महाराष्ट्र-राज्य-साहित्य-संस्कृति-मंडळानें पुरस्कृत

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

वर्ष ४४] त्रैमासिक [अंक १-४

१७३-१७६

ऐतिहासिक संकीर्ण निबंध

८ वा खंड

(स्वीय ग्रंथमाला क्र. ९७)

BHĀRATA ITIHĀSA SAṀSHODHAKA MAṆḌAḶA

Vol XLIV { QUARTERLY } Nos. 1-4

173-176

Miscellaneous Articles On Indian History Vol. VIII

श. १८८८] किंमत ५ रु. [A. D.
रा. श. २९३] Price Rs. 5 [1966

निवेदन

या मंडळाच्या त्रैमासिकाच्या ४४ व्या वर्षाचा हा जोड अंक आहे. हा श. १८८५ मध्यें सभासद असणाऱ्यांसाठीं आहे. या वर्षी आणखी तीन जोड अंक काढून या वर्षाच्या शेवटीं त्रैमासिकाच्या मागील अंकांची भरपाई करावी असा प्रयत्न चालू आहे. यश येईल असें वाटतें.

मागील दोन जोड अंकांप्रमाणें याहि अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळानें भरीव आर्थिक साह्य देण्याचें ठरविलें आहे. याबद्दल मंडळास संतोष वाटतो. मंडळ त्या मंडळाचें अतिशय आभारी आहे.

आपल्या कारभारी मंडळाचे एक सभासद श्री. न. वि. गाडगीळ दिवंगत झाले ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. त्यांच्या पुणें विद्यापीठाच्या कुलगुरुत्वाच्या काळांत त्यांजकडून होणाऱ्या लाभास मंडळ अंतरलें. ईश्वरेच्छा बलीयसी. नवे कुलगुरुहि मंडळ-हितैषी निश्चयानें आहेत.

श्री. प्रा. रा. वि. ओतुरकर यांनीं आपल्या मंडळास कांहीं अटींवर दहा हजार रुपयांची देणगी दिली. याबद्दल त्यांस धन्यवाद द्यावे तितके थोडेच आहेत.

श्री. ग. ह. खरे यांचें 'सिलेक्ट आर्टिकल्स' हें पुस्तक मंडळाच्या पुरस्कृत मालेंत घातलें आहे. मंडळसभासदांसाठीं त्याचें मूल्य साडेपांच रुपये आहे. इतरांस सहा रुपये आहे. पुरस्कृत मालेंत आणखीहि कांहीं पुस्तकें नव्या वर्षांत प्रकाशित व्हावीं असा अंदाज आहे.

या अंकासोबत डॉ. सिंघल यांच्या 'दि स्फिंक्स स्पीक्स' या पुस्तकाच्या डॉ. बा. मो. कानिटकर यांनीं काढलेल्या इंग्रजी सारांशाची प्रत आहे ती पाहावी. अभिनव अनुमान आहे. तो लेख मंडळ त्रैमासिकाचाच अंश आहे.

घटना-सुधारणासंबंधीं सूचना

कारभारी मंडळानें भा. इ. सं. मंडळाच्या चालू घटनेंत सुधारणा सुचविण्यासाठीं घटना-सुधारणा-समिति नियुक्त केली आहे. तरी मंडळाच्या सभासदांपैकीं ज्यांना या घटनेंत कांहीं सुधारणा सुचवावयाच्या असतील त्यांनीं त्या चिटणीस भा. इ. सं. मंडळ यांजकडे लेखी स्वरूपांत ३१ सप्टेंबर १९६६ पूर्वी पाठवून द्याव्या. मंडळाच्या चालू घटनेची प्रत ज्यांना पाहिजे असेल त्यांनीं ती मागवून घ्यावी.

श. १८८८ आषाढ शुद्ध १
इ. १९६६ जून १९

चिटणीस

महाराष्ट्र-राज्य-साहित्य-संस्कृति-मंडळानें पुरस्कृत

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

वर्ष ४४] त्रैमासिक [अंक १-४

१७३-१७६

ऐतिहासिक संकीर्ण निबंध

८ वा खंड

(स्वीय ग्रंथमाला क्र. ९७)

BHĀRATA ITIHĀSA SAṀSHODHAKA MAṆḌALA

Vol XLIV { QUARTERLY } Nos. 1-4

173-176

Miscellaneous Articles On Indian History Vol. VIII

श. १८८८] किंमत ५ रु. [A. D.
रा. श. २९३] Price Rs. 5 [1966

अनुक्रमणिका

क्रमांक	लेखक	लेख	पृष्ठ
1	Anthony D'Costa, Bombay	Muhammad bin Tughluq.	१
2	Dr. P. B. Desai, M. A., Ph. D., Dharwar	A New Haihaya Family.	७
३	श्री. ना. ब. जोशी, विजापूर	वीरमाल सीवाजीचा.	१०
४	,, ,,	कांहीं अज्ञात प्राचीन कवि.	१८
५	श्री. य. ग. फके, पुणें	गंगालहरींतील मूळ पाठ.	२२
६	,, ,,	पंडितराव आणि दानाध्यक्ष भिन्न कीं एकच?	३३
७	श्री. रा. शं. नगरकर, पुणें	गोविंद नरहरी : प्राचीन मराठींतील एक प्रचंड ग्रंथकार.	३७
८	श्री. विनायकराव करमळकर, पुणें	योगिनी मीरा.	४२
९	श्री. य. न. केळकर, पुणें	गणपति पुळें येथील शेंड्ये घराण्याची हकीकत.	४८
१०	प्रा. म. श्री. माटे, पुणें	वास्तुशास्त्र आणि वास्तुशिल्प.	५४
११	श्री. दि. वि. काळे, पुणें	वैजापूरवर भोसल्यांची एक स्वारी.	७०
१२	श्री. रा. चिं. ढेरे, पुणें	संतपूजक पंत.	७३
१३	श्री म. वि. निखळ, पुणें	चिदंबरशिष्य राजाराम याची ग्रंथसंपदा.	८१
१४	श्री. ग. ह. खरे, पुणें	शिखर-शिंगणापूर आणि शिवछत्रपतींचे पूर्वज.	८५

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिकाची केंद्रसरकारच्या नियमानुसार द्यावयाची माहिती (१९५६ चे नियम, नियम ८, नमुना ४)

१ प्रकाशनस्थळ—	भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २
२ प्रकाशनकाल—	त्रैमासिक
३ मुद्रकाचें नांव राष्ट्रीयत्व व पत्ता	दत्तात्रेय वासुदेव आंबेकर; भारतीय आर्यभूषण मुद्रणालय, ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४
४,५ प्रकाशक व साधारण संपादक यांचीं नांवें, राष्ट्रीयत्व व पत्ते	श्री. गणेश हरि खरे, श्री. विश्वनाथ त्र्यंबक शेटे, डॉ. बाळकृष्ण मोरेश्वर कानिटकर, भारतीय; १३२१ सदाशिव पेठ, पुणें २
६ मालक व पत्ता—	भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २

आम्ही उपर्युक्त तिघे प्रकट करतों कीं, आमची माहिती व विश्वास यांप्रमाणें दिलेला तपशील अचूक आहे.

ता. ३०।६।१९६५ **ग. ह. खरे, वि. त्र्यं. शेटे, बा. मो. कानिटकर**

मुद्रक : **द. वा. आंबेकर**, आर्यभूषण मुद्रणालय, ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४.

प्रकाशक : **ग. ह. खरे, वि. त्र्यं. शेटे, बा. मो. कानिटकर**

१३२१ सदाशिव पेठ, पुणें २.

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें

वर्ष ४४] त्रैमासिक [अंक १–४

1. Muhammad bin Tughluq *

(Anthony D'Costa, Bombay)

Muhammad bin Tughluq was the emperor of Delhi from A.D. 13<5–1351, and his reign is one of those rare spells in the history of ancient and medieval India, when almost the entire land was brought under a single rule. True enough he was not the first sultan to cross the Vindhyas into the Deccan; for that had been done for instance by Ala-ud-din Khelji before him, and Ala-ud-din's general Malik Kafur had even advanced as far as the extreme south of the peninsula. All the same, it was Muhammad bin Tughluq who attempted to set up a Muslim administration in the South and even tried unsuccessfully to establish his capital at Devgir, which he renamed Daulatabad.

For the accurate knowledge of Muhammad's impact on the Deccan we depend on medieval Muslim writers like Barani, Ibn Batuta, Isami, and Firishta. But besides that, between the years 1535 and 1540 two Portuguese writers, Fernão Nunes and João de Castro recorded the traditions about this emperor current among the Hindus. Nunes has preserved for us the Vijayanagar tradition, and Castro the Maharashtra tradition. Nunes was utilized by R. Sewell in his well-known history of Vijayanagar, **A Forgotten Empire**; but still, he did not examine too closely the truth of what this tradition says of Muhammad bin Tughluq. Castro, who within a few years of writing this account was to become the Governor and Viceroy of Portuguese Asia (1545–1547), has gone unnoticed till now, and a translation of his account appears in the current issue of **Indica**, the journal of the Heras Institute. This paper is an attempt to compare the two traditions and to understand Muhammad bin Tughluq's impact on Hindu memory.

* ५२ वें संमेलन, श. १८८७ (इ. १९६५)

Both accounts make Muhammad the first sultan to cross the Vindhyas and subjugate Maharashtra and the valley of the Krishna. This must have been because of his attempt to set up a Muslim administration in the South and to establish his capital at Devgir, so that it was he who in course of time became in Hindu memory the representative of the Muslim movement into the Deccan, whereas Ala-ud-din and Kafur were forgotten. But whilst the Vijayanagar tradition attributes this advance to the precise year A. D. 1230, the Maharashtra traditon ascribes it to about the year A. D. 840.

The Muslim historians tell us that Muhammad led several expeditions to the South. First as Prince in 1321, when he overthrew the Kakatiya dynasty of Warangal; next in 1335, when he wanted to punish a Muslim rebellion in Ma'bar, but was obliged to turn back after reaching Warangal; yet again in 1337 to punish his rebellious cousin Baha-ud-din Gurshasp; and finally in 1345 when he crushed a Muslim rebellion at Devgir. Besides that, he resided at Devgir between the years 1327 and 1329 during his ill-fated attempt to make it his capital. Hence, though the Vijayanagar tradition is closer to the actual date than that of Maharashtra, still it enhances the antiquity of events by about a century. Again, after the manner of popular tradition, both accounts simplify history by making Muhammad come down into the Deccan only once and then withdraw. On the other hand the Maharashtra tradition confines itself to the struggle between the Sultan and the Yadava dynasty, while the Vijayanagar tradition speaks chiefly of the overthrow of the ruler of Anegundi in the neighbourhood of the future Vijayanagar.

According to the Maharashtra tradition there was a long and bitter war between Muhammad and Remumdarao, i. e. Ramchandradeva of the Yadava dynasty, till at length "Remumderao (*sic*) was vanquished and killed, and with him all the chivalry of his realm." In fact, however, the Yadavas had been finally overthrown some years before Muhammad came to the throne; and whereas Ramchandradeva more than once, after resisting a while, made his submission to the Sultan of Delhi, it was his successors who fought to the death. We therefore see how tradition endowed Muhammad and Ram-

chandradeva with the character of protagonists in the struggle. The reason why the former impressed Hindu memory in this way have already been pointed out; the explanation why the latter has been thus honoured may be that he made some attempt to resist the invader and was the last Yadava to rule for a considerable number of years, his reign extending from 1271 till about 1310. His two successors rebelled against Delhi and were crushed after short reigns. After that, the Maharashtra tradition goes on to narrate how first the Bahmani and then the five Deccan Sultanates arose.

The Vijayanagar tradition makes Anegundi, in the vicinity of what will soon be the city of Vijayanagar, the centre of the action. Muhammad advances to the attack and the king of the place, after making a last stand at a fortress 'Crynamata', falls with almost all his followers, fighting to the last. But before that, a tragedy is enacted of a kind which was to be witnessed again at Burhanpur when the Maratha troops invaded the place soon after Shambhuji's accession. Led by the king himself the men put their wives and children to the sword in order to save them from dishonour, and then issue from their defences to do battle and die. A few old ministers alone escapes the general massacre. Now events very similar to these are related by the Muslim historians in connection with the rebellion of Muhammad's cousin in 1337. Gurshasp is befriended by the Hindu king of Kampila (of which Nunes's 'Crynamata' may be a variant form); the king is attacked for it by Muhammad's forces and, according to one version, dies fighting after making his family enter the flames. Kampila has been identified with a place of that name not far from Anegundi, and thus the Hindu tradition and the Muslim historians seem to refer to the same episode. However, it is the Hindu tradition which illustrates the humane side of Muhammad's character; for according to it, we see him granting cremation rites to the dead and permitting the king's body to be treated with special honour.

Both the Maharashtra and the Vijayanagar traditions attest to the unrest prevailing among the Hindu population

under Muslim rule. But whereas the former tradition shows us Muslim rule consolidating itself in the Deccan under the independent Bahamani Sultanate, the latter shows us Muhammad bin Tughluq conciliating Hindu feeling like a true statesman by setting up in place of the king of Anegundi one of the old ministers who had survived the disaster. Thus was founded the kingdom of Vijayanagar. On the other hand Firishta describes the rise of Vijayanagar purely as a concerted Hindu attempt to hold Muslim expansion in check, the grace of the Sultan of Delhi having played no part in it. It thus appears that Hindu tradition was kind to the memory of Muhammad bin Tughluq, and it remains to see what more it tells us of him.

In the Maharashtra tradition we see the Sultan, besides vanquishing the Yadavas, also proudly issuing token leather coins "in order to show all people, wheresoever his name and fame reached, how sovereign he was and revered by his subjects." And we know from the Muslim historians that he was indeed given to ambitious projects, and, besides trying to transfer the capital, he gathered an army to conquer Khorasan and then disbanded it, sent an illstarred expedition to the Himalayas, and issued token copper coins. One alone among his contemporaries says that he even tried to make leather currency pass as legal tender. Whether Muhammad actually issued leather money or only planned to do so, or whether this was said merely by way of ridiculing his copper coins, we see that it was the image of him as a proud eccentric man that perpetuated itself in the memory of the Hindus of Maharashtra.

The Vijayanagar tradition also gives us a similar picture of the man. We see him objecting because a ray of sunlight one day strikes his eyes while he is dressing himself in a closed room, and then heedless of all sensible advice he starts out with an army to vanquish the Sun. But soon the dust raised by the marching host obscures the Sun, and he inquires what has become of his enemy. He turns back quite satisfied on being told that he has succeeded in conquering him. Was it the memory of the ambitious plan to annex Khorasan or the Himalayas that continued to survive

in this form? Again, we see the Sultan desirous of seeing all the letters of the alphabet figure in his name. Knowing as we do that he coined for himself more titles than his predecessors had done, is it too much to think that this fact must have survived in popular memory in the form of this conceited wish?

Finaly we see him being told that off the Coromandel Coast there lay "a very big island, the land of which was gold, the stones of whose houses and whatever stones it produced being rubies and diamonds, and in which there was a temple where angels from heaven came down to play music and to dance." He thereupon begins to throw a dam across to Ceylon, and only desists when one of his nobles presents him with a large quantity of gold and precious stones, and makes him believe that it was a tribute from the ruler of the island. Now there is no record of Muhammad ever having personally advanced with an army so far down. It was Malik Kafur who first led the armies of Delhi to Ma'bar or to the far South. This again illustrates how Muhammad's name left so great an impress on Hindu memory as to obliterate those of earlier Muslim conquerors.

The Maharashtra tradition does not say whether Muhammad perpetrated any personal acts of cruelty. But in Vijayanagar he was remembered as the man who used to flay his enemies and prided himself on it by assuming a title to that effect. Here again tradition is not far from the truth, for the Muslim historians record that Muhammad had Gurshasp and some other rebels flayed.

We have already seen that Vijayanagar is kind to Muhammad's memory in tracing its origin to an act of his grace. More than that, it represents him as a holy king, who, as often as he prayed to God, put forth four arms and four hands and was honoured with a shower of flowers from heaven, and who commemorated his exploit in the extreme South by erecting there a temple which became a famous centre of pilgrimage. We have here undoubtedly a reference to the temple of Rameshvaram. Curiously enough Firishta records that Malik Kafur was sent by Ala-ud-din Khalji to reduce Dvarasamudra and Ma'bar, and that he built on the sea coast a mosque

which the Hindus later converted into the temple of Rameshvaram. The striking resemblance between the Vijayanagar tradition and Firishta's narrative inescapably suggests that both refer to the same place, only that the Hindu tradition has substituted Muhammad bin Tughluq for Kafur and made him the author of the temple itself. This calls for a re-examination of the generally accepted view that the Dvarasamudra of Kafur's campaigns is Mysore. For the Vijayanagar tradition leads one to think that Dvarasamudra must have lain in the neighbourhood of the present day Dhanushkodi. Firishta in fact, writing in the beginning of the seventeenth century, says: "The town of Dvarasamudra has, I understand, by the encroachment of the sea, been destroyed and now lies in ruins" a tragedy which has been re-enacted in our own days.

There remains the interesting question as to why the Vijayanagar tradition came to regard Muhammad bin Tughluq with religious veneration. Nor is this veneration restricted to the South, for the North Indian Hindu traditions also hold the Sultan in high regard. Now it happens that we find the Muslim writers censuring the Sultan for putting Hindu nobles in positions of trust and for consorting with Hindu ascetics. The liking for ascetics shows a soul turned towards religious quest. The Vijayanagar tradition, which pictures him in an elevated state of prayer with flowers being showered on him from heaven, finds a striking parallel in a passage of Muhammad's fragmentary autobiography. He tells us how, "while I was afflicted with these sad meditations, a breeze of happiness came down on me from the sky where the wind of divine grace blows." It may have been during a stay in South India that Muhammad specially sought the company of Hindu ascetics, so that the Hindus came to believe in his deeply sincere religious quest, and that was the man whose memory they continued to revere.

Bibliography :

Dom João de Castro, *Primeiro Roteiro da Costa da India desde Goa ate Dio : narrando viagem que fez o vice-rei D. Garcia de uoronha em socorro desta ultima cidade. 1538-1539*, ed Diogo Köpke, Porto 1843.

Chronica dos Reis de Bisnaga, ed. David Lopes, Lisbon 1897.

R. Sewell—*A Forgotten Empire*, London 1900.

Mahdi Husain, *Rise and Fall of Muhammad bin Tughluq* London 1938.

---

2. A New HAIHAYA Family *

(**Dr. P. B. Desai,** M. A., Ph. D., Dharwar.)

Students of Indian History are acquainted with the royal families of the Haihaya lineage, that ruled in Central India. Researches in South Indian epigraphy have however, brought to light the existance of more families of the same stock in the southern regions, who were apparently connected with their kinsmen in the North.

To mention a few, there were the Haihayas who had settled in the Āndhra areas, known as the Koṇa-Haihayas or Haihayas of Kōṇa-maṇḍala. Turning to the present Mysore State, we come across a number of chiefs of the Ahihaya, i. e., Haihaya stock, administering certain tracts in the Sēḍam and Chitāpur talukas of the Gulburga District from their strong-holds at Allūru and Handarki. All these rulers bore the characterstic title Māhishmatīpuravarādhīśvara,[1] i. e., 'Lords of the foremost city of Māhishmatī, reminiscent of their original home.

In 1954, at the invitation of the former Hyderabad Government, I toured in the Raichur District of the present Mysore State and made a good collection of epigraphs. One of these is an inscription from Mānvi, the headquarters, of the taluka of the name in the above district. The epigraph, dated 1052 A.D., refers itself to the reign of the Western Chālukya king Sōmēśvara I and introduces his feudatory Rēvarasa as governing the province of Eḍedoṛe two thousand, which comprised the land between the rivers, Kṛshṇā and Tuṅgabhadrā. This

---

* ४९ वें संमेलन, श. १८८० (इ. १९५८)

1. For details see *Jainism in South India and Some Jaina Epigraphs*, pp. 214-15, wherein I have discussed this topic elaborately.

Rēvarasa belonged to the Haihaya stock as indicated by the two charateristic titles, Māhishmatīpuravareśvara and Kārtavīryakulatilaka occuring in his praśasti.

The inscription further describes Rēvarsa as Mummuṛi-Koṅkaṇiga-baḍavānala (i. e., the submarine fire to the ocean of Mummuṛi, the ruler of Koṅkaṇa), Dhārānagara-bhayaṅkara (i. e., a terror to the city of Dhārā) and Paṇāyakutūhala (i. e., a subject of admiration for the residents of Paṇāya). These epithets which are significant, reveal certain historical events which go to show that Rēvarasa took a leading part in the campaigns of his overlord, directed against his adversaries. One of them was Mummuṛi who must be the same as Mummuṇi, the Śilāhāra ruler of Northern Koṅkaṇa. Another appears to be the Paramāra king Bhōja whose capital, the city of Dhārā, was stormed by the Chālukya forces in the early years of Sōmēśvara I's reign, according to Bilhaṇa's Vikramāṅkadevacharitam and the epigraphic records.[2] The third of the above epithets seems to allude to a similar exploit of Rēvarasa against the Śilāhāras of Karāḍ, who were in possession of the renowned fort of Panhālā, mentioned here as Paṇāya, to be derived from the Sanskrit Parṇālaya.

Rēvarasa, as we have seen, was the governor of a major province in the Chālukya kingdom, and he must have been an influential noble and trusted general. The Mānvi epigraph discloses for the first time that the Haihaya house to which he belonged had their authority extended over the doab area in the Raichūr District. Thus the family of Rēvarasa is one more branch of the Haihayas holding sway in the region of Raichūr.

---

2. D. C. Ganguly, *History of the Paramara Dynasty*. pp. 92-93.

३ वीरमाल सिवाजीचा *

(अफजलखानवधाचा पोवाडा)

(श्री. ना. ब. जोशी, विजापूर)

आजपर्यंत अफजलखानाच्या वधावर अज्ञानदासाचा एकच पोवाडा माहीत होता. आज दुसरा एक जुना पोवाडा उजेडांत आणतांना मला अत्यंत आनंद होत आहे. हा कोणा फतनजी शाहिरानें लिहिला आहे. त्यानें आपली परंपरा अथवा रचनाकाल पोवाड्यांत दिला नसल्यानें त्याचेविषयीं कांहीं माहिती देतां येत नाहीं. पुढेंमागें या पोवाड्याची आणखी एखादी नक्कल मिळून अथवा याच्या आणखी कांहीं कृति मिळून याच्याविषयीं कांहीं चरित्रविषयक माहिती मिळाल्यास हवी आहे.

मला हा पोवाडा ज्या वहींत मिळाला ती वही बरीच जुनी म्हणजे निदान दोनशे वर्षांची तरी असावी. ही वही संगमनेर जिल्हा अहमदनगर येथें एक गळाठा पाहात असतां मिळाली. या वहीची आद्यंतांचीं बरीच पानें गेलीं आहेत. तींत हरदास या नांवाच्या नवीनच ज्ञात होणाऱ्या कवीची व त्याच्या शिष्यांची रचना विशेषत्वानें आहे. या पोवाड्याची ही नक्कल कांहींशी अशुद्ध आहे व कांहीं ठिकाणीं या वहींतील पानें कुजून फाटलीं असल्यानें कांहीं शब्द वा अक्षरें गेलीं आहेत. तरीपण पोवाडा बराच सुस्थितींत मिळाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. नक्लेचें अक्षरहि बरेंच सुवाच्य आहे.

लेखनांतील विशेष येथें नमूद करणें जरूर आहे, सर्व ठिकाणीं 'ख' चे ऐवजीं 'ष' आहे. 'ई' हें अक्षर मोडी ई प्रमाणे आहे. 'ळ' जुन्या वळणाचा आहे. शब्दलेखनांत कांहीं वैशिष्ट्य आढळतें. 'दुर्ग'चें ऐवजीं 'दुरुग', 'पुरंदर'चें ऐवजीं 'पोन्हेधर', 'बंदर'चे ऐवजीं 'वंदर', 'शिरवळ'चे ऐवजीं 'सीर्वळ', 'शहर'चे ऐवजीं 'स्याहार', 'त्याचे' ऐवजीं 'त्याहाचे' इत्यादी. अनेक ठिकाणीं शब्दांतील र हें अक्षर गाळून त्याच्या पुढील अक्षरावर रेफ दिलेला आढळतो. उदाहरणार्थ 'त्यावर डंक' चे ऐवजीं 'त्यावर्डंक', 'वर ठेविला' चे ऐवजीं 'वर्ठेविला' असा लेखनप्रकार दिसतो. 'सत्य' चे ऐवजीं 'सत', 'दिले' चे ऐवजीं 'दिल्हे' 'लिहिली' चे ऐवजीं 'लेहली,' 'आज्ञा' चे ऐवजीं 'अगन्या', 'फौज' चे ऐवजीं 'फऊज', 'कमली' चे ऐवजीं 'कर्मळी', 'चतुर' चे ऐवजीं 'चत्रु' हे लेखनविशेष पोवाड्याचा जुनेपणा दाखवितात 'त्याचे म्हटले पाहिजे केले' हा वाक्प्रयोग जुनेपणाचाच निदर्शक आहे.

अज्ञानदासाचा पोवाडा शिवकालांतच रचला गेला असणें बरेंच शक्य आहे.

* ५५ वाढदिवस श. १८८७ (इ. १९६५)

त्याच्या शेवटच्या चौकांत तसा उल्लेखहि आहे. फतनजीनें हा पोवाडा अफजलखानाच्या वधानंतर कांही वर्षे लोटल्यावर लिहिला आहे. तो म्हणतो, 'मागील मजकूर झाला स्याहिर फतनजी बोले'. किती वर्षानंतर लिहिला हें कळण्यास प्रत्यक्ष साधन नाहीं. परंतु भाषेवरून तो इ. १७०० च्या आगें मागें लिहिला असणें अगदीं शक्य आहे.

फतनजी शाहिरानें या पोवाड्यांतील विधानें फार साक्षेपानें केलेलीं दिसतात. उदाहरणार्थ, तुळजापूरची, भवानी व पंढरपूरचा विठोबा अफजलखानानें फोडल्याचें अज्ञानदास सांगतो, तसें फतनजी सांगत नाहीं. अफजलखानानें विजापूर सोडल्यावर तो वाईस आला एवढेंच तो सांगतो. भवानी व विठोबा लपवून ठेविले होतेच. अफजलखानास शिवाजीविरुद्ध पाठविण्यास पातशाहजादी कारण होती असें फतनजीनें स्पष्टपणें लिहिलें आहे. शिवाजीनें 'जागा वडलाचा'=कोंकण काबीज केल्यानें पातशाहजादीस वाईट वाटलें व रागहि आला. 'बडी साहेब बोले पातस्याजादीः तो चोर आमचा' असें फतनजी लिहितो.

शिवाजी महाराजांचें स्वभावचित्र फतनजीनें अत्यंत मार्मिकपणें रेखाटलें आहे, त्यांचा चाणाक्षपणा व संयम त्यानें अफजलखान व शिवाजी यांच्या संवादांत फार उत्तम रीतीनें दाखविले आहेत. अज्ञानदासानें शिवाजी महाराजांचे तोंडीं अफजलखानास उद्देशून खालील वाक्यें घातलीं आहेत 'तूं तर भटारनीका छोरा' व 'अबदुल जातका भटारी', 'तुमने करना दुकानदारी'. हे शब्द शिवाजी महाराज उच्चारतील काय व उच्चारले नसतांना शत्रूला उद्देशून शाहिरानें घातले तर सहन करतील काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

अज्ञानदासानें म्हटलें आहे कीं, महाराजांनींच अबदुलखानाचें शिर कापलें, संभाजी कावजीनें फक्त भोयांचे पायांना जखमा केल्या व पालखी पाडली. पण फतनजी सांगतो कीं, अफजलखानावर 'संभाजी धांवला आपुन पालखीतून वढुन कापली मान.'

या पोवाड्याचा सर्व अभ्यास येथें अभिप्रेत नाहीं. फक्त या नव्यानें ज्ञात झालेल्या पोवाड्याची तोंडओळख करून देण्याचाच उद्देश आहे. अज्ञानदासाचा एकच एक पोवाडा आजपर्यंत माहीत होता. त्यांत आतां आणखी एका जुन्या पोवाड्याची भर पडत आहे व तो आपल्यासारख्या इतिहाससंशोधकांच्या पुढें अभ्यासार्थ ठेवीत आहे.

वीरमाल सीवाजीचा

प्रथम नमन माझें नीरंजन नीजरूपालाः ॥
नमली माहासरस्वती माझी वीनती सतीगुरुलाः ॥
सीकराचा संभु प्रसन सीवाजी भोसल्यालाः ॥
गाईन वीरमाल तयाचा मारले त्याने अबजलखानालाः ॥

सीवाजी दलभंजन त्याने मारला अबदुलखानः ॥
गड कोट राज्याचे सांगीन चढें चडः ॥
पोन्हेधर कोंडाना रोहेडा तुगी तीकाना ईसापुउंढा.
लोहोगडास नाही जोडा माहा अवघडः ॥
परबळ पेबनार दुरुग माहोली, कोहोज करनाळा भोर पाली.
खेडदुरुग अन जाउली परतापगडः ॥
तळे घोसाळे सुर्गड कंगुरी अनसवाडी धनगड कुरुड राहेरि.
चंदना केळना तोरना कारि जा राजगडः ॥
काबीज केली बीलात कल्याण भीवडी च्यउल वंदर
वाईदेस कराड इंदापुरः ॥
हलठन मानदेस सीर्वळ नीरेचे तीर.
सुपे सासवड कडेपठारः ॥
अवरंगस्याचा मुलुक लुटला स्याहार जुनेर.
झाला मोगलासी दावेदारः ॥
उतरला कोंकनात नाई त्यांवर केली वाहार.
त्याचे मोडले घरोंघर : : ॥ १ ॥
मोडले माहाल माञ्या घर खालची माडी केली वर.
त्यावर्डक होता फार सीवाजीचाः ॥
खबर आणिली मुंलां अमदाने पातस्याजादीणें दीले गऱ्हाने.
कोकन लुटले सीवाजीने जागा वडलाचाः ॥
माझे सा [गणे] करा आधी. त्यावर धाडावी नामजादी.
बडे साहेब बोले पातस्याजादी. तो चोर आमचाः ॥
मग पाचारला भुवाबल. त्याचे नांव खान अबदल.
सीवाजीवर केली चाल. वीडा उचलुन पैजेचा : : ॥
पैजेचा वीडा अबदलखाने उचलीला. सवे घेतले कोन कोनाला : ॥
बाजी घोडपड्या नाईकजी पांढऱ्याला. अकुसखान मबाजी भोसलाः ॥
सीदी सभे सीदी हीलाल मुसेखा रोहेलाः ॥
चौदा हजार घोडा गनतीलाः ॥
कुच करून मग तो वांईदेसा आला : : ॥ २ ॥
वांईस आले दलभार. आईकली राजाने खबर.
खान आले आम्हावर. कैसें करावें : ॥
राजा बोलला आपुनी. खानासी भांडु नका कोन्ही.
ते आहेत आमचे धनी. सत मानावे : ॥

आम्ही खानासी करूं सला. गड कोट मुलुक देउं त्याला.
जाइन पातस्यासी भेटायाला. खानासवें : ॥
हस्यम होतें गडावर. तयास धाडली खबर.
आमचा घ्याया समाचार. जाउलीस यावे ॥ : : ॥
आर्धाले हस्यम गडोंगडचें पाचारीलें.
महाराजे जाउलीस गेले : ॥
स्याला सीवाजी म्हनुन अबजदुलखान बोले.
सीदी हिलाल पुन्यास धाडले : ।।
सीदि सभे नामजाद कोकनामधी केले.
कील्यासी भ[व]तां काहिं न चले: ॥
जाउलीस गेला सीवाजी. जासुद खबर घेउन आले : : ॥ ३ ॥
खबर जासुदाने दिल्ही. बीकट जागा बहु जाउली.
भोवंत्या कळंकाच्या जाळि. लागले बनः ॥
आकासी लागले साव सावडें. चहुंकडे रान अवघे कडे.
तेथें भांडतां गाठ न पडे. नाही मईदान ः॥
अबदुलखाने केली मत. सीवाजीसी करावी सोहलत.
मग करावे त्याला दस्त. कपट करूनः ॥
जोच मुदा अबदुलखानाचा. तोच मुदा सीवाजीचा.
जाउलीस सांपडता यक्रदांचा. तर जाउंना देतुं यथुनः ॥ : : ॥
ईतका वीचार राज्याने आपले मनी केला.
कलु नाहि दीधले कवन्यालाः ॥
लीहली कितावत मग हेजीब पाठीविला. तुम्ही खानासी करा सलाः
तुम्हा वेगळे आनीक कोन्ही नाहिं आम्हालाः
तुम्ही मनी कोप कां धरीलाः ॥
स्याजी राज्यांस तुम्हासी भाउपन. तुम्ही चुलते व्हावेत आम्हाला : : ॥ ४ ॥
खानने हेजीबासी सांगीतले. पातस्याने आम्हासी पाठीविले.
त्याचें म्हतले पाहीजे केले. मोडेना बोलः ॥
त्वां मनचे कपट टाकावे. आम्हासी भेटाया यावे.
पातस्यापें नेईन आपल्यासवें. देइन कउलः ।
पातस्याजादी बडेसाहेब. आमचा मोडत नाहीं जाब.
असा आहे माझा परताब. चालो तो बोलः ॥
अमझा दीली हेजीबाला. आपला हेजीब सवे दील्हा.
जा तुम्ही घेउन या राज्याला. दाखउन कउलः ॥

अबदुलखानाचा हेजीब आला सीवाजी पासी.
कउल दाखवीला राज्यासी: ॥
डोईवर्ठेवीला कउल मान दील्हा तयासी.
अदरमान केल्हा हेजीबासी: ॥
तेथे येतांबहु भें वाटतसे आम्हासी.
येथेच आना खान साहेबांसी: ॥
लेहली किताबत मग दीधली हेजीबासी.
हेजीब आला खानापासी : : ॥ ५ ॥

खानाजवळ बोले हेजीब. तुम्ही आयका खानसाहेब
सीवाजीने लीहिला जाब वीनती आयकावी: ॥
तुम्ही वडील आम्हासी खरें. आमचें करूं पाहाता बरें.
येथे यउन सांगा वीचारे. अगन्या द्यावी: ॥
तुमचें आमचें येक मन. येथें नाहीं दुजेपन.
कुरुपा करावि येउन. वुध सांगावी: ॥
मग अबजलखान बोलला कुच करा उठा चाला
मोहे...जी पाठवीला. खबर राजीहेसी...गावी: ॥ : : ॥

उठ्ला अबजलखान मनी धरूनी कपट.
त्याने धरली जाउलीची वाट: ॥
पुढे चालेत हती घांटाचे घनघनाट.
पाटीसि फउज चाले कट: ॥
माहा सायासे उतरला रडतोंडीचा घाट.
तेथे होतें सीवाजीचें भेट: ॥
राज्याने घातले मांडव बरवां जागा पाहुन तळवट: : ॥ ६ ॥

मांडव घालुन केली हवा. आनला हरजीनसी मेवा.
तर हा खान साहेबांसि न्यावा. राजा बोले: ॥
सीर व्हाहुनी धाडीला माल आनीक पालकी दिल्ही सुकपाल.
त्यास देखुन खुसी हाल. खान झाले: ॥
रात्र कर्मली चत्रु पाहार. तर वर उगवले दिनकर.
खानने पाचारले माहालदार. धाडुन दीले : ॥
महालदार म्हनेत सीवाजीला. खान पाचारीतात तुम्हाञ.
राजा म्हने येतों चला. पुढे लावीले : : ॥
येतां यता झाला तीपाहार. खान म्हने कां लात्रीला उसीर.
भाउबंद सकळ मीळाले [स] हदर. तया सागीतला वीचार : ॥

चाळीस हजार पायेंदळ ठेवलें रानाभीतर.
मत मऱ्हाव्याची थोर : ॥
जंई मी अगाज करीण परतावगडावर.
तई तुम्ही घाट धरा वरजोर : : ॥ ७ ॥
तुम्ही बळकट धरा घाट. मी घेतों अवजलखानाची भेट.
त्यास आपल्यास जीवा साट. मीं करीन : ॥
गडोंगड नाईक हस्यम. तयासी सांगा माझा रामराम.
तुम्हास स्याजीराज्यासि काम. जातों नीरउन : ॥
मग पाचारीले ब्राह्मनाला. दान दक्सेना दीली त्यांला.
मग संकळोक घानला. पुसलें वचन : ॥
भटें सागीतला महुर्त. राजे सिद व्हावें तवरीत.
होउनी येसील येसवंत. सत जान : : ॥
सोयेरे धायेरे सकळ वीनवीति सेवक.
जाउं नये अबजलखानास मोक : ॥
अस्याच गति त्याने ठकीलें करनाटक.
मोटा अवजलखानाचा धाक : ॥
राजा म्हने तुम्ही भेउं नका सकळिक.
मी आहे तयाहुन आदीक : ॥
घेईन त्याचा परान तर मी संभुचा सेवक : : ॥ ८ ॥
राज्याने कीस्मवत आवीलि बरी.
सीले लेउन केली वरजोरी. झग्यावर डगला मुसेजरी. राजा त्याला: ॥
डोईस टोप वर लपेटा. माहालदारानें दीधला पटा.
हाती बिचवा सत्रकाटा वागनक त्याला: ॥
सीवाजीने पाठवीला माहालदार. सांग जा खानासी खबर.
तुम्हाकारने सदर. आरंब केला: ॥
तुमचे आमचे पांच जन. येथे नाही आनखासी कारन.
तर मी तुम्हासी भेटेन. राजा बोलीला : ॥
सीवाजीचा माहालदार आला खानापासी.
तसलीम करून उभा सभेसी : ॥
महाराज्याने वीनती सागीतली तुम्हासी.
सदर सवारली तुम्हासी: ॥
तुमचे आमचे पांच जन कारन नाहि आनखासी.
तर मी भेटेन तुम्हासी: ॥

मऱ्हाठ्याची मत न कळे अबजल खानासीः ॥ ९ ॥
मग बोलला अबजलखान पाचारीले भोई पालखी आन.
येक पेसवा दुसरा पठान. सर्वे घेतलेः॥
पालखी आनवीली सुकपाल. त्यामधी बैसला उभवाबल.
माहालदार उडवीति रुमाल. पांच जन ज[हा]ले ॥
पहिला बंक अनामीकाचा दुसरा बंक तो भुयाचा.
तीसरा जागा तों सीपायाचा. महालदार बोलेः ॥
चवथा कारकोनाचा दप्तरः पांचवि राज्याची सदर.
उजड पडला तयावर. पाहो लागले : : ॥::॥
जिकडे पाहे तीकडे अवघा लखलखाट.
जरतार झमकती तगटः ॥
पातस्याही सदरा करितो अईसा मऱ्हाटा धीट.
खानाने मनि धरीला कपटः ॥
पालखीत बसुन सिवाजी येत होता नीट.
पडलि अबदुलखानावर दीस्टः ॥
पालखीतुन उतरून सनमुख उभा राहेला निट :: ॥ १० ॥
राजा उभा राहेला नीट, अबजलखान करी दाटादाट.
राजा हडती घालुन दीस्ट. धरलें मतः ॥
सीवा काये आहे तुझेच नावं
गुमान करितोसी बहु. खातोस पातस्यायाचे गावं.
अवघी विलातः ॥
गड त्वां घेतले पास्यायाचे. तर तुला कैसे जीरतील. त्याचे,
ठाव ना उरेत तुरेत तुमचे. पिरथीमीतः ॥
वाईट तुं चीतले आपल्याला. दावा पातस्यासी लावीला.
मग महाराजा बोलीला. जोडुन हातः ॥ : : ॥
हात जोडुन सिवाजी बोलला आपुन. अ... याल तर मी सागीनः
सरदेचा मुलुख तुमचा तर म्या केला जतन.
फउज मोगलासी बांधोनः ॥
मोगोल गेलेत काबीज कराया कोकन.
त्यापासुन घेतलें सोडउनः ॥
आनला माल दील्हा सीपायासी वाटून.
डोंगर म्या गड केले बांधोन : : ॥ ११ ॥
डोंगर बांधोन केले कीले. पैके पदरचे लावीले.
कैसे देउं राजा बोले. मी तुम्हालाः ॥

गड जर देईन पातस्यायासी. साहेब काये देतील आम्हासी.
परमाना असेल तुम्हापासी. पाहो द्या मलाः ॥
पेसवा बोलला अबजलखानाचा.
परमाना काई करसिल पातस्याचा.
माथ्या हात घे खानाचा. घेने तुलाः ॥
जाये तुं खानासी सरनं. डोई पोटांत घालुन.
सळ अन्याव घे मागुन. पेसवा बोलिला : : ॥ : ॥
राजा म्हने तुमचे थोर केले अन्याव.
म्या राखले तुमचे ठावः ॥
खान आन आम्ही आहुं पातस्यायचे उमरावः
तुम्ही काये बोलतात गो[वि]दरावः ॥
पर्माना असेल पातस्याचा. सीका मजला दाव.
गड अन मुलुक देईन ठावः ॥
वाईट लागले अबजलखानाला.
त्याने मनी धरला सामाव :: ॥ १२ ॥
पेसवा बोलला मने भाव. तुम्ही खानासि भेटावं.
मनाचें कपट टाकुन द्यावं. करा दूरः ॥
फीरंग घ्या खानाचे हातची. संका नाही गेली मनाची.
अकल बुद मऱ्हाट्याची. वीचार्थोरः ॥
खाने माहालदार पाचारीला. फीरंग देऊन वेगळा केला.
राजा संनमुख चाललाः भेटी सामोरः ॥
धीट पाट नेहट सीवाजी राजा. बोलने बोले बरव्यां वोजा.
वैरयास न म्हनावे माझा. पाहे चौफेरः ॥
सीवाजी अबजलखान भेटले दोघे जनः
दोन्ही धुरा आहेत. संगीनः ॥
पोटांत डोई घातली खानाने धरला गवसुन.
कटारा मारलि वढुनः ॥
जीऱ्हेवर न चले काहिं टाईच आला लेउन.
मग वचकला अबजलखानः ॥
राजाने हीचकली संगीन. बैसक घेऊन.
बीचवा [मार] ला वरम पाहुन : : ॥१३॥
वडला वाघनखांचा हात. फुटलें पोट झाला घात.
खानने फीरंग घेउन सावचीत. हात टाकलाः ॥

राज्याने घेतला पख्यावर वोढुन मारी दुसरा मार.
पालखी आनवीली लवकर खान चालला : ॥
राजा म्हने संभ्या धावं. वैरयासी नको जाउं देउ.
काप सीर तुं नको भेउ रे कवन्याळाः ॥
संभाजी धांवला आपुन. पालखीतुन वढुन कापली मान.
तीकुन फीरला तो पठान. घायास आला :: ॥
सात पांच मीळुन पडले पठानावर.
त्याचा मारून केला चुरः ॥
राजा म्हने ऐसा जनमेना आनीक सुर.
यास मुठीमाटी द्या लवकरः ॥
मारला अबजलखान कापला त्याचा सीर.
घेऊन गेला परतापगडावरः ॥
गडावर जाऊन केले भांडयाचे भडमार.
हसमाला तेच झाली खबरः ॥
हसमास खबर झाली सहीं, ईजेर्दे बांदल चंदर राई.
क[रून] कटकावर धबघाई [उ]ठली लाटः ॥
अवध्या कटकास घातला वेढा.
घायास येईल तो हान पाडा.
हत्यार टाकील त्यासी सोडा. द्यावि वाटः ॥
पठान मुसेखा रोहेला. आपले जमेतसी तयार झाला.
तर तो मारीत नीघाला. वेघला घाटः ॥
सरजा सीवाजी दलभंजन उमराव धरले पांच जन.
सकळ कटक लुट्टन केले. चटः ॥
वाईस गेला रोहेला मुसेखा पठान.
तेथे होतो फाजीलखानः ॥
त्यास घेऊन पळाला रातचा दीस करून.
गेला वीजापुरा घेउनः ॥
रडे पातस्याजादी हे खबर आयेकुन.
सिवाजीने मारला अबजलखानः ॥
नामजाद केला रुस्तमजमा सवे दीधला फाजीलखानः ॥ १४ ॥
फाजीलखान रुस्तमजमा. त्यांनी बरवा केला सामा.
केल्या वीजापुरीहुन धुमा. चाले भारः ॥
वाईस सीवाजी आला. गनती मोहो...तला.
मग तो मारीत चा[लला त्या]चे सामोरः ॥

दोहीस झालेसे भांडन. घातले कोठात मारून.
ते दारवठे देउन बसले वरजोरः ॥
जासुद पनाळाहुन आला. राजा म्हने येंथन चला.
येकायकीच वेधला गडावर : : ॥
घेतला पनाळा सीवाजी झाला स्वार.
वेढुन बसला सीदि जोहरः ॥
अवरंगाबादीहुन चालले मोगलांचे दळभार.
नबाब सास्ताखा सुबेदारः ॥
घेतले सुपें सासवड जाळला सिवापुर.
पुन्यामधी राहेले महीने च्यारः
उतरला गडिहुन राजा चौकीस भांडन झालें थोर.
राजगडा आले ते राजेस्वरः ॥ १५ ॥
सोडला पनाळा राजगडास राजे आले.
आवासाहेब जीजाई हीं आहे माहा आनंदें भेटले.
भांडु मोगलासी मोगल मुलुखात आलेः
मागील मचकूर झाला स्याहिर फतनजी बोलेः ॥+

---

४ कांहीं अज्ञात प्राचीन कवि.*

(श्री. ना. ब. जोशी, विजापूर)

१९६४ च्या डिसेंबरांत संगमनेर येथें कांहीं कामानिमित्त गेल्या वेळीं पोथ्या वगैरेंचा एक गळाठा पाहावयास मिळाला. तो पाहात असतां आद्यंतांची बरीच पानें फाटलेलें एक बाड पाहावयास मिळालें व कांहीं सुटी पानेंहि मिळालीं. एक दोन लहान प्रकरणांच्या पोथ्याहि मिळाल्या हा गळाठा नीट तपासतां त्यांमध्यें आजपर्यंत अज्ञात अशा कांहींचें लेखन पाहावयास मिळालें. लेखन पद्यांत आहे. त्यापैकीं कांहींच्याबद्दलचीं टाचणें आज आपल्यापुढें ठेवीत आहे.

वर ज्या बाडाचा उल्लेख केला ती एक उभी वही असून तिची आद्यंतांचीं निदान पन्नास पाऊणशें पानें तरी नष्ट झालीं आहेत. उरलेल्या भागामध्यें पांच सहा कवींचीं

+ वरील नकल करतांना ब चे ऐवजीं ख केला असून स्पष्ट असलेल्या चुका फार जरूर तेथेंच दुरुस्त केल्या आहेत. फाटलेल्या जागीं समासांत शक्य तीं अक्षरें वा शब्द सुचविले आहेत. मूळ शक्य तों जसेंच्या तसें ठेविलें आहे.

* साधारण पाक्षिक सभा ५, श. १८८७ (इ. १९६५)

पदें व छोटीं प्रकरणें आहेत. हीं मूळ लेखकाच्या हातची वही नसून ती निदान चार पांच निरनिराळ्या नकलकारांनीं केलेल्या नकला आहेत. हरदासाच्या कृतींना त्यांत प्राधान्य असून त्याच्या पुरुषोत्तम नांवाच्या शिष्याचे लिखाणास त्याच्या खालोखाल जागा दिली आहे. याच वहींत शाहीर फत्तनजीचा अफजलखानाच्या वधाचा पोवाडा आहे. या पोवाड्याचें स्वतंत्र टांचण सादर केलें आहे व पोवाड्याची नकलहि त्याबरोबरच दिली आहे.

ही वही निदान दीडशें ते दोनशें वर्षांची तरी जुनी असावी असें वाटतें. या वहींत मध्येंच रिकाम्या जागेंत पांच सहा ठिकाणीं मोडींत आधुनिक वळणाच्या व निराळ्या शाईंत कित्त्याचा मजकूर असून एका पानावर कार्तिक शक १७५१ चा निर्देश मोडीमध्यें केलेला आहे. वहींतील मूळ मजकुराच्या अक्षरांचें वळण व लेखनपद्धति यांचा विचार करतां ती वही शक १७०० च्या सुमाराची असावी असें दिसतें. तीमधील मजकूर अर्थात् त्याच्याहिपेक्षा जुन्या काव्यांच्या नकला आहेत. या सर्व गोष्टींचा सामग्र्यानें विचार करतां वहींतील कविता निदान श. १६२५ ते १६७५ च्या दरम्यानच्या असाव्या असें अनुमान केल्यास तें चुकीचें ठरणार नाहीं. या वहींतील सामुद्रिक हें प्रकरण कोणा येधोजी गडगावन यानें लिहिलें असून तें गीत ऐकणाऱ्यांत रामदास होते असें म्हटलें आहे. हे रामदास प्रसिद्ध रामदास स्वामीच असतील तर त्या प्रकरणाची रचना शक १६०३ मधील अथवा त्याचेहि अगोदरची मानावी लागेल. असो.

नकलकार अशिक्षित दिसतो. त्यामुळें भाषेच्या व शब्दलेखनाच्या बऱ्याच चुका आढळतात. मात्र एकंदर कवितांचा विचार करतां त्या हरदासाच्या परंपरेंतील लोकांनींच नकल केल्याचें दिसतें. पूर्ण वही हातीं लागली असती तर एक अज्ञात परंपरा व बऱ्याच अज्ञात काव्यकृति उजेडांत आल्या असत्या.

या वहींतील सर्व प्रकरणें व कवि यांचे संबंधीं न लिहितां फक्त हरदासांसंबंधींच अगदीं त्रोटक माहिती व त्याच्या कवितांची ओझरती ओळख करून देणार आहे.

हरदास अथवा हरिहरदास यांच्या चरित्रपर अशी कांहींच माहिती मिळत नाहीं. यांच्या लहान मोठ्या सर्व ग्रंथांचा कांहींच ठावठिकाणा संशोधकांस अद्याप तरी लागल्याचें दिसत नाहीं. श्री रामदासी संशोधानाच्या ३९ व्या बाडांत हरिहरदासाच्या पवनविजयाचा उल्लेख असून त्यांतील ५ व ६ अशा ओव्या तेथें दिल्या आहेत. पण त्या या हरदास वा हरिहरदासाच्या वाटत नाहींत. या वहींत कोठेंहि नृसिंहास नमन नाहीं. श्री. ढेरे यांना एका हरिहरदास मालोची पवनविजयाची त्रुटित पोथी मिळाली आहे. प्रस्तुत बाडांतील हरदास वा हरिहरदास वेगळा दिसतो. या वहींतील हरदासाची रचना पाहतां त्यांत एकहि ओवीबद्ध प्रकरण नाहीं. या बाडांतील बहुतेक सर्वच कवि व त्यांच्या कृति अज्ञात आहेत. असें म्हणण्याचे कारण आतांपर्यंत प्रकाशित झालेल्या सूचींत यांचे निर्देश नाहींत. या बाडांतील कविता वाचून एक स्पष्ट कळतें कीं हरदास हा एक संत कवि होता

तसाच शाहीरहि होता. या हरदासाच्या रचनांची आतां त्रोटक माहिती देत आहे. त्याचा हेतु संशोधकांच्या काव्याकडे लक्ष वेधण्याचा आहे.

१ अजपा पिंडीचीं ९ पदें पानें फाटल्यानें त्रुटित.

२ अजपा ब्रह्मांडीचीं ११ पदें त्रुटित पानें, पण वरच्यापेक्षां जास्त सुस्थितींत.

३ मुंगीचें पद ४ पदें यांत अखेरचा पारमार्थिक अनुभव आहे

" अनेक मार्ग अनंत पंथः ॥ वीवेक विवर अर्थ परमार्थः ॥
समरस वेद शास्त्रें गरंथः॥ हरदास म्हणे समर्थ सतिगुरुराजाः ॥ ४ ॥

४ सुलतान का सफर, ५४ हिंदी पदांचें प्रकरण.

" बोले हरदास स्याहिरः पुरसोतमपीर. दस्त पंज्या दीयेः ॥

५ गोपीवस्त्रहरण. लावणीच्या चालीचीं २९ पदें.

यामध्यें चंद्रवदना गवळण नायिका आहे. ती श्रीकृष्णास वश न झाल्यानें वस्त्रहरणाचा प्रसंग उद्भवला असें यांत दाखविलें आहे. काव्य उत्तम आहे.

६ राधारुक्मिणी संवाद ११ पदें.

रुक्मिणी शृंगार करून श्रीकृष्णाची मार्गप्रतीक्षा करीत असते. पण तो वृंदावनांत गेलेला लवकर येत नाहींसें पाहून ती राधेस त्याला बोलावून आणण्यास पाठविते. राधा कांहीं कालानें परत येते. राधेकडे पाहून रुक्मिणी तिला छेडते. असा प्रसंग यांत वर्णिला आहे. काव्य फार बहारीचें आहे.

७ अनसूयाआख्यान १८ पदांचें. यांत दत्तजन्मकथा आहे.

८ अंगद शिष्टाई. दोन प्रसंग. पहिल्यांत २५ पदें व दुसऱ्यांत ३२ पदें.

" एथन सुंदरकांड संपले : मग येउधा (युद्ध) कांड आरंभलेंः जे कां वालमीकें कथीलेंः तें म्हणे हरिहरदासः ॥ ३२ ॥

९ रामकीर्तन. यांत रामरावणयुद्धाची कथा ३० पदांत वर्णिली आहे. कवीनें रावणाचा वध न घडवितां तो युक्तीनें पळून गेल्याचें दाखविलें आहे.

" न साहवे सेस्त्रमार भेणे मुरडला लंकापतीः ॥
केली माव पळाला राक्षेसः माघे परतले आदी पुरुसः ॥
म्हणतसे हरदास आइका रामकीर्तणः ॥ ३० ॥"

या आख्यानांत वाल्मिकी रामायणापेक्षां कांहीं निराळी कथा आढळते.

१० निराकाराची खूण= ११ पदांचें प्रकरण. यांत स्थूल सूक्ष्म विचार सांगितला आहे व शेवटीं म्हटलें आहे.

" अहीसी सांगितली येदांतील खुनः ॥
आईका हो सुरतेनो तुम्हा सांगितले गुजज्ञानः ॥
म्हणे पुरुसोत्तम हे काय नीराकाराची खुणः ॥
म्हणे हरिहरदास लटका सांडावा अभीमानः ॥ "

निराकाराची खूणहि दाखवितां येत नाही. सर्व अगम्य आहे. त्याचा फक्त अनुभवच घ्यावयाचा आहे. शब्द स्तब्ध होतात. हें कवि आपल्या शिष्यास–पुरुषोत्तमास सांगत आहे.

११ दिवा=२ पदें. ज्ञानाचा दिवा लाऊन निजवस्तु शोधा असें यांत सांगितलें आहे.

येथवर हरदासाच्या कवितांची ओळख करून दिली. आतां आणखी एका अज्ञात कवीची, छंदोबद्ध रचना करणारा म्हणून कवि म्हणावयाचे इतकेंच, ओळख करून देतों. तो म्हणजे 'श्रीधर'. हा प्रसिद्ध श्रीधर ब्रह्मानंदापेक्षां वेगळा आहे.

याचा कुंडार्णव हा छोटा ग्रंथ मिळाला आहे. हा ग्रंथहि संगमनेर येथील गळाठ्यांतीलच. हा ग्रंथ आपण अनेक ग्रंथांतील व्यवस्था पाहून लिहिला असल्याचें कवि सांगतो. यज्ञादींच्या करितां कुंडें कशीं तयार करावयाचीं, त्यांचे आकार कसकसे असावे, मोजमापें काय प्रमाणांत असावीं वगैरे विषय यांत आहेत. त्याचप्रमाणें यज्ञादींच्याकरितां मंडप, त्यांची रचना वगैरेंची सविस्तर माहिती तो या ग्रंथांत देत असून हेमाद्रि वगैरेंचीं आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ प्रमाणें देतो. ग्रंथ १९४ श्लोकांचा आहे.

या ग्रंथकाराने आपली माहिती दिली आहे ती अशीः——

श्रीरामभट्टात्मज श्रीरघू जो शिवार्चनी तत्पर सर्वदा जो ॥ १९३ ॥
त्याला असे पुत्रहि कृष्णभट्ट तत्पुत्र नागेशहि सर्वश्रेष्ठ ॥
तत्पुत्र श्रीसूर्यहि वत्सगोत्री तत्पुत्र जो श्रीधर अग्निहोत्री ॥
तेणे असे मंदमतीस केला संपूर्ण कुंडार्णव सिद्ध जाला ॥ १९४ ॥

या माहितीबरोबरच त्यानें आपलें गांव रचना शक वगैरे माहिती दिली असती तर बरें झालें असतें. पण त्यानें ती दिली नाहीं त्याला काय करणार !

आतां आणखी एका कवीच्या एका छोट्या कवितेविषयीं लिहून ही टिप्पणी पूर्ण करतों. हें एक कोणा आनंदसुत मुद्गलानें लिहिलेलें १७ श्लोकांचें रुक्मिणीस्वयंवर आख्यान आहे. रुक्मिणीस्वयंवरावर नवनवीं लहान मोठीं काव्यें उजेडांत येत आहेत. त्यापैकींच हें एक आहे. याचा रचनाकाल अथवा कवीसंबंधींची कांहीं माहिती त्यांत नाहीं. पण मी मुद्दाम येथें याचा निर्देश करीत आहे तो एका कारणाकरितां. रुक्मिणी-स्वयंवर काव्यास संतोष मुनीनें 'रुक्मिणी सैंवर' हें नांव दिलें. तें डॉ. कोलतेना मान्य नाहीं. असें नांव असूं शकणार नाहीं असें त्यांचें म्हणणें. परंतु या आनंदसुत मुद्गलानें आपल्या काव्यास " लघु रुक्मीनी सैंवर " असें नांव दिलें आहे. हें काव्य निदान दोनशें वर्षांपूर्वी लिहिलें असावें. तेव्हां रुक्मिनी सैंवर असें नांव प्रचारांत होतें हें मला या निमितानें दाखवावयाचें आहे. या काव्याचीं जीर्ण पानें हातीं लागलीं आहेत व तीं दोनशें वर्षांपूर्वीचीं खात्रीनें आहेत.

---

५ राघवकविकृत गंगालहरी समश्लोकीवरून कळणारे

गंगालहरींतलि मूळ पाठ.

(श्री· यशवंत गणेश फफे, पुणें)

जगन्नाथपंडितकृत गंगालहरीस्तोत्र भारतांत सर्वत्र सुप्रसिद्ध आहे. अनेकांच्या तें कंठगतहि असतें. पण त्यांत बरेच पाठभेद आडळतात. त्यांचें संशोधन होऊन कवीचे मूळचे पाठ कोणते आणि मागाहून पडलेले अपपाठ कोणते याची निश्चिति होणें अगत्याचे आहे. पाठनिश्चितीचें सर्वोत्तम साधन म्हणजे कवीची स्वहस्तलिखित प्रत होय. तें साधन तर येथें उपलब्ध नाहीं. दुसरा मार्ग म्हणजे जुन्यांत जुनीं अनेक हस्तलिखितें पाहून कवीची विषय मांडण्याची विशिष्ट धाटणी आणि त्याचें पदलालित्य म्हणजे अनुप्रासादि योजण्याची विशिष्ट सरणी यांच्या अनुरोधानें पाठनिश्चिति करणें. अशा प्रकारें कांहीं पाठांची निश्चिति होऊं शकेल. ती आपण पुढें पाहूंच. प्रस्तुत गंगालहरीपुरतें पाठनिश्चितीचें तिसरें संभाव्य साधन म्हणजे या स्तोत्राचा जो मराठी समश्लोकी अनुवाद सर्वप्रसिद्ध आहे तो. म्हणजे जिला " वामनी गंगालहरी " म्हणतात ती. पण परीक्षणाअंतीं असें आढळून येतें कीं, ही समश्लोकी यथार्थदीपिकाकार वामनपंडितानें केलेली असणें शक्य नाहीं. यथार्थदीपिकाकार वामनपंडित हा जगन्नाथपंडिताचा बहुतेक समकालीन–फारतर पाव शतकानें पुढचा–होता आणि वामनी गंगालहरी म्हणून म्हटली जाणारी जी समश्लोकी तिची रचना तर मूळ संस्कृत गंगालहरीत कालांतरानें अनेक अपपाठ उत्पन्न झाल्यानंतर बऱ्याच पुढल्या कालांत झालेली आहे. शिवाय या मराठी समश्लोकींतहि पुन्हा अनेक अपपाठ पडलेले आहेत. इतके कीं, या मराठी समश्लोकीचे मूळ पाठ कोणते हें उलट संस्कृत गंगालहरीच्या अनुरोधानें शोधावें लागतें! अशी स्थिति असल्यानें जगन्नाथी गंगालहरींतील मूळ पाठ ठरविण्याचे कामीं या वामनी म्हटल्या जाणाऱ्या समश्लोकीचा तादृश उपयोग होण्याजोगा नाहीं. अशी अवस्था असली तरी संस्कृत गंगालहरीचे मूळपाठ निश्चित करतां येतील असें एक उत्कृष्ट साधन सुदैवेंकरून उपलब्ध झालेलें आहे. तें म्हणजे गंगालहरीचा राघव कविकृत मराठी समश्लोकी अनुवाद हें होय. यास आपण राघवी गंगालहरी असें म्हणूं.

राघवकवि म्हणजे रघुनाथपंडित मनोहर चंपावतकर. हा अनेक शास्त्रांत पारंगत, पंडित व मोठा प्रतिभाशाली कवि होऊन गेला. यानें संस्कृतांत अनेक विषयांवर पद्यात्मक उच्च प्रतीचे ग्रंथ लिहिले आहेत. याचें वैद्यविलास, चिकित्सामंजरी व नाडीज्ञानविधि हे वैद्यकावरील, वृत्तसिद्धांतमंजरी व छंदोरत्नावली हे छंदःशास्त्रीय आणि कविकौस्तुभ हा साहित्यशास्त्रावरील ग्रंथ आहे. याची माहिती अलीकडेच उपलब्ध

झालेली आहे. वैद्यविलास हा ग्रंथ इ. १६९७ त लिहिलेला आहे. तो या रघुनाथपंडित मनोहरानें परिणत वयांत लिहिलेला दिसतो. त्यांत तो आपल्या ग्रंथास महाकाव्य म्हणतो व आपल्या नांवामागें 'कविकुलावतंस' असें बिरुद जोडतो. मनोहरकुल हा अंबोधि, रघुनाथपंडित हा त्यांतून निघालेला चंद्र, त्याचीं काव्यें हेच त्या चंद्राचे किरण आणि रसिकांचें हृदय हें त्या चंद्रकिरणांनीं विकासणारें कमळ असें सुंदर रूपक योजून हा कवि आपल्या कवित्वशक्तीचें आत्मविश्वासानें वर्णन करतो. इतकेंच नव्हे तर "ननु तर्कमुखाखिलवाग्रचना — घटिकाशतपद्यनिषण्णमतिः" म्हणजे कोणत्याहि विषयावर एका घटकेंत शंभर पद्यें रचण्याइतके शीघ्रकवि आपण असल्याचेंहि तो साभिमान सांगतो. त्याच्या परिणतप्रज्ञतेस हें शोभून दिसतें. पण हाच कवि गंगालहरी-समश्लोकींत फार लीनतेनें व बिचकत बिचकत बोलतो. तो म्हणतो, 'जगन्नाथाचें काव्य हें नारिकेल फल आणि आपण तर लहान चोचीचे पोपट. सारा जन्म वेचला तरी त्याचा भेद आपणांस होणें नाहीं. जगन्नाथादि थोर कवि म्हणजे काव्यरूप आकाशांत भ्रमण करणारे चक्रांग आणि आपण केवळ शलभ. तथापि बालकाचें बोबडे बोल ऐकून पिता प्रेमानें त्याचें कौतुक करतो, तद्वत् विद्वज्जनांनीं माझ्या काव्याचा आदर करावा असें कवि सविनय विनवितो. यावरून गंगालहरीचा हा अनुवाद राघवकवीनें म्हणजे रघुनाथपंडित मनोहरानें आपल्या पूर्ववयांत केला असावा असें दिसतें. हा अनुवाद सामान्यतः समवृत्त समश्लोकी आहे. मात्र तो निरपवादपणें तसा नाहीं. श्लोक १२, २०,२४ व ३८ यांचा अनुवाद समवृत्त असला तरी प्रत्येकीं दोन श्लोकांत केलेला असून श्लोक ४९ चा अनुवाद दोन आर्यांत केलेला आहे. दुसरें असें आढळतें कीं, एका हस्तलिखित प्रतींत जेथें दोन आर्या आहेत तेथें दुसऱ्या प्रतींत एकच समवृत्त श्लोक आहे. यावरून असें अनुमान निघतें कीं, राघवानें हा अनुवाद केला त्या वेळीं तो जगन्नाथाच्या काव्याचें सौंदर्य व मर्म जाणण्याइतका विद्वान् व मर्मज्ञ असला तरी पद्यरचनेच्या कलेंत तो सिद्धहस्त नसून प्रयत्नशील होता व म्हणूनच पूर्ववयी होता. गंगालहरी समश्लोकी हें त्याचें पहिलेंच काव्य असावें. वैद्यविलासाचे रचनाकाळीं रघुनाथपंडित मनोहर साठीचे घरांत व ही समश्लोकी रचण्याचे वेळीं पंचविशी-तिशीचे घरांत होता असें मानिलें तर उघडच या समश्लोकीचा रचनाकाल इ. १६७० च्या सुमारास येतो. आख्यायिकेवरून गंगालहरी हें जगन्नाथपंडिताचें शेवटचें काव्य दिसतें. तसें तें नाहीं हें खरें तरी तें परिणत वयांतीलच आहे. त्याचा रचनाकाल इ. १६५० ते १६६० च्या सुमाराचा म्हणावयास चिंता नाहीं. यावरून मूळ गंगालहरीच्या रचनेनंतर दहा वीस वर्षांच्या–पाव शतकाच्या आंतच राघवी गंगालहरी झाली आहे असें म्हणावयास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. हें मध्यंतर फार अल्प असल्यानें तेवढ्यांत मूळ जगन्नाथी श्लोकांत अपपाठ उत्पन्न झाले असण्याचा फारसा संभव नाहीं. आणि म्हणून राघवी गंगालहरी हें संस्कृत गंगालहरीच्या पाठचिकित्सेचें अत्युतम साधन होय. त्याचाच उपयोग करून पुढें पाठनिश्चिति करावयाची आहे.

राघवी गंगालहरीची ही हस्तलिखित पोथी मोठ्या चमत्कारिक योगायोगानें माझ्या हातीं आली. तें वृत्त असें :—इ. १९१५ किंवा १६ साल असेल. मूळचे इंदूरचे राहणारे भालचंद्रपंत मावळणकर नांवाचे अविवाहित तरुण गृहस्थ येथें भटांच्या बोळांत राहात होते. त्यांनीं अफू खाऊन आत्महत्या केली. तेव्हां शेजारधर्मानुसार पंचनामा, मरणोत्तर तपासणी इत्यादिकांस मला जावें लागलें. पुढें त्यांच्या थोरल्या वहिनी येथें येऊन येथील बिऱ्हाड मोडून इंदुरास जाण्यास निघाल्या तेव्हां घरांत रद्दी कागदांचा कांहीं गळाटा होता तो त्यांनीं कचऱ्याचे पेटींत टाकण्यास काढिला. तेव्हां ती कामगिरी मी आपल्याकडे घेतली. या गळाठ्यांत मला पूर्ण अपूर्ण अनेक हस्तलिखित पोथ्या मिळाल्या. प्रस्तुतची राघवी गंगालहरी त्यांतच मिळाली. तींतील २३ वें पान तेवढें गहाळ आहे. या समश्लोकींत कवीनें आपलें राघव हें नांव दिलेलें असलें तरी आडनांव व गांव दिलेलें नाहीं. यामुळें या कवीचा आमच्या मनोहर कुळाशीं कांहीं संबंध असेल अशी कल्पनाहि तेव्हां मला आली नाहीं व लवकरच या समश्लोकीचें मला विस्मरणहि झालें. यानंतर एकवीस बावीस वर्षांनीं उज्जैन येथील सिंदिया ओरिएंटल इन्स्टिटयूटचे क्युरेटर रा. स. ल. कात्रे, एम्. ए. यांस वैद्यविलास या नांवाचा एक संस्कृत पद्यमय हस्तलिखित ग्रंथ मिळाला. त्यांत कवीनें आपलें नांव राघव किंवा रघुनाथपंडित, उपनाम मनोहर, गांव चंपावती म्हणजे कुलाबा जिल्ह्यांतील चौल इ० सविस्तर माहिती दिलेली आहे. यासंबंधीं श्री. कात्रे यांचा महाराष्ट्र शारदा मासिकाच्या डिसेंबर १९३७ च्या अंकांतील लेख पाहिल्यावर येथील आनंदाश्रमांत तपास करतां वैद्यविलासाची एक जीर्ण हस्तलिखित प्रत मिळाली. ती पाहून मला एकदम माझे संग्रहांतील राघवी गंगालहरीचें स्मरण झालें व तुलना करतां ही राघवी गंगालहरी व वैद्यविलास दोन्ही कृति एकाच राघवकवीच्या म्हणजे रघुनाथपंडित मनोहर यांच्या आहेत असा माझ्या मनाचा निश्चय होऊन, तत्संबंधीं एक सविस्तर लेख मी मार्च १९३८ च्या सह्याद्रींत लिहिला व त्यांत या राघवी गंगालहरींतील कित्येक श्लोक देऊन तिची ओळख करून दिली.

पुढें उज्जैनचे श्री. कात्रे यांस राघवी गंगालहरीच्या तीन प्रती मिळाल्या. त्या व मजजवळील प्रत अशा चार हस्तलिखित प्रतींवरून त्यांनीं मुद्रणयोग्य अशी प्रत सिद्ध करून ठेविली आहे. ती ते लवकरच प्रकाशित करतील अशी मला आशा आहे. श्री.कात्रे यांजकडून कांहीं महिन्यांपूर्वीं माझी हस्तलिखित प्रत परत आली. इतक्यांत मुंबईचे प्रसिद्ध कवि श्री. लक्ष्मण गोविंद विंझे यांनीं गंगालहरीची नवीन समश्लोकी रचून ती मूळ संस्कृत गंगालहरी, वामनी समश्लोकी व गद्य अर्थ यांसह छापून प्रसिद्ध केली ती माझे पाहण्यांत आली. तेव्हां संस्कृत गंगालहरींत आढळणाऱ्या पाठभेदांपैकीं जगन्नाथाचे मूळ पाठ कोणते असावे याविषयीं सर्वांत जुना व बहुतेक जगन्नाथ समकालीन असा जो राघवीय अनुवाद म्हणजे राघवी गंगालहरी हिच्या साहाय्यानें कांहीं निर्णय करितां येईल कीं नाहीं इकडे माझें लक्ष वेधलें व तसा निर्णय निश्चितपणें करतां येतो असें मला दिसून आलें

याविषयींच आतां कांहीं चर्चा करावयाची आहे. या चर्चेसाठीं मुद्रित प्रत म्हणून श्री. विंझे यांच्या पुस्तकांतील संस्कृत गंगालहरी घेतली असून, राघवीच्या हस्तलिखित पोथीं तील संस्कृत मूळ, तशीच संस्कृत गंगालहरीची आणखी एक हस्तलिखित प्रत आणि मराठी राघवी गंगालहरी या चारांचा उपयोग केला आहे.

कित्येक पाठभेद अर्थदृष्ट्या सारखेच असतात. त्यांपैकीं कोणताहि पाठ घेतला तरी काय बिघडलें असें कोणास वाटेल तर तें बरोबर नाहीं. अर्थ सरस होतो म्हणून किंवा पदलालित्य वाढतें म्हणून अमकाच पाठ घ्यावा असें म्हणणेंहि युक्त नव्हे. अयोग्य पाठ घालून कवीचें काव्य बिघडवणें जसें अयोग्य तसेंच आपल्या पसंतीचे नवे पाठ योजून तें सुधारण्याचा प्रयत्न करणेंहि अनुचितच होय. चांगलें असो वाईट असो कवीचें मूळ काव्य कसें होतें तें शोधणें हेंच संशोधकाचें कर्तव्य होय. राघवीय अनुवादावरून व त्या राघवीय समश्लोकीच्या पोथींत घेतलेल्या संस्कृत श्लोकांवरून गंगालहरीचे मूळ पाठ कोणते निश्चित होतात हेंच पुढें पाहावयाचें आहे.

१. सर्वांत प्रथम जी गोष्ट ध्यानांत येते ती म्हणजे मुद्रित प्रतींत एका स्थळीं झालेला श्लोकानुक्रमभंग ही होय. राघवीय गंगालहरींत ' स्मृतीयाता ' इ. श्लोक चौथा असून ' तवालंबादंब ' इ. श्लोक पांचवा आहे. पण मुद्रित प्रतींत तवालंबादंब इ. हा श्लोक चौथा असून ' स्मृतीं याता ' इ. हा श्लोक पांचवा आहे. दुसऱ्या हस्तलिखित पोथींत राघवी पोथींतल्यासारखाच अनुक्रम आहे. दोन्ही पोथ्या व राघवीय अनुवाद यांवरून ठरणारा अनुक्रमच जगन्नाथाचा असणार हें उघड आहे. विषयानुरोधानेंहि तोच श्लोकानुक्रम ठरतो, पाहा. पहिल्या श्लोकांतील वर्ण्य विषय सलिल हा आहे. दुसऱ्या श्लोकाचा वर्ण्य विषय सलिलाचा प्रवाह हा आहे आणि तिसऱ्या श्लोकाचा वर्ण्य विषय उत्तुंग तरंग हा आहे. सलिल, त्याचा प्रवाह व त्यावर उठणारे तरंग या तिहीं मिळून गंगेची मूर्ति होते तेव्हां सलिल, प्रवाह व तरंग वर्णिल्यावर लगेच ' इयं सा ते मूर्तिः ' हेंच यावयाचें. अर्थात् या दृष्टीनें पाहिलें तरी मुद्रितांतील श्लोकानुक्रम चुकला आहे हें उघड ठरतें.

२. आविद्याद्रुम कीं आविद्यद्रुम ?

दुसऱ्या श्लोकांत ' अपिद्रागाविद्याद्रुमदलनदीक्षागुरुरिह ' असा मुद्रित प्रतींत चरण आहे. यांत आविद्या असें पद घ्यावें लागतें. आसमंतात् अविद्या, आविद्या असें समर्थन टीकाकार करतात. पण तें कृत्रिमच होय. प्रस्तुत दोन्हीं हस्तलिखित पोथ्यांत आविद्यद्रुम असा मूळ लेख आहे. दोहोंतहि मागाहून कोणा शहाण्यानें एक काना अधिक देऊन द्य चा द्या केला आहे. पण तो जावई शोध होय. दोन्ही हस्तलिखितां-वरून जगन्नाथाचा मूळ पाठ आविद्यद्रुम असाच दिसतो. अविद्यस्य भावः आविद्यं म्हणजे अज्ञान.

३. उदञ्चन्मार्तंड कीं उदञ्चन् मात्सर्य ?

तिसऱ्या श्लोकांत मुद्रितांत " उद्यन्मार्तंडस्फुटकपटहेरंबजननीकटाक्षव्याक्षेपक्षण जनितसंक्षोभनिवहाः " एवढें दोन चरणांचें समस्तपद आहे. यांत मार्तंड शब्दाचा संबंध कटाक्ष शब्दाशीं जोडावयाचा तर मोठाच द्राविडी प्राणायाम होतो. दोन्ही हस्तलिखितांत मार्तंड याऐवजीं मात्सर्य असा शब्द आहे आणि वामनी व राघवी दोन्ही अनुवादांतहि मात्सर्य हाच शब्द आहे म्हणून तोच जगन्नाथाचा मूळ पाठ होय हें निःसंशय ठरतें.

४. गंगातनुभुवः कीं गांगाः पुनरमी ?

तिसऱ्या श्लोकांत मुद्रितांत गंगातनुभुवः तरंगाः आणि राघवीमध्यें अमी गांगाः तरंगाः असा पाठ आहे. या स्तोत्रांत सर्वत्र कवि गंगेस उद्देशून तिजकडे अंगुलिनिर्देश करून बोलत आहे. पांचव्या श्लोकांत इयं सा ते मूर्तिः, आठव्या श्लोकांत इदं तु गंगेति पदं आणि नवव्या श्लोकांत एतत् ते तीरं असें कवि म्हणतो. या सरणीस अनुसरून तिसऱ्या श्लोकांतहि अमी तरंगाः असेंच त्यानें म्हटलें असणार म्हणून गांगाः पुनरमी हाच मूळ पाठ होय.

५. भवतां दुरितभयभंगाय कीं जगतः दुरितभयभंगाय ?

याच तिसऱ्या श्लोकांत मुद्रितांत भवतां दुरितभयभंगाय असा पाठ आहे. तो उघड अपपाठ आहे. कारण या स्तोत्रांत सर्वत्र कवि गंगेस उद्देशून बोलत असल्यानें त्वं आणि भवत् हे शब्द कोठेंहि गंगावाचकच येणार. भवतां म्हणजे लोकहो तुमच्या असा अर्थ ह्या स्तोत्रांत होऊंच शकत नाहीं. म्हणून येथें राघवींत असलेला जगतः हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

६. अथ च कीं अपि च ?

चौथ्या श्लोकांत मुद्रितांत त्रिविधमथ पापं च व राघवी पोथींत त्रिविधमपि पापं च असे पाठ आहेत. अथ च आणि अपि च दोहोंचा अर्थ समानच आहे. पण राघवींत आढळणारा पाठच जगन्नाथाचा मूळ पाठ मानिला पाहिजे म्हणून त्रिविधमपि पापं च हा मूळ पाठ होय.

७. हरतु कीं हरताम् ?

याच चौथ्या श्लोकाचे अंतीं मुद्रितांत हरतु तर राघवी पोथींत हरताम् असे पाठ आहेत. यांपैकींही राघवींतील हरताम् हाच मूळ पाठ होय. चरणांतीं दीर्घाक्षर असणें इष्ट या दृष्टीनेंहि हरताम् हा पाठ सरस म्हणावा लागेल.

८. चंडांशु कीं चंद्रांशु ?

चौथ्या श्लोकाचा दुसरा चरण हरत्यन्तस्तंद्रां तिमिरमिव चंद्रांशुसरणिः असा आहे.

तंद्रां याशीं अनुप्रासार्थ चंद्रां असेंच हवें. असे अनुप्रास या स्तोत्रांत पुष्कळ ठिकाणीं आले आहेत. वामनीमध्यें ‘ तिमिरा जेविं सविता ’ असा अनुवाद केला आहे म्हणजे चंडांशु हा पाठ घेतला आहे. पण तो अपपाठ होय. राघवींतील चंद्रांशु हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

९. सलिलभरं कीं सलिलमिदं ?

सहावा श्लोक पाहा. सलिल पितां येतें तसा त्याचा भर पितां येत नाहीं. शिवाय सरणीप्रमाणें अंगुलिनिर्देशपूर्वक इदं सलिलं असेंच जगन्नाथानें म्हटलें असणार म्हणून सलिलमिदं हाच मूळ पाठ होय.

१० परिवृताः मृगाः कीं परिवृतं नंदनवनं ?

सातवा श्लोक पाहा. परिवृताः या पाठाप्रमाणें “ लाखो देवांनीं वेढलेले असे मृग नंदनवनांत स्वच्छंदानें प्रवेशतात ” असा अर्थ होतो म्हणजे मृगांच्या प्रवेशापूर्वी नंदनवनांत हे देव नव्हते असें निष्पन्न होतें. पण नंदनवन सदाच देवांनीं गजबजलेलें असणार म्हणून वैमानिकशतसहस्रैः परिवृतं नंदनवनं मृगाः स्वच्छंदं विशन्ति असेंच जगन्नाथानें म्हटलें असणार. राघवीमध्यें परिवृतं असा पाठ आहे व तोच जगन्नाथाचा मूळचा पाठ होय.

११. न विषयः कीं न विशयः ?

दहाव्या श्लोकांत निराकार, नित्य, विशुद्ध असें जें तत्त्व तें हे गंगे, तूंच आहेस असें सांगितल्यावर शेवटीं ‘ न विशयः ’ हे शब्द आले आहेत. “ न विशयः ” म्हणजे यांत कांहीं संशय नाहीं. विशय म्हणजे संशय. राघवी गंगालहरींत ‘ संशय नसे ’ असा अर्थ केला आहे तोच यथायोग्य आहे; व त्यावरून न विशयः हाच मूळ पाठ असल्याचें स्पष्ट होतें. विशय शब्द परिचित नसणाऱ्या कोणीतरी विषय अशी शुद्धि केल्यानंतरच वामनी समश्लोकी झाली आहे व म्हणूनच तीमध्यें विषयः हाच शब्द प्रमाण मानून “ विषय म्हणती मूढ मतिनें ” असें रूपान्तर केलें आहे.

१२. तपोराशिभिः कीं तपोराजिभिः ?

अकराव्या श्लोकांत हा शब्द आला आहे. अनेक तपांनीं हा अर्थ विवक्षित आहे. तो यांतील कोणत्याहि पाठानें होईल. पण मागें घोराभिः असें स्त्रीलिंगी विशेषण आहे. मुद्रितांतील तपोराशिभिः हा शब्द पुंल्लिंगी असल्यानें तो उघड अपपाठ होय. दोन्ही हस्तलिखितांत तपोराजिभिः असा शब्द आहे तोच मूळ पाठ होय. वामनीमध्यें तपकर्त्यांसहि असा अर्थ केला आहे तो तपोराशिभिः हा अपपाठ स्वीकारल्यामुळेंच केला आहे हें उघड आहे.

१३. झटिति कीं सपदि ?

सतराव्या श्लोकांत हे पाठभेद आढळतात. झटिति म्हणजे सत्वर आणि सपदि

म्हणजे तत्काळ. दोन्ही शब्द प्रस्तुत स्थळीं सारखेच लागू पडणारे आहेत. तथापि राघवींत आढळणारा सपदि हाच मूळ पाठ होय. याच्या पुढील तीन शब्द सकारानें प्रारंभलेले असल्यानें त्यांशीं अनुप्रासार्थ जगन्नाथ सपदि हाच शब्द योजील.

१४. पटली कीं पटल ?

विसाव्या श्लोकांत कमलसमूह या अर्थानें मुद्रितांत अंभोजपटली व राघवीचे पोथींत अंभोजपटल असा शब्द आला आहे. पटली म्हणजे वृक्ष आणि पटल म्हणजे समूह, ढीग. यावरून पटल हाच मूळ पाठ होय.

१५. जंबालं जलं कीं जंघालं जलं ?

विसाव्या श्लोकांत मुद्रितांत जलं ते जंबालं आणि राघवीमध्यें जलं ते जंघालं असा पाठ आढळतो. जंबाल हें नाम असून त्याचा अर्थ शेवाळ किंवा चिखल असा आहे. याच श्लोकांत वर जंबाल हा शब्द चिखल ह्या अर्थीं आलेला आहे. प्रस्तुत स्थळीं जलं याचें विशेषण हवें असून तें जंघाल हेंच होय. जंघाल म्हणजे वेगवान्. वामनी समश्लोकींत 'बहु धावे ऐसें' म्हणजे वेगवान् हाच अर्थ केला आहे म्हणजे जंघाल हाच पाठ स्वीकारला आहे. अर्थात् येथें जंघाल हा मूळ पाठ आणि जंबाल हा अपपाठ होय.

१६. विधौ कीं विधेः ?

एकविसाव्या श्लोकांत मुद्रितांत विधौ व्यासंगः आणि राघवींत विधेर्व्यासंगः असें पाठ आहेत. अर्थदृष्ट्या दोन्ही चालण्याजोगे आहेत तरी राघवीमध्यें असणारा विधे हाच जगन्नाथाचा मूळ पाठ म्हटला पाहिजे.

१७ जननी कीं भवती ?

तेविसाव्या श्लोकाचे अंतीं राघवीमध्यें 'यदि जगति जागर्ति भवती' असें आहे आणि मुद्रितांत भवतीऐवजीं जननी शब्द आहे. अनुप्रासाचे दृष्टीनें दोनहि पाठ सारखेच आहेत. तथापि कवि गंगेशीं बोलत आहे म्हणून त्यानें येथें भवती हाच शब्द योजणें स्वाभाविक आहे.

१८. गदविगलितः कीं गदविदलितः ?

चोविसाव्या श्लोकांत हे पाठ आढळतात. अनुप्रास व अर्थ दोन्ही दृष्टींनीं गद-विदलितः हा पाठ सरस आहे व तो राघवीमध्यें आहे म्हणून तोच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

१९,२०. प्रबलतर कीं प्रबलरस ? ज्वर कीं ज्वल ?

सव्विसाव्या श्लोकाचें पूर्वार्ध मुद्रित प्रतींत "स्फुरत्कामक्रोधप्रबलतरसंजातजटिल-ज्वरज्वालाजालज्वलितवपुषां नः प्रतिदिनं" असें आहे. राघवीमध्यें प्रबलतरऐवजीं

प्रबलरस आणि ज्वरऐवजीं ज्वल असे शब्द आहेत. यांचा विचार करावयाचा आहे. संजात कोणापासून तें सांगणारें नाम त्याचें पाठीशीं असणें अवश्य आहे. प्रबलतर हें नाम नाहीं म्हणून येथें प्रबलरस घेणें प्राप्त होय. (रस म्हणजे आसक्ति, मद्य, विष. प्रस्तुत स्थळीं प्रबलरस म्हणजे जलाल मद्य किंवा जहाल विष). तसेंच जटिल हें विशेषण शिखामाली ज्वलनास जसें साजतें तसें ज्वरास साजत नाहीं. शिवाय पुढें ज्वाला शब्द असल्यानें त्याचें मागें ज्वल (ज्वलन) हवाच व तो अनुप्रासासहि साधक आहे. एवंच राघवी समश्लोकीचें पोथींत असलेलें प्रबलरस व ज्वल हेंच मूळपाठ होत.

२१. जटिल कीं जटित ?

सत्ताविसाव्या श्लोकांत हे पाठभेद आले आहेत, राघवीचे पोथींत जटित असा पाठ आहे. जटाजूटजटित म्हणजे जटाजूटांत जडलेला. राघवीय मराठी अनुवाद ' जडोनी राहे तो ' असा आहे. त्यावरूनहि जटित हाच जगन्नाथाचा मूळ पाठ ठरतो.

२२. प्रणय नः कीं प्रणयतः ?

तिसाव्या श्लोकांत हे महत्त्वाचे पाठभेद आढळतात. मुद्रित प्रतींत प्रणय नः असा पाठ आहे. 'नः प्रणय' याचा अर्थ नीटसा होत नाहीं. वामनीमध्यें 'समजो भाव तुजला' आणि लक्ष्मणीमध्यें ' आतां संतुष्ट हो ' असा अर्थ केला आहे. राघवीमध्यें प्रणयतः असा पाठ असून त्याचा अनुवाद स्नेहें असा केला आहे. कवीनें या श्लोकांत असा आविर्भाव आणला आहे कीं, गंगेची एक आकांक्षा कांहीं केल्या पुरी होत नव्हती. तिची फारा दिवसांची असफल राहिलेली ती आकांक्षा सफल करण्यासाठींच तिजवरील स्नेहामुळें कवि पुढें आला आहे ! हा भाव व्यक्त होण्यास प्रणयतः हाच पाठ अवश्य आहे व तोच जगन्नाथाचा मूळ पाठ होय यांत शंका नाहीं. एकेचाळिसाव्या श्लोकांतहि कवीनें गंगेविषयीं आपणांस वाटणारा प्रणय(स्नेह) प्रगट केला आहे. शिवाय एकाच चरणांत अहं आणि नः येणें अशक्य. अन्यत्र असे आले नाहींतच.

२३. एवं गुणगणान् कीं एवंविधगुणान् ?

एकतिसाव्या श्लोकांतील हे पाठभेद होत. एवंगुण आणि एवंविध दोन्ही बहुतेक समानार्थक विशेषणें आहेत. गण कसे ? तर एवंगुण म्हणजे अशा प्रकारचे. अर्थात् इष्ट असलेल्या गुणांचे समुदाय हा अर्थ निष्पन्न होत नाहींच. अर्थात् मुद्रितांत आढ-ळणारा एवंगुणगणान् हा अपपाठ होय. राघवींतील एवंविधगुणान् हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

२४. ऋते त्वत् कीं ऋते त्वां ?

एकतिसाव्या श्लोकांत आढळणारे हे पाठ सारख्याच प्रतीचे असले तरी राघवी प्रतींत असलेला ऋते त्वां हाच जगन्नाथी मूळ पाठ असला पाहिजे.

२५. दलित कीं शमित ?

तेहतिसाव्या श्लोकांतील हे पाठभेद आहेत. राघवानें केलेल्या मराठी समश्लोकींत शमितकलुषा असा शब्द आहे. अर्थात् संस्कृत मुळांतील शमित हा शब्द राघवानें कायम ठेविला आहे व म्हणून शमित हाच जगन्नाथप्रयुक्त मूळ पाठ होय हें यावरून निर्विकार सिद्ध होते.

२६. मम कीं मया ?

सदतिसावा श्लोक पाहा. 'एवं मयापि दुरितनिवहे तु प्रेमा श्लथयितुं अशक्यः' असा अन्वय असल्यानें मया ही तृतीयाच आवश्यक आहे. तशीच ती राघवी प्रतींत आहे. मुद्रितांतील ममः हा पाठ प्रामादिक होय.

२७. टंकार कीं डांकार ?

अडतिसावा श्लोक पाहा. डमरूच्या शब्दास टंकार म्हणण्यापेक्षां डांकार म्हणणेंच समुचित होय. डांकार हाच शब्द ध्वन्यनुकारी आहे म्हणून तोच जगन्नाथाचा मूळ पाठ असला पाहिजे. शिवाय तो अनुप्राससाधकहि आहे.

२८. तिरोधत्तां तापं कीं तिरोधत्तं पापं ?

या प्रश्नाचा निर्णय अडतिसाव्या श्लोकाची राघवी समश्लोकी पाहतां स्पष्ट होतो. या समश्लोकींतील संस्कृत श्लोकांत तिरोधत्तां पापं असें असून मराठी समश्लोकींत 'हरो माझ्या पापां त्रिदशतटिनीतांडव असा' याप्रमाणें पाप हाच शब्द आहे. अर्थात् येथील जगन्नाथाचा मूळ पाठ पापं हाच होय. वामनीमध्यें 'तापा प्रतिहरू' असा अनुवाद केला आहे. अर्थात् ताप असा अपपाठ उत्पन्न झाल्यानंतरच वामनी समश्लोकी झालेली आहे हें स्पष्ट आहे.

२९. सापल्यस्फुरित कीं सापल्यास्फुरित ?

चाळिसावा श्लोक पाहा. भवान्या याशीं अनुप्रासार्थ सापल्यास्फुरित असावें. तसेंच ते राघवी पोथींत आहे व तोच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

३०. त्वदीया सा मृत्स्ना कीं त्वदीयासौ मृत्स्ना ?

बेचाळिसावा श्लोक पाहा. कवि नजिकच्या मृत्तिकेकडे बोट दाखवून गंगेशीं बोलत आहे. अशा वेळीं तो सा मृत्स्ना न म्हणतां असौ मृत्स्ना असेंच म्हणेल. म्हणून राघवींत दिसणारा असौ हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

३१. यजन्ति कीं भजन्ति ?

चव्वेचाळिसाव्या श्लोकांत हे पाठभेद आहेत. पुढें वितान म्हणजे यज्ञ आलेच आहेत. तेव्हां मागें यजन येण्याचें कांहीं कारण नाहीं. म्हणून राघवींत असलेला भजन्ति

हाच जगन्नाचा पाठ होय. वामनानें 'किति देवांसि यजिती' असा अनुवाद केला आहे. अर्थात् यजन्ति असा अपपाठ पडल्यानंतरच वामनीची रचना झाली आहे.

३२. सुकृतजन्मार्जनकर्ता कीं सुकृतकर्मार्जनकर्ता ?

पंचेचाळिसावा श्लोक पाहा. मुद्रित प्रतींत "अविश्रान्तं जन्मावधिसुकृतजन्मार्जनकर्ता" असा चरण आहे जन्मावधि आणि जन्मार्जन दोनदां जन्म शब्द जगन्नाथ कसा योजील ? सुकृतजन्मार्जनकर्ता याचा अर्थहि नीट होत नाहीं. राघवीमध्यें सुकृतकर्मार्जनकर्ता असा पाठ आहे व तोच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

३३. इतरजनसाधारणतया कीं इतरजनसाधारणधिया ?

सत्तेचाळिसाव्या श्लोकांत हे पाठ आहेत. राघवीय अनुवाद 'इतरजनउद्धारमतिनें' असा आहे. यांतील मति शब्दावरून मुळांत धी शब्द असला पाहिजे हें उघड आहे. तेव्हां इतरजनसाधारणधिया हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय.

३४. स्थितां त्वां ये कीं स्थितां ये त्वां ?

श्लोक ४८ पाहा. दोन्ही तेच शब्द आहेत. अनुक्रम बदलला आहे इतकेंच. पण कवीचा शब्दानुक्रम तरी मागून इतरांनीं कां बदलावा ? बदलण्याचा त्यांस अधिकार काय असा प्रश्न आहे. राघवींत आढळणारा 'स्थितां ये त्वां' हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय व उच्चारणास तोच अधिक बरा आहे.

३५. शुभ्राल कीं शोभाल ?

श्लोक ४८ मध्यें प्रथम चरणांत हे दोन पाठ आढळतात. राघवीमध्यें शोभाल व मुद्रितांत शुभ्राल आहे. शोभा ह्या नामापासून शोभाल हें विशेषण होतें; पण शुभ्र हें नाम नसून विशेषण आहे. शुभ्राल शब्द बनण्यास ही अडचण आहे. तें असो. राघवानें हिमकरकलाशोभन शिरीं असा अनुवाद केला आहे त्यापक्षीं त्याचें पुढें शोभाल हाच शब्द होता हें उघड आहे. वामनीमध्यें 'शशिशोभा सुमुकुटीं' असा अनुवाद आहे. यावरून ही समश्लोकी करणारापुढेंहि शोभाल हाच शब्द होता असें ठरतें. अर्थात् शोभाल हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय. वाचाल, प्रज्ञाल इत्यादिप्रमाणें.

३६. करोतु मम शंतनोः कीं तनोतु मम शंतनोः ?

एकुणपन्नासाव्या श्लोक पाहा. तनोतु मम शंतनोः सपदि शंतनोरंगना या चरणांत तीनदां 'तनो' येऊन सुंदर अनुप्रास साधला आहे. राघवीमध्यें तनोतु असा पाठ आहे व तोच जगन्नाथाचा मूळ पाठ आहे.

३७. मन्त्रैर्मीलितं कीं मंत्रैर्मज्जितं ?

पन्नासाव्या श्लोकांत मुद्रितांत मीलितं आणि राघवीमध्यें मज्जितं असे पाठभेद आढळतात. राघवकृत मराठी अनुवाद 'गेले मंत्र बुडोनी' असा आहे. अर्थात

राघवापुढें मज्जितं असा पाठ होता व म्हणून तोच जगन्नाथाचा मूळ पाठ होय यांत शंका नाहीं. वामनी समश्लोकींत ' मंत्रां मौन पडे ' असा अनुवाद आहे तो मीलितं हा अपपाठ उत्पन्न झाल्यानंतरचा आहे हें उघड आहे.

३८, ३९ वीचिक्षालित कीं वारिक्षालित ? कालियाहत कीं कालियाहित ?

पन्नासाव्या श्लोकांत मुद्रित प्रतींत गंगेस उद्देशून वीचिक्षालितकालियाहतपदे असें संबोधन आलें आहे. लक्ष्मणीमध्यें ' पूर्वीं कालियानें जखमी केलेले श्रीकृष्णाचे पाय जसे तूं आपल्या लाटांनीं धुऊन विषमुक्त केलेस ' असा अर्थ केला आहे. वामनीमध्यें ' कालियास दमितां त्याचिया पदा धूसी ' अशा प्रकारें लक्ष्मणीप्रमाणेंच अर्थ घेतलेला आहे. पण श्रीकृष्णाचे पाय कालियानें जखमी केले होते यास काय आधार आहे ? शिवाय श्रीकृष्णानें कालियाचें मर्दन केलें ते यमुनेच्या डोहांत गंगेच्या नव्हे ! अर्थात् कालिय-मर्दनाचे कथेशीं गंगेचा कांहीं संबंध नाहीं. वास्तविक प्रकार असा आहे कीं, येथें कालियाहत असा शब्द नसून कालियाहित असा शब्द आहे, व तो केवळ विष्णुवाचक आहे. श्रीविष्णूला जेव्हां हे मुरारे, हे मधुसूदना, असें म्हणतात तेव्हां त्या शब्दांचा वाच्यार्थ विवक्षित नसतो. हे विष्णो, इतकाच अर्थ विवक्षित असतो, तसेंच येथें आहे. कालियाहितपद याचा राघवीय अनुवाद कालियारिचरण असा आहे. अहित म्हणजे अरि. कालियारिचरण म्हणजे विष्णुपद. विष्णुपदापासून गंगा निघाली तेव्हां तिनें उदकानें विष्णुपद क्षाळिलें हें उघडच आहे, अर्थातच येथें ' वारिक्षालित-कालियाहितपदे ' असें संबोधन असून वारि आणि कालियाहित हेच मूळ पाठ होत. वीचि आणि कालियाहत हे अपपाठ होत.

४०, ४१, ४२, ४३ व ४४. मणिश्रेणि कीं फणिश्रेणि ? वल्गत् कीं चंचत् ? नट कीं नव ? घटी कीं घटा ? तांडवं कीं तोंडवः ?

एकावन्नाव्या श्लोकांत शंकरानें द्यूतांत काय काय हरविलें तें प्रथम सांगितलें आहे. त्यांत मणिश्रेणि असा शब्द मुद्रित प्रतींत आलेला आहे. पण श्मशानवासी शंकरापाशीं मणि म्हणजे रत्नें कोठून असणार ? त्यापाशीं फणी म्हणजे सर्प मात्र होते आणि राघवी समश्लोकीच्या पोथींतील संस्कृत श्लोकांत व त्याच्या मराठी अनुवादांतहि ' फणिश्रेणि ' असा पाठ आहे व जगन्नाथाचा तोच मूळ पाठ आहे. याच एकावन्नाव्या श्लोकाचा चतुर्थ चरण मुद्रित प्रतींत व्यालोलोल्ला-सिवल्गल्लहरिनटघटी तांडवं नः पुनातु व राघवींत व्यालोलोल्लासिचंचल्लहरिनव-घटी तांडवो नः पुनातु असा आहे. यांतील चंचत् आणि वल्गत् बहुतेक समानार्थी असल्यानें चंचत् बद्दल वल्गत् घालण्याचें कांहीं प्रयोजन नव्हतें. तसेंच हें गंगेचें नृत्य असल्यामुळें यांत नटांचा कांहीं संबंध नाहीं. म्हणून नट हा स्पष्ट अपपाठ होय मस्तकावर घटी म्हणजे लहानसा कुंभ घेऊन नृत्य करण्याचा एक प्रकार आहे तो

कवीस अभिप्रेत असेल तर नवघटी असा पाठ धरावा लागेल. राघवी समश्लोकींत ' नवघटमय तें उद्धरू नृत्य मातें ' असें म्हटलें आहे म्हणजे राघवानें नवघटी तांडवः असा पाठ धरला आहे. लाटांचे उंचवटे हेच जणूं काय मस्तकावरील नवघट ज्यांत आहेत असें नृत्य असा राघवी समश्लोकीचा भाव दिसतो. पण समश्लोकी वरील संस्कृत श्लोकांत घटी असा पाठ नसून घटा असा आहे. घटा म्हणजे रणांगणांतील गजदलाची रचना, समूह; यावरून सामान्यत्वें समुदाय असाहि अर्थ होतो. त्यास अनुसरून चंचल्लहरि-नवघटा म्हणजे चंचल लहरींचे नवनवे समुदाय, त्यांच्या नवनव्या रचना ज्यांत दिसत आहेत असें तांडव नृत्य असाहि भाव असूं शकेल. हा भावहि कांहीं कमी हृद्य नाहीं. तेव्हां राघवींतील संस्कृत श्लोकांत असलेला ' व्यालोलोल्लासिचंचल्लहरिनवघटातांडवो नः पुनातु ' हाच जगन्नाथाचा मूळ पाठ होय असें म्हणावयास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

जगन्नाथ पंडितकृत गंगालहरी स्तोत्रांत कसे अपपाठ पडले आहेत आणि त्या स्तोत्राचा राघवकविकृत म्हणजे रघुनाथपंडित मनोहरानें केलेला जो समश्लोकी अनुवाद आहे त्याच्या आधारें जगन्नाथाचे मूळ पाठ कसे निश्चित होतात हें येथवर आपण पाहिलें. श्री. विंझे यांनीं गंगालहरीचे बावन्न श्लोकच छापले आहेत. जणूं काय या बावन्न श्लोकांच्या पठनाबरोबर गंगेनें घाटाच्या बावन्न पायऱ्या चढून येऊन जगन्नाथ पंडितास आपल्या उदरीं ठाव दिल्यामुळें त्रेपन्नावा श्लोक जगन्नाथविरचित असणें अशक्य! परंतु एकंदर स्तोत्रकलाप पाहतां स्तोत्राचे शेवटीं फलश्रुति असावयाचीच. म्हणून हा लेख संपवितांना गंगालहरींतील शेवटचा फलश्रुतीचा त्रेपन्नावा श्लोक व त्याचा राघवी अनुवाद उद्धृत करणें उचित वाटतें.

इमां पीयूषलहरीं जगन्नाथेन निर्मिताम् ॥
यः पठेत् तस्य सर्वत्र जायन्ते जयसंपदः ॥ ५३ ॥
पीयूषलहरी हे तों जगन्नाथें विनिर्मिली ॥
जो पठे त्यास सर्वत्र होतील जयसंपदा ॥ ५३ ॥

---

६ पंडितराव आणि दानाध्यक्ष भिन्न कीं एकच ?

(श्री. **यशवंत गणेश फफे**, पुणें)

शककर्ता शिवाजी या पुस्तकांत श्री. सरदेसाई यांनीं शिवाजीच्या राज्याभिषेक-समयीं अष्टप्रधान कोण कोण होते ते दिले आहेत. त्यांत एक रघुनाथ पंडितराव दिलेले आहेत. आणि खालीं रघुनाथ पंडितरावांचे पुत्रास दानाध्यक्ष नेमल्याचें सांगितलें आहे. यावरून अष्टप्रधानांतील पंडितराव निराळे आणि दानाध्यक्ष निराळे असा अर्थ

निष्पन्न होतो. श्री. राजोपाध्ये यांनीं 'कवि रघुनाथ पंडितराव प्रधान आणि सामराजकृत कविता' या नांवाची जी पुस्तिका अलीकडेच प्रसिद्ध केली आहे तीवरून तेहि पंडितरावपद निराळें आणि दानाध्यक्षपद निराळें असें मानीत असल्याचें दिसतें. ही समजूत यथार्थ आहे काय याचा थोडक्यांत विचार करावयाचा आहे. त्याबरोबरच किंबहुना तत्पूर्वी श्री. सरदेसाई, श्री. राजोपाध्ये प्रभृति म्हणतात त्याप्रमाणें शिवाजीच्या राज्याभिषेकसमयीं म्हणजे इ. १६७४ त रघुनाथभट उपाध्ये हे अष्टप्रधानांतील पंडितराव पदावर खरोखर होते कीं काय हें पाहणें प्राप्त आहे.

रघुनाथ पंडितरावांचें एक पत्र इ. १६७२ मधील उपलब्ध आहे. तें श्री राजोपाध्ये यांनीं आपल्या उपर्युक्त पुस्तिकेंत दिलें आहे. त्यानंतरच्या काळांतलें त्यांचें एकहि पत्र उपलब्ध नाहीं. तसेंच त्यांच्या अस्तित्वाचा नुसता उल्लेखहि इ. १६७२ नंतरच्या कोणत्याहि कागदपत्रांत उपलब्ध झालेला नाहीं. केशव पंडितकृत दंडनीतिप्रकरण या पुस्तकास श्री. वा. सी. बेंद्रे यांनीं रघुनाथभट उपाध्ये पंडितराव यासंबंधानें एक परिशिष्ट जोडलें आहे. त्यांत त्यांनींहि इ. १६७२ चे पुढें रघुनाथ पंडितराव विद्यमान होते असें म्हणावयास कागदपत्रांचा कांहीं आधार मिळत नाहीं असें दाखविलें आहे.

अन्यपक्षीं मोरेश्वर पंडितराव यांचें इ. १६७३ मधील दानपत्र उपलब्ध आहे. श्री. राजोपाध्ये यांनीं आपल्या पुस्तिकेंत तें दिलेलें आहेच. या पत्रावरून या वेळीं मोरेश्वर हे पंडितराव होते. अर्थात् रघुनाथभट उपाध्ये हे पंडितराव नव्हते हें निर्विवाद सिद्ध होतें. मोरेश्वर पंडितराव यांचीं इ. १६७३ ते १६८६ पर्यंतचीं अनेक पत्रें उपलब्ध आहेत. इ. १६७७ मधील तीन पत्रें, इ. १६७९ मधील एक व इ. १६८१ मधील एक अशीं पत्रें शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड २ मध्यें दिलेलीं आहेत. अर्थात् या पत्रांच्या काळींहि रघुनाथभट हे पंडितराव पदावर नव्हते हें स्पष्ट दिसून येतें. येथें प्रश्न असा उत्पन्न होतो कीं जर इ. १६७३ पासून मोरेश्वर रघुनाथ हे पंडितराव पदावर आहेत तर मध्येंच इ. १६७४ त राज्याभिषेकाच्या वेळेपुरतेच रघुनाथभट हे पंडितराव कसे असतील? ग्रँट डफपासून श्री. सरदेसायांपर्यंतच्या इतिहासकारांनीं अष्टप्रधानांत रघुनाथ पंडितराव दिलेले असले तरी तेवढ्यावर न विश्वासतां त्यांचे आधार कोणते आहेत तें तपासून पाहणें प्राप्त आहे.

श्री. चिंतामणराव वैद्य यांनीं शिवाजीच्या अष्टप्रधानांत रघुनाथराव पंडितराव दिलेले आहेत व या माहितीस सभासदोचा आधार दिलेला आहे. श्री. सरदेसाई यांनीं मोरेश्वर रघुनाथ यास दानाध्यक्ष नेमल्याचा उल्लेख केला आहे. तेथें शिवचरित्रसाहित्य खंड १ लेखांक ९० याचा आधार दिलेला आहे. हा लेखांक म्हणजे सभासदीच्याच एका अप्रसिद्ध प्रतींतील उतारा आहे. यावरून असें दिसून येतें कीं, शिवाजीच्या राज्याभिषेकसमयीं अष्टप्रधान कोण कोण होते याविषयीं अस्सल कागदपत्रांचा कांहीं आधार उपलब्ध नाहीं. विश्वसनीय म्हणतां येईल असा एकच आधार उपलब्ध आहे तो म्हणजे

सभासदीचा. सर्व इतिहासलेखकांनीं हाच एक आधार घेतलेला आहे. तेव्हां तो आधार आपण काळजीपूर्वक तपासून पाहिला पाहिजे.

कै. का. ना. साने यांस सभासदीच्या दोन प्रती उपलब्ध झाल्या. एक प्रतापगड प्रत व दुसरी महाड प्रत. यांपैकीं प्रतापगड प्रत त्यांनीं छापिली आणि महाड प्रतींत जें न्यूनाधिक आढळलें तें टीपेंत दिलें. सभासदीची तिसरी प्रत श्री. कृ. वा. पुरंदरे यांस सासवड येथें उपलब्ध झाली. तींतील अष्टप्रधानांसंबंधीं उतारा त्यांनीं शिवचरित्र साहित्य-खंड १ ले. ९० मध्यें छापला. याप्रमाणें उपलब्ध झालेल्या सभासदीच्या तिन्ही प्रतींत अष्टप्रधान कोण कोण होते तें दिलेलें असून प्रत्येकापुढें एकाचा आंकडा घातलेला आहे. या आठ प्रधानांपैकीं एकाचा उल्लेख या प्रतींत पुढीलप्रमाणें आला आहे.

सासवड प्रत—१ रघुनाथ पंडितराव यांचे पुत्रास दानदीक्षिती, या उल्लेखांतील दानदीक्षिती म्हणजे दानाध्यक्षपद. दानाध्यक्ष हें अष्टप्रधानांतील एक पद असून तें रघुनाथभट उपाध्ये, जे एके वेळीं पंडितराव होते, त्यांचे पुत्रास देण्यांत आलें असा या उल्लेखाचा सरळ अर्थ होतो.

महाड प्रत—रघुनाथ पंडितराव त्यांचे पुत्रास दानाध्यक्ष. सासवड प्रतीशी या उल्लेखाचें साम्य असून अष्टप्रधानांतील हें पद रघुनाथभटाचे पुत्रास दिलें असाच याचाहि अर्थ होतो.

प्रतापगड प्रत—रावजी पंडितराव होते त्यांचे पुत्र रायजीराज (?). रायजीराज या शब्दापुढें संपादकांनीं प्रश्नचिह्न केलें आहे. रायजीराज या शब्दावरून रायरायां या शब्दाचें स्मरण होतें. आणि वाटतें कीं न जाणों रायजीराज हेंच या प्रधानपदाचें नांव असेल ! या प्रधानपदाचें नांव कोणतेंहि असो तें पद रावजी पंडितराव होते त्यांचें पुत्रास दिल्याचें येथें सांगितलें आहे. पण येथील रावजी पंडितराव हा उल्लेखहि सदोष दिसतो. तेथें रघुनाथरावजी पंडितराव असावें हें उघड दिसतें. चिंतामणराव वैद्य यांनीं रघुनाथराव पंडितराव असेंच म्हटलें आहे. रघुनाथभट किंवा रघुनाथपंत म्हटलें नाहीं. रघुनाथराव म्हटलें आहे तेंहि या रावजी शब्दामागें रघुनाथ हा शब्द जोडूनच म्हटलें आहे हें उघड आहे.

या तिन्ही प्रतींवरून असा निश्चय होतो कीं अष्टप्रधानांतील हें विशिष्ट पद रघुनाथ-भटांचे पुत्रास दिलें गेलें. पुत्रास हा शब्द तिन्ही प्रतींत आहे पण त्या पुत्राचें नांव मोरेश्वर हें कोणत्याच प्रतींत दिलेलें नाहीं. पुत्र कोणाचा हें सांगण्यापुरताच रघुनाथ पंडितरावांचा उल्लेख पुत्रास या शब्दामागें आलेला आहे. या पुत्रास जें पद दिलें तें म्हणजे दानाध्यक्षपद. दानाध्यक्षपद म्हणजेच पंडितरावपद होय. या प्रधानाचें काम कोणतें तें पंडितराव या शब्दानें समजत नाहीं तें दानाध्यक्ष या शब्दानें बहुतांशीं समजतें.

वैद्य काय सरदेसाई काय सर्वच इतिहासकारांनीं "रघुनाथ पंडितराव यांचे पुत्रास दानाध्यक्ष (किंवा दानदीक्षिती)" याचा अर्थ रघुनाथ भटांस पंडितरावपद दिलें आणि त्यांचे पुत्रास दानाध्यक्षपद दिलें असा केला आहे तो बरोबर नाहीं हें नम्रपणें येथें निदर्शनास आणून देणें प्राप्त आहे. इतिहासकारांच्या अर्थाप्रमाणें अष्टप्रधानांचीं पदें सांगत असतां मध्येंच एक दानाध्यक्ष हें नववेंच पद सांगितलें असें म्हणावें लागतें. तें सर्वथा अयुक्त होय. शिवाय दानधर्माची व्यवस्था पाहणें हें पंडितरावांचेंच काम होतें व तें त्यांनींच केलेलें आहे असें अनेक पत्रांवरून दिसून येतें.

शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळीं राजव्यवहारकोश झालेला नव्हता. त्यापूर्वी अष्टप्रधानांपैकीं सहांचीं नावें सरनोबत, डबीर, पेशवा, मुजुमदार सुरनीस व वाकनीस अशीं फार्सीच होतीं. न्यायाधीश व पंडितराव यांस मात्र फार्सी नांवें नव्हतीं. इतर पदांप्रमाणेंच पंडितराव हें पदहि राज्याभिषेकाच्या कित्येक वर्षें अगोदरपासून अस्तित्वांत होतें. पंडितराव या अर्थाचा दानाध्यक्ष हा शब्द प्रायः राज्याभिषेकसमयीं योजण्यांत आला असावा. तथापि पंडितराव हा शब्दहि योजनेंत राहिलाच आणि त्यामुळें पंडितराव व दानाध्यक्ष हे दोन्ही समानार्थक शब्द एकत्र योजिलेलेहि आढळतात. उदाहरणार्थ, मोरेश्वर पंडितरावाचें इ. १६८६ मधील एक पत्र राजवाडे खंड ८ ले० ४० मध्यें दिलें आहे. त्याखालीं 'मोरेश्वर पंडितराव दानाध्यक्ष' अशी सही आहे. तीवरून पंडितराव म्हणजेच दानाध्यक्ष असें दिसून येतें.

परमानंदकाव्यम् या ग्रंथांतहि याचें प्रत्यंतर मिळतें. उदाहरणार्थ पुढील श्लोक पाहा—

क्रोधः पंडितराजं च दानधर्माधिकारिणम् ।
स्तेयं सेनापतिं सर्वं नास्तिक्यं च पुरोधसम् ॥ पृ. ५१ श्लो. १२३

तसेंच,

क्रोधः पंडितराजस्य दानधर्माधिकारिणः ।
प्राविशत् विवशीभूतं मानसं मानसंयुतः ॥ पृ. ५४ श्लो. ३३

पंडितराव व दानधर्माधिकारी म्हणजे दानाध्यक्ष एकच असें या श्लोकावरूनहि कळतें.

एवंच, शिवाजीच्या राज्याभिषेकसमयीं रघुनाथभट उपाध्ये हे पंडितराव होते व त्यांचे पुत्र दानाध्यक्ष होते अशी जी इतिहासकारांची समजूत आहे ती पूर्णपणें अवास्तव आहे.

पंडितराव म्हणजेच दानाध्यक्ष. शिवराज्याभिषेकसमयीं मोरेश्वर रघुनाथ हेच दानाध्यक्ष म्हणजे पंडितराव होते, असें सभासदीवरून कळतें.

इ. १६७३ तलें मोरेश्वर पंडितरावांचें पत्र उपलब्ध आहे तत्पूर्वीच मोरेश्वरास पंडितरावपद मिळालेलें असणार. म्हणजेच त्या पदावर रघुनाथभट नसणार हें उघड आहे. ते त्या पदावर नसण्याचें कारण त्यांचा मृत्यु किंवा रुग्णतेमुळें अक्षमता यांपैकींच प्रायः असणार. यांपैकीं अक्षमता हेंच कारण संभवनीय वाटतें. कारण त्यांस क्षयरोग झाल्याचें परमानंदकाव्यम् यांत सांगितलें आहे. तसेंच ते शिवाजीच्या मृत्यूपूर्वीच दिवंगत झाल्याचेंहि त्याच काव्यांत सांगितलें आहे. त्यावरून रघुनाथभट उपाध्ये हे इ. १६७२ ते १६८० या कालांत केव्हांतरी निवर्तले हें निश्चित होतें.

---

७ गोविंद नरहरी : प्राचीन मराठींतील एक प्रचंड ग्रंथकार

(श्री. रा. शं. **नगरकर**, पुणें.)

सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी कै. केशव नारायण वैद्य यांनी गोविंद नरहरीच्या भागवत-टीकेसंबंधीं एक टिपण केसरीकडे प्रसिद्धीसाठी पाठविलें होतें. परंतु कांहीं कारणामुळें तें तिथें तसेंच पडून राहिलें. त्यानंतर हें टिपण त्यांचे नातजावई सुप्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञ श्री. ग. वि. अकोलकर यांच्याकडून मराठींतील ख्यातनाम संशोधक श्री. रा. चिं. ढेरे यांचेकडे आलें. तें टिपण व भा. इ. सं. मंडळाच्या हस्तलिखितसंग्रहालयांतील गोविंद नरहरीची भागवतेतर रचना पाहून मी येथें गोविंद नरहरीचा स्थूल परिचय आपणांपुढें मांडीत आहे.

गोविंद नरहरीच्या या भागवतटीकेची प्रत श्री. वैद्यांना मिळाली, ती नगर जिल्ह्यांतील कोतुळ या गावीं. गोविंदाची ही भागवतटीका श्रीधरी टीकेच्या आधारें लिहिलेली आहे. या भागवतटीकेचे दुसरा, सातवा व अकरावा, हे स्कंध पूर्ण असून तिसऱ्या स्कंधाचे १५ ते ३३ अध्याय उपलब्ध आहेत.

दुसऱ्या स्कंधाच्या अखेरीस पुढीलप्रमाणें प्रतलेखनाचा तपशील आलेला आहे.

" शके १७१२ साधारण नाम संवत्सरे माघ शुद्ध एकादशी सोमवार चतुर्थ प्रहरे समाप्तः " ॥ भिकाजी त्र्यंबक देशपांडीयोपनाम भोजापुरकर वास्तव्य अगस्तिक्षेत्र (अकोले, जि. नगर) एन स्वसंग्रहार्थ वा पठणार्थ लिखितं ॥

या अध्यायांत आलेलें कविवृत्त असें—

ग्रंथाची प्रेरणा—या भागवती टीकेची प्रेरणा आपणांस सर्व सज्जनांचें हृदय असलेल्या श्रीकृष्णाकडून मिळाली व त्याच्यामुळेंच प्रपंचांतील उपद्रवांपासून आपलें चित्त मुक्त झालें व म्हणून जगतांत संतांहून कोणी श्रेष्ठ नाहीं. या सत्समागमामुळेंच आपण धन्य झालों, असें गोविंद नरहरी म्हणतो.

कुलवृत्तान्त—गोविंद भारद्वाजगोत्री होता. त्याच्या मातेचें नांव निरा, वडिलांचें नांव नरहरी व बहिणीचें नांव गौतमी असें आहे. शंकर हें त्याच्या गुरूचें नांव आहे. केशव आदि बंधुगणाची त्यानें नोंद केली आहे. पण ते कितीजण बंधु होते, हें निश्चित सांगतां येत नाहीं.

निरा नामे देहजननी । तैसीच गौतमी भगिनी ।
या शंकरीच वसती वाटे मनीं । धन्य कुल भारद्वाजाचें ॥
ज्याचे गोत्रोद्भव बंधुगण । केशवादि परमसज्जन ।
अहो सज्जनसंपर्के करून । परम विश्रांति आहे (२७०–२७१)

या भागवती टीकेचा प्रारंभ आपण पंढरपूर क्षेत्रीं केला असें सांगून—

देवगिरी सन्निध वर्तता । सार्ध योजस पूर्वेसी ।
खडकी राजधानीचे ठाई । द्वितीय स्कंधाची समाप्ति ॥

अशी माहिती दिलेली आहे. शके १५८१ विकारी नाम संवत्सरांत भाद्रपदांतील कृष्णपक्षांत शिव चतुर्दशीला द्वितीय स्कंध पुरा झाला आहे.

या ग्रंथाचे अक्षर सुवाच्य आहे, कमींत कमी अवाच्य नाहीं, असें वैद्यांनीं आवर्जून नोंदविलें आहे.

गोविंदाचें वाङ्मय— याशिवाय भा. इ. सं. मंडळांतील धर्माधिकारी (अकोलें) संग्रहांत याच गोविंदाची महाभारत टीका उपलब्ध आहे. या टीकेंत स्त्रीपर्व, सौप्तिकपर्व (हें पर्व अपूर्ण आहे), शांति-मोक्ष-धर्म-पर्व व उद्योगपर्व हीं उपलब्ध आहेत. याशिवाय या मंडळाच्या हस्तलिखितांच्या सूचींत याच्या सूतसंहितेचीहि एक नोंद आहे. परंतु तें हस्तलिखित मात्र मला पाहायला मिळालें नाहीं. शांतिपर्वाच्या अखेरीस आपण अध्यात्म-रामायण–टीका व अनुशासन–पर्वावरील टीका पूर्ण केली असें सांगून भीष्मपर्वावरील टीका पुरी केल्याचें सांगितलें आहे. यावरून कमींत कमी महाभारताच्या तेरा पर्वांवर यानें टीका लिहिली असावी असें अनुमान निघतें.

हस्तलिखितांचें अक्षर—मंडळांतील याचीं सारीं हस्तलिखितें पाहतां या साऱ्या हस्तलिखितांचें अक्षर अगदीं अवाच्य आहे असें म्हणावें लागतें. त्यांतील लिपि ही देवनागरी आहे, हें प्रथमदर्शनीं खरें वाटूं नये, इतकें हस्ताक्षर वाईट आहे. या हस्त-लिखितांची लिपि देवनागरी असली तरी तिच्यांत मोडी अक्षरांची रेलचेल आहे. मी स्वतः व श्री. ढेरे असे दोघेजण मिळून दोन तास झगडल्यानंतर जेमतेम पंधरावीस ओव्या लावतां आल्या.

अशा प्रकारच्या या कठीण मामल्यांतून जेवढी माहिती या गोविंदाच्या रचने-बद्दल देतां येईल. तेवढी देण्याचा प्रयत्न केला आहे.

(१) गंगेच्या उत्तरतीरावर देवगिरि नांवाचा एक पुण्य पर्वत आहे. त्या पर्वताच्या पूर्वेस खडकी (औरंगाबाद) नांवाच्या गांवीं शके १६८१ युवासंवत्सरीं श्रावण वद्यांत मंगळवारीं शिवरात्रीचे दिवशीं स्त्रीपर्वाच्या लिखाणाची समाप्ति झाली.

(२) सौप्तिकपर्व अपूर्ण असल्यामुळें त्याविषयीं कांहींच माहिती देतां येत नाहीं.

(३) उद्योगपर्वाची अध्यायसंख्या १९५ इतकी असून पत्रसंख्या १००६ इतकी आहे. या पत्रांचा आकार सामान्यपणें १५″ × ७″ असा आहे. यावरूनच उद्योगपर्वाच्या ओवीसंख्येसंबंधीं कल्पना केलेली बरी !

हें पर्व देवगिरीच्या सान्निध्यांत असलेल्या खडकी गांवीं शके १६१६ युवा संवत्सरात कार्तिक शुद्ध षष्ठी सोमवार या दिवशीं लिहून पुरें झालें आहे.

गोविंदानें शके १६१६ ला युवा संवत्सर होतें, असें नोंदविलें आहे. पण ही त्याची नजरचूक असावी. शके १६१६ ला भावसंवत्सर येतें, याच पर्वाच्या बाबतींत फक्त हा शक संवत्सराचा मेळ बसत नाहीं. इतर सर्व पर्वांच्या शक–संवत्सरांचा मेळ बसतो, म्हणून त्याची इथे नजरचूक असावी असें दिसतें.

(४) शांतिपर्व हें खूपच प्रचंड काम आहे. या पर्वाची अध्यायसंख्या ३६२ इतकी आहे. श्लोक-संख्या १४००० आहे. या श्लोकांवरील टीकेच्या ओव्या ३७१६० इतक्या आहेत. या पर्वांत आधार म्हणून श्रुति-स्मृतींतील ३४० श्लोक घेतलेले आहेत. श्लोक, ओव्या व प्रमाणवचनें मिळून एकूण सर्व संख्या ५१५०० इतकी आहे.

या टीकेची समाप्ति एलपूर सन्निधानी खडकीनामक गांवांत शके १६१६ शुक्र-संवत्सरी मार्गशीर्षमासी चतुर्दशीच्या दिवशीं झाली.

गोविंदाची भाषा काव्यमय नाहीं. ती रामदासी वळणाची, सहज सुलभ असली तरी वास्तवाचें अधिष्ठान लाभलेली आहे. आपल्या रचनेला तो केवळ ' टिपण ' म्हणतो. गोविंदाला काव्य जमत नसलें, तरी तो श्लोकाचा अनुवाद मात्र उत्तम करतो. यावरून तो एक समर्थ अनुवादक आहे असें म्हणावें लागतें. गोविंद दर वेळेस प्रत्येक श्लोकाचा स्वतंत्र अनुवाद देतो अशांतला भाग नाहीं. कांहीं वेळेस तो सलग श्लोकांचा अनुवाद करतो. गोविंद हा समर्थ अनुवादक आहे या माझ्या विधानाच्या पुष्ट्यर्थ मी प्रथम कांहीं मूळ श्लोकांचा मराठी अनुवाद देतों व नंतर त्याची टीका देतों—

" राजानें युद्ध न करतांच आपल्या उत्कर्षाची अभिवृद्धि करावी. कारण, हे प्रजाधिपते, युद्ध करून विजय मिळविणें हें कमी प्रतीचें आहे असें सांगितलें आहे. जर मुळांतच चांगली दृढता नसेल, तर न मिळालेल्या वस्तु मिळविण्याविषयींची इच्छा करूं नये. कारण, मुळामध्यें दृढता नसेल तर राजाला लाभ होत नाहीं. ज्या राजाचें राष्ट्र विशाल असून त्यांतील प्रजा संपन्न आणि राजावर प्रेम करणाऱ्या असतात व जो स्वतः संतुष्ट असून सचिवांचें पोषण करीत असतो, तो राजा दृढमूल होय. कारण प्रजा आणि सचिव हीं राज्याचीं मूलें त्याच्या राष्ट्रांत बळकट असतात. ज्याचे योद्धे अत्यंत संतुष्ट, गोडीनें वागविलेले आणि शत्रूंशीं अत्यंत प्रतारणा करणारे असतात, तो राजा जरी सैन्य कमी असले तरी ही पृथ्वी जिंकून घेतो. ज्याच्या राजधानींतील व राष्ट्रांतील लोक प्राण्यांवर दया करणारे व धनधान्यसंपन्न असतात, तो राजा दृढमूल होय. कारण प्रजा हें राज्याचें मूळ आहे. ज्या वेळीं आपला प्रताप गाजविण्याची चांगली वेळ आली आहे असें वाटेल, त्या वेळीं बुद्धिमान् राजानें शत्रूची भूमि आणि द्रव्य हरण करण्याची इच्छा करावी. ज्याचें ऐश्वर्य वृद्धिंगत झालें असून जो सर्व प्राण्यांवर दया करितो व चलाख असून

आपलें संरक्षण करितो, त्याच्या राष्ट्राची अभिवृद्धि होते. जो राजा उत्कृष्ट प्रकारें वागणाऱ्या लोकांशीं असत्यपणें वागतो, त्याचा आत्मा परशूच्या योगानें छिन्न झालेल्या वनाप्रमाणें त्या कर्माच्या योगानें क्षीण होतो. राजानें शत्रूंचा सदैव वध केल्याशिवाय ते कमी होत नाहींत. पण क्रोधाचा नाश कसा करावा हें ज्याला माहीत असतें, त्याला मुळीं शत्रूच नसतात. सभ्य लोक ज्याचा तिरस्कार करतात तें कृत्य सुज्ञ राजानें करूं नये. जें कृत्य शुभ आहे अशी मनाची खात्री होईल, त्याजवरच लक्ष ठेवावें. आरंभिलेलें कार्य शेवटास नेऊन सुखाचा अनुभव घ्यावा, अशी जो इच्छा करितो, त्याचा इतर लोक अपमान करीत नाहींत व त्याला स्वतःलाहि पश्चात्ताप पावावा लागत नाहीं. जो राजा ह्या लोकांमध्यें अशा प्रकारच्या वर्तनाचें अवलंबन करितो, तो इहलोक व परलोक ह्या दोहोंनाहि हस्तगत करून उत्कर्ष पावतो. (शां. प. अ. ९४)

यावरील गोविंदाची टीका अशी—

वामदेव बोले गा सुमना । जो विजय करीजे युद्धे विना ।
तेणे तो राजा पावे वर्धना । तो श्रेष्ठ नृपती ॥
जो युद्ध करूनि जय पावत । तो जघन्य राजा निंद्य बोलिजेत ।
अतेव रायें करावें कृत्य । विनायुद्ध जय प्राप्तीचे जें तें ॥
तत्प्राप्तीचें लक्षण । सांगतों मी करी श्रवण ।
अलभ्य अर्थाची इच्छा न करून । लभ्य अर्थाचीच करावी ॥
दृढमूल असावे राये जाण । दुर्बळ मूळ असता नृपेन ।
अर्थ लाभ नव्हे तया लागून । रायासी कदापि नृपति ॥
अतेव दृढ पाहिजे नृपति । तया दृढमूळाची आइके स्थिति ।
जयाचे देशजन स्फीत वसती । संपन्न धनधान्य संपत्तीने ॥
अराजक असतां देशी । प्रजा राजप्रिया विशेषी ।
संतुष्ट पुष्ट प्रधान ज्या रायासी । दृढमूळ बोलिजे तो राजा ॥
जयाचे योध्ये संतुष्टवीर । वेतनें पावती बळवान समग्र !
एकमने वसती परस्पर । राजकार्यी तत्पर सर्व ॥
ऐसे असतां सेनाबळ । जया नृपाचे सकळ ।
जो अल्पदंडे ही भूपाळ । जय पावे पृथवीचा ॥
जया रायाते पुरजन ! तथा देशींचे लोक प्रजागण ।
अनुरक्त असती राजहित इच्छुन । की मानिले असतां ते सर्व राये ॥
तेणें सर्वहि संतुष्ट वसती । धनधान्यादि समृद्धी जया अति ।
ऐसा जो राजा सर्व लोक सहिती । दृढमूळ बोलीजे तया ते ॥

गोविंद नरहरीची ओवी कोणत्याहि बंधनांत गोवतां येईल असें वाटत नाहीं. मात्रा, चरण, यमक या सर्व बाबतींत बंधनातीत ही ओवी आहे. गोविंदाला बंधन आहे तें फक्त एकच व तें म्हणजे त्याच्या मनांतील अर्थ संपला की त्याची ओवीहि संपते.

गोविंदाचीं हीं सर्व हस्तलिखितें त्याच्या स्वतःच्या हस्ताक्षरांतील असावींत. कारण उद्योगपर्वाच्या प्रारंभींच त्यानें 'स्वटीका प्रारंभा' असें लिहिलेलें आहे. ज्या वळणाचें हस्ताक्षर उद्योगपर्वाचें आहे, त्याच वळणाचें हस्ताक्षर इतर सर्व पोथ्यांचें आहे.

गोविंदाचें जन्मगांव जरी निश्चित सांगतां आलें नाहीं, तरी त्याचें दीर्घकाळ वास्तव्य खडकी येथें म्हणजे औरंगाबादला होतें असें निश्चितपणें म्हणतां येतें. भागवत, शांतिपर्व, उद्योगपर्व, स्त्रीपर्व इ. सर्व पर्वांच्या लिखाणाची समाप्ति औरंगाबादला झालेली आहे व तशी प्रत्येक पर्वाच्या अखेरीस नोंद आहे. भागवत टीकेच्या रचनेचा काळ शक १५८१ असा असून शांतिपर्व, स्त्रीपर्व, उद्योगपर्व यांची रचना अनुक्रमें शक १६११, १६१६ व १६१७ मध्यें झालेली आहे; म्हणजे भागवताच्या रचनाकाळापासून उद्योग-पर्वाच्या रचनेपर्यंत ३६ वर्षें तो खडकीला (औरंगाबाद) राहात असावा असें वाटतें.

त्याच्या गुरूचें नांव शिव आहे व त्याचें उपास्य दैवतहि शिवच असावें. प्रत्येक पर्वांत या गोष्टीची श्लेषार्थानें नोंद झालेली आहे.

उदा. या शंकरीच वसती वाटे मनीं । (भागवत)
जाली शिवकृत हो सुबुद्धि । (शां. प.)

याची शिवभक्ति इतकी उत्कट आहे कीं, बहुतेक कृतींची सांगता त्यानें चतुर्दशीला म्हणजे शिवरात्रीच्या दिवशीं अथवा सोमवारीं केलेली आहे. याशिवाय त्याच्या आजूबाजूचें सारें वातावरणहि बारा ज्योर्तिलिंगांपैकीं घृष्णेश्वराचें सान्निध्य, कैलास लेण्याचा अतूट सहवास इ. शिवप्रभावित आहे. एवंच त्याच्या गुरूचें नांव शिव व उपास्य दैवतहि शिव आहे. म्हणून गोविंद नरहरी हा शैवसंप्रदायी असावा, असें वाटतें.

एक नवीन धागा—रामदासी संशोधन, खंड दुसरा यांत नोंदविलेल्या क्र. ११३३ या बाडांकांत अवधूत–कृत 'कपिलगीते' ची माहिती आहे. या अवधूताचा गुरु कोणी गोविंद आहे. त्याच्या ग्रंथाच्या रचनेचा स्थलकाल पुढीलप्रमाणें आहे—

शालिवाहन शके महिमा । सोळासे तीस नामा ॥
सर्वधारी संवत्सर प्रेमा । वसंत संभ्रमा चैत्र मासु ॥
पर्वतामाजी देवगिरी । खडकी ग्राम बाईजी पुरी ।
केशवाचिया मंदिरीं । ग्रंथ निर्धारीं संपविला ॥

या अवधूताचें स्थळ व काळ पाहतां तो नरहरी गोविंदाच्या स्थळकाळाशीं जमणारा आहे. यावरून हाच गोविंद नरहरी या कपिलगीताकार अवधूताचा गुरु असावा, असें वाटतें. जाणत्यांनीं अधिक खात्री करून घेतली पाहिजे.

८ योगिनी मीरा

(श्री. विनायकराव करमळकर, पुणें.)

प्रस्तुत लेखाचें शीर्षक वाचून वाचक थोडे बुचकळ्यांत पडतील; पण लेख आमूलाग्र वाचल्यानंतर व त्यांत दिलेले संदर्भ मूळ मिराबाईचे उपलब्ध काव्याशीं ताडून पाहतां त्यांची आम्हांप्रमाणेंच खात्री पटेल. जीवनाचें प्रत्येक क्षेत्रांत असंख्य स्त्री व पुरुष रत्नें या भारतभूमींत आपल्या जाज्वल्य तेजानें चमकून गेलीं. त्यांत राजस्थानांत जन्म पावलेली मीराबाई ही केवळ या देशांतच नव्हे तर अखिल जगतांत मानवजातीचें एक भूषण मानलें जाईल यांत दुमत व्हावयासारखें नाहीं. आधुनिक इतिहासज्ञांनीं आतां आवश्यक पुराव्यानें तिचे चरित्रावर नवीनच प्रकाश पाडला आहे. तथापि अद्याप कित्येक गोष्टीं-बाबत विद्वानांत एकमत झाल्याचें आढळून येत नाहीं. भक्तिरसामध्यें ओतप्रोत आप्लावित अशी मीरा. हिनें आपलीं दोन्ही कुळें उद्धरिलीं. एवढेंच नव्हे तर ईश्वरानुग्रहाची एक पायवाटच भावी साधक भक्तांकरिता तिनें उपलब्ध करून दिली. चरित्राचा अगदी धांवता आढावा घेऊन मीराबाई ही भक्त होतीच, तथापि ती निर्गुण भक्त व अद्वैती होती हें आमचें म्हणणें आम्ही सुज्ञ वाचकांचे विचारार्थ पुढें ठेवणार आहों. राजस्थानचा इतिहास लिहिणारे कर्नल टॉड यांचे म्हणण्याप्रमाणें राणा कुंभ यांची ती पत्नी नाहीं तर सिसोदिया कुलावतंस राणा सांगा=संग्रामसिह याचा ज्येष्ठ पुत्र भोजराज याची धर्मपत्नी होय. तिचा जन्म संवत् १५५५ ते १५६१ यांतला असून निधनकाल संवत् १६०३ समजण्यांत येतो. म्हणजे तिला केवळ अट्ठेचाळीसच वर्षांचें अल्प आयुर्मान लाभलें. भारतेंदु हरिश्चंद्र यांचे मतें मृत्यु संवत् १६२० ते १६३० या दरम्यान केव्हां तरी असावा. त्यांनीं आपलें मत उदयपुर दरबारचीं कांहीं महत्त्वपूर्ण कागदपत्रें पाहून बनविल्याचें समजतें. उत्तर भारतीय संतपरंपरेचे विद्वान् लेखक व संतवाङ्मयाचे गाढ अभ्यासी श्री. परशुराम चतुर्वेदी यांचाही विचार, सदर मतास सर्वस्वी पाठपुरावा करणारा दिसतो.

बालपणापासून मीराबाईचें भक्तिप्रेम भगवान् श्रीकृष्णाकडे असल्याचें दिसून येतें. तिच्या अखिल काव्यांत देवाला संबोधून राम, रसैय्या, हरि, अविनासी, निरंजन, अंतरजामी व इतरहि शब्दप्रयोग आले आहेत तथापि ती गिरधारी वा गिरधर गोपाल या नांवानें पूर्वसाधनांत ईश्वराला संबोधिते. भक्तिमार्गांतील तिची वाटचाल 'सगुणाचेनि आधारें निर्गुण पाविजे निर्धारें' अशी अद्वैती स्वरूपाची आहे.

भक्त व भगवान् या द्वैतभक्तींतून तिनें आपली परिणति उन्नत आत्मोपलब्धींत केली ती सुरतशब्दयोग या योगप्रणालीद्वारा होय हें आमचें वैयक्तिक मत आहे. आमचें असें मत व्हावयाचें मुख्य कारण म्हणजे मीराबाईचें उपलब्ध काव्य होय. काशी नागरीप्रचारिणी

सभेचे विद्वान् कार्यवाह स्वर्गीय पंडित व्रजरत्नदास यांचें ‘ मीराँ माधुरी ’ आम्ही समग्र अभ्यासिलें आहे; त्यांनीं सदर ग्रंथाची रचना ऐतिहासिक पुराव्यावर संशोधनपूर्वक अत्यंत परिश्रमानें केली असल्याचें ग्राह्य मानूनहि आम्हांस अत्यंत खेदपूर्वक असें म्हणावें लागतें कीं, हा ग्रंथ अतिरेकी वैष्णवमतावलंबी प्रचाराचा नमुना असून दुराग्रही स्वरूपाचा, सत्यापलापी, विसंगति व कांहीं चुका यांनीं भरलेला आहे. आम्ही आमचे लेखनांत सदर पुस्तकांतील कांहीं अस्सल विधानेंच दाखवितों. विष्णुस्वामीके सम्प्रदायवाले स्वामी ज्ञानदेव पृ० ७७. सेना न्हावी हा रामानंदाचे मुख्य बारा शिष्यांत आहे हें विज्ञ वाचकांस तरी सांगावयास नको. पण तो ज्ञानेश्वरांचा शिष्य म्हणून सांगितला गेला आहे. यांत सत्यापलापाबरोबर ऐतिहासिक असंभाव्य विसंगति आहे पृ. ७४ तुकारामांना स्वप्नांत गुरूकडून उपदेश झाला तो कृष्णचैतन्य म्हणजे गौरांगप्रभूकडून झाल्याचें नमूद आहे ! पृ. ३८ डॉ. स्वर्गीय पंडित पीताम्बरदत्त बडथ्वाल हे मिराबाई निर्गुण उपासकच मानतात; पण व्रजरत्नदासांना सांप्रदायिक अभिनिवेशांत हें मत अत्यंत झोंबतें ! म्हणून ते आपल्या ग्रंथांत म्हणतात ‘ मीराको न किसीसे दीक्षा लेनी थी न इन्हें किसी गुरूकी आवश्यकता पडी ’ वास्तविक पाहतां, सूरदास हे वल्लभाचार्यांचे शिष्य नसून ते अष्टछाप वैष्णव कवींत गणले जात; त्यांचेप्रमाणें मिराबाईनेंही वल्लभांचे शिष्यत्व स्वीकारावें याबद्दल सदर सांप्रदायिकांकडून तिजवर अवांच्छनीय दबाव आणला गेला; पण ती प्रबुद्ध म्हणून या गोष्टीस बधली नाहीं; हें सत्य असून याचा पडताळा बाबू संपूर्णानंद यांचे योगप्रवाह पुस्तकांत सांपडतो. त्यांतील दोन तीन प्रसंग त्यांनीं व्रजभाषा गद्य-साहित्यांत विश्वसनीय आणि सर्वमान्य असलेल्या ‘ चौरासी तथा दोसो बावन वैष्णवों की वार्ता ’ या गोस्वामी गोकुलनाथजी यांच्या दोन ग्रंथांवरूनच घेतलेला आहे. ४० वी वार्ता अशी—गोविंद दुबे म्हणून कोणी साचोरा ब्राह्मण मिराबाईचे घरीं पाहुणचारास राहिला. तो तिच्या सत्संगतीस कांहीं दिवस होता. पण ही बातमी गोस्वामीस कळतांच तें त्यांस कदाचित् न आवडून त्यांनीं एक श्लोक सदर दुबे यास लिहून पाठविला त्याबरोबर हा गृहस्थ मीराबाईचा निरोपहि न घेतां तडक गुरूकडे चालता झाला. वार्ता ५४ मधील मजकूर असा—मीराबाईचे पुरोहीत रामदास यांनां मीराबाईचें दैवत श्रीठाकुरजी श्रीकृष्णापुढें आपले गुरु श्रीवल्लभाचार्य यांचे स्तुतिपर एक पद म्हटलें. त्यावर मीराबाईनें त्यांना दुसरें पद श्रीकृष्णविषयकच म्हणावयाची विनंती केली त्यावर हे एवढे संतापले कीं त्यांनीं शेलक्या शिव्या हांसडून यापुढें तुझें मुखावलोकन नको म्हणून मीराबाई क्षमाशीलतेनें परत बोलवीत असतां रवाना झाले ! त्यांचे स्वतःचे शब्द— अरी दारी राँड यह कोन को पद है, यह कहा तेरे खसमकी मूँड है, जा आज ते तेरो मुँहड़ौ कब हूँ न देखूँगा ! ’ (भारतेंदुजीकृत उत्तरार्ध भक्तमालमध्यें १२३ अनुक्रमाच्या वार्तेंत गोविंद दुबे व १३६ व्या वार्तेंत रामदास यांचा उल्लेख आहे)

वार्ता ९२ मधील संदर्भ—कोणी कृष्णदास अधिकारी वल्लभानुयायी द्वारकेहून परत गोकुळ वृंदावनास जातांना वाटेंत मीराबाईचे गांवास थांबले. पण मीरा वल्लभसांप्र-

दाथी नाहीं म्हणून तिजकडे उतरले नाहींत! तिजकडे हरिवंश, हरिराम, व्यास आदी कित्येक वैष्णव ते वेळीं उपस्थित होते. इतक्यावरहि मीराबाईनें वल्लभाचार्य गादीसाठीं कांहीं भेट त्यांस पाठविली. तीहि त्यांनीं स्वीकारली नाहीं. या अशाच चमत्कारिक वर्तनाबद्दल कोणा वैष्णवानें कृष्णदासाकडे पृच्छा केली असतां 'वल्लभाचार्यशिष्यांना ही तिची भेट स्वीकारून काय करावयाचें? असलें उर्मट उत्तर देऊन इतक्या वैष्णवांचें मेळाव्यांत मीराबाईचा अवमान करून सदरप्रसंगीं 'सबकी नाक नीची कर दी' यांत धन्यता मानली !!

मीराबाई कुलांतील मेडता निवासी हरिदास, राजा जयमल हे सपरिवार श्रीनाथजी शिष्य झाले. अजबकुंवरबाई ही मीराची ज्येष्ठ भावजय श्रीविठ्ठलनाथाची शिष्या झाली. हीबरोबर नाथजी चौपट खेळत; पण हिच्या त्यांनीं तेथेंच राहावें या अत्यंत आग्रहपूर्वक म्हणण्यास त्यांनीं रुकार दिला नाहीं. विठ्ठलनाथ व त्यांचे सात पुत्र जीवित असेपावेतों आपण गोवर्धन पर्वतावरच राहूं, मग येथें येऊं या म्हणण्यानुसार ते संवत् १७२८ मध्यें राणा राजसिंह यांचे राज्यकालांत मेवाडमध्यें आले. असो. मीरा वल्लभानुयायी नाहीं हें प्रथमारंभीं नमूद करणें भाग आहे. मीराबाईचीं म्हणून समजल्या जाणाऱ्या पदांत ती असंदिग्ध शब्दांत आपणांस निर्गुणवादी संत रोहिदास अर्थात रैदास यांची शिष्या म्हणविते.

(१) गुरु मिलिया रैदासजी दीन्ही ग्यानकी गुटकी पद २४
(२) मीराँने गोविंद गुरु मिलिया रैदास पद २९
(३) रैदास सन्त मिले मोहि सद्गुरू, दीन्ही सुरत सहदानी
(४) गुरु रैदास मिले मोहि पूरे, धुरसे कमल भिडी पद १५९

एकंदर मीराचे काव्यसंभारांत असे दुसरेहि उल्लेख सांपडूं शकतील. 'कल्चरल हेरिटेज ऑफ इंडिया' हें रामकृष्ण मिशनचें सर्वमान्य ग्रंथ होत. त्यांतील दुसऱ्या खंडांत पृष्ठ २५२ वर मीराबाई रैदासशिष्या म्हटलें आहे. It is said that Zali the queen of Chitor received her initiation into the religious life from him (Raidas) and Mirabai also completed her spiritual discipleship under his guidance. Worshipper of Girdharilal at first was later initiated by Raidas into the worship of one and infinite.

त्याचप्रमाणें बेलवेडियर प्रेस अलाहाबाद यांत आधारपूर्वक छापलेल्या संतवाणी-मध्यें हेंच मत दिलें आहे. अशा स्थितींत मीराबाई ही माध्व सांप्रदायांतर्गत चैतन्यांची वा रघुनाथदास यांची शिष्या असावी हा आपला तर्क श्रीवियोगी हरी व व्रजरत्नदास कोणत्या आधारावर प्रतिपादितात तें समजत नाहीं. त्यांनीं उद्धृत केलेलें पद निर्विवाद प्रक्षिप्त आहे.

अब तो हरी नाम लौ लागी ।
सब जगको यह माखनचोरा, नाम धर्‍यो बैरागी ॥
कहँ छोड़ी वह मोहन मुरली कहँ छोड़ी सब गोपी ।
मूँड़ मुँड़ाई डोरि कटि बाँधी माथे मोहन टोपी ॥
मातु जसोमति माखन कारन बाँध्यो जाको पाँव ।
श्याम किशोर भए नवगोरा चैतन्य जाको नाँव ॥
पीताम्बरको भाव दिखावै, कटि कोपीन कसे ।
दास भक्तकी दासी 'मीराँ' रसना कृष्ण बसे ॥

मीराबाईचे इतर काव्याशीं ही भाषा मेळ खात नाहीं. संन्यासी चैतन्यांनीं कधीं टोपी घातल्याचें चित्र नाहीं. मीराबाईचे मुखीं गिरधर, गोपाल, असें सगुण लीलाविग्रही शब्द आहेत 'कृष्ण' हा शब्द नाहीं. चैतन्यांना कृष्णावतार समजून कोणी ही रचना मागून केलेली आहे. आनंद शंकर ध्रुव यांचे 'नरसी अने मीरा' या ग्रंथांत ते म्हणतात, 'हमें मीराके चैतन्य सांप्रदायके साधुओंके साथ समागम होनेकी विशेष संभावना ज्ञात होती है'. या त्यांच्या म्हणण्यास नकार द्यावयाचें कारण नाहीं; पण त्यावरून ती चैतन्यसांप्रदायी ठरत नाहीं. श्रीरूप गोस्वामी हे भक्तिरसामृतसिंधूचे कर्ते. यांचे पुतणे जीव गोस्वामी हे सप्त गोस्वामींपैकीं एकटेच ब्रह्मचारी व कर्मठ होते. त्यांना त्यांचे चुलत्यानें एक राधा-दामोदराची मूर्ति पूजनीय म्हणून दिली. तिच्या भजन-पूजनांत ते दंग असत. त्यांची वृंदावनांत मीराबाईनें भेट घेतल्याचा प्रसंग आहे. हे प्रकृति म्हणजे स्त्रीमुखावलोकन करीत नसत. अर्थात् मीराबाईसहि भेट पडद्यांत बसून अवगुंठनपूर्वकच घ्यावी लागली. पण जीव गोस्वामीच्या या 'पणा' बद्दल मीराबाईस सखेद आश्चर्य वाटलें. तिनें साभिप्रायच भागवताचा हवाला देऊन विचारिलें 'आपल्या भक्तींत प्रकृति-पुरुषभेद अद्याप शिल्लकच आहे म्हणावयाचा? एरवीं 'वासुदेवः पुमानेकः स्त्रीमयं इतरज्जगत्' असें मी तरी समजते. व्रजप्रदेशांत तरी श्रीगिरधारीलालजीशिवाय अन्य पुरुष असल्याचे मला माहीत नव्हतें. मीराबाईची कृष्णचंद्राबद्दलची ही अभूतपूर्व निष्ठा पाहून श्री जीवस्वामी ओशाळगत झाले यांत नवल तें काय? ते मीराबाईस प्रेमादरपूर्वक भेटले आणि उभयतांचा कांहीं काल हरिकीर्तनभजनांत व्यतीत झाला, असें ऐतिहासिक रीत्या नमूद आहे. जीव स्वामी स्पष्ट माध्व सांप्रदायी म्हणजे द्वैती. त्यांचें उपास्य दैवत युगुल म्हणजे राधा-कृष्ण. मीराबाईचे पदांत राधेचा नामनिर्देशहि नाहीं! द्वैत, शुद्धाद्वैत, विशिष्टाद्वैत, भेदाभेद या तत्त्वज्ञानांचा ती योगारूढ भूमिकेवरून 'मूले कुठारः' या न्यायानें आपल्या काव्यांत निकालच लावते! अशा स्थितींत ती जीव गोस्वामीशिष्या कसें मानावयाचें? मीराबाईचें सांसारिक जीवन पुढें तीनशें वर्षांनीं झालेल्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर इचेप्रमाणें खडतर होतें. राजकुलांतील सुयोग्य वीरपत्नी, वीरस्नुषा, अकाल वैधव्य, स्वजनविरोध इत्यादि

पण पारमार्थिक जीवन महाराष्ट्रभक्तवर नामदेवांप्रमाणें आरंभीं भक्त पण रैदास अनुग्रहानंतर अपरिच्छिन्न, ब्रह्मस्वरूप, अनन्यभक्तरूप होतें पृष्ठ ९८. अशा स्थितींत मीराचे कोणी गुरु नव्हते, ती केवळ गिरधारीलाललाच गुरु मानी. ब्रह्मानंदरसाहून अनंत गुण अधिक वैष्णवरस आहे भेदाभेदतत्त्वज्ञानप्रचार १४२–४७ पृष्ठ आणि त्यापेक्षांहि कोटि गुण अधिक उज्ज्वल श्रीगोकुलेन्दूचा मधुररस आहे पृष्ठ १४५, हें सर्व व्रजरत्नदास यांचे लिहिणें कट्टर वैष्णवावलंबी प्रचाराचा नमुना म्हटलें जाईल ! पण श्रीकृष्णपाद- [illegible] द्वारकेस निघून जाते व सासर-माहेरचे आग्रह, तसेंच तिच्या समकालीन असलेल्या [illegible] चैतन्यसंप्रदायाचें, संत मेळाव्याचें तिला कायमचें विस्मरण पडून ती द्वारकेहून परत मात्र फिरत नाहीं. ते कां, याचें व्रजरत्नदास उत्तर देत नाहींत ! तिचें वृंदावन–दर्शन व तदुपरान्त द्वारकाप्रयाण १५९५–९६ संवताचें समजलें जातें व तेथेंच ती भजन–पूजन व हरिकीर्तनांत शेष जीवन व्यतीत करते आणि मृत्यूसमयीं मी ठाकुरजीचा निरोप घेते या सबबीखालीं द्वारकेच्या प्रस्तरमूर्तींत विलीन होते. आमचे मतेंही भूतजयसिद्धि असून ती योगीच करूं शकतात. योगी इच्छामरणी असतात आणि निधनसमयीं आपला देह पंचभूतांपैकीं कोणत्याहि महाभूतांत विलीन करितात. इतर संतांचींहि अशीं उदाहरणें आहेत. ऐतिहासिक पूर्णसंशोधनयुक्त मीराबाईचे पदांचा एकही अस्सल संग्रह उपलब्ध नाहीं व तिचे नांवावर ग्रंथरचना नाहीं. आहे ती फुटकळ पदांची. साधारण पांचशेंपावेतों संख्या आहे. राजस्थानी बोलभाषा, व्रजभाषा व गुजराती यांचें त्यांत मिश्रण आहे. तिच्या पदांतून योगविषयक पदांचे ओझरते उल्लेख देऊन आम्हांस हें कार्य संपवावें लागत आहे. अद्वैतज्ञान हें स्वसंवेद्य अनुभवाचें असल्यानें त्यांत भक्तिपर शब्दांचें प्राचुर्य नसणार हें उघड होय; संकेतानेंच ही स्थिति फुटकळ शब्दमाध्यमानेंच समजणार, हें मनांत बाळगून वाचकांनीं निम्न संदर्भावरून मूळ पदें अभ्यासावां असें आम्हांस सुचवावेंसें वाटतें.

(१) तिच्या उपलब्ध पदांत श्रीकृष्ण वा आखरी छाप ' मीराके प्रभु गिरिधर नागर, यापेक्षां अधिक वेळां राम, रमैय्या, अविनासी, अंतरजामी, हरि, निरंजन हीं संबोधनें अपरिच्छिन्न स्वरूपास उद्देशून आहेत.

(२) तिचें उन्मार्गगामी मन मदोन्मत्त हत्तीप्रमाणें अदम्य तें ' सिरपर सद्गुरु हाथ धरनेसे ' अंकुश मारल्यासारखें स्थिर होतें. हा दीक्षाविधि आहे. यानें इंद्रिय–अगोचर अनुभव प्राप्त होतात.

(३) ' वस्तु अमोलक दी म्हाँरे सतगुरु ' ही अमोलिक वस्तु म्हणजे मंत्र चैतन्यनाम. याच्या जपानें आत्मोपलब्धि होते. ३१० पद.

(४) पँचरँग चोला = पांच भौतिक शरीर ' ज्यांचे पति परदेशीं असतील, त्यांनीं त्यांस प्रेमपत्र पाठवावें, माझे प्राणनाथ माझे हृदयींच आहेत. जों बिछुडे हैं

पियारे से भटकते दर बदर फिरते हम न कायर हैं हममें हमें होशयारी क्या-कबीर.
चंद्र, सूर्य, पृथ्वी, जल, पवन, आकाश हीं विलीन होतील पण तो अविनासी (प्रियकर)
अटल राहील. ती सुरत-निरत अर्थात् ध्येयनिर्वाणाकडे अखंड स्मरण-जपाची प्रवाह-
रूप ज्योत लावते. यांत मन ही वात, अगम अर्थात् अद्‌भुत प्रेमरूपी तेल, दिनरात जळत
आहे, या प्रेमभट्टींत जो मन विरमून टाकणारा मद आहे, त्याचें तिनें आकंठ पान केलें
आहे पद ८७-१३०.

(५) ' गगन मँडल पै सेज पियाकी, किस बिध मिलणा होय ' ही सहस्रारांत
प्रियकराची भेट. ' सूली उपर सेज ' ही मूर्ध्न स्थानीं भेट. कबीर सांगतात ' ऊँचा महल
अजब रँग बंगला साँइकी सेज तहाँ लगी फुलनकी '

(६) ' जोत में जोत मिला जा ' जीव-शिव ऐक्य. परमात्म्याशीं मीलन. २६९.

(७) " सबदका ध्यान लगाया रे " हा गुरूपदिष्ट शब्द हा श्वासांत गुंफून
ध्यान करणें, सत् नाम, सुरत शब्द २७७.

(८) " तुम बिच, हम बिच अंतर नाही, जैसे सूरज घामा " सूर्य व त्याचीं किरणें
किंवा प्रकाश यांतलें अद्वैत. जीवो ब्रह्मैव नापरः २८१.

(९) " सोतो सुरत जगाऊँ, अमरापुर पाऊँ " निर्विकल्प समाधींत अखंड परमाप्त
पद प्राप्ति मिळवणे २८३.

(१०) ' मेरे पार निकस गया सतगुर मार्‍या तीर ! ' शब्दरूपी बाण; यानें
पूर्ण देहनिरास होतो. ३०३.

(११) " सुरत सैल असमानी, रैदास संत मिले मोहि सतगुरु, दीन्ह सुरत सहदानी "
सुरत शब्दरूपी निसानी वा आत्मस्वरूपाची खूण रैदासप्रदत्त ३०७.

(१२) " रिमझिम बरसैं मेंहड़ा चहुँ दीसि चमकै दामिणी, गरजै घन भारी हो " धर्म-
मेघसमाधींत, अखंड अनाहत नादश्रवण आणि कोटिसूर्यसमविद्युल्लतेचा प्रकाश " सतगुर
भेद बताइया खोली भरम-किवारी हो. गुरूपदेशानें देहाध्यास कायमचा गेला. ' सब घट दीसे
आतमा ' अगम अटारी, सर्वत्र स्वरूप-दर्शन अविनाशी सौंधावर-सहस्रारांवर ३१४

(१३) " ऊँची नीची राह रपटीली, पाँव नहीं ठहराय, सोच सोच पग धरूँ जतनसे
बार बार डिग जाय ' क्षुरस्य धारा········ दुर्गमं वदन्ति। ऊँचा नीचा महल पियाका
······सुरत झकोला खाय,सहस्रदलकमलांत अविरत अद्वैतध्यान जमत नाही पैंड पैंड बट मार
-षड्‌रिपू व आवरण, विक्षेप किंवा असंभावनाविपरीतभावनारूपी विघ्नें. ३१४

(१४) " आसन माँड मन अडिग होय बैठा " प्रत्याहारसाधना.

(१५) " पियका पलंगा जा पौढ़ूँगी " सहस्रारांत अविचल स्थिति.

(१६) प्रेम घंधुरा, सुरतकी धुनी लास्यभाव, अनाहत नाद, ध्यानरूपी वस्त्र

(१७) होलीमें बिनसुरके छतीसो राग, बिनताल पखवाज, अनेकविध अनाहत नादनादश्रवण "त्रिकुटिमहलके झरोकेसे झाँकी लगाकर सुन्न महलमें सुरत जमाना' भूमध्य प्रदेशांतून शून्य प्रदेशांत म्हणजे निरालंबस्थितींत राहणे.

(१८) साहेबका घर खजूर पेड जैसा बेहद ऊँचा परम पुरुषार्थ. जो चढ पाता है उसको अपूर्व रस चखनेको मिलता है. अननुभूती पराभक्ती प्रसाद मिळतो. नमुन्यादाखल मीराचे काव्यांतून योगविषयाचें हें दिग्दर्शनमात्र आहे. हा विषय सामान्यांस नवखा व कठीण. तशांत अनुभवगम्य असल्यानें हें काव्य कालौघांत नष्ट झालें! सामान्यजनांस प्रेम, भक्ति, जगनश्वरता, विषयवैरस्य, भेटीचो उत्कंठा, विरह आदि काव्य बुद्धिगम्य तें टिकून राहिलें.

(१९) आज कालिकी नाही मीरा जद यह ब्रह्मांड छायो. तुका म्हणे आम्ही विधिचे जनिते। स्वयंभ आयते केले नव्हो. १४५२.

(२०) पोथी म्हारी खांडाकी धार। ज्ञान निभावण राणो है नही ॥

---

९ गणपति पुळें येथील शेंड्ये घराण्याची हकीकत

(श्री. य. न. केळकर, पुणें)

शेंडये हे चित्पावन ब्राह्मण. गोत्र कौशिक, सूत्र आश्वलायन. यांचें घराणें सुप्रसिद्ध गणपतिस्थान पुळें येथील पुराणिक म्हणून ख्यात असलें तरी यांचें मूळ गांव मौजे कासारी, ता. सैतवडें. हे तेथील खोत होते. 'श्रीशके १५०९ वरिखे सर्वजित संवत्सरे वैशाख वद्य १२ रविवार तदिनी (१५८७) नारप्रभु, कृष्णप्रभु व वामनप्रभु या मौजे नरळच्या आगरकऱ्यांनीं मौजे कोळिसऱ्याचे खोत हरि भास्कर व किटो भास्कर यांस कांहीं कृतोपकार फेडण्यासाठीं म्हणून कांहीं जमिनी दिल्या त्या बक्षीसपत्रावर मौजे वाडद, कळझोडी, निवेंडी, वरवडें इत्यादि गांवांच्या खोतांच्या साक्षी वगैरे आहेत. त्यांत 'केशवभट सेंडये खोत मौजे कासारी' याची एक साक्ष आहे. म्हणजे इ. १५८७ पासून तरी हें घराणें कासारीची खोती अनुभवीत होतें हें निश्चित आहे.

पुळ्याच्या गणपतीपुढें सकाळ-सायंकाळ पुराण सांगण्याचा वतनी वृत्ति यांना थोरल्या शिवाजीमहाराजांनीं करून दिली आहे व ती आज तागायत चालू आहे. वृत्ति कशी मिळाली यासंबंधीं हकीकत पुढें इ. १८०१ सालीं कासारीच्या खोतीच्या वतनाबाबत जें निवाडपत्र पेशवे सरकारचें झालें आहे त्यांत दाखल झालेल्या कैफियतींत आली आहे ती अशी—" पेशजी आम्हां रामचंद्रभटाचे वडील विष्णुभट कासारीहून येऊन मौजे मालगुंड येथें राहिले होते. त्यांचे पुत्र महादेवभट शेंडये पुराणवेत्ते जाणोन श्रीगणपति वाडा पुले कसबा नेवरे येथें नित्य पुराण श्रीसंनिध सांगावयाची वृत्ति कै० थोरले शिवाजीमहाराज छत्रपति यांणी करून दिल्ही व देशक व खोत महाजन व

ग्रामस्थ वाडा मजकूर यांणी घर बांधावयास व शाकभाजी करावयास जमीन वतनी करून देऊन पुराणाचें वृत्तीचें पत्र करून दिल्हे. ”

पुढें “ राज्याभिषेक शके ११ रक्ताक्षीनाम संवत्सरे अश्विन बहुल ११ शुक्रवारी ” (२४-१०-१६८४) मोरेश्वर पंडितराय यांनीं ‘ गणेशभट महादेवभट सेंडे पुरानीक ॥ पुळें यांस ‘ ब्राह्मण योग्य वैदिक देखोन धर्मादाय तांदूळ कैली कोठीमापे मण ·॥· दहा जोंवरी वेदमूर्ति क्षेम असतील तोंवरी प्रतिवर्षीं प्रविष्ट करणें ’ म्हणून आज्ञापत्र देशाधिकारी व लेखक प्रा। राजापूर यांस सादर केलें.

यानंतर राज्याभिषेक शक १७ प्रमोद संवत्सरे पौष शुध १ रविवासरे या दिवशीं (२१ १२ १६९० इ.) पंडितरावांनीं नरसो सुरो सुभेदार व कारकून वर्तमान व भावी सुभा प्रभावळी यांस आज्ञापत्र दिलें कीं, “ वे. मू. मादेभट विष्णुभट सेंडे पुराणिक वास्तव्य मौजे मालगुंड ता। सैतवडे सुभा मजकूर (प्रभावळी) यांस पेसजी धर्मादाव तांदूळ पांच मण होते येसियासी वेदमूर्ति योग्य कुटुंबवत्सल पाहोन साल मारी पेसजी धर्मादाव देखील जाजती तांदूळ कोठीमापे मण ·॥· दाहा पेसजी देविले होते. जाजती साल मजकुरीं १० मण येकूण दाहा मण रास वे. मू. क्षेम असतील तोंवरी प्रतिवर्षीं प्रविष्ट करणें. ”

पण पुढील काळांत ही नेमणूक निर्वेध चालली नाहीं म्हणून महादेवभट शेंड्यानें पन्हाळ्यास छत्रपतींकडे जाऊन आपलें गाऱ्हाणें सांगितलें कीं, “ आपणास धर्मादाऊ तांदूळ कोठीमापें दाहा मण व आपले पुत्र गणेशभट यांस दाहा मण येकूण एक खंडी तांदूळ ठरले आहेत. परंतु यापैकीं चतुर्थांश म्हणजे पांच मणच पावतात. येणें करून आपला अवकात चालत नाहीं. त्यावरून रामचंद्र नीळकंठ अमात्य यांनीं छ १४ (१०) रजब सबा तिसैन अलफ (२८·३·१६९७ इ.) रोजीं रामाजी अनंत सरसुभेदार व कारकून प्रांत राजापूर यांना आज्ञापत्र देऊन भटजी मजकुरास ‘ धर्मादाऊपैकीं निमे तांदूळ पांच मण व पुत्रास चतुर्थांश ८२॥ येकूण साडेसात मण तांदूळ कोठी मापें ’ देण्यास फर्माविलें व प्रतिवर्षीं देत जाणें म्हणून बजाविलें. ”

पण ही व्यवस्था पुढें कांहीं वर्षांत विस्कळीत झाली आणि योगक्षेमापुरतें शेंडयांना उपलब्ध होईना. तेव्हां इ. १७२१ सालीं महादेवभटाचा मुलगा हरिभट कोल्हापूरकर छत्रपतीकडे गेला व त्यानें अर्ज केला कीं, “ आपण श्रीसंनिध देवालयीं अखंड पुराण सांगत असतो. कुटुंबवत्सल आणि अनुत्पन्न. पूर्वीं राजगृहीहून धर्मादाय बहुत होता. प्रस्तुत त्याप्रमाणें पावत नाहीं. म्हणून कांहीं भूमि दिल्यानें कस करून योगक्षेम चालवूं ” तेव्हां भगवंतराव रामचंद्र अमात्यांनीं २४–११–१७२१ इ. रोजीं त्यास नवीन वृत्ति भात जमीन वाडा मजकूरपैकीं शेत बनाम चिरटिया बा। भिडे ठिकाणें दोन व चोंढा ठिकाण एक एकूण तीन ठिकाणेपैकीं जमीन वीस पांडाचे बिघेनें जमीन ८१ दिल्ही कुलबाब व कुलकानू हाली पटी व पेस्तर पटीसहित, खेरीज हकदार करून इनाम दिली.

हरभट शेंड्ये चांगला व्युत्पन्न होता आणि तत्कालीन पद्धतीप्रमाणें प्रमाणशास्त्रादि ग्रंथाचा संग्रहहि त्यानें चांगला केलेला होता. जातिवाद किंवा शास्त्रवाद पडत तेव्हां निर्णयासाठीं आधारग्रंथ पाहावे लागत ते अशा शास्त्र्यांच्या संग्रहांतून आणविले जात. या संबंधांत १७२३ सालीं जंजिरेकरांनींहि ब्राह्मणांचा कांहीं जातिवाद पडला होता तेव्हां हरभट शेंड्यांकडून शयाद्रि खंडांतील क्षेत्रमाहात्म्याची पोथी घेऊन येण्यास पाचारण केलें होतें असें पुढील पत्रावरून दिसतें.

२३–१०–१७२३

हुा

महाबतशार हरभट सेंडे पुराणिक मामला वाडा गणेश पुले दाम महाबतहु अजी सिदी साद सुबेदार सलाम सुा आर्बा इशरीन मया व अलफ आंके ब्राह्मणाचे जातीचा मुकद्दिमा पडिला आहे याबदल शयाद्रिखंडांतील क्षेत्रमाहात्म्याची पोथी तुम्हानजीक आहे ते यावी ... असे तर शयाद्रिखंडांतील पत्रे ... सुभा कसबे अंजनवेलीचें ... तुम्हांस कांहीं आजार देणार हे जाहीर जालें यावरून डोलीस वेठे देविले असत तर डोली करून तुम्ही पोथी घेऊन सुभा येणें हकीकत मनासी आणून सवेच तुम्हांस रजा दिली जाइल मालूम होये रा। छ १४ सफर हे किताबत

यानंतर पानपतच्या सुमारास शेंड्यांच्या वतनी पुराणास पुन्हा एकदा खो बसण्याचा प्रसंग आला. बाळंभट व महादेवभट बापट हे वादास उभे राहिले व पुराण सांगण्याची वृत्ति आपली आहे शेंड्यांची नव्हे, असें म्हणूं लागले तेव्हां धोंडभट शेंड्यांनीं पंचाईत करावी म्हणून सांगितलें. तेव्हां समस्त देशक व ग्रामस्थ जमून कसबे नेवऱ्याच्या आदित्यनाथाच्या देवळांत मनसुबी करण्यांत आली. बापटांना कोणताच लेखी पुरावा देतां आला नाहीं व त्यांच्यातर्फे साक्षीदारहि कोणी आला नाहीं ! शेंड्यांनीं पुरावा भरपूर दिला. अखेर श्रीची प्रसिद्धता जाहली तेव्हांपासून शेंड्यांकडे पुराणाची वृत्ति परंपरागत अविच्छिन्न चालत असतां बापटांनीं वाद घातला परंतु त्यांनीं एकहि साक्षीदार दिला नाहीं व भोगवट्याचे कागद भुक्तलिखित आपणांजवळ नाहींत असें सांगितलें. उलट शेंड्यांनीं वृत्तिपत्र व इतर पुरावा दिला तेव्हां बापटांस दूर करून शेंडे मजकुरास पुनरपि त्यांची वृत्ति देण्यांत आली व तसें रत्नागिरी तालुक्याचा तेव्हांचा सुभेदार मोराजी सिंदे यानेंहि अधिकृत वृत्तिपत्र शेंड्यांस इ. १५-७-१७६४ रोजीं करून दिलें !

दिनांक ४·११·१७६५ रोजीं थोरल्या माधवराव पेशव्यांनीं आपल्या खास उलट्या ' न 'च्या शिक्क्यानिसी धोंडभट शेंड्यास पुण्याच्या पुराणवृत्तीचें, वंशपरंपरा-वृत्तीचें पत्र करून दिलें. त्या पत्रांत म्हटलें आहे " धोंडभट बिन हरभट कसबे पुणें येथील मुक्कामीं येऊन विदित केलें, कीं पुळें येथील देवासंनिध नित्य पुराण सांगावयाची

पुराणवृत्ति वतनी आपले वडिलांस (पूर्वजांस) देशमुख व मोकदम व देशकुळकर्णी कर्यात मजकूर याणी वंशपरंपरेनें करून दिली. त्याजप्रमाणें श्रीमंत थो. शिवाजी महाराज यांणी पत्रें करून दिल्ही त्याजप्रमाणें वृत्ति चालत आहे-परंतु राजपत्रें आपणांजवळ होती ती शामलाचे दंग्यांत दग्ध झाली" वगैरे. श्री. शिवाजी महाराजांचें अस्सल राजपत्र शेंड्ये दप्तरांत कां आढळत नाहीं याचा खुलासा आतां आपोआपच होतो. असो.

इ. १७७७ पर्यंत शेंड्यांचें पुराणवृत्तीचें वतन निर्वेध निभलें. परंतु त्या सालीं वाडा मजकूरचा महादेवभट बापट कोरळकर उपटला व त्यानें गणपतीजवळ पुराण व कथादिक सांगण्याचें वतन आपलें आहे असा दावा सांगून अडथळा करण्यास सुरुवात केली. म्हणून धोंडभट, सदाशिव केशव सुभेदाराकडे तक्रार घेऊन गेला. त्याने धोंडभटाचा पुरावा पाहून त्याच्या घराण्याकडेच ही वृत्ति सवाशें-दीडशें वर्षांपासून चालू आहे; सबब त्याचाच हक्क आहे असा निर्णय दिला. तेव्हां महादेवभट बापट कोरळेकर कर्यात मजकूरच्या देशकांकडे तक्रार घेऊन गेला. देशकांनीं धोंडभट शेंड्यास बोलावून नेऊन विचारलें, कीं तुम्ही देशक व भोंवरगांवचे पंच यांचा निर्णय मान्य कराल कां? धोंडभटानें तें तत्काळ कबूल केलें. त्या मनसुबींतहि शेंड्यासारखाच निकाल झाला.

तरीहि हें वृत्तीचें भांडण बापट सोडीना. इ. १७८९ सालीं पुन्हा तें सुरू झालें. या वेळीं पुराणाची वृत्ति धोंडभट वारल्यामुळें त्याचा मुलगा हरभट चालवीत होता. त्याला महादेवभट बापटाचा मुलगा धोंडभट व दुसरा नारायणभट बापटाचा मुलगा बाळंभट असे दोघे अडथळा आणूं लागले. हें भांडण वास्तविक इ. १७८५ पासूनच सुरू झालें होतें. हरभट शेंड्यानें सरकारची द्वाही दिली तरी बापटांनीं मानली नाहीं आणि प्रत्यक्ष मारामारीहि केली. तेव्हां हरभट पुन्हा पुण्यास पेशवे दरबारीं फिर्याद गेला. तेव्हां सवाई माधवरावांनीं इ. २०-८-१७८९ रोजीं शेंड्याचा हक्क मान्य करून तसा अंमल करण्याचें आज्ञापत्र तेथील अधिकाऱ्यांस म्हणजे देशमुख-देशपांड्यांस लिहिलें. ह्यांत स्पष्टपणें सांगितलें आहे कीं, "बापटास निक्षून ताकीद करून त्याचें पुराण मना करणें शेंड्याचेंच चालू देणें"

या शेंड्ये घराण्यांतील हा धोंडभट मोठा खटपट्या, कर्तृत्ववान पुरुष निपजला. त्यालाच वंशावळींत अर्जक पुरुष म्हणून दाखविला आहे. पुराणाची वृत्ति शेंड्यांची पुरातन होतीच, पण त्याच्या जोडीस धोंडभटानें नानासाहेब पेशव्यांकडून पुळ्याच्या गणपतीला पूजा, नैवेद्य, नंदादीप, अभिषेक, दक्षिणा इत्यादींसाठींहि सालीना अडीचशें रुपयांची नेमणूक करवून घेतली. नानासाहेब पेशव्यांनीं ते स्वतः पुळ्याला दर्शनास गेले असतां धोंडभटास तसें आश्वासन दिलें होतें; पण तें प्रत्यक्ष कागदपत्रानिशीं अमलांत यावयाचें राहिलें होतें. पुढें मोरो बल्लाळ थोरल्या माधवरावाजवळ कारभारी असतां त्यांनीं त्या आश्वासनांचीं पेशव्यांस आठवण करून दिली. सबब पेशव्यांनीं लगोलग नेमणूक चालू करून तशीं पत्रेंहि करून दिलीं.

पण या नेमणुकीलाहि दायाद उभे राहिलेच! कोकणासारख्या बुभुक्षित प्रांतांत तरी शितें दिसलीं कीं भुतें उभीं राहण्याला बिलकूल वेळ लागत नसे. त्याचा प्रकार असा–धोंडभट निवर्तल्यावर त्याचा पुत्र श्रीधरभट वरील नेमणूक अनभवूं लागला श्रीधर-भटाची एक मावसबहीण होती. तिचा भ्रतार निवर्तला. त्याचा पुत्र लहान, तेव्हां त्यांना मदत करावी म्हणून वरील शेंडये २०।२५ रुपये त्याला म्ह. वरवडेकर जोशाला देऊं लागला. हा मुलगा म्हणजे बापू जोशी मोठा झाल्यावर शेंडये यांनीं ती मदत बंद केली. त्याबरोबर भाचा बापू जोशी वरवडेकर यांना दुर्बुद्धि सुचली. त्यांनीं धोंडभटाच्या हातचें एक बनावट पत्र तयार केलें. त्या पत्रांत वरवडेकर जोशास दरसाल ४० रुपये देऊं असें आश्वासन दिलेलें होतें. तें पत्र दाखवून तालुका कचेरींतून त्यानें परस्पर तीन सालांचे १२० रुपयेहि उपटले! तेव्हां शेंडये जागे झाले व त्यांनीं ग्रामस्थांकडे निर्णयासाठीं पंचाईत नेमून मागितली. कोतवडे येथील ग्रामस्थांवर पंचाईत नेमून देण्यांत आली. तेव्हां पंचाइतीनें वरवडेकर खोटे व पंचहि खोटे म्हणून ठरविलें. पण पंचायतीचा निकालहि बापू जोशी मानीना. त्यानें माधवराव रामचंद्र कानडे पुण्यांत कारभारी होते, त्यांजकडून सनद करून घेतली. त्यांत मजकूर कीं "श्री मोरो बल्लाळ पटवर्धन यांजकडील रामाजी गणेश साठे हे आमचे मामा याणी धर्मादायाचें कृत्य करून घेतले आम्ही लहान म्हणून शेंड्यांच्या नांवें सनद घेतली व तुम्हांस दर साल ४० रु. देऊं असें पत्रहि लिहून दिले."

शेवटीं शेंडयांनीं हा वाद पुण्यास दुसऱ्या बाजीराव पेशव्यांकडे नेला. तेथें शहानिशा होऊन तेथेंहि जोशी लबाड ठरले. तेव्हां पेशव्यांनीं २८-८-१७९८ रोजीं लक्ष्मण राम यांस आज्ञापत्र पाठवून वरवडेकर जोशी यांस दिलेले पैसे परत घेऊन शेंडयास देण्यास फर्माविलें. असा हा पुळ्याच्या शेंडये पुराणिकांच्या पुराणिक वृत्तीचा इतिहास आहे.

या घराण्यासंबंधी सांगण्यासारखी एक महत्त्वाची गोष्ट ही कीं, यांच्या घराण्यांतील एक महादेवभट शेंडये यांची कन्या हरभट पटवर्धन उपाध्ये मौजे कोतवडे यांना दिली होती. हे हरभट म्हणजेच पेशवाईतील 'वीरांची विलायत' म्हणून गाजलेलें जें पटवर्धन घराणें त्याचे आद्यपुरुष! हरभट तपस्वी आणि गाणपत्य म्हणून विख्यात होते आणि त्यांचे वंशज सर्वच गाणपत्य झाले. पटवर्धनांचें कुलदैवत पुळ्याचा गणपतीच आहे. पटवर्धन सरदारांनीं शेंडयांबद्दलचा जुना आप्तसंबंध फार अगत्यानें सांभाळला. त्यांनीं शेंडयांना आपल्या जहागिरींत कांहीं इनामेंहि करून दिलीं होतीं.

येथपर्यंत शेंड्यांच्या पुराणिकवृत्तीचा इतिहास कथन केला. आतां त्यांच्या कासारी येथील अतिपुरातन खोती वतनाचा वृत्तांत थोडक्यांत सांगावयाचा आहे.

१४.६.१८०१ च्या निवाडपत्रांत शेंड्यांनीं पुराव्यासाठीं दोन हाजी रमजालसीचे दाखले हजर केले त्यांचा उद्गार केला आहे. त्यांपैकीं एक महजर इ. १६०९ चा

म्हणजे १९२ वर्षांमागचा होता व दुसरा इ. १६९९ चा म्हणजे १०२ वर्षांमागचा होता. म्हणजे शेंड्ये घराणें ३५६ वर्षांपूर्वीपासून कासारीचें खोत होतें.

वतन जितकें पुरातन तितकें त्यासाठीं झालेलें वादहि पुरातन असतात. इतर सर्व वतनदार घराण्यांतील वादांप्रमाणें यांच्याहि घरांतील वतनाचे वाद पिढयान् पिढ्या चाललेच होते. तथापि त्यांतील एका प्रकरणाची हकीकत महत्त्वाची व मनोरंजक असल्यामुळें तीच तेवढी सांगूं.

या कासारीच्या खोतांचें आडनांव शेंड्ये, पण गोत्र कौशिक; असें असतां वसईचा शेंड्ये आडनांवाच्या परंतु शांडिल्य गोत्राच्या एका इसमानें या शेंड्यांचें खोतीचें वतन आपलेंच आहे असा दावा सांगण्यास सुरुवात केली व तो जबरदस्तीनें कासारीला घरहि बांधू लागला तेव्हां वाद रंगला.

नानासाहेबांच्या कारकिर्दींत आंग्र्यांचा मुलूख पेशव्यांच्या ताब्यांत आल्यावर आबा हशमनीस म्ह. सुप्रसिद्ध शंकराजी केशव फडके याला पेशव्यांनीं हुजुरून तालुके मजकूरच्या चौकशीसाठीं पाठविलें होतें. त्यांच्याबरोबर त्याचा हस्तक शंकराजी सुंदर शेंड्ये वसई प्रांतीं होता, तोहि गेला होता. त्याला तेथें गेल्यावर एक दोघांनीं भर दिली कीं तुम्ही शेंड्येच आहां. कासारीचें खोतीवतन दाबायला सध्यां सुसंधि आहे. शंकराजी सुंदराला तें मानवलें व त्यानें आपला भाऊ कृष्णभट याला कासारीस आणून ठेवला. शंकराजी फडक्यांसारख्या जबरदस्ताचा वशिला असल्यामुळें कृष्णंभटानें खोती वतन आपलेंच आहे असें सांगून आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठीं व घर बांधण्याकरितां चिरे काढूं लागला. तेव्हां मूळ शेंड्यांनीं त्याला हरकत घेऊन सुभ्याकडे फिर्याद केली. सुभाहून तोतया शेंड्यास मसाला झाला असतां साधनसूत्राची पुरवणी त्याला कांहींच करता आली नाहीं, तेव्हां तो पळून गेला. या खटल्याचा निर्णय झाला त्यांत पुरातन खोत शेंड्ये कौशिक गोत्री यांचे शरीरसंबंध कोणकोणत्या घराण्यांशीं झाले तें सविस्तर उद्धृत करून वसईकर शेंड्या शांडिल्य गोत्री आहे आणि कासारीचे शेंड्ये शांडिल्य-गोत्री म्हणावें तर त्यांचे शरीरसंबंध शांडिल्यगोत्रांत न होतें! असें म्हणून वसईकर शेंड्यास खोटा ठरविला आहे. अर्थात कौशिक गोत्री शेंड्यांचें इतर दस्तऐवजी सर्व पुरावेहि उद्धृत केले आहेतच. हा निवाडा १४–६–१८०१ रोजीं दिनकर विश्वनाथ सुभेदार तालुके रत्नागिरी यांनीं दिला. कासारीकर खोत शेंडे यांजकडून २५ रुपये सरकारनजर घेण्यांत आली.

नानासाहेब पेशवे मुद्दाम पुळ्याच्या गणपतीच्या दर्शनास आपल्या कुटुंबियांसह गेल्याच्या हकीकतीचें पार्वतीबाईसाहेब पेशवे यांनीं अनुबाई घोरपडे इचलकरंजीकर यांना लिहिलेलें एक महत्त्वाचें पत्र खऱ्यांच्या इचलकरंजी संस्थानच्या इतिहासांत छापलें आहे (खंड १ पृ. ४९ लेखांक ४१). पत्रावर तारीख नाहीं, तथापि तें इ. १७५५ पासून १७६० पर्यंतच्या कोणच्या तरी वर्षांतील असावें अशी टीप शास्त्रीबोवांनीं दिली आहे. पण तें

पत्र इ. १७५९ मधील असल्याचें आतां सांगतां येतें. त्यावरून पुळ्याच्या स्वारींत नानासाहेबांबरोबर गोपिकाबाई, आनंदीबाई, राघोबादादा व माधवराव इतकी मंडळी होती एवढें समजतें.

पेशवे डायऱ्यांपैकीं बाळाजी बाजीराव पेशवे खंड २ मध्यें दिलेल्या पेशव्यांच्या मुक्कामांच्या यादींत पुळ्याचा मुक्काम कोठेंच आढळत नाहीं.

---

१० वास्तुशास्त्र आणि वास्तुशिल्प*

(प्रा. **म. श्री. माटे**, पुणें)

गेल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रामध्यें निरनिराळ्या क्षेत्रांत स्वार्थत्यागपूर्वक कार्य करीत राहणाऱ्या थोर माणसांची जी एक परंपरा चालू होती तिचे कै. दत्तोपंत आपटे हे प्रतिनिधी. या अत्यंत सालस व नम्र स्वभावाच्या व्यासंगी विद्वानाच्या स्मृतीस अभिवादन करून मी माझ्या चर्चेला आरंभ करतों

प्रतिपाद्य सूत्र

आजचा व्याख्यानविषय हा सामान्यपणें थोडयाशा अपरिचित अशाच क्षेत्रांतील आहे. तथापि एखाद्या अपरिचित अथवा अल्पपरिचित अशा विषयाचा प्रपंच केल्यास त्याला साद देण्याची रसिकता आपणां सर्वांपाशीं आहे, असा विश्वास धरूनच मीं हा विषय निवडला आहे. व्याख्यानाचा विषय आणि त्यांतील प्रतिपाद्य सूत्र यांची थोडीशी कल्पना मी आरंभींच करून देणार आहे. आपल्या प्राचीन वाङ्मयांत वास्तुशास्त्र किंवा वास्तुविद्या या नावानें ओळखली जाणारी एक शाखा आहे. त्याच्या विषयाची व्याप्ती आणि रचनेचा काळ यासंबंधीं सविस्तर चर्चा पुढें येणारच असली तरी आतां एवढें सांगतां येईल, कीं निरनिराळ्या नगरांचीं व इमारतींचीं विधानें, रचनापद्धती यांविषयीं ह्या ग्रंथांतून माहिती व नियम देण्यांत आलेले आहेत. असें साहित्य गुप्तकालाच्या आरंभापासून ते सोळाव्या शतकापर्यंत निर्माण होत होतें. ह्या आधींच्या काळांत उत्पन्न झालें असलें तरी तसा कालविषयक निश्चित पुरावा आपल्याजवळ नाहीं वास्तुविद्या-विषयक ग्रंथांच्या अभ्यासाला शंभरांहून अधिक वर्षें झालीं आहेत. या शंभर वर्षांत, या ग्रंथांचा अभ्यास विविध दृष्टिकोणांतून करण्यांत आलेला आहे. यांपैकीं एका विशिष्ट अभ्यास-शाखेचाच विचार येथें करावयाचा आहे. प्राचीन भारतीय वास्तुशिल्प आणि वास्तुविद्येवरील ग्रांथिक विवेचन यांचा संबंध कितीसा आणि कोणत्या प्रकारचा आहे हें पाहण्यासाठीं जें संशोधन झालेलें आहे, त्याचीच येथे दखल घ्यावयाची आहे. पुढील चर्चेचा निष्कर्ष स्थूलमानानें सांगावयाचा तर या दोन शाखांचा विशेष असा परस्पर

---

* श. १८८७ द. वि. आपटे स्मृतिदिन व्याख्यान

संबंध दिसत नाहीं. वास्तुशिल्प म्हणजे आचरण किंवा practice आणि वास्तुशास्त्र म्हणजे तत्त्व किंवा theory हीं एकमेकांना अनुसरतांना दिसत नाहींत. वास्तुशिल्प हें वास्तुशास्त्राचें आचरण आहे अथवा वास्तुशास्त्र हें वास्तुशिल्पाचें प्रतिबिंब आहे असें म्हणतां येत नाहीं. असा नकारात्मक निष्कर्ष सांगण्यासाठीं एवढें व्याख्यान कशाला असें जर कोणी म्हणेल तर निदान वरवर तरी तें बरोबर दिसेल. तथापि, ज्ञानसाधनेंत अस्तिपक्षीं सूत्रें सिद्ध करण्यास जितकें महत्त्व आहे तितकेंच भ्रममूलक सूत्रें खोडून काढण्यासहि आहे.

भेद

सुरुवातीसच वास्तुशिल्प व वास्तुशास्त्र यांतील भेद स्पष्ट करणें जरूर आहे. वास्तुशिल्प याचा अर्थ प्रत्यक्ष उभ्या असलेल्या वास्तु. जुन्या काळांतील कितीतरी वास्तु आज उभ्या आहेत, कितीतरी आतां नष्ट होऊन गेल्या आहेत. तथापि, तत्कालीन शिल्पांत आणि चित्रांत घरादारांचे, मंदिरांचे, प्रासादांचे देखावे आहेत. या सगळ्यांमधून तसेंच थोड्याफार प्रमाणांत उत्खात अवशेषांवरून वास्तूंच्या दृश्य स्वरूपाची कल्पना येते. रचनेची प्रत्यक्ष पद्धत किंवा आचरण म्हणजे practice तें वास्तुशिल्प. उलट, अशा इमारती कां, कशासाठीं व कशा बांधाव्यात, त्यांतील स्थापत्यविषयक वा सौंदर्यविषयक तत्त्वें यांची चर्चा करणारें, त्यासंबंधीं यमनियम बांधून देणारें जें शास्त्र तें वास्तुशास्त्र

वास्तुशास्त्र-टीका

आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या एतद्विषयक साहित्यापैकीं कांहीं महत्त्वाच्या ग्रंथांचा निर्देश करावयास हवा. अगदीं आरंभीं म्हणजे इ. १८३४ मध्यें रामराज[1] नांवाच्या गृहस्थांनीं भारतीय वास्तुशास्त्र आणि वास्तुशिल्प यांवरील आपला ग्रंथ प्रसिद्ध केला मानसार व मयमत या शिल्पग्रंथांतील त्यांच्या हातीं लागलेले भाग त्यांनीं प्रसिद्ध केले आणि आकृत्या वगैरे घालून हें वास्तुशास्त्र किती परिपूर्ण आहे हें दाखविण्याचा यत्न केला. दुसरे मोठे संशोधक म्हणजे प्रसन्नकुमार आचार्य[2]. यांनीं १९२७ मध्यें मानसार वास्तुशास्त्राची सटीक आणि सचित्र आवृत्ति प्रसिद्ध केली; आणि या ग्रंथांतील नियमाप्रमाणें वास्तुशिल्पाचे वर्ग, घाट, हे विशद करण्याचा यत्न केला. आचार्य यांनीं याच विषयावर एक कोश व एक ज्ञानकोश प्रसिद्ध केला. यानंतर मनकड[3], भट्टाचार्य[4], मलय्या[5], सोमपुरा[6] असे निरनिराळे अभ्यासक या शाखेकडे वळले आणि त्यांनीं वेगवेगळ्या प्रांतांत उपलब्ध असलेल्या जुन्या वास्तुशास्त्रग्रंथांच्या सटीक आवृत्ति प्रसिद्ध केल्या. विशेषतः भट्टाचार्य आणि त्यानंतर शुक्ल[7] यांनीं केवळ अशा संपादनावरच समाधान न मानतां हाताशीं असलेल्या सगळ्या ग्रंथांचें सार काढून एक परिपूर्ण हिंदु वास्तुशास्त्र आपणांपुढें ठेवण्याचा यत्न केलेला दिसतो. या सर्व ठिकाणीं, यत्न केला असें म्हटलें आहे याचें कारण या लेखकांचें विवेचन व प्रमेयें हीं आजतरी सिद्धान्त या अवस्थेपर्यंत पोंचलेलीं नाहींत. अगदीं अलीकडे सौराष्ट्रांतील सोमपुरा, नाणावटी,

ढाकी[10], यांसारखे अभ्यासक, दक्षिणेकडे श्रीनिवासन्[?], तसेंच उत्तरेस कृष्णदेव,[11] अशा संशोधकांनीं बरेंच वाङ्मय प्रसिद्ध केलें आहे. आतांपर्यंत उल्लेखिलेल्या या साहित्यास टीका-वाङ्मय म्हणण्यास हरकत नाहीं. म्हणजे वेगवेगळ्या ग्रंथांचे लेखक कोण, त्यांचा काळ कोणता, त्यातील प्रक्षिप्त भाग कोणते इ. विषयीं चर्चा आढळते. तसेंच शिल्पशास्त्राच्या आधारानें भारतीय वास्तुशिल्पांतील शाखोपशाखा आणि रूपभेद यांचाहि खुलासा आढळतो.

हिंदी-गुजराती आदि भाषांतील वाङ्मय

ह्या टीकावाङ्मयापैकीं बराच भाग इंग्रजींतूनच प्रसिद्ध झाला आहे. अलीकडे हिंदींतहि कांहीं पुस्तकें झालीं आहेत. गुजरातींत कांहीं महत्त्वाचे ग्रंथ तयार झाले आहेत. मराठीमध्यें असें साहित्य फार थोडें आहे. सुमारें चाळीस वर्षांपूर्वीं नासिकचे श्री. कृ. वा. वझे यांनीं आपल्या येथेंच शिल्पशास्त्रव्याख्यानमाला गुंफली आणि त्यानंतर मंडळानें त्यांचा शिल्पशास्त्रावरील ग्रंथ पुरस्कृतमालेंत प्रसिद्धहि केला. वझे यांनीं याच सुमारास होळकर ग्रंथमालेच्या वतीनें 'हिंदी शिल्पशास्त्रसार[12]' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यांनीं मुख्यत्वें भृगु आणि कश्यप या संहितांचा उपयोग आपल्या लेखनांत केलेला होता. मराठी वाचकवर्गासमोर, भारतांतील प्राचीन शिल्पशास्त्राचें इतकें सविस्तर प्रतिपादन वझे यांनींच प्रथम केलें असावें. अन्य कोणीं केलें असल्यास वझे यांच्या ग्रंथांत त्याचा उल्लेख नाहीं. आणि इतरत्रहि तसा ग्रंथ कोठें आढळला नाहीं. पुराणादि ग्रंथांत संपादकांनीं विविध विषयांच्या अनुषंगानें कांहीं टीका-टिप्पणी दिल्या असल्या तरी त्या फुटकळ स्वरूपाच्या. त्यावरून या सबंध विषयाच्या आवाक्याची कल्पना येत नाहीं.

टीकावाङ्मयाची माहिती आतांपर्यंत सांगितली. आतां प्रत्यक्ष वाङ्मय पाहावयाचें. हा क्रम थोडासा उलटा आहे हें खरें. आधीं मूळ ग्रंथ पाहावयाचा सोडून आधीं टीका-ग्रंथ पहावयाचा हा उद्योग वास्तविक उरफाटाच. परंतु वास्तुशास्त्राचे ग्रंथ हे केवळ टीकाकारांच्या मदतीनेंच सुगम होत असतात. या टीकाकारांनीं कांहीं ठिकाणीं ते अत्यंत दुर्गम व कित्येक ठिकाणीं वादग्रस्त करून ठेवले आहेत हें खरें; परंतु प्रथम त्यांना वंदन केल्याशिवाय पुढें जातां येत नाहीं हेंहि तितकेंच खरें.

वास्तुशास्त्रें : स्वरूप

वास्तुविद्येचा आढावा घ्यावयाचा म्हणजे आपल्याला अनेक अनुमानें, अनिश्चित माहिती आणि एकांगी विधानें यांना तोंड द्यावें लागतें. यांतील बहुतेक सर्व वाङ्मय संस्कृतमध्येंच आहे आणि त्या त्या ग्रंथांच्या कालापासून तो त्यांतील शब्द-संहति व तांत्रिक संज्ञांचे अर्थ येथपर्यंत प्रत्येक गोष्टींत मतभेद आहेत. हे सर्व वादविवाद थोडा वेळ दृष्टिआड केले, तर कांहीं सामान्य रूपरेखा सांगतां येते.

ग्रंथप्रकार

वास्तुशास्त्रें हीं स्वतंत्र ग्रंथांच्या रूपानें तसेंच इतर विषयांवरील ग्रंथांचे भाग म्हणून सांपडतात. आतांपर्यंत सगळ्यांना मान्य असलेला सर्वांत प्राचीन ग्रंथ म्हणजे बृहत्संहिता हा गुप्तकालांतील असावा असें समजतात. ह्या ग्रंथामध्यें वास्तुविद्या हा ज्योतिषशास्त्राचा एक भाग समजूनच त्याचें विवेचन केलें आहे. उपविभाग म्हणजे वास्तुविद्या हा ज्योतिषशास्त्राचा वास्तविक उपयोग समजण्यांत येई. क्रॅमरिश यांनीं आपल्या 'हिंदु टेंपल'[13] या ग्रंथांत "Vāstuśāstra belongs to and is applied astrology," असें स्पष्टपणें म्हटलें आहे तें एवढ्यासाठींच. या ग्रंथांतील वास्तुपुरुषमंडल, ब्रह्मशिला, कूर्मशिला आदिविषयींचे सूक्ष्म नियम वाचले म्हणजे प्राचीन कालीं ज्योतिष आणि वास्तु यांच्या अभिप्रेत असणाऱ्या संबंधाची उत्तम कल्पना येते. वास्तुविद्येचा दुसरा ग्रंथप्रकार म्हणजे पुराणें, आगम, स्मृति अशांसारख्या धार्मिक ग्रंथांतील कांहीं भाग. या ग्रंथांचें मूळ उद्दिष्ट निराळें असलें तरी एक आनुषंगिक विषय म्हणून इतर अनेक विषयाबरोबर यांत वास्तुविद्येचीहि माहिती आढळते. या प्रकारांत वैखानसागम, विष्णुधर्मोत्तर, मत्स्यपुराण, अत्रिसंहिता आदींचा समावेश करतां येतो. तिसऱ्या प्रकारांत राज्यशास्त्र वा समाजशास्त्र अशा विषयांवरील ग्रंथांचा समावेश होतो. मनुस्मृतींतील राजधर्मविषयक भागांत दुर्गशिल्पावर विवेचन येतें. कौटिलीय 'अर्थशास्त्रां'त नगररचना, प्रासादरचना, दुर्गरचना यांची चर्चा आढळते. हे तीनहि प्रकार वास्तुशास्त्राला गौण स्थान देणारे म्हणजे ज्यांत वास्तुविद्येचा विचार एकाद्या निराळ्या विषयाचा भाग म्हणून अथवा त्या विषयाच्या अनुषंगानें झाला आहे असे आहेत.

खुद्द वास्तुशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यांपैकीं बहुतेक ग्रंथांत शिल्प-शास्त्राची म्हणजे वास्तुविद्या, शिल्पविद्या, चित्रविद्या आणि मूर्तिविज्ञान यांसारख्या परस्पर-संबद्ध विषयावर चर्चा केलेली आहे. येथें वास्तुविद्या प्रमुख धरून उरलेल्यांचा विचार मुख्यत्वें वास्तुशोभनाच्या अनुषंगानें झालेला आढळतो. या वर्गांतील ग्रंथांची संख्या पुष्कळच मोठी आहे. त्यांतील फक्त कांहींचाच उल्लेख येथें करतां येईल. विश्वकर्मवास्तु-शास्त्र, मयमत, मानसार, समरांगणसूत्रधार, प्रासादमंडन, दीपार्णव, अपराजितपृच्छा किंवा तंत्रसमुच्चय हे त्यांतल्या त्यांत जास्त प्रसिद्ध होत. या प्रत्येकांत वास्तुविद्येचा अगदीं सूक्ष्म व सांगोपांग प्रपंच करण्यांत आलेला आहे. यांपैकीं कांहीं म्हणजे प्राचीन व महत्त्वाच्या ग्रंथांतील कांहीं कांहीं भाग घेऊन त्यांत थोडेसें कमीअधिक करून पुढच्या रचित्यांनीं नव्या संहिता तयार केल्या. त्यामुळें या साहित्यविभागाचा आकार फुगत गेला. याशिवाय, वास्तुविद्येंतील एखादेंच बारकें अंग घेऊन त्याचीच माहिती सांगणारे कांहीं लहान लहान ग्रंथ उपलब्ध आहेत. अशा प्रकारच्या विशिष्ट शाखेवरील संहितांमध्यें 'प्रमाणमञ्जरी' हा विशेष प्रसिद्ध असा ग्रंथ आहे. यामध्यें काष्ठशिल्पाचा विचार आलेला आहे. वास्तूमध्यें रचनेसाठीं आणि शोभनासाठीं काष्ठांचा वापर कसा

करावा, याचें आकारमान, त्यावरील नक्षी इ. चे सूक्ष्म नियम या छोट्या ग्रंथांत दिलेले आहेत.

ग्रंथांची कालनिश्चिति

वास्तुशास्त्रग्रंथांची निर्मिति केव्हां झाली हें पाहणें आतांच्या चर्चेच्या दृष्टीनें महत्त्वाचें ठरतें. कारण हे ग्रंथ आणि शिल्पाचे प्रत्यक्ष नमुने हे जर समकालीन, निदान निकटच्या काळांतील असतील तरच त्यांची तुलना करणें योग्य ठरेल. अगदीं ढोकळ मानानें असें म्हणतां येतें कीं, हीं दोन्ही अंगें समकालीन आहेत. परंतु एकेका ग्रंथाच्या कालनिश्चितीच्या कामांत फार अडचणी आहेत. अशी निश्चिति मुख्यत्वें अंतर्गत पुराव्यावरच आरंभीं तरी करण्यांत आली. त्यांतील भाषेचें प्राचीनत्व, त्यांत सांपडणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाच्या खाणाखुणा ज्या काळाशीं जास्तींत जास्त जुळतील त्याच काळांत हीं पुस्तकें तयार झालीं असें मानावयाचें. ही कालनिश्चिति स्वाभाविकच अनुमानरूप असते आणि हींत मतभेदाला हवा तितका वाव आहे. मात्र बृहत्संहिता ही सगळ्यांत प्राचीन म्हणजे गुप्तकालाच्या अखेरीस किंवा त्याच्या आसपास तयार झाली असावी असें मानतात. याशिवाय मत्स्यपुराण, अर्थशास्त्र हे ग्रंथहि थोड्याफार फरकानें, पण केव्हां झाले हें सर्वमान्य आहे. पण केवळ वास्तुशास्त्रावर म्हणून जे ग्रंथ आहेत त्यांच्या काळांत अशी सुनिश्चितता दिसणार नाहीं. विश्वकर्मवास्तुशास्त्र, मयमत, मानसार, यांसारखे महत्त्वाचे ग्रंथ इ. स. चवथें शतक येथपासून ते इ. स. बारावें–तेरावें शतक येथपर्यंत प्रवास करतात. प्र. कु. आचार्य यांनीं मानसाराचा काळ इ. स. चवथें पांचवें शतक असावा, असें प्रतिपादलें आहे, तर भट्टाचार्य हे हा ग्रंथ इ. स. १३०० च्या आसपासचा किंवा त्याहीनंतरचा असावा असें मानतात. तिसरे एक संशोधक डॉ. शुक्ल हे याच ग्रंथाला इ. स. दुसऱ्या शतकांत नेऊन बसवितात. आचार्य मयमत हा ग्रंथ मानसारावर आधारलेला असावा असें मत देतात, तर भट्टाचार्य यांचें मत याच्या नेमकें उलट आहे आणि यदाकदाचित् एखाद्या ग्रंथाचा काळ कांहीं अन्य पुराव्यावरून निश्चित झाला असेल आणि तो आपल्या विचारसरणीला पटण्यासारखा नसेल किंवा गैरसोईचा असेल, तर त्यांतूनहि मार्ग काढण्यांत आलेले आहेत. ग्रंथाचा काळ अमुक एक असला तरी शास्त्रपरंपरा निःसंशयच जुनी आहे. फक्त तिचें संहितीकरण नंतरच्या काळांत झालें असें म्हटलें कीं संपलें. पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें प्रत्येक ग्रंथांत जी लांबच लांब गुरुपरंपरा दिलेली असते तीमुळें ग्रंथाचा गाभा आणि त्याची रचना यांत भेद करण्यास वाव सांपडतो.

समरांगणसूत्रधार, तंत्रसमुच्चय अशांसारख्या बोटावर मोजतां येण्यासारख्या ग्रंथांचे काळच नक्की सांगतां येतात. समरांगणसूत्रधार हा अकराव्या तर तंत्रसमुच्चय हा पंधराव्या शतकांतील. समरांगणावर आधारलेल्या आणि 'लाट' शिल्पशैलीचें वर्णन करणाऱ्या अपराजितपृच्छा, प्रासादमण्डन, या ग्रंथांचे काळहि साधारणपणें निश्चित

सांगतां येतात. परंतु इतर बहुतेक ग्रंथांच्या निर्मितीचा काळ नक्की सांगतां येत नाहीं. शास्त्र आणि शिल्प यांचा एकत्र अभ्यास करण्याच्या कामांत अशा रीतीनें कालनिश्चितीचा अभाव ही एक मोठी अडचण आहे.

ग्रंथकार कोण ?

या ग्रंथांचे लेखक कोण असावेत ? लेखक म्हणून, लेखकांचे गुरु म्हणून किंवा त्यांच्या गुरूंचे गुरु अशा परंपरांची मालिका सर्वच ग्रंथांत सांपडते. ह्यांत विश्वकर्मा, मय, कश्यप, भृगु, नारद, अत्रि अशीं नांवें पुन्हा पुन्हा येतात. भट्टाचार्य यांनीं या सगळ्या मंडळींना एका कालक्रमाच्या आणि भौगोलिक कोष्टकांत बसविण्याचा यत्न केला आहे. विश्वकर्मा हा देवांचा शिल्पी आणि मय हा असुरांचा अशी विभागणी करून एक नागर आणि दुसरा द्राविड शैलीचा जनक, असें गृहीत धरून त्यांनीं हें कोष्टक नक्की केलें. तथापि हें कोष्टक स्वीकार्य मानतां येत नाहीं. या ऋषीमुनींचें कुल अथवा काळ यांची कोणतीहि विश्वसनीय माहिती आपल्यापाशीं नाहीं, आणि त्यांच्या लेखनावरून शिल्पशैलीहि स्पष्ट होत नाहीं. म्हणून अशा सर्वगामी नांवांचे लेखक हे कोठें व कोटल्या काळीं झाले हें सांगतां येत नाहीं. या नंतरच्या काळांतले, म्हणजे गुप्तोत्तर काळांतले जे ग्रंथ त्यांत समरांगणसूत्रधार हा महत्त्वाचा ग्रंथ. हा ग्रंथ भोजराजानें रचला असें डॉ. शुक्ल व इतर अनेक विद्वान् समजतात. डॉ. शुक्ल यांनीं भोजराजानें रचलेल्या जवळजवळ बत्तीस ग्रंथांची यादी आपल्या सूत्रधाराच्या प्रस्तावनेंत दिली आहे. यांत व्याकरण, काव्यशास्त्र, नाट्यशास्त्र, वैद्यक, ज्योतिष, तत्त्वज्ञान अशा हरतऱ्हेच्या ग्रंथांचा समावेश आहे. एकाच माणसानें, मग तो कितीहि विद्वान् असो हे सगळे ग्रंथ स्वतः लिहिले असें म्हणणें म्हणजे आपल्या स्वतःच्या आणि वाचकांच्या सहनशक्तीला कमालीचा ताण देण्यासारखें आहे. जर असें गृहीत धरलें कीं त्याच राजानें सगळे ग्रंथ रचले तर ते त्यानें इतर कोणा शास्त्रज्ञांच्या सांगण्याप्रमाणें रचले असें समजावें लागेल. म्हणजे या विषयांतील त्याचें ज्ञान अप्रत्यक्ष अतएव फारसें विश्वसनीय नव्हे असेंच म्हणावें लागेल. याउलट ही एक भोज ' ओरिएंटल सीरिज ' होती; सध्यांच्या होळकर ग्रंथमाला किंवा सयाजी ग्रंथमाला यांच्यासारखी राजाश्रयाखालीं तयार झालेली माला होती असें म्हटलें तर हे ग्रंथ बरेच विश्वसनीय मानतां येतील.

परावलंबित्व ?

लेखकविषयक या वादंगांत भर म्हणूनच कीं काय, परावलंबित्वाची सूचना करण्यांत येते. मुख्य रोख मानसार वास्तुशास्त्रावर असून आचार्य यांनीं प्रख्यात रोमन ग्रंथकार व्हिट्रुव्हिअस याच्या याच विषयावरील ग्रंथाशीं मानसाराची तुलना करून अनेक साम्यस्थळें दाखविलीं आहेत. हें साम्य केवळ कांहीं फारच सामान्य तत्त्वापुरतें मर्यादित आहे. तें नगररचनेंत दिशा ठरविणें, वाऱ्याची दिशा पाहणें, भूपरीक्षा अशा

विषयांपुरतेंच आहे, हें मान्य केलें तरी, वादविवादास, मतभेदास म्हणजे गोंधळास पुरेसें आहे.

ज्योतिष व वास्तु

या सर्व ग्रंथांतील प्रतिपाद्य विषय स्थूलमानानें एकच आहे. बारीक बारीक तपशिलांत भेद असला तरी सगळ्या ग्रंथांमध्यें कांहीं विषयांचा समावेश आवश्यक मानलेला दिसतो. विषयवारीनें दोन भाग पडतात. पहिला ज्योतिषशास्त्रविषयक, दुसरा रचनाविषयक. पहिल्या भागांत बांधकामाला शुभाशुभ मुहूर्त कोणता, जागा कोणत्या, त्या जागेवरील अतिमानुषी शक्तींना कसें संतुष्ट करावें याचें आणि वास्तुपुरुषमंडळाच्या आखणीचें, ब्रह्म अथवा कूर्मशिलेचे व शिलांवरील विविध चिन्हांचें विवेचन येतें. यांतच अष्टदिशा, नक्षत्रें यांचा विचार येतो. या सबंध भागाचा संबंध ज्योतिषशास्त्राशींच आहे. सगळ्या विवेचनाचा भर अतर्क्य अशा अतिमानुषी शक्तींना कसें प्रसन्न करावें यावरच आहे. क्रॅम्रिश यांनीं केलेलें वास्तुपुरुषमंडळाचें विवेचन केवळ पारमार्थिकच आहे. परंतु खुद्द ग्रंथावरून अथवा टीकाकारांच्या विवेचनानेंहि ज्योतिषशास्त्रविषयक भागाचा प्रत्यक्ष रचनेशीं, लौकिक कार्यकारणावरून संबंध कोणता हें स्पष्ट होत नाहीं. तसा संबंध लावून दाखविणाऱ्या विद्वानांत एकमत होत नाहीं. दुसरा भाग रचनात्मक म्हणजे रचनाविषयक आहे. येथें नगराला वा वास्तुला योग्य जागा कशी निवडावी याचा विचार प्रथम केला आहे. जमिनीचा उतार, वाऱ्याची दिशा, मातीचें स्वरूप, पाण्याचें सान्निध्य, या सर्वांचें विवेचन येथें सापडतें. हें सर्व विवेचन अगदीं ऐहिक असें आहे. ह्यावर पारलौकिकाचें आवरण नाहीं.

स्थपति व मापनपद्धति

रचनापद्धतीच्या वर्णनाच्या सुरुवातीला किंवा क्वचित् ग्रंथाच्या आरंभीं, दोन महत्त्वाचे विषय सांपडतात. इमारत बांधण्यास लायक कोण आणि मापनपद्धति कोणती हे ते विषय. स्थापत्यशास्त्राचे चार विभाग सांगितले आहेत. पहिला व सर्वश्रेष्ठ म्हणजे स्थपति. याला इमारती बांधण्याचें आणि इतर शिल्प-शाखांचें उत्कृष्ट ज्ञान तर हवेंच पण शिवाय वेदाध्यायनहि असावें लागतें. स्थपतींच्या मार्गदर्शनाखालीं सर्व काम व्हावयाचें असतें. दुसरा सूत्रग्राहिन् म्हणजे आलेखक व चित्रकार. ह्यालाहि वेदविद्या अवगत असावी लागते. तिसरा तक्षक म्हणजे सुतार. हा काष्ठशिल्पांत निष्णात असावा लागतो. चवथा वर्धाकि. याचा मुख्य व्यवसाय चित्रकाराचा, परंतु यालाहि वेदविद्या अवगत असणें जरूर समजतात. या ठिकाणीं बहुतेक लेखकांनीं वेद याचा अर्थ स्पष्ट न करतां केवळ तेवढा शब्दच देऊन काम भागविलें आहे. परिस्थिति अशी असावी कीं, वास्तुशास्त्र किंवा शिल्पशास्त्र हें अथर्ववेदाचें एक अंग आहे असें मानीत. तेव्हां या वेदांगाचें ज्ञान या चार, मुख्यतः तीन व्यावसायिकांना असावयास हवें असें समजावयाचें. स्थपति, वर्धाकि व सूत्रग्राहिन् हे वेदाच्या सर्व शाखोपशाखांत वा अंगोपांगांत

निष्णात असावे आणि शिवाय त्यांनीं आपल्या विद्येंतहि कुशल असावें असें म्हणणें शक्यतेच्या कोटींत बसत नाहीं.

मापनपद्धतीचीं कोष्टकें सर्व वास्तुशास्त्रांत खुलासेवार दिलेलीं आहेत. ह्या कोष्टकांस सर्वांत सूक्ष्म म्हणून परमाणूपासून सुरुवात झालेली असते. इतक्या सूक्ष्मांतून उत्पन्न झालेली मापनपद्धति अंगुलापाशीं आली म्हणजेच हातांत गवसते. अंगुल म्हणजे हाताच्या मधल्या बोटाची जाडी. याच्या पटी आठानें अथवा चोविसानें वाढवीत वाढवीत दण्ड म्हणजे धनुष्याच्या काठीइतकी लांबी तयार होते. ह्यांत तीन प्रकारचीं अंगुलें असतात. तीं उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशीं; तीं इमारतींच्या बांधणीस वापरावयाचीं; रस्ते किंवा वाहनें याच्या मोजणींत वापरावयाचीं; आणि आसन व मंचक यांच्या बांधणींत उपयोजावयाचीं. इतकीं वर्षें अभ्यास चालूनहि अद्याप दण्ड मापाची तीन प्रकारची लांबी सध्याच्या परिमाणांत किती याचा कोणी निर्णय करूं शकलेलें नाहीं.

स्थापत्य-वास्तु

योग्य भूमीची स्थपतीची व मापनपद्धतीची निवड झाल्यावर, जी वास्तु उभारावयाची तिचा विचार. यांतील पहिला विचार म्हणजे विधान किंवा प्लॅन यासंबंधीचा. यांत नगरविधान, दुर्गविधान, मंदिरविधान, गृहविधान अशा सर्व प्रकारच्या इमारतींच्या वेगवेगळ्या विधानांची माहिती येते. रस्त्याच्या आंखणीमध्यें, त्या रस्त्यावरून कोणत्या प्रकारची वाहनें जाणार आहेत, तो केवळ व्यापारी मार्ग आहे कां सैनिकी मार्ग आहे, अशा गोष्टी ध्यानांत घेतल्या आहेत. नगरांचे दण्डक, सर्वतोभद्र, स्वस्तिक, पद्मक, नंद्यावर्त असे अनेकविध आकार दिलेले आहेत. नगररचनेमध्यें दुर्गरचनेस महत्त्वाचें स्थान दिलेलें आहे. यांत तटबंदी, दरवाजे, बुरूज, खंदक अशा सर्वांचीं वर्णनें आहेत. तसेंच जलदुर्ग, वनदुर्ग, भूदुर्ग असे दुर्गप्रकारहि आहेत. यांत राजप्रासाद, सैनिकनिवास आणि इतरेजन म्हणजे व्यापारी, उद्योगधंदेवाले, लोहार, सुतार आदि तसेंच शूद्र यांचे भाग नगरांत वेगवेगळे आंखलेले आहेत. राजप्रासाद सर्वांत सुरक्षित ठिकाणीं तर शूद्रनिवास सर्वांत असुरक्षित ठिकाणीं आहेत.

नगरविधान तयार झाल्यावर घरें, प्रासाद, म्हणजे निवासस्थानें यावयाचीं. सर्व वास्तुशास्त्रांत इमारतींचें विधान, त्यांतील स्तंभांचे आकार व मांडणी, द्वारशाखा, भिंती, खिडक्या, मजले, छपरें, छतें, वेगवेगळ्या प्रकारचीं दालनें वा महाल इत्यादींचे सविस्तर वर्णन आहे. मानवाचीं आलयें म्हणजे निवासस्थानें आणि देवांचीं आलयें म्हणजे मंदिरें यांतील रचनात्मक भेद स्पष्ट केलेला नाहीं. प्रथम प्रासाद नांवाच्या वास्तूचें वर्णन देऊन नंतर 'याप्रमाणेंच मनुष्यांचीं आलयें बांधावींत' असें म्हटलेलें आढळतें. निवासस्थानें व मंदिरें यांत सुस्पष्ट असा भेद सांपडलाच तर तो इ. स. ८००-१००० च्या नंतरच्या

ग्रंथांत सांपडतो. परंतु याचा अधिक विचार पुढें करावयाचा आहेच. गृहरचनेनंतर पाणी-पुरवठा, रथनिर्मिति अशांसारखे विषय येतात.

वास्तुशास्त्रग्रंथांतील वास्तुविद्याविषयक मजकुराचा थोडक्यांत सारांश हा असा आहे.

वास्तुशिल्प

वास्तुशिल्प हा विषय तुलनात्मक आहे हें या आधींच स्पष्ट केलेलें आहे. ज्या दोन भागांची तुलना करावयाची त्यांपैकीं एकाची कल्पना आतांपर्यंत दिली. आतां दुसऱ्या भागाकडे म्हणजे वास्तुशिल्पाकडे वळावयाचें. वास्तुशिल्प हा शब्द येथें कोणत्या अर्थानें वापरला आहे याची कल्पना आधींच दिलेली आहे. आतां वास्तुशिल्पाचें स्वरूप, व्याप्ति आणि मुख्य वर्गवारी यांचा विचार करावयाचा आहे. चटकन् डोळयांत भरणारे आणि कलापूर्ण असे प्राचीन अवशेष म्हणून आपल्या जुन्या वास्तूंकडे नव्या अभ्यासकांचें लक्ष प्रथम गेलें. पाश्चात्त्य संशोधकांनीं आपल्या संशोधनाला आरंभ केल्या-पासून म्हणजे आज कमींत कमी सवाशें तें दीडशें वर्षें वास्तुशिल्पाची दखल घेण्यांत आलेली आहे. या सर्व अभ्यासाचें सार म्हणून पर्सी ब्राऊन यांच्या ग्रंथाकडे बोट दाखवितां येतें. वस्तुनिष्ठ व उत्क्रान्तिवादी दृष्टिकोणांतून त्यांनीं हा विषय आपल्या "इंडियन आर्किटेक्चर" या ग्रंथांत हाताळला आहे. ह्या ग्रंथाच्या आणि इतर प्रसिद्ध साहित्याच्या आधारें वास्तुशिल्पाचें रूप स्थूलमानानें पुढीलप्रमाणें सांगतां येईल.

नागरी-शिल्प म्हणजे रोजच्या जीवनाला आवश्यक अशा वास्तु. यांत घरें, प्रासाद, नगरें यांचा समावेश होतो. उत्तर मध्ययुगांतील म्हणजे मुसलमानी, रजपूत, मराठी अशा कांहीं कांहीं वास्तु आज उपलब्ध असल्या तरी त्या आधींच्या काळांतले प्रत्यक्ष नमुने आज पाहावयास सांपडत नाहींत, फक्त चित्रांतील अथवा शिल्पांतील प्रति-कृतींवरून जी काय कल्पना येईल तेवढीच. प्राचीन वाङ्मयांत निरनिराळ्या दालनांचे आणि प्रासादांच्या भागांचे उल्लेख येत असले तरी त्यांवरून त्या इमारतींच्या बाह्याकृती अथवा दर्शनें यांची कल्पना येत नाहीं. सारांश, नागरी शिल्पाविषयींचें प्रत्यक्ष ज्ञान अत्यंत त्रोटक आहे.

दुसरा प्रकार **लष्करी किंवा संरक्षक** शिल्पाचा. यांत शहराभोंवतालचे कोट, खंदक, द्वारें, तसेंच किल्ले आणि त्यांची मांडणी व रचना, रक्षित प्रासाद वा गढ्या या सगळ्यांचा समावेश होतो. नागरी शिल्पाप्रमाणेंच येथेंहि प्रत्यक्ष नमुने जवळपास नाहींतच. उत्खात वा चित्रित उदाहरणें अपूर्ण आहेत. पूर्वींच्या काळीं जेथें किल्ले होते, त्या ठिका-णांचीं नावें आणि वर्णनेंसुद्धा मिळतात. तथापि इ. स. १२०० च्या आसपासचा किंवा त्याच्या आधींचा कोणताहि दुर्ग मूळ अथवा थोड्याशा परावर्तित अवस्थेंतसुद्धां पाहाव-यास सांपडत नाहीं. तीं तीं ठिकाणें मोक्याचीं असल्यानें तेथें पुनः पुनः दुर्गांची उभारणी

झाली आणि त्यामुळें आधीचीं विशिष्ट अशीं दुर्गलक्षणें पुसून गेलीं. देवगिरी, पन्हाळगड, शिवनेरी इ. किल्ले यादवकालीं अथवा शिलाहारांच्या आमदानींत बांधलेले, क्वचित् त्याच्याहि पूर्वीचे. परंतु नंतरच्या बहमनी अथवा मराठी सत्तेनें तत्कालीन परिस्थितीला योग्य असे किल्ले बांधले आणि त्यामुळें तेथें आतां यादव वा शिलाहार संरक्षक शिल्पाचे विशेष सांपडत नाहींत.

नागरी व लष्करी शिल्पाची ही स्थिति असली तरी **धार्मिक** म्हणजे मुख्यतः **मंदिर शिल्पाची** स्थिति खूपच भिन्न व चांगली आहे. बांधणींतील दोष, तसेंच दगडांतील दोष आणि मुसलमानी अत्याचार यामुळें बरींच देवालयें पूर्णपणें नष्ट झालीं आणि कांहींची नासधूस झाली असलीं तरी शेंकडों प्राचीन देवालयें पूर्वीच्या वैभवाची साक्ष पटेल इतक्या चांगल्या अवस्थेंत उभीं आहेत. सबंध भारतभूवर पसरलेल्या अशा मंदिरांचा अभ्यास करून धाटणीच्या दृष्टीनें त्यांचे वर्ग पाडण्यांत आलेले आहेत. तसेंच केवळ रचनात्मक आणि कलात्मक उत्क्रान्तीच्या तत्त्वांवर या शिल्पांचा कालक्रमहि लावण्यांत आलेला आहे. प्रत्यक्ष पुराव्यानुसार पाहतां, ज्यांना मंदिर असें नांव निश्चयानें देतां येईल, अशा वास्तु सामान्यतः गुप्तकालाच्या आधींच्या सांपडत नाहींत. मात्र याचा अर्थ या आधींचें कांहींच सांपडत नाहीं असा नव्हे.

मौर्य काळ

मौर्य काळापासून पुढें दोन शिल्पप्रकार उभे दिसतात. पहिलें म्हणजे गिरिशिल्प व दुसरें स्तूप. जैन व बौद्ध कलाकारांनीं या प्रकारांची जोपासना व वाढ केली. स्तूपाची नसली तरी गिरिशिल्पाची बरीच प्रगति हिंदुधर्मियांनीं व कलाकारांनीं विशेषतः गुप्त-वाकाटक काळांत केली. गिरिशिल्प व स्तूप यांविषयीं आपल्या वास्तुशास्त्रांत कोठेंच कांहीं उल्लेख अथवा माहिती नाहीं हें ध्यानांत ठेवावयास हवें.

गुप्त काळ

दुसरा खंड गुप्त व गुप्तोत्तरकालीन म्हणजे हिंदु मंदिरशिल्पाचा. यांत गुप्त काळांत आरंभ झालेल्या आणि नंतरहि बऱ्याच प्रमाणांत टिकून राहिलेलीं मंदिरें व रचना पद्धति यांचा समावेश होतो. इ. स. पाचशें ते आठशें हा काळ मंदिरशिल्पाच्या उद्गमाचा व विकासाचा मानण्यांत येतो. देशांतील अनेक भागांत सौराष्ट्र, मध्य भारत, राजस्थान, ओडिसा, उत्तर कर्नाटक व आंध्र अशा प्रदेशांत मंदिराचे समूह या काळांत उभे राहिले. याच शिल्पाची अधिक प्रगति होऊन उत्तर किंवा आर्य आणि द्राविड किंवा दक्षिण अशा दोन स्वतंत्र शैली उत्पन्न झाल्या. पुढें पुढें या दोन वर्गांचीं कांहीं ठळक ठळक वैशिष्ट्यें कायम ठेवून चेहऱ्यामोहऱ्यांत थोडा बदल केलेले पृथक् पृथक् वर्ग, देश व काळ यांस अनुसरून अस्तित्वांत आले. आर्य शैलींत ओडिसा, मध्य भारत, लाट, उत्तर महाराष्ट्र यांचे स्वतंत्र उपवर्ग आहेत. तर द्राविड शैलींत पल्लव, चोळ, होयसळ, चालुक्य असे उपवर्ग आढळतात.

आर्य व द्राविड शैली

सामान्यपणें असें सांगतां येतें कीं दोन्ही मंदिरशिल्पांत छायाप्रकाश योजनेस महत्त्व दिलेलें असतें. परंतु आर्य शैलींत उर्ध्ववृत्ति म्हणजे Vertical drive महत्त्वाची ठरते तर द्राविड शैलींत समतल वृत्ति म्हणजे Horizontal Strain वर भर देण्यांत येतो. छायाप्रकाशयोजनेंत भिंतीच्या पृष्ठभागाची मोडणी करावी लागते. ही करतांना उभ्या रेषांना महत्त्व देणें हा रुचीचा प्रकार असला तरी सामान्यपणें उभ्या रेषा व त्यांतून निर्माण होणारा Vertical effect ही आर्यशैलीची व आडव्या रेषा व यांतून उत्पन्न होणारा horizontal effect ही द्राविड शैलीची निर्णायक खूण मानण्यास हरकत नाहीं. याशिवाय अनेक बारीक सारीक फरक असले तरी ते येथें सांगण्यास वाव नाहीं. ढोबळ मानानें विषयाची कल्पना आली म्हणजे पुरे आहे. कारण सूक्ष्म तुलना करणें शक्य होणार नाही.

संज्ञाविषयक तुलना

आतांपर्यंत, ज्यांची तुलना किंवा चर्चा करावयाची त्या वास्तूंची माहिती दिली. हा भाग थोडासा लांबला असला तरी, वास्तुशिल्प व वास्तुशास्त्र या विषयाचा अभ्यास सामान्यपणें प्रचलित नाहीं, हें ध्यानांत घेऊन, पुढच्या विवेचनाच्या सुलभते-साठीं तो सविस्तर मांडणें भाग होतें. शास्त्र व व्यवहार यांचा परस्परसंबंध तपासण्यास आरंभ करावयाचा, तर शास्त्र हें स्वतंत्रपणें कितपत सुसंगत व स्पष्ट आहे, याचा विचार करावयास हवा.

प्रासाद

जे विषय अगदीं सामान्य स्वरूपाचे म्हणजे general आहेत, त्यांत सर्व शास्त्रांत एकवाक्यता आढळते. म्हणजे नगररचनेंत दिशा, वाऱ्याची दिशा, भूपरीक्षा अशा बाबतींत किंवा पाण्याचें सान्निध्य असावें, अशासारखे नियम सर्वच वास्तुविद्येंत सांपडतात. केवळ भारतांतच नव्हे तर जगांतील इतरहि वास्तुविद्येंत सांपडतील. तेव्हां असे सामान्य, अगदीं प्राथमिक स्वरूपाचे सिद्धान्त सोडून देऊन ज्या वेळीं आपण भारतीय वास्तुवैशिष्ट्यांकडे वळतो तेव्हांच फलदायी चर्चेचा संभव उत्पन्न होतो. या आधीं सांगितलेंच आहे कीं, गृह म्हणजे राहण्याची जागा आणि मंदिर म्हणजे देवालयें. यांचा फार घोटाळा शास्त्रांतून आढळतो. प्रासाद हा शब्द सर्वत्र वापरला आहे. प्रासाद या शब्दाचा अर्थ आरंभापासूनच मंदिरें असा घ्यावयाचा झाल्यास बौद्ध काळा-पूर्वींहि देवालयें बांधलेलीं होतीं, असा निष्कर्ष निघतो. उलट भट्टाचार्य यांच्या म्हणण्या-प्रमाणें आरंभीं प्रासाद याचा अर्थ राजवाडा असाच होता. इ. स. च्या आरंभाच्या थोड्या पूर्वीं या शब्दाला देवालय असाहि अर्थ प्राप्त झाला व पुढें म्हणजे गुप्त-कालापासून उत्तरेकडील वास्तुशास्त्रांत प्रासाद म्हणजे केवळ देवालयच असा अर्थ रूढ झाला. वास्तविक पाहतां एका शब्दाच्या अर्थासाठीं एवढे मतभेद असण्याची जरुरी

नव्हती. तथापि, प्रासाद शब्दाचा अर्थ मंदिर असाच धरला, तर मंदिराच्या अस्तित्वाचा काळ, सध्यांच्या मान्य कल्पनेपेक्षां जवळजवळ आठशें-हजार वर्षें मागें जातो. दुसरें म्हणजे प्रासाद याची अत्यंत स्पष्ट व्याख्या वास्तुशास्त्रांत सांपडली असती, तर या शब्दच्छलाची जरूरहि नव्हती आणि याहिपेक्षां, वास्तुविद्येच्या सर्व ग्रंथांत हा स्पष्ट अर्थ व व्याख्या सुसंगतपणें टिकवून धरण्यांत आली असती, तरीहि वादाला जागा नव्हती.

आभास

दुसरा असाच शब्द घ्यावयाचा तर 'आभास'. ह्या शब्दाचा अर्थ मानसार-शिल्पशास्त्रावरील टीकेंत आचार्य यांनीं 'शिल्पासाठीं वापरण्यांत येणारा पारदर्शक दगड' असा केला आहे. याउलट भट्टाचार्य हे या शब्दाचा अर्थ शिल्पशोभनासाठीं वापरण्यांत येणारें शिल्प वा चित्र असा करतात. इतके विभिन्न अर्थ या शब्दाला चिकटविण्यांत यावेत याचाच अर्थ असा कीं, मूळ ग्रंथांत या शब्दाचा अर्थ अथवा व्याख्या स्पष्टपणें दिलेल्या नाहींत. या आभासाचें स्वरूप व उपयोग यांचीं मूळ वर्णनें इतकीं त्रोटक व वरवरचीं आहेत, कीं अर्थबोधाची शक्यताच राहात नाहीं.

वितान

आणखी एक उदाहरण घेऊं. छत म्हणजे वितान. या वितानाचे तीन प्रकार लाट शैलींत संभवतात. क्षिप्त, उत्क्षिप्त आणि क्षिप्तोत्क्षिप्त. यासंबंधीं लिहिणाऱ्या चार अत्यंत प्रसिद्ध संशोधकांनीं या संज्ञांचे एकमेकांना पूर्णपणें विरोधी असे अर्थ दिले आहेत आणि मौज अशी कीं, चौघांनींहि आपापल्या मताच्या पुष्टीसाठीं उभ्या असलेल्या मंदि-रांच्या छतांचीं वर्णनें दिलीं आहेत.

अशा संदिग्ध व अस्पष्ट शब्दांची व संहितांची किती तरी उदाहरणें सांगतां येतात. ह्या सर्व संज्ञा अत्यंत महत्त्वाच्या आहेत, कारण त्यांवरून खास भारतीय शिल्पांतील रचनापद्धति, आकार आणि वास्तुभूषणें यांची कल्पना येणार आहे; आणि यांचाच अर्थ लागत नसेल तर वास्तुशास्त्र समजणार नाहीं, वास्तुशिल्पाशीं तुलना लांबच राहिली.

यानंतर पाहावयाचा मुद्दा म्हणजे वास्तुविद्येमध्यें दिलेली मापनपद्धति व प्रमाणें मापनपद्धतीचे तीन प्रकार या आधींच सांगितले आहेत. या पद्धतींचा वापर क्वचितच केलेला आढळतो. वर्णनें येतात तीं परस्पर प्रमाणांचीं. दाराच्या चौकटीचें उदाहरण घेऊं. आपल्याकडे अगदीं परवांपरवांपर्यंत दाराची चौकट व फळ्या विशेष प्रकारें सुशोभित करण्याची पद्धत होती. यासाठीं सगळे भाग प्रमाणबद्ध असण्याची जरुरी होती. हीच प्रमाणें कांहींशीं पुढीलप्रमाणें सांगतात. दाराच्या खांबाची जी लांबी असेल तिचे सोळा भाग पाडावेत. या सोळांपैकीं सात भागांची गणेशपट्टी असावी. गणेशपट्टीचे दहा भाग असावेत. त्यांतल्या तीन भागांइतकी रुंदी ठेवावी. असा तपशील द्वारशाखेच्या म्हणजे चौक-टीच्या प्रत्येक भागाचा आहे. तसाच तो स्तंभ,त्याची उंची,त्याची जाडी, ह्यांचाहि आहे.

परंतु ह्या सगळ्या भागांना एकत्र गुंफण्यासाठीं जें प्रमाण पाहिजे, त्याचा खुलासा कोठेंहि सांपडत नाहीं. दरवाजाचें पूर्ण वर्णन आहे; पण सबंध प्रासादाची लांबी, रुंदी व उंची आणि दरवाजाचें आकारमान यांचा परस्पर संबंध काय असावा, याचा निर्णय नाहीं. बरें, एका समान मापनाशीं संबंध जोडला असेल असें म्हणावें तर तसेंहि कोठें आढळत नाहीं. म्हणून हे ग्रंथ वाचून व त्यांतील प्रमाणें पाहून एखाद्या इमारतीचें विधान वा छेद वा पक्षदर्शन दाखवितां येणें शक्य होणार नाहीं.

देश-काल भिन्नता

वास्तुविद्येच्या अभ्यासकांनीं काल व देश यांचा फारसा विचार केलेला नाहीं. एखाद्या तांत्रिक संज्ञेचा अर्थ सर्वच काळामध्यें एकच असेल अथवा सर्व भारतभर एकच असेल असें समजण्याचें कारण नाहीं. देशकालपरत्वें त्या त्या शब्दांचे अर्थ म्हणजे त्या शब्दांना अभिप्रेत असें वास्तूंचें अंग हें एकच, एकाच आकाराचें, एकाच नक्षीचें असेल असें सांगतां येत नाहीं. विमान या शब्दाची कथा घेऊं. गुप्तकाल आणि गुप्तपूर्वकाल यांत अर्थभिन्नता आहे. द्राविड व उत्तरापथांतील वाङ्मयांत निरनिराळे अर्थ अभिप्रेत आहेत. ही भिन्नता ध्यानांत न घेतां, एकच अर्थ सर्वत्र लावला तर मंदिरशिल्पाच्या इतिहासाचा विपर्यास होतो. यासंबंधीं भट्टाचार्य यांचें समग्र विवेचन वाचनीय आहे.

नागर, वेसर इ.

अशा संदिग्धतेचा कळसच जर कोठें होत असेल, तर तो प्राचीन शिल्पांतील विविध वर्ग अथवा शैली यासंबंधीं. प्रमुख व प्रसिद्ध असे वर्ग तीन. द्राविड, नागर व वेसर. या प्रकारची वर्गवारी सगळ्या वास्तुशास्त्रांत सांपडत नाहीं. डॉ. शुक्ल यांनीं अशी एक बाजू मांडली आहे, कीं वर्गवारी वास्तुशिल्प बऱ्याच प्रगत अवस्थेस पोचल्यावरच शक्य आहे. तेव्हां प्राचीन शास्त्रांत ती सांपडत नाहीं. तथापि, समरांगणसूत्रधार यासारख्या खूप उशिराच्या ग्रंथांत इतकी संदिग्ध विधानें कां असावींत, इतकेंच काय पण वेसर हा शब्द येऊं नये, याला काय कारण असावें हें त्यांना सांगतां आलें नाहीं. मुळांत संदिग्धता आली, कीं मतप्रदर्शन व मतभेद आलेच. ते साधारणपणें खालीलप्रमाणें:––

(१) नागर, वेसर, द्राविड, हे शब्द प्रदेशवाचक आहेत. नागर=उत्तर भारत; द्राविड=दक्षिण भारत; वेसर=मध्यभारत, तुंगभद्रा–कृष्णा खोरीं. प्रदेशवाचक याचा अर्थ असा कीं, त्या त्या प्रदेशांत प्रचलित असलेल्या शैलीचा निदर्शक. ही विभागणी आचार्य यांना मान्य आहे. फर्ग्युसन यांनीं वास्तुशिल्पाच्या अभ्यासावरून ती सुचविली. मात्र ग्रॅव्हली, रामचंद्रन् इत्यादींच्या मतें वेसर म्हणजे औत्तरीय व नागर म्हणजे मध्यदेशीय किंवा चालुक्य शैली.

(२) भौगोलिक संज्ञा म्हणून वापरल्या तरी त्यांत कांहीं शिल्पवैशिष्ट्यें असणें आवश्यक आहे. हीं वैशिष्ट्यें म्हणजे, नागर ही चौकोनी, वेसर ही गोल व द्राविड

ही अष्टकोनी इमारत असते. खुद्द शास्त्रांत या विषयाचा मजकूर अस्पष्ट आहे. त्यामुळें चौकोनी, गोल इत्यादि विशेषणें त्या त्या वास्तूंच्या विधानांना लागूं पडतात किंवा कसें ह्याचा उलगडा होत नाहीं.

(३) शुक्ल यांनीं तिसरा प्रकार प्रतिपादिला आहे. तो असा, कीं नागर याचा संबंध नागरी याच्याशीं जोडणें आणि मोठाल्या नगरांत प्रचलित असणारी, अधिक बळकट व शोभिवंत इमारत ती 'नागर'. येथें भौगोलिक अर्थाचा विचार करावयाचा नाहीं. मात्र द्राविड याचा भौगोलिक, अर्थ स्पष्टच आहे असें ते सांगतात. वेसर याचाहि चालुक्य मंदिरशिल्प असाच अर्थ त्यांना मान्य आहे.

असे मतभेद वा शब्दच्छल होऊं शकतात याचें एक महत्त्वाचें कारण म्हणजे व्याख्येंतील संदिग्धता नाहींशी करण्यासाठीं ज्या आकृति अथवा चित्रें हवीं, तीं येथें नाहींत. विधान, छेद, पक्षदर्शन यांचीं वर्णनें शब्दसाध्य नाहींत तीं दृश्यच हवींत. चित्रें व आकृति यांचा पूर्ण अभाव ही एक आश्चर्यकारक आणि अपकारक उणीव या शास्त्रग्रंथांत आढळते.

या सगळ्या चर्चेचा निष्कर्ष असा, कीं बहुतेक वास्तुशास्त्रें ही सुस्पष्ट व सुगम नाहींत व तीं तशीं व्हावींत यासाठीं चित्राकृति अथवा प्रत्यक्ष बांधलेल्या देवळांचीं उदाहरणेंहि देण्यांत आलेलीं नसल्यानें हा एक वादग्रस्त व दुर्गम विषय झाला आहे.

कांहीं प्रश्न

आतां, अभ्यासकांचा एक वर्ग असा, आहे कीं ज्यांच्या मतें हीं शास्त्रें सुगम, निःसंदिग्ध आणि सुसंगत आहेत. परंतु अशा अभ्यासकांनाहि कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांवर प्रकाश टाकतां आलेला नाहीं. हे प्रश्न वास्तुशिल्प प्रत्यक्ष अभ्यासून उत्पन्न झालेले आहेत; तसेच वास्तुविद्येच्या सामान्य ज्ञानावरूनहि निर्माण झालेले आहेत.

१ द्राविड आणि औत्तर शैलीचा उद्‌गम आणि विकास कसा व कोठें आणि कोणत्या पायऱ्यांनीं झाला ?

२ भारतीय वास्तुशास्त्रावरील ग्रंथांत कोणतीं शास्त्रीय म्हणजे स्थापत्यविषयक मूल तत्त्वें अनुसरलीं आहेत ?

३ वास्तुशिल्पांतील सौंदर्यविषयक दृष्टिकोणाचा यांतून बोध होतो काय ?

४ वास्तुशिल्पांत बऱ्याच लेखकांना जो पारमार्थिक तत्त्वज्ञानाचा पाया 'सांपडला' आहे त्याविषयीं वास्तुशास्त्रें कांहीं सांगतात का ?

वास्तुशास्त्राच्या कांहीं ग्रंथांच्या वाचनावरून मला असें वाटूं लागलें आहे कीं, यांपैकीं सर्वांचीं उत्तरें नकारार्थी आहेत. या विषयाचा म्हणजे वास्तुशास्त्राचा जास्त म्हणजे खोल अभ्यास केलेल्या कांहीं तज्ज्ञांशीं झालेल्या चर्चेंत त्यांनाहि हें मत फारसें

अमान्य असावें असें वाटलें नाहीं. वास्तुशास्त्रांत स्थापत्यशास्त्राचा विचार वा वर्णन नाहीं. सौंदर्यविषयक दृष्टिकोण अथवा तात्त्विक बैठक यांचाहि विचार नाहीं. इतकेंच काय पण वर्ग, शैली व त्यांची उत्पत्ति इ. विषयीं उपयुक्त माहिती या शास्त्रावरून मिळण्यासारखी नाहीं. याचाच अर्थ असा कीं, वास्तुशिल्पाची उत्पत्ति, प्रगति व विकास यांविषयीं ऐतिहासिकदृष्ट्या अथवा सौंदर्यदृष्ट्या ज्ञान मिळविण्यास वास्तुशास्त्रें निरुपयोगी ठरतात. प्रत्यक्ष आचरण आणि ग्रथित नियम यांचा मेळ बसत नाहीं.

योग्य अभ्यासक कोण ?

आतां जर कोणी असें म्हणेल कीं, योग्य अभ्यासक व पद्धति यांच्या अभावीं असा नकारात्मक निष्कर्ष निघतो, तर त्याला एक सोपें उत्तर आहे. योग्य अभ्यासक कोणाला म्हणतां येईल ? त्याच्या अंगीं कोणते गुण असावे लागतील ? ग्रंथ संस्कृतांत म्हणजे अभ्यासक संस्कृतज्ञ हवाच. वास्तुशास्त्राच्या अभ्यासकाला वास्तुशिल्पाचा उत्तम परिचय हवा. तेव्हां वास्तुशिल्पाच्या इतिहासाच्या अभ्यासकाचा यांत समावेश करण्यास प्रत्यवाय नसावा. त्यांत स्थापत्यशास्त्राचा भाग असण्याचा संभव असल्यानें स्थापत्यशास्त्र्यांनीं त्याचा अभ्यास करावा. जर कांहीं पारमार्थिक तत्त्वज्ञान असेल तर तें शोधून काढण्यास या विषयावरील अधिकारी व्यक्तींनीं पुढें यावयास हवें आणि शेवटीं, प्राचीन शिल्पपद्धतीचें तात्त्विक व मुख्य म्हणजे आचारविषयक ज्ञान आहे असें सांगणारे शिल्पी.

यांपैकीं सगळे गुण एकाच व्यक्तींत सांपडणें फार कठीण आहे. सहसा कोणी तसा दावा सांगत नाहीं. परंतु कोणीच सांगत नाहीं, असें मात्र नाहीं. मुख्य उपयोगीं पडणारे लोक म्हणजे ज्यांची वरच्यापैकीं एका, दोन किंवा तीन विषयांत गति आहे, असे संशोधक. येथें नामें व ग्रंथनामें सांगण्यास वेळ व वाव नाहीं; मात्र एवढें सांगतां येईल, कीं अशा ज्ञानी लोकांनीं एकत्र आणि पृथक्पणें केलेल्या प्रयत्नांचें फळ वर सांगितल्याप्रमाणें आहे. केवळ संस्कृतज्ञ माणसास तांत्रिक संज्ञा समजत नाहींत. वास्तूंच्या अभ्यासकांना विशेषतः फर्ग्युसन आदि संशोधकांना संस्कृतचें ज्ञान फार खोल असण्याची शक्यता नाहीं. स्थापत्यशास्त्रीमंडळी जास्तींत जास्त वास्तुशिल्पाचा अभ्यास करूनच थांबतात. कारण त्यांनाहि संस्कृत ग्रंथ सुगम नव्हते. क्रॅम्रिश, हॅवेल, कुमारस्वामी यांसारख्या चार-पांच लोकांव्यतिरिक्त तात्त्विक दृष्टीनें या विषयाकडे फारसें कोणीं पाहिलेलें नाहीं. मुख्य भर होता तो जुन्या परंपरांचें जतन केलेले अशी ज्यांची प्रसिद्धी, अशा शिल्पांवर. मानसाराचे संपादक आचार्य यांनीं अशा शिल्पी घराण्यांचा शोध करून त्यांच्याकडून या ग्रंथांचे अर्थ समजावून घेण्याचा यत्न केला. त्यांचा मुख्य प्रयत्न होता तो तांत्रिक संज्ञांचीं चित्रें, आकृति काढून घेण्यावर. या त्यांच्या प्रयत्नांचा इतिहास त्यांच्याच शब्दांत सांगणें इष्ट आहे.

" अनेक गैरसोई पतकरून आणि द्रव्य व वेळ यांचा मोठाच खर्च सोसून (ठिकठिकाणीं) असणाऱ्या पारंपरिक स्थपतींना गांठण्याचा यत्न मीं केला. यांत दक्षिण भारत,

ओरिसा, राजस्थानमधील संस्थानें, मध्य भारत, गुजरात, मुंबई, सरहद्द प्रांत आणि डोंगराळ भागांतील संस्थानें या सगळ्या मुलखांत, तज्ज्ञ व अनुभवी स्थापत्यविशारद, शिल्पी आणि दुभाषे यांना बरोबर घेऊन या (पारंपरिक) स्थपतींकडून कांहीं माहिती मिळविण्याचा फोल प्रयत्न केला. हे शिल्पी पूर्वीच्या परंपरांप्रमाणें वास्तुरचना करतात असें सांगण्यांत आलें होतें. ही परंपरा त्यांच्यापर्यंत मौखिक शिक्षणानें आलेली आहे असेंहि सांगण्यांत येतें. परंतु (प्रत्यक्ष अनुभव आला तो असा कीं) त्यांजपाशीं कांहीं अर्ध्यामुर्ध्या पोथ्या व टिपणें होतीं. परंतु त्यांचा अर्थ लावण्यास कोणीहि समर्थ नव्हते."[१५]

आचार्य यांना आपल्या ग्रंथांत आकृत्या काढण्यास पारंपरिक शिल्पी मिळाला नाहीं व शेवटीं पाश्चात्त्य पद्धतींत रूळलेला एक चित्रकार त्यांनीं त्या कामावर नियुक्त केला. त्यानें मानसाराच्या एका तोरणप्रकाराचें चित्र म्हणून एका मुगलकालीन कमानीचेंच चित्र रेखाटलें आहे.

दुर्दैवानें आचार्य यांचा अनुभव आजहि बऱ्याच अंशीं तसाच प्रत्ययास येतो. काठेवाडांतील सोमपुरा मंडळी या विद्येंत निष्णात असल्याचा मोठाच गवगवा आहे. त्यांच्यापैकीं कांहींना जैन देवालयांच्या रचनेचा अनुभव बराच आहे. सोमनाथाचें नवें मंदिर यांच्यापैकीं एका शिल्पज्ञानें उभारलें आहे तथापि, त्यांनीं संपादन केलेल्या, दीपार्णव, प्रासादमण्डन, शिल्परत्नाकर अशांसारख्या ग्रंथांचा अभ्यास हेंच दर्शवितो कीं, वर ज्या अडचणी मांडण्यांत आलेल्या आहेत, त्यांपैकीं एकांतूनहि ह्यांना सुटका करून घेतां आलेली नाहीं. अगदीं साध्या साध्या शब्दांच्या अर्थाबद्दलहि त्यांचें एकमत होऊं शकत नाहीं. जगती या संज्ञेनें फक्त जोत्याचा निर्देश होतो कां सबंध भिंतीचा हें स्पष्ट होत नाहीं. एकाच ग्रंथांत प्रत्यक्ष वर्णनांत फक्त जोतेंच असावें असें दिसतें तर आकृतींत सबंध भिंतीचाच समावेश आहे; आणि मुख्य म्हणजे यांतल्या कोणत्याहि ग्रंथकाराला ग्रंथाला समकालीन अशीं समर्पक उदाहरणें देणें फारसें शक्य झालेलें नाहीं. या दृष्टीनें अभ्यास करणारे अगदीं अलीकडचे जे ग्रंथकार त्यांत नाणावटी व ढाकी यांचा समावेश आहे. या लेखकद्वयापाशीं परिभाषेचें व वास्तुशिल्पाचें उत्तम ज्ञान असूनहि त्यांना समाधानकारक अन्वयार्थ लावतां आलेला नाहीं.

वास्तुशिल्पाचा विद्यार्थी व शिक्षक या दोन्हीं नात्यांनीं माझा या विषयाशीं सतत संबंध येतो. या दोन शाखांचा फार घनिष्ट संबंध आहे, असें मत अनेक ठिकाणीं पाहण्यांत येतें आणि तर्कदृष्ट्या असावयास पाहिजे, असें मलाहि वाटतें. परंतु हा संबंध कोणत्या प्रकारचा आहे, याचें मात्र स्पष्टीकरण होत नव्हतें. यासाठीं कांहीं वास्तुशास्त्रांचें वाचन करून आणि त्यांवरील टीकावाङ्मयाचाहि अभ्यास मला करावयाचा होता. या व्याख्यानाच्या निमित्तानें ह्या विषयाचें वाचन मला करतां आलें; परस्पर संबंध नाहीं, ही माझी खात्री झाली आहे. मात्र असें कां व्हावें हें सांगतां येत नाहीं. इतरहि ज्ञानशाखांत अशीच स्थिति आहे काय, हें पाहावयास हवें. विशेषतः वैद्यकासारख्या शाखेंत तर प्रत्यक्ष आचार आणि तात्त्विक प्रपंच यांचा संबंध ताडून पाहणें अवश्यच आहे. म्हणजे तत्त्वज्ञान व आचार यांची फारकत हें सामाजिक व बौद्धिक जीवनाचें एक अंग होतें किंवा काय याचा खुलासा होईल आणि वरील प्रकाराचा उलगडा होईल

संदर्भ ग्रंथ

(1) **Ram Raz**, *Essays on the Architecture of the Hindus*, (1834). (2) **Acharya P. K.**, *Indian Architecture according to Mānasāra śilpa-śāstra* (1927). *Dictionary of Hindu Architecture* (1927). *Encyclopaedia of Hindu Architecture* (1927). (3) **Mankad P. A**, *Aparājitapṛcchā*, Baroda (1950). (4) **Bhattacharya T.**, *The canons of Indian Art or a Study on Vāstu-vidyā*, Calcutta (1963). (5) **Mallaya N. V.**, *Studies in Sanskrit Texts on Temple Architecture* (1949). (6) **Sompura P. A.**, *Dīpārṇava by Viśvakarmā* (1960). (7) **Shukla D. N.**, *Vāstu-śāstra*, Vol. I, Lucknow (1960). (8) **Dhaky M. A.** and **Nanavati J. M.**, Ceilings of the Temples of Gujarat *Bulletin of the Baroda Museum and Picture Gallery*, Vol. XVI–XVII (1963). (9) **Shrinivasan K. R.**, Pallava Architecture of South India; *Ancient India*, No. 14, (1958). (10) **Krishna Deva**, The Temples of Khajuraha in Central India; *Ancient India*, No. 15, (1959). (11) **Vaze K. V.**, *Hindi Śilpaśāstrasāra*, Vol. I, Poona (1928). (12) **Vaze K. V.**, *Prācīna Hindī Śilpaśāstrasāra*, Nasik (1924). (13) **Kramrisch St.**, *Hindu Temple*, Calcutta (1946). (14) **Percy Brown**, *Indian Architecture*, 2 Vols., (1952). (15) **Acharya P. K.**, Preface to the volume of illustrations on *Indian Architecture....* (1927).

---

११ वैजापूरवर भोंसल्यांची एक स्वारी

(श्री. दि. वि. काळे, पुणें)

प्रस्तुत टिपणाचा आधार एक पांच कडव्यांचा किंवा चौकांचा पोवाडा आहे. हा पोवाडा अमुद्रित या अर्थानें अप्रकाशित आहे. परंतु निदान दीडशें वर्षें चालत आलेल्या, पूर्वीच्या मोगलाईतील (आतांच्या औरंगाबाद जिल्ह्यांतील) वैजापूरच्या देवीच्या वार्षिक अकरा दिवसांच्या उत्सवांतील सहाव्या दिवशीं इतर ठराविक कार्यक्रमांत नित्यक्रम म्हणून परंपरेनें म्हणण्यांत येतो, या दृष्टीनें तो अज्ञात नाहीं.

सुमारें इ. स. १८०७ मध्यें उतरलेल्या वैजापूरच्या देवस्थानासंबंधीं तपशीलवार कार्यक्रम नोंदलेल्या एका सचित्र जीर्ण वहींतून हा पोवाडा प्रति करून घेतला आहे. या वहीचाहि स्वतंत्रपणें अभ्यास करण्यासारखा आहे. तसा केला तर मराठवाड्यांतील देवतोत्सवांतील ललितादि कार्यक्रमांची फार चांगली कल्पना येईल. या वहींत निरनिराळ्या भूमिका करणारांसाठीं सूत्रधारानें म्हणावयाच्या कवनांची संपूर्ण नोंद आहे. त्यांतील कांहीं

ठिकाणची अश्लीलता, मुसलमानांची टिंगल, पौराणिक व सामाजिक आख्यानांची सजावट, अनुषंगानें व विनोद निर्मितीसाठीं कानडी, मारवाडी, भाट, जोहारी, जोगी, पंचाक्षरी, चेटकी, कापडी, परीट, जागल्या अशा समकालीन घटकांचें व्यक्तिचित्राण लक्षणीय आहे. विशेषतः या एकादशदिन उत्सवाचा आरंभ विशिष्ट तिथीला होण्याऐवजी शुद्ध पक्षांतील (आषाढ व चैत्र) पहिल्या रविवारीं होणें व समाप्ति बुधवारींच होणें हा एक-बहुधा तिथिक्षय व तिथिवृद्धि टाळण्यासाठीं पतकरलेला विलक्षण संकेत वाटतो. परंतु आपल्याला विशेष आकर्षण आहे तें या पोवाड्याचें. पोवाडा ऐकण्यापूर्वीं त्याचें लेखकाला वाटणारें महत्त्व थोडक्यांत कांही विशेषांसह नमूद करतों--

(१) पोवाड्यांत पोवाडा रचणाऱ्याचें नांव पुंजाजीदेव व गांव कसबा वैजापूर दिलेला आहे; रचनाकाल स्पष्ट नाहीं; पण समकालीन दिसतो.

(२) वर्णन वैजापूर व आसमंतांतील प्रदेश यांचेंच आहे; स्थानिक लोक व थोडी माहिती असलेला कोणीहि याबद्दल साक्ष देईल. नदी, डोंगर, खेडीं, सर्व कांहीं अचूक आहे.

(३) भोसल्यांनीं तीस हजार खंडणी मागितली व ती वसूल करण्यासाठीं फौज पाठविली. गांडापुराहून स्वार पाठविले, गांवानें दहशत खाली व एकजुटीनें स्थानिक नेत्यांच्या हाताखालीं प्रतिकार करण्याचा चंग बांधला व भोसल्यांना पळवून लावलें असें बढाईचें वर्णन आहे.

(४) या हल्ल्याचा दिवस ध्वनित करणारा उल्लेख ' मार्गशीर्ष तीज बुधवार ' असा स्पष्ट आहे. हा योग इ. १६६६, १६७२, १६७६ व १६७९ (जालना स्वारी) असा चारदा तरी शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत येतो. त्यांतील इ. १६७९ नोव्हेंबर २६ हा दिवस जालनापूरच्या घोडदौडींत चपखल बसतो, म्हणून हा पोवाडा छत्रपतींच्या वैजापूरवरील खंडणीस्वारीसंबंधींच असावा असें म्हणतां येतें. वैजापूरवरील भोंसल्यांची स्वारी असा योग एरवीं अन्य वेळीं बहुधा संभवत नाहीं असें वाटतें.

(५) इतिहासदृष्ट्या महत्त्वाच्या या पोवाड्याचें वाङ्मयमूल्य उतारा करतांना आधुनिकीकरण झाल्यानें कांहीं कमी झालेलें असण्याचा संभव आहे. परंतु इतिहास, सामाजिक इतिहास, ग्रामीण, प्रादेशिक वातावरण, समाजस्थिति, प्रादेशिक नेतृत्व, स्वयंसेवकी वृत्ति व तत्कालीन धामधुमीच्या कालाचें वास्तव दर्शन या दृष्टींनीं या पोवाड्यांतील रेषा तशी अज्ञात नसली तथापि सुस्पष्ट व संग्राह्य आहे. त्या वेळच्या कारूनारूंच्या समाजाचें युद्धसामर्थ्य जिवंत असल्याचें या पोवाड्यांत निश्चयानें दिसतें. परस्परांच्या सहकार्याचा विलोभनीय आविष्कार दिसतो आणि अशा परंपरागत केवळ धार्मिक उत्सवांतहि परंपरेनें चालत आलेला स्थानिक कवित्वाचा कांहीं ऐतिहासिक ठेवा मिळण्याचा संभव ध्यानांत येतो.

(६) या सर्व गोष्टींचें प्रत्यंतर येण्यासाठीं वहींतील आतां तो पोवाडाच येथें देतों.

या वहीमध्यें कांहीं नव्या आरत्या वगैरे निःसंशय मिळतील; परंतु त्यांचा प्रपंच अगदीं वेगळा म्हणून वेगळ्या वेळीं केला पाहिजे.

पवाडा

धन्य वैजापुर पांढरी तल्क बाछ्याई। ज्या करणाराने कर्णी केली सवाई ॥ धृ ॥ मार्गशीर्ष मास लागला। की दखनामधे जाला गलबला। भोसल्या शहरावर्ती आला। निघाली स्वारी। गजबजली दूनीया अवघी सारी। खंडणीचे राऊत अले राव गांडापुरी ॥ तीस हजाराचा घडा टाकला भारी। गावांत मातला कलोळ लई गहजोरी। अकात वर्षला म्हणती गोष्ट नाही बरी। मोठा कहर वर्षला त्या गंगातीरी। तीन टोळ्या जाल्या परगणे गोष्ट नाहीं बरी। तळ नेमला काटे पिंपळगांवावरी। ते शीऊर पुलतांबे म्हणती सोन्याची चरी ॥ १ ॥ तीन मुकाम सीव नदीवर। अवघे मिळोनिया सरदार। करिती कुचाचा विच्यार। मनसोबा केला। नव हजार फौज घेऊन बाहेर चालला। कुल खेड्यापाड्यासी पळ सुटला। त्या सायगाव तीढीचे माथ्यावरती अला। देखिला गांव वैजापूर बाछाई किला। त्या वेळेस जासूद बातमीचा गेला। तुम्ही का भुलले माहाराज गांव मतवाला। तेथें मनांत गेली धैशत खतरा अला। ते पाई बोलले लाग नाहीं आपला। फिरून तळ जरूलावर नेमला। त्या गांव कसब्याची काय सांगू बटाई ॥ २ ॥ मार्गशीर्ष्य तीज बुधवार। तळ नेमला जरूळावर। गांव गजबजले वैजापूर धीर धरवेना जीवनाजी पंतअपाने धीरासा दीला। तो मोटा भाई मतवाला। मनसोबेवाला। रघूशेट होता बुधीवंत सागे चौघाला। बोलले रावजी भय नाहीं अपुल्याला। राहा 'येक चीते' मारू भोसल्याला। तो वैजनाथ पीरसाहेब रक्षणवाला। कुल अठरा ताफ्यावर गाजा केला। ते अपअपले मोरचे जागायला। मोरचे अटोपले अपले टाईच्या टाई। ते लहडणार लोक रजपूत कटे शीपाई ॥ ३ ॥ ऐसा करूनीया विच्यार। अवघे मीळोनी कारागीर। येकंदर लोहार सोनार। घडती गोळे कडाखा उठला। तोफाचे जाले बार ऐक गलबला। कांहीं जंबुरे गंडगुळे गणीत नाहीं त्याला। कांहीं बाणाचे जुडगे जुडगे आणी जजाला। तीथे काळुराम जमादार बोलाउन अणीला। खांलाकडील अलग सोपालीशे त्याला। नी वरलाकडील अलम संक्रा पाटला। अचळबा दारूवाला तेथें अला। जी लागेल ती दारू पुरविन तुम्हाला। भरचयौंशि कसबा साटवला। च्यार प्रहर रात्रीचा गस्ती छबीला फीरला। दसदारभीमधाट कृष्ण अवतरला। त्या पहाटच्या समयात बार सुटला। त्या भोसल्याच्या लस्करांत धाक पडला। झाली लगबग लाहि येकच घाई। कूल हत्यार टाकुन पळतो लोक शीपाई ॥ ४ ॥ ते हे तक वैजापूर। जुनी पांढरी जोरावर। करुनी गेला सकेतार। कीर्त जनात बोलती सर्वत्र। गांव यशवंत। दीवाण भोसले बसुन करीती खलबत। घेतले राज्य गडकीले मुलुक अगणीत। नाही पाहिले वैजापूर ऐक्या वक्त। ते वैजापूर आहे दीलीचे तत्क। पुनाजी देव बोलले त्या कसब्यात। म्हणे नाना दीलभर शब्द बोलले सत। अहे वैजापूर पवाडा मशहूर दखनात। लगबग लगबग लाहीया गाव कसब्याची सागू काय बढाई। झ्यांगड झ्यांगड वाजे नवबद मोगलाई ॥ धन्य ॥ ५ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

१२ संतपूजक पंत

(श्री. रा. चिं. ढेरे, पुणें)

पंतांची लोकप्रियता

परशुरामपंततात्यांपासून डॉ. नांदापूरकरांपर्यंत अनेक रसिक पंडितांनीं मोरोपंतांच्या कवितेवर विस्तारानें लिहून ठेवलें आहे. पंतांना त्यांच्या हयातींतच पुण्यापासून काशीपर्यंत अनेक रसिकांचें प्रेम लाभलें आणि हयातीनंतरच्या दीड शतकांतहि त्यांच्या कवितेवर लुब्ध होणारे अनेक रसिक होऊन गेले. हरिभक्तिपरायण पांगारकरांनीं शेकडों पोथ्या आणि कागदपत्रें धांडोळून पंतांचें भौतिक आणि साहित्यिक चरित्र रसाळपणानें मांडलें. त्यांच्या समग्र काव्याचें सटीप प्रकाशनही झालें आहे. त्यांच्या काव्याचा आस्वाद घेणारीं कांहीं मंडळेंहि स्थापन झालेलीं होतीं. अभ्यासकांच्या आणि रसिकांच्या प्रीतीला इतक्या मोठ्या प्रमाणांत पात्र झालेला हा कवि आज मात्र वादविषय बनला आहे.

मानसिक विश्रांतीसाठीं काव्याचा आस्वाद घ्यावा म्हणून आजचा नवा रसिक पंतांच्या काव्याकडे वळण्याची शक्यता नाहीं. त्या दृष्टीनें प्राचीन काव्यभांडारांतील कांहीं वाचायचें झालें, तर तो ज्ञानेश्वरी वाचील, तुकारामाची गाथा हातीं घेईल, नरेंद्राच्या रुक्मिणीस्वयंवराकडे वळेल अथवा मुक्तेश्वराची 'भारती कथा' श्रवण करील; परंतु पंतांच्या वाटेला वळणार नाहीं. अर्थात् या माझ्या विधानालाहि कांहीं मर्यादा आहे. पंतांची प्रदीर्घ आर्याबद्ध रचना आज दुर्गम वाटत असली, तरी त्यांचीं कांहीं छोटीं प्रकरणें अकृत्रिम भावसौंदर्यानें रंगलेलीं आहेत, याचें जाणत्यांना भान आहे.

संत, पंत, तंत

मोरोपंत हे प्राचीन मराठी कविमंडळांत पंतकवींच्या वर्गांत मोडणारे आहेत. संतकवि, पंतकवि आणि तंतकवि असें प्राचीन मराठी कवींचें त्रिविध वर्गीकरण केलें जातें. पैकीं तंतकवि अथवा शाहीर यांची प्रकृति आणि त्यांच्या काव्यप्रेरणा सर्वस्वीं वेगळ्या असल्यामुळें त्यांचा वर्ग संत-पंतांपासून बराच दूर नांदणारा आहे. संतकवींची प्रतिष्ठा पंतकवींहून खूपच अधिक आहे आणि ती पंतकवींनाहि मान्य आहे.

परमार्थ ही केवळ संतकाव्याचीच नव्हे तर बहुतेक प्राचीन मराठी काव्याची प्रधान प्रेरणा आहे. मुक्ति हा परमपुरुषार्थ असून, भक्ति हीच जीवनव्यापिनी साधना आहे, अशी या प्राचीन कवींची श्रद्धा आहे. आपली वाणी केवळ हरिगुणसंकीर्तनांतच रमावी, तिनें इतर बाष्कळ प्रापंचिक गोष्टींत रमूं नये, असें त्यांना प्रामाणिकपणें वाटतें. त्याचमुळें ज्ञानेश्वरांसारखा हाडाचा महाकवि गीतार्थचिंतनांतच रमतो आणि गीतार्थाचें

निमित्त करून साक्षात्काराचें दर्शन घडविण्यासाठींच आपली वाणी राबवतो. ' वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व । ' हें त्यांच्या कविप्रकृतीला मान्य आहे, परंतु ज्या रसिक कवित्वाला परतत्त्वाचा स्पर्श नाहीं, तें काव्य त्यांच्या आदराचा विषय होऊं शकत नाहीं. समर्थ रामदासांना भक्तिशून्य काव्य हें श्वानाच्या भुंकण्यासारखें वाटतें. प्रभूच्या प्रसादानें जें पुनीत झालें आहे, असें काव्यच त्यांना मान्य आहे.

संतकवींची अस्सल कविता

संतकवींची ही काव्यविषयक भूमिका उसनी नाहीं—त्यांच्यावर कोणीं लादलेली नाहीं, तर ती त्यांच्या जीवननिर्ष्ठेतून उमललेली आहे. त्यांचें काव्य भक्तिपर आहे, याचें कारण त्यांचें जीवन भक्तिमय होतें. ' अंतरींचें धावे स्वभावें बाहेरीं । ' या प्रक्रियेनें त्यांची भक्तिकविता निर्माण झालेली आहे. ज्यांचे श्वासोच्छ्वासहि प्रबंध बनून प्रगटत, त्यांच्या फुप्फुसांत केवळ भक्तीचाच प्राणवायु खेळत असल्यामुळें त्या प्रबंधांतहि भक्तिच अवतरली तर तें स्वाभाविकच आहे. त्याचमुळें संतकविता ही स्थूल दृष्टीला एक छापाची आणि त्याचमुळें काव्यदृष्ट्या शबलित वाटली, तरी संतकवींनीं आपल्या भावानुभवांशीं संपूर्ण इमान राखून लिहिलेली ही कविता अस्सल कविता आहे !

पंतकविता कला नव्हे-कारागिरी

पंतकवींच्या काव्याच्या बाबतींत मात्र असें म्हणतां यायचें नाहीं. पंतकवि हे संतांनीं पुरस्कारिलेल्या पारमार्थिक जीवनमूल्यांच्या प्रभावांतून सुटूं शकले नाहींत आणि परमार्थ हा जीवनधर्महि बनवूं शकले नाहींत. त्यामुळें बऱ्याच पंतकवींची अवस्था " अरत्र ना परत्र " अशी झाली आहे.

या पंतकवींतील महानुभावीय आद्यकवि मात्र आपल्या कविभूमिकेपासून चळले नाहींत. तेहि साधक आहेत. परंतु आपल्या उपास्याला—श्रीकृष्णाला—काव्याचा नायक बनविण्याव्यतिरिक्त त्यांनीं काव्यांत परमार्थ येऊं दिला नाहीं. विदग्ध संस्कृत कवीचा वारसा त्यांनीं शुद्ध स्वरूपांत स्वीकारला आणि ओवीसारख्या आर्ष छंदांत काव्यरचना केली. त्यामुळें त्यांचीं काव्यें संस्कृत आणि प्राकृत रसिकांना सारखींच प्रिय व्हावींत, अशीं बनलीं. पंतकवितेचें हें वळण पुढें टिकलें नाहीं. शिवकाळापासून बहरास आलेल्या पंतकवितेंत संस्कृत कवितेच्या ऱ्हासकालीन स्वरूपाचें अनुकरण होत राहिलें आणि कारागिरीलाच कला समजण्याइतकी काव्याभिरुचि ढासळत गेली.

मोरोपंतांची घडण

मोरोपंत हे महानुभावेतर मराठी पंतकवींचे सम्राट् समजले जातात. त्यांनीं वयाच्या पंचविशीपर्यंत केशव पाध्ये व गणेश पाध्ये यांसारख्या प्रकांड पंडितांच्या चरणांशीं बसून संस्कृतांतील अनेक ज्ञानशाखांचा सूक्ष्म अभ्यास केला होता. त्यांच्या संग्रहांतल्या आणि त्यांनीं स्वहस्तें नकललेल्या ग्रंथांची यादी पाहतां त्यांत संस्कृतांतील काव्यनाटकें आहेत'

साहित्यशास्त्रविषयक ग्रंथ आहेत, तत्त्वज्ञान आहे, वैद्यक आहे व ज्योतिषहि आहे. या काळांत त्यांनीं जसें रघुवंशासारखें सहजसुंदर महाकाव्य अभ्यासलें होतें, तसेंच राघव-पांडवीयासारख्या द्व्यर्थी काव्यांचीहि उकल केली होती.

हा विद्याध्ययनाचा काळ संपल्यावर सतत साडेतीन तपांएवढा काळ पंतांनीं काव्यसाधनेंत घालविला. " कांहीं तरावया गावें " या उद्दिष्टानेंच आपण काव्य रचतों आहोंत, अशी त्यांची श्रद्धा होती. पारमार्थिक मूल्यांविषयीं त्यांच्या मनांत अपार निष्ठा वसत होती आणि संतांविषयींचा पूज्यभाव त्यांच्या हृदयांत काठोकाठ भरलेला होता.

संतपूजक पंत

संतांचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यासाठीं पंतांनीं हजारावर आर्या रचलेल्या आहेत. आपलें मन प्रभूच्या चरणीं अष्टौप्रहर लीन होऊन राहावें, म्हणून त्यांनीं संतांना कळवळून विनवणी केली आहे—

हो सकृप पुंडरीका ! ज्ञानेशा ! पाव, नामदेवा ! हूं.
सांग तुकोबा ! प्रभुच्या चरणीं मन आठ याम दे वाहूं.

चोखामेळ्यासारख्या यातिहीन महारापासून कबीरासारख्या यवनापर्यंत सर्व संतांचा त्यांनीं मुक्त मनानें गौरव केला आहे.

मागें झाले, आतां असती, होणार जे पुढें काय,
त्या भागवतांचे म्यां भावें साष्टांग वंदिले पाय !

अशा शब्दांत त्यांनीं भूत–वर्तमान–भविष्यांतील संतांना प्रणिपात केला आहे. सन्मणिमालेंत त्यांनीं केवळ महाराष्ट्रांतीलच नव्हे, तर अखिल भारतांतील संतांचीं नांवें गुंफून त्यांच्या भक्तिजीवनाचीं व कवितेचीं वैशिष्ट्यें मार्मिकतेनें टिपलीं आहेत. या सन्मणिमालेवरून सूचित होणारा पंतांचा प्राकृत कवितेचा व्यासंग आजवर अनेक अभ्यासकांनीं—त्यांच्या काव्याचें सूक्ष्म अवलोकन करून—स्पष्ट करून दाखविला आहे. ' प्रभुभक्त प्रभुरूप स्पष्ट ' अशी त्यांची संतांविषयींची श्रद्धा आहे.

साधु, प्राणी पाहुनि संसारीं तापले, असुख पावे.
' व्हावें जग मुदित ' म्हणे, तद्दुखें आपले असु खपावे.

ही साधूंची वृत्ति पंतांना परिचित आहे. प्रणत जनांचें कार्य सिद्धीस नेण्यासाठीं साधु मरण पतकरतात, या साधूंच्या रीतीचा त्यांनीं अनेकवार गौरव गायिला आहे. साधुदर्शनाचा प्रभाव वर्णितांना ते संतांना उद्देशून म्हणतात—

हरितां दर्शनमात्रें सर्वांच्या पापतापदैन्यांतें.
भयद तुम्ही षडरीतें, रामशर जसे पलाश सैन्यातें.

संतांचें सामर्थ्य देवाधिक आहे, असें त्यांचें प्रामाणिक मत आहे. तापत्रयाचें

हरण करणारा सत्संग त्यांना सदैव हवाहवासा वाटतो. देव हा पित्यासारखा आहे, तर संत हे मातेसारखे आहेत, असें पंतांचें म्हणणें आहे—

मज दीना देवाहुनि अधिक तुम्ही संत सर्वथा धर्में ।
बाळा जेविं पित्याहुनि अधिका माताचि यावया शर्में ॥

मोरोपंत हे असे संतपूजक आहेत. संतांविषयींचा पूज्यभाव हा त्यांच्या बाबतींत केवळ उपचार नाहीं. त्यांची संतप्रीति प्रामाणिक आहे आणि आपलें जीवन संतांच्या संस्पर्शानें धवळून जावें, अशी त्यांची आंतरिक तळमळ आहे. त्यांच्या संतस्तुतिपर कवितेंत त्यांची मुमुक्षुता तीव्रपणें जाणवतें. असें असूनहि मोरोपंतांची कविता संतांच्या सर्वजनसुगम हृदयस्पर्शी कवितेच्या वळणावर न जातां इतकी पांडित्यजड कां बनावी ?

पंतांचें आचरण शुद्ध होतें. त्यांनीं आदर्श गृहस्थाश्रम आचरिला आणि जेवढें शक्य होइल तेवढें परमार्थपोषक वर्तन ठेवलें. त्यांच्या हृदयांत कुणाहिविषयीं द्वेषभाव नव्हता कीं मत्सर नव्हता. परमार्थसाधनेला अनुकूल अशी त्यांच्या मनाची भूमिका होती. तरीहि त्यांची कविता केवळ मूठभर व्युत्पन्न पंडितांना बुद्धिविलासासाठीं पढिक कीर्तनकारांना श्रोत्यांवर छाप पाडण्यासाठीं उपयोगी पडावी, ही वस्तुस्थिति पंतांच्या पारमार्थिक प्रकृतीला शोभणारी नाहीं.

पंतांच्या पारमार्थिकतेची मर्यादा

ज्याच्या ठायीं संतभूमिका बाणूं लागते, त्यांच्या सहजोद्गारांना लीलया काव्यात्मता लाभते—मग तो कवि असो, नसो. आपल्या पारमार्थिक अनुभवांचें, व्यथावेदनांचें व आनंदाचें व्यक्तीकरण करणें आणि दुरिताचें तिमिर दूर करण्यासाठीं तळमळून उपदेश करणें हे संतवाणीचे विशेष आहेत. आत्मपरीक्षण, आत्मशुद्धीकरण आणि आत्मसमर्पण हे संतांच्या जीवनाचे विशेष त्यांच्या वाणीलाहि आगळें सामर्थ्य प्रदान करतात. पंतांच्या कवितेच्या फार मोठ्या भागांत या विशेषाचा आढळ होत नाहीं. याचा अर्थ असा कीं, पंत मुमुक्षु असूनहि ‘ याचि देहीं याचि डोळां ’ परमप्राप्तीचा सोहळा अनुभवण्याइतकी त्यांच्या परमार्थसाधनेला गति लाभली नाहीं. ते दीर्घ काळ केवळ मुमुक्षुतेच्याच पायरीवर तिष्ठत राहिले आणि त्या पायरीवर असतांनाच त्यांच्यांतील पंडित त्यांच्यांतील कवीवर मात करून काव्यरचना करीत राहिला.

पण असाहि एक प्रश्न उपस्थित होतो कीं, पंतांच्या ठायीं, गुदमरलेल्या अवस्थेंत कां होईना, कवि नांदत होता काय ?

पंतांच्या प्रतिभेचे पहिले उन्मेष

पंतांच्या कवितेचे क्लिष्ट व दुर्बोध स्वरूप पाहून अलीकडच्या अनेक समीक्षकांनीं पंतांच्या कवित्वाविषयींच शंका उपस्थित केली आहे. त्यांच्या कवितेंतील आत्यंतिक

संस्कृतप्रचुरता, प्रदीर्घ समासांनीं युक्त अशा पंक्ति आणि प्रदीर्घ यमकांच्या हव्यासांतून होणारी शब्दांची मोडतोड यांमुळें त्यांची कविता आशयाच्या सहजप्रसवाला अवघडली आहे, असें या आधुनिक समीक्षकांना वाटतें आणि त्यांना तसें वाटणें स्वाभाविकहि आहे. परंतु त्यामुळें पंतांच्या अभिजात कवित्वशक्तीविषयीं शंका घेणें मात्र रास्त ठरणार नाहीं.

पंतांनीं आपल्या प्रतिभेच्या वेलीवर फुललेलीं काव्यपुष्पें घेऊन शारदेच्या मंदिरांत जेव्हां पहिलें पाऊल टाकलें, तेव्हां त्यांच्या प्रतिभेच्या त्या पहिल्या-वहिल्या बहरानें शारदेचें हृदय दरवळून गेलें. पंतांनीं नाइकांच्या मुलींसाठीं रचलेलीं तीन सतीगीतें हीं त्यांनीं रचलेलीं पहिलीं वहिलीं—काव्यें आहेत—सीतागीत, रुक्मिणीगीत आणि सावित्रीगीत. स्त्रियांच्या मुखीं असणाऱ्या अभंगसदृश ओवीछंदांत रचलेलीं, गीतविषय स्त्रीच आत्मनिवेदन करीत आहे अशा भूमिकेंतून गायिलेलीं आणि स्त्री-हृदयांतील सर्व भावसौंदर्य सहजसुभग शैलींत व्यक्त करणारीं हीं तीन प्रदीर्घ गीतें पंतांच्या ठायीं वसत असलेल्या जातिवंत कवीचें स्पष्ट दर्शन घडवितात. त्यांतील एकटें ' सीतागीत ' आपण वाचलें, तरी आपण पंतांच्या कवित्वशक्तीवर मुग्ध होऊन जाल.

वनवासाहून परतल्यानंतर सीता आपल्या जावांशीं म्हणजे पूर्वाश्रमींच्या बहिणींशीं गुजगोष्टी करीत बसली आहे. सीतेला त्या वनवासकथा विचारीत आहेत आणि त्यांनी आपल्या वनवासकथेचें धावतें निवेदन ती करीत आहे, अशी या काव्याची भूमिका आहे. इतिहासाचा विषय झालेली वेदना स्निग्धजनांच्या सान्निध्यांत सांगणें–या भूमिकेंतच मुळीं काव्यात्मता आहे. सीता बहिणींना सांगते आहे —

चित्रकूटाहूनी । पादुका घेऊनी ।
वियोग देऊनी । तुम्ही आलां ॥
आम्हीही तेथूनी । तशींच निघालों ।
वनांत रिघालों । तिघें जणें ॥
लक्ष्मण भावोजी । मागें, पुढें स्वामी ।
मज आहे धामीं । ऐसें वाटे ॥
न बाधेचि मज । उष्ण क्षुधा तृषा ।
तुम्हांपाशीं मृषा । न बोलावें ॥
जेव्हां कांहीं वाटे । चालता मी मागें ।
मुरडोनि मागें । विलोकिती ॥
बाई ! काय सांगों । स्वामींची ती दृष्टी ।
अमृताची वृष्टी । मज होय ॥

या अशा अमृतमय चित्रांची मालिकाच पंतांनीं उभी केली आहे. " मज आहे धामीं । ऐसें वाटे ॥ ' या पंक्तींत पंतांची अल्पाक्षररमणीय शैली प्रकर्षानें प्रकटली आहे.

राम-सीतेच्या प्रीतींतील संयत भावावेग प्रकट करतांना पंतांची प्रतिभा सीतेच्या हृदयाशीं संपूर्ण समरसता पावलेली दिसते. त्याशिवाय—

बाई ! काय सांगों । स्वामींची ती दृष्टी ।
अमृताची वृष्टी । मज होय ॥

यांसारखी शब्दावली प्रकटतीच ना ! रावणानें सीताहरण केल्यानंतर रामलक्ष्मण पर्णशाळेकडे येतात, तो प्रसंग सीतामुखानें वर्णितांना पंत म्हणतात—

दोघांच्या हृदयीं । धडधड करी ।
आले झडकरी । धावोनियां ॥
पर्णशाळेमध्यें । देखिले कावळे ॥
स्वामींचा मावळे । धैर्यसूर्य ॥

या वर्णनांतील प्रतीकात्मकता रामहृदयाला अंतर्बाह्य काळवंडून टाकणाऱ्या व्यथेची घनता किती समर्थपणें व्यक्त करते आहे ! पर्णशाळेंत वावरणारे कावळे अशुभ घटनेचें स्पष्ट सूचन करताहेत आणि तें सूचन जाणवतांच रामाचा धैर्यसूर्य मावळून सर्व अंतर्बाह्य विश्व अंधारून जात आहे.

नेऊनियां ठेवी । अशोकवनांत ।
न शोक मनांत । माये माझ्या ॥

यासारख्या ओव्यांत केवळ शब्दांची कसरत नाहीं, हें सहृदय वाचकांना सहज जाणवेल. रावणवधानंतरचें वृत्त सांगतांना—

शिबिकेंत मज । घालोनि आणिलें ।
देह म्यां न्हाणिलें । अग्निकुंडीं ॥

असा आपल्या अग्निदिव्याचा उल्लेख सीतेनें केला आहे. "देह म्यां न्हाणिलें । अग्निकुंडीं ॥" ही शब्दावली सीतेच्या सतीत्वाचें प्रखर तेज सहजपणें प्रत्ययास आणणारी आहे.

सीता अग्निदिव्यांतून उजळून निघाल्यानंतर रामानें तिचा मुक्त प्रीतीनें स्वीकार केला. त्या प्रसंगाविषयीं सीता म्हणते—

मांडीवरी मज । घेतलें स्वामींनीं ।
घनीं सौदामिनी । जनां वाटे ॥

या पंक्तींतील कल्पना नवी नसली, तरी प्रस्तुत काव्यांत ती ज्या पार्श्वभूमीवर आणि ज्या संदर्भात पंतांनीं योजली आहे, त्यामुळें ती अत्यंत आशयघन बनलेली आहे. या कल्पनेंत रामाचें केवळ सावळेपणच व्यक्त झालेलें नाहीं, तर त्यांत त्याच्या

प्रीतीची आर्द्रता आणि आवेग आहे आणि तेजस्विनी सीतेच्या सान्निध्यानें त्याच्या जीवनाला झळाळी लाभली आहे !

पंतांचीं हीं सतीगीतें अशीं हृदयंगम आहेत. त्यांनीं शब्दांच्या मितव्ययांतून आशयाचीं सहस्र वलयें निर्माण केलीं आहेत. या गीतांत शिवशक्तीप्रमाणें वागर्थाचें समरसीकरण झालें आहे. नवल असें कीं, पंतांची ही पहिली-वहिली रचना आहे. ज्यानें शारदेची पहिली पूजा इतक्या सरस-सुगंधी पुष्पांनीं केली, त्याच्या कवित्वाविषयींच शंका घेणें हा आपला करंटेपणा ठरेल. मोरोपंत कवि होते-त्यांच्या ठायीं अव्वल दर्जाची कवित्वशक्ति वास करीत होती, यांत संशय नाहीं. त्यांच्या प्रचंड काव्यसंभारांत ही इतकी सुंदर कविता अत्यल्प आहे, हें मात्र खरें. ज्याच्या ठायीं अव्वल दर्जाची कवित्वशक्ति वास करीत होती, त्यानें प्रचंड रचना करूनहि तींत अव्वल दर्जाची रचना अत्यल्प असावी, हें कसें ? हाच प्रश्न पंतांच्या काव्यजीवनांतील विपरीत स्थितीवर प्रकाश टाकणारा ठरेल.

पंडितांनीं कवींवर मात केली

आतांपर्यंत आपण पाहिलेंच आहे कीं, मोरोपंत हे जसे पारमार्थिक होते, तसेच हाडाचे कवि होते. असें असूनहि त्यांची कविता केवळ पंडितगम्य बनली. ही वस्तुस्थिति सरळ सरळ असें दाखविते कीं, मोरोपंतांनीं काव्यरचनेला प्रारंभ केल्यापासूनच त्यांच्याभोंवतीं संस्कृतविद्येंत रमलेल्या पंडितांचें कडें पडलें असावें. स्वतः पंतांनीं विद्यार्थिदशेंत अनेक शास्त्रांचें सूक्ष्म अध्ययन केलें होतें. हे पंडित मोरोपंत आपल्या पांडित्याला पांडित्याच्या कक्षेंत ठेवून विशुद्ध काव्यसाधनेंत मग्न होऊं लागतांच त्यांचे पंडित समानधर्मे त्यांच्याभोंवतीं गोळा होऊन त्यांच्या पांडित्याचा गौरव करून त्यांना सुखवूं लागले असावे. या विशिष्ट प्रवृत्तीच्या रसिकांच्या आग्रहाखातर पंतांनीं पंडितांना सुख देऊं शकेल, अशा रचनेला प्रारंभ केला असावा आणि तशा प्रकारच्या रचनेचें पंडित मंडळींत प्रचंड प्रमाणांत कौतुक होऊं लागल्यामुळें तशाच सरणीनें काव्यरचना करण्याचा छंद पंतांना जडला असावा.

विशिष्ट प्रमाणांत पारमार्थिक संस्कार झालेले असल्यामुळें पंतांनीं रामायण-महाभारत-भागवत यांसारख्या भक्तिमान्य विषयांवरच रचना केली असली, तरी त्या रचनेंत नरेंद्र-भास्कर-दामोदराची रससंपन्न विदग्धता जाणवत नाहीं आणि मुक्तेश्वराची भव्य आर्षताहि जाणवत नाहीं. ' जाणवत नाहीं ' हे शब्द मीं हेतुतः वापरले आहेत. कारण पंतांच्या कवितेंत हे सर्व गुण वसत असल्याचें अनेक पंडितांनीं आपल्या पांडित्यबळावर सिद्ध केलें आहे. कविता हा चर्चेचा विषय नसून, आस्वादनाचा विषय असल्यामुळेंच मी ' जाणवत नाहीं ' असें म्हटलें आहे.

संस्कृत काव्याच्या ऱ्हासकाळांत काव्यावरून काव्यशास्त्र बनण्याऐवजीं काव्य-

शास्त्रावरून काव्य बनूं लागलें होतें. कृत्रिम अलंकारांचें प्रस्थ वाढलें होतें. क्लिष्ट रचना आणि चित्रबंधरचना यांचें कौतुक सुरू झालें होतें. वांझ पांडित्य या काव्यांत आणि त्यांच्या बौद्धिक चर्चेत रंगत होतें. महाराष्ट्रांत प्राकृत कवितेचा तिरस्कार करणारा आणि संस्कृत विद्येचा अभिमानी असलेला जो पंडितांचा वर्ग होता, त्याला प्राकृत काव्यापेक्षां संस्कृत कविता श्रेष्ठ वाटे, ती त्याच्या या चमत्कृतीमुळें. या चमत्कृति प्राकृतांत-म्हणजे मराठींत करून दाखविणारा कवि त्यांच्या आदराला पात्र होई. पंत ज्यांच्या आहारीं गेले, ते त्यांच्या कवितेचे रसिक या पठडींतले होते आणि त्याचमुळें पंत आपल्यांतील कवीला हरवून बसले, असें मला वाटतें.

जीवनाच्या अखेरीस मात्र पंतांची मुमुक्षुता पुनः तीव्रतेनें उफाळून आली. मृत्यूपूर्वी सहा वर्षें ते काशीयात्रेला गेले असतां त्यांनीं ' गंगावकिली ' या काव्यांत गंगेला जी प्रार्थना केली आहे, तींत केवळ आपलाच नव्हे, तर आपल्या संबंधांतील सर्वांचाच उद्धार करण्याची विनवणी केली आहे. ' श्लोककेकावली ' हें त्यांचें अमर भक्तिकाव्य काशीयात्रेहून परत आल्यावर त्यांनीं रचलेलें आहे. या काव्यांत पंतांचें भक्तहृदय कवीच्या साहाय्यानें उत्कटपणें व्यक्त झालें आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. प्रारंभींच्या सतीगीतानंतर पंतांच्या ठायीं दबून राहिलेला कवि सहजतेनें व्यक्त झालेला दिसतो, तो याच काव्यांत. या काव्याच्या रचनेनंतर पंतांना रामाचा साक्षात्कार झाला, असें म्हणतात. यानंतर लवकरच वयाच्या पासष्टाव्या वर्षी शके १७१६ तील हनुमज्जयंतीच्या दिवशीं पंतांनीं अत्यंत समाधानानें श्रीरामचरणीं देह ठेवला. त्यांच्या प्रचंड काव्यसंभाराच्या वाङ्मयगुणांबद्दल कितीहि वाद होत राहिले, तरी प्रारंभींचीं सतीगीतें आणि अखेरची ' श्लोककेकावली ' यांमुळें त्यांना मराठी साहित्यांत चिरंतनता प्राप्त झाली आहे, हें निःसंशय. त्यांच्या समकालीन असलेल्या एका रसिकाच्या शब्दांत सांगायचें तर—

ऐकुनि विश्व सुखावें ज्या केकांचा अपूर्व तो टाहो।
त्याला ईशकृपेनें आयुष्याचा कधीं न तोटा हो ॥

---

१३. चिदंबर-शिष्य राजारामाची ग्रंथसंपदा

(श्री. म. वि. निखळ, पुणें.)

गुर्लहोसूर येथील विख्यात सिद्धपुरुष श्रीचिदंबर दीक्षित यांचा पट्टशिष्य राजाराम (श. १६९०–१७६५) याच्या चरित्राचा आणि ग्रंथरचनेचा स्थूल परिचय श्री. ज. र. आजगांवकर आणि डॉ. पंडित आवळीकर यांनीं करून दिलेला असला, तरी कर्नाटकांत चिदंबर संप्रदायाचा विस्तार करण्याचें आणि अक्षरशः सागरासारखी प्रचंड ग्रंथरचना करण्याचें त्यानें केलेलें कार्य पुष्कळसें अलक्षितच राहिलें आहे.

राजारामानें प्रचंड अभंगरचना केली असून, अनेक स्फुट ग्रंथहि रचले आहेत. सुमारें दीड लाख अभंग (१,५१,४९१) आणि ' निजात्मबोध ', ' ब्रह्मानंदलहरी', 'महानुभाव', ' ज्ञानगर्भ ', 'ब्रह्मानुभव', 'सद्गुरूपदेश ', 'गुरुगम्य ठेव', ' अद्वैतसार ' इ लघुग्रंथ एवढा त्याच्या ग्रंथांचा व्याप आहे. त्याचे लघुग्रंथ बेळगांवच्या रामतत्त्वप्रकाशनें प्रकाशित केले आहेत, असें श्री. आजगांवकरांनीं लिहून ठेवलें आहे. परंतु मला फक्त ' निजात्मबोध ' आणि ' अद्वैतसार ' हे दोनच ग्रंथ मुद्रित स्वरूपांत पाहावयास मिळाले. अभंगांपैकीं चिदंबरवरप्रसादाचे म्हणून ५२७ अभंग ' चिदंबरवरप्रसाद अभंगगाथा ' या नांवानें रामतत्त्वप्रकाशनेंच प्रसिद्ध केले आहेत.

मला अलीकडेच नारायणगांव (ता. जुन्नर, जि. पुणें) येथें श्री. नारायण गोपाळ वाकनीस यांनीं जुन्या हस्तलिखितावरून नकललेले राजारामाचे चार लघुग्रंथ उपलब्ध झाले आहेत. ' अद्वैतसार ', ' ब्रह्मानुभव ', ' सद्गुरूपदेश ' आणि ' गुरुगम्य ठेवा ', हे ते चार ग्रंथ होत. हे चारहि ग्रंथ कदाचित् पूर्वप्रकाशित असतीलहि, परंतु ते हस्तलिखितांइतकेच दुष्प्राप्य असल्यामुळें माझ्या हातीं असलेल्या हस्तलिखितांवरून त्यांचा स्थूल परिचय करून देत आहें.

या चार ग्रंथांपैकीं ' अद्वैतसार ' हा ग्रंथ ' चिदंबर-अद्वैत पंचरत्न ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पांच ग्रंथांपैकीं पांचवा आहे. ' अद्वैतसारा 'च्या नकलेनंतर या ग्रंथपंचकाचा उल्लेख असा आहे—

निजात्मबोध, चिदंबरसहस्रनाम पूर्ण । **करुणासागर, अमृतानंद** गहन ।
अद्वैतसार पंचग्रंथ पंचरत्न । वदवी पूर्ण चिदंबर ॥

या हस्तलिखिताचे लेखक श्री. ना. गो. वाकनीस यांचें वास्तव्य नारायणगांवच्या बालाजी मठांत होतें. हे गृहस्थ कथा-प्रवचनें करीत असत. ते सुमारें पंधरावीस वर्षांपूर्वी वारले. त्यांना मागें कोणीच नसल्यामुळें नारायणगांवचा बालाजी मठ आणि त्याचा चिदंबर

संप्रदायाशीं असलेला संबंध याविषयीं निश्चयानें कांहींच सांगतां येत नाहीं. या चार ग्रंथांचें स्थूल स्वरूप पुढीलप्रमाणें—

(१) **अद्वैतसार** :—(१५२ ओव्या) या ग्रंथाचें मूळ हस्तलिखित श. १७६१ विकारी संवत्सर आषाढ शु. ७ गुरुवारीं लिहिलेलें असून, त्यावरून श्री. ना. गो. वाकनीस यांनीं श. १८५३ प्रजापति संवत्सर आषाढ वद्य ११, सोमवारीं नारायणगांवीं नकल केलेली आहे. या ग्रंथांत राजारामानें अद्वैत वेदान्त सोप्या व ओघवत्या वाणीनें नित्य व्यवहारांतील दृष्टान्तांच्या साहाय्यानें समजावून देण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व चराचरामध्यें एकच ईश्वर व्यापून राहिला आहे आणि त्याची प्रचीति सद्‌गुरुकृपेनेंच घडते, असें म्हटलें आहे. पहिल्या ५० ओव्यांमध्यें 'अद्वैत म्हणजे काय ?' याविषयीं स्थूल विचार मांडलेला आहे. ते म्हणतात —

जे वस्तु आदि–मध्य–अंतरहित । तयासिच नाम अद्वैत ।
स्वसंवेद्य अखंडित । पारावाररहित अक्षयी ॥

ऐसा अनंत अपार सर्वेश्वर । सर्वां ठाईं एक ईश्वर ।
व्यापियेलें चराचर । अद्वैत चिदंबर दुजें नाहीं ॥

अधिक स्पष्टीकरण करतांना 'घटांमाजी गगन', 'तंतुपट', 'सोन्याचे भिन्न दागिने पण मुळांत सोनें एकच' असे परिचित दृष्टान्त दिले आहेत. अद्वैत अनुभव सद्‌गुरुकृपेनें लाभतो, असें वेळोवेळीं म्हटलें आहे.

जेथें नसे ध्येय ध्याता ध्यान । नुरेचि ज्ञाता ज्ञेय ज्ञान ।
असे स्वतःसिद्ध स्वयंभू आपण । अनुभव खूण सद्‌गुरुकृपें ॥ ४७ ॥

जे चहूं वेदांसि, वाचेसि अगोचर । तें ब्रह्म सद्‌गुरुकृपें होतसें गोचर ।
निजबोधें निववती अंतर । ब्रह्म साक्षात्कार करूनि देती ॥ ७० ॥

विश्वामाजीं विश्वंभर । सर्वांठायीं निरंतर ।
एकरूप चिदंबर । होतसे गोचर सद्‌गुरुकृपें ॥ १३८ ॥

'अद्वैत' अनुभव आगळाच आहे; त्याचें वर्णन करणें अशक्य. मुक्यानें साखर खाल्ली असतां त्याची गोडी सांगणें जसें कठीण, तद्वत् हा अनुभव असतो. सद्‌गुरुकृपेनें सारें प्राप्त होतें, असें राजारामानें म्हटलें आहे.

(२) **ब्रह्मानुभव** :—(ओव्या ६७) सद्‌गुरुकृपेनें राजारामाला 'ब्रह्मानुभव' घडला. हा 'ब्रह्मानुभव' अथवा 'ब्रह्मसुख' केवळ गुरुकृपेनेंच लाभूं शकतें, असें या ग्रंथांत म्हटलें आहे.

तुझिया कृपेविण कांहीं । ब्रह्मसुख कल्पांतीं नाहीं ।
हें निश्चय करूनियां पाही । मज हृदयीं कवळिलें त्वां ॥ ३ ॥

'आपणांसारिखे करिती तत्काळ' या उक्तीप्रमाणें चिदंबरांना शरण जातांच आपणांस त्यांनीं ब्रह्मानुभव घडविला, असें राजारामानें या ग्रंथांत म्हटलें आहे. स्वस्वरूपाचें यथार्थ ज्ञान म्हणजेच 'ब्रह्मानुभव'. एकच आत्मा सर्वव्यापी असून त्याचा साक्षात्कार स्वानुभवानें घडणें हा 'आत्मसाक्षात्कार'.

एकचि आत्मा देह्यदेहीं। देहीं असोनि विदेही।
ब्रह्मानुभवी जाणती ॥ १९ ॥

परन्तु हा 'ब्रह्मानंद' सद्गुरूच्या कृपेनेंच लाभूं शकतो—

अनुभव सद्गुरूच्या कृपेंकरून। कळों येतसे जातां शरण।
ब्रह्मानंद अंतरीं जाण। कळतसे खूण स्वरूपाची ॥ २० ॥

हें कथन करतांना राजारामानें भक्तजनांना निक्षून सांगितलें आहे कीं—

हे बोल नव्हति माझ्या पदरिचें। स्वयें चिदंबर सांगे वाचे।
साक्ष चरण आहे त्याचे। होय भाविकाचें काज येथें ॥ ४३ ॥

शेवटीं जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटका करून घेऊन नरदेहाचें सार्थक करण्यासाठीं सद्गुरूला शरण जाण्यास सांगितलें आहे.

(३) **सद्गुरूपदेश** :—५३ ओव्यांचा हा लघुग्रंथ आहे. याची नकल श. १८५५ श्रीमुख संवत्सर कार्तिक शु. १ या दिवशीं केली आहे.

आत्मज्ञानाची तळमळ अंतःकरणांत होती; त्यासाठीं जप, तप, तीर्थाटनें केलीं; उपासतापास केले; परन्तु समाधान लाभलें नाहीं. शेवटीं सद्गुरूच्या अनुग्रहामुळें 'निजसुख'-प्राप्ति झाली, असें स्वानुभवानें राजारामानें म्हटलें आहे.

सद्गुरूंनीं कृपाहस्तक मस्तकीं ठेविला; संमुख बसवून अनुग्रह करून त्रिवार उपदेश केला; त्यामुळें 'ज्ञानदृष्टि' प्राप्त झाली, आत्मसाक्षात्कार घडला. राजारामाला गुरुकृपेव्यतिरिक्त अन्य साधनांची व्यर्थता स्वानुभवानें पटल्यामुळें त्यानें भक्तभाविकांना विनविलें आहे कीं, ब्रह्मसुखास्तव अथवा आत्मसाक्षात्कारासाठीं प्रपंच सोडून वनांत जाण्याचें कारण नाहीं; योगसाधनेची आवश्यकता नाहीं; स्वतःच्या हृदयांत त्याचें निवासस्थान आहे. त्याची प्रचीति श्रीगुरुकृपेनेंच मिळवा.

न लागे जाणे गिरिकंदरा। नका कोंडूं ब्रह्मांडीं वारा।
सर्वसुखांचिया निजघरां। हृदयमंदिरीं आत्माराम ॥ १४ ॥

हृदयस्थ आत्माराम निरंतर। सबाह्य भरला चिदंबर
ज्ञानदृष्टि दिसे गोचर। अनुभव साक्षात्कार या नांव ॥ १५ ॥

सर्वत्र 'ब्रह्म' स्वरूप पाहणें हेंच सर्व श्रुतिशास्त्राचें मर्म आहे, असें सांगून तो म्हणतो—

समब्रह्म पाहे सदोदित । त्यासीच वर्णिती गीता भागवत ।
न लगे पाहणें नानाग्रंथ । मुख्य वेदांत अर्थ इतुकाचि ॥ २९ ॥

सद्गुरुकृपाबोध झाल्यावर जीवशिवाचें ऐक्य होतें, स्वानंदसुखाची प्राप्ति होते. श्रद्धेनें, निष्ठेनें सद्गुरुकृपेचा लाभ घ्यावा, असा त्याचा अखेरचा सांगावा आहे.

(४) **गुरुगम्य ठेवा** :—३७ ओव्यांचें हें छोटें प्रकरण ' निजगुज ' जाणण्यासाठीं व प्राप्तीसाठीं मार्गदर्शक म्हणून उपयोगी पडेल. मोक्षप्राप्तीसाठीं नाना तऱ्हेचीं साधनें असलीं, तरी श्रीसद्गुरुकृपेवांचून तीं व्यर्थ आहेत, हाच विचार मागील प्रकरणांत सांगितला आहे.

सर्व साधनें वायांचि पाही । ब्रह्मप्राप्तीवीण मोक्ष नाहीं ॥ ३ ॥
नाना प्रकारें देह दिसती । आत्मा सारिखा सर्वांभूतीं ॥
सजीवनिर्जीव वस्तुमात्रीं । आत्मा एक असे ॥ १२ ॥

परंतु हें सारें गुरुकृपेनें घडतें; गुरूपदेशानें अंतःकर्ण निवांत होतें; स्वस्वरूपबोध होतो.

निवांत झालिया अंतःकर्ण । प्राप्तीलागीं नुरे वेगळेंपण ।
वस्तु अंगेंचि असे आपण । गुरुकृपें खूण कळों येति ॥ ३२ ॥

थोडक्यांत सांगावयाचें झालें तर या चारहि प्रकरणांत राजारामानें गुरुकृपेची महती मुक्तकंठानें गायिली असून, गुरुकृपेनें प्राप्त होणाऱ्या अद्वैतानुभवाचें अनिर्वचनीयत्व विवरिलें आहे.

राजारामाची रचना उदंड असून ती प्रासादिक आहे. ओघवत्या व प्रसन्न भाषाशैलीमुळें वेदान्ताचीं गहन तत्त्वें सहजसुलभ झालीं आहेत. शब्दांमागें अनुभवाची बैठक असल्यामुळें वाचकांच्या मनावर खोलवर ठसा उमटविण्याची शक्ति त्यांत निहित आहे. एवढी विपुल व प्रासादिक रचना करणाऱ्या या ग्रंथकाराचें महत्त्व मराठी साहित्याच्या इतिहासांत रुजूं व्हावयास हवें आणि त्यासाठीं त्याचे ग्रंथ अभ्यासकांना सहज उपलब्ध व्हावयास हवेत, अशी अपेक्षा करणें अनुचित ठरणार नाहीं.

[या राजारामाचे सध्याचे वंशज श्री. प्रल्हादबुवा परदेशी हे मु. बाभुळगांव, पो. बाबतर, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद येथें राहातात. हें गांव गोदावरीच्या डाव्या तीरावर वसलें आहे. तेथें जाण्यास सर्वांत सोपा मार्ग पुणतांब्याहून आहे. पण तो पावसाळ्यांत बंद असतो. तेथें एका हडप्यांत राजारामाची रचना असलेल्या १०८ वह्या ठेवलेल्या आहेत. तेथेंहि याची अभंगरचना १५१४९१ एवढीच सांगितली आहे. मात्र विठाबाई राजारामाची शिष्या असा तेथें समज असून तिनें ४७ हजार रचना केली अशी कल्पना आहे. मी टिपण केलें त्यांत

शके सत्राशें चौतीस । नाम जाणा आंगिरस ॥
कृष्ण पक्ष पौष मासी । वद्य असे त्रयोदशी ॥
जागा जाणा गुर्लहोसूर । मलप्रभा नदीतीर ॥

असा अभंगांश आहे. हा बहुधा राजारामास गुरुप्रसाद झाल्याचा काळ असावा. त्याची संपूर्ण रचना सोपी, गंगाप्रवाहाप्रमाणें संथगतीनें जाणारी व भावोत्कट अशी आहे. —ग. ह. खरे]

---

१४. शिखर-शिंगणापूर व शिवछत्रपतींचे पूर्वज

(श्री. ग. ह. खरे, पुणें.)

शिवाजी महाराजांच्या रजपूतत्वाविषयीं अनेकदा अनेक लोक मला विचारतात. माझी सध्या अशी समजूत आहे कीं, शिवाजी महाराज शुद्ध महाराष्ट्रभूचें सुमधुर व बलवर्धक फळ आहे. त्यांचा रजपुतांशीं संबंध प्रस्थापित करणें कृत्रिम आहे. ही समजूत पुराव्यानें सिद्ध होऊं शकते कीं नाहीं हें पाहण्यासाठीं पुरावा शोधीत आहे. या शोधांत शाही किंवा साहित्य किंवा संगीत मकरंदाची पुष्पिका पाहण्याचा योग आला व त्यांतून या लेखाची प्रवृत्ति झाली आहे. या लेखांत दोन विषयांचें विवरण आहे. पैकीं पहिला विषय असा :—

१

श्रीरामदासांची कविता, प्रथम खंड, प्रकाशक सत्कार्योत्तेजक सभा धुळें, या पुस्तकाच्या ३०६ व्या पृष्ठावर

सोरठीचा देव माणदेसा आला । भक्तीसी पावला सावकास ॥ १ ॥
सावकास जाती देवाचे यात्रेसी । होती पुण्यरासी भक्तीभावें ॥ २ ॥
भक्तीभावें देव संतुष्ट करावा । संसार तरावा दास म्हणे ॥ ३ ॥

असें ३२१ वें कवन आलें आहे. हें स्फुट ओव्या या प्रकरणांत संपादकांनीं समाविष्ट केलें आहे. याचा अर्थ या कवनाचा मागच्या पुढच्या कवनांशीं कांहींहि संबंध नाहीं. यांतील पहिल्या ओळींत आलेल्या ‘ सोरठीचा देव ’ व ‘ माणदेसा ’ या शब्दांवर या पुस्तकाच्या संपादकांनीं अनुक्रमें ‘ सोरटी सोमनाथ ’ ‘पंढरपुरास’ अशा पादटीपा दिल्या आहेत. पण ह्या टीपांपैकीं सोरठीचा देव यावरील टीप अचूक असून माणदेसा यावरील ‘ पंढरपुरास ’ ही टीप चुकली आहे. ‘ माणदेसा ’ या शब्दामध्यें शिखर-शिंगणापूर हें स्थान किंवा शंभू महादेव हा तेथील देव अभिप्रेत आहे अशा प्रकारचें अनुमान महामहोपाध्याय द. वा. पोतदार यांनीं आपल्या ‘सोरटी सोमनाथ आणि शिखर शिंगणापूर’

या लेखांत (प्रसिद्धिस्थल भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक वर्ष ३६ पृष्ठ ४९, प्रकाशनकाल श. १८७८ = इ. १९५६) केलें आहे.

सोरठीचा देव या शब्दसमूहाचे दोन अर्थ होऊं शकतील : (१) कवनाच्या संपादकांनीं सुचविलेला सोरटी सोमनाथ आणि (२) द्वारकेचा द्वारकाधीश; दोन्ही देवस्थानें मुसलमानपूर्वकालीन आहेत याविषयीं शंका नाहीं. शैवांना ज्याप्रमाणें सौराष्ट्रांतील सोमनाथ हें ज्योतिर्लिंग अतिशय पवित्र व प्रिय वाटत होतें व वाटतें, त्याप्रमाणें वैष्णवांना द्वारकाधीश हें देवस्थानहि पवित्र व प्रिय वाटत होतें व वाटतें. पंढरपूरच्या विठ्ठलाचें दर्शन घेणारे वैष्णव द्वारकेस जात असें दाखवितां येते. उदा. श. १४२७ च्या सुमारास होऊन गेलेला चांगा मुधेश नांवाचा एक संतकवि विठ्ठलाची यात्रा करी व तो द्वारकेला गेला होता, असें त्याच्या चरित्रांत सांगितलें आहे. महान् बंगाली वैष्णव संत चैतन्य हाहि द्वारकाधीशाची यात्रा करून पंढरपुरास आला होता, असें समजतें. तेव्हां विठ्ठल आणि द्वारकाधीश यांचा उगा–अधिक संबंध जुने लोक लावीत याविषयीं शंका नाहीं. कवनाच्या संपादकांनीं त्या दोन टीपा दिल्या नसत्या तर वाचकांच्या मनांत सौराष्ट्रांतील सोमनाथ व द्वारकाधीश हीं दोन्ही देवस्थानें येण्याचा संभव होता आणि ज्यानें त्यानें आपल्या मनाप्रमाणें त्याचा निर्णय केला असता व या कवनांत कोणताहि एक देव अभिप्रेत आहे असें धरतां आलें असतें. पण संपादकांच्या दोन टीपांमुळें वाचकांच्या मनांत येथें कोणता देव अभिप्रेत आहे याविषयीं गोंधळ उत्पन्न होतो. शिखर-शिंगणापूर व पंढरपूर हीं दोन्ही स्थानें माण देशांत पूर्वींपासून मोडत असल्यानें या गोंधळांत अधिक भर पडते. म. म. पोतदारांनीं या कवनांत एका बाजूस सोमनाथ व दुसऱ्या बाजूस शिखर शिंगणापूर अभिप्रेत आहेत असें अनुमान केलें आहे. हें अनुमान जितकें बलवत्तर तितकेंच बलवत्तर एका बाजूस द्वारकाधीश आणि दुसऱ्या बाजूस पंढरपूर हें अनुमान होऊं शकेल. हें कवन स्फुट प्रकरणांत असल्यामुळें यास मागील पुढील संदर्भ मुळींच नाहीं. यामुळें संदर्भावरून अर्थनिश्चिति करण्यासारखें गमक येथें नाहीं. याच ग्रंथाच्या २१२ व्या पृष्ठावरील १३ व्या कवनांत अनेक देवांचे निर्देश आल्यामुळें त्या कवनाचा येथें अर्थनिश्चितीकरतां उपयोग होण्यासारखा नाहीं. यामुळें केवळ याच कवनाचा विचार करावयाचा तर वर दिलेलीं दोन्ही अनुमानें येथें तुल्यबल आहेत असें वाटतें.

तथापि, या कवनांतील देवतेची निश्चिति करण्यास अत्यंत उपयुक्त ठरणारा असा एक पुरावा भा. इ. सं. मंडळ त्रैमासिकाच्या १० व्या वर्षाच्या तिसऱ्या अंकांत (प्रकाशनकाल श. १८५१) प्रसिद्ध झाला आहे त्याकडे म. म. पोतदार यांचें लक्ष गेलें नाहीं असें दिसतें. नाहीं तर, हा लेख लिहिण्याची अर्धी आवश्यकता उत्पन्न झाली नसती. वरील अंकांत श. १५७२ किंवा त्यापूर्वीं वेद नांवाच्या मनुष्यानें साहित्य-मकरंद किंवा शाही-मकरंद अथवा संगीत-मकरंद या नांवाचा ग्रंथ रचला असून त्याच्या पुष्पिकेंत तीन श्लोक घातले आहेत ते असे—

सौराष्ट्रदेशात् समुपागतोसौ श्रीसोमनाथः प्रमथाधिनाथः ॥
अधित्यकां वीक्ष्य गिरेर्विशालां चकार वासं किल चंद्रचूडः ॥ १ ॥
सुशीलभक्तस्य च भक्तितुष्टः तत्राधिवासस्य महादयालुः
न तत्र नीरं न तरुप्रचारः न कोऽपि लोके वसतिं करोति ॥ २ ॥
तत्रापि शंभुर्निजभक्तलोभात् कैलासवासं मनुते महेशः ॥
तस्मिन् स्थले सूर्यकुलावतंसो मालोजिनामा कृतवान् तटाकम् ॥ ३ ॥

या तीन श्लोकांपैकीं पहिल्या श्लोकांत सोमनाथ सौराष्ट्र देशांतून निघाला आणि महादेवाच्या डोंगरावरील विशाल अशी अधित्यका (राजव्यवहारकोशांत अधित्यका = बालेकिल्ला असा अर्थ) किंवा डोंगरमाथा पाहून तेथें वसती करून राहिला; आणि पाणी, झाडें, वसती नसतां मालोजीनें तेथें एक तळें बांधून पाणी, झाडें इत्यादींची व्यवस्था केली, असें सांगितलें आहे.

२

या साहित्यमकरंद किंवा शाहीमकरंद अगर संगीतमकरंद या ग्रंथांतील पुष्पिकेंत आलेल्या आणखी एका माहितीकडे वाचकांचें लक्ष मला वेधावयाचें आहे. हीमध्यें शिवाजीचें भोसले कुल हें सूर्यवंशी आहे असें सांगून त्याची वंशावळ दिली आहे. या भोसले कुलाची बाबाजीपासून पुढील वंशावळ आपणांस परिचित आहे; पण या पुष्पिकेंत बाबाजीचा पिता परसोजी व परसोजीचा पिता खेलोजी अशा बाबाजीच्या पूर्वीच्या दोन पिढ्यांचीं नांवें दिलीं आहेत.

आतां शिवचरित्रप्रदीप (सं. आपटे व दिवेकर; प्रकाशनकाल श. १८४७) या पुस्तकांत व्यंकटभट्ट या नांवाच्या मनुष्यानें रचिलेलें भोसलवंशावली नांवाचें एक प्रकरण दिलें आहे. त्यांत त्याचा रचनाकाल दिला नसला, तरी शहाजीचा मुलगा एकोजी, त्याचे मुलगे शहाजी, शरभोजी व तुळजाजी येथपर्यंतची वंशावळ दिली असल्यामुळें हा ग्रंथ तुळजाजीचा श. १६५७ (स. १७३५) मध्यें मृत्यू होण्यापूर्वी रचिला गेला याविषयीं शंका नाहीं. या प्रकरणांत मालोजीचा बाप बाबाजी, त्याचा पिता परसोजी व परसोजीचा पिता एकोजी अशी माहिती दिली आहे. यावरून एक गोष्ट कबूल करावयाला हरकत नाहीं व ती ही कीं, बाबाजीच्या पित्याचें नांव परसोजी होतें हें दोन्ही ग्रंथकारांना मान्य होतें; पण परसोजीच्या वडिलांचें नांव सांगतांना एकानें खेलोजी सांगितलें तर दुसऱ्यानें एकोजी सांगितलें आहे; याचा अर्थ असा कीं, जवळ जवळ शिवाजीसमकालीन दोन लेखकांना भोसले कुळांतील बाबाजीपलीकडील केवळ दोन पिढ्यांचीं नांवें माहीत होती. त्यांपैकीं बाबाजीच्या पितृनामाविषयीं दोघांची एकवाक्यता तर पितामह नामाविषयीं मतभिन्नता आहे.

भोसले कुलाचा उदेपूरच्या शिसोदें घराण्याशीं संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सभासदीपासून प्रायः सर्व बखरींनीं केला आहे. त्या सर्वांना मूळ आधार बहुतांशीं गागाभट्टानें केलेला निर्णय आहे. तो मला अजून पहावयास सापडलेला नाहीं.

बाबाजीच्या पूर्वींच्या पिढ्यांच्या वंशावळी कै. चिं. वि. वैद्य आपल्या शिवचरित्र-निबंधावलीतील लेखांत देतात; त्यांतील पिढ्यांची संख्या व तद्दर्शक मूळ साधनांचा काळ यांमध्यें इतकी भिन्नता आहे कीं, त्यांचा तौलनिक अभ्यास केला असतां त्या सर्वच वंशावळी अविश्वास्य वाटतात. शिवाय नेहमींचा अनुभवहि आहे कीं, या वंशावळी समकालीन लेखांच्या कसोटीवर घासून पाहिल्या तर त्या अचूक ठरत नाहींत. आणि या वंशावळीशीं समकालीन व तद्विषयक एकहि चिठोरें अद्याप मिळालेलें नाहीं. मुधोळचें घोरपडे घराणें व त्यांचीं भाऊबंद घराणीं आणि प्रस्तुत भोसले घराणें हीं मूलतः एकच अशी समजूत आहे. ‘ मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास ’ या पुस्तकांत ह्या घोरपडे घराण्यासंबंधीं कांहीं कागद प्रकाशित झाले आहेत. कागद बनावट असल्याबद्दल कै. डॉ. सालतूर यांनीं एक लेख लिहिला होता. त्यांनीं दिलेल्या कारणां-वरून ते बनावट ठरूं शकत नाहींत असें मी दाखविलें आहे. पण इतर अनेक कारणां-वरून ते बनावट आहेत अशी माझी खात्री झाली आहे. शिवाय ते कागद भोसले वंशावळीचा प्रामाणिकपणा ठरविण्यास उपयोगी पडणारे नाहींत.

जयराम पिंडये व परमानंद नेवासकर या दोघांना शहाजी व शिवाजी यांच्या चरित्राची चांगली माहिती होती. पण त्यांच्या पूर्वजांविषयीं ते केवळ मालोजीपासून खात्रीलायक माहिती देतात. पिंडयानें आपल्या राधामाधवविलासचंपूंत महीच्या महेंद्रामधें मुख्य राणा । बलीपास त्याचे कुळीं जन्म जाणा ॥ तयाचे कुळीं माल भूपाल झाला ’ असें अधिक सांगितलें आहे (पृ. २६७). याचा अर्थ असा कीं, राणा कुळांत बलीप जन्मला व त्याच्या कुळांत मालोजी जन्मला. राणा म्हणजे उदेपूराचा कोणी राणा व बलीप म्हणजे दिलीप असा अर्थ करून कै. वैद्य यांनीं भोसले घराण्याचा उदेपुराशीं संबंध जोडला आहे. येथें एक लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, राणा हा शब्द जुन्या मराठी लेखांत पुष्कळ ठिकाणीं आला आहे. उ. वेळापूर व राणे बेन्नूर लेख पहावे.[1] तेव्हां राणा या शब्दाचा उदेपुराशींच संबंध लावला पाहिजे असें नाहीं. शिवाय बलीप शब्दाचे दिलीप असें रूप करणें योग्य नव्हे व केलें तरी हा कोण याचा नीट पत्ता लावलेला नाहीं. यामुळे या उल्लेखानें कांहींच सिद्ध होऊं शकत नाहीं. परमानंदानें मालोजी-पासूनच वंशवर्णन सुरू केलें आहे. संभाजी व राजाराम यांच्या दानपत्रांतही मालोजी-पासूनचीच माहिती आली आहे. तात्पर्य, शिवकालीन लेखकांना शिवाजीचा पणजा बाबाजी याच्या पलीकडच्या पिढ्यांविषयीं विशेष व अचूक माहिती सांगतां येत नाहीं. तरीही भोसले शिसोदेकुळांतील आहेत अशी तत्कालीन व पश्चात्कालीन लेखकांची समजूत होती असें दिसतें. ही समजूत केव्हांपासून प्रचारांत आली हें आज नीट समजत नाहीं. कारण या समजुनीचा उच्चार करणारे शिवकालीन ग्रंथकार कालदृष्ट्या एकमेकांच्या फारसे आगेमागें नाहींत.

[1] श्री. शं. गो. तुळपुळे – प्राचीन मराठी कोरीव लेख.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला

१ अहवाल (शक १८३२) रु. ३—०
२ अहवाल (शक १८३३) रु. ५—०
* ३ सुबंतविचार (वि. का. राजवाडे) १०—०
४ वार्षिक इतिवृत्त (शक १८३४) ५—०
५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (वि. का. राजवाडे) १—५०
६ प्रथम संमेलनवृत्त (शक १८३५) ०—७५
७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३५) ६—०
* ८ द्वितीय संमेलनवृत्त (शक १८३६) ३—०
९ वार्षिक इतिवृत्त (शक १८३६) ३—०
१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० (शिवकालीन घराणीं) ३—०
११ वार्षिक इतिवृत्त (शक १८३७) ६—०
१२ तृतीय संमेलनवृत्त (शक १८३७) ३—०
१३ मुकुंद-महाभाष्य (संस्कृत) ०—५०
*१४ ग्रंथराज (दासोपंत) ०—५०
१५ स्फुट प्रकरणें, भाग १ ला ०—७५
१६ स्फुट प्रकरणें, भाग २ रा ०—७५
१७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३८) ३—०
१८ चतुर्थ संमेलनवृत्त (शक १८३८) ४—०
१९ राजवाडे खंड स्थलसूची ४—०
२० पंचम संमेलनवृत्त (शक १८३९) ३—०
*२१ संशोधनसंग्रह
२२ चंद्रचूड-दप्तर, कलम १ (द. वि. आपटे) ३—०
*२३ महाराष्ट्र-सारस्वत १०—०
२४ षष्ठ संमेलनवृत्त (शक १८४०) ४—०
२५ सप्तम संमेलनवृत्त (शक १८४१) ३—०
२६ संशोधकाची छोटी जंत्री (आपटे) ०—२५
२७ मंडळप्रदर्शनपरिचय ०—२५
२८ फार्सी पत्रव्यवहार (गं. ना. मुजुमदार) ५—०
२९ फार्सी-मराठी कोश (मा. त्र्यं. पटवर्धन) ४—०
३० शिवचरित्रसाहित्य खंड १ ला १—५०
३१ हिस्टॉरिकल मिसलेनी १—०
३२ पुरंदरे-दप्तर, भाग १ (कृ. वा. पुरंदरे) ४—०
३३ शिवचरित्रसाहित्य, खंड २ ४—०
३४ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड १ (ग. ह. खरे) २—०
*३५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १ २—०
३६ राजारामचरितम् (वा. सि. बेंद्रे) १—५०
३७ मंडळांतील नाणीं (ग. ह. खरे) १—०
*३८ शिवचरित्रसाहित्य, खंड ४ १—५०
३९ गोवळकोंड्याची कुतुबशाही (वा. सि. बेंद्रे) ४—०
*४० ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड १ (ग. ह. खरे) १—५०
*४१ दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड २ (ग. ह. खरे) २—०
*४२ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड २ १—५०
*४३ मंडळचित्रग्रंथ, चित्रें २० ०—५०
४४ शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड ३ (शं. ना. जोशी) २—५०
४५ विजयनगर-स्मारक-ग्रंथ (करमरकर व ओतुरकर) ४—०
*४६ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड २ (ग. ह. खरे) १—५०
४७ शिवचरित्रसाहित्य, खंड ६ (ग. ह. खरे) १—५०
४८ मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार (शं. पु. जोशी) ०—७५
४९ शिवचरित्रवृत्तसंग्रह (कानडी), भा. १ (पां. भी. देसाई) १—५०
४९अ, अखिल भारतीय अर्वाचीन इतिहास परिषद पहिलें अधिवेशन ३—०
५० शिवचरित्रसाहित्य, खंड ७ (कृ. वा. पुरंदरे व ब. द. आपटे) १—५०
*५१ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ३ (ग. ह. खरे) १—५०
५२ } शिवचरित्रवृत्तसंग्रह, खंड २ व ३
५३ } फार्सी विभाग (ग. ह. खरे), प्रत्येकीं १—२५
५४ पुणें नगरसंशोधनवृत्त, खंड १ (चिं. ग. कर्वे) १
*५४अ, ऐ. संकीर्ण साहित्य, खंड ३ ३—०

५५ शिवचरित्रसाहित्य, खंड ८ १—५०
*५५ अ, शिवचरित्रसाहित्य, खंड ५ ३—५०
५६ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड४ २—०
५७ ऐ. संकीर्ण वाङ्मय साहित्य,खंड१ १—५०
५८ शिवकालीन दंडनीति (वा.सि. बेंद्रे) ३—०
५९ पुणेंनगरसंशोधनवृत्त,खं. २(चिं.ग.कर्वे)१-५०
६० ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड१ १-५०
६१ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य,खंड५ १-५०
६२ शिवचरित्रसाहित्य, खंड ९
(शां. वि. आवळसकर) १—५०
६३ हिंगणे दप्तर, खंड १ (ग. ह. खरे) ३--०
६४ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य,खंड६ १-५०
६५. ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड३ २—०
६६ पुणें नगरसंशोधनवृत्त खंड ३ १—५०
६७ महाराष्ट्रांतील कांहीं ताम्रपट व
शिलालेख (डॉ. मो. गं. दीक्षित) ३—०
६८ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड७ २--०
६९ ऐतिहासिक संकीर्ण निबंध,खंड २ ३--०
७० हिंगणे दप्तर, खंड २ (ग. ह. खरे) ३--०
७१ आंग्रेकालीन पत्रव्यवहार
(शां. वि. आवळसकर) ३—०
७२ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड४ २-५०
७३ पेठे दप्तर, भाग १ (वि.सि.चितळे) ३-०
७४ Explorations at Karad 5—0
७५ संभाजीकालीन पत्रसारसंग्रह व
शकावली (शं. ना. जोशी) ३—०
*७६ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं
साधनें, खंड ३ (ग. ह. खरे) ३—०
७७ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ४
(ग. ह. खरे) ३—०
७८ पेठे दप्तर, भाग २ (वि.सि.चितळे) ३—०
७९ पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक
पत्रव्यवहार (रा. वि. ओतुरकर) ३—०
८० इतिहासकर्ते मराठे (ग. ह. खरे) २—०
८१ दाभाडे दप्तर, खंड१ (शं.ना.जोशी) ३—०
८२ दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाचीं
साधनें, खं. ४ (डॉ.मो. गं. दीक्षित) ३—०
८३ पुणें नगरसंशोधनवृत्त, खंड ४ २—०
८४ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ५ ३—०
८५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ८
(द. वा. पोतदार) ३—०
८६ शिवचरित्रसाहित्य, खंड १०
(शां. वि. आवळसकर) ३—०
८७ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड९ ३—०
(शं. ना. जोशी)
८८ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ६ ५—०
८९ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड१० ५-०
(शां. वि. आवळसकर)
९० शिवचरित्रसाहित्य खंड ११
(ग. ह. खरे) ५—०
९१ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ११
(य. न. केळकर) ५—०
९२ भारत–इतिहास–संशोधक–मण्डलस्थ–
हस्तलिखित–ग्रन्थानुक्रमणिका
(ग. ह. खरे) १५—०
९३ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ५,
भाग १ (ग. ह. खरे) ६—०
९४, ९५ शिवचरित्रसाहित्य, खंड १२
व १३ (ग. ह. खरे) अनुक्रमें ५ व ६
९६ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ७ ५—०

मंडळ त्रैमासिक पुस्तकें १ ते ४४, प्रत्येकीं ५ रु.; याशिवाय सर्व प्रकारचीं ऐतिहासिक पुस्तकें मिळवून देण्याची खटपट केली जाईल; तारकांकित पुस्तकें अप्राप्य; पण क्र. ३५, ३८, ४०–४३, ४६, ५१, ५४ अ, ५५ अ, ७६ हीं त्रैमासिकांत भागशः प्रकाशित झालीं आहेत; स्वीय मालेंतील पुस्तकांच्या खरेदीवर खालीं दिल्याप्रमाणें सवलत मिळेल— २५–५० रु. = १० टक्के; ५१–१०० रु. = १२॥ टक्के; १०१ रु. व पुढें = १५ टक्के.

महाराष्ट्र-राज्य-साहित्य-संस्कृति-मंडळ-पुरस्कृत

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें

वर्ष ४६] त्रैमासिक [अंक १-४

१८१–१८४

ऐतिहासिक संकीर्ण निबंध

९ वा खंड

(स्वीय ग्रंथमाला क्र. १००)

BHĀRATA ITIHĀSA SAṀSHODHAKA MAṆḌAḶA,
POONA

Vol XLVI { QUARTERLY } Nos. 1-4

181-184

Miscellaneous Articles on Indian History, Vol. IX

श. १८८९] किंमत ५ रु. [A. D.
रा. श. २९४] Price Rs. 5 [1968

निवेदन

(१) भा. इ. सं. मंडळ त्रैमासिकाच्या ४६ व्या वर्षाच्या १ ते ४ या अंकांचा हा जोड अंक आहे. हा श. १८८७ या वर्षी सभासद असणारांसाठीं आहे. श. १८८८ व १८८९ या वर्षी सभासद असणारांसाठीं सुमारें २०० पृष्ठांचा एक जोड अंक छापण्याचें काम चालू आहे. ९६ पृष्ठें छापून झालीं आहेत. पण त्याचा विषय मधेंच तोडतां येण्यासारखा नसल्यामुळें विषय संपेतों त्याची सलग छपाई चालू ठेवणें आवश्यक आहे. २०० पृष्ठांत तो सर्व सर्वांगांनीं पूर्ण करावा अशी योजना आहे. येत्या फाल्गुन अखेर तो अंक सभासदांच्या हातीं देऊन बाकी शून्य करावी असा प्रयत्न चालू आहे.

(२) या मंडळाविषयीं गेल्या दोनतीन महिन्यांत निदान तीन ठिकाणीं प्रतिकूल उद्गार वाचण्यास मिळाले. साधना साप्ताहिकाच्या ता. २२-७-६७ च्या अंकांत १३ व्या पृष्ठावर पुढील परिच्छेद आहे. ' भारत इतिहास संशोधक मंडळाला स्वतःची नवी बहुमजली विस्तृत इमारत बांधतां आली. पण त्या इमारतींत अभ्यास करणारे आहेत कुठें ? कुणी चौकशीला गेला, काय प्रेक्षणीय वस्तू आहेत त्या पाहाव्या म्हणून गेला तरी त्यास पश्चात्ताप वाटतो. इतक्या थंडेपणानें त्याचें स्वागत होतें. मंडळांत कार्यकर्ते नाहींत–पुण्यासारख्या पेन्शनरांच्या आगरांत मोडी वाचणारांचा तुटवडा नसतां कुणी योजक नसल्यामुळें मंडळ कधींच जिवंत वाटत नाहीं. ही आमच्या संशोधनाची शोककथा आहे. असो.

श्री. ना. गो. चापेकरांनीं चित्रमयजगतच्या गेल्या ऑगस्टच्या अंकांत ' थोरले बाजीराव ' अशा मथळ्याचा एक लेख लिहिला आहे. त्यांतील उपांत्य परिच्छेदांत ' चिमाजी अप्पाचा पराक्रम आम्हांला समजला नाहीं. वस्तुतः भा. इ. संशोधक मंडळाचें हें काम. पण आमचें दुर्दैव असें कीं, या संस्थेंत भारताचा पत्ता नाहीं व इतिहास-संशोधनही नाहीं, फक्त मंडळ आहे. आज कित्येक वर्षें तें कागदपत्र जमविण्याचें काम करीत आहे आणि हेंच एकमेव कर्तव्य अशी [तेथील] सर्वांची समजूत झालेली दिसते.

डॉ. शं. गो. तुळपुळे यांनीं महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पहिल्या विभागीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणांत पुढील उद्गार काढले आहेत. ' दोन पाच लाख रुपये खर्च करून सरकारच्या मदतीनें भारत इतिहास संशोधक मंडळानें आपला जीर्णोद्धार करून घेतला, मजल्यावर मजले उठविले. पण आज त्या भव्य प्रासादांत एखादा खरे किंवा एखादा बाबा पुरंदरे लुकलुकताना दिसतो. बाकीच्या खोल्यांतून दिवा तरी लागतो कीं नाहीं कुणास ठाऊक. '

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक

व. ४६, अं. १–४

कृष्णाचार्यविरचितं

१ द्वे विरूपे–सूक्तभाष्यम्

संपादकः – विद्याधरशास्त्री भिडे

प्रास्ताविकम्

अथेदानीं ' द्वे विरूपे ' इति सूक्तस्य (ऋ. १·९५) वैदिकतिलकैः **कृष्णाचार्यैः** विरचितं भाष्यं विदुषां परिज्ञानाय प्रकाशयितुं प्रमोदते मे चेतः। श्रुतिप्रचोदितधर्मैकपरायणानां सन्मार्गप्रवृत्तानां वैदिकानां मूर्धन्यैः सायणाचार्यैः ऋग्वेदसंहितायां भाष्यं विरचय्य तत्रस्थानां सूक्तानां विनियोगपुरस्सरम् अर्थो विवृतः। ननु किमर्थमिदानीं नूतनभाष्योपक्रम इति चेत् सत्यम् । ऋग्वेदस्थानां केषांचन सूक्तानाम् अर्थविषये मतभिन्नत्वं दरीदृश्यते, यतो हि सायणाचार्येभ्यः प्राक्तनानां स्कन्दस्वामि–उद्गीथाचार्यादीनां पूर्वाचार्याणामपि सूक्तार्थविवरणे नैकमत्यम् । सायणाचार्याणाम् अनितरसाधारणं वेदपाण्डित्यम् उररीकृत्यापि केचन आधुनिका ' अस्यवामीया'दीनां कतिपयानां सूक्तानां विवरणे स्वीयं मतभेदं प्रकटयन्तीति विदितचरमेव विदुषाम् । अतः सूक्तस्यास्य भाष्यरचनायां प्रचोदिताः **कृष्णाचार्या** इत्यत्र नाक्षेपणीयं किञ्चित् । एते **कृष्णाचार्या** धार्मिका वैष्णवा वेदशास्त्रसंपन्नाश्च खिस्ताब्दस्य १८९६ तमे वर्षे वैकुण्ठलोकं प्राप्ताः ।

अथ यद् ' द्वे विरूपे ' सूक्तं तस्य औषसगुणविशिष्टोऽग्निः शुद्धोऽग्निर्वा देवतेत्युक्तं सर्वानुक्रमे । किं तु सूक्तस्यास्य सूक्ष्मेक्षिकया पर्यालोचनायां कस्य वा द्वे रूपे इति संशयः समुदेति । एतत्संशयनिराकरणे प्रवृत्ताः नृसिंहैकपरायणाः **कृष्णाचार्याः** । नृसिंहप्रेरणया सूक्तव्याख्याने प्रवृत्ता भाष्यकारा भाष्योपक्रमे स्वयमेव कथयन्ति––

> हरेः प्रेरणया शक्त्या कृपया च तथेच्छया ।
> श्रुतिव्याख्याप्रवृत्तिर्मे न स्वबुद्धिविलासतः ॥ इति ।

समेषां श्रुतिवाक्यानां ब्रह्मपरत्वमेवेति मत्वा कैश्चित् पूर्वसूरिभिरपि वेदस्यार्थः तदनुसारेणैव भूयसा विवृतः । नृसिंहब्रह्मणोः तादात्म्यम् अङ्गीकृत्य सूक्तस्यास्य नीरानृसिंहो देवतेति निर्णीय भाष्यमिदं व्यरचि **कृष्णाचार्यैः** । द्वे विरूपे, सिंहम्, भीमः इत्यादीनां सूक्तगतानां शब्दानाम् अर्थः सहजतया प्रकाशितोऽस्मिन् भाष्ये । श्रुतिवाक्यैः स्मृतिपुराणवचनैश्च परिबृंहितमिदं व्याख्यानं याथार्थ्येन भाष्यपदवीं समारोहति । यद्यपि नीरानृसिंहस्तुतिपरं नेदं सूक्तं तथापि तदधिकृत्यैव प्रवृत्तानां **कृष्णाचार्याणां** विवरणमपि विमर्शार्हं भवेदिति न संशयः ।

नृसिंहतापनीये नृसिंहस्य मन्त्रराजः प्रकटितः —

उग्रं वीरं महाविष्णुं ज्वलन्तं सर्वतोमुखम् ।
नृसिंहं भीषणं भद्रं मृत्युमृत्युं नमाम्यहम् ॥ इति ।

तस्य मन्त्रराजगतस्य कस्य शब्दस्य माहात्म्यं कयर्चा प्रकटीकृतमिति प्रत्यृचं तैः प्रदर्शितम् । सूक्तगतानाम् ऋचां मन्त्रराजस्थैः शब्दैः कीदृक् संबन्धोऽभिप्रेत इति अधस्तनया भाष्यकाररचितोपपत्त्यैव सुस्पष्टं भविष्यति ।

"अथ ऋग्वेदशाकलसंहितायां प्रथमाष्टके सप्तमाध्यायारम्भे पठितस्य 'द्वे विरूपे' इत्येकादशर्चस्य सूक्तस्य प्रत्यृचं नीरानृसिंहमहामन्त्रस्यैकैकं नाम कथं गृह्यत इत्यत्र **दंडवते**–इत्युपनामक**कृष्णाचार्य**कृतभाष्योपपत्तिः" —

ऋक्	भाष्यपरत्वं	मूलमन्त्रशब्दः
द्वे विरूपे चरतः	मृत्युमृत्युं	उग्रं
दशेमं त्वष्टुर्जनयन्त	उग्रं	वीरं
त्रीणि जाना परि	महाविष्णुं	महाविष्णुं
क इमं वो निण्यमा	वीरं	ज्वलन्तं
आविष्ट्यो वर्धते	नृसिंहं	सर्वतोमुखं
उभे भद्रे जोषयेते	भद्रं	नृसिंहं
उद्यंयमीति सवितेव	भीषणं	भीषणं
त्वेषं रूपं कृणुत	नमामि	भद्रं
उरु ते ज्रयः पर्येति	ज्वलन्तं	मृत्युमृत्युं
धन्वन्त्स्रोतः कृणुते	अहं	नमामि
एवा नो अग्ने समिधा	सर्वतोमुखं	अहम् ।

तदिदं भाष्यं वेदशास्त्रपारङ्गतानां स्वान्तःसुखाय भवेदेव । एतादृशं भाष्यकृतः शब्दरचनापाटवं यदनेन तदध्येतॄणां मनसि नीरानृसिंहरूपिणो महाविष्णोः याथातथ्येन दर्शनं भवति। अस्तु। अस्य भाष्यस्य मूलं हस्तलिखितं जीर्णं शीर्णं च वर्तते । अतः तस्य प्रतिलिपिकृतं लिखितपुस्तकं समुपलब्धम् । भाष्यस्यान्तिमे भागे कानिचिद् अक्षराणि त्रुटितत्वात् न दृश्यन्ते । तत्र पूरणे यथामति प्रयतितम् । अस्मिन् भाष्ये समुद्धृतानां वाक्यानां यावच्छक्यं संदर्भाः परीक्षिताः । विशेषतः पद्मपुराणान्तर्गतनृसिंहपुरमाहात्म्याद् अत्र बहवः श्लोका उद्धृताः। मुद्रिते पद्मपुराणे नैतन्माहात्म्यं समुपलभ्यते। किं तु तादृशस्य नृसिंहपुरमाहात्म्यस्य लिखितपुस्तकं भा. इ. सं. मंडलस्य हस्तलिखितसंग्रहे (क्र. ५२-१३१) वर्तते, तदत्रोपयुक्तम् । अस्य संपादने प्रचोदितोऽहं भारत-इतिहास-संशोधक-मंडलस्य कार्यदर्शिभिः श्री. **ग. ह. खरे** महोदयैः, अतः नितान्तं समादरणीयाः ते । सर्वेभ्य ऐहिकामुष्मिकसमृद्धिं ददातु नीरानृसिंह इति भगवन्तं संप्रार्थ्य विरमामि ।

द्वे विरूपे-सूक्तभाष्यम्

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमद्दिव्यलक्ष्मीनृसिंहाय नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः श्रीक्षेत्रनीरानृसिंहपरद्वेविरूपेसूक्तभाष्यप्रारंभः ॥

नीरातटे कृतनिकेतनमंबुदाभं प्रत्यङ्मुखं द्विभुजराजितमब्जनेत्रम् ।
योगासनस्थममलं सदयावलोकं जानुद्वयाहितकरं नृहरिं नमामि ॥

ॐ नमः कमलालालितपदकमलाय नीरातटोल्लासाय निजजनानन्दकन्दाय श्रीलक्ष्मीकान्ताय ॥

सूक्तं यत् द्वे विरूपे इति विमलतरास्वृक्षु चैकादशर्चं
तस्याप्यानुष्टुभो यो विलसति नृहरेर्मन्त्रराजः सुवर्चाः ।
सोऽयं स्वस्मिन् यमेकादशभिरिह पदैरर्थमाविष्करोति
तं **कृष्णाख्यो** हि नीरानृहरिपरमिमं बालबोधं करोति ॥ १ ॥

हरेः प्रेरणया शक्त्या कृपया च तथेच्छया ।
श्रुतिव्याख्याप्रवृत्तिर्मे न स्वबुद्धिविलासतः ॥ २ ॥
सूक्तस्यास्य ऋषिः कुत्सः छन्दस्त्रिष्टुप् तथैव च ।
श्रीमन्नीरानृसिंहोऽसौ देवताऽत्र समीरिता ॥ ३ ॥

मन्त्रलिङ्गतोऽग्नीन्द्रवरुणादिप्रतिपादिका अपि श्रुतयः ब्रह्मपरास्तद्ब्रह्म नृसिंह एव ॥ तथा च श्रुतिः– ' सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म । यो वेद निहितं गुहायां परमे व्योमन् ' (तै. उ. २·१·१) ॥ स्मृतिश्च–' गुहावासाय गुह्याय गुप्ताय गुरवे नमः ' ॥ श्रुतिश्च– सिंहो न भीमो मनसो जवीयान् ' (ऋ. ९·९७·२८) ॥ अभक्तानां सिंहो न । सिंह इव भीमः भीषणः । भक्तानां तु सिंहोऽपि न भीमः न भीषणः । तदुक्तं—

उग्रोऽप्यनुग्र एवायं स्वभक्तानां नृकेसरी ।
केसरीव स्वपोतानामन्येषामुग्रविग्रहः ॥ इति ।

मनसो जवीयान् । मनसोऽपि वेगवत्तरः । श्रुतिश्च –' मृगो न भीमः कुचरो गिरिष्ठाः '– (ऋ. १·१५४·२) ॥ न भीमः सौम्यो मनुष्यः । मृगः सिंहः नृसिंह इत्यर्थः ॥ कुचरो भूचरो मनुष्यः । गिरिष्ठः पर्वतवासी सिंहः । नृसिंह इत्यर्थः ॥ तापनीये च –' एष हि सर्वत्र सर्वदा सर्वात्मा सन् सर्वमिति (मत्ति) नृसिंह एवैकलः ' (नृ. उ. २·४) इति ॥ अतः सर्वे वेदा नृसिंहपरा एव तत्र तावन्नीरानृसिंहपरं **द्वे विरूपे** इति यत् सूक्तं तस्य व्याख्यायां प्रथमामृचमाह ॥

द्वे विरूपे चरतः स्वर्थे अन्यान्या वत्समुप धापयेते ।
हरिरन्यस्यां भवति स्वधावाञ्छुक्रो अन्यस्यां ददृशे सुवर्चाः ॥ १ ॥

द्वे विरूपे इति ॥ **चरतः** अन्तर्यामितया सर्वत्र संचरतः । श्रीनीरानृसिंहस्य **द्वे विरूपे** विशिष्टे रूपे सैकतमूर्त्यात्मके । स्वभक्तयोरेकस्वरूपयोर्ब्रह्मप्रल्हादयोः प्रार्थनया धृते । **अयं भावः प्रल्हादो ब्रह्मणोऽवतारः । कुतः । तुष्टेन नृहरिणा वरप्रदानसमये—**

भवन्ति पुरुषा लोके मद्भक्तास्त्वामनुव्रताः ।
भवान्मे खलु भक्तानां सर्वेषां प्रतिरूपधृक् ॥

(भागवतपुराणे ७-१०-२१)

नृसिंहपुराणे च—

नैव (वं) प्रियो मे भक्तेषु स्वाधीनप्रणयी भव ॥ इति ।

(४३.७१)

सर्वेषु मद्भक्तेषु त्वमेव सर्वोत्कृष्टः सर्वेषां भक्तानाम् उपमानं भवसीत्युक्तम् । अतो ब्रह्मणः सर्वाधिक्यात् । तदितरदेवानाम् अर्वाचीनत्वेन तदंशानां भक्तानामप्यर्वाचीनत्वात् । ब्रह्मांशस्य प्रल्हादस्य सर्वभक्ताधिक्यम् । अन्यथा भगवद्वाक्यवैय्यर्थं स्यात् । अपि च । ब्रह्मसोमौ बुद्धिमनसी इव ब्रह्मांशप्रल्हादोऽपि भगवतः । स्मृतिः ' गंधर्वविद्याधरचारणाप्सरः स्वरः स्मृतीरसुरानीकवर्थम् ' इति । अतः स्मृतित्वात् विज्ञानशक्तेर्ब्रह्मणोंशत्वाच्च प्रल्हादस्य नवविधभक्तिमूलभूता स्मरणभक्तिरुद्भूता । सर्वक्रियाणां स्मरणमूलत्वात् । तस्माद् भक्तिश्रैष्ठ्यतोऽपि प्रल्हादस्य श्रैष्ठ्यम् । ब्रह्मणा सृष्टौ व्यापृतत्वात् । प्रल्हादावतारेणाव्यवहितस्मरणभक्तिः कृता । अपि च । ब्रह्मण इव प्रल्हादस्यापि नारायणजन्यत्वं नारायणमन्त्रोच्चारेण सहैव गर्भसंभवात् । नाभिपङ्कजगर्भे ब्रह्मण इव मातृगर्भे प्रल्हादायापि नारदरूपेण हरिणोपदिष्टम् । ब्रह्मणेव प्रल्हादेनापि तत्रैव दिव्यवर्षशतं भगवद्ध्यानं कृतम् । तथा ब्रह्मणे हरिणेव प्रल्हादाय नारदेनापि प्रत्यक्षोपदेशाभावात् । हृदैवोपदिष्टं मामप्युद्दिश्य निर्मलमिति प्रल्हादोक्तेः । तथा च ब्रह्मद्वेषिणौ मधुकैटभाविव हिरण्याक्षवधनिमित्तकहिरण्यकशिपुद्वेषात् हिरण्याक्षद्वेषस्यापि प्रसक्तेरुभावपि । प्रल्हादद्वेषिणौ हिरण्याक्षहिरण्यकशिपु(पू) हरिणा हतौ । तथा ब्रह्मप्रार्थनया वराह इव प्रल्हादवचसा नृसिंहः प्रादुर्भूतः । ब्रह्मणो वचसेव प्रल्हादस्यैव वचसा भगवदवतारः । नान्यस्याद्युपपत्तिभिश्चैवमुभयोः साम्येन ब्रह्मणोंशत्वात् भगवतो वरप्रसादनाच्च प्रल्हादस्य सर्वभक्तेभ्य उत्तमत्वम् । ' प्रल्हादादुत्तमः को नु विष्णुभक्तो जगत्रय ' इति । अपि च । प्रमाणान्तरानपेक्षं भगवद्वाक्यमेवात्र मुख्यं प्रमाणमिति सर्व[म]नवद्यम् ।

यद्वा **द्वे विरूपे** विषमरूपे नरतनुसिंहमुखात्मके । यद्वा जलरूपमूर्तिरूपात्मके । जलं नीरा । नीरादेवो नृकेसरीतिवचनात् । मूर्तिरूपं सैकतम् । यद्वा स्थावरजङ्गमरूपे । वालुका विष्णुरूपेण इति स्थावररूपम् । मानवाश्चिद्रसात्मका इति जङ्गमरूपम् । कीदृशे विरूपे **स्वर्थे** सुष्ठु अर्थः प्रयोजनं जगदुद्धरणभक्तसंरक्षणादि ययोस्ते । यद्वा **चरतः**

भक्तवात्सल्यादिना विहरत इत्यर्थः । इमे **अन्यान्या** अन्योन्यं मिलित्वा । **उप** समीपे । ब्रह्मांशभूतमग्रे स्थितं **वत्सं** प्रल्हादम् । पुत्रपौत्रनप्तृवन्तमपि प्रल्हादं प्रति । 'वत्स प्रल्हाद भद्रं ते' (भाग. पु. ८·२३·९) इति सप्रेम हरिणाष्टमस्कन्ध उक्तत्वात् । ब्रह्मणोंशेन स्वपुत्रत्वाद्वा वत्सम् । **धापयेते** धेट् पाने सर्वतः संरक्ष्य स्वकीयं रसं स्मरण-ध्यानदर्शनपूजाशेषादिकं पाययतः ददत इत्यर्थः । **शुक्रः** शुद्धः **हरिः** नृसिंहः । **अन्यस्यां** जलमूर्तौ नीरायां **स्वधावान्** पितृतृप्तिकर्मफलदो **भवति** । तदुक्तम्—

नीराभीमांबुकल्लोलदर्शनोदितचेतसाम् ।
पितरो नरकाद् यान्ति बहिर्विमलिताशयाः ॥ इति ।

(पद्मपुराणे नृसिंहपुरमाहात्म्ये २·१३)

अन्यस्यां सैकतमूर्तौ । **सुवर्चाः** सुष्ठु वर्चो ज्ञानादिफलं यस्मात् सः एतादृशो **ददृशे** दृष्टः । तदुक्तम् —

कलिकल्मषबुद्धीनां महापापकृतामिति (मपि) ।
दर्शनात् पापराशिघ्नो भजनाद् भुक्तिमुक्तिदः ॥ इति ।

(नृ. म. १·४०)

यस्मात् स्वभक्तानां मृत्युमपमृत्युं च मारयति अभीष्टं च ददाति तस्मादस्यामृचि **मृत्युमृत्यु**मिति पदस्यार्थ उद्बोधितः ॥ १ ॥

दशेमं त्वष्टुर्जनयन्त गर्भमतन्द्रासो युवतयो विभृत्रम् ।
तिग्मानीकं स्वयशसं जनेषु विरोचमानं परि षीं नयन्ति ॥ २ ॥

दशेममिति ॥ **दश** नृसिंहस्याङ्गुलयः । **अतन्द्रासः** आलस्यरहिताः ता एव **युवतयः** नित्यतरुण्यः । हिरण्यकशिपूदरविदारणाय **जनेषु** जन्यन्त इति जनाः तेषु स्वस्मात् जातेषु नखेष्विति भावः । **तिग्मानीकं** तिग्मं तीक्ष्णं च तत् अनीकं मुखं तीक्ष्ण-मुखं **जनयन्त** उत्पादयन्ति अकुर्वतेत्यर्थः । अन प्राणने 'अनिहृषिभ्यां च' (उणादि-सूत्र ४५७) इति कीकन् । ततश्च **त्वष्टुः** । त्विष दीप्तौ । तेजस्विनः हिरण्यकशिपोः । **इमं गर्भम्** उदरगर्भस्थं अन्त्रजालमित्यर्थः । **परि षीं** परि निषेधार्थे सीं बन्धने बन्धं हरं सिंहं नृसिंहमित्यर्थः । **नयन्ति** प्रापयन्ति । कण्ठे धारणार्थे ददतीत्यर्थः । कीदृशं गर्भं **विरोचमानं** प्रल्हादजननत्वात् अतिवर्चस्विनम् । पुनः कीदृशं **स्वयशसं** स्वायत्तयशस्कं अतिशयेन यशस्विनं त्रिजगति विख्यातमित्यर्थः । कीदृशं परिषीं नृसिंहं **विभृत्रं** सर्वभूतेषु चैतन्यरूपेण विभज्य वर्तमानमित्यर्थः ।

यद्वा **दश** दिशः दिगभिमानिन्यो देवता वा ता एव युवतयः । **त्वष्टुः** नारायणस्य **गर्भं** नारायणमन्त्रोच्चारेण सहजातत्वात् । [यद्] वा **त्वष्टुः** हिरण्यकशिपोर्**गर्भं** प्रल्हादं **जनेषु** **जनयन्त** तत्र तत्र हिरण्यकशिपुकृतयातनाभ्यः संरक्ष्य पुनर्जन्मानमिव

कुर्वन्तीत्यर्थः । तम् इमं प्रल्हादं **परिषीं** स्वामिनं नृसिंहं प्रति **नयन्ति** तत्पादपद्मं प्रापयन्तीत्यर्थः । कथंभूतं परिषीं **तिग्मानीकं** तीक्ष्णं मुखं यस्य सः सिंहमुखत्वादित्यर्थः । अन्यत् समानम् ।

यद्वा **दश** दशोपनिषच्छ्रुतयः **त्वष्टुर्जीवस्य** **परि** निषेधार्थे **सीं** बन्धने इति पदत्रयेण जीवबन्धं हरं नृसिंहमिति सिद्धम् ।

नृशब्दो जीववाची स्यात् (ह) सिं शब्दो बन्धवाचकः ।
नृसिंहन्ता नृसिंहोऽयं जीवबन्धविनाशकः ॥ इति ।

(नृ. म. २.३२)

युवतय इति बहुवचनं अंशाभिप्रायेण । युवतयः नाम युवती जाया । जायाबीजं श्रीः तत्सहितत्वेन श्रीनृसिंहमिति सिद्धम् । 'लक्ष्मीनृसिंहमनुना पूजितो (तौ) संस्तुतौ नतौ' (नृ. म. ५.१८) इति वचनात् । एवं च युवतयः त्वष्टुः परि सीं इति पदचतुष्टयेन श्रीश्रीनृसिंहमिति । **इमं गर्भं** गुह्यं स्वगर्भितार्थं **जनयन्त** उत्पादयन्तीत्यर्थः । 'परोक्षप्रिया इव हि देवाः' (ऐ. ब्रा. ३.३३) इति श्रुतेः । तम् इमं गर्भं स्वगर्भरूपम् अर्थं **विभृत्रं** सर्वभूतेषु चैतन्यरूपेण वर्तमानं जीवं प्रति **नयन्ति** प्रापयन्ति । 'नृसिंहमन्त्रादन्यच्च वैदिकं तु न विद्यत' इति बोधयन्तीत्यर्थः । कीदृशं नृसिंहं **स्वयशसं** स्वं स्वनामकं नृसिंहनामकं यशः उदकम् उदकरूपं तीर्थं यस्य सः नृसिंहतीर्थाभिमानिनमिति भावः । यश इत्युदकनाम ।

ततो नृसिंहतीर्थं हि क्रोशमात्रं वरानने ।
हिरण्यकशिपुं हत्वा यत्र देवो व्यवस्थितः ॥
तत्तीर्थस्य प्रभावो हि मया वक्तुं न शक्यते ।
सर्वार्थदं मोक्षबीजं तीर्थं यत्परमं ततः ॥ इति ।

(नृ. म. ७. ३८-३९)

अन्यत्समानम् । यस्मात् सर्वाणि भूतानि उद्गृह्णते सृजति विसृजति वासयत्युद्ग्राह्यते बृंहयते । तस्मादस्यामृचि **उग्रमिति** पदस्यार्थ उद्बोधितः ॥ २ ॥

त्रीणि जाना परि भूषन्त्यस्य समुद्र एकं दिव्येकमप्सु ।
पूर्वामनु प्र दिशं पार्थिवानामृतून् प्रशासद् वि दधावनुष्ठु ॥ ३ ॥

त्रीणि जानेति ॥ **त्रीणि जाना** जन्मानि अवतारः ब्रह्मविष्णुशिवरूपः **अस्य** नृसिंहस्य एनं नृसिंहमित्यर्थः । **परि** परितः **भूषन्ति** अलंकुर्वन्ति । तदुक्तं नृसिंहपुराणे-

आनाभेर्ब्रह्मणो रूपमागलाद्वैष्णवं तथा ।
आशीर्षाद्रुद्रमीशानं तदग्रे सर्वतः शिवम् ॥ इति ।

एकं समुद्रे एकं दिवि एकम् **अप्सु** । समुद्रे मुद्रया नदीपर्वतादिचिह्नेन सहितसमुद्रे (सहिते) भूभागे ब्रह्मरूपम् । 'पद्भ्यां भूमिः' (ऋ. १०.९०.१४) इति श्रुतेः । आनाभेर्ब्रह्मणो रूपमिति तथा । अप्सु अन्तरिक्षे आप इत्यन्तरिक्षनाम विष्णुरूपम् । 'शीर्ष्णो द्यौः समवर्तत' (ऋ १०.९०.१४) इति श्रुतेः । आशीर्षाद्रुद्रमीशानमिति । अतोऽयं नृसिंहावतारो ब्रह्मविष्णुशिवात्मकस्तस्मान्नृसिंहध्यानश्लोकेषु त्र्यक्षत्व–शशिशेखरत्वनीलकण्ठत्वेन्दुधवलत्वादि शिवस्वरूपत्वमुक्तम् । ब्रह्मणस्तु पुत्रत्वेन सादृश्यान्नोक्तमिति भावः । माहात्म्येऽपि—

शिवे जानीहि नृहरौ त्रयो देवा वयं सदा ।
निवसामो जनानां हि हितार्थाय शुभोदयाः ॥
(नृ. म. २२.३९)

देहाकारो भवेद्ब्रह्मा नाममात्रो हरिः स्वयम् ।
पूजा(ज्योऽ)भिमानी रुद्रो हि (ऽहं) त्रयमात्मैव केवलम् (लः) ॥ इति ।
(नृ. म. २२.४१)

नृहरेः एकं देहाकाररूपं ब्रह्मस्वरूपं समुद्रे भूभागे देहाकारस्य पार्थिवत्वात् । तथात्वेन भासमानादित्यर्थः । एकं नामरूपं हरिस्वरूपं दिवि आकाशे नाम्नः शब्दात्मकत्वात् शब्दस्य आकाशगुणत्वाच्च । एकं पूजाभिमानी रूपं शिवस्वरूपम् अप्सु अन्तरिक्षे अहंकारस्यान्तःकरणरूपत्वात् । यद्वा **अस्य** नृहरे**स्त्रीणि** रूपाणि **परि भूषन्ति** क्षेत्रमलंकुर्वन्ति । **एकं दिवि** व्योमरूपं गोतीर्थे । **एकं समुद्रे** मुद्रया गरुडादिचिह्नेन सहिते देवालये सैकतं रूपम् । **अप्सु** जलेषु नीरारूपमिति । यद्वा नृहरेः प्रियाणि **त्रीणि** रूपाणि —

दक्षे कामदुघा वामे चिन्तामणिगणेश्वरः ।
पृष्ठे कल्पद्रुमोऽश्वत्थः प्रियं मे त्रयमुत्तमम् ॥ इति ।
(नृ. म. ९.१३)

अत्रापि पूर्ववत् क्रमात् दिवि समुद्रेऽप्सु त्रीणि शिवरूपाणि एनं परिभूषन्ति । तदुक्तम्–

अथापि रूपत्रयवानग्रे देवस्य पार्श्वयोः ।
(नृ. म. १२.४६)

अत्रापि काशीविश्वेश्वरः निम्नत्वात् भुवि, रामेश्वरः मध्यस्थत्वात् अन्तरिक्षे, भीमाशंकरः उच्चत्वाद्दिवि ।

पूर्वामन्विति ॥ अयं नृसिंहः **पार्थिवानां** पृथिव्याः संबन्धिनाम् अष्टदिक्प्रदेशानां मध्ये **पूर्वां प्रदिशमनु** प्राचीमारभ्येत्यर्थः ॥ **ऋतून्** षड् ऋतून् **प्रशासत्** प्रकर्षेण विभक्ततया ज्ञापयत् । **अनुष्ठु** इत्येतदव्ययं सम्यक्शब्दसमानार्थं सुष्ठु इति यथा सम्यगनुक्रमेण **विदधौ** कृतवान् । षड्भिर्ऋतुभिः षडरं सुदर्शनं चक्रं निर्मितवानित्यर्थः । तथा च श्रुतिः—

'षळर आहुरर्पितम्' (ऋ॰१॰१६४॰१२) इति। तापनीये च—'षडरं वा एतत् सुदर्शनं महाचक्रं भवति तस्मात् षडरं भवति। षट्पत्रं भवति। षड् ऋतवः। ऋतुभिः संमितं भवति मध्ये नाभिर्भवति। नाभ्यां च ते अराः प्रतिष्ठिताः' (नृ. उ. १॰५॰१) इति। अयं भावः। तत्र वसन्तमध्ये विषुवे प्राचीगते सूर्ये चैत्रशुक्लप्रतिपदि संवत्सरारंभत्वेन कालचक्रारंभात् पूर्वामन्विति श्रुतेस्तात्पर्यम्। एवं षडरं सुदर्शनचक्रं निर्माय तस्मिन् काल एव तस्य नाभ्यां नीरानृसिंहक्षेत्रं स्थापितवान्।

यदागमविदामीशा विदुर्यत्र सुदर्शनम्।
तन्नाभिरेष भूगर्भे क्षेत्रराजो विराजते॥ (नृ. म. १॰३९)

तस्मिन् चक्रतीर्थं च निर्मितवानित्यर्थः। यस्मात् सर्वाणि भूतानि व्याप्नोति व्यापयति तस्मादस्यामृचि **महाविष्णुमिति** पदस्यार्थ उद्बोधितः॥ ३॥

क इमं वो निण्यमा चिकेत वत्सो मातॄर्जनयत स्वधाभिः।
बह्वीनां गर्भो अपसामुपस्थान्महान् कविर्निश्चरति स्वधावान्॥४॥

क इममिति॥ हे नृसिंह **निण्यं** निर्णीतान्तर्हितनामैतत्। वेदनिर्णयप्रतिपाद्यं पूर्वोक्तक्षेत्रमहिमानं **क आ चिकेत** को जानाति न कोऽपीत्यर्थः। यद्वा कः ब्रह्मा आचिकेत जानाति सः। **वः** युष्माकं **वत्सः** ब्रह्मा क्षेत्रसंरक्षणार्थं **मातॄः** गणपत्यंबिकादुर्गाशारदाः लिंगसमवायेन मातृसाहचर्यात् गणपतेरपि मातृत्वम्। **स्वधाभिः** स हि पितृतृप्त्यादिफलैः सह बहिर्द्वारेषु प्रदक्षिणक्रमेण पूर्वादिचतुर्दिक्षु अन्तर्द्वारेषु ता एव देवताः वामक्रमेण याम्यादिचतुर्दिक्षु द्वारपालाधिकारीरूपेण वा प्रतिमारूपेण **जनयत** निर्मितवान् स्थापितवानित्यर्थः। द्वारयात्रयापि पितृतृप्त्यादि फलं भवतीति भावः।

गणराजोंबिकादुर्गाशारदा बहिरास्थिताः।
क्षेत्रस्यास्य महाविघ्नान् संहर्तुं दिक्षु वै क्रमात्॥ इति।
(नृ. म. ३॰८)

क्षेत्रे पितृतृप्तिभिर्भवती[ति]तु किमु वक्तव्यमित्याह। **बह्वीनां गर्भः** बह्वीनां शस्त्रविषजलाग्निपर्वतादिमूर्तीनां गर्भः ताभिर्गर्भवत् संरक्षितत्वादिति भावः। **कविः** क्रान्तदर्शी कवेर्ब्रह्मणोंशत्वाद्वा कविः। **महान्** श्रेष्ठः एतादृशः प्रल्हादः। **अपसां** गदातीर्थोदकानाम् **उपस्थात्** समीपभागात् **स्वधावान्** स्वधाकारसहितपितृकर्मकारकः सन् पितृतृप्तिं कृत्वेत्यर्थः। तस्मादुपस्थात् पितृकर्मणो वा **निश्चरति** निर्गच्छति पितृतृप्त्यवशेषाभावादिति भावः। एतादृशी पितृतृप्तिः केनचिदपि न कृता। तदुक्तं भगवता--

त्रिः सप्तभिः पिता पूतः पितृभिः सह तेऽनघ॥ इति।
(भाग. पु. ७॰१०॰१८)

वरप्रदानेन हिरण्यकशिपोस्तारणात् पुत्रकार्यत्वेन 'वीरवन्तं प्र(अ)कर्त माम् (मा)' (ऐ. ब्रा. ७.१८) इति श्रुत्युक्तसत्पुत्रवाचकवीरशब्दार्थौ नृसिंहे फलित इति भावः । यस्मात् सर्वाणि भूतानि विरमति विरामयत्यजस्रं सृजति विसृजति वासयति तस्माद-स्यामृचि **वीर**मिति पदस्यार्थ उद्बोधितः ॥ ४ ॥

आविष्ट्यो॑ वर्धते॒ चारु॑रासु जि॒ह्माना॑मू॒र्ध्वः स्वय॑शा उ॒पस्थे॑ ।
उ॒भे त्वष्टु॑र्बिभ्यतु॒र्जाय॑मानात् प्र॒तीची॑ सिं॒हं प्रति॑ जोषयेते ॥ ५ ॥

अर्धर्चा नृसिंहावतारमर्धर्चा सैकतरूपद्वयावतारमाह। आविष्ट्य इति ॥ कस्मात् स्तम्भे नास्तीति हिरण्यकशिपुना आक्षिप्तेन प्रल्हादेन स्तम्भं नत्वा दृश्यत इति। उक्त-मात्र एव **स्वयशाः** स्वः स्वकीयः भक्त एव रक्षणीयं यस्य सः तद्वचः सत्यत्वसंपादने-नेत्यर्थः । भक्तप्रतिज्ञापालनेनैव यशस्वीति भावः । एतादृशोऽयं नृसिंहः निजभृत्यभाषितं सत्यं कर्तुं सर्वत्र स्वस्य च व्याप्तिं दर्शयन् **उपस्थे** समीपवर्तिनि स्तम्भे **आविष्ट्य** आविर्भूतः । कीदृशः नृसिंहः । **चारुः** सुंदरत्वेन मनुष्यः । **जिह्मानां** तिर्यक्जातीनां मध्ये **ऊर्ध्वः** उत्कृष्टः सिंहः । 'न मृगो न मनुष्य' इति अद्भुतरूपेण प्रकटस्वरूपो बभूव। तदुक्तम्–

> सत्यं विधातुं निजभृत्यभाषितं व्याप्तिं च भूतेष्वखिलेषु चात्मनः ।
> अदृश्यताद्भुतरूपमुद्वहं स्तम्भे सभायां न मृगं न मानुषम् ॥ इति।
>
> (भाग. पु. ७.८.१८)

यद्वा **चारुः** सुंदरः सिंहमुखोऽपि रमणीयः । यद्वा **जिह्मानां** परस्परविरुद्धगतीनां हिरण्यकशिपुप्राणानाम् **ऊर्ध्वः** ब्रह्मरन्ध्रभेदेन ऊर्ध्वं नीतत्वाद् ऊर्ध्वः ।

यद्वा **जिह्मानां** वक्त्राणां (वक्राणां) स्वनखानाम् **ऊर्ध्वः** वनमालावैजयंती-कौस्तुभेभ्योऽप्यतितरां भूषणरूपाणि प्रियाणि च हिरण्यकशिपोरन्त्राणि कण्ठे धारयितुम् ऊर्ध्वं मस्तकोपरि नीतत्वात् ऊर्ध्वः ।

यद्वा **जिह्मानाम्** अनृजूनाम् अधोगतिमतां संसारिणां करावलंबेन उद्धर्तुं **ऊर्ध्वः** ऊर्ध्वं सिंहासने स्थितः । एतादृशो नृसिंहः **आसु** मातृषु मातॄणां गणपत्यंबिकादुर्गाशारदानां मध्ये मध्यवर्तिनि नीरानृसिंहक्षेत्रे दीनवात्सल्यतया **वर्धते** उत्कर्षेण जयतीत्यर्थः ।

यद्वा अस्य **उपस्थे** समीपवर्तिनि कोटितीर्थे **स्वयशाः** स्वस्य आत्मनः नृसिंहस्य यशः गेयं यस्य सः एतादृशो नारदः अस्तीत्यर्थः । **उभे** नृसिंहरूपे सृष्टिकाले **त्वष्टु**-र्ब्रह्मणः। अथ च तदनन्तरं **जायमानात्** जनिष्यमाणात् त्वष्टुः ब्रह्मणोंशात् प्रल्हादा-दित्यर्थः **बिभ्यतुः** भक्तपारवश्यत्वेन तद् याञ्चाभङ्गात् भयं प्रापतुः । अतः 'स्थातव्यं भुवि देवेश रूपेणानेन सर्वग ' (नृ. म. ३·४३) इति ब्रह्मप्रार्थनां ' स्वामिन्ननेन रूपेण विशास्यां प्रतिमां भुवि' (नृ. म. ४·३२) इति प्रल्हादप्रार्थनां स्वीकृत्य ' विधेऽद्यारभ्य

तिष्ठामि भुवि लोकहितंकरः' (नृ. म. ३·४५) इति ब्रह्माणं प्रतिज्ञाय । 'तथास्तु प्रतिमायां ते स्थास्याम्यद्यावधि [स्वकान्]' (नृ. म. ४·३६) इति प्रल्हादं प्रतिज्ञाय। **प्रतीची** प्राङ्मुखावर्चकौ तौ ब्रह्मप्रल्हादौ । प्रति अञ्चतः प्रतिगच्छतः प्रतीची तयोरभिमुखत्वेन प्रत्यङ्मुखे स्थिते सती **सिंहं** नृसिंहं **जोषयेते** सेवेते नृसिंहरूपे भूत्वा स्थिते इत्यर्थः । जुषी प्रीतिसेवनयोः स्वार्थे णिच् । यद्वा **उभे** नृसिंहरूपे **त्वष्टुर्**दीप्तिमतः उदितस्य सूर्यस्य **जायमानात्** जनिष्यमाणात् अस्तादित्यर्थः । **बिभ्यतुः** सूर्यास्तादनन्तरं पूर्वं वा हिरण्यकशिपोर्वधो भविष्यति इत्यनवधानतः कालव्यत्ययेन ब्रह्मवरस्य मिथ्यात्वापत्तेर्भयं प्रापतुः । अतो रवेरर्धास्तकालप्रतीक्षार्थं तदवधानतया प्रतीची तदभिमुखत्वेन प्रत्यङ्मुखे सती सिंहं नृसिंहरूपं **प्रति जोषयेते** प्रत्यङ्मुखे आसाते इत्यर्थः । भविष्यदवताराभिप्रायेण अवतरिष्यन्तं नृसिंहं प्रति हिरण्यकशिपोर्वधे एवं सूचयति तिष्ठत इति भावः । 'धाता यथापूर्वमकल्पयत्' (ऋ १०·१९०·४) इति अवताराणां च तथा च श्रुत्युक्तनृसिंहादिमन्त्राणां च प्राचीनत्वेन ब्रह्मप्रल्हादयोर्वधहरत्वमभिप्रेतं विज्ञाय नारायणनारदौ जीवबंधहरार्थत्वान्नृसिंहमंत्रमेवोपदेशतुः । ततः सैकतप्रतिमार्चनं(न)पूर्वकं मन्त्रं जपतोस्तयोरग्रे प्रतिमयोः प्रादुर्भूतो नृसिंहस्ताभ्यामनेन रूपेण स्थापितमिति प्रार्थितः सन् तथास्त्विति प्रतिज्ञाय स्वावतारात् पूर्वम् एव सैकतमूर्तिद्वयरूपेण नीरानृसिंहक्षेत्रे स्थितवानिति हेतोरनयोः सैकतमूर्त्योः प्रतिमात्व न शंकनीयं सावयवप्रतिमायाः पृथक्भूतावयवपूजने फलाभावात् शालग्रामशिलायाम् अवयवाभावेन शिलात्वसामान्यात् पृथक्भूतशकलेऽपि पूजनीयत्वम् । अत्र तु केनचिन्महता भाग्योदयेन सैकतरूपान्नृसिंहात् पृथक्भूतस्यापि सैकतरजसः प्राप्तौ तत्पूजने सर्वफलावाप्तेः । अतः स्वाज्ञानदृष्टया प्रतिमारूपेण भासमानमपि सच्चिदानन्दरूपं साक्षान्नृसिंहाभिन्नस्वरूपमेवेदं सैकतमूर्तिद्वयं महतां प्रतीत्यापीति भावः । यस्मात् सर्वेषां भूतानां वीर्यतमश्च सिंहो वीर्यतमः श्रेष्ठ तमश्च । तस्मान्नृसिंह आसीत् । तस्मादस्यामृचि सिंहपदोच्चारात् **नृसिंह**मिति पदस्यार्थ उद्बोधितः ॥ ५ ॥

उ॒भे भ॒द्रे जोष॑येते॒ न मेने॒ गावो॒ न वा॒श्रा उप॑ तस्थुरे॒वैः ।
स दक्षा॑णां॒ दक्ष॑पतिर्बभूवा॒ञ्जन्ति॒ यं द॑क्षिण॒तो ह॒विर्भिः॑ ॥ ६ ॥

उभे भद्रे इति ॥ **उभे** नृसिंहरूपे **भद्रे** भद्ररूपे भद्रप्रदे कल्याणप्रदे इत्यर्थः । **मेने** स्त्रियौ **न** इवार्थे मातराविवेत्यर्थः। एवं भक्तं **जोषयेते** प्रीतिं कुर्वाते जुषी प्रीतिसेवनयोः । अपि च **वाश्राः** हंभारवं कुर्वन्त्यः **गावो न** गाव इव **एवैः** स्वकीयैश्वरित्रैः आदरातिशयेन स्वकीयान् वत्सान् **उप तस्थुः** संगच्छन्ते तथा इमं भक्तम् इमं (इमे) नृसिंहरूपे उपस्थिते भवतः । पूर्वं सेवनमात्रमुक्तम् इदानीं यु(यू)र्गोनि(र्नि)दर्शनेन तत्रैवादरातिशयो द्योत्यते । अतः **स** भक्तः **दक्षाणां** सर्वेषां बलानां **दक्षपतिर्बभूव** बलानां मध्ये यदतिशयितं बलं तस्याधिपतिर्बभूवेत्यर्थः । **यं** भक्तं **दक्षिणतः** दक्षिणदिग्भागे लक्ष्मीतीर्थम् ।

एवमस्तु विशालाक्षी(क्षि) तीर्थेऽस्मिन् सर्वदा प्रिये ।
सदा स्थास्यामि भवतीमङ्के कृत्वा वरानने ॥ इति ।
(नृ. म. ५·१२)

नृसिंहस्याङ्कस्थितायाः लक्ष्म्याः परिचारिकाः अणिमादिसिद्धयः **हविर्भिः** देवयोग्यभक्षभोज्यादिभिः **अञ्जन्ति** आर्द्रीकुर्वन्ति तपयन्तीत्यर्थः । यस्मात् स्वयं भद्रो भूत्वा सर्वदा भद्रं ददाति । तस्मादस्यामृचि भद्रपदोच्चारात् **भद्र**मिति पदस्यार्थ उद्बोधितः ॥ ६ ॥

उद्यंयमीति सवितेव बाहू उभे सिचौ यतते भीम ऋञ्जन् ।
उच्छुक्रमत्कमजते सिमस्मान्नवा मातृभ्यो वसना जहाति ॥ ७ ॥

उद्यंयमीतीति ॥ **सवितेव** अतितेजीयान् **भीमः** भीषणो नृसिंहः **बाहू** बाहुस्थानीये अस्य द्विभुजत्वात् बाहुरूपके **सिचौ** सिञ्चन्त्यौ जलेन पृथ्वीम् आर्द्रीकुर्वन्त्यौ वा फलेन संयोजयन्त्यौ **उभे** नीराभीमरथ्यौ **उद्यंयमीति** उत्कृष्टत्वेनाभिमुखीकरोति । अनेनास्य प्रत्यङ्मुखत्वं द्योत्यते । ते नीराभीमरथ्यौ **ऋञ्जन्** प्रसाधयन् संगमेनालंकुर्वन्तित्यर्थः । **यतते** स्वव्यापारे भक्तकामपूरणादौ प्रवर्तते । **सिमस्मात्** सर्वस्मात् सिमशब्दः सर्वशब्दपर्यायः सर्वतीर्थेभ्यः **अत्कं** सारभूतं **शुक्रं** जलं शुक्रमिति जलनाम **उदजते** उत् उत्कृष्टं अद(ज)ते आदत्ते स्नानाद्यर्थमित्यर्थः । तथा **मातृभ्यः** गणपत्यंबिकादुर्गाशारदाभ्यः **नवा** नवानि **वसना** वसनानि स्वतेजसा सर्वस्य जगतः आच्छादकानि गुप्तिकराणि स्वायुधानि क्षेत्रसंरक्षणसहाय्यार्थं विदु(दि)क्षु **जहाति** उद्गमयति स्थापयतीत्यर्थः । सिंहो न भीम आयुधानि बिभ्रत् (ऋ. ४·१६·१४) इति श्रुतेः । अत्रायुधानामभावेऽपि मातृभ्य इति मातृसहायत्वेन क्षेत्रे(त्रै)काधिकरणत्वेन च स्वानुरूपप्रभावद्योतकत्वेन च भगवदायुधान्येव । अपरश्रुत्यायुधनामोच्चारात् भीमपदेन चोभयोः श्रुत्योरेकार्थत्वाच्चेति भावः । यथा 'सितासिते सरिते यत्र संगथे' (ऋ. १०·७५ इत्यत्र परिशिष्टत्वेन पठिता ऋक्) इत्यत्र गंगायमुनयोर्नामाभावेऽपि प्रयागक्षेत्रनामाभावेऽप्यर्थबलेन प्रयागक्षेत्रार्थो विवक्षितः । तथा 'उभे सिचौ यतते भीम ऋञ्जन्' (ऋ. १·९५·७) इत्यत्रापि नीराभीमरथ्योर्नामाभावेऽपि नृसिंहक्षेत्रनामाभावेऽप्यर्थबलेन नीरानृसिंहक्षेत्रार्थो विवक्षितः । तद्यथा । **उभे द्वे सिचौ** सिञ्चन्त्यावित्यार्द्रीकरणधर्मत्वेन नद्यौ भीमपदेन मंत्रराजोक्तो भीषणो नृसिंहस्तत्संबन्धेन नीराभीमरथ्यावेव तदुभयसंबन्धेन च नीरानृसिंहक्षेत्रमेव विवक्षितं दक्षिणप्रयागत्वेनेति भावः । द्वे विरूपे (ऋ. १·९५·१) इत्यत्र सर्वक्षेत्रेषु रूपद्वयाभावादिदमेव क्षेत्रम् । धन्वन्त्स्रोतः (ऋ. १·९५·१०) इत्यत्र नीराप्रावाह्यरूपार्थत्वेन च नृसिंहतीर्थादिद्योतकत्वेन चेदमेव क्षेत्रं विवक्षितम् । इदं च सूक्तं नीरानृसिंहपर(रं) नीरानृसिंहक्षेत्रार्थद्योतकत्वेनेति भावः । यस्मात् भीमो हि भीषणः मन्त्रे भीमपदोच्चारात् **भीषण**मिति पदस्यार्थ उद्बोधितः ॥ ७ ॥

त्वेषं रूपं कृणुत उत्तरं यत् संपृञ्चानः सदने गोभिरद्भिः ।
कविर्बुध्नं परि मर्मृज्यते धीः सा देवताता समितिर्बभूव ॥ ८ ॥

त्वेषं रूपं इति ॥ **सदने** स्वगृहे नृसिंहपुरे **गोभिः** कामधेनुभिः ' पयसा स्नापयित्वेशं गावो दक्षिणतः स्थिता ' इत्युक्तेः । **अद्भिः** नीराभीमोदकैः सह **संपृञ्चानः** युक्तः सन् **त्वेषं** दीप्तं । ' दीप्ताय दीप्तरूपाय प्रदीप्ताय प्रलोभिने ' इति । **उत्तरम्** उत्कृष्टतरं रूपम् । यद्वा **उत्तरं** उत्तरदि[ग्] भागस्थं भानुतीर्थे भानुरूपं **यत्** यदा **कृणुते** करोति । तदारभ्य **धीः** सर्वेषां धारकः बुध्यधिष्ठिता वा **कविर्ब्रह्मा बुध्नं** स्वस्य मूलभूतं श्रीनृसिंहं सर्वैर्देवैः सह **परि** परितः **मर्मृ[र्मृ]ज्यते** धीः प्रेम्णांगस्पर्शं कुर्वन् स्नानादिभिः पूजयतीति भावः । **सा देवताता** देवैस्तता विस्तारिता **समितिः** सभा समाजो वा **बभूव** ब्रह्मा सहा(ह)गणैः सहात्रागत्य वैशाखीयात्रायां सोमश्रवणयोगे दैनंदिनीयात्राया (यां) वैकुण्ठोत्सवादिकं भगवदाज्ञयैव कुरुत इति भावः ।

तत्र यूयं समायातः (ताः) [सर्वे] मन्त्रक्रियाफलैः ।
द्रष्टुं भीमाद्रवायोगं मया सर्वार्थसाधकम् ॥ इति ।

(नृ. म. १·३२)

भगवद्वचनादित्यर्थः । यस्मायं सर्वे देवा नमन्ति तस्मादस्यामृचि **नमामि** इति पदस्यार्थ उद्बोधितः ॥ ८ ॥

उरु ते ज्रयः पर्येति बुध्नं विरोचमानं महिषस्य धाम ।
विश्वेभिरग्ने स्वयशोभिरिद्धोऽदब्धेभिः पायुभिः पाह्यस्मान् ॥ ९ ॥

उरु ते ज्रय इति ॥ **उरु** विस्तीर्णं । ' पञ्चक्रोशं हरिपुरं नगरं योजनत्रयम् ' (नृ. म. ३·७) इति । **महिषस्य** महिषासुरस्य **ज्रयः** अभिभवकारि दुर्गाधिष्ठितदुर्गातीर्थयोगादित्यर्थः । **विरोचमानं** दीप्यमानम् । यद्वा विना पक्षिणा गरुडतीर्थेन च रोचमानम् । **ते** तव **धाम** स्थानं श्रीनृसिंहपुरं कर्तृ **बुध्नं** स्वस्य मूलभूतं वैकुण्ठं प्रति **विश्वेभिः** सर्वैः **स्वयशोभिः** स्वकीयैर्यशोभिः **पर्येति** व्याप्नोति । वैकुण्ठस्था अपि इदं नृसिंहपुरं स्तुवन्तीत्यर्थः ।

एतत् पुरा महाकल्पे ब्रह्मणोंबुजशायिनः
अनुग्रहायाविरभूद्दिव्यं भुवि महाद्भुतः ॥ इति ।

(नृ. म. ३·१३)

कीदृशैः स्वयशोभिः ॥ **पायुभिः** [पालन] शक्तैः ।

न कलिर्न च वा कालो नाधिर्न व्याधिरुल्बणा ।
[यत्र जागर्ति] चण्डोग्रो मृत्युमृत्युर्नृकेसरी ॥

पुनः कीदृशैः स्वयशोभिः [अ] **दब्धोभिः** पिशाचादिना अहिंसितैः। पिशाचमोचनतीर्थे यो [जने ?] पीडापरिहारकैः। इत्यर्थः। हे **अग्ने** अग्रनेतः आदिगुरो श्रीनृसिंह **इद्धः** देदीप्यमानः सन् **अस्मान् पाहि** संरक्षेत्यर्थः। यस्मात् स वा (वै)[कुण्ठादिलो] कान् स्वतेजसा व्याप्नोति तस्मादस्यामृचि **ज्वलन्त**मिति पदस्यार्थ उद्बोधितः ॥ ९ ॥

धन्व॒न्त्स्रोतः॑ कृणुते गा॒तुमू॒र्मिं शु॒क्रैरू॒र्मिभि॑र॒भि न॑क्षति॒ क्षाम् ।
विश्वा॒ सना॑नि ज॒ठरे॑षु धत्ते॒ऽन्तर्नवा॑सु चरति प्र॒सूषु॑ ॥ १० ॥

धन्वन्त्स्रोत इति॥ धन्वान्तरिक्षनाम **धन्वन्** ध्वन्वन्यन्तरिक्षे **स्रोतः** नीराप्रवाहः नीरोदकं वा। स्रोत इत्युदकनाम। पर्वताग्रादुत्पन्नत्वाद्वा

इतोऽहं द्रवरूपेण स्वां शक्तिं प्रेरयन्त्सुराः।
तमद्य द्रवरूपेण क्रीडन्तं समुपैमि भो ॥

इति विष्णुवचनात्। वैकुण्ठादागतत्वाच्च स्वै **शुक्रैः** निर्मलैः **ऊर्मिभिः ऊर्मिं** शिवस्य क्रोधोर्मिं **गातुं** गमनशीलं गंतुकामुकमित्यर्थः। **कृणुते** करोति तदर्थं **क्षां** भूमिम् **अभिनक्षति** व्याप्नोति। ततश्च तत्स्रोतः नीरोदकं स्वस्मिन् स्नानदानादिना जनानां **जठरेषु विश्वा** सर्वाणि **सनानि** अन्ना[नि] सर्वाण्यकानि **धत्ते** अवस्थापयति च। परं तदुत्पन्नासु [**नवासु** नू] तनासु **प्रसूषु** पुत्रादीनां प्रसवित्रीषु संततिषुफलोन्मु [ख] रूपेण तत्पुत्रपौत्रादिप्रसवार्थम् **अन्तश्चरति** अन्तः स्थितत्वा सं [चारं] करोतीत्यर्थः।

'नयनीसर्वभावानां नीरा या कथ्यते बुधैः'॥ (नृ. म. २·३) '[नीरा सर्व] प्रदा पुण्या पुण्यवद्भि रवाप्यते'॥ इति। यस्मात् सर्वस्य पूर्वज[नितशु]भदाता अहंशब्दस्य अन्नवाच्यत्वं तापिन्यां तस्मादस्यामृचि म (अ)हमिति पदस्यार्थ उद्बोधितः ॥ १० ॥

ए॒वानो॑ अग्ने स॒मिधा॑ वृ॒धा॒नो रे॒वत् पा॑वक॒ श्रव॑से॒ वि भा॑हि ।
तन्नो॑ मि॒त्रो वरु॑णो मामहन्ता॒मदि॑तिः॒ सिन्धुः॑ पृथि॒वी उ॒त द्यौः ॥ ११ ॥

एवानो इति ॥ अग्न इति हे **अग्ने** अगं जडं विश्वं नयं नयति प्रवर्तयतीत्यग्नि-[रित्यस्यशब्द]स्य संबोधनं हे अग्ने विश्वप्रवर्तक **पावक** श्रीनृसिंह त्वं **समिधा** समिन्मात्रेण एव। 'तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्' (मुण्डकोपनिषद् १·२·१२) इति। समित्पाणिं शिष्यं शरणागतं दृष्ट्वा कृपया **वृधानः** वर्धमानः यतस्त्वं सर्वेषां गुरुरूपोऽसि योगारूढत्वात् एतादृशस्त्वं **रेवत्** रयिमते धनयुक्त (क्ता)य **नः** अस्माकं **श्रवसे** अन्नाय यशसे च **वि भाहि** विशेषेण [दीप्यस्व] अस्माकं तादृगन्नं यशश्च प्रयच्छ। **नः** अस्माकं तदन्नं यश [श्च] **मित्रः**

सूर्यः **वरुणः अदितिः** स्वपुत्रैः देवैः सहेत्यर्थः। सिन्धुः [नदी] भिः सहेत्यर्थः। **पृथिवीं** (वी) **द्यौश्च** उपलक्षणमेतत्। सर्वेऽपि [मित्रादयः] त्वदाज्ञया सर्वतोमुखत्वेन **मामहन्तां** पूजयन्तां रक्षन्त्विव [त्यर्थः। उ] **त**शब्दः समुच्चये। यस्मात् सर्वतः पश्यति सर्वतः शृणोमि (ति) [सर्वतो गच्छ] ति तस्मादस्यामृचि **सर्वतोमुख**मिति पदस्यार्थ उद्बोधितः॥ ११।

इत्यस्मिन् सूक्ते अग्निसंबुध्याग्निसूक्तमेवेति चेदत्र [स्वा]नुरूपैश्वर्यासंभवादग्निशब्दोक्तो नृसिंह एव। यद्वा ' [हिरण्य] मवधीः पूर्वं कंसं वा कैटभं वद।' इत्यत्र स्तावकत्वेन नृसिंह[सह]जा स्तूयते। तद्वत्कर्मांगदेवतात्वादर्थवादत्वेन नृसिंहगुणै [रग्निः] स्तूयते। यद्वा धात्रीभिर्दोलस्थनृपबालो नृपगुणैरै (रे) व गी [यते तद्व] च्छ्रुतिभिर्नृसिंहगुणैरेवाग्निर्गीयते। गुणास्तु नृसिंही(नि)नीरानृसिंहेति भावः॥

यद् द्वे विरूपे इति सूक्तमृक्षु चकार [तास्वेव] सुबोधभाष्यम्।
यः स्वीय**कृष्णाख्य**मुखेन सोऽयं श्रीमन्नृसिंहः स्वकृतेन तुष्यात्॥ १॥

पदवाक्यप्रमाणादिग्रंथबाहुल्यभावितः।
न चात्र लिखितं प्रायो यतः सर्वविदो बुधाः॥ २॥

विद्यारण्यमुनेर्भाष्ये यो यो र्ज्ञा (ज्ञा) नाय साधतः।
यद्यदन् संशयः कश्चित्तत्र पश्यन्तु सूरयः॥ ३॥

श्रीलक्ष्मीनृसिंहार्पणमस्तु। श्रीमद्दिव्यलक्ष्मीनृसिंहार्पणमस्तु॥

---

2 THE RENDITION OF CHAUL

(By Anthony D'Costa, S. J.)

The fall of Bassein on 16 May 1739 is a well-known landmark in Indian history; but the surrender of Chaul, which resulted in the completion of the Maratha occupation of the region seems to have passed unnoticed till now. This paper intends to narrate summarily how the surrender came about. The story can be neatly pieced together from information supplied by the official 'Diaries' of the Bombay Government. For the English acted as intermediaries between the Marathas and the Portuguese in this transaction and hence each stage of it is noted in the 'Diaries'.

While moving forward to the final assault on Bassein, the Marathas also launched an attack on Goa and penetrated into Salsette, and they threatened the city of Goa itself.

After the fall of Bassein, the Maratha ally Khem Savant (?) invaded Bardes and annihilated the small band of Portuguese defenders.

The Portuguese had till now been living on the hope that reinforcements would be forthcoming from Portugal. But that hope was dashed to pieces when, on 25 November 1739, it was seen that just one ship had come out from Portugal, bringing scarcely any succour. Accordingly, on 29 November, the Viceroy wrote to the Governor of Bombay, saying that he had decided to hand over Chaul to Shāhū, and asking the English to negotiate on his behalf with the Maratha Court. The Bombay Government was ready to use their good offices; but the fall of Bassein had brought the Peshwa Bājīrāo and his brother Chimṇājī to their doorstep. and they were afraid of offending these two by offering the fort to Shāhū instead of to them. They conveyed their feelings to the Viceroy, who fell in with their views and left the matter entirely in their hands.

So the Bombay Government despatched a certain Capt. James Inchbird, who had an interview with Bājīrāo and Chimṇājī while they were encamped at Ahmednagar. They told the Englishman that they were sure of capturing the remaining Portuguese possessions, and that if the Portuguese wanted peace they would have to accept their terms, which were: they were to cede all the revenue of Daman and 40 % of the revenue of Goa; they had to pay 5 lakhs of rupees and surrender two places as a security for the 40% of the revenue of Goa. Capt. Inchbird on his side pressed for the acceptance of the Portuguese terms, namely: the Portuguese would cede Chaul and the Marathas were to yield in return two *parganas* for the support of the fortress of Daman. Finally Bājirāo withdrew his demand for a share of the revenue of Goa and the five lakhs of rupees, and agreed to give up one *pargana* in return for Chaul; but the Portuguese were to help the Marathas in their expeditions into Karnatak.

Meanwhile the Portuguese emissary to the Court of Poona, a certain Nāro Rām, had returned to Goa, bringing the news that Bājīrāo had marched out with his troops. The Viceroy thereupon thought it better not to be in a hurry to

hand over Chaul. However the Governor of Bombay impressed upon him that the Marathas were in a position to attack the city of Goa and this opportunity of coming to terms with them might never recur again. The Governor offered to use his good offices with the Marathas, but insited that the Viceroy should appoint his own plenipotentiary to negotiate the treaty. The commandant of Chaul, Baron Francisco de Gallenfells, was accordingly appointed to act as such.

At this juncture Nāsir Jang, the son of Nizām-'ul-Mulk informed the Viceroy from Aurangabad that the Mughal forces had gained a victory (over Bājīrāo ?) and several Maratha officers had gone over to the Mughals. But not being quite sure of the news, the Viceroy asked the Governor of Bombay to proceed with the negotiations as he thought best.

The Bombay Government appointed Capt. James Inchbird to help Baron de Gallenfells in dealing with the Marathas. The party sailed from Bombay on 1 May 1740 for Colaba, where Chimṇājī was encamped, having come to help Mānājī Āṁgre against his elder brother Sambhājī. The negotiations got under way, and the differences between the two sides were bridged; but for the unwillingness of the Marathas to yield four *parganas*, which is what the Portuguese were now asking in return for Chaul. As for the Maratha demand for religious freedom in Goa, the impression of the Bombay Government was that "it is a point the Portuguese superstition will never concede to, but on the other hand it is a point the Morattas seem very indifferent about." The negotiations came to a standstill for the moment, because Baron de Gallenfells felt that he could not make any concessions on the subject of the *parganas* without express authorisation from Goa.

Chimṇājī invited Capt. Inchbird to a private interview and informed him at some length of the kind of complaints the Marathas had against the Portuguese. They related mainly to the denial of religious freedom, the Christian upbringing of Hindu orphans, and the Inquisition. As Bājīrāo had died shortly after the commencement of negotiations, Chimṇājī told Inchbird that it was necessary for him to leave

for Poona in order to strengthen the position of his nephew, the new Peshwa Bāḷājī Bājīrāo.

Chimṇājī's complaints against the Portuguese about religious oppression sound somewhat curious if we consider the course taken by the Hindu *bhandaris* of Chaul. When they saw the Portuguese preparing to abandon the place, they petitioned the Bombay Government to be allowed to come and settle in the island. "Your petitioners and their forefathers," they said, "for many generations past have lived under the Portuguese Government at Chaul, and have hitherto maintained the character of true and faithful subjects to that Government." They went on to relate how they had suffered from the raids of Monājī Angre, and declared their readiness to risk their lives in the Portuguese cause if only they had the means of subsistence. The English not only granted their request, but positively encouraged them to come over by offering small presents to their headmen.

In July Chimṇājī insisted that the negotiations should be resumed and speedily concluded. Accordingly Baron de Gallenfells and Capt. Inchbird left for Poona. It was arranged that in return for Chaul the Marathas would cede the *pargana* of Nehar to the Portuguese for the upkeep of the fortress of Daman. Since the contracting parties did not trust each other, it was agreed that the Portuguese would in the first instance relinquish Chaul into the hands of the English. The Marathas would then vacate Goa and only after that would Chaul be made over to them. The treaty was forwarded to the Viceroy, who ratified it on 14 October 1740. The Siddi of Janjira protested to the English against the handing over of the fort to the Marathas; but they explained to him that it could not be helped.

For the moment the Portuguese garrison showed itself willing to continue at Chaul under the English, and so on 28 October a force of just two hundred and four men was sent over from Bombay under the command of Capt. Inchbird. But shortly afterwards, fire broke out accidentally in the Dominican monastery, whereupon the Marathas seem to have warned the Portuguese against any attempt to burn the place. Baron de Gallenfells seized the occasion to play on the

feelings of the English, telling them that the Franciscans were capable of intentionally setting their house on fire. Fearing perhaps that the Portuguese soldiers would make common cause with the friars, the Bombay Government evacuated them, thirteen families in all, and brought them over.

It was now twenty-five days since the English had assumed charge of Chaul, and no message had as yet come from Goa. So the Governor wrote to the Viceroy, telling him that they could not hold Chaul for longer than a month. If by that time the Marathas had not withdrawn from Goa, he should reoccupy Chaul. After a fortnight he received the Viceroy's answer, saying that the Marathas had left Goa and he could therefore hand over Chaul. On 20 December 1740 Capt. Inchbird brought his troops back to Bombay, "having delivered that place to the persons appointed by the Morattas [!], to the entire satisfaction of both partys."

From the fears expressed by the Portuguese commander at the time of the fire in Chaul, one would have expected the friars also to leave the place. But they stayed on, both the Dominicans and the Franciscans, and continued to minister to the Christians of the place. The Franciscans, moreover, were called time and again to Poona to minister to the Christians serving in the Maratha army. The Peshwa used to interest himself personally in the matter and a Franciscan report of 1799 tells us that, if Chaul was left for any length of time without a priest of their Order, the Peshwa used to press them to appoint one. As late as 1804, when the Marathas were trying hard to counter Wellesley's moves to subjugate them, we learn from the Franciscan Provincial that one of his men even accompanied the Maratha armies far into the interior. He says that at that date a Franciscan "finds himself in the very heart of the dominions of the Maratha ruler, accompanying the army of his general Sindo [Sindia] ...... I was requested to send him as a missionary to the vast country of Idarbole [Vidarbha ?] which was bereft of a pastor, and there he also administers the holy sacraments to the Catholics of the same army, and besides calls many others to the bosom of holy Church."

Bibliography : Maharashtra State Archives, Public Dept., Diaries, Nos. 12A-13C.
Indica (Heras Institute) I,178f. 181.

३ ज्ञानेश्वरी–अधिक ओव्यांची विटे प्रत

(श्री. भा. पं. बहिरट, पंढरपूर)

१. तीन महिन्यांपूर्वी विटे येथें गेलों होतों. तेथें श्री. आण्णासाहेब इनामदार या वयोवृद्ध व अभ्यासू सज्जनांकडे हस्तलिखितांचा संग्रह पाहाण्यांत आला. त्यांजकडेच पूर्वी 'अनुभवामृत–राष्ट्रभाष्या 'चें हस्तलिखित होतें. तें त्यांनीं म. म. दत्तोपंत पोतदारांकडे दिलें होतें. गतवर्षीच सदर टीका पंढरपूर संशोधन मंडळातर्फे प्रकाशित झाली होती. श्री. आण्णासाहेबांची समक्ष भेट अद्याप नव्हती म्हणून मुद्दाम विट्यास गेलों होतों. त्यांच्या जवळील संग्रहांत हस्तलिखित ज्ञानेश्वरी होती. ती त्यांनीं मजकडे दिली त्यामुळें आनंद वाटला. सदर प्रत चाळून पहातां त्यांत अनेक ओव्या प्रचलित प्रतीपेक्षां अधिक आढळल्या म्हणून सदर प्रतीची माहिती देत आहे.

२. या हस्तलिखित प्रतींत काल अगर लेखक याचा उल्लेख नाहीं. पोथीचा आकार ५·५″ × ११·९″ आहे. अक्षर अत्यंत सुंदर, रेखीव व सुवाच्य आहे. कांहीं ठिकाणीं प्रचलित उकाराहून निराळा उकार लिहिला आहे. उदा० "जू" ऐवजीं "ज़ु"–तसेंच "ष्ण" हें अक्षर "ष्टण" असें लिहिलें आहे. अक्षरें तोडलेलीं नाहींत. प्रत्येक पानास दोन्ही बाजूस तांबडी दुरेघी असून ओवीचा प्रत्येक चरण संपल्यावरहि तांबड्या दोन रेघा आहेत. प्रत्येक पृष्ठावर १० ओळी आहेत. मात्र अध्यायसमाप्तीच्या पृष्ठावर जेवढा मजकूर असेल, त्या बेतानें कमी ओळी आहेत. शाई काळी वापरली असून अक्षर शेवटपर्यंत सारखें आहे. कागद पांढरा असून त्यावर उदकचिन्हें (वॉटर मार्क्स) दिसतात. लेखकानें ऱ्हस्व–दीर्घाकडे विशेष लक्ष दिलेलें दिसत नाहीं. सुमारें १५० वर्षांपूर्वीची प्रत असावी. या प्रतीचा उल्लेख सरकारी अगर इतर छापील प्रतींत आढळत नाहीं. त्यामुळें त्यांच्या पहाण्यांत ही प्रत आली नाहीं, असें दिसतें.

३. या प्रतींत एकनाथकृत ओव्या नाहींत. यावरून ही प्रत ज्या प्रतीवरून नक्कल केली गेली असेल, तीत या ओव्या नसाव्यात. पहिल्या अध्यायाची सुरुवात—

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यां नमः ॥ जन्माद्यस्य यतो० ॥ १ ॥ वसुदेवसुतं देवं० ॥ २ ॥ पार्थाय प्रतिबोधितां० ॥ ३ ॥ ॐ नमोजी आद्या ॥...

शेवट पुढीलप्रमाणें आहे. पसायदान संपल्यावर पुढील ओव्या आहेत.

ऐंसे युगी परिकली । आणिले ह्मराष्ट्र मंडळी । श्री गोदावरी जवळी ॥ निवासस्थान ॥ ६७ ॥ तें त्रिभुवनैकपवित्र ॥ अनादिपंचक्रोशक्षेत्र ॥ जेथे जगाचे जोवसुत्र ॥ श्रीमहाळसादेवी ॥ ६८ ॥ येथे यदुवंशविलासु ॥ जो सकळकळा निवासु ॥ न्यायते पोसी क्षितिशु ॥ श्रीरामचंद्र ॥ ६९ ॥ तया महेशान्वयसमत्ते ॥ श्रीनिवृत्तिनाथसुते ॥ केलें ज्ञानदेवे गिते ॥ देशिकार लेणे ॥ ७० ॥ एवं भारताचा गावी ॥ भीष्मनाम प्रसिद्ध पर्वी ॥ श्रीकृष्णार्जुने-

बरवी ॥ गोष्टी केली ॥ ७१ ॥ तें उपनिषदाचे सार ॥ सर्वशास्त्राचे माहेर ॥ परमहंसी सरोवर ॥ जेविजे जे ॥ ७२ ॥ तिये गितेचा कळसु । संपूर्णअष्टादशु ॥ ह्मणे निवृत्तिदासु ॥ ज्ञानदेवो ॥ ७३ ॥ आता कळसापरतें काही । बोलावेयीयें ठांई ॥ म्हणोनि पुरेवाई ॥ वाढवावे किती ॥ ७४ ॥ परी पुढती पुढती ॥ यीया ग्रंथपूर्णसंपत्ती ॥ सर्वसुखीसर्वभुती ॥ संपूर्ण होयिजे ॥७५॥ शकें बारा शतें बारोत्तरें ॥ तैटी केली ज्ञानेश्वरे ॥ श्रीसच्चिदानंदबाबा अदरे ॥ लेखकु जाला ॥ २०७६ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवग्दीतासुपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे गीतार्थमोक्षयोगोन्ना मअष्टादशोध्यायः ॥ १८ ॥ संपूर्णमस्तु ॥ छ ॥ वोव्या २०७६ श्लो. ७८ एवं ॥

४. वरील प्रतींतील प्रत्येक अध्यायांतील ओव्या पंढरपूर संशोधन मंडळाचे उत्साही कार्यवाह श्री. शं. रा. बडवे यांच्या सहाय्यानें दांडेकर छापील प्रतीशीं ताडून पाहतां प्रत्येक अध्यायांत अधिक ओव्या आढळल्या. अशा अधिक असणाऱ्या ओव्यांची अध्यायवार संख्या पुढीलप्रमाणें कंसात दिल्या आहेत. १ (२५), २ (५६), ३ (५४), ४ (१), ५ (५४), ६ (५४), ७ (५४), ८ (५१), ९ (२८), १० (२०), ११ (६४), १२ (१०), १३ (४५), १४ (४), १५ (१), १६ (४५), १७ (४१), १८ (२६७).

सर्व अठरा अध्यायांत मिळून अधिक असणाऱ्या ओव्या ८७४ आहेत. पाठ भेदांची स्वतंत्र पहाणी करावयाची आहे. पाठभेदहि बरेच आहेत. अधिक ओव्यांत सर्वांत कमी म्हणजे ४ व ५ या अध्यायांत एकेकच ओवी अधिक असून सर्वांत जास्त अठराव्या कलशाध्यायांत २६७ आहेत. विटें प्रतींत दांडेकर प्रतींतील कांहीं ओव्या गळलेल्याहि दिसतात.

उदा. अध्याय ७ ते १७ मधील २४ ओव्या नाहींत. इतर अध्याय तपासल्यास आणखी सापडतील.

५. नमुन्यादाखल अधिक ओव्यांचा मासला देतों. पहिल्या अध्यायाच्या शेवटीं नेहमींच्याच प्रतींत " आता यावरी तो वैकुंठनाथ० " नंतर " ते सविस्तर पुढारी कथा " ही ओवी देऊन अध्याय संपविला आहे. पण विटे प्रतींत या दोन्ही ओव्यांच्या मध्यें ५ अधिक ओव्या आहेत. त्या अशा—

जेणेअर्जुनाचामोहो नासे । सम्यक्ज्ञानप्रकाशे । ऐसीउत्तरेविश्वेश । बोलिजेती॥ जेउत्तरमीमांसाउपनिषद । मथोनियाश्रीगोविंद । गुह्यनिरोपिलआनंदे । जेणेपार्थ उमजे ॥ जेथेब्रह्मनिरोपण । जेणेहोयेसम्यक्ज्ञान । ते ऐकताचि संपूर्ण । मोहोनासे ॥ वेदीत्रिकांडनिरोपण । कर्म उपासनाज्ञान । हेचिश्रीकृष्णआपण । निरोपीआता ॥ जेथे अज्ञानाचा नाशु । आत्मज्ञानाचाप्रकाशु । विवेकाचा विकाशु । पूर्णत्व होये ॥

६. विटे प्रतींत ८७४ ओव्या अधिक आहेत. त्या आल्या कशा ? मूळ ज्ञानेश्वरींत त्या असत्या तर पुढील नकलांतून ५।२ १ ओव्या गळण्याची शक्यता; परंतु एकदम ७।८ शें ओव्या गळणें अशक्य. मूळ प्रतीचें पारायण करणारास स्फूर्ति होऊन त्यानें मधून मधून या ओव्या घातल्या असाव्या. या दृष्टीनें याहि ओव्या अभ्यसनीय आहेत.

---

४ संत कबीरांच्या भाषेवर मराठी भाषेचा प्रभाव

(डॉ. का. शं. केळकर, एम्. ए., पीएच. डी., पुणें)

संत कबीरांच्या रचनेंत सांपडणारी भाषा आणि तिचें विवेचन करतांना कबीरांच्या विविध रचना, त्यांचा काल, त्यांचे विषय आणि त्यांची प्रामाणिकता इ.चा विचार करणें आवश्यक असूनही तो टाळण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत निबंधांत फक्त कबीरांच्या भाषेसंबंधीच्या मुद्यांचें विवेचन केलें आहे.

कबीरांच्या नांवावर प्रसिद्ध झालेल्या आणि होणाऱ्या अनेक रचना आहेत. कबीरांची हस्तलिखित अशी रचना मूळ रूपांत सांपडली असती तर तिच्या मूळ भाषेचा विचार निश्चित रूपांत आणि ठामपणें करतां आला असता, परंतु त्याचीच वाण असल्यानें कबीरांच्या रचनेंतील भाषेचें रूप काय होतें याबद्दल प्रश्न निर्माण होतो.

प्रस्तुत निबंधाचा आधार-ग्रंथ " कबीर-ग्रंथावली "[1] हा आहे. याही ग्रंथाबद्दल टीकाकारांचें एकमत नाही. परंतु कबीराचें अध्ययन करणाऱ्यांनीं याच ग्रंथाला आधारभूत मानलें आहे आणि या ग्रंथांत " कबीरांच्या हस्तलिखित प्रतींत व ग्रंथ - साहब यांत सांपडणाऱ्या भाषेचें रूप शक्य तोवर जसेंच्या तसें ठेवण्यांत आले आहे "[2] असा संपादकांचा दावा आहे. म्हणूनच या ग्रंथाचा आधार घेतला आहे.

कबीरांचें अध्ययन आणि संशोधन करणाऱ्या विद्वानांनीं कबीरांच्या भाषेसंबंधीं केलेलीं निरनिराळीं विधानें पाहूं.

(१) भाषेसंबंधीं कबीराचें स्वतःचें म्हणणें आहे- " बोली हमरी पूरबकी "[3]

(२) कबीर-बीजक ग्रंथांतील भाषेच्या संबंधानें खालील विधान केलें गेलें आहें. " वह बनारस मिर्जापुर तथा गोरखपुर के आसपासकी बोली है। इसकी भाषा ठेठ प्राचीन पूर्वी है।"[4]

---

(१) कबीर-ग्रंथावली, संपादक : श्यामसुंदरदास छठवाँ संस्करण संवत् २०१३. (२) कबीर ग्रंथावली भूमिका पृ. ६. (३) कबीर साहित्य की परख-आचार्य परशुराम चतुर्वेदी द्वितीय संस्करण संवत् २०२१ पृ. ८१. (४) कबीर साहब का बीजक, कबीर ग्रंथप्रकाशन समिति पृ. १९०.

(३) डॉ. बाबूराम सक्सेना कबीरांना 'अवधीका प्रथम संतकवि'[५] मानतात.

(४) श्री सूर्यकिरण पारिख यांच्या मतें " कबीर की भाषा राजस्थानी है एवं कबीर को राजस्थानी का कवि कहा जा सकता है "[६].

(५) डॉ श्यामसुंदरदास लिहितात " कबीरदासजी की भाषामें पंजाबीपन बहुत मिलता है। "[७]

(६) डॉ. सुनीतिकुमार चतर्जी कबीरांचे भाषेबद्दल आपलें मत असें देतात " वह हिन्दी (हिन्दुस्थानी) तथा ब्रजभाषा का एक मिश्रित रूप है। "[८]

वरील सर्व कथनांचें सार असें की ' कबीरांच्या भाषेंत राजस्थानी, ब्रज, पंजाबी, अवधी, खडी बोली आदि भाषांतील रूपांचा प्रयोग सांपडतो. म्हणूनच असें म्हटलें जातें कीं, कबीरांच्या भाषेवर अनेक भाषांचा प्रभाव दिसून येतो; अथवा विभिन्न भाषा आणि बोली यांचीं वैशिष्ट्यें कबीरांनीं वापरलेल्या भाषेंत दिसून येतात. पण हा प्रभाव कसा पडला याचा ऊहापोह फारच कमी केला गेला आहे.

अनेक भाषांच्या प्रभावांनीं युक्त असणाऱ्या कबीरांच्या भाषेबद्दल एक असाहि तर्क देणेंत येतो, ' कबीरांच्या भाषेचें नीट परीक्षण केलें असतां असें दिसून येतें की त्या भाषेंत कृत्रिमपणा नसून स्थैर्य आहे. त्या काळीं अशीच भाषा बिहारपासून गुजरातपर्यंत व पंजाब पासून दक्षिणेपर्यंत बोलली जात असे. कबीरांनीं याच भाषेचा आधार घेऊन आपल्या मतांचा प्रचार केला. '[९] याच संदर्भांत दुसरा एक तर्क असा ' कबीरसाहेबांच्या पूर्वीं असणाऱ्या प्रचलित भाषेचा वापर अनेक संतांनीं केला.... संत नामदेव आणि कृष्णमुनी यांनीं आपल्या मतांचा प्रचार उत्तरेकडे पंजाब प्रान्तापर्यंत केला आणि आपले उपदेश हिन्दी भाषेंत केले. "[१०]

वरील विवेचनाच्या आधारें असें म्हणतां येईल कीं जर कबीरांच्या भाषेवर अन्यान्य भाषांचा प्रभाव असेल तर तसा प्रभाव मराठीचाही असूं शकेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा प्रभाव दाखवण्याचा प्रयत्न करतांना दिलेलीं उदाहरणें नमुन्यासाठींच दिलेलीं आहेत.

(१) कित्येक हिन्दी शब्दांत प्रथम स्वर ऱ्हस्व आहे. मराठीतील त्याच अर्थानें वापरलेल्या शब्दांत मात्र तो दीर्घ आहे. उदा. हिन्दी रखना, सरिखा, अंधा, भंडा, लकडी, हड्डी, इ मराठी राखणें, सारिखा, आंधळा, भांडे, लाकडी, हाड इ.

वरील शब्दरूपांवरून हे मराठी प्रभावयुक्त शब्द असावेत असा तर्क आहे.

---

(५) दक्खिनी हिन्दी प्र. संस्करण इ. १९५२ पृ. ३२. (६) कबीर साहित्य की परख पृ. २०५. (७) कबीर ग्रंथावली. पृ. ? (८) भारतीय आर्यभाषा और हिन्दी पृ. १९८. (९) कबीर साहित्य और सिद्धान्त पृ. ३८. (१०) कबीर साहित्य की परख पृ. २१६

(२) कबीरांनीं वापरलेल्या शब्दांत अशीं अनेक नामें आहेत जीं मराठीत ज्या अर्थांनीं वापरली जातात त्याच अर्थांनीं कबीरांनीं वापरलेलीं आहेत. या शब्दांचे हिन्दी अर्थ मात्र वेगळे आहेत. उदा. (अ) **खोंडिः राम नाम जाण्यौ नहीं, लागी मोटी खोडि ।**[११] खोडी शब्दाचा मराठी अर्थ वाईट सवय, अवगुण, दोष इ. आहे. हिन्दीत या शब्दाचा अर्थ भूत, प्रेत इ. ची बाधा असा आहे.[१२] कबीरांनीं खोडि हा शब्द वाईट सवय या मराठी अर्थानेंच वापरला आहे. (आ) दुसरा शब्द **घाणः** तन-मन कीया घाण ।[१३] घाण शब्द संक्षिप्त हिन्दी शब्दकोषांत नाहीं. कबीर ग्रंथावली सटीक[१४] या पुस्तकांत घाण याचा अर्थ नाहींसें केलें असा दिला आहे. कबीरांनीं वापरलेला घाण हा शब्द मराठींत प्राचीन काळापासून चालत आला आहे. त्याचा अर्थ दुर्गंधियुक्त, अपवित्र कुरूप इ. असा आहे आणि याच अर्थानें कबीरांनीं तो शब्द वापरला आहे.

(३) कांहीं विशेषणें:– बापुडा, बापुडे

बापुडा– ' ते क्यूं छुटैं **बापुडे** बाँधे सिरजनहार ।'[१५]

बापुडा शब्द हिन्दींत नाहीं. त्याच्या निकटवर्ती रूपांत सांपडणारा शब्द बपुरा आहे. पण बपुरा शब्द प्रान्तीय प्रयोग असल्याचें कोशांत नमूद आहे. हा कोणत्या प्रांतांतील भाषेचा प्रयोग आहे या प्रश्नाचें उत्तर देताना मराठीकडेच बोट दाखवावें लागेल.

(४) क्रियाविशेषण:– ऊभा, ऊभी;

सबही ऊभा मेल्हिगया रावरंक सुलितान ।[१६] यांतील ऊभ, ऊभा शब्द हिन्दी कोषकारांच्या मतें प्राचीन हिन्दी अथवा फक्त पद्यांत वापरण्यांत येतो. मराठींत हा शब्द गद्यपद्यांत सर्वत्र प्राचीन कालापासून उपयोजिला जातो.

(५) क्रियापदें :— कबीरांच्या रचनेंत क्रियापदें आणि त्यांचीं अनेक रूपें अशीं सांपडतात कीं त्यांचा उपयोग कबीरांच्या पूर्वीही मराठी साहित्यांत केला गेला आहे. आणि आजही त्यांचा उपयोग त्याच अर्थी तशाच रूपांत केला जातो. या क्रियापदांचा एकतर हिन्दींत अर्थ वेगळा आहे अथवा त्यांचीं रूपें हिन्दींत वेगळींच आढळतात. उदा०—(अ) माँडी — चौपडि माँडी चौहटै, अरध उरध बाजार ।[१७] यांत माँडी (झाँडना, मरा. मांडणें) हे क्रियारूप उपयोगांत आणलें आहे. या क्रियापदाचा अर्थ हिन्दींत – चोळणें, लेपन करणें, तुडविणें असा आहे. या क्रियापदाचा अर्थ मराठींत

(११) कबीर ग्रंथावली. पृ. २४ (१२) संक्षिप्त हिन्दी शब्दसागर पृ. २४९. (१३) कबीर ग्रंथावली पृ. ७१ (१४) कबीर ग्रंथावली सटीक ले. डॉ. गोविंद त्रिगुणायत प्रथम संस्करण पृ. २५७ (१५) कबीर ग्रंथावली पृ. ३४. (१६) कबीर ग्रंथावली पृ. २०. (१७) कबीर ग्रंथावली पृ. ४.

रचणें, व्यवस्थित पसरणें, ठेवणें असा आहे. याच अर्थानें कवीरांनी मॉडी क्रिया-पदाचा उपयोग केला आहे.

(आ) घालै, घाल्या ! हरि बिचि घालै अंतरा, माया बडी विसास ।[१८] या ठिकाणी घालणें (घालना) या क्रियापदाचा प्रयोग केला गेला आहे. हिन्दी शब्द-सागर कोषांत हा प्रांतीय प्रयोग आहे, असा उल्लेख आहे. परंतु कबीर पूर्व मराठींतहि याचा प्रयोग आढळतो. श्री ज्ञानेश्वरांनीं याचा उपयोग आपल्या रचनेंत केला आहे. उदाः.—

वणवा मिया आधवा । पांखेचि पुसोनि घेयावा ।
पतंगु या हावां । घाली जेवी ।[१९]

याचप्रमाणें, पालवै, आण्या, आणिया, पाडी, इ० क्रियापदे होत.

(६) कांहीं विशेष विभक्ति प्रत्ययः— सप्तमीचा इ, (ई) प्रत्यय.

उदा० घरि·परमेसुर पांहुणां ।[२०]
आंगणि बेलि अकासि फल ।[२१]

या ठिकाणीं घर, आंगण व अकास या अकारान्त शब्दांना सप्तमीचा इ हा प्रत्यय लागला आहे. हिंदींत सप्तमीचे प्रत्यय में, पर हे आहेत. इ हा प्रत्यय कोठेंहीं आढळत नाहीं. हा प्रत्यय मराठींत आढळतो– ईं (इं) या प्रत्ययाचा प्रयोग श्रीज्ञानेश्वरांनीं आपल्या रचनेंत केलेला सापडतो. उदा०

ग्रंथिं, जीवलोकिं, रथिं, द्वारिं, डोंगरिं इ. '[२२]

(७) कांहीं सामान्य रूपें:—

हरि मोत्यांकी माल है, पो ई काचै तागि ।[२३]
कबीर सबसुख राम है, और दुखांकी रासि ।[२४]

या उदाहरणांत–मोती आणि दुःख या शब्दांच्या अनेक वचनांना षष्ठीचे की हे स्त्रीलिंगी प्रत्यय लागले आहेत. या शब्दाची खडी बोलीमध्यें हिन्दीप्रमाणें मोतियोंकी, अथवा दुःखोंकी अशीं सामान्य रूपें झालीं असतीं. अथवा व्रज भाषेप्रमाणें मोतियन की, दुखन की, अशीं रूपें झालीं असतीं. परंतु कबीरांच्या रचनेंत आढळणारीं हीं रूपें मराठीला अत्यंत जवळचीं आहेत. मोत्यांकी– मरा० मोत्यांची; दुखांकी– मरा० दुःखांची. यावरून असें वाटतें कीं या ठिकाणी मराठीचा प्रभाव असावा.

---

(१८) कबीर ग्रंथावली पृ. ३३. (१९) महाराष्ट्र शब्द कोश विभाग ३ पृ. १०८४. (२०) कबीर ग्रंथावली पृ. ५६. (२१) कबीर ग्रंथावली पृ. ८६. (२२) श्रीज्ञानेश्वरी–मुंबई राज्य शिक्षणखातें इ. १९६० (२३) कबीर ग्रंथावली पृ. ५६. (२४) कबीर ग्रंथावली पृ. ७६.

(८) याशिवाय कित्येक शब्दांचीं रूपें जशीं मराठींत आढळतात. अगदीं तशींच कबीरांच्या रचनेंत सांपडतात. उदा०

पाहुणा, आपण, लेखणि, पाणी, कारणी, किराणा, ईंधण, साबण, सजणा, अंगणि, जाण, आणि, कागद, डाव, पडदा. ण् व्यंजनांनीं युक्त शब्द मराठीचे असावेत.

(९) कबीरांच्या रचनेंत कांहीं वाक्‌प्रचार व म्हणी सांपडतात ज्या मराठी म्हणींच्या समान दिसतात. यांत असणारी समानता विशेष उल्लेखनीय आहे. उदा०

(१) लागी मोटी खोडि, (२) पानसुपारी खांहि, (३) तुटै पण छुटै नहिं, (४) नहितर बेगि उठाइ, (५) ते घर मरइटसारखे, (६) पैका पैका जोडता.

वरील विवेचनावरून असें स्पष्ट दिसतें कीं कबीरांनीं उपयोगांत आणलेल्या शब्दांत आणि कित्येक मराठी शब्दांत इतकें साम्य आहे कीं ते शब्द मराठीच आहेत असें म्हटलें तरी चालेल. जर हे मराठीचे शब्द कबीरांनीं आपल्या भाषेंत वापरले असतील तर अन्य भाषांप्रमाणें कबीराच्या भाषेवर मराठीचाही प्रभाव आहे, असें म्हणणें वावगें होणार नाहीं.

---

५ संत कवि तुका विप्रकृत श्रीज्ञानेश्वरचरित्राख्यान

(डॉ. रा. ग. हर्षे, पुणे)

पूर्व रंग

सद्गुरू कृपेचा। अगाध महिमा॥ वेदा जाली सीमा। वर्णू जातां॥ १॥
तेथें पाड काय। इतर वाणीचा॥ महिमा गुरूचा। वर्णावया॥ २॥
सद्गुरू कृपेची। आगळी करणी॥ कीर्तन रंगणीं। उमटली॥ ३॥
श्रोता वक्ता उभा। वीठल समर्थ॥ वदवी यथार्थ। जालें तैसें॥ ४॥

उत्तर रंग

(**पितृकुल**) गौतमी तटाकीं। आपेंगांव क्षेत्र॥ परम पवित्र। पुण्ये भुमी॥५॥ तेथील गोविंद। पंत कुळकर्णी॥ वीठलस्मरणी। सर्वकाळ॥ ६॥ नीराबाई पुण्य। पवित्र अर्धांग॥ भरीव सर्वांग। प्रेम सदा॥ ७॥ पंढरीची वारी। आषाढी कार्तिकी॥ भावभक्ति निकी। जयाघरी॥ ८॥ पुत्र संततिची। धरोनिया आस॥ विनवी देवास। नीराबाई॥ ९॥ हरि गुरू भक्ति। परायेण पुत्र॥ परम पवित्र। व्हावा एक॥ १०॥ देवा विनविता। प्रसन जाहले॥ आपपण आले। मुख्य पोटा॥ ११॥ नवविधा भक्ति। भावें आचरली॥ नीराबाई जाली। पुत्रवती॥ १२॥ स्वयेंभ ज्ञानाचा।

पुतळा वीठोबा ॥ जयाचेनी शोभा । सर्वकर्मां ॥ १३ ॥ करतळा मळ । जया वेदच्यारी ॥ निपुण अंतरीं । सर्व विद्या ॥ १४ ॥ पांचवें वरुसीं । जाला व्रतबंध ॥ ज्ञानी वीठो शुद्ध । आईताची ॥ १५ ॥ गोविंद नीराई । विठोबासहित ॥ करावया तीर्थें । चालियेले ॥ १६ ॥ करोनीयां तीर्थ । उत्तर मानस ॥ दक्षण मानस । करूं आले ॥ १७ ॥ आळंदिसी आले । इंद्रायणी तिरीं ॥ यात्रा सिद्धेश्वरी । उतरले ॥ १८ ॥

मातृकुल

कुळकर्णी तेथें । मुख्य सीदोपंत ॥ गिरिजेचा कान्त । सत्वगुणी ॥ १९ ॥ गिरिबाई सीदो । पंत उभयेतां ॥ येवोनी समस्ता प्रार्थियेले ॥ २० ॥ आश्रम पवित्र करावा समर्थी ॥ केली सीदोपतीं ॥ विनवणी॥ २१ ॥ यात्रा समारंभ । आणिला घरासी ॥ भक्ति भावार्थेंसी । पुजावया ॥ २२ ॥ नवविधा भावें । पूजेन भोजेन ॥ यथाशक्तिदान । सर्व केलें ॥ २३ ॥

स्वप्नदृष्टांत

आनंद लोटला । अर्ध निसीवरी ॥ निद्रा अवसरी । स्वप्न जालें ॥ २४ ॥ सीदोपंत गिरी । बाई पोटीं धन्य ॥ कन्या येक रत्न । नवसाचें ॥ २५ ॥ रखुमादेवी नाम । लावण्यसुंदर ॥ रूप मनोहर । आदि माया ॥ २६ ॥ स्वप्न जालें ऐसें । कन्या हे सुंदरी ॥ बांधा या पदरीं । वीठोबाच्या ॥ २७ ॥

शुभमंगल

गिरीबाई सीदो । पंत हरुषले ॥ बहु बरे जाले । देवराया ॥ २८ ॥ तेथें तेथें स्वप्न । सारखे जाहलें ॥ लग्न लावियेलें । समारंभें ॥ २९ ॥

पितामहास देवाज्ञा व पितृसंन्यास

लग्नविध यथा । स्तीत उरकला ॥ निरोप घेतला वीठोबांनीं ॥ ३० ॥

दक्षण मानस । करोनीया तीर्थें ॥ पातले भावार्थें । कासीपुरा ॥ ३१ ॥ माता पितरासी । देवाज्ञा जाहली ॥ वैकुंठासी गेली । उभयेतां ॥ ३२ ॥ वर्णाश्रम वीध । सर्व उरकला ॥ संन्यास घेतला । विठोबाने ॥ ३३ ॥ नरसीं आश्रम । याचे दीक्षाधारी ॥ साधियेली थोरी । शांतिक्षमा ॥ ३४ ॥ चैतन्ये आश्रम । नाम ठेवियेलें ॥ तीर्थें चालियेले । करावया ॥ ३५ ॥ सीस्येसमुदाये । सहित नरसीं ॥ आश्रम तीर्थासी । चालियेले ॥ ३६ ॥ धरोनिया हेत । दक्षण मानस ॥ पातले तिरास । इंद्रायणी ॥ ३७ ॥

पुनर्मीलन

आळंदीनगर । प्रवेशकरितां ॥ भेटी सीदोपंता प्रथमची ॥ ३८ ॥ साधु सीदोपंतें

आश्रमासी नेले ॥ वीठोबा देखीले । रखुमाईनं ॥ ३९ ॥ गीर्जाबाई कानी । सांगितली मात ॥ पाहोनी येकांत । रुक्माईने ॥ ४० ॥ चैतन्ये आश्रम । म्हणती जयाला ॥ भ्रतार आपुला तोचि होये ॥ ४१ ॥ निभ्रांत ओळखी । पुरली सर्वांची ॥ सोदोपतें साची । प्रश्न केला ॥ ४२ ॥ सरस्वती स्वामी । साष्टांग नमिलें ॥ वृत्त सांगितलें । होतें तैसें ॥ ४३ ॥ सरस्वें ही खूण । अभंग पुरली ॥ रुक्माइ दिधली । वीठो हातीं ॥ ४४ ॥ गुरू आज्ञा मुख्य । मानोनी वीठलें ॥ आंगिकारियेलें । रुक्माईसी ॥ ४५ ॥ विचारिलें स्वामी । होईल संतती ॥ याची काये गती । पुढ कैसी ॥ ४६ ॥ नरसीं आश्रम । बोलियले बापा ॥ होणं गुरुकृपा । सुखें हो कीं ॥ ४७ ॥

संन्याशाची संतति

ब्रह्मा विष्णु सीव । आदिमायाच्यार । बाळें धुरंधर । पोटा आली ॥ ४८ ॥ ब्रह्मा तो सोपान । निउर्ति शंकर ॥ विष्णु ज्ञानेश्वर । मुक्तामाया ॥ ४९ ॥ च्यारी बाळें होतां । उभयेतां गेली ॥ वैकुंठासीं भळी । ब्रह्मानंदें ॥ ५० ॥ उरली हे बाळें । च्यारी निराश्रित ॥ न करिती व्रत । बंध कोणी ॥ ५१ ॥ संन्याशाची मुलें । म्हणोनि हेळिती ॥ तेणे चौघा चित्तीं । उद्विगता ॥ ५२ ॥

प्रतिष्ठानास गमन

निव्रत्तिसोपाने विचार योजीला जावें पैठणाला । ज्ञानदेवा ॥ ५३ ॥ अवस्यें म्हणोनी । वंदीले चेरण ॥ चालिले पैठण । पहावया ॥ ५४ ॥ पतितजनाचा । फेडावया पांग ॥ चालिले अभंग । देवच्यारी ॥ ५५ ॥ पावले पैठण । नमीले भूदेव ॥ सांगितला भाव । स्वागताचा ॥ ५६ ॥ व्रतबंध होणं । म्हणोनीया आलों ॥ पाहोनी तोषलो । द्विजवरा ॥ ५७ ॥ जेणे लागे आम्हा । पवित्रना गाढी ॥ ते युक्ति रोकडी । करावी जी ॥ ५८ ॥ द्विजवरा भावें । करोनि विनंति ॥ उभ्या वेदमुर्ति । बाळ बैसें ॥ ५९ ॥ संन्याशाची मुलें । बैसे ? द्वेसिती म्हणोनी ॥ शास्त्रार्थ पाहोनी । सकळहीं ॥६०॥ न मानिती द्विज । हेळोनी बोलती ॥ ज्ञानदेवा चित्तीं । अनुताप ॥ ६१ ॥

ज्ञानेश्वर–द्विज खटका

बोलियेले द्विज । अस्तारे मुला ॥ तेधवां बोलिला ज्ञानदेव ॥ ६२ ॥ कासयांनं थोरी । तुजलारे आली ॥ अहंकार भुली ॥ सांडी आतां ॥ ६३ ॥ वाचोनी पढोनी । शहाणे जाहाला ॥ थोरपणा आला । तेणें काय ॥ ६४ ॥ उलिस दिसत । म्हणताती पोर ॥ बोले नीचोत्तर । वरं कीं हो ॥ ६५ ॥ ज्ञानोबा म्हणती । द्विज हो ऐकारे ॥ ब्रह्मीं सान थोर । काय बोली ॥ ६६ ॥ बोलतां वरळ । नुमज हे तुम्हा ॥ ब्रह्म ठावें आम्हा । सर्वा घटीं ॥ ६७ ॥

टोणग्यामुखीं वेदोच्चार

तें क्षणीं टोणगा। त्याची ठाया आला॥ वरूति पाखला भरोनियां॥ ६८॥ ज्ञाने-श्वराकडे। पाहोनी रोंकला॥ ज्ञानेश्वरें केला। नमस्कार॥ ६८॥ कांरे केलें पोरा। नमन तयासी॥ 'तुम्हा आम्हा त्यासी भेद काये?'॥ ७०॥ खवळले द्विज। ऐकोनिया बोल॥ समता होईल कैसी पोरा॥ ७१॥ वेद म्हणूं आम्ही। तैसा म्हणे काय॥ म्हैसा येक होये। द्विज कैसा॥ ७२॥ नवल या गोष्टी। काय द्विजराव॥ करी तरी देव। काय नव्हे॥ ७३॥ हाचि रेडा वेद। करील उच्चार। ऐसे ज्ञानेश्वर। बोलियेले॥ ७४॥ सर्वांगें भरला। द्विजांचिया कोप। घातला संकल्प। रेडियासी॥ ७५॥ बोलेव हारेढा। वेदा पोरा आतां॥ नाहीं तरी जातां। जीवें च्यारी॥ ७६॥ याचि रेड्यापायीं। नेमिलें मरण॥ न बोलतां जाण। वेद रेडा॥ ७७॥ ज्ञानोबा म्हणती। ऐका महाराज॥ येथें काय काज। बहु बोलीं॥ ६८॥ चित्तवृत्ति स्थिर। करोनीया बैसा॥ बोलल हा म्हैसा वेद च्यारी॥ ७९॥ हासीनले सर्व। बैसले निवांत॥ वदला वेदांत पशु रेढा॥ ८०॥ सांगोपांग चहुं। वेदांचा उच्चार॥ केला, द्विजवर। डोलविले॥ ८१॥ जैजेकार केला। स्वर्गी सुरवरीं॥ विमानें अंबरीं। पुष्पवृष्टि॥ ८२॥ प्रतिष्ठानपुरा। आनंद ओतला॥ रेडा बोलविला। ज्ञानदेवें॥ ८३॥ संतोषले देव। द्विज सकळिक॥ पंढित वैदिक। अग्निहोत्री॥ ८४॥ शास्त्री पुराणीक। योगी वीतरागी॥ राव रंक मुंगी। संतोषले॥ ८५॥ साष्टांग नमीले। सर्वी ज्ञानेश्वर॥ सत्य अवतार म्हणवोनी॥ ८६॥ निरोप घेवोनी। तैसेचि निघाले॥ नेवासिया आले। ब्रह्मानंदें॥ ८७॥ मोहनी राजाचे। देवालयी वास॥ केला अनायास। मार्गी जातां॥ ८८॥ तेथे सचोपंत। बाबा ठाणेदार॥ पंताचे चाकर हेमाद्रिया॥ ८९॥

यथार्थ गीतार्थाविषयीं राजास लागलेली तळमळ

रामदेव राजा। प्रधान हेमाद्रि॥ दोघे अवतारी। पुण्येवंत॥ ९०॥ गीतार्थैसी चाली। अभंग जयाची॥ आवडी गीतेची॥ ९१॥ लंकेसीं हेमाद्रि। पंत जेव्हां गेले॥ छेपन्नहि आणिले। ग्रंथ त्यांणीं॥ ९२॥ छेपन्न भाषेचे। छेपन्नहि ग्रंथ॥ पाहिले यथार्थ। शोधोनिया॥ ९३॥ राया मनीं अर्थ। एकहि न बाणे॥ गीता योग्य लेणे। अर्थ नोव्हे॥ ९४॥ गीतार्थ नेटका। प्राकृत पहावा॥ राजयाच्या जीवा। वेध ऐसा॥ ९५॥ नेवासीयामध्यें। सचोपंत होते॥ सबळ भावार्थे। ज्ञानसिंधु॥ ९६॥ तया हटकीले। हेमाद्रिपंतांनी॥ तेचि आले दिनी। ज्ञानेश्वर॥ ९७॥ सचोपंत बाबा। दौलताबादेसी॥ तूर्त जावयासी। निघालो ती॥ ९८॥ देवाचे दर्शन। घ्यावया चालीले॥ ज्ञानोबा भेटले। देवद्वारीं॥ ९९॥ नमन साष्टांग। घालोनी विनंति॥ केली सचोपंतीं। ज्ञानदेवा॥ १००॥ मज आले जाणें। दौलताबादेसी॥ राज आज्ञा ऐसी। तूर्त आहे॥ १०१॥ परतोनी भेटी। याचि स्थळीं व्हावी॥ ये विसीं करावी। आज्ञा काय॥१०२॥

करा कार्य सिद्धि। मेटी परतोनी ॥ होईल कीर्तनी । याचि स्थळीं ॥ १०३ ॥ आज्ञा वंदोनियां । पंत चालियेले ॥ दौलता पातले। बादकिल्ला ॥ १०४ ॥ हेमाद्रिपंताचे। दर्शन होतांचि ॥ मुख्य काज हेंचि। सांगितलें ॥ १०५ ॥ गीतेचा प्राकृत। अर्थ कोणी करी ॥ ऐसा पृथ्वीवरी। शोध करा ॥ १०६ ॥ आज्ञा म्हणोनियां। निरोप घेतला ॥ नेवासे पातला। सचोपंत ॥ १०७ ॥ ज्ञानदेवा केलें। नमन साष्टांग ॥ वृत्तांत अभंग। सांगितला ॥ १०८ ॥ आज्ञा आतां काय। करणें करावी ॥ कार्य सिद्धि व्हावी। तूर्त ऐसी ॥ १०९ ॥

ज्ञानेश्वरीजन्म

निवृत्ति बोलले। ज्ञानोबा ऐकावें ॥ कार्य त्वा करावें। गृहस्थाचे ॥ ११० ॥ बरे म्हनोनियां। दिधला निरोप ॥ तरणी प्रताप। ज्ञानराये ॥ १११ ॥ सचोपंत गेले। आपुल्या घरासी ॥ लागले यत्नांसी। ग्रंथाचिया ॥ ११२ ॥ शाई केली, साचे। कातरीले बरे ॥ लेखण्या सुंदर। सिद्ध केल्या ॥ ११३ ॥ निवृति सोपान। मुक्ताई निजेली ॥ ज्ञानदेव केली। युक्ति गाठी ॥ ११४ ॥ कोळसा घेवोनी। देवालयावरी ॥ गीता ज्ञानेश्वरी। अर्थ केला ॥ ११५ ॥ साडे तीं घटिका। ओवीयां टिपण ॥ गीतार्थ प्रमाण। निवडिला ॥११६॥ प्रातःकाळ होता। सचोपंत आले ॥ नमन घातलें। ज्ञानदेवा ॥११७॥ शाई साच्या सिद्ध। लेखणीया स्वामी ॥ ग्रंथ मनोधर्मी। सिद्ध व्हावा ॥ ११८ ॥ ज्ञानोबांनी तया। दाविलें देऊळ ॥ लिहीलें सकळ। गीतार्थानें ॥ ११८ ॥ गीतार्थ लिहिला। देऊळावरता ॥ येतो कैसा हाता। तूर्तातूर्त ॥ १२० ॥ मायोत्तरें काज। अपूर्व जाहलें ॥ परंतु राहीलें। भिंतीवरी ॥ १२१ ॥ सचोपंत बाबा। तेणें चिंतातूर ॥ देखीलें साचार। निवृत्तीनें ॥ १२२ ॥ निवृति म्हणेती। ज्ञानोबा सुजाणा ॥ मनीचिया जाणा। ग्रहस्ताचे ॥ १२३ ॥ आज्ञा म्हणोनीया। लेखणी धरिली ॥ तेचि हाती दिली। सचोपंता ॥१२४॥ साडे तीं घटिका। ग्रंथ झाला सिद्ध ॥ सर्व गुण शुद्ध। नीरूपम ॥१२५॥ गत केली च्यार। चार हजार तीनशें ॥ नवद वरूसें। लोटलियां ॥ १२६ ॥ शालीवान शके। बारासे बारांत ॥ सिद्ध जाला ग्रंथ। ज्ञानेश्वरी ॥ १२७ ॥ लेखीक जाहाले। सदाचिदानंद ॥ बाबा नाम शुद्ध। सचोपंत ॥ १२८ ॥ टोणग्याचे मुखें। वेद बोलविला ॥ तैसाचि हा केला। किर्ती घोष ॥ १२९ ॥ साडे तीं घटिका। ग्रंथ सिद्ध केला ॥ पुढें देखियेला। सचोपंतीं ॥ १३० ॥ तेचि क्षणीं सिद्ध। सचोपंत जाले ॥ चेरण वंदिले। ज्ञानोबाचे ॥ १३१ ॥ ग्रंथ पाववीला। दौलता बादेसी ॥ हेमाद्रि पंतासी। ब्रह्मानंद ॥ १३२ ॥

राजाचें वैराग्य

राजा सदरेसी। बैसला उदार ॥ सर्वज्ञ चेतुर। ज्ञाननिधि ॥ १३३ ॥ तया पुढें ग्रंथ। आणोनि ठेविला ॥ राजा संतोषला। बहुतेणें ॥ १३४ ॥ सचोपंती आज्ञा। राया मागितली ॥ चाकरी ठेविली। पायावरी ॥ १३५ ॥ पुत्राचिया नांवें। धंदा सांगितला ॥

निरोप दीधला । सचोपंता ॥ १३६ ॥ हेमाद्रिपंतांनी । वाचीयला ग्रंथ ॥ राये केला अर्थ । मनालेसा ॥ १३७ ॥ वाकनिसें अर्थ । पारसी लिहिला ॥ राजा बोलियेला । जैसा तैसा ॥ १३८ ॥ येक पारायेणी । जाला वीतराग ॥ केला राज्येत्याग । मनोभावें ॥ १३९ ॥ राज्येभार केला । स्वाधीन पुत्राचें ॥ ध्यावया ग्रंथीचे । सुख सर्व ॥ १४० ॥ घेवोनीयां ग्रंथ । वेरूळासी गेले ॥ गुंफेत सीरले । चौघेजण ॥ १४१ ॥ प्रधान हेमाद्रि । राजा, सेनापति ॥ वैराग्य विभूति । लेवोनियां ॥ १४२ ॥ पाणका ब्राह्मण । भोळा ऐसे चार ॥ जाले शुद्ध नर । वीतरागी ॥ १४३ ॥ अमर असावें । न मरावें कदा ॥ आनंद सर्वदा । सर्व काळा ॥ १४४ ॥ सर्व गुण ऐसा । ग्रंथ संपवित ॥ घेवोनी गुंफेत । प्रवेशले ॥ १४५ ॥ सचोपंत बाबा । नेवासे पातले ॥ साष्टांग नमीले । ज्ञानराज ॥ १४६ ॥ गेलीया पासोनी । जालें वर्तमान ॥ देवा पासीं ज्ञान । सांगितलें ॥ १४७ ॥

ज्ञानेश्वरीवरील गंडांतर

बरें जालें आतां । देउळीचा लिखा ॥ उतरा नेटका । पत्रावरी ॥ १४८ ॥ येक मासा ग्रंथ । पत्रीं उतरला ॥ लिखा तो पुसीला । देउळीचा ॥ १४९ ॥ चौदा विद्या, कळा । चौसष्टी साधनें ॥ नाना युक्ति धने । तया ग्रंथी ॥ १५० ॥ निवृत्तिरायांनीं । बुडविला ग्रंथ ॥ तोहि पाणीयांत । ज्ञानेश्वरी ॥ १५१ ॥ सदचीदानंद । बाबांनी विनंति ॥ ग्रंथ असो क्षितीं । स्वामीराया ॥ १५२ ॥ तेधवा तो ग्रंथ । बाहीर काढीला ॥ गळोनीया गेला । अर्थ कांही ॥ १५३ ॥ नाना कळा नाना । साधनाच्या युक्ति ॥ गळाल्या समस्तीं । एकंदर ॥ १५४ ॥ तुटक उरला । ग्रंथार्थ जेधवां ॥ बोलीले तेधवां । ज्ञानदेव ॥ १५५ ॥ पुढे अवतार । येकनाथ होणें ॥ तेधवां करणें शोध याचा ॥ १५६ ॥ आजपासोनीयां । प्रमाण होतील ॥ दोन शत झाले । चौऱ्याणव ॥ १५७ ॥ ग्रंथाचा या शोध । तेव्हां येकनाथ ॥ करील यथार्थ । प्रतिष्ठानीं ॥ १५८ ॥

चांगा–ज्ञाना भेट

निघोनियां गेले । आळंदी क्षेत्रासी ॥ वृत्त चांगयासी । कळले हें ॥ १५९ ॥ भेटीसी बैसोनी । वाघावरी आले ॥ हातीं धरीयेले, महाफणी ॥ १६० ॥ ज्ञानदेवा, पुढें । निरोप धाडोला ॥ यावें भेटायाला । समारंभें ॥ १६१ ॥ ज्ञानोबा बैसले । होते भिंतीवरीं ॥ चालीले सामोरी । चांगदेवा ॥ १६२ ॥ देखोनियां वाघ । भिंतीसी बुजला ॥ टाकोनी दीधला । चांगदेवा ॥ १६३ ॥ पडतां धरणीं । भुजंग पळाले ॥ बारा वाटा चाले । चौदा शती ॥ १६४ ॥ उरले चांगोबा । येकुलतें येक ॥ पळाले सेवक । जवळीचे ॥ १६५ ॥ चांगया ज्ञानोबा । प्रीतीनें भेटले ॥ भेटीसी पातले । मुक्ताईच्या ॥ १६६ ॥ मुक्ताईचें भेटीं । झाला साक्षात्कार ॥ चांगया साचार । उद्धरिला ॥ १६७॥ पंढरीसी आले । भेटी नामयाचे ॥ सत्यत्व जनीचे । पहावया ॥ १६८ ॥

पंढरीची यात्रा व संतभेटी

चोखा मेळा गोरा। कबीर सांवत ॥ परसा भागवत । नरहरी ॥ १६९ ॥ भाविकाच्या भेटी । जाहल्या सकळ ॥ करूं तीर्थावळ। चालीयेले ॥ १७० ॥ जडमूढ प्राणी । उद्धरीले सर्व ॥ रंक आणि राव। दरुशणें ॥ १७१ ॥ परतोनी आले। पंढरपूरासी ॥ जोडीयेल्या रासी । स्वानंदाच्या ॥ १७२ ॥ तेथें आले राव। पंडीत चेतुर ॥ कोठे ज्ञानेश्वर । म्हणोनीया ॥ १७३ ॥

पंढरपूर येथील चमत्कार

रेडियाच्या मुखें । वेद बोलविले ॥ पंडींत कोपले। ऐकोनियां ॥ १७४ ॥ ज्ञानेश्वरा वेद । बोलविसी आतां ॥ पंडीत बोलतां । वंका आला ॥ १७५ ॥ बाईलेचा भाऊ । चोखा मेळीयाचे ॥ वंका नाम त्याचें अतिशूद्र ॥ १६६ ॥ ज्ञानोबा बोलती । गब्या तूं कोण रे ॥ वंका मी महार । बोलीयेला ॥ १७७ ॥ आडवी ओढली । रेघ त्या पुढती ॥ ज्ञानोबा बोलती । आरता ये ॥ १७८ ॥ वंका आला आंत। रेघेच्या जेधवां ॥ बोलवीला तेव्हां । कोण रे तूं ॥ १७९ ॥ बोलीयेला वंका । शूद्र मी चांगला ॥ आलों वंदावया । संत पाया ॥ १८० ॥ दुसरी ओढली । त्यापुढें रेघ । आंत आला मग । बोलविला ॥ १८१ ॥ वैस्य मी चांगला । बोलीयेला वंका ॥ पातलों पादुका । वंदावया ॥ १८२ ॥ वोढियेली रेघ । त्यापुढं तिसरी ॥ येताची भीतरी । वंका बोले ॥ १८३ ॥ कोण विचारीतां । क्षेत्री बोलीला मी ॥ वंदावया स्वामी । पाये आलों ॥ १८४ ॥ तयापुढें रेघ । वोढीली चवथी ॥ पालटली व्रत्ति । वंकयाची ॥ १८५ ॥ विचारितां कोण । 'हरि'हि वदला ॥ वंका बोलीयेला । ब्राह्मण मी ॥ १८६ ॥ आज्ञा काये स्वामी । जोडीयेले हात ॥ ज्ञानोबा समर्थ संतराव ॥ १८८ ॥ ज्ञानदेवें तेव्हां पंडींत दावीले ॥ दंड थापटीले । वंकीयानें ॥ १८८ ॥ ज्ञानदेवा केलें। पंडीते नमन ॥ अवतार धन्य । होयेसी तूं ॥ १८९ ॥ चेंद्रभागे जातां। उभाउभी ऐसे ॥ आनंदसरिसें । काज केलें ॥ १९० ॥

समाधि व शेवटचे चार शब्द

अवतार आला। शेवटासी जेव्हां ॥ चालीयेले तेव्हां। आळंदिसी ॥ १९१ ॥ सनकादिकांचा। घेवोंनिया मेळा ॥ चालिला सावळा। आळंदिसी ॥ १९२ ॥ संत समुदाय । अनंत अपार ॥ मध्यें ज्ञानेश्वर। हरि गाती ॥ १९३ ॥ इंद्रायणी तीर । आळंदी पावले ॥ तारू सांगितले । हरिपाठ ॥ १९४ ॥ हरिनाम गर्जा। नाहीं भय चिंता ॥ खुण हे समस्तां। सांगितली ॥ १९५ ॥ धांव घ्यारे बापा । पंढरपूरासी ॥ ठाव सार्थकासी। येतुलाची ॥ १९६ ॥ डोळेभरी । पहा। पंढरीचा राणा ॥ भावें हरि म्हणा। सर्वकाळ ॥ १९७ ॥ विटेवरी उभें। साकार सांवळें। महद्भूत भोळें। पंढरीचे ॥ १९८ ॥ वेदाचें जिव्हार । आगर मुक्तीचें ॥ चोविसा मूर्तीचें । उद्धरण ॥ १९९ ॥ वेदांत सिद्धांत।

जयाला वर्णिती ॥ उभी ते हे मूर्ति । विटेवरी ॥ २०० ॥ सकळ जीवाचा । उद्धार सगट ॥ पंढरी वैकुंठ । देखिलीयां ॥ २०१ ॥ कोटीकळा मुक्ति । पाहातां कळस ॥ खूण हे सर्वांस । सांगितली ॥ २०२ ॥ विश्वास पंढरी । तरीक सकळां ॥ पाहा येक वेळां । डोळेभरी ॥ २०३ ॥ हरि नाम प्रीति । सकळहि गर्जा ॥ लावा कीर्ति ध्वजा । सुचविले ॥ २०४ ॥ चालिले समाधि । ज्ञानेश्वर जेव्हां ॥ गजर तेधवां । नानापरी ॥ २०५ ॥ टाळ वीणे भेरी । मृदंग चिपळीं ॥ कीर्तन धुमाळी । ब्रम्हानंद ॥ २०६ ॥ अंबरी दाटल्या । विमानाच्या थाटी ॥ देव पुष्पवृष्टी । करिताती ॥ २०७ ॥ धन्य ज्ञानदेवा । मानव जालासी ॥ जन तारायासी । भक्तिभावें ॥२०८॥ जै जैकार केला । सर्व सुखरीं ॥ समाधी भीतरीं । प्रवेशले ॥ २०९ ॥ अभय वरद । वचन भावीक ॥ दिल्हे सकळीका । येंकंदर ॥ २१० ॥ भक्तिभावें चाला । बोला हरि गुण ॥ तरा च्यारी वर्ण । भवसिंधु ॥ २११ । सांडा काम क्रोध । शांति क्षमा धरा ॥ भवसिंधु तरा । सकळीक ॥ २१२ ॥ निरोप सकळा । आसीर्वाद प्रीती ।। ज्ञानदेव देती । तरावया ॥ २१३ ॥ देव करील ते । सहज होईल ॥ पाषाण तारीऊ । जळावरी ॥ २१४ ॥ हरि भक्तिकाजों । सादर असावें ॥ तरोनी तारावें । आगीकासी ॥ २१५ ॥ जडमूड जीव । लावावें भजना ॥ सेवट सूचना । भाविका हे ॥ २१६ ॥ सकळहि नटा । कीर्तनाचे वृत्ति ॥ करा क्षिरापती । खेळा काला ॥ २१७ ॥ नका करूं कथा । बाजारोबाजार ॥ माळ येकंदर लावूं नका ॥ २१८ ॥ खोटे ब्रह्मज्ञान ॥ कोणा सांगू नका ॥ संतपायीं वांका । सर्वभावें ॥ २१९ ॥ नवविधा भक्ति । नैरास्य कोर्तन ॥ करावें साधन । संतप्रिये ॥ २२० ॥ हरि म्हणा आतां । समाधि बैसले ॥ ज्ञानदेव गेले । निजधामा ॥ २२१ ॥

कवित्वाचा काल व स्थल

नित्य नेम कथा । ब्रह्मपूर ठाणी ॥ विठ्ठल रुक्मीणी । उरूंबुरूं ॥ २२२ ॥ चैत्र वसंत । कृष्णसप्तमीसी ॥ भोमवार निसी । कृष्णा तिरीं ॥ २२३ ॥ गत कालीच्यार । हजार आठसे ॥ सत्तर प्रत्यक्ष । चालियेले ॥ २२४ ॥ शालीवान शक । सोळासे ब्याणव ॥ श्रोता वक्ता देव । दतात्रिय ॥ २२५ ॥

चारही भावंडांचीं समाधि स्थळें व आळंदी तीर्थ महात्म्य

सासवडीं देवा । सोपान समाधि ॥ ब्रह्मागिरीमधीं । मुक्ताबाई ॥ २२६ ॥ समाधिस्त जाहाले । तीर्थ कुशावर्ती ॥ शंकर निवृत्ति । अवतार ॥ २२७ ॥ कृष्ण एकादसी । कार्तिक आळंदी ॥ अभंग समाधी । ज्ञानोबासी ॥ २२८ ॥ देवोनी समाधि सर्व सुरवरीं ॥ इंद्रायणी तिरीं । वास केला ॥ २२९ ॥ कोनकाचा तरू । जयाचिये द्वारीं ॥ इंद्रायणी तिरीं । आळंदिसी ॥ २३० ॥ अज्ञान रोविला । दंडतो द्वारेसी ॥ पल्लव तयासी । अज्ञोणीयां ॥ २३१ ॥ यात्रा समारंभ । आजीवरी मोठा ॥ पंढरी वैकूंठा । समसाम्ये ॥ २३२ ॥ आळंदी संताचें माहेर देखीलें ॥ पावन जाहालें । जन्मांतर ॥ २३३ ॥ मोक्ष मुक्तिजया ॥ चेरणा लागती ॥ आळंदिसी जाती । तयाचीया ॥ २३४ ॥

गुरुकृपेचा महिमा

गुरुकृपेवीन। ऐसे लाभ कैचें॥ कृपे सद्गुरुचे। सर्वलाभ॥ २३५॥ गुरूकृपा तेथे। सर्व सुख रासी॥ सप्त बोले ऐसी। वेदश्रुती॥ २३६॥ श्रोता वक्ता देव। आपण जाहला॥ चेरित्र वदला। कथारंगीं॥ २३७॥ ज्ञानोबाचा आवतार येकनाथ॥ वरदी श्रीदत्त। प्रतिष्ठानी॥ २३८॥

ज्ञानेश्वरांची गुरुपरंपरा

आदिनाथ गुरु। श्री सीव शंकरा॥ तयाचा मछींद्र। उपदेसी॥ २३९॥ मछींद्र-नाथाचे। गोरक्ष वरदी॥ तयाचा प्रसादी। गैनीनाथ॥ २४०॥ गैनीचे निवृत्ति। पाद-प्रसादित॥ तयाचा अंकीत। ज्ञानदेव॥ २४१॥

तुकाविप्रांची गुरुपरंपरा

आदिगुरू परात्पर नारायेण। तयाचे प्रमाण। सीस्य अत्रि॥ २४२॥ अत्रिचे श्रीदत्त। दत्ताचे अंकित॥ अभंग कलींत। जनार्दन॥ २४३॥ जनार्दनवर। येकनाथ राया॥ येकोबाची दया। विश्वनाथ॥ २४४॥ विप्रनाथ राया। कृपा विश्वेश्वर॥ त्रिमूर्ति साचार। विप्रतरु॥ २४५॥ विप्रचेरणीचा। रजरेणु तुका। निमित्यांसी लोकां। दाविताती॥ २४६॥

उपसंहार

कर्ता करविता। सर्वहि आपण॥ निमित्य प्रमाण। तुका विप्र॥ २४७॥ ज्ञानोबा आपण। आपुले चेरित्र॥ वदले पवित्र। पुण्यदाई॥ २४८॥ आपुली आवडी। आपण वदले॥ निमित्य दाविले। तुका विप्र॥ २४९॥ तुका विप्र म्हणे। सद्गुरू गरीमा॥ हरिहर ब्रम्हा। न जाणती॥ २५०॥

टीपा

(१) गोविन्दपन्त कुलकर्णी–निराबाई पुत्र विठ्ठल यांच्या संबंधांत गहिनी नाथांचा उल्लेख नाहीं–पंढरीची वारी व उभयतांची विठ्ठलभक्ति यांचा उल्लेख आहे. 'विठ्ठल स्मरणीं सर्वकाळ' (६) नाथसंप्रदायी अव्यक्त ब्रह्माचे उपासक व ॐकाराचा जप करणारे. असें असतांना नाथांचा विठ्ठलाशीं संबंध कसा जोडतां येतो हें कोणीच लक्षांत घेत नाहीं. (२) 'स्वयेंभ ज्ञानाचा। पुतळा विठोबा॥ जयाचेनी शोभा सर्व कर्मा (१३) करतळामळ। जया वेद च्यारी। निपुण अंतरीं। सर्व विद्या' (१४)–ही सर्व अतिशयोक्ति दिसते. (३) 'पांचवें वरुसीं। जाला व्रतबंध' (१५)–ब्रह्मवर्च-स्काम (वेदाध्ययन करूं इच्छिणाराचा व्रतबंध पांचव्या वर्षी हा मनुप्रोक्त आचार) (४) 'गोविंद नीराई विठोबासहित करावया तीर्थें। चालियेले' (१६) अन्यत्र विद्याध्ययन

समाप्तीनंतर एकटाच विठोबा तीर्थयात्रेस निघून गेल्याचा उल्लेख आहे. (५) ' करोनिया तीर्थ उत्तरमानस । दक्षिणमानस करूं आले (१७) ' आदिमध्यें उल्लेखिलेल्या स्थळांवरून विठ्ठलाच्या तीर्थयात्रेची निश्चित कल्पना येत नाहीं. त्या काळचे तीर्थयात्रेचे मार्ग कोणते होते त्यांत आळंदी बसते कां तें पाहिलें पाहिजे. केशवकृत नाथचरित्रांत एकनाथांच्या वेळीं येथें घनदाट अरण्य असल्याचा उल्लेख आहे. (६) मातापित्यांसह विठोबा आळंदीस आले व त्यांचें सिधोपंत कुलकर्णी यांनीं स्वागत केलें व त्यांस भोजनास व राहण्यास घरीं घेऊन गेले ही गोष्ट अन्यत्र नाहीं. पण ती येथें स्वाभाविक वाटते. (७) उभयतांस एकच स्वप्न पडल्याची कथा येथेंहि आहे. पण त्यानंतरचा विस्तार (भक्तितत्त्वामृत रहस्य पाहा) येथें नाहीं. (८) लग्नोत्तर दक्षिणमानस यात्रा पुरी केल्याचा उल्लेख; मात्र पंढरपुरास उभयता जाऊन आल्याचा येथें उल्लेख नाहीं. (९) यानंतरचें विठोबाचें चरित्र इतकें त्रोटक आहे कीं लग्नोत्तर घडलेल्या घडामोडींचा नीट उलगडा होत नाहीं. ' दक्षणमानस (म्हणजे कोणतें स्थान ?) करोनियां तीर्थें । पातले भावार्थें । कासीपुरा (३१) मातापितरासी । देवाज्ञा जाहली । वैकुंठासी गेली । उभयेता (३२) वर्णाश्रमवीध । सर्व उरकला । संन्यास घेतला विठोबानें (३३) (१०) विठ्ठलानें संन्यासदीक्षा ' नरसीआश्रम ' यांच्याकडून घेतल्याचा उल्लेख नवा आहे । नांवहि ' चैतन्याश्रम ' असें अन्वर्थक दिलें आहे. (३५) रामानंद व चैतन्य किंवा श्रीपादाश्रम व चैतन्य ही जोडी जमत नाहीं. संन्याशांचे जे अनेक पंथ आहेत त्यांस पुरी, गिरी, अरण्य, सरस्वती, भारती, चैतन्य, आनंद वगैरे भिन्नभिन्न नांवें आहेत. त्यांत भेसळ करतां कामा नये. नाथ संप्रदायांत अवधूतपंथी लोकच संन्यासमार्गी असतात. मत्स्येन्द्रनाथांचा आनंद संप्रदाय समजला जातो व त्या परंपरेंतील सर्वांचें दीक्षानाम ' आनंदान्त ' असलें पाहिजे ही अपेक्षा आहे. या परंपरेंतील सच्चिदानंद, प्रकाशानंद (सोपानदेवशिष्य) हींच आनन्दान्त नांवें रूढ आहेत हेंही येथें लक्षांत घेतलें पाहिजे. नाथसंप्रदाय व संन्यास हें कितपत सुसंगत आहे याचाहि विचार झाला पाहिजे. (११) नृसिंहाश्रमांचे शिष्यासह आळंदीस येणें, सिधोपंताच्या घरीं ' पुडीस ' आले असतां सर्व उलगडा होणें अधिक स्वाभाविक आहे. तेथेंच विठ्ठलपंतास गृहस्थाश्रमस्वीकाराची आज्ञा; परंतु संततीचें काय होणार याचें नृसिंहाश्रमांचें उत्तर गुळमुळीतच आहे (४०-४७). (१२) ' चारी बाळें होतां । उभयेतां गेली । वैकुंठासी भली । ब्रह्मानंदें ' (५०). केव्हां आणि कोठें याचा तपशील दिला नाहीं. अन्यत्र मुलांचें उपनयन करण्यासाठीं विठ्ठलपंत नाशकास गेल्याचा उल्लेख आहे. संन्याशाचीं मुलें म्हणून वाळींत टाकल्याची गोष्ट येथें गृहीत धरली आहे. ' संन्याशाचीं मुलें । म्हणोनी हेळिती । तेणें चौघा चित्तीं । उद्विग्नता ' (५२) (१३) निवृत्ति व सोपान ज्ञानदेवाच्या विचारानें पैठणास जातात. मध्यंतरीं निवृत्तिनाथास ब्रह्मगिरीवर गहिनीनाथाचा उपदेश झाल्याची व त्यानें ज्ञानदेवास व ज्ञानदेवानें सोपानदेव मुक्ताबाईस उपदेश दिल्याची भक्तितत्त्वामृतरहस्यांतील कथा येथें बाळली आहे. (१४) ' ज्ञानेश्वरद्विजखटका ' यांतील विधानें एकनाथांच्या एका

रूपकावर आधारित असल्याचें नारायण केशव विप्रांनीं आपल्या टिपणींत दिलें आहे. ' आरता येरे धाकुल्या मुला । कशानं थोरपण आलंय तुला । उलिसच कीं रे दिसतें पोर । ब्रह्मीं नाहीं लहान थोर । तुला ब्रह्म ठाउकें आहे । सर्वा घटीं तेंचि पाहें (गाथापंचक ३७४४ पान २८४). (१५) रेड्यामुखें वेद बोलविल्याचा चमत्कार व अतिशयोक्तवर्णन 'जैजेकार केला । स्वर्गी सुरवरीं । विमानें अंबरीं । पुष्पवृष्टि ' (८२) (१६) नेवाश्याचे ठाणेदार सचोपंत हेमाद्रीचे सेवक. रामदेव राजा व हेमाद्री यांस गीतार्थाची तळमळ यासंबंधीं उल्लेख भक्तितत्त्वामृतरहस्यांत आहे. ' छपन्न भाषेच्या ग्रंथांचा उलगडा ' यांत केला आहे (ज्ञानेश्वरीतील उल्लेख). ' लंकेसी हेमाद्री । पंत जेव्हां गेले । छेपन्न आणिले । ग्रंथ त्यांणीं (९२) । छेपन्न भाषेचे । छेपन्नहि ग्रंथ । पाहिले यथार्थ शोधोनीया (९३) । राया मनीं अर्थ । एक हीन वाणें । गीता योग्य लेणें । अर्थ नोहे (९४) । गीतार्थ नेटका प्राकृत पाहावा । राजयाच्या जीवा वेध ऐसा (९५) सचोपंतास याविषयीं सांगायला व ज्ञानदेव नेवाश्यास यायला एकच गांठ. (१७) ज्ञानेश्वरीची जन्मकथा— कोळश्यांनीं मंदिराच्या भिंतीवर गीता लिहिल्याची कथा पांगारकरांनीं दिली आहे. पण भक्तितत्त्वामृत रहस्यांत हा चमत्कार नाहीं. तेथें सच्चिदानंद बाबांच्या पुनर्जीवनाचा चमत्कार वर्णिला आहे. (१८) रामदेव, हेमाद्रि, सेनापति व पाणक्या ब्राह्मण यांनीं वेरूळच्या गुहेंत केलेल्या ज्ञानेश्वरीपठनाची कथा नवीन आहे. (१९) ज्ञानेश्वरी ग्रंथ पाण्यांत बुडविल्याची कथा, त्यांतील चौदा विद्या चौसष्ट कला या धन-साधनांचें वर्णन, तो पुनः पाण्यांतून बाहेर काढतांना नष्ट झालें ' एकनाथ आवृत्तीची भविष्यवाणी इत्यादि चमत्कार यांत वर्णिले आहेत. (२०) साडे तीन घटकांत कोळशानें ज्ञानेश्वरी देवळावर लिहिली—निवृत्तीच्या आज्ञेनें सचोपंताकरवीं तेवढ्याच वेळांत लेखणीनें कागदावर लिहविली. रामदेव राजा-कडून परत आल्यावर एक महिना पुनः लेखन केलें. नंतर कोळशाचा लेखा पुसला गेला. ही हकीकत चमत्कारमय आहे. (२१) नेवाशाहून आळंदीस आले; पण आजोळचा उल्लेख नाहीं. आळंदीहून चांगदेवाचा उद्धार होतांच पंढरपूरला नामदेवाच्या भेटीस गेल्याचा उल्लेख (१६८). (२२) पंढरपुरास चोखा मेळा, गोरा, कबीर, सांवता, परसा भागवत, नरहरी यांच्या भेटीचा उल्लेख आहे. परंतु यांतील कबीर नंतरचा असल्यानें सर्वांच्याच काळाची तपासणी झाली पाहिजे. (२३) तीर्थावळीचा उल्लेख याच पंढरपूरभेटींत आला आहे. पण नामदेव तींत आला नाहीं (१६९ – १७३). (२४) पंढरपुरास बंका महाराचें वृत्तिपरिवर्तन करून दाखवून ब्राह्मणाचें खंडन केल्याची कथा नवीन आहे (१७४–१९०). (२५) शेवटच्या निरोपांत हरिपाठ, हरिनामस्मरण व विठ्ठलदर्शन यांचा उपदेश बराच लांबविला आहे. तसा कांहीं उपदेश ज्ञानदेवांनीं केल्याचें आढळत नाहीं. (२६) समाधिप्रवेशाचें सविस्तर वर्णन केलेलेंच नाहीं. अनेकांनीं तें अद्भुतरसभरित केलें आहे. (२७) कवित्वाचा काळ वैशाख कृ. ७ मंगळवार शक १६९२ स्थळ-ब्रह्मपूर. (२८) चारही भावंडांचीं समाधिस्थानें

सांगत असतां मुक्ताबाईचें 'ब्रह्मगिरीमधीं। मुक्ताबाई' (२२६) असें जें म्हटलें आहे तें लक्ष्य होय. कारण एदलाबादेजवळ मुक्ताबाई अन्तर्धान पावल्याची कथा सर्वत्र रूढ आहे. ब्रह्मगिरी त्र्यंबकपर्वतास म्हणतात. (२९) 'देखोनी समाधी। सर्व सुरवरी। इंद्रायणीतिरीं। वास केला' असें तुका विप्र म्हणतात. परंतु आळंदीचें माहात्म्य वर्णन करीत असतां तिच्या प्राचीन माहात्म्याचें मोठें सुरस वर्णन आढळतें. इंद्रायणींत इन्द्रानें तप करून इन्द्रपद पुनः मिळविल्याची व इतर अनेक कथा असून ज्ञानदेवापूर्वीच येथील तीर्थक्षेत्रांत अनेक देवतांचा वास होता असें वर्णिलें आहे. (३०) यजान(अज्ञान) वृक्षाची कथा दिली आहे ती अशी : 'अज्ञान रोविला। दंड तो द्वारेसी। पल्लव तयासी। अज्ञोणीयां' (२३१) (३१) तुका विप्र नित्य कीर्तन करीत. श. १६९१ च्या कीर्तनवहींत तत्पूर्वीं १४ वर्षें त्यांचा हा क्रम अव्याहत चालू होता असें दिलें आहे. कीर्तनाच्या आख्यानांत श्रोत्यांच्या मनरंजनासाठीं अद्भुत चमत्कारांची भर घालण्यांत आपण कांहीं विशेष करीत आहोंत असें त्यांस वाटत नसतें. सत्यासत्याची त्यांची व्याख्या बरीच लवचीक दिसते. त्यामुळेंच संतचरित्रांची विश्वसनीयता नष्ट झाली आहे (कीर्तनसंप्रदायामुळें). (३२) तुका विप्रांच्या गुरुपरंपरेबद्दल श्री. नारायणराव विप्रांनीं दिलेली माहिती विचारांत घेण्यासारखी आहे. ती त्यांनीं तुका विप्रांच्याच उल्लेखावर आधारलेली अशी दिली आहे. शिष्यपरंपरेनें तुका विप्र एकनाथांना 'नाता नातू होये' असें म्हणतात. इतरत्र अनेक ठिकाणीं एकनाथ-अनंत-विठ्ठल- विश्वनाथ अशी परंपरा दिलेली आहे. अनंत-विठ्ठल-विप्रनाथ हीच परंपरा बरोबर असून विश्वनाथ हें अनंत किंवा विठ्ठल यांपैकीं कोणाचें तरी दुसरें नांव असावें असा ते निर्वाळा देतात.

---

६. अज्ञानसिद्ध कवीची अप्रकाशित काव्यरचना पृच्छापत्र

(डॉ. व. वि. पारखे, डोंबिवली)

शक १३०० ते १३५० च्या सुमारास बालाघाट जिल्ह्यांत नागनाथ या नांवाचे सत्पुरुष होऊन गेले. अज्ञानसिद्ध आणि बहिरा पिसा हे दोन त्यांचे प्रमुख शिष्य होते. नागेश हे निसंग निर्विकार मुक्तपणाची राहणी असलेले एक थोर संत असून त्यांच्या ठायीं शुद्धाशुद्धादि सकल भेदभाव लयास गेले होते आणि त्यांना अलौकिक ब्रह्मस्थिति प्राप्त झाली होती, अशी माहिती श्री. ल. रा. पांगारकर आपणांस देतात.[1] धुळें येथें

---

१. मराठी वाङमयाचा इतिहास दुसरा खंड. लेखक श्री. ल. रा. पांगारकर; पृष्ठ २७.

श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरांत असलेल्या एका बाडांत अज्ञानसिद्ध नागनाथकृत 'वासुदेव' नांवाचें एक हस्तलिखित आढळतें. त्यांत एके ठिकाणीं कवि म्हणतो[२]—

संत गुरु नागनाथु सिद्ध अज्ञान ज्ञाता ॥ अनंते कृपा केली कीर्ति काये वर्णू आता ॥
या उल्लेखामुळें श्री. पांगारकरांनीं नागेशाच्या संतपणाविषयीं दिलेल्या माहितीस पुष्टीच मिळते.

महाराष्ट्रसारस्वतांत' वडवाळसिद्ध नागेश आणि अज्ञानसिद्ध नागेश हे दोन स्वतंत्र कवि असल्याचें विधान डॉ. शं. गो. तुळपुळे करतात.[३] परंतु श्री. ल. रा. पांगारकर मात्र 'नागनाथ नागेश, वडवाळ नागेश, सिद्धलिंग, सिद्धराज हीं नांवें एकाच पुरुषाचीं असून, तो अज्ञान कवीचा गुरु होता,' असें सांगतात.[४] श्री. गो. का. चांदोरकर यांना, वरद नागेश आणि अज्ञानसिद्ध कवि एकच व्यक्ति असावी असें वाटतें![५] अज्ञानसिद्ध कवि श्रीगुरु म्हणून नागनाथ अथवा नागेशाचें नांव ठिकठिकाणीं देतांना आढळतो,[६] त्यामुळें या वादास अर्थ उरत नाहीं!

अज्ञानसिद्ध कवीच्या नांवावर महाराष्ट्र सारस्वतांत, 'गुरुशिष्यसंवाद' 'काळज्ञान,' व 'पंचीकरण' या ग्रंथांचा उल्लेख आढळतो. श्रीरामदासी संशोधनाच्या दोन खंडांत, 'वासुदेव', 'संकटहरिणी शिवग्रंथ,' आणि 'वरदनागेश' ही ग्रंथरचना नमूद केलेली आढळते. या व्यतिरिक्त पदपदांतरांचाहि उल्लेख केलेला दिसतो. श्री. गो. का. चांदोरकर केवळ 'काळज्ञान' आणि अविंध भाषेतील 'पंचीकरणाचा' उल्लेख करतांना दिसतात!

डॉ. पंडित आवळीकर यांनीं 'जुनें वाङ्मय नवें संशोधन' या संशोधनलेखसंग्रहांत अज्ञानसिद्धावरील विवेचक लेखांत अज्ञानसिद्धाविषयींचे अनेक अपसमज दूर करून त्याच्या 'तत्त्वबोध', 'जीवब्रह्मभेदलक्षण' 'पृच्छापत्र' आणि 'काळज्ञान' या चार ग्रंथांचा परिचय घडविला आहे. तसेंच डॉ यू. म. पठाण यांच्या 'नागेशसंप्रदाया'चें परीक्षण करतांना श्री. रा. चिं. ढेरे यांनीं 'इंद्रायणी' मासिकांत 'अकालज्ञाना'चा निर्देश केला आहे.

---

२. श्री रामदासी संशोधन, प्रथम खंड, पान ३१४, क्रमांक ३७६.

३. महाराष्ट्र सारस्वत (चतुर्थावृत्ति), पान ९२०.

४. मराठी वाङ्मयाचा इतिहास, दुसरा खंड, पान २७.

५. संत-कवि-काव्य सूचि पान ८.

६. श्री रामदासी संशोधन, प्रथम खंड, पान ३१४, क्र. ३७६; द्वितीय खंड, पान २३३, क्र. १०७४; पान २७४, क्र. ११९७; पान ३६७, क्र. १४२१; तसेंच मराठी वाङ्मयाचा इतिहास (पांगारकर) २ रा खंड, पान २६; इत्यादि पाहावे.

'पृच्छापत्रांत' अज्ञानसिद्ध कवि आपल्या गुरूची थोरवी वर्णन करतांना म्हणतो-

ऐसा वडवाळसिद्ध नागेश पूर्ण। गुरुसिष्य निर्द्वंद्व अनुभवे करून ॥ तेथे सिष अज्ञान ज्ञानरहित जाण। विज्ञान पूर्णापूर्णत्व सहज ॥ २०१ ॥

त्याचप्रमाणें 'अकालज्ञान' या काव्यरचनेंत कवि आपल्या गुरूस नमन करतांना म्हणतो-

नमो नमो जी नागदेवा। नमो नमो पूर्णात्मा पूर्ण भावा ॥ नमो देवाधिदेवा ॥ नागेश्वरा ॥ १०० ॥

संपूर्ण सदा नागेशू ॥ संपूर्ण संपूर्ण प्रकाशू ॥ संपूर्ण निजवासू ॥ अखंडित ॥१०२॥

या उल्लेखांवरून 'पृच्छापत्र' आणि 'अकालज्ञान' ही काव्यरचना अज्ञानसिद्ध या एकाच कवीची असावी यांत शंका वाटत नाहीं!

प्रस्तुत 'पृच्छापत्र' ही अज्ञानसिद्धाची काव्यरचना प्रसिद्ध केली जात आहे.

'पृच्छापत्र' ही २०१ ओव्यांची अध्यात्मपर काव्यरचना असून ती प्रश्नोत्तरस्वरूपांत गुंफिलेली आहे. शिष्य गुरूला प्रश्न विचारतो आणि गुरु शिष्याचें शंकानिरसन करतो, अशी या काव्याची धाटणी आहे. शब्दब्रह्म म्हणजे काय? चिदाचें लक्षण कोणतें? आनंदपुरुष कसा असतो? अक्षर म्हणजे कोण? जो क्षर तो कसा क्षरला? चैतन्यब्रह्मीं पुरुषपण आहे काय? निर्गुण ब्रह्म म्हणजे काय? ईश्वरी जीवात्मा आहे किंवा नाहीं? परब्रह्मीं कर्मत्रय कसें राहतें? निराकार कसा प्रकाशतो? इत्यादि. वेदांतपर प्रश्नांची चर्चा या काव्यरचनेंत अज्ञानसिद्ध कवीनें केलेली आहे. मात्र ही चर्चा करीत असतांना कवीनें भगवद्गीतेचा आणि शंकराचार्यांच्या मायावादाचा आधार प्रामुख्यानें घेतलेला दिसतो. उदाहणार्थ, कवि म्हणतो-

विकारमाया अविद्येचा चराचरी। हे दोन्ही भेद गिते माझारी ॥ निरोपिले ॥ २८॥

अथवा असती अनुवादले श्रीकृष्णनायक। भगवद्गीते तेरावे अध्याई ॥ ३२ ॥

किंवा म्हणोन स्वमुखें सांगत। भगवद्गीते सातवे अध्याई ॥ ९२ ॥

श्रीशंकराचार्यांच्या 'मायाविवर्त' कल्पनेचा आधार घेत कवि म्हणतो—

सत्यवीण असत्य नाही। हे तव सहज उपपती (त्ति) पाही ॥

म्हणोनि सद्ब्रह्म सत्यचि माया तद्वीवर्त हेही। अनूभवी नित्यानित्य ॥ १६ ॥

ग्रंथ जरी अध्यात्मप्रवण असला तरी, वाळवंटांत आढळणाऱ्या ओयासीसप्रमाणें यांत काव्यदृष्ट्या कांहीं सरस रचना आढळते. कवि अज्ञानसिद्ध अनेक ठिकाणीं अनुप्रासात्मक रचना करतांना आढळतो. उदा०

---

१ पृच्छापत्र- भा. इ. सं. मं. हस्तलिखित क्रमांक २९।४३४.

जे सर्वत्र वर्तता सर्वत्रपूर्ण । जे अचळ अनामय अविनाश खुण ॥
पाहे पाहाणेवीण ते ॥ १३ ॥

अथवा–तरि पूर्ण ते पूर्णापूर्ण अपूर्ण अगम्यता ॥ ६४ ॥

अज्ञानसिद्धानें कांहीं ठिकाणीं दिलेले दृष्टान्तही सुंदर आहेत. उदा०––

तव मुमुक्षु चकोर चंद्रनिर्लोछन । नित्य संप्रज्ञात बोधसमाधी विहीन ॥
आपते स्नेहाळ लडिवाळ भाव ऐकोन । बोलता जाला ॥ ६ ॥

तसेंच–मुखी घालिता शर्करा कवळ ॥ सर्वांगी स्वादाचा सुकाळ ॥
तैसा स्वानंद कल्लोळी इंद्रियाचा मेळ । विकळ ते स्वानंद सुखे ॥ २१ ॥

किंवा–चित्रीचा व्याघ्र लागे स्वप्नावस्था पाटी । हे तद्द्रष्ट्या सत्यमान गोष्टी ॥
तैसी दंपत्य ही कोटी न साहे ब्रह्मी ॥ ६१ ॥

अथवा–तम अंधकारी ज्ञानदीप उजळिला ॥ तै अंधकार प्रकाशरूप संचला ॥
तैसा जिवित्व निराशा पावला ॥ ऐश्वर्यत्व ॥ ७२ ॥

या दृष्टान्ताच्या बरोबरच आपणांस कांहीं सुंदर उत्प्रेक्षाहि कवीनें रचिलेल्या आढळतात. उदाहरणार्थ—

का कामिनीसंगे कामिक सुखाची प्राप्ती । ते त्यजून नैश्वर्य भोगाची सुखोत्पत्ती ।
तेची तुर्या कामिनीसंगे अखंड सुख भोगिती । ते स्वानंद सुख ॥ २२ ॥

का रसे सुखावे रसना । ते त्यजोनी विषयाची वासना ॥
अर्धमात्रा ब्रह्मरसे समरस मना । निर्मने भोगी ते स्वानंद सुख ॥ २३ ॥

अज्ञानसिद्ध कवीच्या या हस्तलिखितांत कांहीं ठिकाणीं अक्षरें गळलेलीं आढळतात अथवा चुकीचीं शब्दरूपें येतांना दिसतात. उदा० अपत्यसाठीं ‘आपत’ किंवा ब्रह्म हा शब्द ‘ब्रंम्ह’ असा लिहिलेला आढळतो. कदाचित् कवीचा हा दोष नसून नकलकाराचा तो असावा, असें वाटतें. या हस्तलिखिताचा नकलकार भानजी त्रिंबक हा असून तो मोहोळ येथील राहणारा. शके १७९३ प्रजापति नाम संवत्सरीं त्यानें अज्ञानसिद्ध कवीच्या ‘पृच्छापत्रा’ची नकल स्वतःसाठीं केलेली आहे. अज्ञानसिद्ध कवीच्या या काव्यांतील ओवीची रचनाहि चमत्कारिक आढळते. कांहीं ठिकाणीं ३ चरणच आढळतात. उदा० ६१ वी ओवी पाहावी. तसेंच, या ओव्यांच्या चरणांची लांबीहि फार आढळते. जणूं कांहीं गद्यसदृश वाक्येंच! त्याचप्रमाणें ओवीचा चतुर्थ चरण कांहीं ठिकाणीं छोटा (उदा० ७२) तर कांहीं ठिकाणीं लांबलचक असलेला दिसतो (उदा० ७, १४, २३ वगैरे).

अज्ञानसिद्धाच्या रचनेची वाचकांना ओळख व्हावी म्हणून ‘पृच्छापत्र’ हा काव्यग्रंथ आम्ही या अंकांत प्रसिद्ध करीत आहोंत. त्याचा ‘अकाळज्ञान’ हा ग्रंथहि प्रसिद्ध करण्याचा मानस आहे. अज्ञानसिद्धाचे हे दोन अप्रकाशित ‘काव्यग्रंथ’ अभ्यासार्थ उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही प्रा. ग. ह. खरे, कार्यवाह, भा. इ. सं. मंडळ, पुणें यांचे ऋणी आहोंत.

———

पृच्छापत्र–मूळ पाठ

श्रीगणेशाय नमः ॥ पृच्छापत्र ग्रंथ प्रारंभः ॥ ॐ नमो सद्गुरू वोंकार मायामह तत्त्वाचा मुळी ॥ ॐ नमो सद्गुरू गुणसाम्य संकेता जवळी ॥ ॐ नमो सद्गुरु सच्चीदानंद कलोळी ॥ विरहीत सहजा ॥ १ ॥ ॐ नमो सद्गुरू अनंदघन अपरमिता ॥ ॐ नमो सद्गुरू त्रिगुणात्मक वंधन विध्वंसिता ॥ ॐ नमो सद्गुरूनाथा पंथ बुझाविता ॥ ज्ञयज्ञान ग्रासिता विज्ञानत्वे ॥ २ ॥ तू तव निशब्दपणे शाश्वत ॥ परि अनाथा कारणे वेळाइत ॥ कर्तृत्वा नातळता बुझावित ॥ मुमुक्षाते ॥ ३ ॥ तू ऐश्वर्य संपूर्ण परमांमृतेसी ॥ प्रस्नोत्तर दहकाते निवारिसि ॥ म्हणोनि अज्ञानसित्थ नागेशी ॥ निज प्रेमेसी विनवणी ॥ ४ ॥ जी पृछापत्र पाटविले राजचंद्रे ॥ तरी तुवा विज्ञानस्थिती योगेंद्रे ॥ सिष्यवृंद निववोनि सुखेंद्रे ॥ स्वसुखे निववीजे ॥ ५ ॥ तव मुमुक्षु चकोरचंद्र निर्लांछन ॥ नित्य संप्रज्ञात बोधसमाधी विहिन ॥ आपते श्नेहाळ लडिवाळ भाव ऐकोन ॥ बोलता जाला ॥ ६ ॥ बोधाचा करोनि ग्रास ॥ समाधीप देवोनि त्रास ॥ अश्रमाभिमानी उदास ॥ तो नागेश म्हणे वद सिषा ॥ ७ ॥ मग निज चरणी ठेवोनि मन ॥ वदे सिष अज्ञान ॥ सच्चीदानंद पद व्याख्यान ॥ हे विपद ज्ञान सांगिजे जी ॥ ८ ॥ सच्चीदानंद पद ॥ हा तव वेदीचा शब्द ॥ याचे निरसोनि त्रै भेद ॥ ज्ञान विशुद्ध निरोपावे ॥ ९ ॥ पृछापत्र ते वचन ॥ शब्द ब्रह्म ते कवण ॥ चिदाचे काय लक्षण ॥ आनंद पुरुष तो कैसेन निर्धारे अज्ञा ॥ १० ॥ मग निशब्दवादे शब्दगती चेवउन ॥ बोले भवभयश्रम विध्वंसन ॥ सद्ब्रंह्मपदनिर्वाण ॥ परब्रंह्म ते ॥ ११ ॥ दिवस निशा भ्रमण होत जात ॥ तया माजि शाश्वत ते सहजसत ॥ ते शब्द ब्रह्म अविकृत ॥ जाण नित्यानित्य स्वयंभ ॥ १२ ॥ जे अस्तितव सत्ता मात्र स्वानंदघन ॥ जे सर्वत्र वर्तता सर्वत्रपूर्ण ॥ जे अचळ अनामय अविनाश खुण ॥ पाहे पाहाणेवीण ते ॥ १३ ॥ जया स्वरूपामाजि कैसी कोठे किती ॥ ब्रह्मांडे कवणीकडे अहेत म्हणोनि नेणती ॥ ते स्वरूप अंगांगत्व पूर्णस्थिती ॥ सद्गुरु खुणे निश्चिति पाहे या पाहणे ॥ १४ ॥ ऐसे सत्पद ब्रह्म साचेची ॥ द्वैत मिथ्या हे अज्ञा वेदाचीं ॥ तरी चित्पदमाया तद्वीवर्त हें सांगणेची ॥ न लगे अनुभविका ॥ १५ ॥ सत्यावीण असत्य नाही ॥ हे तव सहज उपपती पाही ॥ म्हणोनि सद्ब्रह्म सत्यचि मायातद्वीवर्त हे ही। अनूभवी नित्यानित्य ॥ १६ ॥ आतां अनंद पुरुषाचे लक्षण ॥ ते विवेकदृष्टान्ते सांगेन खुण ॥ दोही अंतरी सर्वेश्वर पूर्ण ॥ प्रकाशवंत ॥ १७ ॥ आपणापासी वस्तू असे नैश्वर नीच ॥ आणि दुसरी लाधे अनैश्वर साच ॥ तरि अनंद वाटे सहजच ॥ प्रसित्ध दिशे ॥ १८ ॥ म्हणोनि चिद्रूपमाया निरसिता ॥ आणि सद्रूप अनुभवे अनुभविता ॥ दोही अंतरी अनंद प्रकासिता ॥ तो स्वानंद निर्धारू ॥ १९ ॥ कवण ऐसे म्हणेल ॥ जे स्वरूप अनुभवो सांगो यईल ॥ परि अनंद सुख कैसे असेल ॥ अनुभवसित्ध नागेश ॥ २० ॥ मुखी घालिता शर्करा कवळ ॥ सर्वांगी स्वादाचा सुकाळ ॥ तैसा स्वानंद कल्लोळी ॥ इंद्रियाचा मेळ ॥ विकळ ते स्वानंद सुखे ॥ २१ ॥

का कामिनीसंगे कामिक सुखाची प्राप्ती ॥ ते त्यजून नैश्वर भोगाची सुखोत्पती ॥ तेंची तुर्या कामिनीसंगे अखंड सुख भोगिती ॥ ते स्वानंदसुख ॥ २२ ॥ का रसें सुखावे रसना ॥ ते त्यजोनी विषयत्वाची वासना ॥ अर्ध मात्रा ब्रह्मरसे समरस मना ॥ निर्मने भोगी ते स्वानंदसुख ॥ २३ ॥ येवं सच्चीदानंदपद व्यान ॥ अद्वयभेदे भिन्न ॥ हे निरसोनि उन्मन ॥ स्वस्थ संप्रज्ञ स्थिती ऐके ॥ २४ ॥ जेथे नातले द्वंद्राचे स्फुर्ण ॥ गिळिला येकरणाचा अभिमान ॥ तेथे अनंद ग्रासिला जाण ॥ सहज जेथिचा तेथे ॥ २५ ॥ एवं सच्चीदानंद पदभेद ॥ हे मिथ्या अनुभव गतीते निर्द्वंद्व ॥ यदर्थी वेदांत वचन साक्षी उपनिषद ॥ सित्धांत अनुभव शब्द निशब्द ते जाणोनी नेणे ॥ २६ ॥ हे वेदांत सित्धांत अप्रमाण ॥ म्हणती तयाही न विवेकियाचें खंडज्ञान ॥ तया पाषांडमत्ते दूषण ॥ तयाचे तया भोगवी ॥ २७ ॥ ऐसे सच्चीदानंद पदत्रयांमृत ॥ करोनि येकार्णव सहज दृष्टांत ॥ मग सिष्य होवोनि संप्रज्ञात ॥ असें उत्धारिता पृछापत्र ॥ २८ ॥ जी कैवल्यनिधी गुण-सागरा ॥ निरसिले सच्चीदानंदपद श्रमोत्तरा ॥ आंता क्षराक्षर विचार करा ॥ सद्गुरु माहेरा अनाथाचिया ॥ २९ ॥ पत्रवचन अक्षर कवण तो सचंला ॥ क्षर कैसा क्षरला ॥ या दोहीचा विचार भला ॥ होय ते सांगा ॥ ३० ॥ उत्तर ॥ मग सकोमळ सप्रेम भाव देखोनि भाव तत्पर ॥ बोले पूर्णबोधसद्गुरु उदार ॥ म्हणे अक्षई चैतन्यावभास ते अक्षर ॥ तया करस्थापर ते परमस्वरूप ॥ ३१ ॥ तेथोनि त्रिगुणात्मक आणि पंच-भूतात्मक ॥ हे क्षर जे क्षरले सकळिक ॥ असती अनुवादले श्रीकृष्णनायक ॥ भगवद्गीते तेरावे अध्याई ॥ ३२ ॥ हा क्षराक्षर विचारू ॥ वाचकगती अंधकारू ॥ मग कृपा करोनि सद्गुरु ॥ करी निर्धारू अनुभवे ॥ ३३ ॥ क्षराचे कारण अक्षर ॥ अक्षर करस्थ वस्तूपर ॥ ऐसा अनुभवे निर्धार ॥ करोनि बुझाविला ॥ ३४ ॥ पुनरपी सिष करी विनंती ॥ जे अशंका पृछापत्री ॥ ती ऐका जी निश्चिती ॥ सद्गुरूराया ॥ ३५ ॥ पत्रावचन ॥ तिजा पुरुष तो करण ॥ याचे सांगितले पाहिजे लक्षण ॥ चैतन्य ब्रह्मी पुरुषपण ॥ असे की नसे ॥ ३६ ॥ उत्तर ॥ मग बोले विज्ञानसिंधू सिरोमणी ॥ पूर्ण सर्वारंभपूर्णपणी ॥ प्रस्नोत्तरासि सादर होउनी ॥ निरोपिता जाला ॥ ३७ ॥ म्हणे तिजा पुरुष तो उन्मेशु ॥ जो गुण साम्य संकेती सहवासु ॥ उन्मेशा निराभासु ॥ पुरातन वस्तू ॥ ३८ ॥ चैतन्यब्रह्मी पुरुषपण ॥ असे की नसे हे वचन ॥ अनुभवे करितसे खंडण ॥ गुरूराज ॥ ३९ ॥ षडदर्शनासि बुझाविता ॥ कृपा उपजली तया श्रीगुरूनाथा ॥ म्हणे चैतन्य ब्रह्मी अस्तीत्व पुरुषत्वा ॥ हे काय सांगणे नलगे ॥ ४० ॥ हे अष्टधा प्रकृतीप्रपंच सकळिक ॥ सकळ ऐश्वर्याचैतन्य कारणिक । म्हणोनि मुळीच सत्ता पुरुषत्व असे देख ॥ हे संशयात्मक जनासी ॥ ४१ ॥ जरी परसमंधे चैतंन्नी नाही पुरुषत्व सकळिक ॥ तरी पुरुषत्वा नाही स्थानक ॥ चैतन्या परते पुरुष ना नपुसक ॥ अद्वयात्मक अजत्वे ॥ ४२ ॥ ऐसे ऐकोनि निरोपण ॥ सिव विनवी संप्रज्ञ ॥ म्हणे सगुण निर्गुण लक्षण ॥ हे पृछापत्र वचन प्रभु निरसावे ॥ ४३ ॥ पत्रवचन ॥ निर्गुण ब्रह्म ते कवण ॥ याचे कीजे निरोपण ॥ सगुणाचे कैसे लक्षण ॥

तेही सांगावे ॥ ४४ ॥ उत्तर ॥ मग देखोनि खंडज्ञा। भद्रजाती ॥ अनुभवसिद्ध न भीत चित्ती ॥ विदारी निशस्रपणे भ्रांती ॥ प्रश्न वचनाची ॥ ४५ ॥ निर्गुण ब्रह्म ते सत्पदत्व ॥ तयाचे लक्षण कैसे हे भेदत्व ॥ हे परिसत जिही दास्यत्व ॥ केले असेल सद्गुरूचे ॥ ४६ ॥ तरी निर्गुणाची गती ॥ ते प्रगटेना गुप्त स्थिती ॥ आहे नाहीं म्हणती श्रुती ॥ टकोनि टेलिया ॥ ४७ ॥ जे सर्वकाळ नित्यानंद भरित ॥ अदृस्यरूपे अत्मासमीप नित्य ॥ जैसा मींन उदकी वर्तत ॥ तैसी सगुण ब्रह्मांडे निर्गुण ब्रह्मी ॥ ४८ ॥ अता सगुणाचे लक्षण ॥ ते तव अष्टधा प्रकृती भेदभिन्न ॥ अविद्या प्रपंचभेदत्रयकार्य माया कारण ॥ हे भगवद्गीते भगवान वदे सातव्याध्याइ ॥ ४९ ॥ ऐसे सगुण निर्गुण भेदत्व गती ॥ निरसोनि राहिले पूर्ण स्थिती ॥ त्याचिये सांप्रदाई अधिकारिये होती ॥ ते पावती हे स्थितीते ॥ ५० ॥ ऐसे जाणोनिया चिती ॥ सुख पावोनिया अनुभव गती ॥ पुनरपी सिष करी विनंती ॥ पृछापत्री जे अशंका ॥ ५१ ॥ पत्रवचन ॥ इश्वरी माया जाळी ॥ ते दुहिता गमो अली ॥ आणि प्रकृती पुरुष गमली ॥ कोणे न्याये ॥ ५२ ॥ जरी अकस्मात जाली दोनी ॥ तरि तो बंधू ते भगिनी ॥ ते माता जरी ती पासुनी ॥ तो देव केवी घडे ॥ ५३ ॥ होणे नाही दुजे स्थान ॥ तरी ते दंपत्य कैसेन ॥ दोही मातृकाचे प्रमाण केले कैसे ॥ ५४ ॥ उतर ॥ ईश्वर मायेचे विवरण ॥ आणि प्रकृती पुरुषाचे लक्षण ॥ दुहिता माता बंधू भगिनी दंपत्य हे वचन ॥ भ्रम निरसू परियस ॥ ५५ ॥ अविद्या कार्य अष्टधा प्रकृती भेदत्व ॥ कार्यकारण कर्तृत्व ॥ तया अधिष्ठाणे जिवात्मया पुरुषत्व ॥ परिस अभेदत्वे ॥ ५६ ॥ तत्वता जाणोनि दृष्टान्त ॥ अनात्मजात श्रुती निरसत ॥ तेथे प्रकृती पुरुषाचि नास्तित्व ॥ मायबंधूभगिनित्व राहे कोटे ॥ ५७ ॥ मग तया ऐश्वर्य कारण ईश्वरी ईश्वरत्व ॥ तोही शुत्ध सत्वात्मक भोग द्वैत ना म्हणत ॥ तेणे इह नानास्तिकिंचन हे श्रुति वाक्य सत्य ॥ मानिती अनुभव ज्ञानी ॥ ५८ ॥ जेथे अनाजात श्रुतिशब्द निरसिले ॥ अद्वैत एकमेव सर्व अनुभविले ॥ तो अनुभवही जे टाई विरेल ॥ तेथे अटले ईश्वरमायेसहित ॥ ५९ ॥ तेथे दुहिता माता पाहता ॥ बंधू भगिनीत्व अथवा पिता ॥ ही आशंका कळंक आदि गभस्तीसि लाविता ॥ जै सूर्य मृगजळी बुडता ॥ तरि हे न घडेल ॥ ६० ॥ चित्रीचा व्याघ्र लागे स्वप्नावस्थापाटी ॥ हे तद्दृष्ट्या सत्य मानी गोष्टी ॥ तैसी दंपत्य ही कोटा न माहे ब्रह्मी ॥ ६१ ॥ तरि तया नसोनि तयेसि सहवास ॥ भोग भोगोनि अभाक्ता उदास ॥ हा ही निरसे कळंक लेश ॥ जैसा स्वप्नभया पासाव सावकाश ॥ होवोनि राहे जाग्रती ॥ ६२ ॥ साकार माया अविद्या वनस्पती ॥ वसंतरात सत्ता बोलावनी ॥ त्याची सहकुटुंब उत्पत्तिस्थिति ॥ केवी निराकार वसंती अतळे ॥ ६३ ॥ परब्रह्म सत्य पूर्ण तत्वता ॥ तरि दुजे असावेचा कोटे होती अपूर्णता ॥ तरि पूर्ण ते पूर्णापूर्ण अपूर्ण अगम्यता ॥ अपूर्णता ते शब्दचातुर्यताज्ञान उरे ॥ ६४ ॥ तरि ते नाते दोनी नाटकपण ॥ तेथे कवणासि काय होय कवण ॥ येणे सिधांते तर्कमुद्रेचे खंडण ॥ करी अनुभव न्याये ॥ ६५ ॥ ऐसे इश्वर माया प्रकृती पुरुष उपलवण ॥ करूनि सांगीतले अनुभविका ब्रह्मपूर्ण ॥ चेरा हतभाग्या असतचि

न दिशे जाण ॥ अंधा सूर्य जैसा ॥ ६६ ॥ तव स्वानुभवे सुखी होउनी ॥ पुनरपी पृछापत्र उत्थारुनी ॥ इश्वरी जिवात्मा अहे की नाही •हा निर्णय करोनी ॥ सांगा म्हणे सिष्य ॥ ६७ ॥ पत्रवचन ॥ इश्वरी जिवात्मा अहे की नाही ॥ अथवा असे की नसे परब्रम्ही ही ॥ कर्मत्रय कैसे वसे परब्रह्मी ॥ ते सांगा स्वामी ॥ ६८ ॥ उत्तर ॥ मग बोले अज्ञान दस्यकुटारदहक ॥ अविद्योपाधी बोलिजे जीवतर्क ॥ तद्दृष्ट्या जिवित्वकळंक ॥ केवि लागे ॥ ६९ ॥ आविद्योपाधो जीव ॥ मायोपाधी शीव ॥ या दोहीचा उगव ॥ करिती अनुभवी वेदांत ज्ञानी ॥ ७० ॥ सकळ जीवाचे ईश्वरत्व ॥ म्हणोनि नाम ईश्वरत्व ॥ तरी ईश्वरी वर्ते जिवित्व ॥ ऐश्वर्यत्वे ॥ ७१ ॥ तम अंधकारी ज्ञानदीप उजळिला ॥ तै अंधकार प्रकाशरूप संचला ॥ तैसा जिवित्व निराश पावला ॥ ऐश्वर्यत्व ॥ ७२ ॥ ऐसा अंधकारी प्रकाश थोर ॥ की प्रकासी अंधकार ॥ तैसा इश्वरी जिवात्मयाचा विचार ॥ माया अविद्या समंधे विस्तार उपाधीवशे ॥ ७३ ॥ अज्ञानाचाते निरसी ज्ञान ॥ ज्ञानाते निरसी विज्ञान ॥ तेथे नाही जीव इश्वरपण ॥ व्रह्म पूर्ण पूर्णत्वे ॥ ७४ ॥ जीवत्व ईश्वरत्व नलगे वस्तूसी ॥ तेथे त्रिविध कर्मासी वस्ती कैसी ॥ या पृच्छापत्र वचनासी ॥ पारहार परि तो ॥ ७५ ॥ जेथे अविद्या माया नातळती ॥ तेथे त्रिविध कर्मासि कैची अस्ती गती ॥ तरी या सकळ प्रपंचासि व्रह्मी वस्ती ॥ जैसे मृगज (ल) दिनकरी ॥ ७६ ॥ पत्रवचन ॥ महदूत्रय अहंकार लक्षण ॥ साक्षात्कार होय कैसेन ॥ देवत्रय कोठुन ॥ रुपासि अले ॥ ७७ ॥ उत्तर ॥ महतत्व श्रुत्धसत्वात्मक माये पासुन ॥ तेचि महद् त्रय अहंकाचे स्थान ॥ उत्पती स्थिती हरा सलक्षण ॥ सत्व रज तम ॥ ७८ ॥ रूपमात्रासि रूपावया कारण ॥ अष्टधा प्रकृती मुख्य जाण ॥ या प्रकृती निरासे उरे अभिमान तेथे रुप कैचे ॥ ७९ ॥ ज्ञानांजन शुधार्थ पायाळ नैनी दाटे ॥ तै दस्य महिमाजि अदस्य भेटे ॥ तोहीं ज्ञानघन अभिमान जेथिचा तेथे आटे ॥ तै फिटे दस्य भुरळे ॥ ८० ॥ ऐसे सद्गुरुचेनि कृपालेशे ॥ दस्य सबाह्य अदस्य प्रकाशे ॥ चतुर्थशून्य चैतन्यानुभवे निरसे ॥ पूर्णत्वे पूर्ण ॥ ८१ ॥ तेथे प्रथम चारि दशा अनुभविता ॥ मध्यशून्य साक्षात्कार पाहता ॥ दिशे प्रकाश तत्वता ॥ महदत्रय अहंकाराच्या ॥ ८२ ॥ गौरशामकृष्ण ॥ हे सत्व रज तम जाण ॥ याचा साक्षात्कार गुरुवचन ॥ करी मध्य शून्य ॥ ८३ ॥ या विकल्प भ्रांती सकळिका ॥ दस्य कळंक न लगे निष्कळंका ॥ पत्रवचन भ्रम निरसावया सिष्य टिळका ॥ वचनार्थ दाखविला ॥ ८४ ॥ ऐसा शब्दसंदेह निरसला ॥ तव सिष्य विनविता जाला ॥ पुन्हा उद्धार केला ॥ पत्र प्रश्नाचा ॥ ८५ ॥ पत्रवचन ॥ अकारा अले सर्वही नाशे ॥ निराकार कैसा प्रकाशे ॥ ज्ञयज्ञात विज्ञान कैसे ॥ सांगावे जी ॥ ८६ ॥ उत्तर ॥ अकारमात्र निरसे ॥ मग गुरुमुखे निराकार प्रकाशे ॥ तेव्हा सर्व नैश्वर ऐसे ॥ सहजचि कळे ॥ ८७ ॥ जो जो दस्य पदार्थ जाणिजे ॥ तो तो ज्ञय ऐसे बोलिजे ॥ द्रष्टा तो ज्ञाता सहज ॥ अनुसंधान धरिजे ते विज्ञान ॥ ८८ ॥ हे दस्याचे ज्ञान सोडोनी ॥ अदस्य अत्मा गुरुमुखे अनुभवोनी ॥ ते परमविज्ञानी ॥ लीन होती साधू

॥ ८९ ॥ जे अनुभवे अनुभवी पूर्ण ॥ तै ज्ञप्तोकळा जाय हरासोन ॥ तै ज्ञयज्ञाताज्ञान ॥ विज्ञानी समरसे ॥ ९० ॥ ऐसे परमनिर्वाणिक ॥ जाणो निरसले प्रस्नभेद कळंक ॥ तव सिष्य सद्‌गुरुचा बालक ॥ पुन्हा विनविता जाहाला ॥९१॥ पत्रवचन ॥ शबल शुद्धवाच्य लक्ष ॥ हा द्विधा वर्णपक्ष ॥ त्यजावा कोण प्रत्यक्ष ॥ कोण तो घेणे ॥९२॥ उत्तर ॥ संसार तमावरि अदित्य ॥ पूर्ण प्रभा सद्‌गुरु नित्य ॥ तो अशंका निरसावया उदीत ॥ विज्ञान सिंधू ॥९३॥ म्हणे सगुणत्व ब्रह्मांड-उपाधि शबल ॥ वाच्य जो वाचक गतीचा मेळ ॥ लक्ष जो लक्षत्व लक्षत्वा अळुमाळ ॥ युक्तीसि आणिती ॥ ९४ ॥ याचांश सोडोनि जिवाचा ॥ लक्षांश त्यजोनि ईश्वराचा ॥ शबलांश निरसोनि दस्याचा ॥ शुधांश वस्तूचा अनुभव घेईजे ॥ ९५ ॥ परब्रह्मी ज्ञेप्ती निमग्न होता ॥ वाचा निवर्तलिया सर्वार्था ॥ तेथ शबल लक्ष पाहता ॥ सहजचि निरसले ॥ ९६ ॥ मग शुत्ध पदार्थी ॥ या सहजचि निरल्या भ्रांती ॥ हे जाणोनि सिष्य करी विनंती ॥ अनुभवराजयासी ॥ ९७ ॥ पत्रवचन ॥ पदद्वयाचे लक्षण ॥ कार्य आणि कारण ॥ भेदत्रयाचे निरोपण ॥ करावेजी ॥ ९८ ॥ उत्तर ॥ पदद्वयाचे निरोपण ॥ त्वंपदतत्पद जाण ॥ याचे कार्यकारण ॥ माया अविद्या ॥ ९९ ॥ अविद्योपाधी जिवात्मा त्वंपदपिंड ॥ याचे कारण मायोपाधी तत्पद इश्वर ब्रह्मांड ॥ भेद त्रयासि कारण महतत्व प्रचंड ॥ तयासि कारण शुत्ध माया ॥ १०० ॥ जेथे माया अविद्या वावो ॥ तेथें पदत्रया कैचा ठावो ॥ मग अखंडित ब्रह्मान्वयो ॥ पदभेदरहित ॥ १ ॥ त्वं पद तत्पदाचे ऐक्यत्व ॥ ते असिपद अनुभव ग्रासी पूर्णत्व ॥ हे निरसोनि प्रश्न भेदत्व ॥ पुन्हा सिष्य विनवी ॥ २ ॥ पत्रवचन ॥ ॐकारी औट मात्रा ॥ त्या सांगाव्या जी सर्वत्रा ॥ त्याचेही अर्थ पवित्रा ॥ प्रत्यक्ष दावा ॥ ३ ॥ कोठे प्रग(ट)ला वोंकार ॥ तेथे कैसे क्षराक्षर ॥ अर्थ मात्रुका विस्तार ॥ कैसा जाला ॥ ४ ॥ वेद कोठे जाहले ॥ नेति मुखे काय निरसिले ॥ पूर्ण देखिले ॥ कवणे ते वेद ॥ ५ ॥ उत्तर ॥ निर्वाण स्वरूपीची शुत्धसत्वमाया ॥ तयेपासूनीरे महतत्व सिष्यराया ॥ ॐकार औट-मात्रासहित प्रगटावया ॥ तेचि स्थान ॥ ६ ॥ प्रथम अकारू ॥ द्वितिय उकारू ॥ त्रितिय मकारू ॥ याचे ज्ञातृत्व निर्धारू ॥ तेचि अर्धमात्रा ॥ ७ ॥ ते ज्ञातृत्व अर्धमात्रा स्वरूपीं मुरे ॥ तेचि त्या अर्धपवित्राचे पवित्र वारे ॥ गुरुमुखे प्रत्यक्षाकार निर्धारे ॥ तै हे प्रश्न मिथ्या ॥ ८ ॥ नित्य स्वरूपी उन्मेश चैतंन्य स्फुर्ण ॥ ते आक्षर कुटस्थ जाण ॥ तेथोनि अष्टधा प्रकृतीसी कारण ॥ विस्तारले क्षर ॥ ९ ॥ या क्षरापासोनि अक्षरावरी ॥ अनाम्मश्रुती नेति नेती उच्चारी ॥ तो उचारोनि निःशब्द निर्धारी ॥ तया निःशब्द पूर्ण ब्रह्माभीतरी बुडाले सर्व ॥ १० ॥ ऐसे निःशब्दी ॐकार शब्दगती ॥ तेथेचि प्रणवसहीत वेद वसती ॥ वेदा आस्तितत्व शाद्बिका गती ॥ या सकळिका व्यक्ती अव्यक्ता होती परब्रह्मी ॥ ११ ॥ ऐसा निरोपिला वचनार्थ ॥ तव सिष आसे अ(अं)र्तभुत । देह चतुष्ट्य ईश्वरी विशदार्थ ॥ निरोपिजे जी ॥१२॥ पत्रवचन ॥ वेद कोणे वस्तुमाजी ॥ काय निरसोनि दिधली बुडी ॥ देहे चतुष्ट्य ईश्वरी ॥ कैसे सांगा ॥ १३ ॥ उत्तर ॥ तव

संकल्पशनिःपाते व(वे)ष्टिले या जिवाते ॥ उपचारिता ब्रह्मरस परमामृते ॥ कृपा उपजली निजपद दातियाते ॥ म्हणे परिस निजभक्ता ॥ १४ ॥ ब्रह्मी उन्मेशादि प्रपंच निर्सिता ॥ वाचा निवर्तलिया सर्वथा ॥ मग वेद मौने निशब्द तत्वता ॥ स्वरुपी बुडि देवोनि राहिला ॥ १५ ॥ आता ब्रह्मांडविश्वरूप ते इश्वराचे स्थुळ शरीर ॥ तेथिची जागृतीते शृष्टी अवस्था निरंतर ॥ ब्रंह्मा अभीमानी रजोगुणी षडविकार ॥ सृजित विश्व ॥ १६ ॥ हिरण्यगर्भ व्यवस्थाचक्र लिंगदेह इश्वरी ॥ स्थिती अवस्था ते स्वप्न अवधारी ॥ विष्णू आभिमानी सत्वगुण अधिकारी ॥ करी स्थिती व्यापार ॥ १७ ॥ कारण शरीर इश्वरी ते माया ॥ तेथील शुशुप्ती अवस्था तो प्रळय रे सिषराया ॥ रुद्रतमोगुण अधिकारिया ॥ वर्ते तेथे ॥ १८ ॥ निजावृती चैतन्यत्व साक्षित्व ज्ञातृत्व ॥ तें चि महाकारण देह आस्तित्व ॥ तेथे तुर्य अवस्था वर्ते ऐश्वर्यत्व ॥ अभिमानी प्रत्यगात्मा ॥ १९ ॥ ऐवं स्थूळ सुक्षम क्ष्म) कारण महाकारण ऐश्वर्य ॥ हे इश्वराचे देह चतुष्टये ॥ चारी अवस्था चारि अभिमानिये ॥ निरोपिले वेदांतसाक्षी ॥ २० ॥ ऐसा निरसला प्रश्नेद ॥ तव सिष करी अनुवाद ॥ म्हणे परिसाजी पुन्हा शब्द ॥ पृछापत्रिचा ॥ २१ ॥ पत्रवचन ॥ देवासि कोण अधिद (दै) वत ॥ कोणासि म्हणिजे अधिभूत ॥ अध्यात्म बोलिजेत ॥ कवण ते जी ॥ २२ ॥ उत्तर ॥ तव सद्गुरू बोलती सिषोत्तमा ॥ देवादेव आधि तो निजात्मा ॥ देवोदेवत नलगे परब्रह्मा ॥ तया अनुभवै प्रश्न भ्रमावेगळे होईजे ॥ २३ ॥ सकाळभूत-भूतासी ॥ प्रपंचादिकपिंड ब्रह्मांडासी ॥ अधिभुत ते परियसी ॥ शुत्धसत्वात्मक माया ॥ २४ ॥ ऐसे सद्गुरूने निरोपिले ॥ तव सिषे विनविले ॥ पृछापत्रीं जे बोलिले ॥ ते परिसा स्वामी ॥ २५ ॥ पत्रवचन ॥ विकार असे की नसे इश्वरी ॥ देव असती कोणे विकारी ॥ या जिवासि निर्धारी ॥ विकार कितीं ॥ २६ ॥ उत्तर ॥ तव सद्गुरू म्हणती अवधारी ॥ शुत्धज्ञानमायाविकार इश्वरी ॥ देवता त्रय उत्पती-स्थितिलय संव्हारी ॥ विकारवंत ॥ २७ ॥ जीव अविद्याविकारी ॥ येवं जीवादेवा अवधारी ॥ विकार माया अविद्येचा चराचरी ॥ हे दोन्ही भेद गितेमाझारी ॥ निरोपिले ॥ २८ ॥ जेथे अविद्यामाया निरसे ॥ तेथे जीवदेव विकार न दिसे ॥ अखंडित अविकारी असे ॥ निजात्मस्वरूप ॥ २९ ॥ ऐसे अनुभवीक निरोपण ॥ ऐकोनि सिष करी गुरूसि वंदन ॥ म्हणे परिसा जी वचन ॥ स्वामिराया ॥ ३० ॥ पत्रवचन ॥ कोणती अवस्था देवा ॥ किती अवस्था जिवा ॥ अवस्था निर्धार करावा ॥ वनस्पतीचा ॥ उत्तर ॥ तव म्हणे विज्ञान सिंधू ॥ परिसी जीवदेव अवस्थाभेदू ॥ तेणे तुटे सवशय (संशय) कंदू ॥ पृच्छापत्र वचनाचा ॥ ३२ ॥ ब्रह्मांडतत्साक्षित्वे पिंड वसे ॥ ते सप्तधातुकस्थूळ शरीर पारिसे ॥ विष्णू आभिमानी जाग्रत अवस्था वसे ॥ नेत्रस्थानी ॥ ३३ ॥ अंतःकर्ण चतुष्टय देह सुक्षम ॥ तेथे अवस्थेचा भ्रम ॥ तैजस अभिमानी हे वर्म ॥ बुझे कंठस्थान त्याचे ॥ ३४ ॥ कारण देह अज्ञानपण ॥ तेथे शुशुप्ती अवस्था अहंकार प्राज्ञ ॥ हृदयस्थानी अधिष्टान ॥ जाण तयाचे ॥ ३५ ॥ माहाकारण देहे ज्ञातृत्वलक्षण ॥ जयाचे

मूर्ध्नीस्थान ॥ तुर्य अवस्था जाण ॥ अभिमानी प्रत्यगात्मा ॥ ३६ ॥ ऐसे देहे चतुष्टय अभिमानी चतुष्टय ॥ अवस्था चतुष्टय स्थान चतुष्टय ॥ हे परिसतू मुनिवर्य ॥ जे विवेकज्ञानी ॥ ३७॥ पिंड उपाधी वेगळी पाही ॥ जीवासि अवस्था नाही ॥ अविद्योपाधी सर्व हीन विकार चेष्टा ॥ ३८ ॥ ब्रह्मांडा वे (ग) ळे पाही ॥ देवासि अवस्था विकार नाही ॥ मायोपाधी पाही ॥ ज्ञानविकार चेष्टा ॥३९॥ अता वसंत रुतु सत्ता वनस्पती ॥ वृधी हरास (ऱ्हास) आणि स्थिती ॥ निरंतर अवस्था शुशुप्ती ॥ अहेर्निसी ॥४०॥ येवं ब्रह्मांडी अवस्था शिवासि मायोपाधी ॥ आणि पिंडी अवस्था जींवासि अविद्योपाधी दोहीचा निरास निरोपाधी ॥ कैवल्यनिधी निजात्मा ॥ ४१ ॥ श्रीगुरूचे वचन लाधले ऐसे ॥ तव सिष्य परमसंतोषे ॥ प्रस्नवचन पुन्हा कैसे ॥ विचारिता जाला ॥ ४२ ॥ पत्रवचन ॥ जीव शीव तो कवण ॥ देहे चळे कवणापासुन ॥ चेतवी प्रेत प्राण ॥ गेलिया कवण तो जी ॥ ४३ ॥ उत्तर ॥ तव सद्‌गुरू फेडी संदेहो ॥ ब्रह्मांडी मायोपाधी चाले तो शिव ॥ पिंडी अविद्योपाधी चाली जीव ॥ स्थूळ देहे चले अभिनव लिंगदेहापासुनी ॥ ४४ ॥ तया चाळकाचे चाळक जाण ॥ ते चैतन्य कारण ॥ लोहचुंबकन्याये जाण ॥ अनात्माजडासि अत्मा न चळोनि चाळी ॥ ४५ ॥ प्राण गेंलियावरी ॥ भूतचेष्टे स्तव क्षणभर विकारी ॥ लिंग देहे गेलियावरी ॥ विकार कैचा ॥ ४६ ॥ ऐसे निरोपिता सद्गुरु ॥ तव सिष्य करी प्रश्नादरू ॥ सांगित जी वचन निर्धारू ॥ पृछापत्रीचा ॥ ४७ ॥ ॥ पत्रवचन ॥ ब्रह्मी जीव भिन्न ॥ की जिवाब्रह्मा येकपण ॥ या ब्रह्मांडासि कवण ॥ आधारू आसे ॥ ४८ ॥ उत्तर ॥ हे अशंका निरसावया ॥ कृपा उपजली सद्‌गुरुराया ॥ म्हणे जीव–ब्रह्मी भेद भिन्न देखावया ॥ अविद्या उपाधी ॥ ४९ ॥ देहेच देहे चतुष्टय निरासी ॥ अनुभवे उरी नाही जिवासी ॥ तेथे येकपण ते कवणासी ॥ उपाधी निरसता ब्रह्म परिपूर्ण ॥ ५० ॥ या पिंडब्रह्मांडासि अधार मूळमाया शक्ती ॥ परब्रह्मसत्तें जयेसि आस्तित्व गती ॥ जैसी मृगजळाची वस्ती ॥ दिनकरांश्रये ॥ ५१ ॥ ऐसे सद्‌गुरू निरोपती ॥ तव सिष करी विनंती ॥ म्हणे पृछापत्री विचारिले जे ॥ ५२ ॥ पत्रवचन ॥ ब्रह्म निर्गुण केवळ ॥ माया महाढिसाळ ॥ तियेसि अधार मूळ ॥ काय असे ॥ ५३ ॥ ब्रह्म पूर्ण की अपूर ॥ शास्वत की देशांतर ॥ कर्मभक्ती निर्धार ॥ जोडे की न जोडे ॥ ५४ ॥ उत्तर ॥ तव प्रतिवचन निर्धारू ॥ निरोपिता स्वामी सद्गुरु ॥ सकळमाया ढिसाळासि अधारु ॥ सत्यात्म वस्तू लोहचूंबकन्याये ॥५५॥ ब्रह्म पूर्णापूर्ण शाश्वत असे ॥ ते पावावया साधन परिसे ॥ कर्म भक्तिज्ञान असे ॥ वेदशास्त्र पुराण बोलती ॥ ५६ ॥ कर्म करिता लागे भक्ती ॥ भक्तीने ज्ञानाची प्राप्ती ॥ ज्ञानविवेके सद्गुरुचरण जोडती ॥ ते विज्ञाने निरसती कर्मभक्ती ज्ञान ॥ ५७ ॥ सद्‌गुरूचेरण प्रसादे पूर्ण ॥ अनुभवे निजात्मखुण ॥ परि सद्‌गुरूकृपेवाचुन ॥ न जोडे परब्रह्म ॥ ५८ ॥ ऐसे वचननिरास ॥ करी सद्‌गुरू परेश ॥ तव विचारी सिष्य ॥ पुन्हा पत्रवचन ॥ ५९ ॥ पत्रवचन ॥ अजपा ते कवण ॥ जपाचे काय प्रमाण ॥ देवताचक्री निवेदन ॥ कैसे केले ॥ ६० ॥ हे कैसी चालती अजपा ॥ कवण जपू या अजपा ॥ हा जप पडपा ॥ कैसा अला ॥ ६१ ॥

हा कवणे टाई कैसा उटे ॥ कैसा केधवा कोटे अटे ॥ दोन्ही अक्षर प्रगटे ॥ करूनि दीजे ॥ ६२ ॥ उत्तर ॥ तव प्रश्नभेद निरसावया उदीत ॥ बोले स्वामी सद्गुरूनाथ ॥ अजपाचा वृत्तांत ॥ पिंडी पाहिजे ॥ ६३ ॥ सप्तचक्रामाजि पिंडी जाण ॥ साह शत यकवी (स) सहस्र जपाचे प्रमाण ॥ अहोरात्री जाण ॥ प्राणवायो समंधे घडे ॥ ६४ ॥ देही प्राण तव चाले अजपा ॥ साक्षभूत जाणे सोहं जपा ॥ देहेरूपा स्तव पडपा ॥ जप अला ॥ ६५ ॥ या सकल हस्या उटावया अटावया स्थान ॥ येक परब्रह्म पूर्णघन ॥ तेथे सकळ भेदमान ॥ उटे आटे ॥ ६६ ॥ ऐसा निरसोनि पृछापत्र भेद ॥ तव सिष्य करी अनुवाद ॥ पुन्हा पत्रवचनीच्या शब्द ॥ विचारिता जाला ॥ ६७ ॥ पत्रवचन ॥ हृदय कमळकलिके भीतरी ॥ चंद्र असती चारी ॥ तेथे चौसष्टी क्रिडा करी ॥ ते कोण स्थान ॥ ६८ ॥ कोणते क्रीडा मंदिर ॥ कोटोनि उटती देहे विकार ॥ स्थूळ सुक्षम शरीर ॥ गती कैसी ॥ ७० ॥ देही इंद्रिय अनेका ॥ वाचा कोणते कळाचाळका ॥ तेथिचिया सुखदुःखा ॥ कोण जाणे ॥ ७१ ॥ तेथेचि त्रिन्ही लोक ॥ तोही दाखवा (वा) विवेक वाचा देहे स्थाने सकलिक ॥ शून्यासि सांगा ॥७२॥ उत्तर ॥ तव सद्गुरु सांगे निरोपण ॥ हृदयकमळ कळिके मधे जाण ॥ चतुर्थ पदार्थ चंद्र जाण ॥ मनभेद वर्तती ॥ ७३ ॥ अन्नजटर परिपाकानंतरे ॥ कुंडलनी(*) नळे व्यानपवनाधारे ॥ येकत्रय-नवनळे विखरे बाहत्तर छिद्री ॥ ७४ ॥ नवनाडी सोळा सांदी ॥ बाहत्तरकोट सर्वादी ॥ मनमुखे चौसष्टी कुमोदी ॥ निववी चंद्रकळा ॥ ७५ ॥ मन उन्मन जालियाबरी ॥ सर्वही जाले अविकारी म्हणोनि मनमुखे अंतःकर्ण क्रीडा मंदिरी ॥ चतुष्ट्य चंद्र ॥ सुक्षम देहापासोनि जाण ॥ देहे विकार चळती भिन्न भिन्न ॥ स्थूळ सप्तधातू कारण ॥ सुक्षम अंतकर्ण चतुष्टये ॥ ७७ ॥ देहे इंद्रियासि जाण ॥ लिंगदेह करी चळण ॥ ईंद्रियासि राजा मन ॥ तेथील सुख दुःख मनचि जाणे ॥ ७८ ॥ या मनासहीत देहे चतुष्ट्य क्षत्रासी ॥ चैतन्य चाळक साक्षभूत परियेसी ॥ तत्साक्षीत्व उपाधीरहीत सहजेसी ॥ शुत्धबुत्ध वस्तू ॥ ७९ ॥ त्रिकुट त्रिखंड कपाळ देख ॥ वामसव्यमध्य उभय येक ॥ त्रिगुण गुण पृथक पृथक ॥ दिसती भेद ज्ञानिया ॥ ८० ॥ परावाचा ब्रह्मद्वारी ॥ वोळगती अटवे हृदयाभितरी ॥ ध्वनी ज्ञाने योगेश्वरी ॥ वोळखिजे ज्ञान परा हृदई ॥ ८१ ॥ पस्यंति ते अधारी ॥ मध्यमा हृदया भीतरी ॥ मुखीं वैखरी मात्रुकाक्षरी ॥ प्रगट दिशे ॥ ८२ ॥ येवं द (दे)ह चतुष्टयाभीतरी ॥ चारी वाचा चौस्थानी वायु अधारी ॥ तेथे भ्रमर गुंफेवरी ॥ चतुर्थशून्य अनुभविजे ॥ ८३ ॥ सद्गुरूचेनि कृपा बळे ॥ शून्य प्रमावेगळी वेगळी कले ॥ हे सकळीक विवेकसहित मावळे ॥ निराभास ब्रह्मी ॥८४॥ ऐसा सांगीतला वचनार्थ ॥ तव सिष्ये विनविला सद्गुरूनाथ ॥ म्हणे परिसा जी मात ॥ पत्र वचनाची ॥८५॥ पत्रवचन ॥ जेथोनि ब्रह्मी सकळजन ॥ ऐसा कर्ता तो कवण ॥ पाळिता नारायण ॥ कोण पाळी ॥ ८६ ॥ रुद्रादि सव्हारिता ॥ कवण संव्हारकर्ता ॥ इश्वरादिकादिकादिकादि

---

* टीप—केवळ काकपद असून बाकी कांहीं दिलेलें नाहीं.

चाळिता ॥ तो सूत्रधारी कवण ॥८७॥ जो सर्वत्री सदावसे ॥ जेणे सर्व व्यापिले असे ॥ तो सदाशीव प्रकाशे ॥ प्रत्यक्ष कैसा ॥८८॥ उत्तर ॥ तिन्ही अहंकार तिन्ही शक्तियुक्त ॥ इश्वरसत्ता उत्पतीस्थिती लयो चालित ॥ माया अविद्या समायुक्त ॥ होत जात सर्वही ॥ ८९ ॥ येवं सृज्यसृजिता चतुरानन ॥ स्थिती पाळिता नारायण ॥ सव्हारकर्ता रुद्र जाण ॥ ऐसे गुण तिन्ही ऐश्वर्य इश्वराचे ॥ ७ ॥ तया इश्वरमाया अनंत ॥ ब्रह्मांडाबाहीर आत ॥ सूत्रधारी अच्युत ॥ करोनि अकर्ता जो ॥ ९१ ॥ ऐसा अकर्ता जो अमूर्त ॥ तोचि सूत्रधारी अनंत ॥ म्हणोन स्वमुखे सांगत ॥ भगवद्गीते सातवेध्याइ ॥ ९२ ॥ या अनंत ब्रह्मांडासबाह्य सर्वत्र वसे ॥ तो सदाशिव निरोपाश्वी गुरुमुखे प्रकाशे ॥ मग प्रत्याक्षाकार होता नाशे ॥ शब्दभेदू ॥ ९३ ॥ तेथे नामरूप याती गोत्र ॥ अत्मासत्य अनात्मा अनिर्वचनिय सर्वत्र ॥ म्हणोनि समूळ पृछापत्र ॥ सर्वथा सर्वत्र अशंका ॥ ९४॥ शब्दगती न पडे टाई ॥ ते शब्द चर्चा करणे काइ ॥ म्हणोनि सद्गुरूकृपा पाही ॥ अनुभव लाधे ॥ ९५ ॥ मग सद्गुरू म्हणे सिष्यासी ॥ हा अनुभव असेल पृछापत्र पाटविलेल्यासी ॥ तरी सुख होइल राजचंद्रासी ॥ नाही तरी सद्गुरू करोनि भ्रांतीसी निर्शन कीजे ॥ ९६ ॥ प्रपंच उदरपोषणा कारणे ॥ अनंत अटाटी करणे ॥ मा परब्रह्मपद विवरणे ॥ तेथे करणे मतिमंद पण ॥९७॥ उत्तमतीर्थ शेवणे ॥ वैराग्य सद्भक्ती संत अराधन करणे ॥ त्याचिया चरणप्रसादे पावणे ॥ प्रत्यक्ष अनुभव ॥९८॥ मग निरसप्रछापत्र सोसू ॥ अनुभवे येकात्मता परेशू ॥ आणि निरशे गुरूसिष द्वंद्वलेशू ॥ मग उरे निराभासू अखंडत्वे ॥ ९९ ॥ तेथे होणे ना होणे ॥ अनुभवेचि अनुभवणे ॥ मग अनुभवेचि अनुभव पूर्णपणे ॥ सहजचि असे ॥१००॥ ॥२००॥ ऐसा वडवाळसित्ध नागेश पूर्ण ॥ गुरूसिष्यनिद्वंद्व अनुभवे करून ॥ तेथे सिष अज्ञानज्ञानरहित जाण ॥ विज्ञान पूर्णापूर्णत्व सहज ॥ १ ॥ वो. २०१॥

इति श्री पृछापत्रसंपूर्णमस्तु ॥ कसबे मोहोळ स्वग्रही संग्रहार्थ भानजी त्रिंबक देशलेखकेन लिख्यते ॥ शेके १७९३ प्रजापति नाम सवत्सर ॥ कार्तिक कृष्ण ८ भोमवासरी प्रथम प्रहरी समाप्तमस्तू ॥ शुभं भवतू ॥

---

७ समर्थ संप्रदायांतील एक अज्ञात कवि दत्त.

[श्री. रा. शं. नगरकर, पुणें]

कांहीं दिवसांपूर्वी भा. इ. सं. मंडळांतील बाडें चाळीत असतांना ४५७ क्रमांकाच्या बाडानें माझें लक्ष वेधून घेतलें. तें वेधण्याचें एक प्रमुख कारण म्हणजे या बाडांत एकाच कवीची कृति आहे. बाड तसें फारसें मोठें नाहीं. त्याचीं आद्यंतींचीं कांहीं पत्रें नष्ट होऊन अवघीं सदतीस पत्रें आपल्या हातीं राहिलीं आहेत. प्रत्येक पृष्ठावरील ओळींची संख्या सुमारें सतरा असून त्याचा आकार ७″ × ९″ असा आहे. हें बाड

दोन माणसांनीं नकललेलें असावें. कारण अक्षरांचीं दोन भिन्न भिन्न वळणें आहेत. असें असलें, तरी गचाळपणाच्या बाबतींत मात्र तीं वळणें एकमेकांवर ताण करणारीं आहेत. या आडव्या शिवलेल्या वहींत कोण्या 'दत्त' नामक कवीची कविता आहे.

प्रथमदर्शनींच हें बाड रामदासी असावें, अशी शंका आली. या शंकेला, दोन कारणें होतीं. पहिलें कारण म्हणजे प्रत्येक पदाच्या सुरुवातीला 'श्रीरामप्रसन्न' वा 'रघुवीर समर्थ' अशीं घोषवाक्यें आहेत. आणि दुसरें कारण म्हणजे या बाडांत अनेक ठिकाणीं रामदासांचे श्लोक नकलले आहेत. हा संशय समग्र बाडाच्या अभ्यासानंतर खरा ठरला.

सुमारें १६४ स्फुटें (अभंग व पदें) असलेल्या या बाडांतील कांहीं पत्रांचे कोपरे झिजलेले असल्यामुळें कांहीं पदांतील कांहीं अक्षरें नष्ट झालीं आहेत; पण सुदैवानें त्याचें आत्मचरित्रपर पद उत्तम स्थितींत आहे. त्या पदांतील मजकुराच्या आधारें आपणांस असें सांगतां येतें कीं—

दत्ताच्या मातेचें नांव गिरिजा आणि पित्याचें नांव जनार्दन. हा ऋग्वेदी विश्वामित्र गोत्री ब्राह्मण होता. सातारा जिल्ह्यांतील अतीत नामक गांवांत त्याचा जन्म झाला. विठ्ठलदास असें त्यानें आपल्या गुरूचें नांव त्या पदात नोंदलें आहे. या अतीत गांवांत शमनामीर नांवाचा एक पीर होता आणि हनुमंत हा तिथला श्रेष्ठ ग्रामदेव होता, अशी त्यानें गांवाच्या ओळखीसंबंधीची अधिक माहिती पुरविली आहे. त्याचें आत्मचरित्रपर पदच पुढें उद्धृत करीत आहें—

जनार्दन पिता गिरिजा माझी माता। जन्म जाला दत्ता तेथूनिया ॥ १ ॥ जन्मभूमी नांव अतीत नगर। पीर शमनामीर तये रानीं ॥ २ ॥ ग्रामदेव श्रेष्ठ हनुमंत देव। सत्याचा निर्वाह मोठा तेंथें ॥ ३ ॥ ऋषि-मुनींमाजीं विश्वामित्र जाणा। ऋग्वेद-राणा वेदांमाजी ॥ ४ ॥ प्रवृत्तीचें नाम दत्त ठेवियेलें। तेंचि खरें केलें गुरुदेवें ॥५॥ गुरुदेवें बोध निश्चयाचा केला। तेणें गुणें जाला अनुताप ॥६॥ अनुतापें सर्व मायिक भासलें। लक्ष हें बैसलें निरालंबीं ॥७॥ निरालंब सुखस्वामी विठ्ठलदास। दत्ताचा विश्वास तये ठायीं ॥८॥

कृष्णेचा परिसर ही रामदासांची कर्मभूमि आहे. त्या परिसरांतच हा कवी होऊन गेला. त्यानें उल्लेखिलेल्या शमनामीराचा रामदासाच्या जीवनाशीं थोडा संबंध आहे. शमनामीर हा एक मुसलमान साधु. एकदा त्याच्या वार्षिक उरुसाला समर्थ उपस्थित झाले असतांना हा साधु प्रकट झाला, आणि त्यांचे परमार्थासंबंधीं कांहीं आदान-प्रदान झालें, अशी कथा 'दासविश्रामधामा'च्या १८ व्या अध्यायांत आहे.

या बाडांतच विठ्ठलदासाचें एक विस्तृत पद आहे. या पदांत विठ्ठलदासाला रामदासांकडून झालेल्या प्रत्यक्ष गुरुबोधाच्या क्षणाचें तपशीलवार वर्णन आहे. प्राचीन मराठींत जीं हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीं अशीं तपशीलवार वर्णनें आहेत, त्यांतच

या पदाची गणना करावी लागेल. गुरूनें त्याला कुरवाळून त्याचें चुंबन घेतलें. त्याच्या पाठीवर थाप मारली आणि त्याला मंदिल (रुमाल) बांधला. त्याची दृष्ट काढून त्याच्या गळ्यांत हार घातला, आणि डोक्यावर तुरा चढविला. त्याला चादर दिली. त्याच्या हाताला धरून त्याला आपल्या जवळ बसवून घेतलें आणि सर्वांकडून त्याचा बहुमान करविला. गुरुबोधाच्या क्षणाचा इतका बारकावा देणारें हें संपूर्ण पदच इथें उद्धृत केल्यास तें अस्थानीं ठरणार नाहीं.

ककुद्मतीतीरीं आहे चंद्रगिरी । तेथें राज्य करी स्वामी माझा ॥ १ ॥ स्वामी माझा रामदासांचें मंडन । भवाब्धिखंडन त्याच्या बोलें ॥ २ ॥ ऐसी पैं हे कीर्ती ऐकोनिया कानीं । आठवलें मनीं जावें भेटी ॥ ३ ॥ माघ शुद्ध आणि गुरुवार ते दिसीं । गेलो समर्थांसीं भेटावया ॥ ४ ॥ दीर्घ दंडवंत केली प्रदक्षणा । बध्दांजुळी जाणा । उभा ठालों ॥ ५ ॥ कृपादृष्टींपूर्ण पाहिलें ते काळीं । पूजा सायंकाळीं आज्ञा केली ॥ ६ ॥ आज्ञा केली मग जाला सायंकाळ । पूजेचें सकळ सिद्ध केलें ॥ ७ ॥ जाला पूजाविध अनुग्रह केला । पद्महस्त ठेला मस्तकीं तो ॥ ८ ॥ जाले सात दिस मग आज्ञा केली । भिक्षेलागी दिल्ही आज्ञा तेव्हां ॥ ९ ॥ आज्ञासमर्थांची वंदूनिया शिरीं । माथा चरणांवरी ठेविएला ॥ १० ॥ कुर्वाळुनि मुख चुंबन पै दिलें । हृदयीं आळंगिलें प्रेमप्रीतीं ॥ ११ ॥ थापटिली पाठी मंदिल बांधलें । निंबलोण नेलें उतरोनी ॥ १२ ॥ आणीली मेखळा गळाचे पैं हार । तुरा आणि चादर दिल्हीं तेव्हां ॥ १३ ॥ धरुनिया करीं जवळीं बैसविलें सर्वां करविलें बहुडीयासी ॥ १४ ॥ गेले सर्व लोक एकांत पै जाला । मग गुज बोलिला स्वामी माझा ॥ १५ ॥ स्वामी माझा गुज बोलिला जीवींचे । आणि भविष्याचें चिन्ह कांहीं ॥ १६ ॥ भविष्याचीं चिन्हें सांगितली देवें । म्हणें मनी अनुभवावें न बोलवी ॥ १७ ॥ म्हणे विठ्ठलदास कासया बोलावें । आपेआप ठावें होईल जनां ॥ १८ ॥

विठ्ठलदासाच्या ऐवजीं आपणच तिथें आहोंत, अशी कल्पना करून तें क्षणचित्र आपल्या डोळ्यांसमोर उभें केलें, तर त्या पदांतील खुमारी आणि धन्यता ही आपणांस सहज कळणारी आहे.

विठ्ठलदासाला समर्थांकडून गुरुबोध ज्या स्थानीं प्राप्त झाला, तें निसर्गरम्य स्थान अल्पकाळ समर्थवास्तव्यानें पुनीत झालें होतें. रामदासांना सृष्टिसौंदर्याची फार ओढ असे. ही सृष्टिसौंदर्याची ओढ आपल्याला ' हनुमंताकारणें ' लागली, असे त्यांनीं स्वतःच सांगितलें आहे. शहापूरच्या डोंगरावर राहून ते जसे हनुमंताचें दर्शन घेत असत त्याचप्रमाणें चंद्रगिरी ऊर्फ चांदोबाच्या गुहेंत राहून ते भीमकाय हनुमंताचेंच चिंतन करीत असत. निसर्गाच्या प्रशांत पार्श्वभूमीवर येणारा अनुभव त्यांनीं उत्कट शब्दांत व्यक्त केला आहे.

चंद्रगिरीचा डोंगर । त्यांत गुप्त एक शिखर । तेथें राहे योगेश्वर । निरंजन ॥ रे नवल त्या निरंजनाचें शिखर पाहों आकाशाचें । ऐसें पृथ्वीमध्यें कैचें । पाहों जातां

जागा सुंदर गहन। तेथें सुखावलें मन। वरी पाहतां गगन। सांटवलें॥ तेथें अखंड नाहीं वात। म्हणऊनि जागा तो निर्वात। शीतकाळीं घुमघुमीत। वस्त्र न लगे॥

या पुढें या पदांतच निसर्गाच्या अन्य दृश्यांचाहि उल्लेख आहे.

समर्थांचें एक डफगाणें आहे. त्या गाण्यांत कोल्हापुरापासून शहापुरापर्यंत असलेल्या निरनिराळया तीर्थस्थानांची माहिती देत असतांना समर्थ स्वतः संबंधीं लिहितात—

चंद्रगिरीमध्यें गवी। तेथें वास करी कवी।
त्याची जागा ते पुरवी। शहापुर॥

या गुहेंतील समर्थांच्या वास्तव्याचा कालावधि सुमारें शक १५६७–६८ असा दिला जातो. या वास्तव्यांतच विठ्ठलदासाला त्याच्या गुरुकडून गुरुबोध झाला आहे. विठ्ठलदासाचें जें पद वर उद्धृत केलें आहे, त्यांत त्याच्या गुरुबोधाची तिथि नाही. गुरुबोधाविषयी तपशीलवार माहिती देणाऱ्या या संतानें गुरुबोधप्राप्तीची तिथि दिली नाहीं, असें म्हणवत नाही.

'माघ शुद्ध आणि गुरुवार ते दिसीं।' हा त्याच्या पदांतील एक चरण आहे. या चरणांतील 'आणि' हा शब्द निरर्थक आहे. या पदाची ज्यानें नकल केली असेल, त्याला तें पद न समजल्यामुळें त्याच्या हातून ही घोडचूक राहून गेली आहे. विठ्ठलदासाला प्राप्त झालेल्या गुरुबोधाच्या काळावरून आपल्याला दत्ताचा काळ ठरवितां येतो. इ. स. च्या सतराव्या शतकाचा उत्तरार्ध व अठराव्या शतकाचा पूर्वार्ध हा स्थूलमानानें दत्ताचा कालावधि ठरविण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें रामदास–विठ्ठलदास–दत्त अशी त्याची परंपरा ठरते.

संतश्रेष्ठ तुकारामाप्रमाणेंच दत्त संसाराच्या तापानें फार तापला आहे.

कुटुंब पोसाया पोटधंदा केला। तेणें कष्ट मला फार जाले॥

केलेला धंदा त्याच्या गळ्याशीं आला. त्याच्या परिणामाला त्याला एकाकींच तोंड द्यावें लागलें. जन हे दिल्याघेतल्याचे असून, अंतकाळचे खरे सोबती कोणी नाहींत, या विचारामुळें खिन्न होऊन अनुतापाचा कंद त्याच्या मनांत रुजला. आणि तिथें त्या कंदाला हळूहळू नवनवीन धुमारे फुटूं लागले. सर्व माया सांडून तो परमेश्वराला प्रेमभरानें शरण गेला आणि—

देहाचा संकल्प स्वामीलागी केला। तयावीण मला नाहीं सखा॥

या अवस्थेपर्यंत त्यानें मजल मारली. आतां त्यानें देहाचा संकल्प रामासाठीं केला, पण अजून त्याला रामदर्शन मात्र घडलें नव्हतें. त्यामुळें जीवनावेगळी केलेली मासोळी जशी तडफडते, तशी त्याच्या मनाची अवस्था झाली होती. तो श्रीरामाला सरळ सरळच विचारूं लागला कीं—

सांडून सर्वै आस । दृढ धरिली तुझी कास । आतां कैसे करिसी उदास । श्रीरामराया ॥

सांवळ्या श्रीरामा, आतां आणखी माझी परीक्षा पाहूं नकोस, तुला जर माझ्या निष्ठेची शंका आली असेल, तर पुन्हा एकदा माझें म्हणणें नीट ऐकून घे—

तुजवीण मज असेल आधार । तरी माझें शरीर कुष्ठ होये ॥ १ ॥ तुजवीण दुजें मानीन मी जनीं । तेव्हां तेच क्षणीं देह भंगो ॥ २ ॥ कोण मज आहे आणिक सोयरा । हें मनीं विचारा दत्त म्हणे ॥ ३ ॥

रामचंद्रांच्या सूचनेवरून दिव्याला तयार झालेली सीता म्हणाली की, जर रामचंद्राशिवाय दुसरा विचारहि माझ्या मनांत आला नसेल, तर हे देवी तूं मला आपल्या उदरांत स्थान दे. इथें सीतेच्या या करुण वचनाची आठवण न झाली तरच नवल.

दत्त पुढें म्हणतो, आतां तरी माझ्याकडे डोळे उघडून बघ. तूं कृपेचा सागर, दीनांचा दाता, पतितपावन म्हणून जगीं तुझी ख्याती आहे. विश्रांतीचें घर म्हणून वेद तुझ्याकडे पाहतात. तेव्हां देवा, मनीं कांहीं तरी करुणा असूं द्यावी, नाहीं तर तुझ्या सर्वसाक्षीपणाला बोल लागेल. लोक तुला कूर्मदृष्टीचा म्हणतात. आतां माझें उणेंपुरें न पाहतां मला तुझ्या दृष्टीचें पोसणें दे.

आर्तता हा साधकाच्या जीवनांतील पहिला टप्पा आहे. यालाच कदाचित् आत्म्याची काळोखी रात्र म्हणत असतील. विरहिणीच्या स्वरूपांतून केलेलीं पदेंहि याच भागांत मोडतात. कारण परमेश्वराची करुणा भाकण्याचा तोहि एक मार्ग आहे. भक्त या मार्गाचा अवलंब करतात.

परमेश्वर हा आपला प्रियकर आणि आपण त्याची प्रेयसी या भूमिकेंतून त्याची आळवणी करणें असा तिथला थाट असतो. अनुरागाच्या भूमिकेंतून उत्पन्न होणारी उत्कंठा, उत्कटता व विकलता ही विलोभनीय असते. त्या जीवशिवाच्या मीलनप्रसंगीं बाह्य जगाचा पडणारा विसर आणि त्यामुळें मानसिक स्थित्यंतरांचें घडणारें कमनीय दर्शन हा काव्याचा एक विलोभनीय विशेष आहे.

दत्ताच्या कवितेंत हा विशेष दृग्गोचर होतो. त्याच्या प्रियकराचें नांव आहे राघव. त्या राघवाच्या पायीं त्याचा सर्व ' हेत ' गुंतला आहे. राघवाशिवाय त्याचें मन अन्यत्र कोठेंहि स्थिर व्हायला तयार नाहीं.—

बाईये गे । राघवपायीं गुंतला माझा हेत । आनु बैसेना कोठें चित्त ॥

वेद माझ्या श्रीरामाचें गायन करतात; शास्त्रें त्याला धुंडाळतात आणि शिव त्याचें ध्यान करतो, असा आपल्या प्रियकराचा यथार्थ गौरव त्यानें केला आहे. असा हा सर्व सामर्थ्यानें युक्त असलेला श्रीराम मी साक्षात् पाहिला, असें दत्तानें आवर्जून सांगितलें आहे.

दत्ताला काळोख्या रात्रींत फार काळ राहावें लागलें नाहीं. बोधाचा उजाळा त्याला लवकरच प्राप्त झालेला दिसतो.

स्वामीची दया जाली । ज्याची त्यास कळो आली ॥ धृ ॥ जेथें पाहे तेथे देव। रिता न दिसे कोठें ठाव ॥ १ ॥ रूप पाहतां रूपा नये । ऐसें जालें मी सांगों काये ॥ २ ॥ दत्त विस्मित मनीं जाला । दास विठ्ठलीं विराला ॥ ३ ॥

असा त्यानें साक्षात्काराचा अनुभव नोंदून ठेवला आहे. मी आतां सर्व लोक-लाज टाकून अंतरीं देव धरला, त्यामुळें कोणास काय म्हणायचें असेल, त्यानें तें खुशाल म्हणावें, कारण—

आम्ही देवाचे पै वेडे । निःशंक निधडे ॥ धृ ॥ सुखें छंद करूं फार । आम्हां नाहीं हो विचार ॥

परमेश्वराशीं जवळीक साधल्यामुळें त्याची अभिमानाची गवसणी गळून पडली. संसार देशोधडीला लागला आणि सारें शून्याकार झालें. याच्या नादीं लागलें कीं याशिवाय अन्य कांहीं मिळत नाहीं, असा त्याचा अनुभव आहे.

दत्त म्हणे करिसी काये । मज अनुभव तोचि आहे ॥

ज्याच्या भेटीमुळे मी–तूंपणाची भाषा विरून जाते, अहंकार गळून पडतो, त्या श्रीरामाच्या सामर्थ्याला उपमा नाहीं, असें दत्താचें सांगणें आहे. जो निखळ ज्ञानी आहे, त्यालाच केवळ तुझ्या कळा कळतात, असें त्यानें एका पदांत म्हटलें आहे. आपण जी गोष्ट हातीं घेतली असेल, त्याला जर भगवंताचें अधिष्ठान नसेल, तर ती गोष्ट सिद्धीस जात नाहीं. रामाशिवाय केलेले सर्व श्रम वायां जातात, म्हणून—

दत्त म्हणे राम साह्य। तेणें सर्व सिद्धी होये ॥

रामाच्या केवळ नामस्मरणानें अपार जन्मखेपा तुटतात, असंख्य प्राणी पुण्यशील होतात, यासाठीं त्या समर्थ श्रीरामाचें ध्यान करावें, असा दत्ताचा विचार आहे.

पूर्ण चंद्राचें दर्शन घडतांच सागराला जशी भरती येते, तशी सदगुरूसंबंधींच्या गुणवर्णनांत दत्ताच्या वाणीला भरती येते.

गुरूची कृपा पूर्ण होईल बा रे । तरी मोह संताप तेथें न थारे । गुरूप्राप्तता संचीतावीण नाहीं । दत्त लागला पूर्ण सदगुरूपायीं ॥

लज्जा आणि अभिमान यांचें निरसन करून गुरुदास्य केलें पाहिजे, सद्गुरू आणि परमेश्वर हे एकच आहेत, असा दृढभाव त्याच्या मनांत आहे.

मनीं धरूनिया दृढभाव । सद्गुरू देवाधिदेव । ऐसा करावा निश्चयो दृढपणें ॥

सद्गुरूसंबंधींचा अपार दृढभाव संतसाहित्य रसिकांना फारसा अपरिचित नसल्यानें त्याचा प्रपंच अधिक न करणेंच बरें.

सद्गुरूच्या भेटीनें दत्ताला जो आनंद होतो, तोच आनंद त्याला संतांच्या भेटीनें

होतो. संत हेंच त्याच्या जीवींचें सर्वस्व आहे. संतांचें दर्शन हीच त्याची काशी आहे. त्यांच्या नामाला तीर्थांचें पावित्र्य आहे. संत हेच त्याच्या सुखाची खाण आहेत. याहि पुढें जाऊन दत्त म्हणतो—

तेच माझें जीव तेच माझे शिव । म्हणऊनी दत्त भाव धारिजे मनीं ॥

जीव–शिव स्वरूपांत संतांना पाहणारें दत्ताचें मन त्यांच्यांत भेद करायला तयार नाहीं. जे कोणी हा संत आजचा आणि हा संत कालचा, असे भेद करतात, त्यांच्या बाबतींत दत्त म्हणतो—

न कळोन म्हणती चुकोन बोलती । नेणोन मानिती नवे जुने ॥

हा रामदासांचा प्रशिष्यच असल्यामुळें त्यांच्या विचारांचा प्रभाव याच्या मनावर असल्यास नवल नाहीं. रामदासांनीं श्लोकशतकांचा विषय केलेलें 'मन' यानेंहि आपल्या विवेचनाचा विषय बनविला आहे. समर्थांनीं अभिमानाची अतिरेकी टर उडविली आहे. तसेंच यानेंहि मोठ्या नेटक्या शब्दांत त्याचे दुष्परिणाम दाखवून दिले आहेत. आचारधर्माच्या बाबतींत रामदासांचा कटाक्ष आपल्या परिचयाचा आहे. ब्रह्मज्ञानाला जर क्रियेची जोड नसेल, तर तें ब्रह्मज्ञान कुचकामी आहे. असें दत्तानें आवर्जून सांगितलें आहे.

तोचि जाणा ब्रह्म पूर्ण। क्रियेसहित ब्रह्मज्ञान ॥

या दत्ताच्या काव्यपंक्ति वाचल्यानंतर आपणांपुढें

भले नष्ट दोघे कसे ओळखावे। क्रियाभ्रष्ट ते नष्ट जाणोन घ्यावे ॥

रामदासांच्या या ओळी आल्या नाहींत तरच नवल !

रामचरित्राचें गुणगान करण्यांत धन्यता मानणारी दत्ताची वाक्सरिता अत्यंत समर्थपणें कृष्णाचेंहि गुणगान करतांना दिसते. त्याच्या दृष्टीला राम आणि कृष्ण वेगळे दिसत नाहींत. विठ्ठलस्वरूपांत रामचंद्राचें दर्शन घेणाऱ्या समर्थांच्या विचारांचाच हा प्रभाव आहे. या विचारांमुळेंच मराठी भक्तिपरंपरेची उदार व समन्वयशील घडण झाली आहे. तिच्यांतील औदार्याचें भरणपोषण याच मार्गानें झालेलें आहे. दत्त जितक्या सहजतया श्रीरामाचें वर्णन करतो, तितक्याच सहजतेनें व तन्मयतेनें गोकुळवासी कृष्णाचेंहि तो गुणगान करतो.

गोकुळीचा कान्हा नाटका जाणा । तेणें मोहिलें माझ्या मना ॥ सासुर माहेर दोनी विसरलें । नेणें तेणं काय केलें ॥ दत्त म्हणे मज आठवत नाहीं । चेटकी मोठा हा बाई ॥

रामकृष्णांचें समान गुणगान करणारी त्याची वाणी अत्यंत साधी, सोपी आणि प्रासादिक आहे. तिला अलंकारांचा हव्यास नाहीं. यमक–अनुप्रासासाठीं कुठेंहि ओढाताण झालेली नाहीं. भक्ति हा त्याच्या भाषिक सौंदर्याचा अखेरचा निकष आहे आणि या निकषाला तो पुरेपूर उतरला आहे.

---

८ शिवरामकृत बंकटतरंगिणी

[डॉ. बा. ना. मुंडी, इंदूर]

ग्वाल्हेरच्या मातृभूमि कार्यालयांतील हस्तलिखित ग्रंथसंग्रहांत उपर्युक्त पोथी आहे. नांव ' बंकटतरंगिणी, ' एकूण पानें १०५, देवनागरी अक्षर व टीका.

कर्ता :—या 'बंकटतरंगिणी'चा कर्ता **शिवराम** हा आहे (अ. ११। ओ. २२७).

सहजबोधाचा आत्मकुमर शिवकल्याण; त्याच्या वंशांत
गोपाळादि झाले; तेथेंचि उद्भव **शिवरामासि** ॥

रचनाकाल :—हा ग्रंथ श. १७०५ मध्यें रचला गेला.

शके सत्राशे पंचोत्तर । शोभन नामे संवत्सर
कृष्णदशमी भानुवार । माघ मासीं हा ग्रंथ ॥ ११ । २३५

प्रतलेखक, लेखनकाल व स्थान :—हस्ताक्षर यशवंत नारायण, वस्ती इंदोर--संमत १८४१, कार्तिक शुद्ध ९ मी गुरुवार दिन घटिक २४ तद्दिने समाप्त. यानुसार शके १७०६ म्हणजे सामान्यतः मूळ रचनेनंतर एका वर्षाच्या आंत प्रत झालेली आहे.

ग्रंथविस्तार :—या ग्रंथाचे एकूण अध्याय अकरा आहेत. एकूण पृष्ठसंख्या व ओवीसंख्या अध्यायवार पुढीलप्रमाणें आहे :—

अध्याय १ ला—	ओवीसंख्या	१११	–	पृष्ठसंख्या	–	८
अध्याय २ रा—	,, ,,	१२८	–	,, ,,	–	७
,, ३ रा—	,, ,,	१५५	–	,, ,,	–	९
,, ४ था—	,, ,,	१३८	–	,, ,,	–	७
,, ५ वा—	,, ,,	१५६	–	,, ,,	–	९
,, ६ वा—	,, ,,	१२९	–	,, ,,	–	९
,, ७ वा—	,, ,,	१६९	–	,, ,,	–	१२
,, ८ वा—	,, ,,	१५६	–	,, ,,	–	११
,, ९ वा—	,, ,,	२०७	–	,, ,,	–	(?) (११)
,, १० वा—	,, ,,	१८९	–	,, ,,	–	९
,, ११ वा—	,, ,,	२४१	–	,, ,,	–	१३
(गुरुपरंपरा क्रमासह)		१७७९				१०५

अध्याय ९ वा अपूर्ण आहे. त्याची पहिली दोन व शेवटलीं दोन अशीं केवळ चार पानेंच आहेत. मधलीं नाहींत. शेवटच्या पानांवर पृष्ठक्रमांक नाहीं. ओवीसंख्येवरून सामान्यतः अकरा पानें असावींत असें वाटतें.

ग्रंथविषय :—या ग्रन्थांत प्रामुख्यानें व्यंकटगिरी व वंकटेश यांचें माहात्म्य वर्णिलें आहे, वंकट म्हणजे श्वेत वाराहाचा अवतार घेतलेला श्रीभगवानच होय. वंकट म्हणजे अमृतानें परिपूर्ण – "अमृत ऐश्वर्य सदोदित। नव्हे कधीं जें नाशिवंत।" मुळांतील, "वंकारो वटबीजश्च कट ऐश्वर्य एवच। अमृतैश्वर्यसंघत्वाद्‌वंकटाद्रिरिति स्मृतः॥ ही व्याख्या देऊन टीकाकार

बंकार म्हणजे अमृतबीज। कट ऐश्वर्य संज्ञा सहज।
प्रथम मीळणी म्हणोनि गुज। व्यंकटाद्रि हे घडलें॥ १।५६॥

अशी स्वतः ही व्युत्पत्ति करितो व इतरहि "करिती वित्पत्ती बहुसाल। युगानुयुगीं अनेकनामीं॥" असें सांगून विविध नांवें सकारण–सविवरण देतो. तीर्थाद्रि, पुष्कराद्रि, वृषाद्रि, कनकाद्रि, नारायणगिरी, वैकुंठाद्रि, सिंहाचल, अंजनाद्रि, वाराहाद्रि, नीलपर्वत, इत्यादि. व्यंकटाद्रि हें नांव कां पडलें याचें कारण वर दिलें असून पुढें व्याख्यान केलेलें आहे व त्या निमित्तानें दोन कथाहि सांगितल्या आहेत.

ग्रन्थाचें अध्यायवार दिग्दर्शन वर केलें आहे. विषयाच्या दृष्टीनें या अध्यायांत, देवानें अवतार घेऊन पूर्व-पश्चिम; दक्षिणोत्तर जे दुष्ट पसरले होते त्यांचा विनाश केला, हें मुख्य सूत्र आहे. त्यासाठीं कथा आहेत. शेवटल्या अध्यायांत मात्र ग्रंथकारानें राजयोग, हठयोग, ज्ञानयोग, इत्यादींचें संक्षिप्त वर्णन, स्पष्टीकरण सूतांकरवी शिष्यांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें म्हणून केलेलें आहे. सगळ्या ग्रंथभर ऋषिवर हे पृच्छक व व्यासशिष्य सूत हे उत्तर देणारे, अशा प्रश्नोत्तर-संवादरूपांत विवेचन केलेलें आहे, हा ग्रंथ म्हणजे "वाराह पुराणाच्या तीस अध्यायांचा संक्षेप आहे." संक्षेपाचें कारण "वाराह पुराणीचा विस्तार। अगोचर मति मूढां॥ १।१८॥ वंकटरमणाचे महिमान। तीस अध्याय केले कथन। ते विस्तारें वर्णित। जाण। ग्रंथ गहन वाढेल॥ १।१९॥ म्हणोनि संक्षेपे ध्वनित कथा वाणिजेल ......"

ग्रंथाधार :—हा ग्रंथ "वेदव्यास जगन्नाथ। जगद्‌गुरू तो समर्थ। तदाधारे" केला आहे. कारण, "व्यासवाणी आदिशक्ति। आदिमाया जे भगवती। मातृका पटी अमृतमती। तदाधारें चालतसे॥ २४०॥ व्यासवाणीचा मथितार्थ। भाषामात्र हे प्राकृत। जाणोनि खर्परी नवनीत। टाकी पंडित हे न घडे॥ ५।५३॥ गीर्वाण अथवा प्राकृतवाणी। परंतु तेथे चक्रपाणी। मृत्सुवर्ण घटीं पाणी। ज्यान्हवीचे ज्यापरी॥ २४१॥" हा ग्रंथ, "संमत वाराह पुराणी। महामुनी श्रीव्यास" वराह पुराणाच्या आधारें व्यंकटगिरीमाहात्म्यावर आधारून लिहिला आहे.

'बंकटतरंगिणी' या ग्रंथाचा हा सर्वसामान्य परिचय होय. यांतील काव्य. उपमादृष्टांत, शब्द, व्याकरण इत्यादि इतर आणखी कांहीं बाबींचा उल्लेख करतां येईल, परंतु या सर्वांपेक्षां एक महत्त्वाची गोष्ट असून तिच्यामुळेंच या ग्रंथाकडे लक्ष आकर्षिलें जातें. ती म्हणजे या ग्रंथाच्या शेवटीं दिलेला "गुरुपरंपराक्रम" अध्याय ११· पत्र ९ (१·) व त्यांतून उद्भवणारे विचार. ही परंपरा अशी :--

आदिनाथ (आदिगुरु) हरिनाथ–रघुनाथ–मुकुंदभारती यतिवर्य–नृसिंह–
–भारती–जगन्नाथभारती–

सहजबोध (गृहस्याश्रमी) निजानंद (संन्यासधर्मी)

शिवकल्याण (आत्मकुमर) — रंगबोध (रंगनाथ) (गृहस्थ) — ब्रह्मानंद (श्रीधरपिता)

(गोपाळादि–मधली परंपरा)

शिवराम (ग्रंथकार)

सध्या आपलें विवेचन बंकटतरंगिणींतील पुढील गुरुपरंपरादर्शक ओव्यांपर्यंत मर्यादित ठेवूं :—

जगन्नाथ भारती यती। जो ज्ञानाचा पूर्णगभस्ती। जेणें उपदेशिले क्षिती। गृहस्थ आणि यतिवर्य ॥ ९ । १६३ ॥ सकळां माजी ज्ञानवंत। भक्ति विरक्ति प्रेम भरित। दोघे शिष्य चंद्रादित्य। जेंवि विख्यात जाहाले ॥ १६४ ॥ **सहज बोध** गृहाश्रमीं। **निजानंद** संन्यास धर्मीं। ज्यासि उपमा द्यावया भूमी। अत्री तनय अनधूत ॥ १६५ ॥ भारती **निजानंदाचे शिष्य**। तेहीं जाले पै तादृश्य। **रंगस्वामी** ग्रहच्छ-वेश। इतर **संन्यास धर्मांचे** ॥ १६६ ॥ विश्वविख्यात **रंगनाथ**। ज्याचि कविता अति समर्थ। भक्ति विरक्ती ज्ञानपंथ। जेणे केला सोज्वल ॥ १६७ ॥ **निजानंदा** पासूनि बहुतां। दीक्षा लाधली **संन्यासपंथा**। **ब्रह्मानंद श्रीधर पिता**। तोही शिष्य तदन्वयीं ॥ १६८ ॥ ब्रह्मानंद पूर्वाश्रमीं। पुत्र जाला श्रीधर स्वामी। ज्याची कविता विख्यात भूमी। हरि विजयादिक ग्रंथ ॥ १६९ ॥ असो आतां ग्रहस्ताश्रमीं। सह (ज) बोध, **कविचा स्वामी**। त्याची कथा श्रोत्र युग्मीं। श्रोती सादर परिसावी ॥ १७० ॥ त्यानंतर सहजबोधाची माहिती दिली आहे). **सहजबोधाचा आत्मकुमर**। **शिव-कल्याण** योगेश्वर। वयसां सांत संवत्सर। दर्शन जालें अंबेचे ॥ २२५ ॥ उत्पन्न ज्ञानी जैसा शुक। त्याचि अपर प्रतिमा देख। ज्याचे ज्ञान आलोलिका कोणा जाय वर्णिले

॥ २२६ ॥ **गोपाळादि** त्याचे वंशीं । ज्ञान विज्ञान तेजोराशि । तेथेचि उद्भव **शिवरामासी** । अत्री तनयासी जो साम्य ॥ २२७ ॥...... तेवि **कर्ता वक्ता श्रोता** । **सहजबोधचि** पै तत्वता । यथ तूटली अहंता । कवन कविता हे त्याचि ॥ २२३ ॥

शिवकल्याण हा सहजबोधाचा आत्मकुमर (पुत्र) खरा. त्याच्याच वंशांत गोपाळादि झाले. तेथेंचि उद्भव शिवरामासी. या सर्व विवेचनांत शिष्य म्हणून कोठेंच म्हटलेलें नाहीं. केवळ सहजबोध या गृहस्थाश्रमी व्यक्तीची वंशपरंपरा दिलेली आहे. शिवाय शिवरामानें बंकटतरंगिणि ह्या ग्रंथाचा कर्ता, वक्ता, श्रोता सहजबोधच असें म्हटलें आहे. इतरत्रही अध्यायांत व त्यांच्या शेवटीं सहजबोधांची कृपा म्हणून हा ग्रंथ झाला, असें म्हटलें आहे. योगेश्वर, शुकससान, अलौकिक ज्ञानी, अवर्णनीय अशा शिवकल्याणाबद्दल किंवा ज्ञानविज्ञान तेजोराशि गोपाळादिबद्दलहि इतरत्र कोठेंच कांहीं नाहीं. तेव्हां शिवराम हा सहजबोधाचाच शिष्य असावा, असें वाटूं लागतें. नातू किंवा पणतू म्हणावा फार तर. देचिकचरित्रांतही सहजबोध–रंगबोध– व शिवबोध असा क्रम आहेच.

' बंकटतरंगिणी'तील इतर वैशिष्ट्यें:–– मुकुंदराजांच्या एकंदर व्यक्तित्वाचा लेखकावर प्रभाव पडला होता असें दिसतें. केशव जयरामकृत " भक्तिरहस्य " या श. १७७९ मधील व विठ्ठल कवीच्या श. १७५० मधील ' धर्मपुरी–महात्म्या'वर आधारलेल्या पौराणिक स्वरूपाच्या ग्रंथांत मुकुंदराज अथवा मुकुंदभट्ट यांच्याबद्दलची एक कथा दिली आहे. हरिनाथ आणि रघुनाथ हे काशींत असतां मुकुंदभट्ट जोतिषानें भिक्षा मागण्यास आलेल्या रघुनाथास " तुझें आज मरण आहे " असें भविष्य कथन केलें. रघुनाथानें हरिनाथास हें सांगितलें त्यांनीं आपल्या सामर्थ्यानें तें मरण चुकविलें. दुसऱ्या दिवशीं रघुनाथाला पूर्ववत् भिक्षेला आलेला पाहून, मरण कसें चुकलें व कोणीं चुकविलें ह्याचें मुकुंदभट्टाला आश्चर्य वाटलें. मरण चुकवूं शकणाऱ्या अति सामर्थ्यशाली महान व्यक्तीकडून त्यानें उपदेश घेतला. तेच ' मुकुंदराज ' होत. ([१])

अगदीं याच कथेचें स्वरूप ' बंकटतरंगिणीं'त आहे. सहजबोध यांचें पूर्वाभिधान कमलाजीपंत, वृत्ती ग्रामलेखन (कुलकर्णी), बेदरच्या सार्वभौम यवनानें कमलाजीपंतांच्या गांवीं दूत पाठविले व द्रव्याची मागणी केली. पाटील वगैरे पळाले, कमलाजी आवरा आवर करीत असतांच धरले गेले, परंतु द्रव्याबद्दल कांहीं बोलेनात म्हणून " चवळियांत मोट " बांधून (ग्रामसमीप नदीचा) मोठा डोह होता त्यांत टाकलें. यवन पाटिलाला धुंडावयास इतरत्र गेले. कमलाजीपंत हे गीतापाठ करीत. त्यामुळें जलदेवता त्यांना भक्षूं शकल्या नाहींत. शेवटीं आठव्या दिवशीं त्यांनीं नदीच्या (डोहाच्या) पाळीवर त्यांना आणून ठेविलें. घरच्या व गांवच्या लोकांना हें कळून ते आले, पण कमलाजी बोलेनात. त्यांची वाचा गेलेली. पाटी मागवून तीवर लिहिले " संमंध नाहीं तुम्हां आम्हां । जगन्नाथ भारती पासी नेउनि सोडा या देहासि ॥ " जगन्नाथ भारतीकडे

(१) श्री. ढेरे–गुरु. गोरक्षनाथ–पृ. १४६ व श्री. कुलकर्णी विवेकसिंधु पृ. ६२.

नेत असतांच त्यांनीं (जगन्नाथ भारतींनीं) अंतर्ज्ञानानें त्याचें आगमन ओळखलें. कमलाजीपंतांनीं दंडवत घालतांच त्यांना वाचा आली व " जेवि वसंत होता प्राप्त । " टाहो फोडित कोकिळ " तसे ते बोलूं लागले. जगन्नाथ यतिवर्यानें त्यांचें स्वागत केलें व १२ वर्षें त्यांनीं गुरुसेवन मोठ्या प्रेमभरानें केलें. (वर्षाकाळीं नदी भरोन । चाले तेवि प्रेमभरें) : " गोदावरीतटीं ग्राम । त्याचें **खेड** ऐसें नाम । जगन्नाथ मठ विश्राम । तेथें गोदावरी समीप असे ". त्या ग्रामांत दादोपंत प्रसिद्ध ज्योतिषी राहत असे. कमळाजीपंत भिक्षेस गेले असतां त्यांनीं आपल्या पत्नीस हळूंच सांगितलें, " याचें उद्यां मरण आहे तेव्हां त्याला आज चांगली भिक्षा घाल ". ही गोष्ट कमळाजीपंतांच्या कानीं पडली. ती जगन्नाथांनाहि अंतर्ज्ञानानें कळली. त्यांनीं मृत्युसमयीं त्यांना (कमळाजीपंतांना) " गंगातीरीं प्रातःसमयीं ।......गुरुक्रम यथाक्रम । शिरी ठेविले हस्त पद्म । करोनि प्राणाचा संयम । आत्मा नेला ब्रह्मांडी । " अशा प्रकारें--

" बारा वर्षें चतुर्विंशती । वर्षें वायुसाधना करिती । त्यासी न लभे ते स्थिति । जनन्नाथें गुरुवर्यें ॥ ११-२०६ ॥ क्षणार्धांत केलें सिद्ध । अवघा तोडिला भेदाभेद । **जगन्नाथ सहजबोध** । येकरूप जाहले ॥ २०७ ॥

अशा प्रकारें मृत्यूची वेळ टळली. दुसऱ्या दिवशीं कमळाजीपंत दादोपंतांच्या घरीं भिक्षेस गेले. तें पाहून दादोपंत चकित झाले. हें असें ज्या गुरूच्या सामर्थ्यानें घडलें, त्या जगन्नाथ भारतींच्या मनांत असें आलें कीं, दादोपंतांच्या दोन मुलींपैकीं वडील मुलगी कमळाजीपंतांस मिळावी पण दादोपंत कबूल झाले नाहींत. तेव्हां ती मुलगी गुरुक्रोधानें वारली. तेव्हां योग्य तो बोध घेऊन दादोपंतांनीं धाकट्या कन्येस कमळाजीपंतांस दिली. जगन्नाथांनीं त्यांना गृहस्थ धर्म आचरण्यास सांगितलें. ' **औंढ्या**समीप दिशा प्राची । तेथें **टाकळी कुंभकर्णाची** । तया **ग्रामीं वस्ती** साची । सहकुटुंब तेव्हां कीजे ॥ " ह्या कथेचें मूळ वर दिलेल्या मुकुन्दराजांच्या कथेंत कसें आहे, तें मुकुन्दराज परंपरेंतील व्यक्तीच्याच बाबतींत कसें शक्य आहे, हें स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाहीं.

या कथेप्रमाणेंच दुसऱ्याहि एका प्रचलित प्रसिद्ध घटनेचा प्रभाव लेखकावर होता. ती घटना म्हणजे ज्ञानेश्वर-चांगदेव भेट (भिंत चालविणें इत्यादि). त्याच कथेचें समजून-उमजून अनुसरण केलेलें आहे. त्याची (लेखकाची) ही जाणीव पुढीलप्रमाणें व्यक्त झाली आहे.

" चांगदेवाच्या भेटीलागी । पूर्वी ज्ञानेश महायोगी । भिंति चालवि लागवेंगी । तैसी परी हे जाली ॥ २२ ॥ सहजबोधांची पारीक्षा पहावी म्हणून येथें वडवाळ नागेश सिद्धांना आणलें आहे.

" बैसोनियां व्याघ्रासनीं । सर्पाचाचि चाबुक करुनि । भेटी पातला महामुनी ।

सहजबोधा जाणवले ॥ २१९ ॥ भिंतीवरी बैसले सहज । ××× हे निर्माण जाले काज । भिंतिमाते ऐके गुज । चाले भेटी स्वामीच्या ॥ २२० ॥ भिंती चालली ऐसे म्हणता । नवल जाले जन समस्तां । दोघे भेटोनि येकात्मता । ब्रह्मानंदी पावले ॥ २२१ ॥

ही भिंत जेथपर्यंत चालली तेथपर्यंतची भूमि अद्यापहि इनाम म्हणून सहजबोधांच्या वंशजांकडे असल्याचा उल्लेख आहे. मागें दिलेल्या परंपरेच्या संदर्भांत येथें एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी कीं, हीच टाकळी इनाम म्हणून शाहूनें श्रीधरास शक १६५० मध्यें दिल्याचाहि निर्देश आहे.[1]

मुकुंदराज–जैतपाळासंबंधीची कथाहि सविस्तर देऊन (अध्याय ११ वा) लेखकानें स्वतःची मुकुंदराजाशीं घनिष्ठता व्यक्तविली आहे.

वडवाळसिद्ध नागेश ही अजून विवाद्य व्यक्ति आहे. तिच्या संबंधीं प्रपंच नाहीं म्हटलें तरी बराच झालेला आहे. परंतु समाधानकारक निर्णायक माहिती अद्याप उपलब्ध नाहीं. पं. आवळीकर यांनीं ' अज्ञानसिद्धा ' वरील लेखांत;[2] तर महाराष्ट्र सारस्वतांत डॉ. तुळपुळे यांनीं;[3] म. म. पोतदार यांनीं भा. इ. सं. मंडळ–वा. इ. वृत्तांत[4] बहिरा–जातवेदाच्या निमित्तानें, तर श्री. शं. श्री. देव यांनीं " संकट हरणी शिवग्रंथ " ह्या नागनाथ सिद्धाच्याच ग्रंथाच्या निमित्तानें.[5] तसाच " वरदनागेशी " व " गुरुशिष्यसंवाद " या दोन (किंवा एकाच) ग्रंथाच्या निमित्तानें;[6] वडवाळसिद्ध नागेश[7] याचा शिष्य जंगली फकीर सय्यद हुसेन याच्या निमित्तानें; असा एकूण बराच प्रपंच आजवर झालेला दिसतो. याशिवायहि अनेक जागीं झालेला आहेच. पण तो प्रस्तुत 'बंकटतरंगिणी'चा प्रमुख भाग नाहीं. त्यावर स्वतंत्र विवेचनच व्हावयास हवें.

बंकटतरंगिणीचें साहित्यदृष्ट्या विशेष उल्लेखनीय असें महत्त्व नसल्याचें प्रथमच सांगितलें आहे. नूतन-परंपरादिग्दर्शनाचा जो हेतु समोर ठेवून प्रस्तुत परिचयलेख लिहिला होता तें कार्य झालेलें आहे. मात्र हा ग्रंथ ज्याच्या कृपेनें, आशीर्वादानें, सामर्थ्याच्या बळावर लेखक लिहूं शकला त्या सहजबोधाबद्दल त्यानें दिलेला कृतज्ञता–परिचय पाहणें उचित होईल.

---

(१) डॉ. तुळपुळे–महाराष्ट्र सारस्वत (पुरवणी), पृ. १०१९; तसेंच श्री. चि. नी. जोशी–श्रीधर (चरित्र). (२) पं. आवळीकर–जुनें वाङ्मय नवें संशोधन, लेख " अज्ञानसिद्ध " (३) डॉ. तुळपुळे–महा. सारस्वत (पुरवणी) पृ. ९२०. (४) भा. इ. सं. मंडळ, वार्षिक इतिवृत्त, श. १८३४ पृ. ६९. (५) भा. इ. सं. मंडळ, वार्षिक इतिवृत्त श. १८३५ पृ. ४०. (६) श्री. देव–रामदासी संशोधन, द्वितीय खंड, पृ. ६. (७) श्री. प्रियोळकर–मुसलमानांची जुनी मराठी कविता उत्तरार्ध पृ. २०.

बंकटतरंगिणी वर्णिली खरी. पण हें त्या मूळ सहजबोध गुरूचें सामर्थ्य होय. कारण तो सहजबोध—

" दीन जनांचा कृपाळ। चंद्रापरी जो शीतळ। अज्ञान तमहंता केवळ। सहस्र-किरण ज्यापरी ॥ २२८ ॥ त्याचा लाधूनि वरदहस्त। तो बैसोनि हृदयाआंत। स्वये निर्माण करवि ग्रंथ। हें सामर्थ्यें तयाचें ॥ २२९ ॥ जें जें नून अथवा पूर्ण। ग्रंथीं दूषण की भूषण। त्याचा कर्ता तो आपण। जाला मन तो माझें ॥ २३० ॥ वेणु वाजे मधुर बहुत। तेणें प्रसन्न जन समस्त। होती परंतु तें सामर्थ्य। नोहे सत्य काष्ठाचें ॥ २३१ ॥ काष्ठ जड तें त्रिकाळ खोटें। त्यांतून मंजुळ ध्वनी उमटे। हे सामर्थ्य गोमटें। पवन फुंकी तयाचे ॥ २३२ ॥ तेवि कर्ता वक्ता श्रोता। सहजबोधचि पै तत्त्वता॥ येथ तूटली अहंता। कवन कविता हे त्याचि ॥ २३३ ॥ वेडा वांकुडा उत्तरीं। वाचा सुमनें पूजिला हरी। प्रीति पावो हृदयांतरीं। जो व्यापक सर्वांच्या ॥ २३४ ॥ समाप्त कर्ता श्रीगुरुनाथ। श्रोतीं आवडी ठेविजे येथ। प्रीति पावो रुक्मिणीकांत। भीमा तीर· विहारी ॥ २३६ ॥

[बंकटतरंगिणीच्या कर्त्यानें आपल्या परंपरेंत शिवकल्याण, निजानंद, रंगनाथ व ब्रह्मानंद (श्रीधरस्वामींचा पिता व गुरु) यांचा समावेश केला आहे. बंकटतरंगिणीचा कर्ता शिवराम हा मुकुंदराजाच्या 'बोध'परंपरेंतील व सहजबोधांच्या शिष्यशाखेंतला होय. त्याच्या गुरुपरंपरेंत निजानंद, रंगनाथ व ब्रह्मानंद यांचा त्यानें केवळ परंपरेच्या अज्ञानानेंच समावेश केला आहे, हें उघड आहे कारण निजानंदादींची आनंदपरंपरा इतिहाससिद्ध आहे. तसेंच, शिवरामाच्या परंपरेंतील शिवकल्याण हा नित्यानंदैक्य-दीपिकाकार शिवकल्याणाहून वेगळा तरी असावा अथवा जर वेगळा नसेल, तर शिवरामानें त्याचाहि समावेश अज्ञानानेंच केलेला समजावा. प्रस्तुत संदर्भांत प्रा. मुंडी यांनीं त्या त्या व्यक्तींच्या इतिहाससिद्ध परंपरांशीं शिवरामानें दिलेली माहिती तुळून बरीच विस्तृत चर्चा केली होती. लेख आटोपशीर होण्यासाठीं अशी चर्चा आम्ही त्यांच्या संमतीनें गाळली आहे. – **संपादक**]

---

९ भाऊसाहेबांची बखर : कांहीं भाग

(श्री. ना. के. जोशी, पुणें)

प्रस्ताव :—प्रस्तुत अपुऱ्या बखरीचीं ९ ते ३८ पानें तासगांव येथील श्री. महादेव रामचंद्र हिंगे यांजकडे होतीं तीं सातारा येथील प्रख्यात देशभक्त डॉ. वा. वि. आठल्ये यांचे-कडून मंडळाकडे आलीं. त्यांची नकल करून घेऊन तीं डॉ. आठल्ये यांजकडे परत केलीं.

या पानांतील विविध–विषयक मजकूर भाऊसाहेबांच्या बखरींतील तद्तद् विषयक मजकुराशीं ताडून पाहतां असें आढळून आलें कीं, बहुतेक प्रसंगांचा या प्रकरणांत संक्षेप असून भाऊसाहेबांच्या बखरींत तेच प्रसंग विस्तारानें सांगितले आहेत. यास एकदोन अपवाद आहेत ; तथापि बहुतेक ठिकाणीं भाऊसाहेबांच्या बखरीत असलेले शब्द, वाक्प्रचार व वाक्यरचना यांचा थोड्याशा फरकानें या प्रकरणांत समावेश असल्यानें तसेंच प्रसंगक्रमही दोहीकडे एकच असल्यानें या प्रकरणावरून भाऊसाहेबांच्या बखरीचा एखादा पाठ तर तयार झाला नसेल ना अशी शंका मनास चाटून जाते. मात्र एतद्विषयीं पक्कीं विधानें करण्यास प्रस्तुत बखरीचा याहून अधिक अंश मिळावयास पाहिजे. म्हणून येथें विशेष तौलनिक अभ्यास पुढें न मांडतां फक्त मूळ पाठ छापिला आहे.

मूळ पाठ

दुराणियानी धरून नेहल्या ब्राह्मणाच्या तमाम बायकानी यमुनाडोहात उड्या घालून प्राण दिल्हे ते समई माहानदीने निदान वक्त जाणोन किती येकास वाट दिल्ही पलीकडे अंतरवेदात निघोन गेली अब्दालीने मथुरेची खराबी करून मजल दर मजल आग्न्यावर आले आसपास सुरुजमल जाट याचा मुल्क खराब केला गोघाटावर यमुनेचे तीरी शाहाचा मुकाम जाहाला गाजदीखान वजीर समागमे कैदत होता तो प्रालब्धयोगेकरून डेरियाचे पाणीकडेस जाहले होते ते वेळेस गाजदी [खान*] याने रात्री जिवावर उधार होऊन पाणियात उडी घातली पोहवत व वाहात ऐसा आग्रियाचे किल्यानजीक येऊन बाहेर निघाला आणि दरवाजियाजवळ येऊन किलेदारास येऊन सूचना केली की आपण यकटा असे या गतीने आला आहे या वेळपरयंत मजला वाट देऊन जगविले परंतु आता तुम्ही किल्यात घेऊन जीव जगवणे आसे म्हणताच किलेदारानी गाजदीखान यास किल्यात घेतले गाजदीखान दगा करून आग्र्यात गेला हे अबदाली यास वर्तमान कळले नंतर फौजा सिध्ध करून आग्र्यावर चालून आला तो किला केवळ आसाध्य च्यार लक्ष फौज आलियाने आग्र्याचे काय होणार आहे मग किलेदारानी दम खाऊन फौज नजीक येऊन दिल्ही आणि यकदाच तोफास सरबती देऊन यकदाच बारासे गोळा पडताच फौजीस पळताच पुरे जाहाले आग्र्याचे कार्य होणे हे कठीण जाणोन जाटांचे कुंभीवर शाहा दिल्हा हिकडे दिलीच्या किल्यात नजीबखान रोहिला होता त्यानी गाजदीखान याचे कबिले चुलत्या व मावशा व मावळनी होत्या तितक्या रोहिलेयानी घरात घातले असे सर्वस्वे निमकहारामी जाहाला आंतरवेदीतील च्याळ... लक्षाचा मुल्क आपणाकडे नजीबखान याने करून घेतला रोहिलेयाचा गुरू कुतुबशाहा होता याचेसमागमे पाच सात हजार फौज देऊन आगदी स्वस्थान हास्तगत केले मु[दु,]देखान रोहिला येकदर त्याचा चुलता आणिखी त्याचेच लेक केली त्या योगेकरून सासरा होय त्यास भागीरथीस पूल बाधोन गंगापार मुल्क काबीज केला तितका त्याचे स्वाधेन करून हिकडे सुरुजमल जाट याजवर शाहा दिल्हा होता तो दक्षणेतून राजश्री राघोबादादा व मल्हारराव होलकर

पनाससाट हाजार फौजेनिसी जेयेपूरचे रानात येऊन गिलज्याची बातमी कळताच तेथेच दम खाल्ला त्यास पुढे जावयास आवसान पडेनासे जाहले आणि दक्षणेतून फौज आली ही आबदालीस वर्तमान कळताच गिलज्याचे व सुरुजमल जाट याजपासी दाहा लक्ष रुपये घेऊन उरकते घेऊन त्वरेने निघोन आबदाली आपले स्वदेशास चालला दिलीचे स्वस्थान रोहिल्याचे हावाली करून त्यास इमान प्रमाण दिल्हे की आणिखी जे समई तुजवर भारी पडेल ते समई येऊन पोहचणे आसे त्यास आभय देऊन मजल दर मजल सरदेस गेला तेथे जाऊन समदीखान व करालखान याजपासी (प) धरा हाजार फौज देऊन त्यासी तेथे ठाकिले तेथून लाहूरास गेले तो तेथील सदीद(प)खान बेग त्यास अगोदरच दूर केले होते तेथे अबदालीचा पुत्र तंबूरशाहा यास वीस हाजार फौजेनिसी लाहूरात ठेविले दिलीहून पुढे जातेसमई महमदशाहाची स्त्री मलकाजमनी तीही अगोदरच नजीबखान याचे हाती तिने आपली कन्या होती ती तंबुरशाहास दिल्ही ती व ही निघोन समागमे गेली पुढे येऊन दिलीची पातशाही करावी आसा विचार करून त्यास लाहूरात ठाकून आबदाली आटक उतरोन खेदरास गेला हे गडबडीचे वर्तमान हिदुस्थानातून अंताजी माणकेस्वर व सुरुजमल जाट व रामसिंग याचा पुत्र व राजेश्री दताजी सिंदे व जनकोजी सिंदे यास भासभास आला की हिकडे आब्रदालीने येऊन दिलीचे स्वस्थान व आणिखी आंतरवेदीचे वगैर आगदी हास्तगत केले हे वर्तमान कळलियावर जनकोजी सिंदे हागांम वैशाख मासी तीस हजार फौजेस नालबंदी दिल्ही तो खबर आली की गिलज्या आपले देशास गेला......तैसेच च्यार महिने जनकोजी सिंदे यानी घरी दम खाऊन राहिले तो हिकडे राजश्री राघोपतदादा व मल्हारराव होळकर जेयेपूरचे रान सोडून तमाम स्थानाचे खडण्या घेत दम खाऊन दिलीस जाऊन पोहोचले शहरपना मोकळा दरोबस्त यक लक्ष फौज आसावी याजकरिता रोहिल्याने शहरची आस्ता सोडून कमळगडावर सिलक गडीवर बळकाऊन राहिला शहरचा विनाशकाल याजकरिता जे यावे त्यानी वस्त्रे हारण करावी व मग पुढे करतुत्व करावे व जयेसिंगपुरा व बाहादरपुरा आणिखी येक दोन पुरे मारून चिंदीचोळा केला आणि किल्यास मोर्चे लाविले दोन किले आट रोज परयंत जुजले नजीबखान याने विच्यार केला की प्रस्तुत आपणास कोणी कुमकेस येत नाही त्यामधे रोहिला जबरदस्त कामातुर मोगलाई मसला आहे की लेक देऊन जावाई मारावा तैसा विच्यार करून मल्हारराव होळकर याजकडे आत्र लाविले की तुझा धर्मपुत्र आहे आजचे प्रसंगी मजला जीवदान देऊन अबरू रक्षावी असा त्याकडील सदर्प यताच मल्हारराव यास वीरश्री चढली की मी पुत्र म्हणून शरण आला त्या पुरशास खामाखाय रक्षावे म्हणोन आपले जागा विच्यार करून आपण व गंगोबा दिवाण ऐसे राघोबादादा याचे कचेरीस येऊन श्रीमंतास आर्ज केला की राजश्री राव कैलासवासी व नानासाहेब या उभयतासही आम्ही जो मनसुबा केला तो ऐकतच गेले त्याचे जागा आपण खावदच आहेत विनती करू ती गोष्ट मान्ये करावी आ[से म्हण]ताच दादा [साहेब]ही उमजले की मल्हारराव होळकर माग[ता]त जे नजीबखान याचा मागील विच्यार चितात

आणून दादानी जाबसाल केला की नजीबखान याची गोष्ट निराळी करून जीव मागितला तर तयार आहे आपले वचनाखेरीज आपणास अधिकोतर दुसरी गोष्ट काय आहे उतर ऐकोन मल्हारराव यानी मागती जाबसाल केला की मोड उगवताच खुडोन टाकिला मग मागणारानें काय मागावे ऐसा सदर्प दाखवून मल्हारराव यानी गाल फुगवून डेरियास गेले गेलियावर दादानी आपले कारभारी सखारामबापू आणिखी छोटेमोटे मिळवून मनसुबा केला की हिंदुस्थानचे सूत्र होळकराचे स्वाधेन आहे आजचे प्रसंगी याचे न ऐकावे तरी अवघे मसलतीस धका बसतो यानकरिता आजचे प्रसंगी कावसी करावे आणि मल्हारराव सागतील तैसे करावे की किला स्वाधीन जाहालियावर रोहिला याचा आभाव काय आहे भलती कफावत करून पिसाळले कुतरे मारावे जैसे तैसी मसलत करोन मल्हारराव याचे डेरियात गेले त्याचा बहुत प्रकारे गौरव केला की राव कैलासवासियाचे मागे सर्वस्वे वडील आपण आहा त्यास आपण वरचेवर रुसावे हा आर्थ जेव्हा आमचे चितात होते की रोहिला मात्रागमनी आहे ज्याचे आंन्न खाऊन त्यास ठाळावे त्याचे घरावर उठोन त्याचेच कबिले घरात घातले पुढे आपण त्यास रक्षून परिणाम कैसा लागेल हे कळतच आहे आसो असा विच्यार आसोन आम्हावर वडीलपणे शब्ध ठेऊन रुसून आला त्यास काय म्हणावे याजवर मल्हारराव बोलली की ज्यासी बेमानी त्याच्या कामास यईल परंतु शरण यतील त्यास मरण चिंतावे आसा आर्थ नाही हे इतक्यावर खावंद आहा ऐकाल तर उतमच आहे न ऐकले तर त्यापेक्षा उतमच आहे ऐसे साफ उतर ऐकोन राघोबादादानी पोटसी धरून समजाविसी केली की तुम्ही वडील आहा आम्हास ज्या प्रो वर्तवाल त्या प्रो वर्तणूक करू शुभ आथवा आशुभ नानासाहेब तुम्हास विच्यारितील आम्ही जेऊन मात्र आसावे आपले विच्यारास जैसी मनसुबी येईल तैसे करावे म्हणून त्याचा गौरव करून डेरियास घेऊन आले उपरांतिक मल्हाराव यानी किल्यात वकील पाठऊन रोहिल्यास इमान-प्रमाण बेलभंडार देऊन बाहीर काढून आपले गोठानजीक उतरावयास जागा दिल्ही आमदशाहा पातशाहा याचे मसलतीने मिसळला होता त्यास मारून नवा आलमशाहा पातशाहास तख्ती बैसवा [वू] न शेहरात द्वाही फिरविली वजीर नावजला गाजदीखान यासी देऊन गैर नवानी मागती अंताजी माणकेश्वर यासा दिल्ही आदा पूर्ववतप्रो सुदामत करून पुढे लाहूरास जावयाचा निस्छय केला परंतु आधी नजीबखान याचे काम करून पुढे जे कर्ण ते करावे हा विच्यार करून संधी पाहातच होते तो यक दिवसी मल्हारराव भोजन करून निद्रा केली ही बातमी दादानी आणोन लटकी रांडापोराची कटकट लावून रोहिल्यावर हाला केली आसपास त्याची जावाण लस्कर लुटून जिवे मारावे तो मल्हारराव सावध जाहाला आणि दरम्यान येऊन उभा राहिला की आधी हाला मारून मजला मारावे मग रोहिल्यास मा·ावे आसा विच्यार जाहाल्यावर याचा विचार चालेनासा जाहाला हाला माघारी फिरविली मल्हारराव याचे चितात पुरते आले की श्रीमंतानी दगा देऊन मारावे आणि आपले तो इमान गुंतले कामाचे नाही मल्हारराव कचेरीस येऊन दादासाहेबास अर्ज केला की आम्ही

येक वेळा जोड मागितली आणि आपणही येक वेळा जोड दिल्ही तोडातून ताबूल टाकिला त्याची मागती आशा धरून घ्यावयाचे अर्थ नाही त्याचे मारफतीचा मुलूख गेला आहे त्यावा इजारा आम्हाकडे लागला आहे त्याचे रुपयाची निशा आम्हापाशी घेणे चैघे कमाविसदार आहेत त्याचे मारफतीस येईल त्याप्रा यासी निरोप देऊन परगण्यास लावून देणे ऐसे ऐकोन दादानी चितात विच्यार केला की या विच्यारात ऐकावे तर कामाचे नाही रोहिल्यास या वेळेस जाऊन द्यावे मग पढे पारपत्य करावयाचे मात्र करून निरोप दिल्हा रोहिल्याने विज्यारियाचे वचनप्रमाण मल्हारराव याचे हातून सरकारात भरले आणि आपण अमल करू लागला दोन तीन सालांत प्रांतात दोन तीन क्रोड रुपये पदरी बाळगोन दहा हजार फौज बाळगली हिकडे राघोबादादानी पुढे कूच करून मजल दर मजल जाऊन कुरुक्षेत्री जाऊन तेथील तीर्थविधी उतमप्रकारे करून त्या सरदेसी गेला त्या सरदेस सलादखान कतलबाज होऊन आणि कुमक पोहोचेनासी जाहाली मग बाहेर तसेच निघोन सलासला म्हणोन लस्कर लुटू लागला बहूत नग व रुपये यासी बेमुलूक तमाम पेढारी कुबेर जाहाले वगैरे लोकासी प्रालब्धानसार लूट सापडली खासा सलादखान पळत होता तो पेढारियानी धरून आणिला त्यासी वस्त्रे देऊन जिवानिसी सोडून दिल्हा सदीदखान याचा पुत्र बारा वर्षाचा होता त्यास आपणाकडे च्यार हजार फौजनिसी चाकरीस ठेवून सरदेत ठेविला तेथून कूच करून शरयू नदीतीरी उतरोन दस्तियाने मुलूख काबीज केला आणि लाहूरास गेले तेथे तबूरशाहा आबदालीचा पुत्र वीस हाजार फौजनिसी शाहारात होता यानी धास्तीने लाहूरास पळाला तो अटक उतरून पार जाहाला यानी आपले ठाणे लाहूरात घालोन रुपयाही उतमप्रकारे मिळविला सदीद(प) खान बागा(बेग)याची स्त्री आपणासनींध्य चाकरीस ठेविली तिजपाशी दादानी आपला येक ब्राम्हण व तुकोजी होळकर व मल्हारराव याचा पुत्र पाळक तो दोन हजार फौजनिसी त्या रानात टाकोन दक्षणच्या रोके डाला दिल्ह्या हिकडे जनकोजी सिंदे यानी फौज टेऊन घरी बसला होता तो श्रावण मासी आंविद निज्यामआली याचा व पेशवे याचा बिघ (घा) ड जहाला ते समई श्रीमंतापासी फौज सनींध्य नाही ते समई दताजी सिंदे व जनकोजी सिदे यासी पुण्याहून सिरपाव दिल्हा आणि बहूत गौरव करून आज्ञा केली की आजपरयंत हिदुस्थानात भुमे व मारवाडी यांसारिखे काटक पराभवाते पाविले ते आम्ही कानी मात्र ऐकिले परंतु द्रिष्टीने पाहिले नाही देसी लाढाई मोगलासी होतच गेली परंतु देसी लढाईच प्रसंग पडला नव्हता व आवंदाही विघड जाहाला धणी तुम्ही प्रसंगी असता फिकीर काय विश्वासराव तुमचे हाती दिल्हे आवंदाच मोगलावर माहीम जाहली त्यास मोगल आणि आपण पाहून घेणे म्हणताच जनकोजी सिंदे कुरणिशा करून अर्ज केला की आजपरयंत हिदुस्थानात ही पुण्येप्रतापे साहेबाचे कामास आला आणि पुढेही धण्याचा आर्सीवाद कामास येईल या गोष्टीची साहेबानी फिकीर न(?)करावी असा अर्थ नाही म्हणून गोष्टीचा अंगिकार करून निरोप घेऊन श्रीगोंदियास तमाम लोकास पत्रे पाठविली भाद्रपद

मासी मुहूर्त पाहोन निघोन पैठणावर गेले तोफा नाहीत जमा जाहाल्या तोपर्यंत अविंद याचा व त्याचा तह होताच उभयताचे अइक्यतेस ययिनासे जाहाले व विस्वासराव व जनकोजी सिंदे उजनी मागे ठाकून सडी फौज करून अवरंगाबादेभोवते तीन कोसावर राहिले पधरा रोज परयंत अवरंगाबादेभोवते दंगा करून तमाम बागेचा खराबा करू लागले बाहेर येऊन तोड देईनासा जाहाला म्हराठेयानी निकड करून आस्वीन-मासी फौजा सिध्ध करून लढाईस यतात असे वर्तमान आइकोन मोंगल पळून गेला बागत म्हराटेयाच्या फौजा राहिल्या होत्या सरदार वेंकटराव निबाळकर व जानराव निबाळकर व खाडगले आणिखी लहानथोर सरदार याच्या फौजा तयार होऊन बाग धरून उभे राहिले आपले कोटगिऱ्या ठाकोन मोगलावर घोडे घातले खासा जनकोजी सिंदे याचे तोंड त्याजवर बसविले विस्वासरावनी घोडे घातले ते वेळेस अविंदानी त्याची कुमक राखिली नाही कि यकास येक सोयरे आहेत निदान ते यकसूत्र होऊन आपणास त्रास देतील म्हणोन तसेच उभे राहिले ते वेळेस आविंदाकडील म्हराठे यानी चागलीच केली सोयरे जाहाले यकामेकाची घरी मेजवानीस जातील परंतु साहेबकामावर सोयरे म्हणावयासी येन नाही सिंदे याजकडील लस्करचे करोल सामान भारी वेकटराव यास तोड सुचेनासी जाहाली मांड धरून मार खात उभा राहिला तो नागोजी माने यानी विच्यार केला की हे सोयरे खवळला असता दम खाऊन राहावे असा अर्थ नाहीं म्हणोन जिवावर उदार होऊन आपले घरीसामानानिसी सिदे याजवर घातले परतु सिंदे करोल जवून मांड धरून मारीत मारीत उभे राहिले नागोजी माने दोन घटकापरयंत सिपाईगिरीची शर्थ केली परतु जीव थोडका आणि कोणी कुमकही न केली विटेचा मोहरा जिंदेस येऊन डुकर खळीस येऊन तैसा उखलेनासा जाहाला याची त्याची झोडधरणी बहूत जाहाली निज्यामआली व सलबातखान उभयता अंबारीत बसून तमाशा पाहातात याची व त्याची फारच हातधरणी जाहाली परतु आतीशा निसाने गाठले चितातील हेत पूर्ण होता गोळी लागोन ठार जाहाला नागोजीराव याचा प्राण घोडीवर निघोन गेला मग लोकानीही शर्थ करून मुडदा वहून नेहला तो साहेकाळ जाहाला मोगलाच्या चितात की किलाफ होता तोही निरशण जाहाला आविंद व नागोजी माने याच्या डेरियात येऊन बहुतप्रकारे समाधान केले आम्रिप्रसाद दिल्हा तमाम मोगलात कळले की म्हराटेयात आपणापासी कोणी जुजले नव्हते नागोजी माने याने बहूत आश्चर्य केले असो याप्रा॰ येहलोकी लोकीक कीर्त करून परलोकी साधन केले आपला क्षेत्रोधर्म पूर्वीला त्याज उपरातीक शाहारावर आणिखी येक दोन झुज होऊन मोंगल बाहर निघाला युध्धे करीत सिंदखेडास येऊन रामचंद्रराव जाधवराव यासी आपणात मेळऊन मागती गंगातीरास आले ते वेळेस सिंदे यानी येक दोन वेळा युध्ध उतम प्रकारे केले म्हराटे-यात याजप्रा॰ मोगलासी युध्य कोणी केले नव्हते गनीम भारी मोंगलासी सोसेनासे जाहाले तीन महिने युध्ध करून मोंगलानी शेला करून घेतला तो नानासाहेबही पुणियाहून लस्करात आले आवींद यक महिना यक जागा होते मग येक दिवसी

जनकोजी सिंदे यानी नानासाहेबास अर्ज केला की आवंदा फौज भारी ठेविली आपणास देसी राहणे पुरवत नाही हिंदुस्थानात जावयासी निरोप द्यावे न द्यावे असे होते तो सिंदे यानी अति आग्रह करून दताजी सिंदे यानी निरोप घेतला साखरखेडियावर श्रीमंताची फौज सोडून हिंदुस्थानाचे रोके तीन कोसावर मुकाम केला तेथून दताजी सिंदे सडेच चांभारगोंदियास जयाजी सिंदे याचे कन्याचे लग्न करावयासी गेले फौज समागमे जनकोजी सिंदे व रामाजीपंत दिवाण असे तीस हजार फौजेनिसी मजल दर मजल नरमदा पार होऊन माळवे प्रांतात गेले तेथे कोणी गिरासी होते त्याचे पारपत्य करून मुकुंदबारी उतरोन खचीवाड व अहीरवाडा सिंदेवाडा बुंदीकोट असे तमाम मुलुखाचे खडण्या घेत उदेपूरचे सुमारास गेले उदेपूरच्या राणाजीचा भाऊ सिवसिंग व सिसदव आडवे सात मजलीवर यऊन बहुमान घेऊन सालोसाल खडणी करार होती तिची निशां केली या उपरांतीक सिवसिंग यानी अर्ज केला की सिवपुरियाचा राजा राणोजी नौकर असता जे नवे घेतले बादक आहे आशा पाच सात गडिया घेऊन बे (ई) बदल होऊन स्वस्थानास उपद्रव दिल्हा आहे फौजेस खर्चास पाच लक्ष रुपेये देतो यवढ्या गड्या व सवनूरचे स्थान जे घेऊन तेथील राजेयासी तंबी पोहोचऊन प्रगणा हास्त करून देणे म्हणोन म्हणतातच जनकोजी सिंदे यानी मनसुबा केला की दताजी सिंदे देशास राहिले ते यावे लागतात पुढे जाऊन काय करावे यखादा जागा च्यातुरमास छ्यावणी करावी हे काय वावुगे आहे म्हणोन आंगिकारून ज्येष्ट व आषाढ परयंत समग्र दोन महिन्यात अवघे गड घेऊन दिल्हे कौलगडी तिजवर राणोजी भोइटे सरनोबत च्यार हजार फौजेचा सरदार मातबर मनुश होता त्यासी गोळी लागून ठार पडला त्याच्या समजाविसीस दोन लक्ष रुपये घेतले सिवपुरीचा राजाही सलियास आला त्यानी तीन लक्ष रुपये देऊन राणोजीचे व आपले सखेत्व करून घेतले श्रावण शु॥ १ प्रतिपदेस कूच करून येक मजल लस्कर गेले तो तिकडून राघोबादादा यास लाहूरची मोहीम करून येत होते दुसरे दिवसी त्याची व याची भेट जाहाली उभयता लस्करास तीन कोसाची तफावत होती येक रोजी दोही लस्करचा मुकाम होऊन राघोबादादा यासी डेरियासी घेऊन आले श्रीमंतांसी बहुमान हातीघोडे व जोहारवस्त्रे देऊन जनकोजी सिंदे यानी कुरणीशा करून अर्ज केला की लाहोरपरयंत मोहीम करून मुलूख काबीज केला असता आम्हास मोहिमेस जावयासी रान कोणते ती आज्ञा करावी ऐसे ऐकोन दादानी गौरव करून मनपूर्वक बोलले कीं आम्ही चवघे भाऊ म्हणवितो आम्ही त्रिवर्ग तुम्ही चवथे तुम्ही यासी अन्येथा असाल तर ईश्वर साक्ष म्हणून इमानपूरवक बोलोन पदर पसरोन जोड मागितली की पहिलो शेवाचाकरी करीतच आलो पुढेही करू परंतु आम्हास प्रस्तूत येवढी द्यावी की नर्जाबखान रोहिल्यास आमचे हाताने मृत्यू नव्हता मल्हारराव यानीं पाट राखोन जिवानिसो सोडविला त्याचे भिडेस्तव ठाळा दिल्हा आता तुम्हास या गोष्टीकरिता कोट रुपये सिबंदी जाहली तर आम्हाकडे लागली भरून देईन असेच रोहिल्याचे पारपत्य करोन त्यासो जिवे न सोडिता त्याची

राडापोरे डाणकास यावी म्हणून बहुत अजीज होऊन पदर पसरून मागितले जनकोजी सिंदे यानी जाबसाल केला की धणियाने पदर किनिमित्य पसरावा नजीबखान म्हणजे कोण जिनस अधिकोतर काय आहे याचे पारपत्य आपण आज्ञा केली हुकूम आम्हाकडे लागला ऐसे ऐकोन दादा बहुत सतोष होऊन जनकोजी सिंदे यास हाती व वस्त्रे देऊन निरोप घेतला दादा मजल दर मजल देशास आले मागांहून यका महिनियात मल्हारराव होळकर आले त्यांचा याची अलीकडे चित शुध्ध नव्हते मारवाडचे सालियाचा त्याचा कुसूर धरून मल्हारराव याने चितात धरून बिजसिंग आतस्थ कागदपत्र पाठवीत होते हा किलाफ पुरताच जनकोजी सिंदे याचे चितात होताच जनकोजी सिंदे याचे चिती भेटावे हे नव्हते तो मल्हारराव याचे चितातील मनसुबा की आपले वृध्धपण जाहाले आपला येक नातूही शाहाणा नाही यास्तव सख्यत्व करून नातू हाती घ्यावा म्हणोन तीन च्यार दिवस गंगेबा तात्या येऊन बळेच रदबदली करून मल्हारराव याचे डेरियास येऊन भेट घेतली मल्हारराव यानी ममता दाखवून डोळियास पाणी आणोन नातवास हाती दिल्हे उभयता येकमेकास ममता अधिक अधिक करून कुफर तोडिला आट रोज पावेतो लस्करात समागमे होते मल्हारराव निरोप मागते समई जनकोजी सिंदे यासी बोलले की आमचे वृध्धपण जाहाले आणि तू जयाजीबावा आहेस आपला नातू मालोजीबावा तो दताजी बावा आता मानअभिमान तुमचा तुम्हाकडे लागला म्हणोन समाधाने निरोप घेतला ते समई जनकोजी सिंदे बोलले की सुभेदार आम्हास दादानी पदर पसरोन जोड मागितली की नजीबखान रोहिला याचे पारपत्य करावे त्यास जिवे न सोडावे म्हणोन बहुत काकुलती येऊन जोड मागितली याची काय आज्ञा म्हणताच मल्हारराव याने उतर दिल्हे की निक्षेत्री जाहाली कोणी भूमंडळात अथवा मोंगल भारी नाहीसा जाहाला अलिकडे नवे खुळ नजीबखान मात्र उभा राहिला यवढे बहुजापुरठाणे (बुजावणे) मोडून ठाकिले उपरांतीक श्रीमंतास तुमचे आमचे अगत्य काय तुम्हास व आम्हास धोत्रे धुवावयास लागतील आणि कमाविसदाराच्या हातून आटकेपासून रुपये आणवितील यवढे खुळ रक्षोन जे कर्णे त करावे ऐसे बोलोन उभयताही येकमेकास सिरपाव देऊन निरोप घेऊन निघोन कूच दर कूच मल्हारराव देशास आले जनकोजी सिंदे यानी मल्हारराव याची गोष्ट ऐकोन चितात मात्र ठेविले परंतु रोहिल्याचें पारपत्य कर्णे आवशक न करावे तरी स्वामीद्रोह पडेल पुढे जनकोजी सिंदे मजल दर मजल जेयेनगरची खडणी करून मारवाडात प्रांती जाऊन तेथील बंदोबस्ती करून कूच दर कूच दिलीचे रोके चालले मागोन दताची सिंदे यका वर्शानी समागमे नारोशंकर चवदा हजार फौजनिसी नौकर टेऊन उजनीवर आले तो दादाची व त्याची भेट जाहाली ज्याप्रो जनकोजी सिंदे यास सागितले त्याजप्रो नजीबखानाविसी दताजी सिंदे यानीं सांगितले त्याजवरून विठल सिवदेव याच्या व दताजी सिंदे याच्या भेटी जाहल्या विठलराव यास विच्यारिले की दादानी व मल्हारराव यानी आटकेपरयंत मुलख काबिज केला आतां तुम्हास मुलख

गिरीस रान खाली कोणते आहे हे ऐकोन विठलराव बोलला कीं ते रानातील भूप मदतीस घेऊन भार्गीथीस पूल बाधोन अयोध्येपासून सुर्योजयेतदउला त्याजवर चालून जावे मुलूख सबळ आहे त्या रानात अद्यापि कोणाची तस्ती नाही तुम्हास रुपये मन मुक्ता मिळेल आणि फौज ही आमदानी होईल त्या वितरिक्त मुलूख काही राहिला नाहीं यानी प्रतिउतर केले की आता भुमया भारी कोण आहे कोणास हाती धरावे तेव्हा विठलराव बोलले की आजचे प्रसंगी नजीबखान भारी आहे त्याची पाठ थापटलिया सिकाय (सिवाय) आशा दाखऊन त्याचे हाती भागिरथीस पूल बाधोन गंगापार होऊन पलीकडील मुलूख काबीज कराव सुर्योजयेतदवला (शुजाउद्दौला) त्यास तंबी पाइ-चालविल्यावर थाडके तरी पाच क्रोड रुपये देईल ऐसे विठलराव यानी मनसुबा देताच दताजी सिंदे याची गोष्ट प्रचितीस त्यास आली आजचे प्रसंगी सुर्योजयेतदवला मनसूरचा पुत्र याजपासी रुपया आहे येणेप्रो स्वराज्यात पइकेकरी कोणी मातबर नाहीं ऐसे जाणोन तोच मनसुबा पुरता ध्यानात आणोन उजनी सोडून दिल्ही आणि कूच दर कूच कावेरीयाचे मुकामास आले तो तिकडूनही मल्हारराव देशास येत होते तो त्याची व याची भेट जाहली कोव्याचे मुकामी उभयताचे अइक्यता होऊन उभयताही येकमेकासी सिंदे होळकर यासी विच्यारिले की राजेश्री दादासाहेब आम्हास नजीबखान रोहिले याचे पारपत्याविशई फार फार पदर पसरून सांगितले आहे याचे काय आहे याची आज्ञा म्हणोन विच्यारिता मल्हारराव याने जाबसाल केला की आजचे प्रसंगी बुझावणे तवढेच आहे खुळ मोडलेयाने पेशवे कमाविसदाराचे हातून अटकेपासून पैसा आणवितील ऐसे कितीक प्रकारे अगोदर जनकोजी सिंदे यास दर्शविलेच आहे व तुम्हासही सूचना केली आहे म्हणोन सांगताच दताजी सिंदे यास अगोदरच विठलराव यानी हा मनसोबा दिल्हाच होता त्याजवर मल्हारराव यानीही तच सुचविले उभयताचा मनसुबा आइक्यतेसच येतात दताजी सिंदे याचे न्हदयात तातकाळ गोष्ट ठसली प्रचीतीस आले की मल्हारराव यास दशास रवाना करून दताजी सिंदे मजल दर मजल दिलीचे रोके जनकोजी सिंदे मिळावयास चालले दिली अली-कडे च्याळीस कोस रेवडीवर उभयता चुलते पुतण्याच्या भेटी जाहाल्या समागमे देसीहून उभयताच कविले समागमेच आणिले होते यक जाहाली यानंतर बाहादरगडची मामलत चुकोन दिलीनजीक यमुनातीरी मजणूकाठियावर केला गाजदीखान वजीर बाहेर येऊन याच्या व त्याच्या भेटी जाहाल्या वजीरास घासदाणा पाच लक्ष रुपये मागो लागले ते समई वजिराकडील पातशाही कारभारी नांगरेमिळाने येऊन अर्जे केला की नजीबखान याचे पारपत्य कराल तर तुम्हास दाहा लक्ष रुपये देतो आणि जी आम्हापासी फौज आहे ती घेऊन तुम्हापासी येतो परतु नजीबखान याचे पारपत्य करणे जरूर तो अगोदर जनकाजी सिंदे यानी खुरणिसी करून उभा राहून अर्ज केला की वजीरास म्हणतात ही गोष्ट खामखाय ऐकावी आर्जीचे च्यार रुपये मिळतात आणि खावदाचेही वचन मान्ये केलेसे होते बहुत नम्रतेने अर्ज केला प्रसंगी नारो शंकर व जानराव दामले [वाबळे]

आणखीही छोटेमोटे सरदार होते त्यानीही सांगावयाचे ते सांगितले की जनकोजी सिंदे सांगतात ते मान्ये करावे ही गोष्ट उपयोगीचीच आहे अवघे याचे भिडेस्तव दताजी सीदे बरे म्हणोन बोलले परंतु चितात गोष्ट पुरती टसली नव्हती नागरेमेल याचे चितात सतोष होऊन विडे घेऊन शेहरात गेले वजीरास हा मजकूर श्रुत केला जनकोजी सिदे याची सिफारस फारसी सागीतली की उमर तो सोळा वर्शाची परतु बुधीस जैसा ब्रहसपति म्हणोन आपला हित गुणाणवाद बोलून वजिरानी मोहर्तानी डेरे दिल्हे तो बाहादरपुरियात पातशाई रिसाला व तोफा व गंजीचे गाब्या व हास्तनाला व सुतरनाला व बाजे होते ही बातमी दताजी सिंदे यास कळताच अगोदरच चितात भलताच विच्यार करून तह मोडावया विच्यारातच होता व जानराव वाबळे याजसमागमे च्यार हजार फौज देऊन तोफा पुरून ठेविल्या होत्याच उकरावयास लाविले हे वर्तमान गाजदीखान वजीर यास कळताच चितात विशाध आला की आम्ही सर्वस्वी याचे पदरी असता यानी परभारे न पुसता तोफा खाणविती तोफा काढावयाचे कारण काय तस्मात याचे चितात काही बेमानी आहे म्हणोन वजिरानी आपली पाच हजारा फौज व पायदळ होते ऐसी जमात घेऊन पातशाही रिसाल्यावर वजिरानी गनिमासी युध्य केले जानराव वाभळे यानी तवदस्ती कडनिकड करून वजीरावर घोडे घातले उभयता फौजेतील सवशेये मनुशे ठार जाहाली सिंदे याजकडील बाळोजी लवळे याचा पुत्र बळवतराव यास गोळी लागोन ठार जाहाला हे वर्तमाने लस्करात कळताच आणिखी च्यार हाजार फौजनिसीं जिवाजी भोइटे कवठेकर चालोन गेले बाहादुरपुरा अगदी लाहोर दरवाजियापरयंत आगदी चिंदीचोळा केला वजीरानी चितात विचार केला कीं आपण हाटनिग्रह केलियाने परिणाम नाही गनिमाची इछा भारी असे समजून दताजी सिंदे याजकडे वकील पाठविला की दादासाहेब स्थापना करून गेले आहेत तुमचे खातरेस जसे यईल तैसे करणें म्हणोन सरनोबद आपले हावेलीस जाऊन स्वस्थ राहिले जानराव वाबळे यानी आवघ्या तोफा बाहेर काढल्या त्यातील नऊ लक्षाची येक आठ तोफा तीन लक्षाच्या खुशाली अैश्या दोन्ही तोफा करार करून गाड्या तयार करून तोफा लस्करात आणित होते तो थोरली तोफ आटकळली चालेनासी जाहाली दोन हाती व च्यारसे बैलाच्या च्यार माळा लाविल्या परंतु तोफ चालेनासी जाहाली येक मनुशे आऊन दिल्हे देताच तोफ लस्करात येऊन दाखल जाहाली तोफा काढावयासी कारण काय म्हणाल तर मारवाडातील नागेर याचे पारपत्य मनोदयानरूप जाहले नव्हते याजकरिता तोफा काढून उजनीस लावून द्यावे ऐसा निस्चय केला तो सूरजमल जाट याजकडील वकील रूपराम कोठारी आपले खडनीचा गुता ठरवावायासी आला त्याने दताजी सिंदे यास अर्ज केला की खडणीपैकी च्यार लक्ष रुपये मजुरा द्याल तर आपण उजनीस तोफा प्रविष्ट करितो ते समई तोड करून दोन लक्ष रुपये खर्चोन तोफा उजनीस न पोहचलिया आशेरीजवळ चमेलीच्या खालियात तोफा तैशाच

राहिल्या तोफ भारी चवदा हात लांबी पिछयाडीस गर्भी आठ हात होती दिलीवर मुकाम महिनाभर केला वज़िराजवळ पाच लेक्ष रुपये घेतले वजिराचे समागमे यावयाचा निस्चय राहिला समागमे अंताजी माणकेश्वर यास घेऊन लाहूरचे रोके चालले त समई जनकोजी सिंदे यानी चुलत्यास अर्ज केला की आधी यमुना उतरोन अंतरवेदीत जावे रोहिले याचे पारपत्य करोन मग पुढे कर्णे त करावे दताजी सिंदे यानी उतर दिल्हे की लाहूर प्रांतीचा बदोबदस्त करून तिकडून माघारे फिरलियावर तेवढेच आहे म्हणून कूच दर कूच सोनपतावर जाऊन मुकाम केला अगोदर जनकाजी सिंदे यानी जेयेनगर प्रांतीहून }ग{ गणोजी हालकारा प्रांती रवाना केला होता त्याजसमागमे पाच हजार फौज पुढे गेलीच होती आणिखी मागाहून शाबाजी सिंदे याजसमागमे आठ हजार फौज देऊन त्याच प्रांतो लाऊन दिल्हे आपण मागाहून मुलखाच्या [खडण्या] करून हादेत चालले सरदेत सदीदखान याचा पुत्र होता तोही साबाजी सिंदे याजसमागमे गेले ते तैनातीस दिल्हे आपण माघून कुरुक्षेत्री बारा रोज मुकाम करून तेथील तीर्थविधी उभयतानी दंपत्यासुध्धा तुळा करून ब्राम्हणास दिल्ही तीर्थविधी यथाविधीने करून सरदेने शन्धूचे बेठावर यक महिना मुकाम केला त्या रानातील बदोबस्त उतमप्रकारे करून साबाजी सिंदे व गणोजी कदम त्या रानात येऊन आपण माघारे फिरोन कूच दर कूच कुजेपुरीयावर आले तेथे खडणी घेऊन कुजपुरियानजीक घाट होता तेथे यमुना उतरोन आंतरवेदीत गेले तो च्यार हाजार फौजनसी गोविंदपत बुंदेले येऊन दाखल जाहाले जनकोजी सिंदे याचे चितात नजीबखान याचे पारपत्य करावे नंतर दताजी सिंदे याच्या विच्यारास त्यास रक्षोन कार्य करून ध्यावे म्हणोन गोविंदपत बुंदेले यास यकांती नऊन सांगितले की जैसे कळेल तैसे कर्णे रोहिल्यास भेटीस आणावे गोविंदपत बुंदेले याचा व रोहिल्याचा निस्चय उतम प्रकारचाच होता गोविंदपंताची पत्रे रोहिलियासही जाणपुरस्कर जाताच नजीबखान दोन हजार फौजनसी येकायकी आघाडीचे ढालेपासी उभा राहिला दताजी सिंदे यास चोपदारासमागमे मुजरा सागोन पाठविला हे वर्तमान जनकोजी सिंदे यास कळताच दताजी सिंदे याजपासी येऊन कुरणिश्या केल्या आणि अर्ज केला की वैरी केवळ बहुत प्रयत्ने ससा भानवसी सापडतो तैसा सापडला आहे आशात माहाराजानी हुकूम आम्हास कराव याचे पारपत्य केलियाने स्वामीस सतोष होईल या रानातील कुफरही तुटेल याप्रो दताजी सिंदे यानी उत्तर केले की वैरी खरा परंतु शेरण आला त्यास मरण काय चिंतावे यास रक्षून याचे हातून कार्य संपादून घ्यावे मारून हातास येणे काय असे उतर होताच जनकोजी सिंदे आपले जागा बहूत आर्जूदा होऊन आपले कचेरीचे डेऱ्यास येऊन छोटे मोटे उमराव त्यास सांगू लागले की नजीबखान याच्या पारपत्याविशई वडील तो तह देत नाहीत दादानी तो पदर पसरून जोड मागितली आणि आम्ही ही कबूल केली होती आता या गो

---

१० ग्रँट डफचीं सातान्यांतील चार वर्षें (इ. १८१८-२२)

(डॉ. अ. रा. कुलकर्णी, पुणें)

फ्रान्समध्यें जेव्हां राज्यक्रांति घडत होती त्या वर्षी म्हणजे इ. १७८९ सालीं ग्रँटचा जन्म झाला आणि क्रांतिकालांत जन्माला आलेल्या या ब्रिटिशपुत्रानें भारतांत ब्रिटिशांची नवीन राजवट चालूं करण्यांत महत्त्वाची कामगिरी बजावली. ग्रँटचें विस्तृत चरित्र उपलब्ध नाहीं. पारसनीस यांनीं भारतवर्षांत (अंक १७ पृ. १२) त्याचें एक त्रोटक चरित्र रेखाटलें आहे आणि ग्रँटच्या मराठ्यांच्या इतिहासाच्या नंतरच्या आवृत्तींमधून त्याच्या जीवनवृत्ताचें टिपण संपादकांनीं जोडलेलें आहे.

ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदी नोकरींत प्रवेश करून घेण्याच्या इरादानें ग्रँटनें प्रथम कॅडेटशिप पत्करली व इ. १८०५ सालीं बॉम्बे ग्रेनेडिअर्स पलटणींत एक सामान्य सेनाधिकारी म्हणून त्यानें भारतप्रवेश केला. इ. १८१० सालीं एलफिन्स्टन पुण्याचा रेसिडेंट झाला. गुजराथेंत शौर्य गाजविलेल्या आणि फार्सी भाषेचें ज्ञान असलेल्या कॅप्टन ग्रँट या उमद्या तरुणानें त्याचें चित्त आकर्षून घेतलें. मराठ्यांचें राज्य खालसा करण्याच्या त्याच्या महत्त्वपूर्ण कामगिरींत कर्नल बर, कॅ. फोर्ड यांजबरोबरच जेम्स ग्रँटची वर्णी लागली. इ. १८१० ते १८१७ या कालांत त्यानें एलफिन्स्टनचा विशेष विश्वास संपादन केला असला पाहिजे. त्याखेरीज ब्रिटिश राजवटीची मुहूर्तमेढ रोवण्याची बिकट कामगिरी एलफिन्स्टननें त्याच्यावर सोंपविली नसती.

इ. १८१८ ते १८२२ या चार वर्षांत सातान्यांत राहून ग्रँटनें दोन गोष्टी साधल्या. पहिली, ब्रिटिश राज्यपद्धतीचा मराठी शासनव्यवस्थेंत प्रवेश आणि दुसरी, मराठ्यांच्या इतिहासाचा कच्चा आराखडा केला.

सातान्याचा रेसिडेंट म्हणून ग्रँटची जेव्हां नेमणूक झाली तेव्हां तो २९ वर्षांचा होता. त्याजकडे सोंपविण्यांत आलेली कामगिरी अत्यंत नाजूक स्वरूपाची होती. राजाची मर्जी सांभाळून त्याला ब्रिटिश शासनपद्धतीच्या मार्गावर आणण्याचें बिकट काम ग्रँटच करूं शकेल असा एलफिन्स्टनला भरंवसा होता; म्हणून त्यानें त्याला हाताशीं धरलें होतें.

दि. ११ फेब्रुवारी १८१८ रोजीं सातान्याच्या राज्यासंबंधीं एलफिन्स्टननें जो जाहीरनामा काढला तो म्हणजे बाजीरावावरील एक आरोपपत्रच[1] (Indictment)

---

१ "Satara Territory" Selections from the Records of the Bombay Govt. No XLI, New Series (1857) pp 46–47.

आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. " या मसनदीवर बाजीराव आल्यापासून त्याचा प्रदेश दुहीला आणि फुटीला बळी पडला आणि लोकांचें संरक्षण करूं शकेल असें समर्थ सरकार राहिलें नाहीं " असें विधान करून इ. १८०३ पासून ब्रिटिशांशीं झालेले करारमदार त्यानें कसे मोडले आणि त्यामुळें नाइलाजानें कंपनीला त्याचा सर्व प्रदेश कसा काढून घ्यावा लागला याचा त्यांत पाढा वाचला आहे. पेशवा आणि त्याचें सरकार यांच्या दुष्कृत्यांशीं संबंध नसलेल्या सातान्याच्या राजाला या काबीज केलेल्या प्रदेशापैकींच कांहीं भाग देण्यांत येईल व सातारचें राज्य निर्माण करण्यांत येईल अशी घोषणा त्यांत केली आहे.[२]

सातान्याची राज्यनिर्मिति हा एलफिन्स्टनच्या मुत्सद्देगिरीचा विजय म्हटला पाहिजे. असें राज्य निर्माण करणें हें ब्रिटिश राजवट हिंदुस्थानांत स्थिर करण्याच्या दृष्टीनें आवश्यक होतें. तसें केलें नसतें तर शिंदे, होळकर आदींनीं बंड पुकारलें असतें, ब्रिटिश सत्तेला सर्वत्र शह बसला असता आणि पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणें ही सत्ता संपुष्टांत आली असती. म्हणून जें आपणांस पचणार नाहीं तें सेवन करणें हें अप्रस्तुत होय असें तो म्हणतो. इ. १८१९ सालीं आपल्या मित्राला लिहिलेल्या एका पत्रांत त्यानें आपली भीति व्यक्त केली आहे. तो म्हणतो, " आपलें ब्रिटिश साम्राज्य भारतांत दीर्घकाल टिकणार नाहीं हा खोटा ग्रह (Prejudice) नसून रास्त तर्क (Reason) आहे.[३] "

तसेंच पेशव्याला पदच्युत करण्यापासून जर सर्वांत महत्त्वाचा कोणता फायदा असेल तर तो म्हणजे मराठे सरदारांच्या संघाला (Confederacy) त्यामुळें तडा जाईल.[४] कारण असें केल्यानें त्यांना एकत्रित आणणारा दुवाच नष्ट केल्यासारखें होईल असें त्याचें मत होतें. इ. १८१८ च्या जाहीरनाम्यानें छत्रपतीची गादी कायम ठेवली आणि लोकांना सामाजिक, धार्मिक व आर्थिक स्वातंत्र्याचें आश्वासन व अभयदान दिलें. पुढें इ. १८५७ सालीं व्हिक्टोरिया राणीनें जो जाहीरनामा काढला त्याची ही रंगीत तालीम होती असें म्हणावयास हरकत नाहीं.

सातान्याच्या राज्याचें कायदेशीर स्वरूप काय होतें हें निश्चितपणें सांगणें कठीण आहे. दि. २५ सप्टेंबर १८१९ रोजीं प्रतापसिंह आणि कंपनी सरकार यांमध्यें तहनामा अथवा करारनामा झाला त्यांत असें नमूद केलें आहे कीं, " सातान्याच्या गादीचें पुरातनत्व लक्षांत घेऊन, कंपनी सरकारनें ठरविलें आहे कीं, सातान्याच्या राजाला आपल्या कुटुंबियांसह मानानें आणि सुखानें राहतां येईल इतकें सार्वभौमत्व राहील (Sovereignty sufficient for the maintenance of his family in comfort and

---

२ Life of Mount Stuart Elphinstone (London, 1884) by Colbrooke Vol II pp 40–44 ३ Ibid p. 72

४ Poona Residency Correspondence (PRC) Vol.XIII p. 399

dignity)[५]. हें असलें सार्वभौमत्व स्वीकारतांना राजाकडून एका कलमान्वयें असें आश्वासन घ्यावें लागलें कीं, हा मुलूख आपण ब्रिटिश सरकारचे एक दुय्यम सहकारी म्हणून धारण करीत असून (hold the territory in subordinate co-operation with the British Goverment)[६] राज्यकारभाराच्या सर्व बाबतींत आपण ब्रिटिश वकिलानें दिलेल्या सल्ल्याप्रमाणें वागूं. सार्वभौमत्वाच्या रूढ कल्पनांत प्रतापसिंहाचें हें सार्वभौमत्व बसत नाहीं. नंतरच्या काळांत जी ब्रिटिश पॅरामाउन्ट्सीची कल्पना उदयाला आली तिची सुरवात ही अशी झाली असावी.

प्रतापसिंहाला गादीवर बसवावयाचें, त्याच्या राज्याच्या सरहद्दी ठरवून द्यावयाच्या, त्याचें जरीपटका निशाण फडकूं द्यावयाचें आणि असें करीत असतांना अशी दक्षता बाळगावयाची कीं जुनें छत्रपतींचें राज्य आलें, असें कोणाला वाटणार नाहीं. प्रजेच्या मनावर असें कायम ठसविलें पाहिजे कीं, प्रतापसिंह राजा असला तरी सर्वोच्च अधिकार कंपनी सरकारकडे आहेत.[७]

या राज्यनिर्मितीनें एलफिन्स्टनपुढें नवीनच समस्या निर्माण झाल्या. या प्रदेशांत सुस्थिर अशी सनदी राजवट, शांतता आणि सुव्यवस्था निर्माण केल्याखेरीज ब्रिटिशांची सत्ता मूळ धरणार नव्हती, लोकांचा विश्वास संपादन करूं शकणार नव्हती. पूर्वीच्या राजवटीपेक्षां ही नवी राजवट बरी आणि ती तशीच चालू राहिली पाहिजे असें लोकांना वाटणें आवश्यक होतें. स्वतंत्र राज्य निर्माण केलें, पण राजा राज्य-कारभारास अनभिज्ञ असल्यामुळें कांहीं काळपर्यंत त्याला ब्रिटिश वकिलाची मदत घ्यावी लागेल. स्वतंत्र रीत्या राज्यकारभार करण्यास तो योग्य झाला म्हणजे सर्व सूत्रें त्याच्या हातीं सुपुर्द करण्यांत येतील. अशा तऱ्हेची सिद्धता करण्यांत आली आणि हा सारा खटाटोप लोकांच्या हितासाठीं आणि भरभराटीसाठीं करावयाचा आहे अशी लोकांची कल्पना करून दिली गेली.

साताऱ्याचें राज्य ब्रिटिश नेतृत्वाखालीं स्थापन करण्याची सारी कामगिरी ग्रँटकडे सोपविली होती. राजकीय दृष्ट्या ब्रिटिश सत्तेच्या वर्चस्वाखालीं असूनही राजाला असें वाटलें पाहिजे कीं, अंतर्गत व्यवहार आणि प्रजेवरील सत्ता या बाबतींत आपण स्वतंत्र आणि मुक्त आहोत.[८] येथें एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, प्रतापसिंहाचा उल्लेख नेहमीं "राजा" असा केला आहे, छत्रपति असें चुकून सुद्धा त्याला म्हटलेलें नाहीं.

साताऱ्याचा राज्यकारभार कसा करावयाचा यासंबंधीं विस्तृत सूचना एलफि-न्स्टननें ग्रँटला दिल्या होत्या. राजाचा विश्वास संपादन करणें, त्याच्या हिताबद्दल विशेष

५. Treaties, Engagements and Sanads, Vol. II by Aitchison p. 443 ६. कित्ता. ७. Social policy and social change by Ballhatchet pp. 19–20. ८. PRC Vol. XIII, p 437.

जागरूक राहणें, त्याच्या कुटुंबांतील सर्वांशीं प्रेमानें वागणें आणि राजघराण्याशीं आपलें संबंध बिघडणार नाहींत याची काळजी घेणें ही त्यांत एक महत्त्वाची सूचना होती.[९] ग्रँटची आणि प्रतापसिंह व माईसाहेब यांची ओळख एलफिन्स्टननें, त्याची रेसिडेंट म्हणून नेमणूक होण्यापूर्वींच, राजा सातार्‍यांत येण्याआधींच म्हणजे चंदनवंदन किल्ल्यावर करून दिली होती. तेव्हां तो म्हणतो, "आम्हांस आपलेकडील वकिलीचें काम सांगितलें. माईसाहेबांनीं महाराजानें व भाऊसाहेबांनीं जें बोलणें तें आम्हासी बोलावें, परभारें बाळाजीपंताकडे (नातू) कोण्ही बोलूं नये. बाळाजीपंतास आम्ही आपलेजवळ ठेऊन घेतलें आहे तें कागदपत्राची माहितगारी[साठीं] व न समजेल तें विचारणें तें आम्ही विचारूं तुम्ही परभारें बोलू नये."[१०] म्हणजे अगदीं पहिल्या सलामींतच ग्रँटनें राजानें कसें वागावें हें सांगून टाकलें आणि नेटिव्ह असिस्टंट बाळाजीपंत नातू याच्या कामाचें सत्य स्वरूप उघड केलें.

असें असलें तरी ग्रँटनें राजाची दृढ मैत्री संपादन केली होती हें इंग्लंडमध्यें स्थायिक झाल्यानंतर १८३३–३५ पर्यंत त्यानें प्रतापसिंहाशीं जो उपयुक्त पत्रव्यवहार केला त्यावरून लक्षांत येईल.[११]

राजाचा वार्षिक खाजगी खर्च तीन लाखांहून अधिक मंजूर करूं नये अशी एक सूचना एलफिन्स्टननें केली होती. याहून अधिक खर्च चालणार नाहीं असा धाक त्याच्या मनांत निर्माण करावा असें सांगण्यांत आलें होतें. ही बाब फारच नाजूक होती. राजानें मुळीं मागणीच ५० लाखांची केली; नंतर ती वीस लाखांवर आली. परंतु ग्रँटनें जेव्हां एलफिन्स्टनचा आंकडा सांगितला तेव्हां राजानें तें जमणार नाहीं असें निक्षून सांगितलें. पुढें बाळाजी नातूच्या मध्यस्थीनें ग्रँटनें हें प्रकरण तीन लक्ष बारा हजारांवर मिटविलें.[१२]

राज्यकारभार स्वतः पाहावा आणि असें करीत असतांना सर्व गोष्टी राजास समजावून द्याव्यात, त्याच्या इच्छेप्रमाणें वागावें व त्याच्या ठिकाणीं काम करण्याची अभिरुची व राज्यव्यवस्थेच्या तत्त्वांचें ज्ञान उत्पन्न करावें अशी एक सूचना ग्रँटला दिली होती. राजाची मर्जी संपादन करीत असतांना व त्याला राज्यकारभार करूं देत असतांना प्रत्यक्षांत ब्रिटिश सरकार सर्वाधिकारी आहे याची त्याला सतत जाणीव करून द्यावयाची होती. "तसें झालें नाहीं तर हें नवें राज्य भस्मासुरासारखें आपल्यावरच उलटलें असतें." अशी एलफिन्स्टनला भीति होती.[१३]

ग्रँटनें राजाला कसें कार्यप्रवण केलें याची कल्पना प्रतापसिंहाच्या रोजनिशीवरून येईल. "नित्यनेम करून मग अदालतींत जाऊन उत्तर देणें तीं देऊन हिसेब लिहून नंतर ग्रँटाची गाठ पडून बोलणी झाली ती कलमे" अशी प्रस्तावना करून दैनंदिनी

---

९. PRC Vol. XIII p 437. १०. डेक्कन कॉलेज ऐतिहासिक संग्रह रु. नं. ५५ फा. १२ क्र. १. ११. Journal of Indian History Vol. XV part II No. 44 (1936) १२. Social Policy etc. p 21. १३किता p. 20.

त्यानें लिहिली आहे. यावरून कशा प्रकारची शिस्त ग्रँटनें त्याला घालून दिली होती याची कल्पना येईल. इ. १८१८ ते १८२४ या कालखंडांत राजाच्या अंगीं ही शिस्त इतकी बाणली होती कीं, राजवाड्यांतील एका खोलींत खुर्चीटेबलावर बसून हा शिवाजीचा वंशज स्वतःच्या हातानें पत्रें आणि रोजनिशी लिहितो हें पाहून एलफिन्स्टनला आश्चर्य वाटलें. "मला भेटलेल्या मराठ्यांत प्रतापसिंह हा एक अत्यंत सुसंस्कृत मराठा आहे" असें तो इ. १८२६ सालीं लिहितो.[१४] इ. १८२७ सालीं कर्नल ब्रिग्जचें मत देखील तसेंच होतें. ग्रँटच्या नेतृत्वाखालीं राजानें किती तत्परतेनें राज्यकारभार केला हें खरोखरच आश्चर्यकारक आहे आणि त्यानें घालून दिलेली पद्धत ज्या सातत्यानें तो पाळीत आहे तें खरोखरच त्याला भूषणावह आहे[१५] असें कर्नल ब्रिग्जनें आपलें मत नोंदविलें आहे.

इ. १८१८ सालीं साताऱ्यांत ब्रिटिश नेतृत्वाखालीं प्रस्तुत केलेली नवी राजवट सुकर व्हावी म्हणून दि. १४–४–१८१८ रोजीं राजानें दोन जाहीरनामे काढले. पहिल्या जाहीरनाम्यांत सर्व अधिकारी आणि रयत यांना बजावलें आहे कीं, "मी इंग्रज लोकांवर विश्वास व भरवसा ठेऊन त्यांच्या छावणीत गेलों, तेथें त्याची व आमची परस्पर दोस्ती घडून आली आहे. ह्याकरिता इतःपर कोणी बाजीरावाशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवूं नये व त्यांशीं पत्रव्यवहार करूं नये. जे कोणी ऐकणार नाहींत त्यांचें उत्पन्न सरकारांतून जप्त केलें जाईल व त्यांस योग्य शासन होईल."

दुसऱ्या जाहीरनाम्यांत "क्याप्टन ग्रांट बहादूर ह्यांजकडे आम्ही सर्व राज्य-कारभार सोंपविला आहे, ते आमच्या राज्याचें कल्याण व भरभराट होईल अशा रीतीनें राज्यकारभार चालवतील"[१६] असें आश्वासन दिलें आहे. अर्थात् हे दोन्ही जाहीरनामे एलफिन्स्टनच्या सांगण्यावरून काढले आहेत हें उघड आहे.

ग्रँटला दिलेल्या सूचनांपैकीं आणखी एक महत्त्वाची सूचना म्हणजे प्रस्थापित व्यवस्थेंत विशेषतः सामाजिक व्यवस्थेंत फारसा बदल न करणें. सत्तांतराच्या काळांत किमान सामाजिक बदल घडून येणेंच इष्ट होय. सत्तेचा मोठ्या प्रमाणांत दुरुपयोग केला जात असेल अथवा लोकांच्या हितसंवर्धनार्थ असा हस्तक्षेप आवश्यक असेल तरच तो करावा. ब्रिटिशांचें हें धोरण त्यांच्या परंपरेला आणि सनातनवृत्तीला धरूनच होतें.

मराठ्यांची शासनपद्धति आणि इतर व्यवस्था शक्य तितक्या प्रमाणांत अबाधित ठेवली पाहिजे. ती लाचलुचपतीची असली आणि तितकीशी कणखर नसली तरी ती येथील परिस्थितीला लागू पडणारी असल्यामुळें आणि तिनें या भागाचा

१४. Colbrooke II pp. 187–88 १५. Social Policy etc. p. 241.
१६ (भारतवर्ष : पारसनीस १७।१८).

विकास साधला असल्यामुळें, तींत आवश्यक तेव्हांच आणि तेथेंच सुधारणा करावी असें एलफिन्स्टनचें धोरण होतें.[१७]

राज्यशासनांतील बारीकसारीक गोष्टींत लक्ष घालून (details of administration) त्यांतील दोष क्रमशः दूर करून, लाचलुचपतीला आळा घालून, एक प्रकारची शिस्त निर्माण करण्याची कामगिरी ग्रँटकडे होती. इ. स. १८१८ ते १८२२ या चार वर्षांच्या काळांत एलफिन्स्टनच्या या कल्पना कितपत प्रत्यक्षांत उतरल्या आणि राज्यकारभारांत ग्रँटनें कसें लक्ष घातलें होतें हें कागदपत्रांवरून समजून घेणें उद्‌बोधक ठरेल. इ. १८२७ सालीं लिहिलेल्या एका पत्रांत एलफिन्स्टन म्हणतो, "साताऱ्याच्या राजाचें वर्तन आणि त्याच्या शासनाचें यश यांनीं आमचे अपेक्षेपेक्षां अधिक समाधान केलें आहे." कांहीं वेळां प्रेमानें, कांहीं वेळां धाक दाखवून ग्रँटनें हें यश मिळविलें होतें आणि म्हणूनच एलफिन्स्टन म्हणतो, "मैत्रींत तूं थोर आहेस, आणि त्याचबरोबर तुझा कोप भयानक आहे." (you are great in your friendship and you are terrible in your wrath)[१८]

उत्कृष्ट महसूलव्यवस्था, काटकसरीचें शासन, न्यायदान आणि शेतकऱ्यांना प्रसंगीं सारासूट ही ग्रँटच्या कार्याची चतुःसूत्री होती. इंग्लंडहून प्रतापसिंहाला लिहिलेल्या पत्रांत याच मार्गदर्शक तत्त्वांचा त्यानें वारंवार उल्लेख केला आहे.

महसूलपद्धतीची योग्य पायावर उभारणी करण्याकरितां म्हणून ॲडम्स या अधिकाऱ्याच्या मार्फत त्यानें जमीन मोजणीच्या कार्याला प्रारंभ केला होता. खर्चांत काटकसर झाली पाहिजे असा त्याचा सतत आग्रह असे. बळवंतराव चिटणीसांच्या लेकीच्या लग्नासाठीं कांहीं रक्कम द्यावी असें महाराजांनीं ग्रँटला सुचविलें तेव्हां तो सांगतो, "आसी लग्ने फार होतील, हा दस्तूर पाड्डू नये व म्हाराजाचे राज्य हवाली जाहाले म्हणजे असाच खजिना देतील लोकास." शेवटीं आपलें दातृत्व सिद्ध करण्यासाठीं महाराजांना आपल्या खाजगींतून दोन हजार रुपये द्यावे लागले.[१९]

ग्रँट हा मोठा करारी आणि जबरदस्त माणूस होता. एकदां एक विशिष्ट घोडा खरेदी करण्याविषयीं राजाला निरोप पाठविला असतां, तो "पाहून घेऊ" असें उत्तर घेऊन विठोबा दिवाण आला. हें उत्तर ग्रँटला रुचलें नाहीं. तो रागावला आहे हें दिवाणानें चटकन् ताडलें आणि सत्वर त्यानें आपलें बोलणें सुधारून घेतलें. तो म्हणतो, "माहाराजाचे म्हणणे की तुमचे पारखीस आला असल्यास आमचे पसंत आहे."[२०]

---

१७. Social Policy etc. p. 234. १८. Social Policy etc. p. 21.

१९. प्रतापसिंहाची (रोजनिशी क्र. ५ पृ. १९ : ता. २२·१०·१८२१) अप्रकाशित : पेशवे दप्तर. २० रो. क्र. १ पृ. ३६, सन १८१९.

दैनंदिन राज्यकारभार कसा चालत असे याची कल्पना देणारे कांहीं कागदपत्र डेक्कन कॉलेजच्या पारसनीस संग्रहांत आहेत. पत्रव्यवहारासंबंधीं ग्रँटनें असा नियम घालून दिला आहे कीं, "मोर्तब सर्व कागदावर चिटणीसांनी करावा. सर्व कागदपत्र येतील त्याचे लखोटे फोडून वाचून दाखवून उत्तर देणें हे त्याणी करावे दिवाण (समक्षास) असल्यास उतम नसल्यास चिटनिसानी त्याची उजूर कोणतेहि काम करण्यास धरू नये [२०अ]

ग्रँटला विचारून जीं कामें करावयाचीं त्यांची एक यादी तयार केली जात असे आणि तींतील प्रत्येक कलमावर त्याच्याकडून हुकूम घेतले जात; मग तें कलम कितीही सामान्य असो. उदाहरणार्थ "कुरणांत गुरे चरावयाची पंधरा दिवस अवकाश करावा" या कलमाखालीं ग्रँटचा निर्णय असा कीं, "पंधरा दिवस गवत देवावे आम्हापासी घास नाहीं, पुढें कुरणांत रवानगी व्हावी."[२१] अथवा "बडे साहेब आले पुणियास त्यास फराळास वगैरे काही पाठवावे त्यास आपले सलेस आले तरी पाठवू" यावर "पाठवावे" अशी ग्रँटची आज्ञा आहे.[२२]

ग्रँटशीं कांहीं बाबतींत झालेलीं प्रश्नोत्तरें नोंदविलीं जात. उदाहरणार्थ ग्रँटनें विचारलें, "फिर्यादी कमी आहेत कीं नाहीं" "कमी आहेत उत्तर केलें" "काम कसे चालते पुसले." "दस्तूरमाफक चालते सांगितले." "पंचाईत प्रकर्णी यादी तयार आहेत की नाहीत," "आहेत म्हणून सांगितले."[२३]

विठोबा दिवाणानें काय कामें करावीं याची एक मोठी यादी-२० कलमांची दिली आहे. हींत घाटावर चौकी बसविणें, रयतेला त्रास देणाऱ्या रामोशांना शासन करणें, तोफखान्याकडील अधिकारी किती ठेवावेत, घाटावर ठेवावयाचे कारकून, कचेरीच्या वाड्यावरील पहारेकरी कोणत्या बाजूस किती ठेवावेत आणि दर पाहऱ्यांत किती शिपाई असावेत, कंपनी सरकारच्या बागेंतील भिस्ती, नोकर यांच्या नेमणुका, दिवाण, चिटणीस, फडणीस याकडे प्रत्येकी किती शिपाई असावेत, त्यांची बदली केव्हां करावी, शिबंदीची तैनात इत्यादि विविध विषयांवर आज्ञा दिल्या आहेत.[२४]

साताऱ्याच्या राज्यांत त्यानें कांहीं नवीन प्रथा सुरू करण्याचा उपक्रम केला होता. महाडीक, थोरात इत्यादि वतनदारांना त्यानें खानेसुमारीबाबत खलिते पाठविले आहेत. "हर येक तालुक्यातील घरे व माणसे व गुरे वगैरे किती आहेत याचा झाडा घ्यावयाचा दस्तूर कुपणी सरकारात आहे याकरितां नमुन्याप्रमाणे श्रीमन्माहाराज छत्रपति साहेब यांचे इलाख्यांतील झाडा तयार करून पाठविण्याविसीं लिहिले......... तरी नमुना आधी समजून घेऊन वीस दिवसांत झाडे तयार करून देवावे."[२५]

२० अ. डेक्कन कॉलेज रु. ५५ फा १२. २८ ता. ७-९-६७ २१. डेक्कन कॉलेज रु. ५५ फा १२ : १३.२२. डेक्कन कॉलेज रु. ५५ फा १२ : १८. २३. डेक्कन कॉलेज रु. ५५ फा १२ : २९. २४. डेक्कन कॉलेज रु. ५५ फा १२ : २५. डेक्कन कॉलेज रु. ५५ फा १२ : ४,१९.

पेशवे दप्तरांत ग्रँट साहेबाच्या कारकिर्दीतील जीं पुडकीं आहेत त्यांत पेव्यांकडून जमा होणारा वसूल, निरनिराळ्या कारखान्यांच्या कामावर कोणकोणते लोक नेमले त्यांतील सुतार, गवंडी इत्यादि कारागिरांच्या कामाचीं हजेरीपत्रकें, त्यांचे पगार इत्यादि याद्या आहेत. पेव्यांतून आलेल्या रकमेची पावती इंग्रजी–मराठी भाषांतून आहे. या पावतींत साल गुदस्त आणि साल मजकूर असे दोन भाग असून त्यांचे तपशील दिले आहेत. तसेंच किती प्रकारचे रुपये किती आहेत–मलकोरे, चांदवड, छापी चांदवड, मध्यम छापी, फुटके चांदवड आणि खुर्दा किती याचा तपशील आणि शेवटीं खजांची आणि सराफ यांच्या सह्या आहेत. ही पावती पाहिल्यावर, पैसे भरल्याची आज बँकेतून जी पावती मिळते तिची आठवण होते.

या खेरीज ३१४ मोठी बारनिशी बुकें असून त्यांत सरकारांतून गेलेल्या पत्रांची नोंद आहे. उदाहरणार्थ बाजीरावाच्या एका सैनिकाला येथें समज दिली आहे कीं, धन्याचा पराभव झाला तरी तू अद्याप कंपनी सरकारांत कां रुजूं झाला नाहींस इ०

चार वर्षें साताऱ्याचा राज्यशकट हाकल्यानंतर ग्रँटनें निरवानिरव करण्यास प्रारंभ केला. राजाच्या कारभारावर त्याचें बारीक लक्ष होतें. त्याच्याकडे सर्व सत्ता देण्यास हरकत नाहीं अशी त्याची खात्री झाली. प्रस्तुत संदर्भांत प्रतापसिंहाशीं त्याची झालेली चर्चा विस्तृतपणें रोजनिशी क्रमांक ४१५ मध्यें आली आहे.

ग्रँट गेल्यानंतर आपलें कसें होईल याची चिंता राजास वाटूं लागली. ग्रँटनें त्याची समजूत घातली कीं आम्ही लिहून ठेऊं "जो वकिलीस सातारा येथे साहेब लोक येईल त्यास साहा महिने वहिवाट पाहून आमी समजून देऊन मग जाऊ व पुढे वहिवाट राहील त्याणे तसी करणे.[२६]

राज्य हवालीं कसें करावें याचा मसुदा त्यानें राजाकडून करून घेतला व तो कमिशनर च्यापलिनकडे पाठविला. जहागीरदारांच्या बाबतींत राजानें घातलेलें कलम कंपनीनें मान्य केलें नाहीं. तथापि दि. ५ एप्रिल १८२२ रोजीं सातारच्या रंगमहालांत कचेरी होऊन च्यापलिन, ग्रँट, मॅकलोड, मॉरिस इत्यादि अधिकाऱ्यांच्या उपस्थितींत बाळाजीपंत नातूनें " राज्य माहाराजाचे हवाली केल्याचा जाहीरनामा वाचिला नंतर सिकेदऊत व मोर्तब ग्राट साहेबानी आपले हाती उठोन महाराजांचे हातो दिल्ही. " आणि नंतर सर्वांना यादीप्रमाणें पोशाख वाटून सत्तांतराची क्रिया पूर्ण झाली.[२७]

दि. २७ नोव्हेंबर १८२२ रोजीं ग्रँटनें महाराजांचा निरोप घेतला आणि उपदेशाचे चार शब्द सांगितले, " येथे कोणी येईल त्यावर भरवसा ठेवावा म्हाराजांनी व जे म्हाराज करणे ते साफ बोलावे व येक बोलून येक तरेने न करावे. " इत्यादि.[२८]

---

२६. रो. क्र. ५ पृ. १३४. २७. डेक्कन कॉलेज रु. ५५ फा. १२ : १४. २८. रो. क्र. ६ पृ. २११.

ग्रँटला कांहीं चीज याददास्तीकरितां द्यावी असें महाराजांच्या मनांत फार होतें. त्यांनीं एक तरवार देऊं केली असतां, साहेब लोकाचा दस्तूर कांहीं घेण्याचा नाहीं असें सांगून त्यानें त्याचा इन्कार केला.[२९]

इतिहासलेखन

एल्फिन्स्टनच्या प्रेरणेनें इतिहासलेखनाचें कार्य ग्रँटनें हातीं घेतलें. पेशवे दप्तर खंड ४२ मधील उतारे इतिहासाची जुळवाजुळव करण्याचे कामीं ग्रँटनें केलेल्या परिश्रमाची ग्वाही देतात. डेक्कन कॉलेजांतील सातारा दप्तरामध्यें एक अपुरा जाहीरनामा आहे. त्यावर तारीख नाहीं. कागद नकल असल्यामुळें त्याची अस्सल पुराव्यांत गणना करतां येत नसली, तरी त्यांत आलेल्या मजकुरावरून आणि ग्रँटनें नंतर केलेल्या कामगिरीवरून असें वाटतें कीं, हा जाहीरनामा ग्रँटनेंच काढला असावा. तो असा— " जाहीरनामा माहाराज मंडळ हुजुरून समस्त लोकास समजावे याकरिता आज्ञा केली जाती जे बखर व कैफियत व ताम्रपत्रे व जुने सनदा वतनपत्रे व इनामपत्रे वगैरे व मुलकाचे हकीकतीसुद्धा मराठे अक्षराची व पारसी व बालबद्ध व संस्कृत व हिंदुस्थान्यातील व जुने हिंदी राज्यातील व बदर पादशाही व निज्यामशाही व इदलशाही राज्यातील व सिवाजी माहराजाचे राज्याचे कारकिर्दीतील व संभाजी महाराज व राजा ...... "[३०] इतक्या स्पष्ट आज्ञा ग्रँटशिवाय दुसरा कोण देणार ?

इतिहासाकडे पहाण्याची ग्रँट डफची दृष्टी शास्त्रशुद्ध होती असें अनुमान पेशवे दप्तर ४२ व्या खंडांत प्रतापसिंहाच्या डायरींतील जे उतारे प्रसिद्ध झाले आहेत तसेच जे अद्याप अप्रकाशित आहेत त्यांवरून काढावयास प्रत्यवाय नसावा. ग्रँट डफच्या इतिहासांत दोष राहिले असतील तर ते प्रमाणभूत साधनांच्या अभावामुळेंच होय असें म्हणावें लागेल. प्रतिनिधिपद केव्हां सुरु झालें ? मोकासा, चौथाई व सावोत्रा, जाहगीर इत्यादि वाटणीचे प्रकार कसे आहेत ? अष्टप्रधानांचें वेतन काय ? तें नख्त कीं सरंजाम होतें ? स्वराज्य म्हणजे काय ? सरदेशमुखी अमल जुना कीं नवा ? इत्यादि अनेक प्रश्न ग्रँट बळवंतराव चिटणीसांना पुसत असे व त्यांनीं उत्तर दिलें म्हणजे " दाखला " दाखवा असें म्हणे. आवा पारसनिसाकडून पारसी कागदाच्या नकला करून घेई. सरदेशमुखी, बाबती, चौथाई यांचा दस्तूर सर्वत्र सारखा नसल्यामुळें आणि फडणीस अथवा चिटणीस यांनीं दिलेलीं स्पष्टीकरणें समाधानकारक नसल्यामुळें " फार फिकीर आहे, कोणी पुरा माहीत बुढा आहे की नाहीं शहरांत " अशी ग्रँट पृच्छा करतो. यावर " अमल का बुढा " मिळाला नाहीं तर त्याचा काय उपयोग म्हणून पारसनीस चालढकल करूं पाहतो.

चिटणीस, ग्रँट डफ आणि बाळाजीपंत नातू यांच्यामध्यें सरदेशमुखीबाबत झालेली चर्चा उद्बोधक आहे. ग्रँटनें विचारलें " सरदेसमुखी अमल जुना की नवा ? " यावर चिटणीसांनीं सांगितलें कीं, " जुना शिवाजी माहाराजापासून आहे. " ग्रँट डफची विचार-

२९. डेक्कन कॉलेज रु. ५५ फा. १२ : ११. ३०. डेक्कन कॉलेज रु. १ फा. ६ : २४.

पद्धति बाळाजीपंतानें जणूं आत्मसात केली होती. तो चिटणीसास विचारतो, " यास आधार काय ? " त्यावर जुनी याद आणि फर्मान पाहून चिटणीसांनीं वाचून दाखविलें, " सरदेसमुखी, चौथाई **साधले** त्याचें फर्मान करून आणावें. "

यावर बाळाजीपंतानें चटकन् चिटणीसाला दुरुस्त केलें, " **साधेल** म्हणा **साधले** असें म्हणूं नका. मात्रा **ध** वर द्या **ल** वर देऊं नका. "[31]

कागदपत्र मिळविणें, त्यांच्या नकला करवून घेणें, बखरीचें इंग्रजी भाषांतर करवून घेणें या बाबतींत ग्रँटनें जे अविश्रांत परिश्रम केले आहेत त्यावरून आपला इतिहास पक्का करण्याचा त्याला कसा ध्यास लागला होता याची कल्पना येईल. रायगडाच्या वेढ्यांत (इ. १६८९) सगळे जुने कागद पादशहानें हस्तगत केले या चिटणीसाच्या उत्तरानें त्याचें समाधान झालें नाहीं. किती तरी प्रश्नांचा त्याला नीट उलगडा झाला नव्हता. शाहू महाराज दिल्लीहून कधीं आले ? बाळाजीपंत पेशवे सनदा आणण्यासाठीं दिल्लीस एकटेच गेले कीं त्यांजबरोबर आणखी कांहीं सरदार होते ? बाळाजी विश्वनाथ आंग्रे याजवर मुलूख घेण्यास चालून गेले तेव्हां प्रतिनिधी कोण होते ? प्रतिनिधीपद वरिष्ठ असेल तर ते कां गेले नाहींत ? चंदरराव मोरे याचे बापाचें नांव काय ? शाहूच्या कुत्र्यानें कोणत्या रानांत आणि केव्हां वाघ मारला म्हणून त्याला पालखीची नेमणूक करून दिल्ही.[32] इत्यादि एक ना दोन, अनेक प्रश्न ग्रँटला सतावीत होते आणि त्यांची उत्तरें शोधून काढण्याचा त्यानें कसोशीनें प्रयत्न चालविला होता.

इतिहासाचीं साधनें कोणतीं अव्वल दर्जाचीं व कोणतीं कमी प्रतीचीं याची त्याला पूर्ण जाणीव होती. बखर हें एक इतिहासाचें साधन असलें तरी संपूर्णतया त्यावर विसंबून राहून इतिहास लिहितां येणार नाहीं हें तो जाणत होता. चिटणीसाला तो म्हणतो, " बखर केली परंतु सारी माहाराजाची बढती. चांगलेच लिहिले. येखादे वेलेस वाईट चालले आसते तरी लिहिले नाहीं तेव्हा संषय येतो. सारेच चांगले असते असे नाहीं." असें असलें तरी फारसी तवारिखापेक्षां मराठी बखरी त्याला जास्त प्रमाणभूत वाटतात. "मुसलमान लोकांनी तारीफ करून किताब लिहिली ती लबाड फार. हिंदूचे लिहिणे निम्मे खरें व निम्मे खोटे याप्रमाणें आहे. " असें म्हणून त्यानें नारायणराव नांवाच्या माणसास बखरीचें इंग्रजी भाषांतर करण्यास नेमलें होतें व बळवंतराव पारसनीसाला विचारून जुनीं टांचणें पाहून भाषांतर करावें[33] अशी त्याला आज्ञा दिली होती.

कागदपत्र हेंच इतिहासाचें खरें प्रमाणभुत साधन होय हें तो जाणून होता आणि म्हणूनच बाळाजीपंताकडे त्याचा सारखा लकडा सुरू होता कीं, महाराजाकडून कागद पत्र मिळवा. कागदपत्राचे बस्ते देण्यास महाराज नाखूष होते. फडणीसानें जेव्हां सांगितलें कीं, पारसनीस आपल्या घरीं अथवा वाडियात बसून, मुनसीला बरोबर

---

३१. पे. द. ४२ पृ. १८ – १९. ३२. पे. द. ४२ पृ. २८. ३३. पे. द. ४२ पृ. २७–३१

घेऊन साऱ्या कागदांच्या नकला करून देतील तेव्हां त्याला मनस्वी राग आला. तो म्हणतो, "इतका संशय का ? पाहिजे तरी आम्ही हर बस्त्यावर मोहर करू अथवा तुम्ही करा, इ०" ग्रँटनें असा रुद्रावतार धारण केल्यामुळें त्याच्याकडे गुंतलेले कागद परत कसे आणावयाचे याची साऱ्यांना चिंता होती. आबा पारसनीसच लिहितां लिहितां युक्ती प्रयुक्तीनें कांहीं कागद आणतील तर बरें असें साऱ्यांना वाटूं लागलें. मिळालेल्या बस्त्यानें ग्रँटचें समाधान झालें नव्हतें.

बाळाजीपंत नातूस तो सांगतो कीं, महाराजापाशीं अथवा चिटणीसापाशीं आणखी कांहीं कागद असतील असा संशय येतो, त्याचा पुर्ता शोध फडणीसाकडे करावा. यासंबंधीं विचारलें असतां फडणीस कानावर हात ठेवतो. तदनंतर "माहाराज, फडणीस, चिटणीस आणि बाळाजीपंत बसून तावदानाचे खोलीत बोलणे झाले." प्रारंभीं पावसापाण्याच्या गोष्टी झाल्यानंतर खलबतें झाली आणि महाराजांनीं निक्षून सांगितले, "ग्रँटविषयी आमच्या मनांत कांहीं संशय नाहीं. दोस्ती झाली तेथें संशय कसला ? जे होते ते सारे दिले. यापरते नाही." बाळाजीपंतानें चिटणीसाला दमदाटी करून पाहिलें, "आणखी एखादे समई निघालियास नीट नव्हे ?" महाराजांचीं आर्जवें केलीं, आमिषें दाखविलीं. "सारे कागद पाहून छाप्यात छापून विलायतेस जाईल. सर्वांस महाराजाचा पराक्रम राज्ये वगैरे जाहीर होईल याकरिता करितात." तरी पण प्रतापसिंहानें आपलें म्हणणें सोडलें नाहीं.[३४]

महाराजांनीं आपल्या सर्व अधिकाऱ्यांना ताकीद दिली होती कीं "कागद ग्रांटास दाखवून, न ठेवतां माघारे आणावे आणि न्याहाल त्याची यादी लेहून सेरा मारून घेऊन जाणे."[३५] चिटणीसांनीं पुरविलेल्या माहितीचा आपण संपादन केलेल्या माहितीशीं मेळ बसत नव्हता, म्हणून चिटणीसास तो सतत प्रश्न विचारूं लागला. प्रतापसिंहानें चिटणीसास सांगितलें, "जे पुसतील माहितगारी ते बखर दिल्ही या आधारावरच धरून बोलावे. जे पूर्वीपासून माहीत आहे ते असे आहे. मग तुमचे लिहिले असेल ते खरे म्हणावे. आग्रह करू नये. जबरदस्तापुढें आग्रह करून कामाचा नाही व आग्रह, सिध्ध करून फल होते असे नाही. होणार ते होईल व कागद आणखी आहे, पुसतील तरी नाही म्हणावे. हे दोन जाबसालानी उतरे करावी. रिकामा विच्यार विवंचना घोर करून लभ्ये नाही. समयेपरत्वे होय म्हणत असावे."

ग्रँटच्या इतिहासाच्या कामांत बाळाजीपंत नातूची त्याला बरीच मदत झाली असावी. बाळाजीपंतानें आपणांस ऐतिहासिक माहिती लिहून दिली व तिचे इंग्रजी भाषांतर आपण करवून घेतलें असें ग्रँटनें आपल्या इतिहासांत नमूद केलें आहे[३६]. त्याचा बराच उपयोग त्यानें करून घेतला असला पाहिजे. बाळाजीपंतास "बखर पावली

---

३४. पे. द. ४२ पृ. २३-२६ ३५. पे. द. ४२ पृ. ३०. ३६. History of the Marathas by Grant Duff (1921) Vol. II Foot note p. 470.

बहुत मेहरबानगी झाली पाहून परत पाठवू " अशा आशयाचें पत्र पाठविण्यासंबंधीं त्यानें चिटणीसांना सांगितलें होतें.[३७] ही बखर म्हणजेच बाळाजीपंतानें तयार केलेला मराठ्यांचा इतिहास असावा.

इतिहासलेखनाच्या कामीं एलफिन्स्टननें त्याला केवळ प्रेरणाच दिली नाहीं तर आवश्यक तें सहाय्य केलें. दि. २१ मार्च १८२२ रोजीं ग्रँटला लिहिलेल्या एका पत्रांत तो म्हणतो, " तूं पाठविलेलीं तीन प्रकरणें मी अपेक्षेपेक्षां जलद वाचून संपविलीं. तीं वाचून मन प्रसन्न झालें. इतिहासलेखनाच्या तुझ्या शैलींत पूर्वीपेक्षां खूपच सुधारणा झाली आहे. संथ आणि प्रौढ अशी लेखनशैली तू संपादन केली आहेस. पूर्वी तुझ्या शैलींतील जे दोष मी दाखविले होते ते आतां नाममात्रही राहिले नाहींत."[३८] त्यानंतर १ महिन्यानें म्हणजे दि. २०।४।१८२२ ला पाठविलेल्या पत्रासोबत एलफिन्स्टननें आपली राजारामासंबंधींचीं टिपणें आणि इतिहासलेखनासंबंधीं कांहीं सूचना पाठविल्या " असंख्य अशा असंबद्ध बखरी आणि फुशारकी मारणाऱ्या तवारिखा यांच्यामधून घटनांचें संपादन करून त्यांची चातुर्यानें मांडणी करून त्यांतून एक सुसंगत आणि सयुक्तिक (Rational) असा इतिहास निर्माण करणें, हें काम कठीण आहे आणि तें तूंच एकटा करूं शकशील असा मला भरवसा आहे. प्रसंगीं तुला कल्पनेचा आधार घ्यावा लागेल. तेव्हां आपल्या मनांतील शंका व्यक्त करण्यासाठीं, ' बहुधा ' (probably) " वर-करणी " (apparently) अथवा अशा आशयाचे शब्दप्रयोग तुला वापरावे लागतील; अर्थात् या वाक्प्रयोगांचा तू अतिरेक करतां कामा नये. जे उघड आहे, सूर्य प्रकाशा-इतकें स्पष्ट आहे तें सांगू नये. या दोन्हींचा मध्य साधणें यांतच इतिहासकाराचें कौशल्य आहे. "[३९]

दुसऱ्या एका पत्रांत (दि. २७।४।१८२२) पुणें, हैद्राबाद आणि कलकत्ता येथील दप्तरांत मराठी इतिहासाला उपयुक्त अशी कोणती साधनसामग्री सांपडेल याची एक मोठी यादी एलफिन्स्टननें त्याला दिली होती असा उल्लेख आहे.[४०]

थोडक्यांत, साताऱ्याचा रेसिडेंट म्हणून काम करीत असतांनाच मराठ्यांच्या इतिहासाच्या सामग्रीचें संपादन व जुळवणी आणि कांहीं कच्चें लेखन ग्रँटनें केलें असलें पाहिजे असें म्हणावयास हरकत नाहीं. इ १८२२ च्या अखेरीस त्यानें आपलें घर गांठलें आणि मराठ्यांच्या इतिहासाला सर्वस्वी वाहून घेतलें. इतिहासलेखनाचें काम हातावेगळें केल्यानंतरच म्हणजे इ. १८२७ सालीं वयाच्या ३८ व्या वर्षी त्यानें लग्न केलें. एलफिन्स्टनला ग्रँटच्या कामाबद्दल इतका आत्मविश्वास वाटत होता कीं, इ. १८२२ सालीं कर्नल क्रोजला लिहिलेल्या पत्रांत तो म्हणतो, " त्याचा ग्रंथ अत्युत्तम ठरेल. "[४१]

---

३७. डेक्कन कॉलेज रु. ५५ फा. १२ : २९ दिनांक ८–९–१८२२. ३८. Colebrooke Vol. II p. 157. ३९. Ibid p. 137–38. ४०. Ibid p. 137–38. ४१. Ibid p. 140.

इ. १८२६ सालीं ज्या ग्रंथाला प्रकाशक मिळत नव्हता, त्या ग्रंथाच्या पुढें सहा आवृत्त्या निघाल्या आणि मराठ्यांच्या इतिहासकारांत ग्रँटला महत्पद प्राप्त झालें.

ग्रँट डफच्या एकंदर कारकिर्दीचा विचार केला असतां असें वाटतें कीं, २९ वर्षांचा हा तरूण अधिकारी शासनांत चांगलाच वाकबगार होता आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा इतरांवर उमटविण्याची कला त्याला चांगली साध्य झाली होती. सरदेसाई म्हणतात त्याप्रमाणें तो एक सामान्य ब्रिटिश लश्करी शिपाई[४२] (a raw British soldier) निश्चित नव्हता. साताऱ्च्या राजाचा आणि जनतेचा त्यानें चांगलाच विश्वास संपादन केला होता. ग्रँट साहेबाचें नांव आजहि सातारा जिल्ह्यांतील लोकांच्या तोंडीं आहे (a household name)[४३] असें जें पारसनिसांनीं म्हटलें आहे तें वस्तुस्थितिनिदर्शक आहे असें म्हणावें लागेल. एक कुशल प्रशासक आणि जाणता इतिहासकार म्हणून ग्रँटनें मानाचें स्थान पटकाविलें आहे.

---

११ निवृत्तिनाथांचीं स्फुट प्रकरणें व ग्रंथ

(श्री. ज. शा. देशपांडे, मुंबई)

महाराष्ट्रांतल्या अलौकिक विभूतींमध्यें निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव व मुक्ताबाई या चार भावंडांची गणना प्रामुख्यानें होते. त्यांचे मानले जाणारे अभंग मिळतात, पण त्यांची भाषा अर्वाचीन असून, निश्चित पाठ नाहींत व अनेकांनीं अभंग तयार करून त्यांत घुसडलेले दिसतात. यामुळें या चौघांचे खरे अभंग असल्यास ते कोणते, हें ठरविणें कठीण झालें आहे. ज्ञानेश्वरांचे यादवकालीन भाषेंत ज्ञानेश्वरी व अमृतानुभव हे ग्रंथ उपलब्ध आहेत. ज्ञानेश्वरींत जागोजागीं निवृत्तिनाथांचा आदरपूर्वक उल्लेख येतो. ज्ञानेश्वरांना गुरुस्थानीं असणारी व्यक्ति सामान्य असणें अशक्य आहे. निवृत्तिनाथांनीं ग्रंथरचना केली होती कां, अशी शंका सहज येते. याबद्दल शोध करतांना निरनिराळ्या हस्तलिखितांबद्दल मिळालेली माहिती खालीं दिली आहे.

निवृत्तिप्रसादः—धुळें येथें श्रीसमर्थवाग्देवता मंदिरांत बाडांक १२८३ मध्यें पृष्ठ ३१, ३२ वर १० संस्कृत श्लोक मराठी श्लोकानुवादासह आहेत. त्यांची सुरवात अशी आहेः—

निवृत्तिप्रसाद ४३ ॥ अ ॥

---

४२. New History of the Marathas by G. S. Sardesai, Vol. II p. 510. ४३. भारतवर्ष अं. १७।१८.

श्लोक--रक्तपीतश्च श्वेतश्च । श्वेतसमश्च कर्बुरं । रक्तश्याम तथा नीलं । कृष्णयुक्तं सुनीलजं ॥

टीका--रक्त आणि पीत । हा वर्ण एकांगभूत । तो अकार रजोगुणयुक्त । स्थूल देह हा ॥ १० ॥

४३ अध्यायांपेक्षा अधिक अध्यायांचा हा ग्रंथ असावा. श्लोकांची भाषा अर्वाचीन असल्यानें हा ज्ञानेश्वरबंधु निवृत्तिनाथ यांचा ग्रंथ नाहीं हें उघड दिसतें.

निवृत्ति अवधूतकृत परमप्रकाश अथवा ज्ञानबोधः--

वरील संस्थेंत बाडांक २५८ मध्यें परमप्रकाश हें ८५ ओव्यांचें प्रकरण आढळतें. ते इ. १८९४ (मे व जून) मध्यें काव्यसंग्रहांत प्रकाशित झालें. " यावरी गुरुने सीश आळंगिला । सीश आनंदें बोधला । ते ज्ञान अनुवादला । निवृत्ति अवधूत ॥ ८४ ॥ सद्गुरुकृपाप्रसादें । वाचा प्रकाश आनंदें । ते सुख अनुवादे । निवृत्ति अवधूत ॥ ८५ ॥ " असा त्याचा शेवट होतो. हेंच प्रकरण बाडांक ४२० मध्यें थोड्या फरकानें ' ज्ञानबोध ' या नांवानें आढळतें. " श्रीगुरुआनंदचैतन्यप्रसादें । वाचा प्रकाशिली स्वानंदें । म्हणोनि मी आत्मसुखें अनुवादे । परात्पर अनुपम्य जें ॥ ८३ ॥ " असा त्याचा शेवट आहे. हे निवृत्ति अवधूतनिवृत्तिनाथ नव्हेत, यांत शंका नाहीं.

पंचपदी प्रकरण व अन्य ओव्याः--

' पंचपदी ' हें छोटें प्रकरण व इतर कांहीं स्फुट ओव्या पुणें येथील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या बाडांत आढळल्या. त्यांची भाषा अर्वाचीन आहे.

निवृत्तेश्वरी, निवृत्तिदेवी इत्यादि नांवांच्या गीताटीका :—ह्या निवृत्तिनाथांच्या नांवानें आढळल्या. या ग्रंथांचें परीक्षण करतांना विचित्र स्थिति आढळते. हे निरनिराळे एकाच कविनामाचे ग्रंथ पूर्ण भिन्न असून एकाचें दुसऱ्याशीं साम्य नाहीं. त्यांची माहिती खालीं दिली आहे :—

(१) **निवृत्तिटीका**— भारत इतिहास संशोधक मंडळ बाड २२।१०१ या पोथीला १, २९ व ३२, ४२ पानें नाहींत. ग्रंथ ११३९ ओव्यांचा होता. शक १५८३ हा नकलेचा काल असावा. भाषा यादवकालीन नाहीं, तरी जुनी आहे. ओव्या बहुतेक साडेतीन चरणी आहेत. पान ४३ वरील व शेवटच्या कांहीं ओव्या नमुन्यादाखल दिल्या आहेत.

पान ४३— मन बुधी ठेउनीया माझा ठाई । परस्परे प्रतिबोधा पैं । गुणकीर्तनी संतोसोनी देही । रमत मजसी ॥ ५१ ॥ ते मजसी सतत युक्त । प्रीतिपूर्वक मातें भजत । तयासी मी बुधीयोंमृते देत । जेणें पावति मातें ॥ ५२ ॥ तैसीया कृपा करुनी । अग्यानतमातें नाशुनी । तयाचीया ग्यानादीपातें प्रकासौनी । दें गा अर्जुना ॥ ५३ ॥ तंव अर्जुनु म्हणे जी परब्रम्हा । आगा पवित्रा परमाध्यामा । सकळासी परुतू पुरुशोत्तमा । दीव्य-

स्वरूपा ॥ ५४ ॥ तुं शाश्वतु स्वयंतु । जन्मविरहितु अमरकंदु । तु समस्तांचा रावो प्रभु । आदिवंतु तुंची ॥ ५५ ॥ तुवां यैसे बोलीले । जे हे सकळै मजपासुनी जाले । देवरुशी नारदादी जीतुले । मुक्त करुनी ॥ ५६ ॥ हे सकळै देख । मजपासुनी असेष । यैसें सांगितले व्यापक । देवराया ॥ ५७ ॥

शेवट— तुझें वचन मज । कारण असे नीज । दासु मी अनुसरुलु तुज । सर्वभावें ॥ ३५ ॥ यैसे संजय बोलीले । जें देवें अर्जुनाप्रति निरोपिलें । आइकोनि मन कां ढळलें । सर्वांगीं देखा ॥ ३६ ॥ व्यासांचेनि प्रसादें । जे परम गुज सांगितलें गोविंदें । यौगेस्वरें परमानंदें । साक्षात आपन ॥ ३७ ॥ राया कासीया सांगो मागुती । या संवादाची अद्भुत गती । श्रीकेशवे अर्जुनाप्रती । निरोपिले जें ॥ ३८ ॥ येया संवादाचा हरीषु । वेळोवेळा येतुसे अधीकु । सांगता जाला वीश्वव्यापकु । अर्जुनाप्रती ॥ ३९ ॥ इति श्रीभगवद्गीता । श्रीकृष्णरावो नीरोपिता । शुभाशुभकर्मवेवस्ता । अठराध्याई ॥ छ ॥ इति श्रीनिव्र (ति) टीका ग्रंथ संपूर्ण ॥ शुभं भवतु ॥ ग्रंथसंख्या वोवीया तौ ॥ ११३९ यादृशं पुस्तकं अिसंवत् १७१८ शक १५८३ प्लवनाम संवस्तरे उत्तरायणे वसंतऋतौ महामांगल्यप्रदे फाल्गुनमासे कृष्णपक्षे तिथी २ सोमे नानथा ग्रामे ग्रंथ समाप्त जाला ॥छ॥

(२) निवृत्तिदेवकृत भगवद्गीताटीका—धुळें येथील श्रीसमर्थवाग्देवता-मंदिरांत बाडांक ३५० मध्यें या टीकेचे १ ते ८ अध्याय असून बाडांक २११७ मध्यें सर्व अध्याय आहेत. प्रथम अध्याय ' रामदास व रामदासीं ' वर्ष ३५ मध्यें अलीकडेच प्रकाशित झाला. टीकेचा आरंभ " पहिला नमु ईश्वरु । जो गिरिजेचा मनोहरु । तो परमपदाचा दातारु । शूलपाणी ॥ " या ओवीनें होत असून, " आतां श्रीमत भगवद्गीतेचा अभिप्रावो । मऱ्हाटीया करीन प्रस्तावो । विनवीतसे निव्रत्तिदेबो । यथामति त्या ॥ (३०) या ओवींत निव्रत्तिदेवांचें नांव येतें. बाडांक ३५० मधील अक्षरांचें वळण जुनाट आहे. अध्याय ८ मधील कांहीं ओव्या (संस्कृत श्लोक उद्धृत केले नाहींत) पहा. :—

" शुक्लपक्षी होये गती । नाहीं त्यास पुनरावृत्ती । कृष्णपक्षी अवगती । पुनरावृती होये ॥ ५२ ॥ यैसी शुक्लकृष्णगती । जगत्रई शाश्वत मती । आगा हे नेणतीच नीरुती । श्रुतीमतें पै ते ॥ ५३ ॥ म्हणोनि तो श्रुतीमतान्येनि पार्था । योगीया मोहाते न पवे सर्वथा । त्याकारणे सर्वकाळी योगयुक्ता । तूं होये अर्जुना गा ॥ ५४ ॥ वेदयज्ञ दान आणि ते पुण्ये । करितील फलभोगरुपें । तैसीया प्राणियाचेनि दीपे । योगी दीपेना तो ॥ ५५ ॥ सकळै सांडुनी कामना । तुवा भआवेआ लागेल अर्जुना । तो योगी पावे परम स्थाना । तेची आम्ही गा ॥ ५६ ॥

ग्रंथाचा शेवट — योगासि स्वामीचा स्वामी म्हणवितु । तो श्रीकृष्णनाथ जेथे आसतु । तेथे धनुर्धर असे पार्थु । तिष्ठत उभा ॥ १६१ ॥ तेथें असे श्री लक्ष्मी विजय । यश निति परमैश्वर्य । हें माझें मत विशेषाकार । एक धृतराष्ट्रा ॥ १६२ ॥ हरिॐ अि

इति श्रीमद्भगवद्गीता । श्रीकृष्णदेवो निरोपिता । समस्त गीता विवर्णता । अष्टादशाध्याई ॥ शके १७३२ प्रवर्तमाने प्रमादनाम संवत्सरे भाद्रपदकृष्णत्रयोदश्यां बुधवासरे तद्दिने भुजंगरावस्यात्मजः सखारामेण लिखितम् ॥

शक १७३२ हा नकलेचा काळ दिसतो. ग्रंथांतील ओव्या बहुतेक साडेतीन चरणी असून जुने शब्द मधून मधून येतात. तथापि भाषा यादवकालीन नाहीं.

पोर्तुगालमध्यें ब्राग येथील ग्रंथसंग्रहालयांत ७७३ क्रमाकांच्या बाडांत असलेली निवृत्तेश्वरी धुळेंप्रतीशी जुळते. यादवकालीन नाही.

(३) तंजावर येथील सरस्वतीमहाल मंदिरांतली 'निवृत्तिदेवी' समश्लोकी पोथीचा प्रारंभ...

धर्मक्षेत्री कुरुक्षेत्री मिळोनी । युद्धवांछा धरूनि मनी । माझे (पुत्र) आणि पांडव जुडोनी । काय करिताति संजया ॥ १ ॥ देखोनि पांडवसैन्य सुरचित । आचार्याप्रति जाउनि त्वरित । राजा दुर्योधनु यथोचित । बोलता जाला ॥ २ ॥ राजा म्हणे पाहे पां । आचार्याइते सुरचित। पांडवसेनेते द्रुपदपुत्रे । श्रीमंतें तुझियेनि शिष्यें ॥ ३ ॥ अती शूर महाथोर । भीमार्जुनसम वीर । युयुधान विराट युद्धचतुर । द्रुपदु महारथी ॥ ४ ॥ धृष्टकेतुश्चेकितान । कासिराजा वीर्यवंतु जाण। पुरुजित कौतिभोज आपण । शैब्यु नरश्रेष्ठ ॥ ५ ॥ युधामन्यु आणि विक्रांत । उत्तमौजा बळिवंत । सौभद्र द्रुपदपुत्र । आद्यंत सर्वही महारथी ॥ ६ ॥ आमचे विशिष्ट आइके द्विजोतमा । नायक सैन्याचि महिमा। ते संज्ञार्थे करूनि तुम्हा । सांगेन देखा ॥ ७ ॥ तुं आणि भीष्म कर्ण कृपाचार्या । अश्वत्थामा विकर्ण गा आचार्या । सोमदंती महावीर्या । मध्ये श्रेष्ठ ॥ ८ ॥ आणि माहाशूर बहूत । मजकारणे त्यक्तजीवित । नानाशस्त्रे सोड्र जाणत । युद्धी कुशल जे ॥ ९ ॥ आमचे भीष्म सैन्य रक्षील नेमें । पांडवसैन्य रक्षिलें भीमें । म्हणोनि ते अधिकाक्रमे । श्रीकृष्णाश्रये ॥ १० ॥

शेवट--हा तुझा माझा संवादु । याचा करिता अनुवादु । त्यानें ज्ञान होये सच्चिदानंदु । योजिले होये ॥ ७० ॥ अनुसोई आणि श्रद्धापरु । याचे श्रवण करी जो नरु । तो मुक्तु आणि सदाचारु । गतिते पावे ॥ ७१ ॥ हा उपदेशु तुवां आइकिला । येकाग्रे मनी धरिला । तरि तुझा मोहो असका नासला । हृदयातिला ॥ ७२ ॥ अर्जुना म्हणे गोपाळा । स्मृति जालि मोहो नासला । अच्युता माझा संशयो गेला । तुझा बोलु करीन मी ॥ ७३ ॥ संजयो धृतराष्ट्राते बोले । देवे अर्जुनासि निरोपिलें । यैकोनिया हर्षे कांटाळले । सर्वांग तयाचे ॥ ७४ ॥ व्यासप्रसादें आइकिलें । जे का परमगुह्य बोलिलें । योगेश्वरें कृष्णे तलें । आपण स्वयें ॥ ७५ ॥ राया काय सांगो मागुति । मागुति या संवादाची स्थिति । कृष्णार्जुन पुण्यमूर्ति । याचा अंश अंश हरुष वाटतो ॥ ७६ ॥ ते स्मरे पुढती पुढती । त्या विश्वरुपाची स्थिती । विस्मयो राजयाप्रति । संतोशे पुनः पुनः बोले

। ७७ ॥ जेथें श्रीकृष्ण योगेश्वरु । जेथ पार्थ धनोर्धरु । तेथें लक्ष्मी वसे निरंतरु । आणि तेथेचि जयो निश्चयेसि मति माझी ॥ ७८ ॥

या पोथींतल्या बहुतेक ओव्या चार चरणी आहेत.

(४) मुंबईमधील एका छापखान्यात एका समश्लोकी गीताटीकेची छापील पानें पडून आहेत. तिच्यामधील ओव्या बहुतेक चार चरणी असून भाषा अर्वाचीन आहे. कांहीं अध्यायांच्या शेवटीं ' निवृत्तिदेव विरचितायां ' असें म्हटलें आहे. ग्रंथाची सुरुवात " धृतराष्ट्र म्हणे संजया धर्मक्षेत्री यया । कौरवपांडव मिळोनिया । तेथ काय करिताती ॥ १ ॥ संजयो म्हणे गा राया । पांडवसैन्य दृढ देखोनिया । दुर्योधनु द्रोणाचार्या । सांगता जाहला ॥ २ ॥ " अशी आहे.

(५) हैद्राबाद येथें उस्मानाबाद वियापीठांत एक निवृत्तिदेवी होती असें समजलें. परंतु तिच्याबद्दल कांहीं माहिती मिळूं शकली नाहीं.

(६) अकोल्याचे प्राध्यापक श्री. म. रा. जोशी यांचेकडील निवृत्तिकृत गीता-टीका शक १७५८ मध्यें रेणुका क्षेत्रापासून दोन कोस असलेल्या बदरी ग्रामी नकललेली आहे. ती व वरील (४) मधील टीका यांत फार थोडा फरक दिसतो व दोन्ही जवळ जवळ एकच आहेत. शेवटचे जादा श्लोक व मधील एकादे दुसरे जादा श्लोक सोडल्यास ही समश्लोकी आहे. हिच्या प्रारंभींच्या ओव्या-" धृतराष्ट्र म्हणे संजया । धर्मक्षेत्रकुरुक्षेत्र ठाया । कौरवपांडव मिळोनिया । तेथे काय करिती ॥१॥ संजय म्हणे रायासि । पांडवसैन्य देखिले परियेसि । राजा दुर्योधन द्रोणाचार्यासी । जाउनि सांगता जाला। ॥२॥ " या असून पहिल्या अध्यायाच्या शेवटीं (४) मध्यें नसलेली ओवी " युद्ध न करी म्हणे अर्जुन । त्यासि संबोधना प्रबोध करी श्रीकृष्ण । द्वितीयोध्याई निरोपण । ऐका म्हणे निवृत्तिराज ॥४९॥ " ही निवृत्तिनाथांचें नांव असलेली ओवी येते. अठराव्या अध्यायाच्या शेवटल्या श्लोकानंतर खालील अधिक ओव्या शेवटीं येतात-" अगाध परमात्मयाची करणी । सकळ शास्त्रमथन करोनी । गीता नवनीत काढोनी । धनंजयासी दिधले ॥१॥ तेणे किरटीस बोध जाला । परब्रह्म मिळणीस मिळाला । आणि सकळ लोका मार्ग सापडला । भवसागर तरावया ॥२॥ अर्जुना जाले समाधान । भगवंत कृपेकरुण । गेले अज्ञान अध:पतन । दिव्य प्रकाश जाला ॥३॥ यालागी महानुभाव महाऋषी । तत्पर गीता अभ्यासी । तेणे पावले ते नेमेसि । अविनाशपद ॥४॥ ऐसा कृपाळु देवाधिदेव । जगी तारावया केला गीताभाव । कल्पांतीचा गर्वभाव । पुनरावृत्ति नाहि तया ॥५॥ "

(७) ज्ञानेश्वरकालीं एक महानुभावीय यक्षदेव अथवा निवृत्तिदेव होऊन गेले. त्यांनीं शक १२२४ मध्यें गीतीटीका लिहिली. तिच्याबद्दल सविस्तर माहिती अद्याप प्राप्त झाली नाही.

वरील सर्व गीताटीकांचें स्वरूप पाहातां त्यांपैकीं कुठलीच ज्ञानेश्वरबंधू निवृत्तिनाथ यांची नाही हें उघड दिसतें. ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ प्रवृत्त करणारे निवृत्तिनाथ स्वतः कनिष्ठ दर्जाची गीताटीका लिहितील हें असंभवनीय वाटतें. ज्ञानेश्वरींत " तीरे संस्कृताचीं गहनें । तोडूनि मऱ्हाटिया केली शब्दसोपानें । रचिली धर्मनिधाने निवृत्तिदेवे " १११९. या ओवीचा निवृत्तिनाथांनीं ज्ञानेश्वरांकडून करविली असा अर्थ लावला जातो. व मागीलपुढील ओव्यांवरून तोच अर्थ सयुक्तिक आहे. इ. स. १४०० च्या सुमारास महानुभावीय चाल्हणशिष्य नृसिंहाच्या संकेतगीतेंत ज्ञानेश्वर, निवृत्तिनाथ, सोपानदेव यांचा कवि म्हणून उल्लेख आढळतो. एकनाथांनींहि भागवताच्या पहिल्या अध्यायांत निवृत्तिनाथांचा कवीश्वर म्हणून उल्लेख केला आहे. त्यामुळें निवृत्तिनाथांनीं कांहीं ग्रंथरचना केली होती कीं काय असा प्रश्न उद्भवतो. मात्र प्रस्तुत संकेतगीता संशोधनपूर्वक छापली गेली नाहीं व तिची छापलेली प्रत पाहतां तिच्यात कांहीं अध्यायांनंतर भाषा बदलून समश्लोकी होते. यामुळें तिच्याबद्दल संशय उत्पन्न होतो. निवृत्तिनाथांनीं कांहीं रचना केली असेलहि; परंतु सध्या तरी त्यांची निश्चितपणे म्हणतां येईल अशी रचना उपलब्ध नाहीं व निवृत्तेश्वरी या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या गीताटीका अर्वाचीन कवींच्या आहेत. तंजावर येथील हुसेन अंबरींत निवृत्तिनाथाच्या गीताटीकेचा जो उल्लेख आहे तो अशाच अर्वाचीन गीताटीकेचा उल्लेख असावा. कदाचित् तो उल्लेख वरील (३) प्रतीचाच असेल.

---

१२. पेशवेकालीन एक सांकेतिक लिपी.

(मेजर ना. ब. गद्रे, पुणें)

इ. १९३२ सालीं पेशवे दप्तरांतील निवडक साधनांचा २२ वा खंड प्रसिद्ध झाला, त्यांत आरंभीं व पृ. १५५ वर इ. १८०९ सालची एका सांकेतिक लिपींतील नोंद श्री. सरदेसाई यांनीं छायाचित्रासह उद्धृत केली आहे. त्यामुळें तशाच इतर नोंदी शोधण्याचा व त्या लिपीचा संकेत उलगडण्याचाहि प्रयत्न प्रस्तुत लेखकानें इ. १९५० मध्यें केला होता. त्यासाठीं इ. १८०५ ते १८०७ दरम्यानच्या व दुसरा बाजीराव यांचे खाजगी खर्चांत खिजमतगार त्रिंबकजी डेंगळे याचे मार्फत झालेल्या सुमारें वीस नोंदी नकलून त्यांचा तक्ता बनविला; त्यांत साम्यवैषम्य शोधून लिपिसंकेत उलगडण्याचा व अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. पण यश आलें नाहीं.

इ. १९६७ जुलै-ऑगस्ट मध्यें तोच धागा पुन्हा पकडून काम चालू केलें. इ. १८०७ ते १८१० च्या आणखीहि पांच खर्चनोंदी सांपडल्या. इ. १८१० तील खर्च खिजमतगार यशवंतराव मैराळ याचे मार्फत झाला आहे. मात्र कोणताच लिपिसंकेत अद्याप उलगडला नाहीं. वार्षिक सुमारें पंचवीस लाखांचे जमाखर्चांत दरसाल दीडदोन

लाख रुपये गडप करणारा हा सांकेतिक खर्च उलगडला तर कांहीं इतिहासवस्तु नक्की हातीं लागेलसें वाटतें.

मुकतीच एक नवीन गोष्ट कळली. श्री. सरदेसाई यांनीं निवडलेल्या खास कागदांत रुमाल एस. आर. ५९ मध्यें 'दुर्बोध लिपींतील पत्रें' या मथळ्याचें सुमारें ५० बंद असलेलें पुडकें आहें. त्यांत अशाच एका सांकेतिक लिपीतील इ. १७९० च्या सुमाराचीं सवाई माधवरावाचे कारकिर्दीतील पत्रें आहेत. खालील संकेतानें उपरिनिर्दिष्टांपैकीं पुष्कळच पत्रांची फोड होते. मात्र वर दर्शविलेल्या दुसऱ्या बाजीरावांचे खर्चनोंदीस तो संकेत लागू पडत नाहीं.

हा संकेत असा :—

मूळ	अ	क	ख	ग	घ	ङ	च	छ	ज	झ
सांकेतिक	क	अ	छ	ज	झ	ङ	ट	ख	ग	घ
मूळ	ञ	ट	ठ	ड	ढ	ण	त	थ	द	ध
सांकेतिक	ञ	च	त	थ	द	ध	ठ	ड	ढ	ण
मूळ	न	प	फ	ब	भ	म	य	र	ल	व
सांकेतिक	भ	म	य	र	न	प	फ	ब	स	ह
मूळ	श	ष	स	ह	ळ	क्ष	ज्ञ			
सांकेतिक	ळ	क्ष	ल	व	श	ष	ज्ञ			

वरील संकेत थोडक्यात असाही देता येईल.

'अ' ची बाराखडी कल्पलेली आहे.

अ　ख ग घ च　ठ ड ढ ण　न प फ ब　ल व श ष

क　छ ज झ ट　त थ द ध　भ म य र　स ह ळ क्ष

ङ, ञ, ज्ञ बदलत नाहींत. वरच्या अक्षरांचीं खालील किंवा खालील अक्षरांचीं वरील हीं एकमेकांचीं मूळें वा सांकेतिकें आहेत.

खालीं हा संकेत लागू पडणारें पेशवे दप्तरांतील एक अप्रसिद्ध पत्र व त्याखालीं त्याची फोड दिली आहे.

॥ श्री ॥

श्रीबाप	**हिज्ञामभा**	**गंरुलबेट**	**पापसठीटा**	**म्बआब**
श्रीराम	विज्ञापना	जंबुसरचे	मामलतीचा	प्रकार
ठबी	**गपीठाबापणे**	**हाअथे**	**याब**	**व्फापुशे**
तरी	जमीदारामधे	वाकडे	फार	ह्यामुळे
फेअ	**मैळफाटी**	**ठयाहठ**	**अेसिफाल**	**ठअबीब**
येक	पैश्याची	तफावत	केलियास	तकरीर
वोईल	**लासपगउबी**	**फाधी**	**गपीढाबाटी**	**पात्र्ब**
होईल	सालमजकुरी	याणी	जमिदाराची	मात्र
बुगुहाठ	**असी**	**ठअबीब**	**अबधाटे**	**प्वधधे**
रुजुवात	केली	तकरीर	करणाचे	म्हणणे
ई	**भाबोमंठाल**	**आदाहे**	**प्वधगे**	**ह्फागलंरणी**
कीं	नारोपंतास	काढावे	म्हणजे	व्याजसंबधी
बुगुहाठ	**वोईस**	**फाटे**	**प्वधधे**	**ई**
रुजुवात	होईल	याचे	म्हणणे	कीं
भाबोमंठी	**लर्ह**	**फेअ**	**मैळफाटे**	**काठव**
नारोपंती	सर्व	येक	पैश्याचे	आतर
तेहिसे	**भावी**	**ठी**	**फाढ**	**ओधाल**
ठेविले	नाही	ती	याद	कोणास
ढाछाहीठ	**भावी**	**दुशळीळेच**	**लाय**	**रोसठो**
दाखवीत	नाही	तुळशीशेट	साफ	बोलतो
ई	**फाढ**	**काप्वाल**	**तुह्नवाल**	**कंठबट**
कीं	याद	आम्हास	तुम्हास	अंतरच
अबाहफाटे	**भलिस्फाल**	**फाढ**	**ढाछहाही**	**प्वधगे**
करावयाचे	नसिल्यास	याद	दाखवावी	म्हणजे
कंठब	**तेहिसे**	**कावे**	**भावी**	**लपगेस**
अंतर	ठेविले	आहे	नाही	समजेल
वे	**जोक्ष्व**	**ठबी**	**वे**	**अबीठ**
हे	गोष्ट	तरी	हे	करीत
भावी	**दुशळीळेच**	**काप्वामाली**	**फेहुभ**	**लर्ह**
नाही	तुळशीशेट	आम्हापासी	येवून	सर्व

नाक्षणे — भाषणे
छर्टहेट — खर्चवेच
तुप्वी — तुम्ही
असपे — कलमे
कावे — आहे
काप्वाल — आम्हास
मावा — पाहा
काप्वी — आम्ही
ढाछहा — दाखवा
हाचधाव — वाटणार
कावेठ — आहेत
फेठ — येत
वगाव — हजार
रोसठो — बोलतो
ढीआधाल — दीवाणास

ठअवीवभीलमधाटी — तकारीरनीसपणाची
लुणा — सुधा
कंठल्ठाटी — अंतस्ताची
पगसा — मजला
तुप्वाल — तुम्हास
फाढी — यादी
कैले — ऐसें
एहश — केवळ
प्वधाहे — म्हणावे
लासपगअवी — सालमजकरी
फागअविठा — याजकरिता
भावी — नाही
व्रुमफे — रुपये
मवंढु — परंतु
कनीपाभ — अभिमान

काप्वाल — आम्हास
फाढी — यादी
लाजाही — सागावी
स्वट्फफाल — प्रत्ययास
फाधी — याणी
पुछाभे — मुखाने
लंव्ळफ — संशय
ठवी — तरी
ववफेअ — हरयेक
आवी — काही
भावोमंठ — नारोपंत
झ्फाहे — ध्यावे
वे — हे
हीळेश — वीशेष

लिरढीटे — सिबंदीचे
हाअयजावी — वाकफगारी
मावूभ — पाहून
प्वधगे — म्हणजे
काधूभ — आणून
ढाछाहिसी — दाखविली
पाट्व — मात्र
शेहूभ — घेवून
फाल — यास
भिपिट्फ — निमित्य
फेअ — येक
आढाहफारढास — काडावयाबदल
कैलेवी — ऐसेही
कैअठ — ऐकत
मथीसा — पडिला

हजैवे — वगैरे
कावे — आहे
ट्फाठील — त्यातील
कंठव — अंतर
ढेठो — देतो
वी — ही
प्वधठाठ — म्हणतात
फाढ — याद
हाकीचं — वाईट
मावठ — पाहत
रोसठा — बोलता
ठीभ — तीन
ठुशाळेच्च — तुळशेट
भावी — नाही
कावे — आहे

१३ शहाजी व शिवाजी यांच्या बिकानेर येथील जन्मपत्रिका

(म. म. द. वा. पोतदार, प्रा. ग. ह. खरे, श्री. गो. त्र्यं. कुलकर्णी, पुणें)

(१) शिवजन्मतिथीचा वाद इ. स. १९२५ ते १९३० च्या दरम्यान फार मोठ्या प्रमाणांत चालून नंतर तो थंड पडला. हळूहळू नवी शिवजन्मतिथि लोकांत मान्य होऊं लागली होती व जुन्या तिथीचे प्रवादक अस्तंगत होऊं लागले होते. परंतु महाराष्ट्र सरकारनें शिवजन्मतिथीच्या निश्चयासाठीं एक समिती नेमल्यानें त्या वादास पुनः एकदां चालना मिळाली. त्या समितीचा वृत्तांत अजून प्रसिद्ध व्हावयाचा आहे. एवढ्यांत श्री. पगडींनीं मुरारेस्तृतीयः पंथाः या वाक्प्रचारास अनुसरून एक तिसरीच तिथि लोकांपुढें मांडण्याचा प्रयत्न केला. यामुळें नवतिथिवाद्यांना आपल्या पुराव्यांची परिस्थिति पुनः एकदां अवलोकन करावी असें वाटलें. आमच्या जन्मपत्रिकांच्या पुराव्यांपैकीं एक बिकानेरला आहे हें सर्वज्ञात होतें. पण तिचें प्रथम प्रकटीकरण डॉ. दशरथशर्मा यांनीं इ. १९३४ मध्यें इंग्रजींत केल्यावर लागलीच प्रा. खरे यांनीं त्याचा मराठी अनुवाद केसरीमध्यें प्रकाशित केला (१९३५ मार्च ५). पण त्या पत्रिकेचा मूळ पाठ आम्हांपैकीं कोणापाशींही नव्हता. तसेंच ती पत्रिका बिकानेरला कोणापाशीं आहे याचाही आम्ही कोणी शोध घेतला नव्हता. भारतीय इतिहास परिषदेच्या पतियाळा अधिवेशनाला जाण्याच्या निमित्तानें प्रा. ग. ह. खरे, श्री. गो. त्र्यं. कुळकर्णी व आमचे मित्र श्री. देवीसिंग चौहान अशा तिघांनीं सितामऊ येथील डॉ. रघुबीरसिंह यांजकडील फार्सी अखबारांचा संग्रह तपासून आवश्यक ते उतारे घेण्यांत पाच दिवस घालविले आणि पतियाळा अधिवेशन संपल्यावर म. म. पोतदार, प्रा. खरे व श्री. कुळकर्णी असे तिघे बिकानेरला गेलों. तेथें मुख्य कामाबरोबर जन्मपत्रिकेचाहि शोध घेतला. हा शोध घेत असतां देवदैत्यांच्या समुद्रमंथनांत अमृताबरोबर लक्ष्मीसारख्या इतर रत्नांचाहि लाभ झाला त्याप्रमाणें शिवाजी महाराजांच्या जन्मपत्रिकेबरोबर शहाजीच्या जन्मपत्रिकेचाही लाभ झाला. या लाभाचेंच येथें वर्णन करावयाचें आहे. पण हें करण्यापूर्वी शहाजीच्या जन्मदिनाची तर सोडाच पण जन्मवर्षाचीहि किती व कशी अनिश्चिति होती हें येथें थोडक्यांत दाखवितों.

(२) कै. राजवाडे शहाजीचा जन्म श. १५१६ मध्यें झाला असें मानतात. (राधामाधवविलासचंपू प्रस्तावना पृ. ४१). कै. रा. ब. दरदेसाई यांनीं आपल्या रियासतीच्या शहाजी या पहिल्या भागांत शेडगांवकर बखरीच्या आधारानें श. १५१६ जय संवत्सर चैत्र शुद्ध ५ (इ. १५९४ मार्च १८) असा जन्मकाल दिला आहे (पृ. २०). व त्याचाच थोडा निराळा पुनरुच्चार त्यांनीं आपल्या न्यू हिस्ट्री

ऑफ दि मराठाजमध्यें केला आहे (खंड १, पृ. ४१). पण मूळ शेडगावकर व सप्तप्रकरणात्मक चरित्र या बखरी पाहतां त्यांत श. १५१६ जय संवत्सर येवढाच तपशील दिला आहे (पृ. ८, प्रा. भीमराव कुलकर्णी संपादित प्रत पृ. १२). चैत्र शुद्ध ५ हा तपशील शिवदिग्विजय बखरीवरुन घेतलेला दिसतो. तथापि त्या बखरींत इंदुवार दिला आहे तो चैत्र शुक्ल ५ शीं जुळत नाहीं म्हणून तो टाकून दिला (पृ. ३७). कै. द. वि. आपटे यांनीं शिवचरित्रनिबंधावलींत श. १५२४ (इ. १६०२) मध्यें शहाजीचा जन्म झाला असावा असें अनुमान केलें आहे (पृ. १५). कै. सरकारांनीं शहाजीचें जन्म-वर्ष-मास-दिन यांपैकीं कांहींच दिलें नाहीं. पण ते आपल्या 'हाउस ऑफ शिवाजी' मध्यें मलिकंबर इ. १६२६ मध्यें मेला तेव्हां शहाजी सुमारें ३१ वर्षांचा होता असें विधान करतात (तिसरी आवृत्ती पृ. २७). तेव्हां त्यांच्या मतें शहाजी सुमारें इ. १५९६ मध्यें जन्मला असें ठरतें. कै. डॉ. बाळकृष्ण शहाजीचा जन्म इ. १६०२ मध्यें झाला असें समजतात (शिवाजी दि ग्रेट, खंड १, भाग १, पृ. ५५). श्री. बेंद्रे आपल्या मालोजी राजे आणि शहाजी महाराज या पुस्तकांत शहाजी इ. १६०१ मध्यें जन्मला असावा असें अनुमान करतात (पृ. १४७, १४८). तात्पर्य, भक्कम पुरावा मिळत नसल्यानें शहाजीचा जन्म विविध विद्वानांनीं श. १५१६ व श. १५२४ यांच्या दरम्यान झाल्याचें अनुमानलें आहे.

(३) बिकानेर येथील अनूप हस्तलिखितग्रंथालय, त्यांत असलेल्या दुर्मिळ हस्तलिखित संग्रहाबद्दल जगप्रसिद्ध आहे. तेथें राधामाधवविलासचंपू, राजाभिषेक इ. मराठी इतिहासाला उपयुक्त हस्तलिखितें आहेत हें सर्व गंभीर अभ्यासकांस माहीत होतें. तेथील हस्तलिखितांच्या बृहत्सूचीहि प्रकाशित झाल्या आहेत. त्यांपैकीं राजस्थानी हस्तलिखितांच्या सूचींत जन्मपत्रिकांचे २ संग्रह नोंदले आहेत. पैकीं क्र. २३७१२ या संग्रहाची वही साधारणतः पाच इंच लांब, चार इंच रुंद आहे. या वहींत ७७ पानें म्हणजे १५४ पृष्ठें आहेत. प्रत्येक पृष्ठावर एक याप्रमाणें हींत १५४ जन्मपत्रिका आहेत. मुळांत हीं पानें अंशतः सुटीं असावीं. पण तीं जीर्ण होऊं लागल्यानें त्यांना साधारण पारदर्शक कागद चिटकवून त्यांची वही बांधली आहे. तरीही तीमधील कांहीं पानें फाटलीं आहेत. वहीच्या दहाव्या पानाच्या पोटावर शिवाजीची व पाठीवर शहाजीची जन्मपत्रिका आहे. प्रत्येक जन्मपत्रिकेचे दोन भाग आहेत. पहिल्या भागांत २ ते ४ ओळींत विशिष्ट मनुष्याच्या जन्मसमयाचा उणाअधिक तपशील दिला असून त्याखालीं तदनुसार बनणाऱ्या दोन कुंडल्या समोरासमोर दिल्या आहेत. पैकीं डावीकडच्या लग्नकुंडलींत ग्रह मांडले असून उजवीकडच्या भावकुंडलींत बारा स्थानें दाखविलीं आहेत. पण कोणत्याही भावकुंडलींत ग्रह मांडलेले नाहींत. या संग्रहांत सर्वांत जुनी जन्मपत्रिका पृथ्वीराज चौहानाची असून सर्वांत अलीकडची संवत् १७१९ ची आहे. तेव्हां ही वही सं. १७१९ नंतर लवकरच बांधली गेली असें समजण्यास हरकत नाहीं. ही वही बिकानेरला तयार झाली असल्यामुळें बिकानेरच्या राजांपैकीं


कांहींच्या, तसेंच बिकानेरची वसणूक, तद्वत् बिकानेर किल्ल्याचा सूत्रपात (आखणी), खात (खुदाई), शिलान्यास व संपूर्णता यांच्याही पत्रिका या संग्रहांत आल्या आहेत. पण यांत दारा, मुराद, खुस्रव, शहरियार, पर्वीझ, इत्यादि मुघल राजपुरुष आणि जाफरखान, खानझमान, शायिस्तेखान इत्यादि मुघल सरदारांच्याही जन्मपत्रिका आहेत हें या वहीचें वैशिष्ट्य आहे. शहाजीच्या कुंडलीसह जन्मपत्रिकेचा पाठ असा--

(१) संवत् १६५५ वर्षे फाल्गुन कृष्ण १४ गुरौ रात्रिगतघ
(२) टी २७ पल ४७ संमये मीनलग्नमध्ये शाहजीराज
(३) जन्मः

लग्न



भाव 8 ।।



(४) पिल्ले जंत्रीप्रमाणें संवत् १६५५ (श. १५२०, इ. १५९९) मधील अमांत फाल्गुन वद्य १३, गुरुवारीं २८ घटका १२ पळें असून नंतर चतुर्दशी लागत आहे. शहाजीचा जन्म रात्रीचा २७ घटका ४७ पळें एवढा समय गेल्यावर झाल्यामुळें तेव्हां चतुर्दशी निश्चयानें होती. जन्म पहाटेच्या वेळीं किंवा उजाडत्या शुक्रवारीं झाला असल्यानें त्या वेळीं मीन लग्न असण्यास कांहींच हरकत नाहीं. पण वाराचा हिशेब एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंत करीत असल्यानें जन्मसमयीं वार गुरुवारच धरला पाहिजे. या योगाची इंग्रजी तारीख इ. १५९९ मार्च ३० ही येते.


(५) ही जन्मपत्रिका शिवाजीचा बाप शहाजी याचीच कशावरून असा आक्षेप काढल्यास त्यास उत्तर येवढेंच कीं, राजपूत राजपुरुषांत शहाजी असें नांव सहसा येत नाहीं व शिवाय ही पत्रिका शिवाजीच्या जन्मपत्रिकेच्या पाठीवर असल्यानें ती शहाजीचीच आहे याविषयीं शंका रहात नाहीं.

(६) या जन्मपत्रिकेच्या संगतीनें शिवाजीच्या जन्मपत्रिकेचा पाठहि देऊन ठेवतों.


(१) संबत् १६६६* वर्षे फाल्गुन वदि ३ भृगौ रात्रिगत घटी
(२) १ पल १ संमये सिंहलग्नमध्ये शिवाजीरो ज* जन्मः

* या संख्येपैकीं शेवटचे दोन सहाचे आकडे जुन्या पोथ्यांत अनुसरलेल्या पद्धतीप्रमाणें बारीक रेषांनीं खोडले असून थेट त्यांच्या माथ्यांवर लहान आकाराचे पण त्याच शाईत ८ व ६ हे आकडे घातले आहेत. जच्या माथ्यावरही एक उभी रेषा मारून तें अक्षर खोडल्याचें दाखविलें आहे. लग्नकुंडलींत कर्णांच्या छेदबिंदूवर श्री हें अक्षर लिहिलें आहे.

लग्न



भाव 8।।



(७) या संशोधनाच्या निमित्तानें दोन गोष्टी लक्षांत येतात. एक म्हणजे राजस्थानांत आणखी दोन तीन पत्रिकासंग्रह उपलब्ध असल्याचें आज ज्ञात आहे. तेव्हां त्यांत आणखी कोणा मराठी राजपुरुषांच्या जन्मपत्रिका आहेत कीं काय हें पाहिलें पाहिजे. आणि दुसरें म्हणजे मराठी इतिहासाचें संशोधन आम्ही महाराष्ट्रियांनीं केलें तरच तें अधिक फलदायी होईल. येथेंच पहा ना. डॉ. दशरथशर्मा यांना अपूर्वाई वाटली म्हणून त्यांनीं शिवाजीची जन्मपत्रिका प्रकाशित केली. पण त्यांचें लक्ष शहाजीच्या जन्मपत्रिकेकडे गेलें नाहीं. आमच्या इतिहासाची आमच्या इतकी आस्था इतरांनाही असली पाहिजे अशी अपेक्षा करणेंच चूक आहे. आमच्या इतिहासाचें संशोधन आम्हीच केलें पाहिजे.

---

14 Marathi Contents of This Issue

(1) Bhide V. V.: A commentary on the Dve Virūpe hymn. Here the editor gives information about the author and his commentary on the above hymn from the Śākala recention of Ṛgveda. The author tries to interpret the hymn as addrssed to Nṛsiṁha the 4th incarnation of Viṣṇu, who is not accepted as a Vedic god by Vedists.

(2) Rendition of Chaul (in English).

(3) Shri. Bahirat B. P.: A new MS of Jñāneśvarī, with 874 additional *ovīs*. This copy of the MS, although not more than 150 years old, does not seem to have its origin in the version of Jñāneśvarī as revised by Ekanātha. It was found at Viṭe (dist. Satara).

(4) Dr. Kelkar K. S.: Influence of Marathi on Kabīra. The writer points out on the basis of some illustrations from Kabīragranthāvalī, that the natural flow of the language of Kabīra contained not a few traces of Marathi and opines that his language was a sort of integrated Hindi.

(5) Dr. Harshe R. G.: Versified life of Jñāneśvara by a poet-saint Tukā Vipra. The writer reproduces the text of 250 verses with critical annotation at the end, stating in places how his account differs from the conventional one.

(6) Dr. Parkhe V. V.: Pṛcchāpatra: an unpublished composition of Ajñānasidha. The writer reproduces the full text of the composition with a few introductory remarks regarding the poet. According to him the poet lived in the 14th century and the subject of his composition is a dialogue on Vedanta.

(7) Shri. Nagarkar R. S.: The poet Datta, hitherto unknown poet of the Rāmadāsī sect. The writer gives information about the poet, who lived towards the end of the 18th century. He was a disciple of Viṭṭhaladāsa who on his part was the disciple of Rāmad[illegible]sa. The language is simple and full of devotional pathos.

(8) Dr. Mundi B. N.: Baṅkata Taraṅgiṇī of Śivarāma. The writer acquaints the reader with 'Baṇkata Taraṅgiṇī', a versified devotional composition of Śivarāma completed by him in Śaka 1705. The work is an abridged rendering of the Sanskrit *Varāha Purāṇa*. He further traces the tradition of Śivarāma and draws attention to the similarity of the writings with two other poet-saints.

(9) Shri. Joshi N. K.: An incomplete version of Bhāūsāhebāñcī Bakhara?: a new MS seemingly the origin of the well-known Bhāūsāhebāñcī Bakhar was in the possession of Shri. Hinge of Tasgaon (dist. Sangli). The same was acquired through the good offices of Dr. V. V. Athalye of Satara. The MS seems to be an abridged narration of most of the incidents in the famous bakhar. With a few exceptions even some words and phrases are similar. Perhaps only a complete copy of the MS if and when available would enable a student to conclude whether Bhāūsāhebāñcī Bakhar is really an enlarged version of this composition or not.

(10) Dr. Kulkarni A. R.: Grant Duff's Satara Residentship 1818-22. The writer elaborates how Capt. James Grant Duff ably served his master Elphinstone during the critical transitional period, introducing British administration in Satara, while always behaving tactfully with the Rājā Pratāpasiṁha. He also describes how sincere and painstaking he was in collecting reliable information for his famous 'History of the Mahrattas'. The writer has profusely supported his statements, quoting original documents.

(11) Shri Deshpande J. S.: Miscellaneous writings and works of Nivṛttinātha—The writer examines a number of compositions (both in MS and printed forms) associated with the name of Nivṛttinātha as the author and concludes that their authorship could not be associated with Nivṛttinātha, the brother of Jñāneśvara.

(12) Major Gadre N. B.: Code writing of the Peshwa period. Peshwa Daftar Vol. 22 p. 155 gives a statement of accounts for the year 1809 written in a code language. The writer has gone through many similar statements, but he had not been able to decipher them. He has however found out a code which is useful for a set of other letters. A specimen of such a writing is given here.

(13) M. M. D. V. Potdar, Prof. G. H. Khare and Shri G. T. Kulkarni: Birth-dates and horoscopes of Shahājī and Shivājī the Great. Here the authors bring to light for the first time the birth-date and horoscope of Shahājī, the former of which was disputable as that given by *bakhars* is irregular. They also reproduce the text of the details of the birth-date and horoscope of Shivājī, the Great, which was already known.

(३) या मंडळावर वरील टीका करतांना टीकाकारांनीं ती करण्यापूर्वी प्रथम पुढील मुद्द्यांचा विचार करावयास पाहिजे होता. (१) आपण मंडळास कांहीं साह्य करतो कां ? (२) करीत असल्यास किती करतो ? (३) इतर लोक, सरकारें, नगरपालिका, जिल्हा परिषदा, कांहीं प्रदान करूं शकणाऱ्या विद्यापीठासारख्या संस्था यांजकडून कितपत साह्य मिळतें ? (४) संस्थेचें ध्येय काय व तिच्या गरजा कोणत्या ? (५) तदनुसार उचित योग्यतेचीं व संख्येचीं माणसें नेमावयाचीं तर त्यासाठीं द्रव्यसाह्य किती लागेल ? (६) आज मिळणारें द्रव्यसाह्य तेवढें आहे कां ? अशा प्रकारच्या सर्व मुद्द्यांचा आत्मौपम्य भावनेनें तुलनात्मक माहिती समोर ठेवून विचार केला तर या तिघांनींही संस्थेवर अवास्तव टीका करून विलक्षण मोठा अन्याय केला आहे असें मान्य करावें लागेल. असें करणारास ज्ञानेश्वरांनीं अतिशय मार्मिक उत्तर दिलें आहे. ते म्हणतात ' जैसा कोणी एक कांजी पियाला—, आणि परिणाम पाहों लागला अमृताचा. समाज या संस्थेस कांजी प्यायला देतो आणि या संस्थेवर अमृत प्याल्याचा परिणाम कां होत नाहीं हें विचारीत आहे. टीकाकारांनीं वस्तुस्थिति लक्षांत घेऊन, निदान मंडळ कार्यकर्त्यांशीं विचारविनिमय करून नंतर लिहावयास पाहिजे होतें असें वाटतें.

(४) मंडळाची त्रैवार्षिक निवडणूक होऊन तीमध्यें शक १८८९ ते ९१ या सालांकरितां पुढील कार्यकारी मंडळ निवडून आलें.

(१) **कार्याध्यक्ष**– म. म द. वा. पोतदार; (२) **खजिनदार**– श्री. सरदार गं ना. मुजुमदार; (३,४,५,) चिटणीस–प्रा. ग. ह. खरे, डॉ. अ. रा कुळकर्णी, श्री. स. वि. जोशी; **साधारण सभासद**–(६) प्रा. न. र. फाटक, (७) श्री. वि. द. घाटे, (८) प्रा. रा. वि. ओतुरकर, (९) श्री. वि. रा फडके, (१०) श्री. म. द. भागवत, (११) श्री. वि. अ. पटवर्धन, (१२) आचार्य वि. प्र. लिमये, **स्वीकृत** : (१३) श्री. देवीसिंग चौहान, (१४) डॉ. पु. म जोशी.

(५)या अंकांत द्वे विरूपे हें सूक्त प्रकाशित केलें आहे. त्याच्या अधिक प्रतींसाठीं श्री. खं रा. विंचूरकर यांनीं दोनशे रुपये व श्री. गो. ह. दंडवते, साहित्याचार्य यांनीं अकरा रुपये दिले. या सूक्ताच्या स्वतंत्र प्रति काढून त्यांस स्वीय ग्रंथमालेचा ९९ हा क्रमांक दिला आहे. या सूक्ताची सटीक प्रतही श्री. दंडवते यांनींच उपलब्ध केली.

(६) गेल्या अंकाप्रमाणें याहि अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाकडून साह्य मिळणार आहे याबद्दल मंडळास संतोष वाटतो व हें मंडळ त्या मंडळाचें आभारी आहे.

श. १८८९ रथसप्तमी
इ. १९६८ फेब्रुवारी ५

चिटणीस

५६०

५९६

अनुक्रमणिका

क्रमांक	लेखक	लेख	पृष्ठ
१	वि. वि. भिडे.	द्वे विरूपे सूक्तभाष्यम्.	१
२	Anthony D. Costa	The Rendition of chaul.	१४
३	भा. पं. बहिरट.	ज्ञानेश्वरी–अधिक ओव्यांची विटेप्रत.	१९
४	का. शं. केळकर.	संत कबीरांच्या भाषेवर मराठीचा प्रभाव.	२१
५	रा. ग. हर्षे.	संत कवि तुका विप्रकृत श्रीज्ञानेश्वर चरित्राख्यान.	२५
६	व. वि. पारखे.	अज्ञानसिद्ध कवीची अप्रकाशित काव्यरचना– ' पृच्छापत्र. '	३६
७	रा. शं. नगरकर.	समर्थ संप्रदायांतील एक अज्ञात कवि दत्त	४८
८	बा. ना. मुंडी.	शिवरामकृत बंकटतरंगिणि.	५५
९	ना. के. जोशी.	भाऊसाहेबांची बखर ? : कांहीं भाग.	६१
१०	अ. रा. कुलकर्णी.	ग्रँट डफचीं सातार्‍यांतील चार वर्षें (इ. १८१८–२२).	७२
११	ज. शा. देशपांडे.	निवृत्तिनाथांचीं स्फुट प्रकरणें व ग्रंथ.	८४
१२	ना. ब. गद्रे.	पेशवेकालीन एक सांकेतिक लिपी.	८९
१३	द. वा. पोतदार, ग. ह. खरे गो. त्र्यं. कुलकर्णी	शहाजी व शिवाजी यांच्या बिकानेर येथील जन्मपत्रिका.	९३
१४		Marathi Contents of This Issue	९६

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिकाची केंद्र सरकारच्या नियमानुसार द्यावयाची माहिती (१९५६ चे नियम, नियम ८, नमुना ४)

१ प्रकाशन स्थळ—	भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २
२ प्रकाशन काल—	त्रैमासिक
३ मुद्रकाचें नांव राष्ट्रीयत्व व पत्ता	दत्तात्रेय वासुदेव आंबेकर, भारतीय, आर्यभूषण मुद्रणालय, ९१५/१ शिवाजीनगर, पुणें ४
४,५ प्रकाशक व साधारण संपादक यांचीं नांवें, राष्ट्रीयत्व व पत्ते	श्री. गणेश हरि खरे, डॉ. अनंत रामचंद्र कुळकर्णी, श्री. सदाशिव विश्वनाथ जोशी; भारतीय, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २
६ मालक व पत्ता—	भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २

आम्ही उपर्युक्त तिघे प्रकट करतों कीं, आमची माहिती व विश्वास यांप्रमाणें दिलेला तपशील अचूक आहे.

ता. ६।२।१९६८

ग. ह. खरे, अ. रा. कुलकर्णी, स. वि. जोशी

महाराष्ट्र-राज्य-साहित्य-संस्कृति-मंडळ-पुरस्कृत

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें

वर्ष ४५] त्रैमासिक [अंक १–४

१७७–१८०

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

१२ वा खंड

(स्वी. ग्रंथमाला क्र. ९८)

BHĀRATA ITIHĀSA SAṀSHODHAKA MAṆḌAḶA,
POONA

Vol XLV { QUARTERLY } Nos. 1–4

177–180

Miscellaneous Sources of Indian History, Vol. XII

श. १८८९] किंमत ५ रु. [A. D.
रा. श. २९४] Price Rs. 5 [1967

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला

१ अहवाल (शक १८३२) रु. ३—०
२ अहवाल (शक १८३३) रु. ५—०
* ३ सुबंतविचार (वि. का. राजवाडे) १०—०
४ वार्षिक इतिवृत्त (शक १८३४) ५—०
५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें
खंड १२ (वि. का. राजवाडे) १—५०
६ प्रथम संमेलनवृत्त (शक १८३५) ०—७५
७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३५) ६—०
* ८ द्वितीय संमेलनवृत्त (शक १८३६) ३—०
९ वार्षिक इतिवृत्त (शक १८३६) ३—०
१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें
खंड २० (शिवकालीन घराणीं) ३—०
११ वार्षिक इतिवृत्त (शक १८३७) ६—०
१२ तृतीय संमेलनवृत्त (शक १८३७) ३—०
१३ मुकुंद-महाभाष्य (संस्कृत) ०—५०
*१४ ग्रंथराज (दासोपंत) ०—५०
१५ स्फुट प्रकरणें, भाग १ ला ०—७५
१६ स्फुट प्रकरणें, भाग २ रा ०—७५
१७ वार्षिक इतिवृत्त (शक १८३८) ३—०
१८ चतुर्थ संमेलनवृत्त (शक १८३८) ४—०
१९ राजवाडे खंड स्थलसूची ४—०
२० पंचम संमेलनवृत्त (शक १८३९) ३—०
*२१ संशोधनसंग्रह
२२ चंद्रचूड-दप्तर, कला १ (द. वि. आपटे) ३-०
*२३ महाराष्ट्र-सारस्वत १०—०
२४ षष्ठ संमेलनवृत्त (शक १८४०) ४—०
२५ सप्तम संमेलनवृत्त (शक १८४१) ३—०
२६ संशोधकाची छोटी जंत्री (आपटे) ०—२५
२७ मंडळप्रदर्शनपरिचय ०—२५
२८ फार्सी पत्रव्यवहार (गं. ना. मुजुमदार) ५—०
२९ फार्सी-मराठी कोश (मा. त्र्यं. पटवर्धन) ४—०
३० शिवचरित्रसाहित्य खंड १ ला १—५०
३१ हिस्टॉरिकल मिसलेनी १—०
३२ पुरंदरे-दप्तर, भाग १ (कृ. वा. पुरंदरे) ४—०
३३ शिवचरित्रसाहित्य, खंड २ ४—०

३४ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं
साधनें, खंड १ (ग. ह. खरे) २—०
*३५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १ २—०
३६ राजारामचरितम् (वा. सि. बेंद्रे) १—५०
३७ मंडळांतील नाणीं (ग. ह. खरे) १—०
*३८ शिवचरित्रसाहित्य, खंड ४ १—५०
३९ गोवळकोंड्याची कुतुबशाही
(वा. सि. बेंद्रे) ४—०
*४० ऐतिहासिक फार्सी साहित्य,
खंड १ (ग. ह. खरे) १—५०
*४१ दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाचीं
साधनें, खंड २ (ग. ह. खरे) २—०
*४२ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड २ १—५०
*४३ मंडळचित्रग्रंथ, चित्रें २० ०—५०
४४ शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड ३
(शं. ना. जोशी) २—५०
४५ विजयनगर-स्मारक-ग्रंथ (करमरकर
व ओतुरकर) ४—०
*४६ ऐतिहासिक फार्सी साहित्य,
खंड २ (ग. ह. खरे) १—५०
४७ शिवचरित्रसाहित्य, खंड ६ (ग. ह. खरे) १-५०
४८ मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील
विस्तार (शं. पु. जोशी) ०—७५
४९ शिवचरित्रवृत्तसंग्रह (कानडी),
भा. १ (पां. भी. देसाई) १—५०
४९अ, अखिल भारतीय अर्वाचीन इतिहास
परिषद पहिलें अधिवेशन ३—०
५० शिवचरित्रसाहित्य, खंड ७
(कृ. वा. पुरंदरे व ब. द. आपटे) १—५०
*५१ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ३
(ग. ह. खरे) १—५०
५२} शिवचरित्रवृत्तसंग्रह, खंड २ व ३
५३} फार्सी विभाग (ग. ह खरे), प्रत्येकीं १—२५
५४ पुणें नगरसंशोधनवृत्त, खंड १ (चिं. ग. कर्वे) १
*५४अ, ऐ. संकीर्ण साहित्य, खंड ३ ३—०

निवेदन

(१) या मंडळाच्या त्रैमासिकाचा, ४५ व्या वर्षाच्या चार अंकांचा हा जोड अंक आहे हा श. १८८६ मध्यें मंडळाचे सभासद असणाऱ्यांसाठीं आहे. गेल्या वर्षीं काढलेल्या अंकाच्या निवेदनांत त्रैमासिक मागें पडलें आहे तें गेल्या वर्षांतच चालू वर्षापर्यंत आणूं असें आश्वासन दिलें होतें. पण अनेक कारणांनीं त्याप्रमाणें घडलें नाहीं. या वर्षीं तें आश्वासन पुरें करण्याचा आटोकाट प्रयत्न करूं.

(२) या अंकासहि महाराष्ट्र-साहित्य-संस्कृति-मंडळाकडून त्याच्या नियमांप्रमाणें मिळणारें अनुदान मिळालें आहे. याबद्दल मंडळास संतोष वाटतो. हें मंडळ त्या मंडळाचे आभारी आहे.

(३) दक्षिण महाराष्ट्रांतील सरदार घराण्यांपैकीं सांगली संस्थानाचे मूळ पुरुष चिंतामणराव आप्पा पटवर्धन यांनीं बुडती पेशवाई व उगवून क्रमानें स्थिर होत चाललेली आंग्लाई अशा दोन्ही सत्ता पाहिल्या. त्यांच्या दिनचर्येच्या शेवटचा कांहीं भाग श्री. य. न. केळकर यांस उपलब्ध झाला. त्यापैकीं प्रारंभींचा कांहीं अंश या जोड अंकांत प्रकाशित केला आहे.

(४) हा अंश श. १७६८ मार्गशीर्ष वद्य ३० (इ. १८४६ डिसेंबर १८) पासून सुरू होतो. या वेळीं कंपनीचें राज्य दक्षिणेंत प्रायः स्थिर झालें होतें, दुसरा बाजीराव ब्रह्मावर्तास पेन्शन खात बसला होता, तर छत्रपति काशीस वनवास कंठीत होते. दोघेहि पुन्हां आपल्या पूर्वींच्या पदांवर येण्याचा संभव उरला नव्हता. चिंतामणराव आप्पांनीं सत्तरी ओलांडली होती व आंग्लाईंत इंग्रजांना आवश्यकतेप्रमाणें सर्व साह्य देण्याइतपत निष्ठाही दाखविली होती. अशा समयीं त्यांच्या मनांत कंपनीसत्तेविरुद्ध उठाव करण्याची कल्पना येणेंच शक्य नव्हतें; मग तिचा उच्चार व आचार कुठून होणार ? आली स्थिति हीच ठीक आहे अशी भावना असणाऱ्याच्या दिनचर्येंत स्वातंत्र्याची खंत, भावनांची उत्कटता, प्रक्षोभ इ. सापडण्याची अपेक्षा आपण केली तर तें चूक नव्हे का ? तथापि इंग्रजी छत्राखालचा एक सुसंस्कृत संस्थानिक कोणते दैनंदिन व्यवहार करी ? त्यास रस कशांत असे ? इत्यादि समजण्यास या दिनचर्येचें साह्य खचित होईल. हा उद्देश मनांत धरूनच मंडळानें ही दिनचर्या प्रकाशित केली आहे.

श. १८८९ आषाढ शु. १
इ. १९६७ जुलै ८

चिटणीस

प्रस्तावना

सांगली संस्थापक पहिले श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन यांच्या या अधिकृत खासगी दिनचर्या म्हणजे रोजनिशा हा इतिहासाचा एक बहुमोल ठेवा आहे. हा ज्यानी आपुलकीने माझ्या हवाली केला त्या श्री. गंगाधर गोविंद बिनीवाले यांचे हार्दिक आभार मानणे हे माझे प्रथम कर्तव्य होय. बिनीवाले सांगलीकरांचे पिढीजात सेवक. त्यानी हा जुनाट मोडी लिपीतील संग्रह रद्दीत न काढता अभिमानाने जतन करून ठेवला होता. हा संग्रह हवाली करण्यात जसे श्री. बिनीवाले यांचे उपकार आहेत तसेच उपकार सांगली संस्थानच्या इतिहासाचे अस्सल साधनांवरून आलोडन केलेले एकमेव तज्ञ रा. सा. गोविंदराव कुंटे (वय ८४) यांचेहि आहेत. माझ्या अनेक शंकांचे निरसन त्यानी आपुलकीने केले आहे.

हा दिनचर्यांचा पहिला हप्ता भा. इ. सं. मंडळाकडून प्रसिद्ध होत आहे. सर्व दिनचर्या छापून झाल्यावरच त्यावर सामग्र्याने लिहिणे सोईचे असल्यामुळे तें काम या प्रास्ताविकांत उरकले नाहीं. तथापि श्रीमंत चिंतामणरावांच्या जीवनाचा ढोबळ आराखडा यापुढे देत आहे. त्यावरून दिनचर्यातील पुष्कळ व्यक्तींची तपशीलवार ओळख होण्यास वाचकास सुलभ होईल.

पटवर्धन सरदारांचे आद्य पुरुष हरभट बाबा म्हणून ओळखले जातात ते योग्यच आहे. कारण तेच पहिले अर्जक पुरुष. तथापि चिंतामणराव आप्पा पटवर्धनांनी आपल्या घराण्याची ऐतिहासिक दृष्टीने जुळणी करण्याचा जो साक्षेप केला त्यातून हरभट बाबाच्या आजोबापर्यंत जुनी संगति लागली. त्यानुसार असे दिसते कीं, यांचा मूळ पुरुष कोणी हरभट बुवाच होता. त्याचे आडनांव पटवर्धन होते व या पटवर्धन घराण्याकडे मौजे कोतवाड्याची ग्रामोपाध्येपणाची वृत्ति व शिवाय कोतवड्याचे खोत सहस्रबुद्धे यांच्या कुलोपाध्यायपणाची वृत्तीहि होती. या मूळ हरभटाला तीन मुलगे होते. ते म्हणजे १ बाळंभट २ रघुनाथभट ३ कृष्णंभट. यांपैकी रघुनाथभट हा कोतवाड्यापासून जवळच असलेल्या शीळ नांवाच्या गांवी जाऊन तेथे स्थायिक झाला. त्याचे घराणे पुढे शीळकर या नांवाने ओळखण्यांत येऊ लागले. या शीळ गांवी सांगली संस्थापक चिंतामणराव आप्पांचे वडील पांडुरंगराव तात्यासाहेब यांनी श्रीहरिहरेश्वराचे देवालय बांधून पूजेच्या उर्जेकरितां पुढे कांही इनाम जमीन करून दिली होती.

असो. या पहिल्या हरभटाचा थोरला पुत्र जो बाळंभट त्याला तीन पुत्र झाले. ते म्हणजे अनुक्रमे हरभट, विठ्ठलभट, व केशवभट. यांपैकी हरभट हाच सध्या पटवर्धन-कुळाचा मूळ पुरुष मानला गेलेला आहे. हरभटबाबा हे वरदी तपस्वी पुरुष होते, त्यांची समाधि पुण्यास ओंकारेश्वरावर आहे.

हरभटांना एकूण सात पुत्र झाले. पैकी एक लहानपणीच वारला. बाकीच्या सहां-पैकी दोघे वेदविद्या शिकून पारंपरिक वृत्तीने राहिले. बाकीच्या चौघांनी मात्र कारकुनी-पेशा आणि शिपाईपेशा स्वीकारून मराठी इतिहासात चिरंतन कीर्ति मिळविली.

त्यांची नांवें अशीं

(१) कृष्णंभटदादा उर्फ बापाजी
(२) त्रिंबकपंत आप्पा
(३) गोविंदपंत नाना
(४) रामचंद्रपंत आप्पा

ही कारकुनी व लष्करी पेशांत शिरलेल्या पुत्रांची नांवें.

यापैकीं गोविंदपंताला पुत्र चार. (१) गोपाळरावदादा ऊर्फ रावसाहेब, (२) वामनराव बाबा, (३) पांडुरंगराव तात्या, (४) गंगाधरराव ऊर्फ बाळासाहेब.

गोविंदपंतनानांचे पहिले दोघे पुत्र जे गोपाळराव व वामनराव ते निपुत्रिक वारले. म्हणून तिसरा भाऊ पांडुरंगराव तात्या यास सरदारी मिळाली. गोविंदराव नानांनीच प्रथम पाग्यापासून नोकरी करून पुढें पथक्यापर्यंत उत्कर्ष करून घेतला. १७६३ सालीं पेशव्यांनी गोविंदपंतांनाच तैनात जाबता करून दिला. त्यानुसार गोविंदपंत नानांनी ८००० स्वार पदरी बाळगून चाकरी करावी व त्यासाठीं २५ लाखांचा मुलुख त्यांना सरंजाम दिला. मुख्य सरदारी गोविंदपंताची होती व त्याच्या पोटांत त्यांच्या भावांचे हिस्से दाखवून देण्यांत आले होते. अर्थात् मुख्य घराणे गोविंदपंत नानांचे.

पांडुरंगरावांना शके १६९८ मध्ये सरदारीची वस्त्रे मिळाली. सन १७७६ सालीं सावशीच्या लढाईत पांडुरंगराव जखमी होऊन हैदराकडे पाडाव गेले. त्यांना हैदराने कैद करून ठेवले ते कैदेतच कार्तिक शुद्ध ४ मंगळवार शके १६९९ या दिवशीं मृत्यु पावले.

पांडुरंगरावांचे वडीलपुत्र हरिहरराव यांना सरदारीची वस्त्रे शके १७०० आश्विन शु. १० दसऱ्यास देण्यांत आली. या वेळीं हरिहरराव वयाने फारसे मोठे नव्हते. या समारंभापूर्वीच ३ वर्षे आधी शके १६९७ मध्ये त्यांचा विवाह झाला होता. आप्पा बळवंत मेहेंदळे यांची कन्या झुराबाई त्यांना दिली. तिचे सासरचे नांव रमाबाई ठेवण्यांत आलें. हे हरिहरराव सरदारी मिळाल्यानंतर लवकरच म्हणजे १७०२ जेष्ठ व. ११ बुधवारी मिरजेस वारले. त्यांना मूलबाळ नव्हते व त्यांची बायकोहि रमाबाई थोडेच दिवसांत सासवडास निवर्तली. हरिहररावांच्या पाठचे चिंतामणराव आप्पा म्हणून त्यांनाच पेशव्यांनी सरदारी दिली.

चिंतामणरावांचा जन्म शके १६९७ पौष शु. ४ गुरुवारी मिरज किल्ल्यांत झाला; व त्यांची मुंज शके १७०२ त झाली व त्यांना सरदारीचीं वस्त्रें शके १७०४ माघ शु ५ गुरुवारी मिळाली. म्हणजे ते त्या वेळीं अवघे ८ वर्षांचे होते. म्हणून

दौलतीचें काम चुलते गंगाधरराव पहात आणि लष्करी चाकरीचें काम पथक घेऊन परशरामभाऊ पटवर्धन करीत.

चिंतामणरावांना एक धाकटा भाऊ होता. त्याचें नांव विठ्ठलराव बापू.

चिंतामणरावांचे लग्न पुण्यास झालें. शके १७०७ मार्गशीर्ष शु. १० सोमवारी त्याच सुमारास चुलते बाळासाहेब यांचा मुलगा केशवराव दाजी चिंतामणरावांपेक्षां महिन्या दोन महिन्यांनीच मोठा होता त्याचेंहि लग्न झालें. या दोघांना अनुक्रमें हरिपंत फडक्यांची कन्या व नात अशा नवऱ्या करण्यांत आल्या. चिंतामणरावांची बायको ही हरिपंत फडक्याचे चिरंजीव बाबा फडके यांची कन्या. चिंतामणरावांच्या बायकोचें नांव यशोदाबाई असें ठेवण्यांत आलें.

वर उल्लेखिलेल्या चिंतामणरावांच्या धाकट्या बंधूंची म्हणजे विठ्ठलराव बापूसाहेबांची थोडक्यांत हकिकत अशी. दुसऱ्या बाजीराव साहेबास शिंद्याआधी आपणच जुन्नराहून हस्तगत करून त्यांस पुण्यास न्यावे म्हणून नाना फडणिसांनी परशुरामभाऊ पटवर्धनास पाठविलें होते. त्यांचे बरोबर हे विठ्ठलराव बापूहि होते. पुढे त्यांची व बाजीराव साहेबांची चांगली जानपछान झाली व बाळासाहेब मिरजकर विरुद्ध चिंतामणराव या चुलत्या पुतण्यांत वाटणीची व अधिकाराची यादवी सुरु झाली. तेव्हा आपल्या थोरल्या भावाची म्हणजे चिंतामणरावांची बाजू पेशव्यांजवळ नेटाने मांडण्यांत यांनी फारच कसोशी केली व पुढें वाटणी मिळाली. हे विठ्ठलराव बापू, बापू गोखले पडले त्या मराठशाहीच्या अखेरच्या अष्टीच्या लढाईनंतर थोड्याच दिवसांनी वारले. विठ्ठलराव बापूंच्या दोन बायका होत्या. पहिली रखमाबाई व दुसरी अन्नपूर्णाबाई. रखमाबाईला मूल झाले नाही. अन्नपूर्णाबाईस मात्र मुलगा झाला होता. पण लहानपणीच निवर्तला. अन्नपूर्णाबाई विठ्ठलरावबापूंच्या मृत्यूनंतर हरिपुरास सती गेल्या त्या जागी संगमेश्वराचे दक्षिणेस तेव्हा लावलेला अश्वत्थ वृक्ष अजून आहे. थोरली बायको रखमाबाई या पुढे मरेपर्यंत आप्पासाहेबाजवळच राहिल्या. अखेर अखेर त्यांना कांहीं पिशाच्च-बाधा झाली होती.

चिंतामणराव आप्पांचा पहिला विवाह पुण्यास झाल्याचे वर सांगितलेच आहे. त्या वेळी आप्पासाहेबांचे वय ११ वर्षांचे होते. त्यांच्या पत्नीचे नांव यशोदाबाई ठेवण्यांत आले होते. या कुटुंबापासून त्यांना पंढरीनाथ नांवाचा पुत्रहि झाला होता. परंतु तो कांहीं महिन्यांतच वारला. या यशोदाबाई बाळंतरोगाने पुणे मुक्कामी सन १७९९ आश्विन व ८ रोजी वारल्या.

नंतर आप्पासाहेबांचे दुसरे लग्न दोन वर्षांनी कोतवड्याचे खोत जकातवाडीकर नारो महादेव सहस्रबुद्धे यांच्या कन्येशी हरिपुरास झाले. तिचेहि नांव यशोदाबाईच ठेवण्यांत आले. या स्त्रीच्या पोटी दोन पुत्र व दोन कन्या अशीं चार अपत्ये झाली.

पहिला मुलगा अल्पवयांतच वारला. दुसरा मुलगा गणपतराव तो मात्र मोठा होऊन व लग्न होऊन वारला. मुलींपैकी पहिली कृष्णाबाई ही इचलकरंजीकर व्यंकटराव दादासाहेबांना दिली होती. तो विवाह शके १७४२ च्या वैशाखात झाला. दुसरी कन्या काशीबाई नांवाची ती माधवराव रास्त्यांच्या पुत्रास दिली. तो विवाह शके १७४९ जेष्ठ शु. ८ रविवारी झाला.

सन १८१९ मध्ये आप्पासाहेबांचे दुसरे कुटुंब वारले म्हणून त्याच सालच्या ज्येष्ठांत लगेच आप्पासाहेबांनी आपला तिसरा विवाह पुणेकर जोशी यांच्या कन्येशी केला. तिचेहि नांव यशोदाबाई असेच ठेवण्यांत आले. त्यांना माईसाहेब म्हणत असत. त्यांना मूलबाळ कांहीं झाले नाही. त्या १८२८ साली भाद्रपद शु. ४ गुरुवारी एकाएकी घेरी येऊन निवर्तल्या.

यानंतर पुनः त्याच सालीं चिंतामणराव आप्पासाहेबांचा चवथा विवाह माघ शु. ५ इंदुवारी रामचंद्र सखाराम ऊर्फ गुंजूमामा करमरकर यांच्या बहिणीशी झाला. त्यांचे नांव अंबाबाई असें ठेवण्यांत आलें. त्यांना एक कन्या व दोन पुत्र झाले. पुत्रांपैकीं थोरला मोरेश्वर जन्मानंतर थोडेच दिवसांत वारला. दुसरा पुत्र म्हणजेच धुंडिराज ऊर्फ तात्यासाहेब. तात्यासाहेबांचा जन्म सन १८३८ आषाढ वद्य षष्ठीस झाला. हेच पुढें आप्पासाहेबांनंतर गादीवर येऊन पुढे १२ डिसेंबर १९०१ रोजीं वारले. अंबाबाईची एकुलती एक कन्या आवडाक्का. त्या माधवराव देशमुख पुणेकर यांना दिल्या होत्या. अंबाबाई या सन १८४० मध्ये अधिक ज्येष्ठ सप्तमीस वारल्या.

आप्पासाहेबांचे शेवटचे म्हणजे पांचवें लग्न मंगळवेढे येथील मायदेव घराण्यातील नाना मायदेव यांच्या कन्येशीं झालें. त्यांचें नांव पुनः एकदां यशोदाच ठेवण्यांत आलें. या यशोदाबाई श्री. आप्पासाहेब १८५१ मध्यें वारल्यावर त्यांच्या मागें सुमारें साठ वर्षेपर्यंत हयात होत्या. त्यांना मूलबाळ कांहींच झालें नव्हतें. त्या सन १९०९ मध्ये सांगली मुक्कामी वारल्या.

आप्पासाहेबांच्या दुसऱ्या विवाहातील स्त्रीपासून जी संतती झाली त्याचा उल्लेख वर आलाच आहे. त्यांपैकीं गणपतरावांसंबंधीं माहिती अशी. गणपतरावांना रावसाहेब असें म्हणत असत. त्यांचा जन्म २१-९-१८०९ रोजीं म्हणजे शके १७३१ भाद्रपद शु. त्रयोदशीस सांगली येथें झाला. बारश्याचा समारंभ मात्र पुढे पौष वद्य द्वितीयेस करण्यांत आला. त्यांचा व्रतबंध सन १८१६ सालीं झाला व विवाह पुढे ४ वर्षांनीं सन १८२० साली म्हणजे शके १७४२ वैशाख वद्य षष्ठी गुरुवारी झाला. पुण्याचे वे. मू. चिंतामण दीक्षित आपटे यांच्या कन्येशीं हा विवाह झाला. हें गणपतराव ऊर्फ रावसाहेब लग्नानंतर ६ वर्षांनीं १८ जुलै १८२६ रोजीं नगर मुक्कामीं एकाएकी वारले. त्यावेळी त्यांची स्त्री सती जाणार होती. परंतु तुझ्या मांडीवर दत्तक मुलगा

देऊ असे कबूल करून तिची मोठ्या प्रयासाने समजूत करून तिला राहविली. हरभटाचे द्वितीय चिरंजीव बाळंभट त्या घराण्यातील श्रीपतराव हे पांडुरंगराव तात्यासाहेबांचे बरोबर सावशीच्या लढाईत कैदेत गेलें होते. त्यांचे नातू बळवंतराव मोरेश्वर म्हणून होतें. त्यांच्या ५ पुत्रांपैकीं दुसरा मुलगा गणपतरावांच्या पत्नीचे मांडीवर दत्तक देण्यांत आला. ही दत्तकाची व्यवस्था श्री. आप्पासाहेब पुण्यास असता परस्पर झाली. इंग्रजांनी प्रथम दत्तकास मान्यता देण्यास विरोध केला परंतु आप्पासाहेबांना पुत्र संततीची आशा नसल्याने त्यांनींहि नेट धरला. ते प्रकरण ७–८ वर्षे चालले व अखेर ज. मालकमने फार फार खटपट करून कोर्ट ऑफ डायरेक्टर्सची मंजुरी दत्तकास मिळवून दिली.

गणपतराव रावसाहेबांच्या बायकोचे म्हणजे सत्यभामाबाई यांचे निधन गणपत-रावांच्या मृत्यूनंतर अवघ्या ६ महिन्यांतच सन १८२० च्या जानेवारीत झाले. (पौष वद्य १२ गुरुवार शके १७४८)

गणपतरावाच्या बायकोच्या मांडीवर मुलगा दत्तक देण्यांत आला त्याचे नांव विनायकराव ऊर्फ भाऊसाहेब. त्यांची मुंज शके १७५२ चैत्र शु. १० भृगुवारी झाली व विवाह शके १७५८ वैशाख वद्य षष्ठी गुरुवारी (मे १८३६) मध्ये केला. नरगुंदकर गंगाधरपंत लिमये यांच्या कन्येशी हा विवाह झाला. तिचे सासरचे नांव गंगाबाई ठेवण्यांत आलें. या दत्तक भाऊसाहेबांना–आप्पासाहेबांच्या पोटी धुंडिराजपंत तात्या जन्मले त्यानंतर लवकरच एक पुत्र झाला. त्याचे नांव गणपतराव ऊर्फ बाबासाहेब असें ठेवण्यांत आलें. नंतर त्यांना दुसरा पुत्र विठ्ठलराव उर्फ बापू झाला. भाऊसाहेब या उभयतामुलांसह गणेशदुर्गात म्हणजेच सांगलीच्या किल्ल्यांत रहात असत.

धुंडिराजतात्यासाहेब व गणपतरावबाबासाहेब यांच्या मुंजी बरोबरच करण्यांत आल्या.

असो. चिंतामणराव आप्पांनी गतपुत्राच्या बायकोच्या मांडीवर दत्तक देऊन दौलतीला वारस निर्माण केला परंतु नंतर त्यांना औरसपुत्र झाल्यामुळे सहाजिकच त्यांचे मन त्याकडे ओढले व त्यांनी खटपट करून त्या मुलाला म्हणजे धुंडिराज-तात्यालाच दौलतीचा स्वामी केले. आप्पासाहेब हे १५ जुलै १८५१ रोजी वयाच्या ७७ व्या वर्षी वारले. त्यांच्या मृत्यूनंतर अपेक्षेप्रमाणे औरसात व दत्तकात मोठाच वाद माजला.

इ. १९६७ मे १८

य. न. केळकर

◆◆◆

भारत - इतिहास - संशोधक - मंडळ, पुणें

वर्ष ४५] त्रैमासिक [अंक १–४

दिनचर्या श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन

१८–१२–१८४६

यादी दिनचर्या सु॥ सबा आर्बैन मयातेन व अलफ माहे जिल्हेज ऊर्फ मार्गसीर्ष मास शके १७६८.

मार्गशीर्ष व॥ ३० भृगुवार मेहरबॉ ग्रामसाहेब बहादुर बेलगावाहून आपासाहेब यांचे भेटीकरिता शाहापुरास संध्याकालचे घटका दीड घटका दिवसास आले. आपासाहेब, तात्यासाहेब वाड्याचे दरवाज्याचे सदरेपर्यंत सामोरे जाऊन साहेबास घेऊन सदरेच्या दुमजल्यावर बैठक घातली होती तेथे गेले. खैरयतीची बोलणी जाहली. नंतर खाना घ्यावयास दुसरे ठिकाणीं मेज केले होते तेथें खाना घेऊन पुन्हा कचेरीस येऊन बसले. विडे हार तुरे गुलाबअत्तर जाहले. कचेरीत साहेबाचे व आपासाहेब यांचे बोलणे जाहले त्यातील भाव, साहेब बोलले की " उच्छत्र समारंभ मोठा आहे कीं आम्हा लोकांत असी अब्रू कोणास मिलाली नाहीं, तसी आपली अब्रू विलायतपर्यंत जावोन तरवार आली आहे. अशा तरवारी आपले जवळ बहुत असतील परंतु या तरवारेची अबरू मोठी आहे." त्याचे उत्तर आपासाहेब याणी केले की "आपली मेहरबानगी आहे येवढीच गोष्ट ! " त्याचें उत्तर साहेबानी केले कीं " आमची मेहरबानगी कशाची ? आपली कीर्ति व अबरू विलायतेपर्यंत विख्यात आहे आपले सिपाइगिरीबद्दल बहुमान आला आहे असा कोणास व्हावयाचा नाहीं व जाहला नाहीं." मधोनच तात्यासाहेब यास ' आमचे हवाली करा ' म्हणोन तात्यासाहेबाचा हात धरून पुसिले की आपण घोड्यावर बसता ? शिकारीस येता ? आम्हाबरोबर कोलापुरास येता ? म्हणोन पुसिले. तात्यासाहेब याणी सांगितले ' घोड्यावर बसतो, सिकारीस येतो. ' नंतर निरोप घेऊन साहेब निघाले. साहेब आपासाहेब यास म्हणाले कीं आपण पोचवावयास येऊ नये मी जातो म्हणाले. आपासाहेब पाठवणेस दुमजल्याचे खाली सदरेपर्यंत आले होते. कचेरीस कलवांतिणीचा नाच जाहला.

मु॥ शाहपूर अस्तमानचे दोन घटका रात्रीस परशरामपंत भाऊसाहेब तासगावकर आपासाहेबांचे भेटीस गावात असता तीन दिवसानी आले होते. येरवीच बोलणे

होऊन निरोप घेऊन माघार गेले. ग्रामसाहेब याणी तरवारीचे पडदळे किती लांब कंब्रेस लागते त्याचे माप घेऊन गेले.

१९–१२–१८४६

पौष शु॥ १ मंदवार प्रातःकाळी मिरजमळ्यातील श्रीमंत रा० बापू व राव बाबासाहेब भेटीस आले होते. भेटून निरोप घेऊन गेलेनंतर तिसरे प्रहरी स्वारीची तयारी येकंदर करून आपासाहेब व तात्यासो व भाऊसो व बाबासो व पदरची मंडळी भाऊबंदसुद्धा एकंदर जमेतीनिसी, स्वारी बेलगावास जाणेस चालती जाहली. प्रथम मेहरबा शा साहेब बहादुर कलकटर जिल्हा धारवाड यांची भेट त्याचे बंगल्यास जाऊन घेतली. साहेब बोलले " आपली कीर्ती व नांव ऐकत होतो आज दृष्टीस पडले. आपले येणे धारवाडास व्हावे " म्हणोन वगैरे बोलणे जाहलेनंतर विडे, अत्तर, गुलाब, होऊन स्वारी पुढे चालती जाहली. मेहरबा रिव्हिससाहेब, येकंदर लष्करचे साहेब सरदार वकील व पलटणे व मेहरबा ग्रामसाहेब जिल्हा कोलापूर व आपासाहेब व आबासाहेब कुरुंदवाडकर × × लक्ष्मणराव व आणासो मिरजकर व व्यंकटराव राजे मुधोळकर, कागलकर सुधा माळावर उभे होते. आपासाहेब यांची स्वारी माळावर गेली. मेण्यातून उतरली. साहेब वगैरा सरदार घोडयावरून उतरले. पुढे निशाण रोवले होते. आपासाहेब याची व साहेब लोक वगैरेची भेट मुजरा जाहला. नंतर काही पायउतारा शेपन्नास पाउले जाऊन तेथे सर्वत्र सरदार होते त्याचे देखत गौरनरसो याची थैली व करांचली व पडदळें विलायतहून आलेले असे रिव्हिसनसो याणी पेटीतून घेऊन आपा- साहेब यास दिली. आपासाहेब याणी पडदळ सुद्धा करांचली घेऊन रीव्हीसन साहेब यांचे हातात देऊन बोलले कीं मुलास यावी म्हणोन. त्या प्रो रीव्हिससाहेब व ग्राम- साहेब याणी बरे आहे म्हणून तरवार पडदळे सुधा तात्यासो यास दिल्ही. तात्यासाहेब उभयता साहेबास सर्व सरदारा देखता बोलले कीं ही तरवार दिल्ही त्यासारखे आमचे हातुन दोस्तीचे ठिकाणी काम घ्यावें. ते सर्वत्र सरदार व साहेब याणी ऐकून बहुत खुष जाहले. उभयता साहेबानी बहुत बरे आहे म्हणोन म्हणाले. खुषीच्या तोफा ×× बार कर्णोविसी सांगितले. आपासो याजकडील तोफेचे बार भेटीचे खुषीबद्दल जाहले नंतर दोन घटका पलटणचे लोकांची कवायत होत होती. नंतर अगदी अस्तमान जाहला सबब आज फैरा व बार करू नये आणखी येकेदिवशी करावयास येतील म्हणोन आपासो याणी साहेबास सांगितले आणि उभयता साहेब बोलले जे आम्ही फौजसुद्धा पोहोचवावयासी येतो आपासो याणी सांगितले जे आता काही यावयास नको. तत्राप रीविससाहेब व ग्रामसाहेब हे तीनशे स्वारानिसी पोहोचवावयास बरेच लांब आले.

तासगांवकर, कुरुंदवाडकर व मिरजकर व मुधोळकर व खरडेकर सर्व लोकानी साहेबास मुजरा करून व आपासो याचा निरोप घेऊन सर्व आपले ठिकाणी गेले. आपासाहेब याची स्वारी मोठे सभारंभाने शहापुरास आली. तरवार तात्यासो यानी श्री

गणपतिमहाराजापुढे ठेऊन नमस्कार केला. त्या दिवसी आसपास गावचे व शहापूर बेळगांव मिळोन पाउणशे मनुष्य रामोशी पाहावयास आला. त्या वेळेस कोणी लुच्याने आपासाो यास लग्गून घात करावा या बेताने दगड मारला तो श्रीगणपतिमहाराजाचे कृपेने चुकून आपासाहेबाजवळ डावे आंगास आप्पासाहेबाच्या पदरचे राजश्री हरी यशवंत निमये होते त्यांचे डावे डोळ्याचे भिवईखाली पापणीवर लागला. खाच गहू इतकी खोल पडली श्रीचे कृपेने लौकरच बरी जाहली.

२०।१२।१८४६

छ १ मोहरम पौष शु॥ २ रविवार मु॥ शाहापूर प्रातःकाल दहा घटका दिवसाचें सुमारे रा. दाजीबा पंडित कारभारी करवीर हे श्री. रा. आपासाहेब यांचे भेटीस शाहापूरचे वाडयांत आले होते. भेट होऊन कचेरीस बसले. श्री. रा. श्रीमहाराज छत्रपती करवीरवासी उभयता यांचे लग्नाच्या गोष्टी व आणसटलीच्या घाटास इकडील छत्र आहे तो गांव मोबदल्यात देण्याचें वगैरे बोलणी जाहली. नंतर विडे देऊन निरोप दिला. सायंकाळचे प्रहर दिवसाचे सुमारास रावसाहेब खरडेकर करवीरकर हे श्री. रा. आपासाहेब यांचे भेटीस आले होते आगतस्वागताची बोलणीं होऊन निरोप दिला वरकड नवल विशेष कांहीं नाहीं आपासाहेब यांचे × × × × × सापुरकर स्वामी आले आहेत त्याचे दर्शनास गेली त्याणी × × मंत्र अक्षता

२१।१२।१८४६

छ २ मोहरम पौष शु॥ ३ सोमवार मु॥ शाहापूर श्री. रा. आपासाो. याची स्वारी वडगावचे बापू नावलीकर याणी मळा केला आहे तो पाहावयास गेली होती. अस्तमानी रा. व्यंकटरावराजे मुधोळकर हे भेटीस आले होते. आगत स्वागताची बोलणी जाहली व त्यांस इंग्रजी सरकारातून तरवार आलेली दाखविली स्वारी मळ्याहून येतें वेळेस वे. शा. सं. सुब्रम्हण्यशास्त्री यांचे घरी गेली होती.

२२।१२।१८४६

छ ३. मोहरम पौष शु॥ ४ मंगळवार मु॥ शाहापूर तिसरे प्रहरचे दोन घटका दिवसास मेहेरबा मेजर पाद्रीसाो व त्याचा जावई मेहेरबान उंटसाो व उभयतांच्या बायका व उंटसाोची तीन मुले पैकी एक मुलगी व दोन मुलगे असे आपासाो यांचे वाडयात आले होते. भेट खालचे दिवाणखाण्यात बैठक घातली होती तेथे जाहलीं. त्यानंतर तीन मुले व मडमा दोघी अशी आतल्या बंगल्यात गेल्या. तेथे श्री. सौ. मातोश्रीसाहेब व आवडाबाई व गंगाबाई यांस भेटून खाना जाहाला. आगत स्वागत बोलणी जाहली नंतर उठोन गेली. नंतर उभयता साहेब त्याच ठिकाणी खान्यास आले. खाना होऊन विडे दिले नंतर साहेब मडमा व मुलें अशी पहिले ठिकाणी बैठक घातली

तेथे आले. इंग्रजी सरकारातून तरवार आलेली सर्वत्रास दाखविली पाहून निरोप घेऊन साहेब वगैरे आपले बंगल्यास गेले. सदरहु साहेब वगैरे येणेचे पूर्वी सावनूरकर वैष्णव स्थळी याचे देवाचे सोन्याचे दागिने १ घंगाळ, १ तामण, १ तबक व समताखडी, १ अखेरड व लहान समई (?) एकूण तीन व घागर १ आब्याच्या कवल[1] तीन असे दागिने कुरुंदवाडकर याचे घरी ४०००० हजार रुपये **साधाण** होते. ते दागिने स्वामींनीं मोडून दिले. ते दागिने वजन आदमासे २००० रुपये होते. सदरहु दागिने आपासो यास दाखवण्यास बापू शहापूरकर याणीं आणिले होते ते सर्वत्र मंडळीनी पाहून बापूनी नेले.

२३।१२।१८४६

पौष शु॥ ५-६ छ ४ मोहरम मु॥ शाहापूर कालचे प्रहर दिवसाचे सुमारे दाजीबा घोरपडे याचे चिरंजीव मल्हारराव घोरपडे रिसालदार हे आपासो यांचे भेटीस वाडयांत आले होते. भेट होऊन परस्परे मुदारतीची बोलणी जाहली. नंतर निरोप घेऊन गेले. तिसरे प्रहरी आपासो यांची स्वारी मेहेरबा रीविसनसाहेब याचे बंगल्यास बेळगांवचे किल्लयात बंगल्यानजीक तंबूत गेली चार घटका स्वारी होती तेथे मेहरबा हंट साहेबबहादूर आले. त्याची व आपासो याची भेट जाहाली नंतर विडे अत्तर गुलाब हार वगैरे जाहले आपासो याणीं आपले भाईबंद मंडळी व पदरची जुनी मंडळी वगैरे यास मेहेरबा रीविसनसो यास भेटविले व त्यांचे कोण कोणचे पुरुषानी सरकार कामे बजावली व सरकार कामावर जखमा लागल्या व ठार जाहले व हा अमूक अमूक पिढीचा चाकर व त्याजकडे अमुक काम आहे हे सर्व सांगितले. नंतर साहेब बोलले जे बहूत अछा आहे. सर्वत्रानीं मिळून तात्यासाहेब याजकडे लक्ष ठेवून नोकरीवर हाजेर राहावे. त्यांस सांभाळावे. नंतर साहेब यांचा निरोप घेऊन मेहेरबां डेक साहेब डाकतर याचे बंगल्यास आपासो यांची स्वारी गेली तेथे अर्ध घटका बसून नंतर स्वारी किल्लयाचे बाहेर आली. बेळगांवचे भेडी बाजारातून रा. व्यंकटराव घोरपडे मुधोळकर याचे ठिकाणी आली. बरोबर भाऊसाहेब होते. परस्परे खैरयतीची बोलणी जाहली घोरपडे याणी आपासाहेबास दुपट्टा पागोटे व भाऊसो यांस शेला पागोटे दिल्हे नंतर विडे अत्तर गुलाब होऊन स्वारी बेळगांवाहून सडकेवर काळे लोकांची कवाईत छावणीत होत होती त्या वाटेने शहापूरचे गांववेशीने स्वारी शहापूरास आली. त्याच दिवशी दोन प्रहरी वे. रा. रामभट्ट भट शहापूरकर याणी तात्यासो व भाऊसो व बाबासो व श्री. सौ. बाईसो व आवडाबाई व वहिनी बाई यांस पदरची मंडळी कांहीं यास मेजमानी केली. उत्तम प्रकारचा बेत केला होता. त्यादिवशी श्री. सौ. बाईसो यांची स्वारी वडगावचे मळ्यात जाऊन आली

1. समताखडी–आभिषेक पात्र ठेवण्याची तिवई. (आखेरड)–हारातील मध्यावर लोंबणारे पदक.

छ-५ मोहरम पौष शु॥ ५ गुरुवार मुक्काम शाहापूर श्री. रा. आपासो याची स्वारी तिसरे प्रहरी बेळगांवचे किल्ल्यांत मेहेरबा रिविसन साहेब बहादूर यांचे बंगल्यास गेली. साहेबाची भेट होऊन बोलणे होऊन नंतर निरोप घेऊन मेहेरबा सांडणी सो पाद्री याचे किल्ल्यातील बंगल्यास गेली. तेथे क्षणभर बसून नंतर त्याने आपले बंगल्याचे पाठीमागे दुसरा बंगला आहे तेथे नेऊन आगीचे यंत्र लाकूड कापावयाचे व लाकूड कातावयाचे दुसरे यंत्र व विहिरी वरील पाणी काढावयाचे पीप (पंप) असे दाखविले. नंतर स्वारी शहापूरास आली. भाऊसाहेब हे साहेब लोक यांचे बंगल्यास भोजनास यावे म्हणून बोलवावयास गेले होते. तेहि आले नंतर आस्तमानचे घटका दिवसास मेहेरबा रिविसन साहेब व फ्रेळसाहेब व मेहेरबा डेक साहेब डाक्तर व त्याचा एक मुलगा व मेहेरबा दुवीत्री साहेब बेळगांवचा कामगार व मेहेरबा सांडणी साहेब पाद्री व दोन साहेब पलटन सरदार असे आले व वाड्यांत सदरेचे दुमजल्यावर कचेरी जाहली. त्यानंतर क्षण एक बसून नंतर पाठीमागील दिवाणखान्यांत दुमजल्यावर खान्याचें मेज केले होते, तेथे सर्वत्र साहेब लोक येऊन खाना घेतला. त्यावेळेस तात्यासाहेब याणीं साहेबलोकास बंदुकीचा बार काढून दाखविला व कवाईतीचे शब्द म्हणून हुकूम सांगितला. नंतर साहेबलोक व आपासो वगैरे सर्व मंडळी कचेरीस आले. कचेरीस इंग्रजी सरकारातून करांचली आपासो यास दिल्ही ती साहेब लोकास दाखविली नंतर अत्तर गुलाब होऊन आपासोनी आपले भाऊबंद मंडळी एकंदर यांस आणून भेटविले व सर्वत्राचा थोरपणा सांगितला. साहेब लोक निरोप घेऊन गेले

२५।१२।१८४६

छ. ६ मोहरम पौष शु॥ ८ भुगूवासरे साहेब लोक याजकडील दिवाण व मुनशी वगैरे कामगार लोक यांस भोजनास बोलावण्याकरिता भाऊसो गेले होते. भगवंतराव दिवाण हे परभु सबब ते खेरिज करून बाकी सर्व मंडळी भोजनास आली होती. नंतर दिवाण येऊन आपासोस भेटून गेले. आपासो यांची स्वारी बेळगावास असतखान लहरी पीर याचे दरग्यास गेली होती तेथून वडगांवास बापू शहापूरकर यागी मळा केला तेथे जाऊन अस्तमानी माघारी आली.

२६।१२।१८४६

छ. ७ मोहरम पौष शु॥ ९ मंदवार मु॥ शहापूर दादा सराफ शेणवी पेठ शहापूर याणे श्री. रा. आपासो वगैरे मंडळी व पदरची मंडळी यांस मेजवानी केली. भोजनाचा बेत वाड्यांत व बापू कृष्ण याचे वाड्यात जाहला. मेहेरबा साहेब **सासे कापूस दिकी बचे (?)** कामाकरिता आहे तो येऊन क्षणभर बसून गेला.

२७।१२।१८४६

छ. ८ मोहरम पौष शु॥ १० रविवार मु॥ शहापूर श्री. सत्यबोध स्वामी मठ सादनूर यांस भिक्षा करावयाचा बेत टरवून भाऊसो प्रातःकाळी बोलवावयास गेले. नंतर स्वामी मंडळीसुद्धा सरकार वाड्यांत आतले चौकात येऊन बसले. त्याची पाद्यपूजा भाऊसाहेब याणी केली. नंतर स्वामी वाड्यातून बापू कृष्ण याचे घरातील चौकांत जाऊन बसले तेथे देवपुजेचे सामान आणून सोन्याचा देव्हारा वगैरे मांडून अस्तमानचे चार घटका दिवसपर्यंत पुजा वगैरे जाहले नंतर आपासाहेब सर्वत्र मंडळी-सुद्धा जाऊन पुजा वगैरे सर्व पाहिले नंतर स्वामी वगैरे मंडळीचे जेवण शहापूरकर याचे घरी जाहली व आपासो याजकडील मंडळीची भोजने व आपासो यांचे भोजन अस्तमानी जाहले. प्रातःकाळी स्वामी आले त्यावेळेस आपासोचे स्वारीबरोबरचे वैष्णव मंडळी होती त्यांस तप्त मुद्रा दिल्या. स्वामीनी तात्यासो व भाऊसो या उभयतास दोन दुपट्टे दिले. आपासो यांस शालजोडी पौष शु॥ २ दिवसी स्वारी त्याचे दर्शनास गेली ते समई दिली होती. बेळगांवचे मुनसी वगैरे कचेरीचे लोकापैकीं कांहीं मंडळी भोजनास यावयाची राहिली होती ती जेवावयास आली होती.

२८-१२-१८४६

छ. ९ मोहरम पौष शु॥ ११-सोमवार मु॥ शहापूर आपासाहेब याची स्वारी बेळगावास तिसरे प्रहरी शाळा पाहावयास गेली होती बरोबर तात्यासो व भाऊसो बाबासो वगैरे सर्व पदरची मंडळी कांहीं होती. तेथे मुलांची परीक्षा व भूगोल व खगोल यंत्र व धक्याचे यंत्र असे साहेब पाद्री यांनीं दाखविले नंतर स्वारी अस्तमानी शहापुरास आली

२९-१२-१८४६

छ. १० मोहरम पौष शु॥ १२ मंगळवार मु॥ शहापूर प्रातःकाळचे दोन घटका दिवसास तासगावकर भाऊसाहेब याचे बारगीरांचा डोला निघाला. बराबर भाऊसो याणी हत्ती व कोतवाल घोडे दोन, अत्पागीर चवरी असे दिल्हे होते नंतर तिसरे प्रहरी श्रीमंत तात्यासो व भाऊसो यांची स्वारी बरोबर मंडळी अशी हात्तीवर बसून बेळगावास डोल्याचा समारंभ पाहावयास गेले होते. समारंभ सुमारात. उत्तम नव्हे. तीन चार डोले होते. एक डोला मात्र पलटनचे लोकाचा बराच होता व मोठाहि होता १०००० मनुष्य आदमासे मिळाले होते

३०-१२-१८४६

छ. ११ मोहरम पौष शु॥ १३ बुधवार मु॥ शहापूर

अपासो स्वारी बेळगांवास हणमंतास गणपतीस जाऊन आली भाऊसो पलटनची छावणी पाहून आले.

३१-१२-१८४६

छ. १२ मोहरम पौष शु॥ १४ गुरुवार मु. शहापूर श्री. रा. आपासो स्वारी बेळगांवास दोंनप्रहरी एकघंटा वाजवलेवर किल्ल्यात गेली प्रथम मेहेरबा डेकसाहेब डाक्टर याचे बंगल्यात जाऊन बसली तेथे दोन तीन घटका होते इतक्यांत तेथें मेहेरबा रिविसनसाहेब बहादूर हे आले व मेहेरबा कर्नलसाहेब हेही आले एक घटका अदमास बसून गेले नंतर रिवीसन साहेब व अपासाहेब असे रिवीसनसो-च्या डेऱ्यास गेले तेथे दोन घटका बसून बोलणे होऊन नंतर अत्तर विडे होऊन साहेब कँपास जावयास चालते जाहले. आपासो स्वारी शहापूरास आली व त्याच दिवशी स्वारी बेळगांवास जावयाचे पूर्वी सावनूरकर स्वामीचे येथे जाऊन त्यास धोतरजोडी एक व दक्षणा १५० रुपये दिल्हे नंतर स्वारी बेळगांवास गेली

१-१-१८४७

छ. १३ मोहरम पौष शु॥ १५ भृगुवासरे मु. शहापूर पाद्रयाच्या शाळेतील पाद्रीसाहेब यार्णे धक्याचे यंत्र बाईसाहेब यास वाड्यात आणून दाखविले व त्यादिवसीं गांवचे बायकास हाळद कुंकू श्री. सौ. बाईसो यांची स्वारी आली सबब बापू शहापूरकर याचे वाड्यांत बैठक बायकांची घातली होती. सरकारचे वाड्यापुढे रात्री राधेचा तमाशा देशिंगचा आला होता त्याचा केला मध्यरात्रपर्यंत जाहला.

छ. १४ मोहरम पौष व॥ १ मंदवासर मु. शहापूर श्री. रा. आपासो व तात्यासो व भाऊसो व बाबासो व पदरची मंडळी वगैरे सुद्धा बेळगांवचे किल्ल्यात तोफखाना पाहावयास गेले होते. तोफा व तोफाचें गोळे व बंदुखा वगैरे सामान फार चांगले होते व लोखंड कातावयाचे यंत्र वगैरे पाहिली स्वारी जाते वेळी बेळगावास श्री मारुतीचे दर्शनास गेले.

छ १५ मोहरम पौष शु॥ २ रविवार मु. शहापूर शहापूरचे वाड्यात काकणे करणार आणून काकणे कशी करतात ते पाहिले [भट्टीत काचा घालून सळई भट्टीत घालून, तापविल्यानंतर त्या वाकवून बांगडी करणे] वाकूध करतात ते पाहिले नंतर अस्तमानी इंग्रजी काळे पलटणचे हणमंतराव वगैरे सुभेदार व हवलदार मद्रासी ३–४ आसामी आले होते त्यांत अस्तमानचे घटका दिवसास तासगांवकर भाऊसो आले होते तासगांवास जाणेचा निरोप घेऊन गेले.

छ. १६ मोहरम व॥ ३ इंदुवार मु. शहापूर आपासो याणी कासार याजकडून काकणे करविली कोष्टी याजकडून लुगडे कसे विणतात तेहि पाहिले.

छ १७ मोहरम पौष व॥ ४ मंगळवार श्रीमंत घरच्या बायका मंडळीसुद्धा श्री वैजनाथ म्हणोन शिवस्थान मोठे शहापूरचे पश्चिमेस डोंगरात आहे तेथे स्वारी

जाऊन माघारी परत उचगांव म्हणोन शहापूराहून तीन कोस आदमासे आहे तेथे मुक्कामास आली तासगांवकर हे तासगांवास निघोन त्याच दिवशी चालते जाहले

छ १८ मोहरम उचगांव येथे स्वारी गेली तेथे गोपालपंत उचगांवकर याणी मेजवानी केली नंतर स्वारी माघारी बेळगांवास सायंकाळचे चार घटका दिवसास छावणी पलटणीची आहे त्याचे पश्चिमेस माळ आहे तेथे आली. त्यादिवशी इंग्रजी सरकारचे पलटणापैकी गोरे पलटणाची कवाईत जाहली बाराच्या फैरा जाहल्या. जनरल व कर्नल साहेब वगैरे साहेब लोक आले होते त्याचे मुजरे होऊन नंतर स्वारी अस्तमानी घटका रात्रीच्या सुमारास शहापुरास आली त्याच दिवसी प्रातःकाळी इंग्रजी सरकारचे पलटणापैकी मद्रासी पलटणाची कवाइत झाली बाणाच्या फैरा जाहल्या व तोफाची कवायत बेळगांवचे उत्तरेस माळावर जाहली. गोरे पलटणाची कवाईत पाहण्यास श्रीमंत घरच्या सर्व बायकामंडळी सुद्धा होती मिती छ १८ मोहरम पौष ५ बुधवार.

छ १९ मोहरम पौष व॥ ६ गुरुवार मु. शहापूर बापू शहापूरकर याणी मेजमानी केली भोजनानंतर सरकार वाड्यांत दुमजल्यावर नाच जाहला.

छ २० मोहरम पौष व॥ ७ भृगुवार मु॥ शहापूर मेहेरवां वड्डसाहेब याची स्वारी रिवीसनसाहेब याचे काम पहावयास आली उमदगीहून (?). त्याचे भेटीस त्याचा बंगला बेळगांव उत्तरेस आहे, तेथे जाऊन भेट घेऊन दोन घटका बसले. बोलणे वाघाचे लढाईत आपासाहेब यास नाकावर व कुशीस भाल्याच्या (जखमा) अशा लागल्या त्या प्रकरणांत होऊन ते निरोप घेऊन निघाले ते सडकेनेच तोफ.चें गोळे मारण्याचे मातीचा ढीग घालून तोदा केला आहे तो पाहून इंग्रजी सोजराचे पलटणांत आले तेथे मेहेरबा कर्णेलसाहेब व त्याचे हाताखालचे मेजर वगैरे सरदार येऊन भेटले साहेब याणी रिजमेटचे लोंक राहतात त्या बंगल्यात नेऊन शिपाई लोकांचे सामानसुमान वगैरे दाखवून दुसरे बंगल्यात नेले तथेहि तसेच दाखवून नंतर रथात आपासाो बसून रजिंमिटातील सोजर वगैरे दुखण्याने पडिले असतात ते एका ठिकाणीं राहून दाक्तर याजकडून बरदास्त करवितात तो बंगला रिजिंमिटचे छावणीचे उत्तरेस आहे तेथे नेले. आत जाऊन सर्व सोजर वगैरे लोक आजारी होते ते पाहिले आपासाहेब याणी एका सोजराचा हात पाहिला आणि त्याचे प्रकृतीचे मान त्या दाक्तरास सांगितले त्याचे परीक्षेस मिळाले तेव्हां ते कर्णेल वगैरे सरदार दाक्तर साहेब बहुत खूष जाले नंतर आपासोनी कर्णेलसाहेब व आणखी सरदार यांस शहापूरास येणे विषयी सांगितले रविवारी येतो म्हणोन साहेब बोलले नंतर आपासाहेब यांची स्वारी कर्णेलसाहेब सुद्धा रिजमेटचे छावणीहून आली कर्णेलसाहेब यांनीं एकंदर साहेब यांस जेवणाचा बेत करतात तो बघितला व जेवणाची भांडी सुऱ्या कातऱ्या वगैरे होती ती सर्व रुप्याची होती ती दाखविली व बंगलाहि दाखविला त्या भांड्यात एक भांडे भात केल्यापासून प्रहर दोन प्रहर पर्यंत ऊन जसाअसतो तसा असावा असे भांडे दाखविले.

ते भांडे असे आहे कीं खाली तीन पाय करून त्याजर ताम्हणासारखे करून त्याजवर तबकडो त्या तबकडीत भात शिजवून घालून त्याचे खालचे ताम्हणांत ऊन पाणी आधण सारखे घालावे आणि भाताचे थाटीवर पालथे टोपणासारखे असते ते घालावे म्हणजे खालचे पाण्याचें उबेने भात ऊन राहतो व वरील झाकणाचे योगाने भात निवत नाही असे आहे. दाक्तर साहेब याणीं आपले औषधी तेले वगैरे जिन्नस सर्व दाखविले नंतर स्वारी अस्तमानाबरोबर रथांत बसून माघारी शहापूरास आली त्याच दिवशी दोन प्रहरी कै. तात्या देशपांडे शहापूरकर यांचे चिरंजीव याणी श्रीमंतास वगैरे मंडळीसुद्धा मेजवानी केली. हंड्ट साहेब याणे बोलला जे " करवीरचे बंडाचे वेळेस आपली फौज आम्हाजवळ चिकोडींस होती म्हणून आमचे संरक्षण झाले नाही पेक्षा आम्हास बंडवाले धरून नेत होते " म्हणून वगैरे बोलणे झाले रात्री दुगासानी व कुशी बक्षीची कसबीण इचे गाणे आप्पासो याजजवळ जाहले नंतर फडणीस राहतात त्या बंगल्यात झाले. गाणे चांगले जाहले.

छ २१ मोहरम पौष व॥ ७–८ मंदवार मु॥ शहापूर अपासाहेब बेळगांवचे किल्ल्यात जनरल सो बंगल्यास गेले तेथे उंटसाहेब आले होतें जनरलसोनी तात्यासोस जवळ बसवून घेऊन फार संतोषे करून बोलले तात्यासाहेब याणी इंग्रजी कवाईतीचे शब्द भाऊ भावे यांस सगितले भावे याणी कवाईतीचे हात केले जनरल फार संतोष जाहले. नंतर जनरल साहेब याचे चिरंजीव यास शहापूरास मेजवानीस बोलावले साहेबाची प्रकृती नीट नाही सबब येणे होत नाहीं म्हणोन बोलले.

छ २२ मोहरम पौष व॥ ८ रविवार मु. शहापूर सकाळचे प्रहर दिवसाचे सुमारे रा. मोरोपंत आणा लेले आपासाहेबाचे भेटीस वाड्यातील मागील चौकात आले. बरोबर कै. साबाजीराव बागणीकर याचे नातू, पुत्राचे पुत्र ते, चिटणीस व त्याज बरोबर विसाजी पंत करंदीकर आणखी भले लोक सिलेदार वगैरे आदमासे ७-८ आसामी होते आपासाहेब याणी भरताजीम घेऊन भेटले नंतर कचेरीस बसले बोलणे जाहले व गोमांतकचे फिरंगी याजप्रकरणी मजकूर बोलले त्यातील अभिप्राय. फिरंगीयाचे व इंग्रजाचे वैमनस्य यावयाचे कारण कीं पुर्वकालास फिरंगी याचा पातशहा होता तो वारला त्याचे पोटी पुत्र नाही सबब त्याचे लेकीस गादीवर बसविले तेव्हा त्या बादशहाचा भाऊ होता त्याचे म्हणणे की माझे वडिल भावाचे पाठीमागे मी मालक त्यापेक्षां मी गादीचा मालक परंतु ते त्याचे कारभारी याणी न ऐकिना लेकीस गादीवर बसवून भावास दुसरे देशांत रवाना केले त्याणे तिकडे काही जमाव करून इंग्रजास अनुकूल करून घेतले आणि इकडे गोमांतकास गौवनर आहे तो हल्ली गादीवर जी आहे तिचे लगत्याचा आहे त्याचा काही घात करावा असा बेत त्याचा होता परंतु ते काही साधले नाही अशी अजब तरेची वाकडी आहेत व सावंतवाडीकर सावंत याणी बंड केले होते ते हल्ली कोठे आहेत म्हणोन

आपासाहेबाणी पुसले. लेले याणी सांगितले जे गोमांतकास फोड सावंत तेथे आहेत म्हणोन बोलणे होऊन नंतर दोन प्रहरी इंग्रजी सरकारचे काले पलटनचे चपराशी पैकी हणमंतराव हवालदार वगैरे लोक ८-९ आसामी व गोरे रेजिमेंटचे रैटर कोंडों रामानुज २५–३० असामी सुमार असे भोजनास आले होते. रामानुज यांची पंगत बापूचे घरी केली होती व हवालदार वगैरे यांची पंगत सरकारीं वाडयात मागील चौकात केली होती बेत जेवणाचा सुंदर जाला होता भाऊसाहेब याणी समाचार घेतला बहुत खूष जाहले नंतर विडे पान सुपारी जाहली नाच जाहला नंतर सर्व लोक याणी आपासाहेबाचा निरोप घेऊन गेले ते समई इंग्रजी सरकारातून तरवार आली ती सर्वत्रास दाखविली सर्वत्रांनी आपासाहेब यांचे लौकीकाची व कीर्तीची व इंग्रजी सरकारचे दोस्तीची तारीफ बहूतच केली. श्री. रा. तात्यासाहेब व बाबासो–उभयता व मंडळी कांहीं बालभा (?) वर्द (?) याचे येथे भोजनास गेली होती. तात्यासो व भाऊसो यांस सनगे दिली नंतर अस्तमानचे दोन तीन घटका दिवसास आपासो याची स्वारी वडगांवचे मळ्यात जाऊन परत आली. अस्तमानीं चार घटका रात्रीस वे. रा. त्रिंबक दिक्षीत वाटवे याणी आपले घरी फराळास आपासो वगैरे मंडळीस बोलाविले फराळास स्वारी आपासो भाऊसो वगैरे मंडळी गेली होती मोरोपंत आणा लेलेहि तेथे पंगतीस होते

छ २३ मोहरम पौष वा। ९ सोमवार मु. शहापूर .रा० जगन्नाथपंत गाडगीळ पोतनीस परगणे शहापूर याणी आपासो यांस मेजवानी केली सिलेदार मंडळीहि आली होती त्याचा निराळा बेत केला होता. त्याच दिवसी प्रात काळी इंग्रजी सरकारचे पलटणपैकी महारांच्या पलटणाची कवाईत बाराची जाहाली. आपासो कवाइत पाहण्यास गेले होते. आपासो यांची स्वारी येशवंत नाईक सराफ व बाजीपंत मराठे यांचे घरी गेली. तिसरे प्रहरी सांगलीहून वर्तमान आले कीं रा. रघुनाथ हणमाजी सरनोबत यांस पुत्र दुसरे पत्नीस प्रथम जाहला, दिवस नववा म्हणून सांगितले-अस्तमानी गोऱ्या रेजिमेंटचे बेंडबाजेवाले सुमारे ३६ व कर्नलसाहेब व त्याच्या हाताखालचे मेजर व सुभेदार वगैरे मिळोन १६ असामी शहापुरास आले. वाडयात बेंडबाजा जाहला आपासो व गोरे अधिकारी याणीं कचेरीत बसून बाजा बघितला. तरवार बघीतली. आतल्या दुमजल्यावर गोऱ्या अधिकाऱ्यांचे मेज झाले. नंतर अस्तमानी हंड्ड साहेब आले त्याणी तरवार पाहिली त्यात तरवारीवर बाळबद किताब लिहिलेला वाचून पाहिला व तरवारे-बरोबर गौरनर सो याची थैली आलेली साहेब याणी आपणच वाचून पाहिली. कर्नाटकी कळवातिणी नाचत होत्या. साहेब म्हणाले हिंदुस्थानी गाणे यास येते किंवा नाही तेव्हां येते म्हणोन सांगितले आणि तुंगसानी इला उभी करून हिंदुस्थानी नाच जाहला. साहेब गेले तेव्हां रात्र जाहली होती सबब त्यांचे बरोबर महतापा दिल्या होत्या. उद्या संक्रमण सबब कगराळी नदीस स्नानास जावे

असा बेत केला होता परंतु आपासाहेब यास किंचित् शैत्य होऊन पडसे आले सबब राहिला.

छ. २४ मोहरम पौष व॥ १० सोमवार मु. शहापूर

संक्रांत १६ घटका दिवसास लागली त्या दिवशी स्वारी शहापुरांत होती तिळ-शरकरेचा समारंभ जाहला गावातील सावकार वगैरे आले होते. अपासोनी इंग्रजी पलटणातील लोकास तिळसाखर पाठविली.

छ. २५ मोहर पौष व॥ ११ बुधवार मु. शहापूर
काही गोरे पलटनचे, वाड्यात आले होते त्यास तात्यासो यानी कवाईत करून दाखविली

छ. २६ मोहरम पौष व॥ १२ गुरुवार

आपासो याची स्वारी बेळगाव किल्ल्यात सांडणीसोपाद्र्याचे बंगल्यात गेले. तेथे उंटसाहेब आले होते. तेथे लाकूड कापणारे व कातणारे आगीचें यंत्र होते ते पाहण्यास आपासो बरोबर कारागीर घेऊन गेले होते. साहेबाच्या मडमेने इंग्रजी वाद्याची पेटी बुक ठेवून त्याप्रो वाजविली. नंतर दुसरी पेटी चागली वाजती ती दाखवितो म्हणोन उभयतासो सुद्धा साहेब यांचे आदितवारी देवाचे स्मरण करावयाचे हपीस आहे तेथे गेले. तेथे ते वाद्य वाजवून दाखविले फार सुंदर आहे. नंतर एक बुक इंग्रजी अक्षराचे छापलेले पाद्रीसाहेब याणी आणिले. ते आपासो याजकडील भवानसिंग रजपूत याणे वाचून दाखविले. त्यात हाशील—भगवान याणे आपल्यास उत्पन्न केले आहे त्यापेक्षा त्याचे ठिकाणी विश्वास ठेवून त्यास भजावे म्हणजे तो आपणास कांहीं संकट पडू देत नाही म्हणोन वगैरा आहे ते वाचून पाहून नंतर आपासो स्वारी शहापुरास आली या भेटीत पाद्रीच्या बंगल्यात विहीर आहे ती पाहिली. ती पाहताना साहेब म्हणाले (उंटसो) " बाजूने हळूच उतरावे. आपले सारखे माणसे कोठली ? " आपासो मेण्यांत बसावयास लागले तो पाद्रीसाहेबाच्या दोन तीन मुली आल्या आम्ही मेण्यात बसतो म्हणाल्या आपासो दोघी मुली ७-८ वर्षाच्या होत्या त्यास मेण्यांत घेतले व एक मुलास हत्तीवर बसविले आणि थोरले वाद्य ऐकावयास गेले. त्याच दिवशी तिसरे प्रहरीं शहापूरचे वाड्यात इंग्रजी सरकारचे काळ्या पलटणचे हाणमंतराव वगैरे आपासोचे भेटीस आले होते

छ. २७ माहे मोहरम पौष व॥ १३-१४ शुक्रवार मु. शहापूर मेहेरबा इलवर्ड साहेब हे बेळगांवास रिवीससाहेबाचे कामावर मुंबईहून आले. आपासो याचे वडील चिरंजीव कै. गणपतराव बाबासो यांची पत्नी कै. सत्यभामाबाई यांचे सांवत्सरीक श्राद्ध झाले. सकाळचे १२ घटिका दिवसास बेळगांवाहून सोजर ६ असामी आपासो पाहाण्यास आले होते त्यास केळी वगैरे मिठाई दिली. अस्तमानचे घटका

रात्रीस मोरोपंत लेले हे आपासो याजकडे भेटीस आले होते चार पांच घटका बसले होते. त्यास इंग्रजी सरकारची कामे दोस्तीखातर बज्याविली त्या प्रकरणी वाका तयार जाहला तो रिवीसनसाहेब याजकडे दिला. त्याची नकल वाचून दाखविली.

ते निरोप घेऊन गेल्यावर रणमल्ली म्हणोन कर्नाटकी गाणे आहे तो अर्धघटका-पर्यंत जाहला. काल स्वारी आपासो यांची किल्ल्यात पाद्रीसाहेबाचे बंगल्यास गेली. तेथें त्याची मुले हत्तीवर बसतो म्हणाली सबब आज हात्तीवर हौदा व अंबारी घालून किल्ल्यात पाठविली होती त्यात त्याणीं बसून घटकाभर फिरविली

छ. २८ मोहरम पौष व॥ ३० शनिवार मु. शहापूर

अपासोस्वारी तिसरे प्रहरी वडगांवचे मळ्यांत गेली होती दुसरे कांहीं नवलविशेष नाहीं. रा. गोविंदराव कारकून निसबत पंत प्रतिनिधी हे आले त्याचें सांगण्यात प्रतिनिधी याणीं ममईस लिहिले होते कीं आपणास मुल नाही सबब ओव्यात घेणार म्हणोन त्याजवरून हुकूम आला कीं मुल दत्तक घ्यावा व नजर व मुलाचे नांव येविसो महाराज सरकार यास लिहिले. बाबा सिराळकर हे मशारदिल्हे बराबर आले

छ. २९ मोहरम माघ शु॥ २ रविवार मु. शहापूर

आपा फडणीस याणी मेजमानी केली बापू शहापूरकर हे अनगोळाहून शहापूरास आले. मोरोपंत लेले यास अस्तमानी आपासो याणी आपलें पंगतीस फरालास बोलाविले होते. आपासाहेब याचे भाईबंद याणी आपासाहेबाचे नाशाविसी कसकसे उद्योग केले व आपासाहेब याजकडून भाईबंद याचे कल्याणाविसी कसे उद्योग केले त्याप्रकरणी वाके बंद दोन रित्रीस साहेबाकडे दिले त्याची नकल व मजमदार प्रकरणी वाका काही वाचून दाखविला. नंतर आपा रैटर वगैरे रैटर मंडळी इंग्रजी सरकारचे पदरचे आपासाहेबाकडे मेजमानीस आले होते. इंग्रजीसरकारचे पदरचे साहेब लोक वगैरा कामगार गैर आदबी करतात त्याप्रकरणी गोष्टी निघाल्या होत्या. तिसरे प्रहरी कृष्णराव सरआमीन आपासाहेबाचें भेटीस आले होते त्याणी इंग्रजी सरकारचे येथे एकंदर जमेची कलमे व खर्चाची कलमे तपशिलवार किती प्रकारची त्याची याद व इंग्रजी सरकारचे दौलतीचा बंदोबस्त कसा कोणच्या रीतीचा करितात तेसुद्धा लिहून आणिली होती. लेले निरोप घेऊन गेले

छ. ३० मोहरम माघ शु॥ २ इंदुवासर मु. शहापूर.

प्रातःकाली गोविंदपंत निसबत प्रतिनिधी कराडकर हे आले होते बोलणे जाहले त्यातील हाशिल. श्री. सौ. मा. लक्ष्मीबाई प्रतिनिधी याणीं दत्त मूल घ्यावयाचा ये विषयी छत्रपती सातारकर याजकडे याद दिली. त्याणी उटरामसाहेब रसिडट याजकडून मुंबईस लिहविले त्याजवरून दत्त मूल घेणेविषयीं हुकूम आला आहे. त्यास मूल घ्यावयाचा तो थोर प्रऊढ शहाणा मुंज लग्न झालेला घ्यावा किंवा लहान घ्याव-

याचा विचार करून श्री देवीस चिट्या टाकून मग अज्ञा देईल तसे करण्याचे ठरले म्हणोन बोलले. आपासो म्हणाले फार चांगले केले. मुलाचे जातक वगैरे पाहून घ्यावा असे आपासो म्हणाले गोविंदपंत निघोन गेले. दोनप्रहरी कै. गोपाळराव यांचे श्राद्ध सावत्सरीक जाहले. मोरोपंत लेल्याकडील ५० शिलेदार मंडळी भोजनास बोलावले होते ते जेवण करून गेले. सायंकाळी स्वारी इनवर्डसाहेब याचे भेटीस बेळगांवचे उत्तरेस पोलटक्क्यालिचा बंगला थोरला आहे तेथे गेली. साहेब व हंटसाहेब असे उभयता बंगल्याखाली मैदानांत सामोरे आले. आपासोचा हात धरून वर गेले. आम्हीं तुमच्या भेटीची इच्छा फार दिवस करीत होतो म्हणाले आपासो नी विचारले आपले येणे या मुलखात कधी झाले होते किंवा नाही ? साहेब नाही म्हणाले. नंतर साहेबांनीं तात्यासाहेबास विद्या कोणच्या येतात म्हणून पुसले. तेव्हां इंग्रजीचा आभ्यास करण्यास सुरवात झाली आहे, मराठी येत आहे, बंदूक पट्टा दांड लकडी घोडयावर बसणे शास्त्र व वेदाभ्यास वगैरे बहूत चालला आहे म्हणोन सांगितले आणि बुक होते तें घेऊन कांहीं अक्षरे वाचून दाखविली. मराठी पुस्ती दाखविली. बंदुकीचा बार काढला व पट्ट्याचे हात केले. नंतर साहेबानी आपासो पुसले इकडील हवा चांगली किंवा सांगलीकडील चांगली ? आपासो उत्तर केले इकडील हवा सर्द बहूत आहे–ते पुढे म्हणाले आणखी चार दिवसांनीं धारवाड व शिरटीस जाऊन मग सांगलीस जाऊ. तात्यासोकरितां नवस केला आहे म्हणून कोकणातहि जावयाचे आहे. साहेब म्हणाले आता तेथे उन्हाळी दिवस. आपासो म्हणाले पाहू. उन फार झाल्यास पुढले वर्षी जाऊं. साहेबांनीं तरवार पाहण्याची इच्छा दर्शविली तेव्हा उदईक उंटसाहेबाचे एथे यावे तेथे दाखवितो. साहेब बरे म्हणाले.

छ. १ सफर माघ शु॥ ३ मंगळवार मु. शहापूर.

श्री. स्वामीसंकेसवर याच्या पदरचे शिवरामभट लाटकर व बाबा दिवाण वगैरे मंडळी भेटीस सकाळीच आली होती. घटका दिवसाचे सुमारे इनवर्डसो व हंट्रसो व ग्राटसाहेबाचे चिरंजीव असे तिघे शहापूरचे वाडयांत मेजवानीस आले. आपासोनी तोफाचे पांच बार करविले. इंग्रजी सरकारातून आलेली करांचली दाखविली. नंतर आतल्या दिवाणखान्यात जेवणे झाली. जगद्गुरु प्रकरणी आपासोनी बोलणी काढली तेव्हां उदईक कागदपत्रे पाहून चौकशी करतो असे साहेब बोलले. साहेब गेल्यानंतर आपाजीराव देसाई जांबोटीकर हे भेटीस आले.

छ २ सफर माघ शु॥ ४ सोमवार मु. शहापूर.

अपासो तात्यासो इंग्रजी पलटणाच्या कवाइती पाहण्यास गेले होते. मोरोपंत लेल्यास भोजनास बोलावले होते. बाजीपंत मराठ्यांनीं आपले घरी कांहीं मंडळी भोजनास बोलाविली होती. तिसरे प्रहरी लेले निरोप घेण्यास मंडळीसुद्धा आले होते त्यास शेलापागोटी दिली. सकाळी स्वारी जांबोटीकर देसाई यांजकडे गेली होती आपासो स्वारी वडगांवचे मळ्यात जाऊन अनगोळास ठाण्यात कुरुंदवाडकर याचे येथे गेली होती.

मोरोपंत लेले यास निरोपसमई खास पागेपैकी एक घोडी दिल्ही तिचें नांव महबूगांगी, देशपांडे इची सिंगी.

छ. ३ सफर माघ शु॥ ५ गुरुवार मु. शहापूर.

मल्हारराव घोरपडे रिसालदार यांस जेवावयास बोलाविले होते. पावणोजीराव देसाई जांबोटीकर व आपासाहेब व आबासाो कुरुंदवाडकर ही मंडळीसुद्धा भोजनास होती. देसायाबरोबर कारकून मंडळी ८-१० शेणवी होते. त्यांची पंगत निराळी मांडली होती.

रात्रौ वसंतपचमी सबब तुगांसानी इचा नाच झाला.

धर्मराव देसाई काकतीकर याणी आपला मुलगा लहान दोन वर्षांचा, काल आपासाहेब यांचे पायावर घालणेस आणला होता. ते वेळेस त्याजकडून पुतळी व कांहीं मिठाई जिन्नस नजर ठेवली व सनगे दिल्ही ती आपासाहेब याणी मान्य करून त्यास पुतळी दिल्ही व अनत्यास (आणणाऱ्यास) सनगे व दाली पडदळे दिले.

छ. ४ सफर माघ शु॥ ६ शुक्रवार मु. शहापूर भाऊसो शहापूरचे दक्षिणेस एक कोस सुमार, महिगालगड आहे तो पहावहास गेली होती. जाऊन परत आले. तिसरे प्रहरी आपासाो बेळगांवचे किल्ल्यात दाक्तर साहेबाचे बंगल्यात जाऊन तेथून साहेबसुद्धा प्रकृती व हत्यार वगैरे औषधी ठेवावयाचे हपीस किल्ल्यांत आहे तेथे जाऊन सर्व हत्यारे व औषधी कुप्या वगैरे दाखविली व कागद सेण एकत्र करून मनुष्य केले आहे; त्या मनुष्याचे अंगातील रक्त मांस व शिरा व हाडे दिसावी असे रंग निरनिराळे करून ठेवले आहे ते दाखविले. नंतर स्वारी साहेबसुद्धा दाक्तराचे बंगल्यास आली. तेथे त्याणी आपले मूल ७ दिवसाचे लहान तान्हे दाई मडम इजकडून आणून दाखविले. मुलगा होता. मनुष्याची परीक्षा कोठें शिरा किती असतात, पोटात बाईकाचे मुल असते ते कसे असते, ते उपजते कसे, त्याच्या तसबीराची वही एकंदर इंग्रजी होती ती दाखविली. नंतर स्वारी दोन घटका दिवसास बेळगावास आली. आज दिवस चांगला मुहूर्त स्वारी निघण्याचा, म्हणून प्रस्तान ठेविले. उदईक भोजनासच स्वारी बाळे कुंदरीस जाणार-वे. शा. स. रा. शुभकृष्ण शास्त्री यांस संभावना धोतरजोडा व उभयता चिरंजीवासहीं दोन धोतर जोड दिल्हे.

रा. गोविंदनाना भिलवडीकर हे मिरजेस गेले वे. रा. सखंभट मामा करमरकर याणी आश्रम घेतला. सबब त्याचे चिरंजीव गुंजुमामाहि गेले.

छ ५ सफर माघ शु॥ ७ मंदवार मु. बाळे कुंदरी. आपासाहेबाची स्वारी दोन प्रहरचें सुमारे बाळेकुंदरीस पोहचली. बाळेकुंदरीस पाणी अगदी जवळ दोन अडीच हातावर विहिरी निघतात सबब तात्यासाो याणी दोन मनुष्याकडून विहीर अस्तमानी खणवली. तीन हातावर पाणी लागले. दोन तीन घटकात विहीर जाहली. विहिर औरस चौरस दोन हात रुंद व लांबीची खंटली शहापुराहून बाळेकुंदर कोस अडींच-

आवशीचे प्रहर रात्रीचे सुमारे हरीहरराव दादा लागू शिरटीहून आले. आपासाहेबास नमस्कार करून लगेच गेले. स्वारी निद्रेस गेली.

छ. ६ सफर माघ शु॥ ८ रविवार मु. बाळेकुंदरी. बापू शहापूरकर यांचे चिरंजीव हे उदईक आष्टेयास आपले घरी मेजमानी आपासाो यास करणार.

छ ७ सफर माघ शु॥ ९ सोमवार मु. बाळेकुंदरी-आष्ट्यास बापू शहापुरकराचे घरी मेजवानीनंतर तात्यासोस तमंच्या एक फर्ददिपाचा दिल्हा (?) स्वारी अस्तमानी दोन घटका दिवसास आष्टेहून बाळेकुंदरीस आली. गोविंद कृष्ण पटवर्धन हे काही डाक्तरी जाणतात सबब त्यास व भाऊसाहेब यास बेळगांवास इंग्रजी सरकारचे पदरचे डाक्टर आहेत त्याजवळची हत्यारे व कलमे वगैरे पाहून सर्व समजून घेऊन यावे म्हणोन आज प्रातःकाळीं बेळगांवास पाठविले होते.

छ ८ सफर माघ शु॥ १० मंगळवार मु. बाळेकुंदरी, उदईक प्रातःकाली इंडसाहेब हे बेळगांवाहून अथणीकडे जाणार त्याचा मुक्काम उदईक मारेहाळास आहे. जाताना आपासाहेबास भेटून पुढे जाणार असे पत्रच साहेबाचे आले. वापटाचें घरची चाळीसपन्नास मनुष्ये कुटुंबीय पाहून आपासाहेब संतुष्ट झाले.

छ ९ माघ शु॥ ११ सफर बुधवार मु. बाळेकुंदरी. इनवर्डसाहेब बाळेकुंदरीस भेटीस आले होते.

छ १० सफर माघ शु॥ १२ गुरुवार मु. सुळेभावीं, आपासाहेब यांची स्वारी काकतीस काल गेली होती ते आज प्रातःकाळीं स्नान संध्या जाहाल्या नंतर मंडळी-सुद्धा करगुपीकर याचे वाड्यांत त्याणी मेजमानी केली, उत्तम केली. त्याणी सणगे दिली नंतर स्वारी धर्मराव देसाई काकतीकर याचे घरीं गेली. त्याणी साखर वगैरे जिन्नस नजर ठेविली व सणगे दिल्ही. नंतर धर्माआपाचे चुलत पुतणे दोडीपा देसाई याचे घरी स्वारी गेली. तेथेंहि सदहू प्रमाणेच सणगे वगैरे दिल्हे. नंतर स्वारी खानापा देसाई काकतीकर याचे घरी गेली. तेथेहि त्याणी सदरहू प्रमाणे सनगे वगैरे दिल्ही. नंतर स्वारी गौंडवाड कऱ्यात काकती पेटा शहापूर येथे गेली. बापुराव कुळकर्णी याचे घरी त्याणी बोलाविले. सबब गेली. तेथे त्याणी जिन्नस वगैरे व सनगे दिल्हीं. नंतर स्वारी निघाली ती आष्टेचे मार्गाने निघाली ती अगस्तीतीर्थ भरमहट्टीचे वाटेस डोंगराचे कडेस आहे तेथे जाऊन दर्शन घेऊन आष्टेस आली. आष्ट्यास बापू शहापूर याच्या सुनेचे गर्भादान. सबब श्री. रा तात्यासाहेब व भाऊसाहेब वगैरे व श्रीं सौ. मा. बाईसाो वगैरे सभारंभास गेली. बापूचे चिरंजीवास आहेर करून चार घटका बसून स्वाऱ्या सुळेभावीस गेल्या. मागाहून आपासाहेब यांची स्वारी आष्ट्यास आली. बापूचे घरी आली. बाबांनी मानाची सनगे दिल्ही--मंडळीनी बाबास आहेर केले. साखरपाणी घेऊन स्वारी अस्तमानचे चार घटका दिवसास सुळेभावीस आले. पुढे सामोरे रा- रामचंद्र नाना

देशपांडे व त्याचे तिसरे चिरंजीव रा. दाजीबा उभयता शंभर आसामी अदमासे काटक घेऊन पुढे आडवे आले व गांवकरी याणी भेट ठेविली. स्वारी गांवालगत श्री महादेव याचे दर्शन व श्री. गणपतीचे दर्शन घेऊन स्वारी नानाचे घरी आली. तेथे राहणे जाहले. मंडळी गांवात राहिली. पुणेकडील पत्रे आली त्यांत रा. माधवराव देशमुख याचे पत्र आले त्यात त्याचे दायाद कोणी वारले ते वर्तमान लिहिलें होते, सबब श्री. सौ आवडाअक्का यांस आशौच तीन दिवसाचे आले. आज प्रथम दिवस रा. बाबा मज्यालेली (?) याणी काल श्रीमंताचा निरोप बाळेकुद्रीस घेऊन आज आष्ट्यास राहून उदईक तासगांवास जाणार. नाना देशपांडे याणी घोडीं व हत्तीस चंदीवैरण वगैरे दिल्हीं. काकतीपासून सुळेभावी कोस चार.

छ. ११ सफर माघ शु॥ १३ शुक्रवार मु. बुध्येहाळ. श्री. रा. आपासा वगैरे व श्री. सौ. मा. वगैरे मंडळी यास मेजवानी सुळेभावीस नाना देशपांडे याणी केली नानांची पत्नी नुकतीच वारली सबब सगने देऊ नये येविशी नानास आपासाहेब याणी आज्ञा केली परंतु त्याचा मनोदय देण्याचा फार पडला. सबब सर्वत्रास सनगे दिल्ही. रा. हरहरराव दादा लागु त्याची पत्नी हरीपूरास आहेत त्याचे प्रकृतीस बरोबर नाही सबब पत्र आले यावरून हरीपुरास जाणें करितां आजच सुळेभावीहून चालते झाले. आपासो याची स्वारी सुळेभावीहून अडिच प्रहरी निघाली ती सुळेभावीचे पेठेत चावडी आहे तेथे जाऊन क्षणभर बसले. पेठकरी याणी नजर नजराणा केला. स्वारी चालती जाहली ती गांवचे दक्षिणेस कै. आण्णादेशपांडे याणी आंबराई लाविली आहे ती पाहून गांव सारा डावा टाकून बुध्देहाळचे मार्गे निघाली. पावकोस पर्यंत. नाना देशपाडे स्वारीस पोचवित आले नंतर निरोप घेऊन माघारे गेले. स्वारी पुढे चालती जाहली. श्री. रा. तात्यासाहेब हे रा. बळवंतरावजी फडणीस याचे घोड्यावर फडणीस यांजपुढे बसले आणि दोन कोस बुध्देहाळ पर्यंत रपटेसातला (?) गेले. मागाहून स्वारी अस्तमानचे तीन घटका दिवसास बुध्देहाळास आली. पुढे सामोरे अदकोस पर्यंत रा. लिंगोपंत तात्या देशपांडे हे शेपन्नास काटक, हलगे शिंग तासेवाले सुद्धा आले होते. स्वारी अण्णा देशपांडे याणीं वाडा बांधला आहे तेथे राहिली. मंडळी वगैरे गांवात घरोघर राहिल्या. स्वारी बरोबर तोफखाना आहे त्यांस बुद्धेहाळचा रस्ता नीट नाही सबब परभारे सुळेभावीहून ज्यासरगीस उदईक सडकेवरून न्यावा हेविसी सांगितले. तोफखान्याबरोबर हशम व स्वार वगैरेचा बंदोबस्त केला आहे. वे. रा. गोपाळभट तात्या वाटवे हे सांगलीहून आपले मुलाची मुंज माघ शु॥ २ स व दाजीबाचे मुलाचे लग्न माघ शु॥ ५ चे करून स्वारीत बुद्धेहाळचे मुक्कामास आले. दाजीबाचे मुलास नवरी जनवाडयात केळकर यांचीं कन्या. तात्या देशपांडे याणी घोडयास चंदी वैरण दिली सुळेभावीपासून बुद्धेहाळ कोस चार.

छ. १२ सफर माघ शु॥ १४ मंदवार मु. कोणूर श्री. रा. आपासो याणी स्नानसंध्या आटोपून सहा घटका दिवसास बुध्देहाळ नजीक गुजनामाळ म्हणोन

पाव कोसावर आहे तेथील कुळकर्णीपणाची वृत्ती बापू शहापूरकर याची आहे सबब त्याणी तेथे घर बांधले आहे तेथे सडीस्वारी गेली होती. चार घटकानीं माघारी आली. नंतर १३ घटका चतोर्दिसी टाळून स्नान करून रा. लिंगो निळकंट देशपांडे याणी मेजमानी केली ती जेवणे मंडळीसुद्धा खाशांची जाहली. देशपांडे याणी आपासाहेब यांस शालजोडी पागोटे व तात्यासाहेब वगैरे यास दुपट्टे व शेले पागोटी व श्री. सौ. बाईसो वगैरे यास लुगडी खण दिल्हे व कांहीं मंडळीस सनगे दिल्हीं नंतर २॥ प्रहरी स्वारी गोकाकचा धबधबा घटप्रभा नदीचा डोंगरावरून पडतो तो पाहावयास निघाली, ती पाछापूरनजीक दक्षिणेस कंगराळी नदी उतरून कोणूरास आली. पाछापुरास रा. भाऊ देशपांडे याचे घरी स्वाऱ्या सर्व गेल्या साखरपाणी घेऊन अस्तमानी कोणूरास आल्या. त्या मुक्कामी इनवर्ड साहेबाचा मुक्काम जाहला आहे. स्वारीचा मुकाम गांवचे अग्नईस घटप्रभेचे दक्षिणभागी ज्या ठिकाणी नदीची दोन वळणे होऊन मध्ये बेट झाले आहे त्याचे दक्षिणेस जाहला. रा. बापू चोळीकर (जनतीकर ?) हे खुद्द व धाकटे चिरंजीवासह निरोप घेऊन गेले. थोरले चिरंजीव रा. आबा हे मात्र आहेत तो मुक्काम बुद्धेहाळापासून कोस सहा.

छ. १३ सफर माघ शु॥ १५ रविवार मु. पाछापूर श्री. रा. आपासाहेब व श्री. सौ. मा. बाईसो वगैरे सर्वत्र मंडळीसुद्धा स्वारी भोजन करून कोणूर नजीक आठ कोसावर पूर्वेस डोंगरात घटप्रभा नदीचा धबधबा पडतो तो पाहावयास गेली. धबधबा पडतो तेथे दोहीकडून डोंगर. मध्ये कडा शंभर दीडशे हात उंची व पांचशे हात लांबी तुटला आहे. तेथे नदी पूर्व मुख पडती आहे, मोठा खळाळ होऊन पडती. तेथे आवाज मोठा होतो. पाणी पडते ते पांढरे सफेत असे दिसते. त्या पाण्याचे वाखाने (रोखाने ?) जर मधून दगड मारला तर कांहीं जाऊ पाहात नाही अलिकडे येऊन पडतो, पलीकडून मारल्यासारखा येतो. नदी खाली पडते त्याचे दक्षणेस व उत्तरेस दोही कडेस श्री. महादेवस्थाने देवालये आहेत. दक्षणेचे देवळात एक गोसावी राहात आहे. तो सारंगी करमणुकीकरिता वाजवीत बसतो. त्यास एक रुपया दिल्हा. नंतर स्वारी माघारी फिरली. खासा स्वारी पुढे आली. आदकोसाचे अंतराने तात्यासाहेब व श्री. सौ. बाईसाहेब यांची स्वारी आली तो डोंगरात माणसाचे आवाजावर वाघ उठला तो स्वारीतून गेला. लहान होता. हे तात्यासो यांस कळताच घोडयावर बसतो म्हणून बोलून पालखीतून घोडयावर बसले आणि भालदारास हुकूम केला जे पुढे हत्तीवर निशाण आहे त्याचे मागे करोल स्वार चालावे त्यामागे भालेकरी स्वार चालावे व त्यामागे आडाव स्वार व आडाव पायदळ व बाणदार वगैरे जिलीब चालावी. तसे पाठीमागे बंदोबस्त आसावा म्हणोन सांगितले आणि आपले हातात बंदूक भरून तोडा पेटवून घेतली आणि म्हणाले जे वाघ कोठे आहे तो येऊ दे पाहतो कसा आहे त्याचा तमाशा म्हणोन-परंतु वाघ कांहीं आला नाहीं झाडीत निघोन गेला. स्वाऱ्या पुढे आल्या. हे वर्तमान सर्वत्रांनीं

पाहून या वयात अशी अक्षरे हिमतीची निघतात व तरतूद करवितात त्याजवरून आश्चर्य केले. आपासाहेब पुण्यवान व मर्द त्या पुण्याच्या या गोष्टी आहे. नंतर स्वारी पाछापुरास आली. हे वर्तमान सर्वत्रानी आपासाहेब यास विनंती केली. फार संतोष जाहला. आणि तात्यासाहेब यांस विचारले कीं कसे जाहले ते सांगावे म्हणोन-नंतर तात्यासाहेब याणी जो जाहला प्रकार सांगितला. स्वारी सहा घटका दिवसास सायंकाळचा होते वेळेस आली. स्वारीचा मुक्काम गांवचे ठाण्याचे आग्नेयीस कगराळी नदीचे उत्तर भागी मळ्यांत जाहला. रामचंद्रपंत बाबा देशपांडे व भाऊ देशपांडे पाच्छापूरकर हे भेटीस आले. त्याणी उदईक मेजवानीचा बेत आपले घरी गांवात केला आहे व आपासाो याचा मुकाम गांवात पाणी व रस्ता चांगला नाही सबब ठिकाणास जाहला आहे. सर्वत्र खाशे मंडळीसुद्धा यास आमंत्रण केले व सरकारी वगैरा एकंदर हत्ती, घोडी, उंट वगैरे यास चंदी वैरण दिली. कोणूराहून पाछापूर मुक्काम कोस पांच.

छ. १४ सफर माघ व. १ सोमवार मु. न्यासरगी ताो कित्तूर पाच्छापूर येथे बावा व भाऊ देशपांडे यांचे घरी सर्व मंडळी भोजनास गेली होती. आपासाो व तात्यासाो भोजनाचे साहित्य आणून ठिकाणी दिल्हे होते. भोजन करून नंतर देशपांडे याचे घरी गेले. १४ घटका दिवसाचे सुमारे स्वारी निघोन आडीच कोसाचे सुमारे आडवी आय्या जंगम मठ मौजे आंकले पाो पाछापूर याचे रानांत त्याचा मठ आहे तेथे गेली. अय्या हा मोठा थोर माणूस आहे. त्याणे मठ मोठा बांधिला आहे. जो मनुष्य जितके येईल त्यास. अन्न घालतो. त्यास प्राप्ती म्हटले तर आंकलेचे आसपास सात आठ कोसपर्यंत जितके गांव आहेत त्या गांवचे लोक जे आहेत त्याणी नित्य एक भाकरी नेऊन पोचविल्या खेरीज जेवण करीत नाहीत व कोणी वर्षाचे काठी दोन चार रुपये ज्याची जशी शक्ति असेल ते देतात. त्या पैक्याचा मठ बांधला आहे व ज्या भाकरी वगैरे येतात त्या वाटसरू वगैरे लोकास देतो असे आहे. तेथे दोन तीन घटिका स्वारी बसून नंतर निघाली ती हणमर हट्टीचे बारीने नासरगीस आली ती आस्तमानाबरोबर आली. हणमरहट्टीकर कमाविसदार याणी नजर वगैरे ठेविली व सणगाबद्दल कांहीं रुपये ठरवून दिल्हे. सुळेभावीस तोफखाना होता तो न्यासरगीस आला. जंगम आय्या यांस वीस रुपये पाठवून दिले. पाछापूराहून न्यासरगी मुक्काम जाहला तो गांवचे उत्तरेस ओडयाचे पलीकडे आंबराईत व विहिर आहे तेथे जाहला. मुक्काम कोस सात.

छ. १५ सफर माघ वा॥ २ मंगळवार मु. संगोली नासरगीहून सर्वत्रांनीं भोजन करून दहा घटिका दिवसाचे सुमारे कूच जाहले ते देवलापूर ताो कित्तूर यांजवरून संगोळी मलापहारी नदीचे दक्षिण तिरास संगोळीचे पूर्वेस मुक्काम जाहला. रा लिंगोपंत देवपूर याचे घर देवलापुरास आहे तेथे त्याणी तात्यासाो व बाबासाो यांस उदईक भोजनास बलाविले. सबब जाणार. आपासाो वगैरे यांस उदईक संकष्टी आहे सबब एरवीच घरी जाऊन येण्याचा बेत आहे.

संगोलीकर गांवकर याणी फडफरमास आणून दिल्ही काशीहून साहेबी द्राक्षे रा. जगन्नाथ पंत खाडिलकर याणीं पाठविली ती पुण्यास आली तेथून मुक्काम मजकुरी देवलापूरकर यांजबरोबर येऊन पोहचली न्यासरगीहून संगोली मुक्काम कोस चार

छ—१६ सफर माघ व० ३ बुधवार मु. गुरलहसूर.

श्री. रा. तात्यासो व बाबासो यांची स्वारी प्रातःकाळी स्नानासच देवलापूरास लिंगोपंत याचे घरी गेली. तेथे स्नान संध्या करून उभयता जेवण केले मागाहून श्री. रा. आपासो व भाऊसो श्री. सौ. बाईसो व आवडाबाई व सूनबाई यांस संकष्टीचे उपोषण सबब तशीच जाऊन विडा घेऊन आले लिंगोपंत याणी सर्व खाशा मंडळीस सणगे दिल्ही नंतर स्वारी गुरलहासुरास परभारे देवलापुराहून आली. प्रातःकाळी तोफखाना होडवाडास परभारा गेला वुणगे वगैरे संगोलीहून दुसरे वाटेने गुरलहासूरास आले स्वाऱ्या रा. नाराप्पा नाईक याचे घरी उतरल्या मंडळी गांवात घरोघर उतरली पागा व हत्ती वगैरे पेठेत श्रीचिदंबर दिक्षित याची समाधी आहे त्याचे पुढे उतरले रा बाळकृष्णराव भाऊ लागू हे शिरटीहून परवा सोमवारी हरीपुरास त्याचे मातुश्रीची प्रकृत नीट नाहीं सबब जाण्यास आले ते याच मुक्कामी काल आले आज निघोन रातोरात पुढे चालते झाले संगोलीहून गुरलहासूर कोस सहा.

छ १७ सफर माघव० ४ गुरुवार मु. गुरलहासूर.

श्री. रा. अप्पासो याची वगैरे जेवणे रा. सिनाप्पा नाईक याचे घरीच होऊन दोन प्रहरचे सुमारास श्री यल्लमाचे डोंगरास दर्शनास जाण्यास स्वारी निघाली गुरलहासूरचे पूर्वेस दोन कोस सवदत्ती म्हणून गांव आहे त्या वाटेने सवदत्तीस जाऊन गांवा लगतच पूर्वेस डोंगर आहे तो दीड कोस सुमार आहे तो चढून स्वारी वर देवीजवळ गेली देवीचे दर्शन घेऊन दक्षणा वगैरे सर्वत्र खास मंडळीनी ठेविली. देवीजवळ ब्राम्हण भिक्षूक वैष्णव वगैरे होते. त्यास संभावना व देवीजवळचे सेवेकरी व जोगत्यास कांहीं देऊन अस्तमानचे चारपांच घटका दिवसाचे सुमारे माघारी फिरली श्री. देवीचे दर्शन घेऊन देवीपुढे मंडपांत आपासो याची स्वारी क्षणभर बसली होती जवळ भाऊसो व गोविंद हरी बिनिवाले व रामाजी नाईक वगैरे मंडळी काहीं होती बिनिवाले हे आपासो याजवळच लगत होते त्यास त्या मंडपात सोने वजन अर्ध गुंज सुमार सांपडले ते त्याणी लागलेच आपासो यास दिल्हे आपासो याणी पाहून सोने असे खरे समजून देवीजवळ आज लाभ जाहला म्हणोन म्हटले आणि बिनीवाले यांस आज्ञा केली कीं देवीजवळ नेऊन पुजारी यांजकडून प्रासादिक सुवर्ण घ्यावे त्याप्रो बिनीवाले याणी श्री देविजवळ नेऊन पुजारी यांजकडून पायास लावून प्रसाद म्हणोन आणिला. स्वारी निघाली ती पुन्हा सवदत्तीस आली तो अस्तमान जाहला स्वारी जाते समई सवदत्तीस गेली तेव्हां सवदत्तीस नजिक परसगड आहे तेथे इंग्रजी सरकारचे मामलेदार रा० गणेश रामचंद्र मलठणकर सिद्धटेकजवळ

जि० पुणे माहाल भिमथडी येथील राहाणार, हे प्यादे वगैरे घेऊन आडवे आले नमस्कार केला कोण कोठिल हे विचारिले त्याणी सदहू लिहिले अन्वये सांगितले त्यास आपासो याणीं सांगितले जे पूर्वी आम्ही वाघाचे पारपत्त्यास मेहेरबा वसली साहेब याजबरोबर सरकारातून उमराव होतो तेव्हां समदत्तीस मुक्काम ब्राम्हणाचे घरी होतो त्या घराची माहिती व नांव स्मरणांत नाहीं त्यास कोणी वृद्ध मनुष्य गावांत असल्यास त्या वेळची माहिती विचारा म्हणोन. त्याणी शोध करतो म्हणोन म्हणाले. त्यांस आपासो याणी विडे देऊन निरोप दिला नंतर स्वारी पुढे गेली स्वारी परत येताना पुन्हा मामलेदार हे आणखी सदरील मजकुराचा शोध करून दोनतीन आसामीस माहिती होती त्यास विचारून ज्याचे घरी होती त्याचे नांव लिहून त्या यादीवर ज्यास माहिती होती त्याणी सांगितले त्या तिघांचे रुजू करून घेऊन याद आणून दिली ती आपासो याणी पाहिली नंतर अस्तमान जाहला सबब यास निरोप विडे देऊन दिला. स्वारी गुरलहासूरास चार घटिका रात्रीचे सुमारे पोचली स्वारी जाते वेळी वाघाचे स्वारीत ह्या रानातून वसली साहेबाबरोबर आपासो फिरले ती माहिती आमके ठिकाणी बसलो होतो अमक्या वाटेने गेलो वगैरे जो मजकूर जाला तो सर्व तात्यासो वगैरे यांस सांगितला. स्वारी येतेवेळी मजकूर श्रीमंताचे कारकिर्दीचे वगैरे बोलण्यांत आले त्यात एक गोष्ट आपासो याणी बिनीवाले याजवळ सागितले कीं श्री. कै. पंतप्रधानसो यांची स्वारी कर्नाटकात आली त्या समई आमचे जाहागिरीतील महाल त्या महालातून स्वारी गेली तेव्हां कोणा एका दोघा चौघा रयतांच्या शेतातून स्वारी जाऊन पिकाची खराबी होऊ लागली तेव्हां त्यास त्यानी गोपाळराव यांची द्वाही घातली परंतु लष्करचे लोक ऐकेना हे वर्तमान श्रीमंतास समजताच त्यांनीं लोकास ताकीद करून ज्या वाटेने स्वारी गेली तेथील पिकाची खराबी होऊ दिली नाही एसे श्रीमंत कदरदां होते आम्हा सरदार लोकावर अशी कृपा करीत होते अशी बोलणी झाली. मजल कोस जाता येता मिळोन कच्चे आठ कोस.

छ. १८ सफर माघ वद्य॥ ५ शुक्रवार गुरलहासूर.

प्रातःकाळी ह. भ. प. बाबा नासिककर संस्थानिक हे मुक्काम मजकूरी आले आहेत त्याणी देवाचा प्रसाद वगैरे आणून दिला. नाईक याणीं मेजवानी केली. तिसरे प्रहरी श्री. सौ. मा. बाईसो व आवडाबाई व सूनबाई व भाऊसो व कांहीं मंडळी अशी गुरलहासूरचे इशान्येस एका कोसावर मयूरतीर्थ म्हणून आहे ते पाहून अस्तमानी मावारी आली तीर्थासबंधे अशी कथा आहे को पूर्वी मलप्रभा नदीचा ओघ जात होता तेव्हा डावेकडे डोंगर त्या वाटेने मार्ग नाही सबब मधून मऊ रानातून जात होती ते डोंगरावर मोर बसला होता तो म्हणतो काय मऊ रानांतून जाती आहे म्हणून हसला तेव्हां ते नदीने ऐकून तशी उलटली आणि डोंगर फोडून चालली तो एक कोसभरपर्यंत डोंगर फोडून दुभांग करून निघोन गेली तसे ते वळण नदीचे

फिरलेले आहे. हा चमत्कार पाहिला. आपासो यांची स्वारी वडली म्हणोन गुरलहासूरनजिक पाव कोसावर आहे तेथे शंकर दीक्षित यांचे चिरंजीव आहेत त्याचे दर्शनार्थ गेली होती माघारी आस्तमानी आली त्यास पंधर रुपये १५ दिले व गुरलहासूरास दिक्षीत बाबाचे देवालय आहे तेथे गेली दर्शन घेऊन दिक्षीत यांचे वंशिक असतात त्यास पंधरा रुपये दिले हरिहरदादा यांची पत्नी सौ. विठाबाई यास देवआज्ञा झाली म्हणून सांगलीहून लिहून आले असे. माघ वा॥ १ सोमवारी वारली.

छ. १९ माघ वा॥ ६ मंदवार मु. दोडवाड

सिनआपा नाईक याचे घरी भोजने झाल्यावर नाईकांनीं पोषाख शालजोडी पागोटे दुपेटा हातात हिऱ्याची पोहची वगैरे दिल्हे बायकास लुगडी खण दिले तीन प्रहरी स्वारी निघून गांवातील नाईकांनीं बांधलेला हनुमंताच्या देवळांत जाऊन बाबा नासिककराकडे जाऊन आणि त्यास धोतरजोडा व ५० रुपये देऊन स्वारी निघाली ती करिकट्टावरून दोडवाडास अस्तमानी आली.

छ० १९ सफर माघ वद्य ६

कोन्हेररावबाबा पेठे यांचे घरी उतरले तोफखाना घेऊन भाऊ भावे वद्य ३ बुधवारी संगोलीहून परभारे दोडवाडास आले ते ठाण्याचे पश्चिमेस तळे आहे त्याचे दक्षणेस आंबराई आहे त्यात उतरले. आज स्वारीबरोबरचे लोक हत्ती वगैरे आले ते गांवात उतरले भवानसिंग रजपूत शहापूरकर हा इंग्रजी शिकवणार त्यांस चाकरीस ठेवला तो परवाचे दिवशी आला तो आज श्रीमंतास भेटला आपासो यांची स्वारी वाड्यात दाखल जाहल्यानंतर ठाण्यांत मंडळीसुद्धा जाऊन ठाण्यातील जागा व तोफा व जेजाला वगैरे सर्व दाखविले स्वारी आली तेव्हां आडवे बावा पेठे कमावीसदार हे शेपन्नास गाडदी व तासे वगैरे शिंग-वाजंत्री घेऊन आले करीकट्ट्यापर्यंत आले होते गुरलहासूराहून दोडवाड कोस चार स्वारीस व लष्करच्या लोकास वगैरे पाणी ठाण्याचे उत्तरेस हौंड आहे त्याचे पाणी चांगले आहे आज गुरलहासूरात रा० राघोपंत लिमये हे धारवाडास इकडून असतात ते आले रा० व्यंकाजीपंत महाजन याचे घर गुरलहासूरास आहे त्याचे घरी स्वारी गुरलहासूराहून येते समई गेली होती दोडवाडास आल्यावर ठाण्यातील तोफेचे बार ५ केले.

छ० २० सफर माघ वद्य ७ रविवार मु. दोडवाड

प्रातःकाळी स्नानसंध्येचे वेळेस आपासो यास पहिली आठवण जाहली त्या वाघाचे स्वारीत दोंडवाडास वाघ आला त्या वेळेस गांवातील सोनार हा हस्तनाला म्हणोन हातातून तोफेचे बार काढतात ती तोफ वीतसवावीत लांब असती ती घेऊन बार काढी तो सोनार किंवा त्याचा कोण आहे याचा शोध केला त्याचा नातू आहे असा पत्ता लागून त्यास आणून विचारले त्याणे सांगितले जे आपला आजा होता

तो काढी. व मलाहि काढावयास येतो म्हणोन सांगितले त्याजवरोन ठाण्यातील हस्तनाल आणून सोनार याजकडून बार काढविणेविसी भाऊ भावे यास सांगितले व सुभाना म्हणोन प्यादा दोडवाडास होता तो एक दिवसात दोडवाडाहून सांगलीस चाळीस कोस चाले त्याचा कोण आहे म्हणून विचारले त्याचा नातू सरकारात ठाण्यांत चाकरीस आहे असे समजले व दोडवाडात मुसलमान मुल्ला होता तो रमलाचे फासे टाकून शकून सांगे त्याचे कोण आहे म्हणून पुशिले त्याचा लेक आहे तोहि फांसे टाकून शकून सांगत असतो म्हणोन समजले त्याजवरून त्यांस आणणेविसी आज्ञा जाहली रा० कोन्हेर राव बावा पेठे हे किल्ल्याकडील मेजमानी सरकारवाड्यांत होणार सबब खासे मंडळी व पदरचे मंडळीस आमंत्रणास आले होते सांगलीहून रा० चितोपंत भिडे याचे पत्र आले त्यांत श्री० रा० महाराज छत्रपती संस्थान पन्हाळा याची स्वारी श्री नरसोबाचे वाडीस आली आहे माघमासी यात्रा आहे सबब आली आहे पांच दिवस राहणार म्हणोन व रा. कृष्णराव आपटे मामलेदार मामला आष्टे वाळवे हे मेहेरबा अटसन् साहेब बहादूर हे मिरजेस आहेत त्याचे भेटीकरितां म्हणोन सांगलीस येऊन एक दिवस राहिले होते म्हणोन. कुडलगीकर स्वामी हे संचारास निघाले ते एकोडीस राहिले आहेत त्यांचेबरोबर हत्ती आहेत त्यात एक हत्ती बुजला तेणे कडून वरील महात खाली पडला. हातीने रागाने दांताचा मोहरा मारून त्यास ठार मारला म्हणोन वर्तमान आले दोन प्रहरी ठाण्यातील वाड्यांतच भाऊसाो मंडळीची भोजने जाहली श्री सौ. बाईसाहेब व तात्यासाो हे पेठे याचें घरीच जेवले नंतर तिसरे प्रहरी ४–५ घटका दिवसास आपासाो भाऊसाो व मंडळी असे ठाण्यात वर जाऊन दुरभिणीतून नरगुंदचा किल्ला वगैरे पाहून नंतर आपासाो व भाऊसाो यांची स्वारी गांवचे पश्चमेस तळे आहे त्या तळ्याचे पश्चमेस जाऊन कित्तूरचे स्वारीस तोफा ठेवून खाशांनीं आणखूद्द (?) मध्ये फिरले ते वगैरे जागा दाखवून नंतर स्वारी नवी अंबराई लावली आहे त्यात आली. शौचास जाऊन स्वारी परत ठाण्यात आली ते समई गांवचे महार याणीं आडवे पडून अर्जी दिल्ही. त्यांत पेशजी सरकारातून आपले वतनाची जप्ती होती त्या वेळेस वसुलाची मेहनत पडते सबब रयतेकडून अर्धा आणा ठरवून दिला होता. पुढें सरकारांत नजर घेऊन वतन मोकळे केले. परंतु रयतेकडील बैत म्हणून काही आम्ही घेत नाही. अर्धा आणाच घेत असतो व व गांवातील पेवे काढतात त्या समई आमचा हक्क आम्हास देत नाहींत ये विसई आज्ञा व्हावी म्हणोन. तो मजकूर खाशानीं खुद्द मनास आणून जप्तीचे पूर्वी जे बैते रयत देत होते त्याचा दाखला पाहून त्याप्रो द्यावे व पेवाचेहि पोटगी, दाखल्याप्रमाणे द्यावी. ये विसई आज्ञा जाहली गांवचा काजी मुसलमान याजकडून रमल आणविले होते ते पाहिले सोनार याजकडून हस्तनालेचा बार काढविला तो हस्तनाल फुटली मागील दुमाला फुटून जाऊन तटास लागला. सोनार यांस दोन चार बिराणे लागले त्यांस खुषीबद्दल सरकारातून दिल्हे आणि निरोप दिला.

छ० २१ सफर माघ वद्य ८ सोमवार मु. नरेंद्र नजीक धारवाड

श्री. रा. आपासो वगैरे याची स्वारी रा. कोन्हेरराव बाबा पेठे याचे घरी भोजन केले शालजोडी दुपट्टा पागोटे लुगडी खण वगैरे यथाक्रम पेठ्यांनीं दिल्यानंतर स्वारी बेटगिऱ्यावरून मुक्काम मजकूरी आले मुक्काम कोस दोडवाडाहून चार. दोडवाडास ग्रामस्थ ब्राह्मणास घरटी रुपयाप्रो दिल्ही रा. राघोपंत × × × ×

छ २२ सफर माघ व० ९ मंगळवार मु. केलगीर बागनजीक.

श्री. रा. आपासो वगैरे मंडळी दहा घटका दिवसाचे सुमारे निघाली ती मुक्काम मजकूरी दोन प्रहरी आली. आपासो यानी बंगला व बाग केला आहे त्यात उतरली लष्कर व तोफखाना बागेत बंगल्याच्या दक्षिणेस उतरला नंतर रा. कृष्णरावजी हुलगोळ हे आपासोचे भेटीस आले होते. आपासो स्वारी निशाण नौबत डंका आंबारी हौदा फौजसुद्धा अस्तमानी धारवाडास गेली. प्रथम मेहेबा हरिसन्‌सो बहादूर इंजनेर याचे बंगल्यास गेली तो पुढे सामोरा आला होता. तात्यासो याजकडे क्षणभर पाहून साहेब म्हणाला यांचे डोळ्यांत बहूत जरब आहे व शाण छान आहे तात्यासाहेबानी पुस्ती कवाईत बंदूक दाखवून इंग्रजी २६ अक्षरे म्हणून दाखविली आपलेपाशी सिंव्हाचे कातडे आहे ते आपासो दाखविण्या करितां आणविले परंत ज्या गड्याजवळ होते तो गडी गांवात गेला सबब उदईक दाखविण्यास पाठवितो म्हणोन साहेबांनीं सांगितले. त्याचा निरोप घेऊन स्वारी मेहेरबा शाबसाहेब याचे बंगल्यास गेली साहेबाचे बोलण्यांत उदईक मेहेरबा वैसन (रसेल ?) हे येणार नंतर तात्यासो याणी साहेबास पुसले की तुमचे बाबालोक मुले कोठे आहेत मुलगा पांच वर्षाचा मुलगी साडेतीन वर्षाची त्यास आणून हातात हात धरून भेटले मुले हत्तीवर बसतो म्हणाले म्हणोन आपासो याणी हात्तीण बसविणेस सांगितले ती मुलें बाहेर येऊन अंबारीत बसली नंतर स्वारी अस्तमानचे सुमारी कलगिऱ्याचे बंगल्यात आली आज प्रातःकाळी नरेंद्रचे मुक्कामी राघोपंत काळे याचा शागीर्द गंगाधर दुर्वा आणण्याकरिता शेतात गेला तेथे लमाण उतरले होते त्याणी दुर्वा तोडू नको म्हणोन बोलले त्याजवरोन याची व त्याची कटकट होऊन लमाणांनी त्यास मारून उसांत नेऊन ठेवले इकडे शागिरदाचा शोध पुष्कळ केला पत्ता लागला नाहीं अस्तमानी शागीर्द कलेगिप्यास आला व त्यानेच मग सर्व हाकीकत सांगितली नरेंद्राहून कलेगीर एक कोस.

छ २३ माघ व० १० बुधवार मु. कलेगीर.

अंताजीपंत साठे हे इंग्रजी सरकारचे तालुक्यात इंग्रजी सरकारातून जमीन-मोजणीचे कामावर असतात ते आपासो यास येऊन भेटले त्यांनी जमीनमोजणीचा शिरस्ता कसे मोजतात व बारनिशी वगैरे व प्राची साधावयाचे यंत्र असे आणून दाखविले भाऊसो याचे दुसरे चिरंजीव विठ्ठलराव बापू याचे जावळ काढले. सिद्धराज भोजराज देसाई आथणीकर याजजवळ जनार्दन आपाजीपंत करमरकर हे आसतात. ते आपासाहेब याचे भेटीस आले त्याणी सांगितले त्यात इंग्रजी सरकारातून

हल्ली ठरले कीं वतनदार देसाई वगैरे याणीं कोणापासून पुर्ववत् प्रमाणे हक्क वगैरे कांहीं घेऊ नये म्हणोन. त्याजवरून आथणीकर देसाई याणीं आपले इलाख्यातील वाणी उदमी वगैरे याजपासून मामुल शिरस्तेप्रो १००-१५० रुपये सुमार घेतले होते ते परत देऊन त्याच्या पावत्या देसाई याणी घेतल्या. नंतर देसाई याजकडील कारकून याणे वाणी वगैरे यास म्हणाला जे तुम्ही रुपये घेऊन पावत्या दिल्या हे ठीकच जाहले परंतु सालमजकूरचे रुपये हे देसाई यांस द्यावे असे म्हणताच सर्व बरे आहे म्हणोन काहीं जणानी ३५ रुपये परत कारकूनाजवळ दिले त्यातील एका उदम्याने रुपये दिल्हे नसतां धारवाड अथर्णचे मामलेदार याजकडे फिर्याद केली त्यात सरकारचे हुकुमाप्रो देसाई याणी रुपये परत दिल्हे आम्हाजवळील पावत्या घेतल्या असता पुन्हा रुपये परत आम्हा जवळून घेतले म्हणोन त्याजवरुन मामलेदार याणी चौकशी केली त्यांत ३५ रुपये कारकुनाने घेतले हे देसाई यास माहित नाही असे जाहले तो कट्ट व देसाई वगैरे यांस मेहेरबान हंट्रसो याजकडे गेला त्याणी पाहून देसाई यास कैद करुन धारवाडास पाठविले व मागाहून कट्ट पाठविला तो हल्ली आला आहे देसाई याणी जामीन देऊन चौकशी चालली आहे, काय होते पाहावे म्हणोन व श्री. रा. मिरजकर हे मेहेरबा शावसाहेबाचे भेटीकरितां आले होते साहेबानी अमूक घटकेस यावे म्हणोन सांगितले परंतु त्या वेळेस त्याचे जाणे जाहले नाहीं. उशीराने गेले सबब भेट घेतली नाहीं म्हणोन साहेब बोलले मिरजकर माघारी गेले व आपासो यांचे देणे मिरजकर याणीं असून त्याचे गाव कसे सुटले त्याचे उत्तर हिसेब चालला आहे म्हणोन साहेबाने हिशेब न पाहाता गाव सोडले हे ठीक न जाहले म्हणोन व येथिल इंग्रजी सरकारची शाळा आहे त्यांत पतोजी बाळकृष्ण म्हणोन आहे तो म्हणत होता की आपासो याणी बेळगांवास शाळेत मुलास १२५ रुपये दिल्हे म्हणोन. तेहि बोलले. आपासो याचीं व तात्यासो व भाऊसो यांची स्वारी संध्याकाळचे चार घटका दिवसास धारवाडचे मेहेरबान कायसन असिष्टंट व म्यानिसिपलसाहेब हे उभयता एकाच बंगल्यात होते. तेथे स्वारी गेली उभयता साहेब पुढे सामोरे येऊन आंत घेऊन गेले नंतर पूर्वीच्या नसपिल साहेब याचेवर आपासो याचे बोलणे जाहले नंतर मेहेरबा टौसनसाहेब (?) शासाहेबाचे बंगल्यात होते तेथे स्वारी आली आपासो यानीं विचारले मडमसो व मुले बरोबर आहेत काय? साहेब म्हणाले ती सर्व विलायतेस आहेत त्याच्या तसबिस काढल्या आहेत त्या नित्य पाहात असतो असे म्हणून एक ऐनावर सहा तसबीरा काढल्या होत्या त्या आणून दाखविल्या. साहेब म्हणाले वैशाख अखेरीस येऊन नहरास आम्ही जाऊ नंतर साहेबानीं तात्यासो च्या आभ्यासाची चौकशी केली त्यास खेळण्यास फुरसद नाहीं म्हणोस आपासो म्हणाले. त्यावर सो म्हणाले तसे करू नये दिवसातून एक प्रहर पर्यंत खेळण्यास वेळ द्यावा सो नी गोष्ट सांगितली कीं कोणी एक पंडित होता त्याज-बरोबर एक मूल थोराचा खेळत होता दुसरे एकानें विचारले कीं तुम्ही पंडीत. हा मुलगा खेळत आहे तुम्ही कसे पाहाता? म्हणोन. पंडीत याणे आपले काखेस कमान होती ती

दाखविली आणि त्यास सांगितले कीं ही कमान आहे हिचा चिल्हा आहे तो उतरून ठेविला आहे याचे कारण हा चिल्हा जर नेहमी चढविलेला असला तर नीट नाही. कमान भागेल. ज्या वेळेस काम त्या वेळेस चिल्हा चढवावा काम झाले म्हणजे उतरून ठेवावा म्हणजे समयास नीट राहतो म्हणोन मुलास फार विद्येत गुंतवून त्याचे मनास खेद क॰ नये. काहीं तरी वेळ मोकळा असला तर त्याचे बुद्धिस बढती असती. माझी मुले विलायतेस आहे त्यास बरे वाटत नाहीं म्हणोन वर्तमान आले त्याजवरोन मी आपले आईस लिहून पाठविले कीं मुलास खेळण्यास किती वेळ दिला आहे तो लिहून पाठवावा. आईने दोन घटका मोकळ्या दिल्या आहेत म्हणून लिहिले त्यावर मी एवढ्या पुरणार नाहीं आणखी सहा घटका द्याव्या म्हणजे प्रकृती नीट होईल म्हणोन लिहिले त्याप्रा॰ एक प्रहर मोकळीक देताच प्रकृती नीट झाली. नंतर स्वारी एक घटिका रात्रीचे सुमारे बंगल्यास कलगीर्यास आली रात्री पाऊस दोन चार घटका सुमार बराच पडला. नंतर आणखी दोन वेळ मोठा आला सारी रात्र टपका लागला होता लष्करची खराबी फार झाली.

छ० २४ सफर माघ वद्य १ गुरुवार मु. केलगीरे

प्रातःकाळी कृष्णराव हुलगोळाचे वडील चिरंजीव नरसिंगराव व रा. जीवनराव देशपांडे याचे चिरंजीव व्यंकटराव असे भेटीस आले होते आपासोनी त्यांस मागील दाखल्याचे कांही कागद असल्यास आणून देण्यास सांगितले आपासो॰ नी धारवाडचे स्वारीची गोष्ट अशी सांगितली की किल्ल्यास मोरचे होते त्यात गोळीचा बार भरलेला होता ती बंदूक तशी ठेविली होती आदले दिवसी गोळागोळी झाली दुसरे दिवशी त्या बंदुकेचे समोरून माणूस जात होता तो अकस्मात बंदुकीचा बार जाहला कोणी तोडा लाविला नव्हता यापुढे सुद्धा जवळ असे असतो बार होऊन तो माणूस मेला म्हणोन रा. बाळकृष्णपंत गडबोले पावसकर हे कै. निळोपंत गडबोले यांचे दाशाद हे धारवाडास इंग्रजी सरकारातून पाठशाळा आहे त्यातील पंतोजी त्यांस ३० रुपये दरमहा. आहे ते आपासो॰ याजकडे दोनचार मुले व तात्यासो॰ याजकरितां व्याकरण बुके व कांहीं गोष्टी वगैरेची बुके अमरकोश सटिक व रूपावळी वगैरे पाठपुस्तके छापलेली व भूगोलचे बुके आशी आणून त्यातील अर्थ वगैरे सर्व समजून दिले शाळेत स्वारी येणे विषयी मुलांची विनंती आहे म्हणोन गडबोल्यानी विनंती केली शाळा कोठे आहे म्हणून आपासोनीं विचारले विठोबाचे देवळयाजवळ आहे म्हणून सांगितले पंतोजी याणी सात बुके तात्यासो॰ याजकरितां दिल्ही इतक्यांत श्री स्वामी कुंडलगिकर याजकडील गोविंदशास्त्री व केशवशास्त्री हे मंत्राक्षता व नारळ प्रसाद घेऊन आले स्वामीचे पत्र वाचून दाखविले स्वामीचे हल्लीचे वास्तव्य कोठे आहे म्हणून विचारलेवर म्हणाले हेबळीस आहे हेबळीस येण्याचे कारण असे सांगितले की हुबळीस कोणी आय्या आहे तो पालखीत बसून आडवी चालवितो स्वामीची बरोबरी करतो

धारवाडास साहेबाकडे फिर्याद केली आहे त्यांत साहेब आख्यासारखे बोलतात तरी आपण साहेबास सांगून बंदोबस्त करवावा म्हणून त्यांनीं विनंती केली नंतर कांहीं सुभाषित श्लोक चर्चा झाली येते वेळेस स्वामीचे हत्तीने माणून मारले ही गोष्ट निघाली होती तो हत्ती मोठा बाट आहे त्यांस आपासोकडे द्यावा असा स्वामीचा मनोदय. रा. आपाजीपंत रानडे शिरटीहून पन्नास प्यादे व दहा स्वार घेऊन मुकाम मजकूरीत स्वारीत आले.

छ २५ सफर माघ व॥ १२ भुगुवार मु. कलगिरे दहा घटका दिवसास तात्यासो व बाबासो उभयता ठौसनसाहेब यांचे बंगल्यास गेले.

छ ८ सफर सोमवार माघ व० ३० मु. कलगिरे आपासो स्वारी प्रातःकाळी जिन्नत मकान निसबट साहेब यांनी बाग केला तो पाहण्यास गेले तिसरे प्रहरी जडज प्रेरसाहेब याचे बंगल्यास जाणेकरितां निघाले प्रथम हारीसन्ससाहेब इंजनेर याचा बंगला आहे त्याचे पश्चिमेस त्याच्या दुरबीणी व नकाशे वगैरे काढण्याचा बंगला आहे तो पाहण्यास स्वारी गेली साहेबाचे कारकून परशरामपंत सर्वेयर याणी सर्व दाखविले त्यात त्याणी बेळगांव कुडचीचा नकाशा दाखविला हरिसन साहेब यांना त्यांच्या बदलीचा हुकूम मुंबईहून आल्यामुळे दिलगीर होते म्हणोन स्वतः दाखविण्यास आले नव्हते नंतर जडज्ज साहेबाचे बंगल्यास स्वारी गेली तेथल्या बोलण्यांत साहेबानें आपली मुले विलायतेत आहे त्याच्या तसबिरा दाखविल्या विलायतच्या राणीसाहेबाची तसबिर दाखविली विलायतेस जाण्यास एक महिना लागतो म्हणोन.

व विद्या कोणची शिकत असता म्हणून विचारले बाबासोनी आपले नांव, लिहिणे अमूक लिहित असतो म्हणोन सांगितले नंतर साहेबास बंगल्यास येण्याविषयी आमंत्रण करून उभयता परत आले आपासोचे बंगल्यास साहेब लोक येणार सबब बंगल्याचे पुढे कापडी मंडप देऊन आंत बैठक घालून खुरच्या मांडून तयारी केली संध्याकाळी वेसन शा व हरीसन व दुसरे एक असे चार साहेब आले वेसनसाहेब आपासो यास बोलले जे आपणास नाकावर तरवारीची जखम लागली ती कोणाचे लढाईत कोणाचे हातून ? आपासोनी उत्तर केले धोंडजीवाघाचे लढाईत आम्ही फौजसुद्धा हल्ल्याळास सरकार हुकूमावरून होतो त्यावेळीस त्याजकडील स्वाराचे हातची जखम नाकावर तरवारीची लागली पाठीस ढाल होती ती दोन अडिच बोटे तुटून वार नाकावर लागला पाठीस भाल्याची जखम ढाल फाटून लागली कुशीस भाल्याच्या दोन लागल्या. नंतर ढाल आणून दाखविली तेव्हा साहेब बोलले जे ढालेने बचाव फार झाला आपली किर्ती वाढविली म्हणून हिला जतन करून ठेवावी. नंतर तात्यासोनी बंदुकीचा बार काढून दाखवला व इंग्रजी कवायत बंदूक लाकडाची केली आहे ती आणली भाऊ भावे याणी कवाईत सांगितली त्याप्रमाणे तात्यासोनी केली. नंतर साहेबानी मेज घेतले- नंतर अत्तर गुलाब होऊन साहेब गेले

साहेबांची स्वारी यावयाचे पूर्वी त्रिंबकराव जिवाजी जोग व कृष्णराव हुलगोल हे आले होते आणखीही धारवाडची कांही मंडळी भेटीस आली होती बडे साहेब काझी सांगलीहून आज आले रामजी काजी व दांडखडकर मुल्ला हेही येऊन कांहीं पारशी कित्ताब व विलायतेस पातशहास पत्र जाणेचे मायने पारसी वाचून त्याची सुधरत होत होती.

छ. २६ सफर माघ व॥ १३ मंदवार महाशिवरात्र मु. मेलगिरे श्री. आपासो सर्व मंडळीसह दोन प्रहरी श्री. सोमेश्वर म्हणोन महास्थान शिवाचे धारवाडचे दक्षिणेस एक कोसावर मैराळ टेकडीचे पलिकडे आहे तेथे दर्शनास गेले गांवचे वगैरे लोक दर्शनास बहूत आले होते देवाचे पुढे एक मोठे तीर्थ आहे त्यात लोकांनी स्नाने केली देवाचे दक्षिणेस एक मोठे तळे डोंगरात आहे स्वारी तेथून माघारी येते समई मैराळ टेकडीवर चढून श्री. खंडोबा देव आहे त्याचें दर्शन घेऊन तेथे क्षणभर बसले त्यावेळीं आपासो याणी सर्व मंडळीस पूर्वीची धारवाड वेढयाची हकीकत सांगितली धारवाडास मोर्चे होते त्यासमई जनोबा भाऊ पटवर्धन मेघश्यामराव बापूचे चिरंजीव यास गोळी लागली ते व कृष्णराव लिमये यासहि गोळी लागली ते व अमूक ठिकाणी मोर्चे होते व श्री. कै. परशुरामपंत भाऊसाहेब याचा घोडा गोळा लागून मेला वगैरे सर्व सांगितले नंतर दुरबीण लावून आपासोनी नरगुंद पूर्वेस आहे ते पाहिले नंतर पूर्वेचें अंगास घाटासारख्या पायऱ्या बांधल्या आहेत त्या वाटेने उतरून सिनाप्पा नाईकाचा मळा पाहून नाईकानी बांधलेल्या मारुतीचे दर्शन घेऊन परत धारवाड सारे उजवे घालून मेलगिऱ्यास परत आली.

त्या रात्री श्री. मलमेश्वराच्या देवळात दाजीबा बहूलकर व बापू सहस्त्रबुद्धे उतरले होते त्यांचे सर्व चोरट्यांनीं चोरून नेले. इंग्रजी सरकारचे पलटण काळे मद्रासी धारवाडास होते त्याची बदली होऊन दुसरे पलटण मुंबईहून आले पहिले नागपुराकडे गेले

छ. २७ सफर माघ व॥ १४ रविवार मु. कलगिरे शेखअल्ली जमादार कित्तूरकर याचा कोणी आप्त आहे तो इंग्रजी सरकारांत चपराशीपणाचे कामावर धारवाडास आहे तो आप्पासो भेटावयास आला होता त्याणे एक दस्ताना हातातील जोडा एक व एक पारसी कितात्र आपासोस नजर केला तिसरे प्रहरी कृष्णराव हुलगोल आले होते त्यानी विलायतेस राणीचे नावे पत्रा लिहिण्याचा मायना पारसी आणून दिला आपासो स्वारी इंग्रजी छावणी पाहून आली स्वारी पाहण्यास शहरातील हजारो लोक मिळाले होते रा. रामराव ताडपत्री दिवाण वैसनसाहेब हे सडकेवर भेटीस आले होते.

छ, २८ सफर माघ व ॥ ३० सोमवार मु. कलगिरे

स्वारी तीन घटका रात्रीचे सुमारे कलेगिरचे बंगल्यात परत आली संध्येचे वेळेस रा. भिमराव नैटी व जडज्ज हे प्रेर साहेबाचे जवळ कामावर असतात त्यास पगार ५०० रुपये आहे ते भेटीस आले होते.

छ. २९ सफर फाल्गुन शु ॥ १ मंगळवार मु. कलगिरे

आप्पासाहेब धारवाडास बंदीवानांचा तुरुंग पाहण्यास गेले प्रेरसाहेबानी तुरुंगातील बायकाच्या व पुरुषाच्या खोल्या बंदीवान काय काय कामे करितात त्या जागा कोणी कांबळी विणतात कोणी धोतरे पासोड्या कोणी सतरंज्या जे ज्यास काम येते ते त्याजकडून करवितात ते सारे दाखविले नंतर बायकाचे हापिसात गेले त्यावेळेस एक बायको म्हातारी ५०–६० वर्षाची आदमासे होती ती दाखवली तिणे अपराध मोठा केला सबब तिला काळे पाण्यास सोडली असतां पुन्हा समुद्रातून पोहून आली तिला विचारले असता ती म्हणते की मला एक केवड्याचे झाड सांपडले त्याला धरून पोहून आले. ती ही बाई आहे. हिला पुन्हा काळे पाण्यास पोहचवयाचे आहे म्हणून साहेबानीं सांगितले-नंतर स्वारी कलगिऱ्यास परत आली जिवनराव देशपांडे यांनी बंगल्यात मेजवानी केली होती तिसरे प्रहरी कृष्णराव हुलगोल हे आले त्यांनीं श्रीरंगपट्टणचा किल्ला व टिपूसो यास मारले ती इंग्रजाची लढाई जाहली किल्ला घेतला मीरसाबदीन (?) याणे फितूर केला वगैरेचा नकसा चित्राचा आणून दाखविला. अस्तमानी जडज्ज साहेब व असिष्टंट साहेब हे उभयता आले होते.

छ. १ रबिलावल फाल्गुन शु ॥ २ बुधवार मु. कलगिरे

विलायतचे पादशाह राणीची तसबिर जडज्ज साहेबांनीं आपासोकडे पाठविली होती ती पाहून आपासोनी उतार उतरून घेतले धारवाडास चंदनाचे काम पेट्या वगैरे करनाटकी खापिसे (?) करतात-त्याणी पेट्या व चौऱ्या वगैरे सामान विकावू आणिले होते व चौऱ्या करितात ते दाखविले. फणी करंड्या फार चांगली जलद करतात

छ. २ रबीलावल फाल्गुन शु॥ ३ गुरुवार मु. कलगिरे प्रातःकाळी स्वारी जाणार सबब कुचाचा नगारा करविला नंतर श्री. सौ. बाईसो अस्पर्श झाल्यामुळे तीन दिवस राहाणे झाले कुंडलगिकर स्वामी याजकडील तीन हत्तणी व एक हात्ती ज्याणी चार माणसे मारली तो असे पाहण्यासाठी त्याजकडील केशवशास्त्री व गोविंदशास्त्री घेऊन आले होते कोणचा खात्रीस येईल तो ठेवून घ्यांवा म्हणोन सांगितले त्याजवरोन हत्तीण फौजलक्ष्मी म्हणोन हत्तीण देखणी बरीच आहे ती ठेवून घेऊन बाकीचे परत पाठविले तिसरे प्रहरी पाऊस चार घटका मोठा पडला.

छ. ३ रबीलावल फाल्गुन शु॥ ४ भृगुवासर मु. कलगिरी

कुन्डलगीकर स्वामी नरेंद्रास आले आहेत त्याच्या दर्शनास स्वारी गेली होती स्वामीनी जयलक्ष्मी हात्तीण दिली तिसरे प्रहरी नबाब अबदुल हाकीमखान याची कन्या तिचा बंदोबस्त चालणेचा नबाबानीं करून दिल्हा असतां त्याचे वंशज हरकत करितात त्यासाठी ती धारवाडास आपासोकडे आली होती ती आपासो यास भेटण्यास आली येते समई मेण्याचे गाडीत बसून आली आल्यानंतर सभोवते पडदे बांधून खोलीत

श्री. सौ. बाईसाो बसली होती तेथे आली बाहेरील पडदा लावून आपासाोहि बसले होते इकडे कोणीकडे आला होता म्हणून तिज बरोबर मुसलमान भला माणूस होता त्याजकडून विचारले नंतर घटकाभर बसून विडेनिरोप जाहाला चार घटका दिवसास हारिसन इंजिनियरसाो याचे कारकून रा. परशुरामपंत सरवेर हे भेटीस आले ते नकाशे व चित्रे वगैरे कामांत कुशल आहेत.

छ. ४ रवीलावल फाल्गुन शु ॥ ६ मंदवार मु. कलेगिर

प्रातःकाळी स्वारी सजून कुंडलगीकर स्वामीस बंगल्यास घेऊन आले स्वामीजवळ शास्त्री यांनी आपासाोच्या वर्णनाचा श्लोक म्हटला व अर्थ सांगितला नंतर स्वामीची स्वारी कलेगिऱ्यास श्री. कलमेश्वराचे देवालयात जाऊन उतरली रघुनाथराव देशपांडे यांचे बंधु गोविंदराव देशपांडे त्याणी आपासाोस नजर पाच बरुची पेरे रंगीत व आरशातील व्यंकोजीची तसबीर व गव्याचीं शिंगे अशी दिली सायंकाळी आपासाोनी स्वामीकडे जाऊन दीडशे रुपयाचीं शालजोडी, दक्षणा रुपये २०० व धोतरजोडा खेरीज जवळील शास्त्रीपंडित भिक्षुकास दिली. स्वामीनी काल हत्तीण दिली तीच पुन्हा आणून तयार करून तात्यासाो यास दिली धारवाडास नवे पलटण आले त्यांत रत्नागिरीचें लोक आहेत ते आपासाोच्या लष्करातील माणसाचें ओळखीचे सबब भेटावयास आले होते सबब त्यास जेवावयास बोलाविले होते.

छ. ५ रबिलावल फा॥ शु॥ ७ रविवार मु. कलगिर

प्रातःकाळचे प्रहर दिवसास दत्तात्रय निळकंठ मामलेदार ताो धारवाड व परशराम सरवेयर व बाळकृष्णपंत कानेटकर पंतोजी वगैरे भेटीस आले होते चमत्कारिक गोष्टी निघाल्या होत्या स्वारी धारवाडास गेली जाताना किल्ल्याचे रेवणी नजीक खंदकावर जाऊन बाहेरूनच खंदक बघितला धारवाडाहून परत येताना गांवचे सर्व लोकास साखर वाटली.

छ. ६ रबिलावल फाल्गुन शु॥ ८ इंदुवार मु. कलेगिर

तिसरे प्रहरी अपासाो धारवाडास बाळकृष्णपंत गडबोले पंतोजी यांची शाळा पाहण्यास गेले व मुलांची परिक्षा घेतली पंतोजी फार चांगले चपळ आहेत मुले उत्तम तयार केली आहेत त्यांचे शेजारी कानडी पंतोजीनी कानडी शाळा घातली आहे तीही पाहिली गडबोले पंतोजीच्या शाळेतील मुलास मिठाईबद्दल ५० रुपये दिले कानडे शाळेतील मुलास १५ रु. दिले नंतर जोग व परशरामपंत सरवेअर याजकडे जाऊन स्वारी बगीत बसून बंगल्यास आली उदईक स्वारी शिरटीस जाण्याचे ठरले आहे

छ. ७ रबीलावल फाल्गुन शु ॥ ९ भोमवार मु. हुबळी

आपासाोचे जहागिरीतील हुबळीतील इंग्रजी सरकारास चौथाई चाकरीबद्दल महाल दिले त्यांत दिली, त्या गावचे रयत लोक आपले धनी आपासाो म्हणोन त्यास पाहण्यास

हजारो आले होते प्रभाकर शास्त्री मुनसफ हे चार महिन्यापूर्वी चिकोडीहून बदली होऊन हुबळीस आले आहेत ते येऊन भेटले शास्त्रीबावाचा ऋणानबंध फार आहे हुबळीचे मामलेदार नरहरपंत जावडेकर हेहि आले होते खेरीज उद्धव नाईक तबीब वगैरे शे दोनशे आसामी नजर घेऊन आले होते.

छ. ८ रबिलावल फाल्गुन शु॥ १० बुधवार मु. कुन्दगोल

प्रहर दिवसाचे सुमारे हुबळीहून नरसोबा नाईक तबीब याचे चिरंजीव आपासोस आपले घरी येण्याविषयीं निमंत्रणास आले होते उद्धव नाईक तबीब यांचे घरच्या बायका श्री. सौ. बाईसाहेबांस बोलावण्यास आल्या होत्या सबब त्यास जाणेविषयीची आज्ञा झाली सावनुरकर नबाब याचे कारभारी याचे बंधु भेटीस आले भाऊसो सडे तेग्याचे कनाथीपर्यंत आडवे जाऊन त्यास आणणेविषयीं आज्ञा झाली आपासो भरताजीम घेऊन गाद्यावर त्यास बसविले त्याचे बरोबर नबाबाचे मुनसी वगैरे ५-४ मुसलमान होते करांचली मिळाल्याचे ऐकून नबाबास फार खुषी जाहली या देशांत स्वारीचे येणे बहूत दिवसानीं झाले सावनुरास येण्याविषयी मी नबाबाची आज्ञा घेऊन आपणाकडे आलो आहे वगैरे सांगितले त्याना निरोप दिल्यावर स्वारी पाव तास दिवसास निघाली ती हुबळीचे पेठेतून प्रथम उद्धव नाईकाचें घरी गेली नजर नजराणा झाला कचेरीत नाच झाला नंतर गडीत तबीबाचे भाऊबंद विष्णू नाईक तबीब बोलवण्यास आले त्याचें घरी गेले प्रभाकर शास्त्री मुनसफ यांचेंही घरी स्वारी गेली शास्त्री याणी तात्यासोस पागोट्यावरून बांधावयाचा रुमाल कंदी दिला नंतर नरहरपंत मामलेदार तसेच बाळाप्पा नाईक तबीब याचे घरी गेली गढीचे बाहेर नाईक याणीं मुरलीधर देऊळ बांधले आहे ते पाहिले नंतर लांखडे सावकार यांचे घरी स्वारी गेली नंतर लांखडे याचे घरून स्वारी निघाली ती हुबळीचे पेठेतून दक्षिणेचे वाटेने सडकेनें कुन्दगोलाचे मार्गानें निघाली स्वारी पाहाण्यासाठी गावातील दहापंधरा हजार मनुष्य मिळाले होते आपासोस पाहून धनी पाहिल्याचा संतोष त्यास वाटला तो कोठवर लिहावा ? अस्तमानचे सुमारे स्वारी कुन्दगोळास आली. कुंदगोळचे ठाण्याचे व गांवचे दक्षिणेस हांड पाण्याचा आहे त्याचे दक्षिणेस शेतात स्वारी उतरली. हुबळीहून कुंदगोळ कोस कच्चे पांच.

छ. ९ रबिलावल फाल्गुन शु॥ ११ गुरुवार मु. माडहळी ता॥ शिरटी.

प्रहर दिवसाचे सुमारे स्वारी कुंदगोळ ठाण्यात श्री. महादेवस्थान मोठे आहे तेथे दर्शनास गेली नाडगीर याचे घरी जाऊन स्वारी बेगीहाळ कुंदगोळचे दक्षिणेस अदकोस आहे तो उतरून सावशी उजवी टाकून हुनहिरे गुजाळचे उत्तरेकडून स्वारी मुक्काम मजकूरी प्रहर दिवसास आली मुक्काम सरकारवाड्यात झाला लष्कर गांवचे उत्तरेस देशपांडे याचा मळा आहे तेथे राहिले चिमणाबापू चिटणीस काल ज्वर आला सबब कुंदगुळासच राहिले माडहाळीस पाणी एक विहिर व उत्तरेस ओढा आहे ती लागते.

कुंदगुळाहून मडवली मुक्काम कोस पांच. आज प्रातःकाळी नरगुंदकर देसाई याजकडील घोडा नजर आला.

छ. १० रबीलावल फाल्गुन शु ॥ १२ भृगुवार मु. एळवती ताो शिरटी

प्रातःकाळी स्वारी निघाली ती पांच घटका दिवसास मौजे मजकुरी आली सिरटी तालुक्यातील कांहीं गांवचे लोक प्रातःकाळी शिरस्तेप्राो एक होन, विडा नारळ वगैरे नजर घेऊन आले होते एळवंतीस आल्यावर ते ठाणे चांगले सबब पाहण्यास गेले मग वाड्यांत स्वारी आली गावचे कमाविसदार गोविंदराव जीवणराव देशपांडे धारवाडकर यांनीं गांवाकडून चंदी वगैरे साहित्य दिले माडवलीपासून एळवंती कोस दीड १॥

छ. ११ रबिलावल फाल्गुन शु ॥ १३ मंदवार मु. आदरकट्टे ताो शिरटी

स्वारी दोन प्रहरचे सुमारे निघाली प्रथम ठाण्यांत अग्नेचे बुरूजावर बांगडी लोखंडी तोफ आहे ती दहा हात लांब आहे ती पाहून आले तीन कोसावर मागडी ताो शिरटी येथे लागू याचा मळा आहे तेथे गेली तेथून लक्ष्मेश्वरास आली तेथेले मामलेदार विनायकराव परभू व फडणोस व गांवकर शेदोनशे आसामी वाजत गाजत सामोरे आले वाड्यात कचेरीस बसून नंतर आतील वाडा सर्व पाहून स्वारी निघाली.

लक्ष्मीश्वरलिंग देवालय आहे येथे जाऊन देवूळ पाहून नंतर मारूतीचे दर्शन घेऊन गांवात मशीद फार चांगली दगडी काम खोदीव केले आहे त्यात पारशी अक्षरे उतरली आहे काम फारच चांगले केले आहे ती मशीद पाहून श्रीसोमेश्वर लिंग महास्थान चांगले मोठे देवूळ आहे तेथे जाऊन ते पाहून स्वारी लक्ष्मीश्वरापासून अर्ध कोसावर लागूचा मळा आहे तेथे मुक्काम जाहला. शामजी गिरमाजी कुलकर्णी मंगळवेढे यास देवअज्ञा झालेचे वर्तमान आले.

छ. १२ रबिलावल फाल्गुन शु॥ १४ रविवार मु. बिदरहली

आदर कट्टाहून स्वारी निघाली ती मौजे बेलहट्टीं ताो. शिरटी येथे आली नंतर तेथून मुक्काम मजकूरी आली स्वारीचा मुक्काम श्रीअश्वथ नारायणाचे देवालय तुंगभद्रातीरी घाटावर आहे त्याचे सनिध धर्मशाळेत झाला आदरकट्याहून बिदरहाळी मुक्काम कोस आठ.

छ. १३ रबिलावल फाल्गुन शु॥ १५ सोमवार मु. बिदरहाळी

तिसरे प्रहरी वाघाचें कातडे संबंध त्यात गवत भरून वाघासारखे केले होते लष्करचे सारे हत्ती आणून मैदानांत नेऊन त्याजवर हत्ती घालविले फत्तेगज हात्तीनें एकदोन मोहरे व ठोकारा मारल्या व फुंदणगज यानीं तसेच भीतभीत दोन मोहरे केले वर राजमोहर धसला होता हत्तीनें झाडणी फार केली परंतु माहूत याणे खूप संभाळून टकरा मारविल्या नंतर येशवंतगज आणून त्यावर घातला त्याणे न भितां मोहरे व टकरा मारून दातात धरून पायाने रगडला वरकड सारे भिऊन माघारी गेले रात्रौ रामआवतारी खेळ धर्मशाळेंत केला दहा घटका रात्रपर्यंत झाला.

छ १४ रबिलावल फाल्गुन १५-१ मंगळवार बिदरहाळी

काल सोमवारी सावनुरकर नबाबाचे कारकून जीवनराव कृष्ण याजबरोबर केळीचे घड व तात्यासाो यास चंदनाची चवरी २ जोडी एक आली पत्रहि होते आज धुळवडसा। आपासाो सर्व मंडळीसह खेळ खेळून तुंगभद्रेची स्नाने करून भोजनास आली. सौ० पुसाबाई ओक आपासाोची भाची इचे घर इटगले ताो. शिरटी तुंगभद्रातीर येथे आहे ती बोलवण्यास आली तिचेकडे उदईक जाणेचे ठरवून बायकामंडळी आज तीन प्रहरा इटगलेस गेली रात्री इटगलेचे वाणी खेळकरी याणी कळसुत्र बाहुल्याचा खेळ केला.

छ १५ रबिलावल फाल्गुन व ॥ १ बुधवार मु. सासरवाड ताो शिरटी नजिक शंकर गड्डा

काल रात्री गावातील वाणी खेळ केला ते आले होते त्याणी पदे म्हटली व त्यांचे पाठीमागे बनीकोपचा अप्पा हा भागवतपणा करीत असतो त्याणे नरसिंव्ह अवताराची चुर्णीका कानडीत म्हटली फार चांगली सुरात म्हटली खेळकरी मुले यास दोन आसामीस दोन रुपयाचे तोढे ५० पन्नास पन्नास रुपये भाराचे आदमासे दिले मुलांनीं खेळ चांगला केला सबब त्यास शाबासकी दिली मुलांनीं विनंती केली जे या प्रांतात गावचे गांवी खेळ आहेत सरकारातून आम्हास निशाण द्यावे म्हणजे आमचा लौकिक व सरकार कृपा आहे असे होईल त्याजवरून खेळात निशाण करून खुतनीचे दिल्हे व आप्या यांस सरकारातून ज्याहाली एकसाली महाली पडते त्यासाली अप्या याजपासून एक होन सरकारांत घेत असतात तो माफ करावा म्हणोन त्याने अर्ज केला त्याजवरून सदरी ××× लिहिल्याचे होन घेऊ नये ये विसई त्यास पत्र दिले अडिच प्रहरचे सुमारे स्वारी बिदरहलीहून निघाली ती अस्तमानचे चार घटका दिवसास गड्ड्यास आली शंकर गड्डा व श्रीचे दर्शन घेऊन स्वारी माघारी डेऱ्यास आली गावकरी भेटीस आले होते त्यात ह्या गड्ड्याचे दोही बाजूने तुंगभद्रा नदी आहे. तुंगभद्रेचे दक्षण प्रांती आंमल इंग्रजी सरकारचा आहे तेव्हा बेटावर आंमल कोणाचा म्हणोन विचारणा झाली तेव्हा ह्या गोष्टीची चौकशी पूर्वी इंग्रज सरकारचा आंमल झाला तेव्हा या प्रांती मंडरोज्ञ (?) साहेब होते त्याजवळ खटला आपासाो यांचे गांवकरी म्हणत हा गड्डा आमचा पलिकडील गांवकरी म्हणत आमचा तेव्हां साहेबानी ज्या ठिकाणी तुंगभद्रा दुभंग जाहली त्याचेवर जाऊन कडब्याची पेंढी टाकली ती ज्या ओघाने जाईल त्याच्या अलिकडचा गड्डा असे ठरवून पेंडी टाकली ती पेंढी पलीकडून पूर्वेच्या ओघाने गेली तो गड्डा सासरवाडचा ठरला. गड्ड्यांत झाडी फार मोठे मोठे अंब्याचे व चिंचेचे वृक्ष आहेत आंत श्वापदे व मर्कटे व मोर वगैरे बहुत गड्डा लांबी दक्षिण उत्तर आदमास दीडकोस आहे व रुंद आदमासे १००० हात सुमारे आहे जागा फार चांगली रमणीय व देवस्थान दोहीकडून नदीचे पाणी किल्ला फार चांगला होईल अशी आहे व ह्या जागीं साक्षातकार आहे कीं कधी तरी छ्यावण्या वाळत घातल्या आहेत असे दिसते म्हणोन

मागे कै. केशवरावजी लागू याचें सांगण्यात होते त्या विसईचा शोध गावकरी या जवळ केला त्याचें सांगणेत आम्ही कांहीं पाहिला असे नाही परंतु जागा देवस्थान सिद्धाची आहे ह्या गड्ड्यांत एक समाधीही आहे त्याजवरून असेल असेहि वाटते उदईक इटग्यास भोजनास स्वारी जाणेचा बेत ठरला आहे सदरहू मुक्काम बिदरहळीहून कोस दोन कच्चे पश्चिमेकडील नदीचा ओघ उथळ आहे उन्हाळे दिवसात पाणी गुडघ्या इतके असते पूर्वेकडील ओघात पाणी फार डोह आहे त्यात मोठ्या मोठ्या सुसरी आहेत स्वारी आल्यावर पलीकडील काठास मेंढरे पाणी पिणेस आली होती त्यातील एक मेंढरू सुसरीने ओढून नेले तिजवर बारही टाकिले परंतु ती पाण्यात घेऊन गेली.

छ. १६ रबीलावल फाल्गुन वद्य २ गुरुवार मु. इतगे ताो सिरटी तुंगभद्रातीर

स्वारी चार घटका दिवसास पांडर (?) गव्याहून निघाली इटग्यास प्रहर दिवसाचे सुमारे आली ती प्रथम केशवराव भाऊ ओक यांचे घरी गेली तेथे मेजमानी झाली केशवराव ओकांचे कुटुंब मोठे घरात विहीर आहे परंतु पाणी ओढावे लागते सबब त्यास शागिर्दाची नेमणूक सिरटी महालाकडून करून दिली रात्रौ इटग्याचे राम-अवतारी यांजकडून खेळ करविला स्वारीचा मुक्काम शिरगड्याहून इटगे कोस एक

छ. १७ रबीलावल फाल्गुन वद्य ३ शुक्रवार संकष्टी चतुर्थी मु. बनिकोप ताो सिरटी

खासा स्वारी गांवांत ओक याचे घरी गेली आपासोचे भेटीस वे. रा. जगन्नाथ शास्त्री याचे पुतणे आले होते त्यास संभावना दिली गांवात माकडें धरणारा व सर्प धरणारा वाणी आहे त्याणे काल एक सर्प (धामण) आणिली होती व एक माकड आणिले होते त्यास घटिका भर खेळविले त्यास एक रुपया दिला रात्रौ खेळ रामआवतारी करविला त्यास बिदागी दिली स्वारी मुक्काम मजकुरी आली तेव्हां शिरस्त्याप्रमाणे वगैरे नजर दिली गांवाचे कोष्टी वाणी वगैरे याणी गांवगुंडाचा खेळ दोन घटक सुमारे खाशापुढे केला खारीचा मुक्काम इटग्याहून बनिकोप कोस चार

६।३।१८४७

छ. १८ रबिलावल फाल्गुन वद्य ४ मंदवार मु.

प्रातःकाळी बनीकोपाहून निघाली ती अडीच प्रहरचे सुमारे मौजे वरवी ताो सिरटी येथे आली रा. विष्णुपंत पटवर्धन निसबत लागू यांचे घरी गेली घटका दिवसाचे सुमारे शिरटीचे नैर्ऋत्येस लागूच्या मळ्यांत आली कचेरीस येऊन बसले अस्तमानीं दारु नळे चंद्रजोती लावून गांव डावा टाकून ओढयातून पेठेतून नीट किल्ल्यात आली गावातील बायका आरत्या घेऊन ओवाळण्यास आल्या होत्या स्वारी पाहावयास गांवातील बहुत मिळाले होते व रस्त्यातून चिराखदान केले होते स्वारी वरवीस आली त्या वेळस सिरटीहून भाऊ लागू वगैरे मंडळी १००–२०० सामोरे आले होते खासास्वारी व मंडळीचे राहणे किल्ल्यातील वाड्यात व किल्ल्यातील ब्राह्मणाचे घरी जाहले स्वारी

किल्ल्यात आल्यानंतर जंबूऱ्याचे २५ व थोर तोफेचे दोन असे बार जाहले बनिकोपाहून सिरटी मुक्काम कोस ५

७।३।१८४७

छ. १९ रबीलावल फाल्गुन वद्य ५ रंगपंचमी मु. सिरटी

प्रातःकाळी मंडळी किल्ला पाहावयास बातेरीवरून गेली होती किल्ल्याचे वायव्य दिशेचे बुरूजावर तोरड तोफ व आणखी एक दोन तोफा पाहून परत आले भोजनानंतर तिसरे प्रहरी गांवचे हालगे करडोल वाजवणार लिंगाइत कोष्टी वगैरे दोन फड आले होते त्यांचे दोन घटका वाजविणे व टिपऱ्या खेळणे जाहले नंतर खासा स्वारी देवदर्शने घेऊन पेठेतून अस्तमानचे घटिका दिवसाचे सुमार किल्ल्यात आली स्वारी देवास गेल्यानंतर मंडळीनी वाड्यांतील कचेरीस बसून नाच करून रंग गुलाल बुका खेळले स्वारी आपासो ची परत आली ती किल्ल्यातील दक्षिणेस खुरसीवर बसून लमाण आणवून त्याजकडून बल्लम व करांचली घेऊन नाच व खेळ करविला.

८।३।१८४७

छ. २० रबीलावल फाल्गुन व॥ ६ सोमवार मु. सिरटी

स्वारी सिरटीस फकीरस्वामीचा मठ देसाई याची राख केंचवा इणे मठ बांधला आहे तो पाहण्यास गेली होती तेथें रथ आहे तो व हालवर्ती म्हणोन गोडे विहिर आहे ती पाहून अस्तमानी परत आली.

९।३।१८४७

छ. २१ रबीलावल फाल्गुन व॥ ७ मंगळवार मु. सिरटी.

तिसरे प्रहरी रामराव निगडे भेटीस आले होते रात्रौ नारायणाचार्य याणी पुराण सांगितले भागवत दशमस्कंद रुखमीणी स्वयंवर सांगितले रामाजी नाईक मिडे व हरिपंत नातु हे निरोप घेऊन सांगलीस गेले.

छ. २२ रबीलावल फाल्गुन व॥ ८ बुधवार मु. सिरटी.

१०।३।१८४७

सकाळी गांवांतील किल्ल्यातील वैदिक व शास्त्री आशिरवादास आले होते रात्रौ सिरटी येथील रामअवतारी खेळ करणारा यास आणून खेळ करविला चार घटका खासे बसले होते.

११।३।१८४७

छ. २३ रबीलावल फाल्गुन व॥ ९ गुरुवार मु. सिरटी

अस्तमान चार घटका दिवसास वाजहुद्दीनसाहेब पिरजादे विजापूरकर हे विजापूराहून आपले मुरीदतालीबाकडे या प्रांती येऊन पुढे सावनुराकडे जाणार ते आपासोची

भेट घेणार सबब बडेसाहेब काझी यास त्याणीं बोलावून नेऊन त्यांस विनंती करण्या-विसई सांगितले आपण मान्य थोर आपलेकडे प्रथम खाशापैकी कोणी यावे म्हणोन सांगितले त्याप्रो काझीनी विनंती केली सबब बाळकृष्णराव × × × लागू यास आज प्रातःकाळी पाठविले होते त्याप्रमाणे अस्तमानी पिरजादे येऊन आपासोस भेटून दुवा केला.

१२।३।१८४७

छ. २४ रबीलावल फाल्गुन व॥ १० भृगुवासर मु. सिरटी

प्रातःकाळी नारायणाचार्य व रामचंद्र ज्योतिषी रमल जाणणारे गंगातीरकर असे आले होते. त्याणी एक दोन शकून पाहिले दोन तीन घटका बसले होते व गोविंद हरी बिनीवाले याचे हात कागदावर छापून घेऊन गेले उदईक लक्षणे बघून सांगतो म्हणोन बोलले दुपारी परचुरे याचे घरी स्वारी भोजनास गेली होती स्वारीतील सर्व लोक बारगीर शिलेदार यास जेवणाचा बेत किल्ल्यातील पागेत केला होता जेवणें होऊन. विडे नाच होऊन आपासाो यांस मुजरा करून ठिकाणास गेले नंतर कुसलापूर येथील लोखंड करणार आणविले होते त्याजकडून भट्टी लावून अस्तमानी भट्टी दोन घटका रात्रीस उतरून लोखंड जाहलेले सर्वत्रांनीं पाहिले सिरटीलगत तीन कोसावर गोजनूर गांव आहे त्या गांवालगत डोंगर आहे त्या डोंगरात वाघ आला होता त्यास गांवकऱ्यानी मारून त्याचे कातड्याचे भोत करून बिदरहल्लीस आणिला होता तसा आणखी वाघ येऊन कांहीं माणसे मोडली म्हणोन वर्तमान आले त्यावरून उद्या दोन घटका दिवसास शिकारीस जाण्याचा बेत तात्यासाोचा केला आहे स्वारीबरोबर बरकंदाज व करोल वगैरे शेदोनास ताकीद केली आहे.

१३।३।१८४७

छ. २५ रबिलावल फाल्गुन व॥ ११ मंदवार मु. सिरटी.

तात्यासाहेब व भाऊसाो शिकारीकरिता गोजनूरास गेले मागून चार घटकांनी आपासाो स्वारी गेली सारा डोंगर पिटला व बार काढले परंतु वाघाची चाहुल कोठे लागली नाहीं एक दोन ससे उठले त्यास मारून आणले तात्यासाहेब यास वाघ मारावयाची हौस मोठी.

२४।३।१८४७

छ. ६ रबीलाखर बुधवार मु. सिरटी

देसाई यांस वस्त्रे दिऊन निरोप दिला नंतर नरगुंदकर दोन घटका बसले होते त्यास निरोप दिला ते किल्ल्यातील बागेत बंगल्यात राहिले त्याजकडे शिधापाणी पाठवून दिले रात्री नरगुंदकरास भोजनास बोलावले होते.

हरिहररावाकडून देसाई याची हकिकत कळली ती अशी कै. बाळकृष्णपंत भाऊ-लागू यानी श्री. कै. गंगाधरराव काकासो यांचे कारकीर्दीस त्यांस विनंती करून दरसाल एक हजार नेमणूक देसाई यास करून दिली ती पांच चार वर्षे चालली पुढे वाघाच्या दंग्यात देसाई त्यास मिळाला व सिरटीस मोर्चे बसविले बेकैदी केली म्हणून सदरहू हजार रुपयाची नेमणूक तसेच मागडी व बनिकोप येथील पाटीलक्याची वतने आदमासे ५०।५० रुपयांची अशी जप्त केली ती आयाप जप्त आहेत ती सोडवावी अशी विनंती लागूनी केली तेव्हां पुन्हा एकदा सर्व हकीकत एकून मग निकाल सांगू असे स्वारी म्हणाली

२५।३।१८४७

छ. ७ रबीलाखर चैत्र शु॥ ९ गुरुवार रामनवमी मु. सिरटी.

केशवरावजीचे मळ्यातील उसांत दहाबारा रानडुकरे आली म्हणून भाऊसो व फडणीस व हरीहरराव दादा स्वारीची तयारी करून गेले सारा ऊंस भोवताला वेढून नागव्या कराचंल्या घेऊन व बंदुक घेऊन उसात माणसे घातली एक डुकर बाहेर काटला तो तितक्या माणसातून निघून गेला त्याचे मागे स्वार लागले गणपतराव भोसले देशिंगकर घोरपडे रामसिंग व गोविंदराव निगडे श्रीपतराव भोसले वगैरेनीं भाल्यानी तो डुकर मारला व खाशापुढे आणिला नंतर मळ्यातच स्नान फराळ होऊन तीन प्रहर हुल्लड केली आणखी ७ डुकर व एक कोल्हे असे मारले त्यापैकी २ दोन डुकर रातोरात घोड्यावर घालून धारवाडास रावसाहेबाकडे पाठविले चितांबर रामचंद्र कुळकर्णी मौजे हिरेगुंजाळ व एकप्पागौडा पाटील मौजे माडहळी ता। सिरटी यांनीं लावणीसंचणीमध्ये फार मेहनत करून सरकारकिफायत केली सबब त्यांस अबदागीर द्यावी म्हणुन हरिहर लागू याणी विनंती केली म्हणून त्यास अबदागिरीबद्दल एक मारप्रो जमीन पडीपैकी ५.५ होनाचे आकाराची देऊन आबदागिरीबद्दल वस्त्रे पागोटी आज अस्तमानी दिली ज्याणी डुकर मारला त्यास शिकार वाटून दिली काश्मीराहून एक पांढरे अस्वल एक साधे अस्वल अशी दोन घेऊन दरवेशी शिरटीस आले आहेत पांढरे अस्वल मोठे आहे असे कधी पाहिले नव्हते.

२६।३।१८४७

छ. ८ रबीलाखर चैत्र शु॥ १० भृगुवार मु. सिरटी.

हणमंतराव मुनसी यांनीं हरपनहाळीचे आमंत्रण आग्रहानें केले होते परंतु उन्हाळी दिवस २५ कोस जावे लागते म्हणून जाण्याचा बेत रहित केला हुबळीकर आप्या हा गोवनकोपेस जाऊन आडवी पालखी चालवित होता ते वर्तमान शावसाहेबास समजल्या-वरून तसे न करण्याची व वीस माणसापेक्षां अधिक लोक घेऊन न फिरण्याचा हुकूम

त्यांनीं आग्यास पाठविला आग्याकडून त्याबाबद जामीनहि घेतला अशा वर्तमानाचे पत्र धारवाडाहून आले.

१४।३।१८४७

छ. २६ रबिलावल फाल्गुन व॥ १२ रविवार मु. शिरटी

स्वारीचे भेटीस आज प्रातःकाळी रामचंद्रपंत सहस्त्रबुद्धे कोतवडेकर हे इंगल हलीचे दरखदार ते आपले चिरंजीवास घेऊन आले होते त्यांनीं जिन्नस पुढे ठेऊन भेटले तिसरे प्रहरी स्वारी किल्ल्याचे भोवतालेने फिरून आली.

१५।३।१८४७

छ. २७ रबिलावल फाल्गुन व॥ १३, १४ सोमवार मु. सिरटी

बाळाजी तमाजी सिरटीकर यानी मोठी मेजवानी दिली. रा. रामचंद्र आपासो जमखिंडीकर यास नवरी मुलगी पहिली कोकणचे केळकर याची पाहिली होती त्यास आणविली लग्न निश्चय मुहूर्त वगैरे सर्व पाहिले असता ती मुलगी न करितां दुसरी मुलगी हरी महादेव गोडबोले तासगांवकर सराफ यांची सात वर्षाची केली म्हणोन सांगलीहून लिहून आले. तिसरे प्रहरी फलज्योतिशी वगैरे मंडळी आली होती.

१६।३।१८४७

छ. २८ रबिलावल फाल्गुन व॥ ३० मंगळवार मु. सिरटी

आणासाहेब मिरजकर आज श्री. आपासोचे पंक्तीस होते दोघेही सायंकाळी फकीरस्वामीचा मठ पाहून आले रात्रौ सिरटीचे रामआवतारी याणी खेळ केला.

१७।३।१८४७

छ. २९ रबिलावल चैत्र शु॥ १ बुधवार (पाडवा गुड्याचा) शके १७६९ मु. सिरटी

गावातील जोशी येऊन पंचाग श्रवण जाहले नंतर दहा घटिका दिवसाचे सुमारे लगी व गुढीची पुजा केलीं व स्वारीबराबर बिनीकडील निशाण आहे त्याची पुजा बिनीवाले यांनीं केली नंतर आणासाहेब मिरजकरासमवेत खासे पंक्तीस भोजने जाहली आजचा बेत महालचे मेजमानीचा मामलेदार यानी केला नंतर आणासाहेब निरोप घेऊन मिरजेस गेले. छवीस सरकारीं पागा आहे त्या पागेत पीरखान हवालदार आहे त्याने सिंगरे व मादवाना वगैरे आणून दाखविली अस्तमानी गावातील विद्वान मंडळी आशिरवाद देण्यास आली होती.

१८।३।१८४७

छ. ३० रबीलावल चैत्र शु॥ २ गुरुवार मु. सिरटी

काल सोलापूराहून एक पत्र खाशास आले त्यांत बेळगांवास जनरेल साहेब होते त्यास कमेंडरचिफचे काम जाहले सबब काल ते मुबईहून गेले म्हणून

दुसरे वर्तमान कीं जाहागिरदार लोक आहेत त्याचे घरी भावबंदाच्या वाटण्या होऊ नयेत विसई इंग्रजी सरकारातून ठरले आहे म्हणोन. प्रातःकाळी तात्यासाहेबाची सोडमुंजी आज करावयाची त्याचे प्रायश्चित करून पुण्याहवाचन सर्व जाहले तात्यासोची मुंज होऊन तेरा महिने जाहले मध्ये आशौचे आली त्याच्या तीन दिवस आशौच बसावयाचे ते आज बसले. आज मुंजीसमई ब्राह्मणास भुयसी दोन पैसेप्राो व भोजनसमई आठ पैसेप्राो दिले आज रात्रौ चांदरात्र सबब तोफेचे पांच बार सिरस्तेप्रो येविसई तोफखाने याणी विनंती केली.

१९।३।१८४७

छ. १ रबीलाखर चैत्र शु॥ ३ भृगुवार मु. सिरटी

स्वारी तिसरे प्रहरी सिरटीचे पश्चिमेस मौजे हरीपुर म्हणोन गांव इकडील नवा बसविला आहे तो पाहून स्वारी अस्तमानी परतली रा. रामचंद्र जोसी लक्ष्मेश्वरकर हे भेटीस आले होते त्यानीं आपासोाना इंग्रज सरकारनें दिलेली तरवार न पाहताच आमुक आंगुळे लांब आहे म्हणोन गणीत करून सांगितले त्याप्रमाणे ती करांचली मोजून पाहिली.

२०।३।१८४७

छ. २ रबिलाखर चैत्रा शु॥ ४ शनिवार मु. सिरटी

तात्यासो यास आशौच तिसरा दिवस सबब विनोदाने सर्वत्रास शिवाशीव केली घटकाभर मौज केली चैत्रगौरीचे हाळदकुंकू सौ. मा. बाईसो. यानी करविले मखर वगैरे आरास चांगली केली होती रात्री राघोपंत बापट पुळ्याचे गणपतीचे हे गवई त्यानी येऊन कानडी पदें म्हटली

२१।३।१८४७

छ. ३ रबीलाखर चैत्र शु ॥ ५ रविवार मु. सिरटी

प्रातःकाळी लक्ष्मेश्वरकर गोंधळी येऊन एक घटकाभर सुमार पदे वगैरे कानडी तात्यासो याजवळ म्हटली तिसरे प्रहरी हमगीरकर किंचनगौडा देसाई भेटीस आले तो समारंभ जुन्या मानपानाच्या तरतुदीचा मोठाच जाहला शेवटी देसाई याने मुजरे करून स्वारी येऊन इतके दिवस झाले तरी मी भेटीस आलो नाही ही मजकडून गोष्ट सर्वस्वी गेली मी पदरचा आहे माझी स्थापना सरकारांनीं केली आहे म्हणोन अर्ज केला रात्रौ लक्ष्मेश्वर गोंधळी ब्राह्मण याणी खाशाजवळ पदे म्हटली चौडके वाले यानी चौडके वाजविले.

२२।३।१८४७

छ. ४ रबीलाखर चैत्र शु ॥ ६ सोमवार मु. सिरटी.

रात्रौ लक्ष्मेश्वर गोंधळी याचे गाणे व रमा व गुलाबीचे गाणे चार घटका जाहले.

२३।३।१८४७

छ. ५ रबिलाखर फाल्गुन शु ॥ ७ भौम वार मु. सिरटी
(घेण्यासारखा मजकूर नाही.)

२४।३।१८४७

छ. ६ रबिलाखर चैत्र शु ॥ ८ रोज मु. सिरटी.

अस्तमानचे चार घटका दिवसास केंचनगौडा देसाई ता॥ सिरटी हा आपासो॥ याजकडे आला सिरस्तेप्रमाणे कचेरीत येऊन बसला इतक्यात भास्करराव बाबासो॥ नरगुंदकर हे आपासोचे भेटीस आले त्यास सामोरे भाऊसो॥ गेले शिरटीकर देसाई यास आपासोनी सांगितले तुम्हीं सिरटीचे किल्यास मोरचे बसविले होते.

२७।३।१८४७

छ. ९ रबीलाखर चैत्र शु ॥ ११ मंदवार मु. सिरटी.

प्रातःकाळी गांवातील विद्वान मंडळीस संभावनेस आणून नारायण आचार्य व नारायण जोसी सिद्धांती यास चार चार रुपये व धोतरजोडा दिला व समस्त ब्राम्हणास ६० रुपये संभावना दिली वनीकोपकर आप्पा यास दोन रुपये मांडवलीकर यास दोन रुपये व कवीश्वर कालीदास गरिब ब्राह्मण यास तीन रुपये दिले.

२८।३।१८४७

छ १० रबिलाखर चैत्र शु ॥ १२ रोज रविवार मु. कळसापूर

प्रातःकाळी दिवसा अडिच प्रहरचे सुमारे सिरटीहून स्वारी निघाली ती अस्तमानचे चार घटका दिवसास साडेतीन कोस बालेधडी म्हणोन गांव आहे तेथे येऊन थोडे थांबून नंतर कृष्णराव हुलगोळ यांचे इनाम गांव कळसापूर येथे आली गदगचे इंग्रज सरकारचे मामलेदार गणेश रघुनाथ तळावली (?) तसेच गदग येथे व्यंकटदास गुजर सावकाराचे चिरंजीव वासुदेवदास या मुक्कामी भेटून गेले सिरटीहून निघताना भाऊ लागू मामलेदार याणी एक कुमेद घोडा नजर केला होता तसेच शालजोडी पागोटे व तलवार निमच्या परज दिल्लीशाई पान आलेमान असा व सोन्याचे साखळीचे ७० सत्तर तोळे वजनाचे नवे पडदले करून दिली. सिरटीहून कळसापूर चार कोस.

२९।३।१८४७

छ. ११ रबीलाखर चैत्र शु ॥ १३ सोमवार मु. होबळ

कळसापुराहून येताना वाटेत गदगास स्वारी जाऊन आली. उदईक सूर्योदयाचे सुमारास नरगुंदास जावयाचे आहे. असे आहे.

३०।३।१८४७

छ. १२ रबीलाखर चैत्र शु॥ १४ मंगळवार मु. नरगुंद

काल मध्यरात्री कूच होऊन शेलवडी वरून नरगुंदचे पूर्वेस नरगुन्दकराचा मळा आहे तेथे आली तेथे बाबासो नरगुन्दकर आले नंतर स्नानसंध्या झाल्यावर श्री व्यंकोबाचे दर्शन व इतर देवांची दर्शने घेऊन सहा घटका दिवसाचे सुमारे कै. बापूजी गणेश गोखले यांनी वाडा गांवात पेठेचे पश्चिमेस श्री. विठोबा देवालय नजिक दक्षिणेस वाडा बांधला आहे त्या वाड्यांत राहाण्यास आली स्वारी मंडळी सुद्धा गांवात गोखले व आणखी देवालय वगैरेत राहिले. साहित्य भोजनाचे नरगुंदकर याजकडून आले तिसरे प्रहरी खासास्वारी नरंगुदकरासह नरगुंदचा किल्ला पहावयास गेली किल्ल्यावर जाऊन वर वाडी आहे तेथे जाऊन पाहून कचेरीत बसून विडे घेऊन स्वारी आली नंतर पुन्हा किल्ला फिरून पाहिला दुरबीणीनीं सर्व रान पाहिले अस्तमानी स्वारी नरगुंदास आली आज कळसापुराहून स्वारीं मुक्काममजकूरी आली ती कोस ८ आठ श्री. सौ. मातोश्रीबाई अस्पर्श झाली.

३१।३।१८४७

छ. १३ रबीलाखर चैत्र शु॥ १५ बुधवार चंद्रग्रहण घ. १७ रात्रीस गोणनगर मलप्रभा तीर.

प्रातःकाळी व्यंकोबाची पूजा पाहून बाहेर आले तेथे डवरी यानी पदे म्हटली ती ऐकून नंतर व्यंकोबा मोडक यानी गायन केले ते व रुद्रविणा वाजविला तो ऐकून स्वारी गोखले याचे घरी ठिकाणास आली अस्तमानी निघाले ते मुकाम मजकुरी १२ घटका रात्री आले नंतर १७ घटकाचे सुमार ग्रहण मग स्नान करून गोप्रदाने दिली जप केला भुयसी वाटली पहाटेचे ५ घटिका रात्रीचे सुमारे मुख्य रस्त्याने कूच जाहले बाईसो अस्पर्श सबब नरगुंदासच राहिली आहे नरगुंदाहून गोणनगर कोस सहा सदरहू गाव रामदुर्गबाई याणी आपली कन्या थोरली सौ. बयाबाई यास इनाम दिला आहे.

१।४।१८४७

छ. १४ रबीलाखर चैत्र व॥ १ गुरुवार मु. गोणनगर.

रामदुर्गकर राधाबाई यांजकडून तात्या हुपरीकर बोलवण्यास आले तिसरे प्रहरी स्वारी गोणनगरचे रानांत गांवचे दक्षिणेस डोंगरानजीक शांबरीवन आहे तेथे गेली होती शांबरी देवीचे दर्शन घेतले देविचे दक्षिणेस तीर्थ आहे तेथे जिवंत पाणी आहे त्या तीर्थात एक लहान कुंड उत्तरेचे अंगास आहे त्या कुंडात शांबरी म्हणोन मोठ्याने हाक मारली असल्यास आतून बुडबुडे येतात हा चमत्कार सर्वांनीं पाहिला तेथें क्षणभर बसून देवीचे

पूर्वेस जवळच मळा आहे तेथे स्वारी गेली मळ्यात नारळी पोफळी आंबे फणस बहूत आहेत अंबराई फार चांगली जागा फार रम्य अशी पाहण्यात थोडी तो मळा त्यांच गावचा आहे देवीजवळचे कुंडाचे पाणी आहे त्याचे धरण बांधून पाणी मळ्यात आणिले आहे तेथे माकडे आहेत अस्तमानी स्वारी परत तळावर आली शांबरी हे रामायणातील शबरीने दिलेली बोरे खाण्याचे ठिकाण.

२।४।१८४७

छ. १५ रबिलाखर चैत्र व॥ २ भृगुवार मु. रामदुर्ग.

भोजनोत्तर निघोन स्वारी डोंगराचे खिंडीनी रामदुर्गास आली रामराव रामदुर्गकर हे सामोरे आले होते व्यंकोबाच्या देवालयात मुक्काम जाहला तिसरे प्रहरी वाड्यांत स्वारी गेली आदर सत्कार झाला राधाबाई रामदुर्गकर व त्याची कन्या व धाकटी सून नमस्कार करून गेली गोणनगरहून रामदुर्ग कोस दोन

३।४।१८४७

छ. १६ रबीलाखर चैत्र व॥ ३ मंदवासरे मु. मिरजी.

रामदुर्गास किल्ल्याचे पश्चिमेस दरवाजा दुसरा आहे त्या वाटेने किल्ल्याचे पडकोटात आपाजीपंत भावे यांचे घरी गेले

४।४।१८४७

छ. १७ रबिलाखर चैत्र व॥ ३ रविवार संकष्टी मु. मिरजी घटप्रभातीरनजीक तेरदळ पांच कोस.

दोन प्रहरानंतर सारे हत्ती नदीत धुतले ऊन फार सबब तात्यासो मात्र गांवात देवळात थंड जागा सबब गेले होते

अस्तमानी तेरदळाहून राघोपंत काळे व विठ्ठलपंत सप्री पंचपावड असे आले होते रात्रीच परत तेरदळास स्वारी उदईक जाणार सबब निरोप घेऊन गेले.

५।४।१८४७

छ. १८ रबीलाखर चैत्र व॥ ५ सोमवार मु. तेरदळ.

मिरजीहून स्वारी १२ घटका दिवसाचे सुमारे निघाली ती मौजे हदींगुंद या गांवात मळ्यात आली तेथे साखरपाण्याचा बेत झाला.

सदरहू मुक्काम मिरजीपासून कोस सहा गोविंदराव नाना हे साताऱ्यास गेले होते ते आले त्याणी वर्तमान सांगितले कीं श्री. पंतप्रतिनिधि कराडकर याणी दत्त सुलगा चैत्र शु॥ २ गुरुवारी शके मजकुरी घेतला श्री. सौ. मा. लक्ष्मीबाई यांची गांठ पडली होती तरवार प्रकरणी बाई बोलली जे आपास इतकी योग्यता आली सुखी असो

गोविंदपंतानी दुसरे वर्तमान सांगितले ते श्री. म. रा. श्री छत्रपती संस्थान सातारा याणीं भागी तारकसीण म्हणोन कसबीण होती; कोणी एक गरिब बायको होती तिचा दादला मेला व तीही मरू लागली त्यावेळेस तिचे लहान सहा महिन्याचे मुल होते ते पायावर ठेऊन महाराजास दिले म्हणोन सांगोन मेली. ते मूल महाराजांनीं भागीचे ओव्यात घालून त्यास सेनापती असा किताब दिला त्या मुलाचे लग्न साल मजकुरी करावें असे ठरोन दोन नवऱ्या केल्या इकडे लग्नपत्र आले होते त्याजवरोन आहेर गोविंदराव नाना बरोबर साताऱ्यास पाठविले होते भागीचा भाऊ रामराव म्हणून आहे त्याणे मुलाचे लग्न केले त्यास व महाराजास ×× अशी पाठविली होती परंतु साताऱ्यास कारभारी व नातू यांचे विचारे एक आहेर महाराजास मात्र करावा असे होऊन सर्वत्रानी एकच केले त्याप्रो नानानीही एक केला लग्नाबद्दल २-२॥ लक्ष रुपये खर्च केला. निःकारण खर्च हा बेजाब केला याविसई वगैरा सर्वत्रास वाईट वाटले.

साताऱचे दुसरे वर्तमान श्री. म. छत्रापती बुवासाहेब महाराज यास पेशजी काशीस इंग्रजी सरकारातून रवाना केले त्याची चौकशी जाहली त्यांत याजकडे कांही दोष नाही असे जाहले त्याजवरून महाराजास व त्याणी पेशजी कै. बाळासो सेनापतीचा मुल ओव्यात घेतले आहे त्यास गादीवर बसवून बुवासो महाराजानीं साताऱ्यास येऊन राज्यकारभार करावा असे आहे म्हणोन ××× ज्या वेळेस महाराजास काशीस नेले त्यासमई बाळासो सेनापती यासहि बरोबर नेले मागे आपासो महाराज याणीं सेनापतीचे घर जप्त करून त्याचा लिलाव केला त्यात जे जिन्नस मोठे मोठे होते ते चवथाई अशा हिश्याने किंमत लावून सारे घेतले. पंचविस हजार अदमासे सरकारात कागदी जमेस धरली आहे सेनापती व महाराज गेले त्यावेळेस महाराजानीं इंग्रजी सरकारांत याद दिल्ही जे मजकडे अपराध आहे म्हणोन इंग्रजी सरकारातून मला काशीस रवाना केले जे करणे ते मला करावयाचे माझे पदरचे सेनापती होते त्याजकडे काय आहे असे असतां त्याचे घरजिनगीचे लिलाव होत आहे पाहिजे तसे किंमत लावित आहे म्हणोन वगैरे दिल्ही नंतर लिलाव जाहाला हल्ली चौकशीअंती दोष नाहीं असे जाहल्या नंतर महाराजानी पुन्हा इंग्रजी सरकारांत जिनगीविसई याद दिली त्याजवरोन चौकशीबद्दल विलायतेहून हूकूम आला त्याजवरोन सातारे मुकामी रसिदंट वगैरे साहेबलोक यांचे विचारे चौकशी जाहली त्यात सेनापतीचे नुकसांनीं बद्दल १। लक्ष रुपये आपासो महाराजानीं सेनापतीस द्यावे असे ठरले त्याजवरून सदर ऐवज द्यावा असा हुकूमही आला आहे

भागीचा भाऊ रामराव म्हणोन शिंदा गुलाम आहे त्याजवर मर्जी महाराजाची आहे त्यास झुंजारराव म्हणोन किताब दिला त्यांस सर्व सरदार व मानकरी याणी कचेरीत भर ताजीम द्यावी ये विसईचे महाराजाचे म्हणणे. त्यावरोन सर्वत्रांनीं विनंती केली जे महाराज लहान मनुष्यास कामाशिवाय मोठा मान देणे हे नीट नव्हे ही

गादीची जागा जशी ज्याची योग्यता तसे असावे पण महाराजाचा फार आग्रह की मी सांगतो हे सर्वत्रानी ऐकावे परंतु सर्वत्रानीं ऐकली नाहीं व कांहीं पाच चार आसामी मानकरी चाकरी सोडून निघून गेले सर्वत्रास जाहले कीं फार महाराज अनन्वित करतात कसबीण ती काय तिच्या पोराचा इतका बहुमान होतो हे राज्यकर्त्यास वाईट बेकैदी आहे ईश्वर सत्ता असेल तसे होईल महाराज थोरले हे येणार अशी वदंता आहे त्याजवरून नातू वगैरे कितीएकाची लक्ष्ये तिकडे आहेत सातारा येथिल लोक फार दिलगीर आहे

आणखी वर्तमान श्री रा. माधवराव गोविंद दाजीसाहेब चिंचणीकर हे श्री. रा. रामचंद्र गोपाळ यांचे लग्नास जमखिंडीस गेले आहेत

६।४।१८४७

छ. १९ रबीलाखर चैत्र व॥ ६ मंगळवार मु. तेरदळ

प्रातःकालचे चार घटिका रात्रीस स्वारी काळे यांचे मळ्याहून निघाली ती तेरदळचे ठाण्यात सरकारी वाड्यांत दाखल झाली मामलेदार याणी चंद्रज्योती लाविल्या होत्या खाशाची भोजन व निद्रा झालेनंतर तिसरे प्रहरी राधा नायकिण इचे गाणे झाले चार घटका दिवसास स्वारी बाहेर ठाणे पाहावयास गेली होती ठाण्यासभोवते फिरून पडझड पाहून अस्तमानी परत आली चिमडकर कोटबागी याजकडून फर्मास ऊस आंजिर साखरखडी बेदाणा केळी वगैरे घेऊन कारकून आले होते

७।४।१८४७

छ. २० रबीलाखर चैत्र व॥ ७ बुधवार मु. तेरदळ

प्रहर दिवसाचे सुमारे राघोपंत काळे याणी तेरदळचे रानांत पूर्वेचे अंगास हल्ली इगलीचे वाटेस डोंगरात आंब्याची झाडे लाविली आहेत ती पाहावयाकरितां स्वारी निघाली शंभरदीडशे आंबे पंचवीस फणस व काजू लाविले आहेत ती अंबराई पाहून स्वारी परत निघाली आपासोनी जमखिंडीस यावे म्हणून विनंती करणेकरिता व उद्या रामचंद्र आपासाो जमखिंडीकर भेटीस येणार हे सांगण्याकरितां आबा आसंगिकर वगैरे आले होते.

सतीकराचे घरी भोजन झाल्यानंतर स्वारी गावांत श्रीप्रभुस्वामी वगैरे देवास जाऊन आली.

८।४।१८४७

छ. २१ रबीलाखर चैत्रा व॥ ८ गुरुवार मु. तेरदळ

गोविंदसिंग सांगलीहून आले.

बापू नरळीकर विषमज्वराची भावना होऊन चैत्र व॥ ५ सोमवारी देवआज्ञा झालेचे वर्तमान आले

दुसरे वर्तमान बाबा नारोसकर वकिल इंग्रजी सरकारचे पदरचे हे जमाखिंडी व मुधोळास असतात त्याचे गडी दोघे कोणी फितविले किंवा कसे ते इश्वर जाणे बाबा शौचास जात होते त्याजबरोबर ते गडी होते त्याणी शौचास बसल्यानंतर दगडानी मारून डोचके फोडले व डोळ्याजवळ बहूत लागले दहाबारा दिवस झाले खैर आहेत येविसईचे पत्र आले आहे नारोसकरास ज्या गड्यानें मारले त्यांस मुधोळकर याणीं बेडी घालून ठेवून सदहूचा रपोट इंग्रजी सरकारात लिहिला आहे.

तिसरे प्रहरी काळे याचे घरी राधानायकिणीचे गाणे दोन घटका जाहले अस्तमानी रामाजी अनंत फडणीस यांचे घरी विड्यास गेले फडणीसांचे घरी जाऊन गावांतील रयत लोकांनीं वगैरे नव्या विहिरी खणून मळे केले आहेत ते पाहण्यास गेले नंतर परत आल्यावर आकप्पा देसाई परगणे तेरदळ व सगुणाप्पा नाडगौडा व रयत वगैरेनीं नजर नजराणा किराणा जिन्नस ठेविला संप्रदायाप्राो देसाई यांनीं मोहर, नाडगौड्यानी पुतळी व गांवकऱ्यानी दोन पुतळ्या आशा भेटीबद्दल ठेवून मुजरा केला. तिसरे प्रहरी गांवातील पैलवान एक दोन येऊन तात्यासो याजवळ घटकाभर खेळून गेले.

९।४।१८४७

छ. २२ रबिलाखर चैत्र व॥ ९ भ्रुगुवार मु. तेरदळ.

प्रातःकाळी स्वारी हानगंडीस यावी म्हणून आकप्पा देसाई विनंती करण्यास आले होते तीन प्रहर वाजताच स्वारी हानगंडीस गेली देसाई याचा मळा पाहून शेला पागोटे दुप्पट्टे नजर स्वीकारून घटकारात्रीचे सुमारे स्वारी परत तेरदळास आली. छ. २२ रबीलाखर भ्रुगुवासर मु. तेरदळ इतक्यांत चिमडकर वीरसंगाप्पा याचे चिरंजीव शिवलिंग अप्पा हे आले त्यांस निमताजीम घेऊन भेटण्याची वहिवाट त्यांनीं चिमडास येण्याची विनंती केली निरोप घेऊन ते गेले.

स्वारी हनगंडीस जाताना वाटेने गोष्टी निघाल्या त्यांत इंग्रजी सरकारातून तलवार दिली त्या तरवारीस सोन्याचे पडदळे ७० सत्तर रुपये भाराचे केले आहे असे इंग्रज सरकारास कळवीत आहो यापूर्वी कधी सोन्याचे पडदळ केले नव्हते ते केले त्यांस बाध येऊ नये म्हणून (दुसऱ्याने कोणी असे करू नये असा इंग्रजाकडून आदेश यावा म्हणून) तेरदळाहून हनगंडी ·॥· अर्धा कोस

१०।४।१८४७

छ. २३ रबीलाखर मंदवासर चैत्र व॥ १० मु. तेरदळ

प्रातःकाळी भोजनोत्तर तेरदळचे ठाण्यापैकी रेहकले व जेजाला पाहण्यास आणिल्या होत्या खराब झाल्या त्या नीट करविल्या.

रा. अंताजी मल्हार दप्तरदार मिरज किल्ल्याकडील याचे व कै. केशव लक्ष्मण मोडक पेठ सांगली याचा देण्याघेण्याबाबद कज्या होता मोडकांनीं फिर्याद करून

अंताजी मल्हार याची तैनात जप्त केली होती ती गेली १५ वर्षे जप्त आहे हल्लीं केशव नायकाचा मुलगा व्यंकोबा नाईक पांडोबा याणी विनंती केली कीं आमच्यामुळे ब्राह्मणाची तैनात जप्त झाली आहे आम्ही आतां आपसात उलगडा करून घेऊ तरी जप्ती मोकळी करावी. आपासोनीं ते मान्य केले आपासो जमखिंडीकर व माधवराव चिंचणीकर यांच्या स्वाऱ्या येऊन भेटल्या रात्रौ जमखिंडीकर व चिंचणीकर भोजनास आले होते गांवातील गोंधळी रात्री येऊन दोन पदे म्हणून गेले.

११।४।१८४७

छ. २४ रवीलाखर चैत्र व॥ ११ रविवार मु. चिमड

तेरदळाहून चिमड कोस २॥ अडीच

१२।४।१८४७

छ. २५ रवीखलावर चैत्र व॥ १२ सोमवार मु. रबकवी

जमखिंडीकर यमना नाईकीण हिच्या दोघी लेकींचा नाच कर्नाटकी जाहला जमखिंडीकर यांस हस्तीदंती हिरवे रंगाचा आंवा लांवन (?) आला होता तो दिल्हा फार चांगला होता.

सदरहू मुक्काम चिमडापासून रबकवी एक कोस

१३।४।१८४७

छ. २६ रविलाखर चैत्र व॥ १३ रोज मंगळवार मु. रबकवी

रात्री श्री. वीरभद्रेश्वराचा रथोत्सव झाला स्वारी जमखिंडीस गेली जमखिंडीचे किल्ल्याचे इशान्येस मोतीबागेत वंगला आहे तेथे आली तिसरे प्रहरी किल्ल्यात गेले महादेवाचे दर्शन घेतले कचेरिस बसले नंतर बाहेर येऊन गांवात धोंडोपंत आपटे याचे घरी जाऊन सायंकाळी मुक्कामास आले १५–२० पंधरावीस हजार माणूस स्वारी पाहण्यास जमले होते.

१४।४।१८४७

छ. २७ रवीलाखर चैत्र व॥ १४ मु. जमखिंडी

१५।४।१८४७

छ. २८ रवीलाखर मु. जमखिंडी

कुशाबा नाना लिमये पंतोजी इंग्रजी शिकवणार आपासाो जमखिडीकर यांस, ते भेटींस आले होते.

१६।४।१८४७

छ २९ रबीलाखर वैशाख शु॥ १ .मु. हुल्लकहळी.

जमखिंडीकर याणीं वडलांचे वेळची हत्यारे तरवारी बंदुका, पेशकबजे व पिस्तुले वगैरे दाखविली त्यांत श्री. कै. परशरामपंत भाऊसाो यांचे हातचा पट्टा आहे किंवा नाहीं याचा शोध केला परंतु नाहीं ! भाऊसाो पाडाव जाहले त्या समई गेला किंवा कसे याची माहिती नाहीं. श्री. रामचंद्रपंत आपासाो यांचे हातची मात्र फिरंग दाखवली तिला गोळी चिमव्याचे वर दोन तीन बोटे सुमार लागून पोंचा येऊन भोंवरा जाहला आहें ती व आणखी एकदोन तरवारीच्या जखमा आहेत त्या पाहिल्या आपासाो याणी सगिंतले जे भाऊसाो यांचे हातचे पट्टयास खूण खोबळ्यावर तरवारीची जखम आहे व खोवळ्यावर रूपेरी वरखी मुलामा भरगच्ची आहे म्हणोन. तो कांहीं नाही.

जमखिंडीकर याचा निरोप घेऊन माघारी बंगल्यास आले हुलकहळीस मध्यान रात्रीस जाऊन पोहोचले जमखिंडीपासून सदरहू मुक्काम कोस नऊ.

१७।४।१८४७

छ १ जमादिलावल वैशाख २-३ अक्षय तृतीया मंदवार मु. म्हैसाळ इलाखा सांगली.

नरसिंगरावजी यांनीं वर्तमान सांगितले त्यात श्री. रा. पंतप्रधान बाजीरावसाो यांची कन्या ७ वर्षाचीं आहे ती तात्यासाो यांस द्यावी म्हणून कलकत्त्याचे गवरनरास बाजीरावसाोनी लिहिले तिकडून विलायतेस लिहुन जाऊन तीन महिन्यांत मान्यता आणविणार. कसेहि करून हा योग घडविण्याची बाजीरावांची इच्छा आहे. स्वारी म्हैसाळाहून तीन प्रहरचे सुमारास निघाली ती वाडीवरून मिरजेस म्हैसाळ वेशीनें किल्ला उजवा घालून शनिवार पेठेतून तळ्याचे वेशीने येऊन तळे डावे घालून कमानी वेशीनें बाहेर येऊन श्रीगणपतीचे मळ्यांत स्वारी आली. रात्रौ पाऊस फार पडला उजाडेपर्यंत पडून लष्करचे माणसाचे फार हाल जाहले.

प्रातःकाली किल्ल्यातून श्री. रा. बाळासाो व दादासाो व विनायकराव पंडित येऊन भेटले व वाड्यांत येण्याविषयी विनंती केली त्याप्राो गेले होते किल्यात देवघर चौकांत कचेरीस बसून माधवजीचे दर्शन घेऊन नातेवाईक मंडळीच्या भेटी घेऊन किल्ल्या बाहेर आले अंडरसन साहेब याचें भेटीस गेलें होते. काशीहून नरसिंगरावजीचे पत्र आले ते दोन प्रहरी वाचून पाहिले त्यांत श्रीमंताची कन्या तात्यासाोस देणेचा मजकूर होता.

२०।४।१८४७

छ. ४ जमादिलावल वैशाख शु ॥ ६ मंगळवार मु. मिरज

२१।४।१८४७

छ. ५ जमादिलावल वैशाख

मु. मिरज स्वारी अडीच प्रहरी निघाली ती सांगलीस सुमुहूर्ते पंचवीस घटका दिवसानंतर आली गणपती माहाराजाचे देवळांत दाखल झाली करांचली देवापुढे

ठेविली पांच घटका रात्रीनंतर मुहूर्त होता किल्ल्यांत घरी जाण्यास. किल्ल्यांत कचेरी व नजरा झाल्या.

२२।४।१८४४

छ ६ जमादिलावल वैशाख शु॥ ५ वृद्धी गुरुवार.

मु. सांगली रा. बापूजीपंत भट पुणेकर हे पुण्याहून सांगलीस येऊन दोन महिने सुमार झाले ते आज संध्याकाळी भेटीस आले कोल्हापूरकर छत्रपतीचे लग्नाचे पत्र आले श्रीमंताच्या वेळच्या गोष्टी निघाल्या होत्या. श्री. कै. पंतप्रधान सवाई माधवरांवसो यांचे पंतोजी रा. राघोपंत भट त्याचे चिरंजीव बापूजीपंत भट. माहितगार वृद्ध ६५ वर्षांचे आहेत. बरे आहेत.

आज बापूजी भटास व निळकंठराव पेठयास खासे पंक्तीस बोलावले होते.

२४।४।१८४७

छ. ८ जमादिलावल वैशाख शु॥ ९ मंदवार.

मु. सांगली रा. बाबाजी सोनी याणीं बेळगांवास मेहेरबान जनरलसाहेब होते त्याची बदली होऊन दुसरे हुद्यावर गेले त्याजवळून एक साहेबाची तसबीर व एक अडजुना दुहेरी तंबू घेतला तो सरकारांत आला. वे. मू. प्रभाकर शास्त्री वाईकर हैदराबादेस गेले होते ते चार पाच महिने तेथे होते ते आले त्यांनीं वर्तमान सांगितले की हैदराबाजवाल्याचा व इंग्रजाचा कांहीं विघाड येऊन हैदराबादेस अंमल इंग्रजाचा जाहला.

२५।४।१८४७

छ ९ जमादिलावल वैशाख शु॥ १० रविवार. मु. सांगली

प्रात:काळी बापूजी भट पुणेकर हे मागील जुने श्रीमंताचे हातचे कागद व पुस्त्या वगैरे माहितीचे कागद घेऊन आले होते कांहीं दाखविले नंतर निरोप घेऊन गेले

दोन प्रहरचे सुमारास वे शा. सं. रा. दाजीबा जोसीराव हे महाराजाचे लग्नाचे आमंत्रणपत्र घेऊन आले थोरले महाराज बाबासाहेब यांचे लग्न उदईक शु॥ ११ सोमवार गोधुळचे. कन्या बापुजीराव पाटणकर यांची व धाकटे चिमणसो महाराज यांचे लग्न वैशाख व॥ १ मंदवारी मुलगी नरसिंगराव शिंदे यांची असे पत्रात आहे.

स्वारी करवीरास लग्नास जावे न जावे याचा विचार होऊन न जावे असे ठरले कारण पहिलेपासून सांप्रदाय जाणेचा नाही त्यांत आपले योग्यतेप्रमाणे मान मरातब झाला तर बरे. पुन्हा आवकाश थोडा यास्तव बेत राहिला

आवा जोग जिवाजी गोपाळ जोग यांचे नातु ते भेटीस आले होते.

२६।४।१८४७

छ १० जमादिलावल वैशाख शु॥ ११ सोमवार मु. सांगली

तिसरे प्रहरी स्वारी हरीपुरास निघाली तेथील देवापुढे इंग्रजी सरकारांतून आलेली कारांचली ठेवून नमस्कार केला. तेथून निघून परत सांगलीस २८ घटकेचे आंत मुहूर्त म्हणून त्याचे आंत किल्ल्यात जाऊन देवदर्शन केले रात्रौ किल्ल्यांत विष्णूशास्त्री गाडगीळ व दाद्रा दातार यांचे पुराण व भागवतातील आर्यावर चर्चा झाली

२७।४।१८४७

छ. ११ जमादिलावल वैशाख शु॥ १२ मंगळवार मु. सांगली

नाना मायदेव हे आपासो यांचे सासरे ते मंगळवेढ्याहून काल सांगलीस आले. —कारण कै. व्यंकटराव तात्या यादवाडकर याचे चिरंजीवाचे लग्न मंगळवेढयास आहे सबब श्री. सौ. मातुश्रीबाई साहेब यास मंगळवेढयास लग्नास येणेविशी विनंति व लग्नाचे आमंत्रण करावयाकरिता आले आहेत रा. दिनकरपंत भाऊ गोखले याची आजी व धाकटा भाऊ असे श्री महायात्रेस गेले होते ते काल आले त्याणी आपासाहेब यास श्री गंगा व पांढरे सोवले काशीचे असें आणून दिल्हें आज देसिंग घोरपडे व म्हसवडकर बाजीराव माने वगैरे व मगरमंडळी अशी स्वारीबरोबर सिलेदार होते त्यास निरोप घरी जाणेस दिल्हे. ते गेले. रात्रौ संध्या फराळ जाल्यानंतर वे. रा. नरभट आणा जोसी सांगलीकर वैद्य वगैरे मंडळी होती येरवीच गोष्टी जाहल्या फडणीस भिडे बापट हे मिरजेहून आज आले नाहीत

२८।४।१८४७

छ. १२ जादिावल वैशाख शु॥ १३ बुधवार मु. सांगली

प्रातःकाली स्नानसंध्येचे समई गावातील सिष्ट वे. रा. सखंभट गाडगीळ व हरभट फडके व बाळंभट म्हैसकर व विठल (भट) जोसी मटकर वगैरे मंडळी येऊन आसीर्वाद नारळ × × व तात्यासो यास देवलात देऊन घटकाभर बसून निरोप घेऊन गेले नंतर आज नरसिंह जयंति फराळ निद्रा जाहलेनंतर तिसरे प्रहरी जिन्नस जिनसाना व अलिबकस हत्तीचे दात × × जन्मापासून आजपर्यंत जितके निघाले तितके ठेविले आहेत ते आणून पाहिले येकंदर तीन × × सुमार लांब तुकडे आहेत ते पाहिले वगैरे आणखीहि जिन्नस पाहिले रा. बाबा वसगडेकर व विठलराव बाळकृष्ण बिनिवाले हे भेटीस आले होते क्षणभर बसून निरोप घेऊन गेले कर्नाटकातून पांढरे व काळे गंगावन विकावयास घेऊन मुसलमान आला होता ते पाहून परत दिले सरकारात आहे सबब दिल्हे. सहा घटका दिवसास सुमार स्वारी बागेत जाऊन अस्तमानी परत आले. स्वामी

संकेश्वरकर याचे संस्थान जप्त होते ते सुटले म्हणोन खास वर्तमान समजले-स्वारी मुहूर्तानें जे दिवसीं आली त्या दिवसी दारू-नळे चंद्रज्योति मोर व घडेबाजी वगैरे चांगली करविली होती. परंतु पाउसामुळे बेत राहिला सबब आज पांच घटका रात्री अवशीचे सुमारे चांदण्यात श्री देवापुढे रस्त्यांत दारू लावली तात्यासाो भाऊसाो पाहण्यास बसले नगारखान्यापुढे बसले होते वगैरे गावचे माणूस इतर पाहण्यास आले होते दारूवर हत्तीचे × × सिंगरवट घोडी घालून बुजरेपणा घालविला. फडणीस बापट जोग (?) मिरजेहून आले.

२९।४।१८४७

छ. १३ जावल वैशाख शु॥ १४ गुरुवार मु. सांगली.

सौ. बाईसाहेब यांचा बेत मंगळवेढयास लग्नासाठी जाण्याचा राहिला. हरिहरराव दादा लागू आले. दौलतीसंबंधे बोलणे झाले.

३०।४।१८४७

छ. १४ जावल वैशाख शु॥ १५ मंदवार मु. सांगली

आज वार्षिक वसंतपूजा जाली तात्यासोनी ब्राह्मणांचे पाय धुऊन पूजा करून ब्राह्मणभोजन सुमार येक हजार जाले दक्षणा येक रुपया, आठ आणे, चार आणे दाखल्या प्रो दिली. स्वारी तिसरे प्रहरी किल्ल्यातून बागेत जाऊन अस्तमानी परत देवालयांत आली. सखाराम बाबा गोडशे हे सालमजकुरी मुंबईस आश्विनच्या सप्त्यास (?) गेले होते ते आज कुटुंबसुधा आले.

१।५।१८४७

छ. १५ जमादिलावल वैशाख. मु. सांगली

तिसरे प्रहरी सखारामबाबा गवई हे मुंबईहून आले सबब भेटीस आले भेट घेऊन मुंबईस रा. आनंदराव पालेकर मांडवी म्हणजे जकातीचे कामावर असतात त्याणी गव्याचे शिंगाचे कलमदान रुप्याचे पटयाचे एक व पत्र असे बाबाबरोबर सरकारात पाठविले ते आणून दिले नंतर या देशापेक्षा तरवारीचा लौकिक तिकडे इंग्रजी लोकांत फार मानतात म्हणून सांगितले व तरवार दिली त्यावेळी ममईस सोळा तोफेचे बार केले म्हणून सांगितले.

२।५।१८४७

छ. १६ जमादिलावल वैशाख व॥ २ मु. सांगली

३।५।१८४७

छ. १७ जमादिलावल वैशाख व॥ ३ संकष्टी मु. सांगली.

४।५।१८४७

छ. १८ जमादिलावल वैशाख व॥ ४ मंगळवार. मु. सांगली

नारायणराव कृष्ण मंगळवेढेकर हे करविरास आहेर घेऊन लग्नास गेले होते त्यांनीं तिकडील वर्तमान सांगितले त्यातील हाशील-करवीरास कोणी मोठे मनुष्य पहिले आमदानी-तील आगदी नाही-सारे नवे त्यात इंग्रजी हुकमाशिवाय कोणतेहि करावयाचे नाही-काल-मानानुरूप लग्नसमारंभ जाहला थोरले महाराजाची बायको हिला लग्नापूर्वी आठचार दिवस रजोदर्शन प्राप्त जाहले तिला १४ वर्षे सुमारे आहे नंतर लग्न जाहले. दुसरे महाराजाची बायको लहान आहे व समारंभास मनुष्य थोडेच होते कोणी सरदार वगैरे नव्हते पहिले दिवशी ब्राम्हण भोजन ३००० दुसरे दिवशी चार हजार व पुढे तिसरे चवथे पाचवे दिवशी अनुक्रमे ५-६-९ हजार असे जाहले भोजनाचा बेत पंचगंगेवर झाडीत झाला होता. सावली सुमारांत होती-पांचवे दिवशी देकार झाला सकट ब्राम्हणास एक रुपया मुलास चार आणे बायकास अधेली गोसावी बैरागी कोमटी वगैरेस चार आणे प्रमाणे दिले दहाबारा हजार ब्राम्हण दक्षिणेस जाले साताऱ्याहून नरसोपंत म्हणोन कोणी देशस्थ हे आले ते साताऱ्यास बुवासाहेब यांचे कारकिर्दी पासून आपले वडीलासह चाकरीस होते महाराज काशीस गेल्यावर हे बेरोजगार झाले म्हणून कांहीं सोइच्या उद्देशे श्री. रा. आप्पासो यांस येऊन भेटले त्यांस भोजनास बोलाविले आहे व वासुदेव बाबा म्हैसकर यांस चिंचवडचे गणपतीचा प्रसाद ते ब्रम्हावर्तास आहेत त्याचे पुत्रास श्री. बाजीराव सो यांची पालक कन्या तिची कन्या देऊन सालमजकूरी लग्न जाहले वासुदेव बाबा पूर्वी इकडील पदरचे ते स्मरून त्यांनी लग्नसमारंभ झाल्याची वार्ता कळविण्यास आपले चुलत बंधू आपाभट म्हैसकरास लिहिले होते त्यांवरोन ते येथे आले होते. त्यास धोतर जोडा देऊन निरोप दिला.

५।५।१८४७

छ. १९ जमादिलावल वैशाख वद्य ५ मु. सांगली

श्रीमंत बाळासो मिरजकराकडून चंदनाची पेटी कर्नाटकी खोदीव पाहावयास आली आहे.

६।५।१८४७

छ. २० जमादिलावल वैशाख व॥ ६ गुरुवार मु. सांगली या दिवशी विशेष नाही.

७।५।१८४७

छ. २१ जमादिलावल वैशाख व॥ ७ सांगली

हरीहर दादा लागू यांनी आपले सांगलीचे घरांत विहिर खंटली त्याची कूपशांत आज केली

गणपतराव विनायक पटवर्धन यांचे चिरंजीव परशरामपंतभाऊ यांची पत्नी माहेरी साताऱ्यास वैशाख व॥ १४ गुरुवारी वारल्याचे वर्तमान आज आले.

छ. २२ जमादिलावल वैशाख शु॥८ मु. सांगली

शिवराम नाईक बंकापुरे मिरजेस राहणारे यानी एक पांचेची पोहोची सराफरी अडिच बोट हामचौक व दुपटेदार बोट सव्वा बोट अशी रंगदार होती ती विकावयास आणिली होती तिची-किमत सुमार ७००, ८०० सांगितली आहे

छ. २३ जमादिलावल वैशाख शु॥ ९ रविवार मु. सांगली

रात्रौ श्रीगणपती महाराजाची एकवीस ब्राम्हणाची वसंतपूजा जाहली एक रुपया दक्षणा व पंखा असे ८६ दिले. पंखे सांवतवाडीहून मोरोपंत लेले यानीं पाठविले ते आज आले

तेगुराहून डोंगरातून स्वारी धारवाडास गेली ते समईच माणसे भालेकाठ्या आणावयासपाठविली होती त्याणी ११००-१२०० भालेकाठ्या तोडून सांगलीस आज आणिल्या

छ. २४ जमादिलावल वैशाख शु॥ १०, ११ सोमवार क्षयदोन मु. सांगली

जनार्दन कृष्ण केळकर दिमत पागा याचे पुत्र विनायक जनार्दन याचे लग्न झाले

छ. २५ जमादिलावल वैशाख शु॥ १२ भौमवार मु. सांगली

नरसोबाचे वाडीस कोणी सत्पुरुष दिगांबर मौनी आले आहेत त्याचे दर्शनास उदईक जाण्याचे ठरले

छ. २६ जमादिलावल वैशाख व॥ १३ बुधवार मु. नरसोबावाडी

सांगलीहून प्रात:काळी कूच करून घटकारात्री वाडीस स्वारी पोंहचली अस्तमानी परत आले सांगलीहून वाडी मुक्काम कोस पांच

छ. २७ जमादिलावल वैशाख व॥ १४ गुरुवार मु. सांगली

काल वाडी येथे मौनी स्वामी बाबाजी गाडगीळ यांचे ओवरीत राहिले होते त्यांचे जाऊन दर्शन घेतले चरणावर मस्तक ठेवले जवळ कोणी होते त्यानी स्वामीचे हात स्वारीचे मस्तकावर ठेवविले स्वामीजवळ कोणी नारायण दीक्षित म्हणून वृद्ध ब्राम्हण सर्वविद्वान आहे ते स्वामीजवळ भाषण सांगत होते ते श्रवण केले

दोन प्रहरी विनायकराव कुरुंदवाडकर भेटीस आले व कुरुंदवाडास येण्याविषयी विनंती केली पण आपासोनी नाकारले नंतर भाऊ वाठारकर निंबाळकर निसबत करवीरकर हे भेटीस आले नंतर गणेशपंत साठे हे आपासो यांची पत्नी यांची बहीण सौ. वारुबाईचे यजमान ते आपासो यांचे साडू ते वाडीस सेवेस असतात ते भेटीस आले होते.

गोव्याची कळावातीण ममईस होती तिला कांहीं उपद्रव सबब ती येथे सेवेस आली आहे तिणे देवाजवळ पदे म्हटली ती बरीशी वाटून तिजकडून आणखी १, २ पदे म्हणून घेतली तिला लुगडे खण दिले नंतर स्वारी निघाली ती कुरुंदवाड डावे घालून सिरढोणावरून इचलकरंजीस तिसरे प्रहरी गेली कुरुंदवाडास गोपाळराव म्हैसकर आखबारनिशीस असतात ते आले होते ते वाटेने थोडा वेळ होते इचलकरंजीकर केशवराव तात्यासो भाद्रपद मासी दुखण्याने आजारी पडले सबब श्रीत्र्यंबकोबास नवस केला होता सबब बरे होऊन दर्शन घेऊन आले आहेत इचलकरंजीकरीण यांचा, दुसरे पत्नीचा गर्भपात झाला त्याचेहि समाचारास स्वारी गेली होती नंतर गावात त्रिबकपंत सहस्रबुद्धे तात्यासोचे पंतोजी त्याणीं घरी बोलावून सत्कार केला.

इचलकरंजीहून ६ सहा घटका दिवसास स्वारी निघोन सांगलीस आली.

छ. २८ जमादिलावल विशेष मजकूर नाही

छ. २९ जमादिलावल अधिक जेष्ठ शु॥ मंदवार मु. सांगली विशेष नाही.

छ. १ जमादिलाखर अ. जेष्ठ शु॥ २ रविवार. मु. सांगली

आज कवलापुरास जाण्याचा बेत आहे कारण तेथे गांवचे उत्तरेस पांढर मोठी आहे ती खणतांना त्यात एक दगडाचा रांजण मोठा चाळीस घागरीचा सुमार आहे त्याची भकले आहेत दोन्ही भकलांचा सांधा कळाशी घेतलेला आहे.

तिसरे प्रहरी स्वारी कौलापुरास जाऊन सायंकाळी परत आली.

छ. २ जमादिलाखर अधिक जेष्ठ शु. ३ इंदुवार मु. सांगली.

पंचपा उमदी यांनीं रबकवीहून सरकारांत नजर म्हणून सागवानी पाट रुप्याचे फुलाचा व तांब्याचे कारंजे बिन खजीन्याचे दम भरून उडावयाचे असे पाठविले ते आले आहे व गोपीनाथ दादा वाईकर आले होते राजकी व शास्त्रीय चर्चा झाली.

छ. ३ जमादिलाखर अ. जे. शु॥ ४ मंगळवार मु. सांगली विशेष नाहीं

छ. ४ जमादिलाखर अ. जे. शु॥ ५ बुधवार मु. सांगली.

नगीसमशेर हत्ती उदगावचे रानांत चारणीस होता त्यास मस्त येऊन सुटला तो येथे सांगलीस मौज पाहण्यास आणविला तो काल आला आज प्रातःकाळी श्री गणपतीचे देवालयापुढें येऊन दहापांच वेळ करून (?) मौज केली इतक्यात नारो सदाशिव दांडेकर याचे घरापुढे ××× धक्याने दोन मुले दहा वर्षाची ××× त्याचे पागोटे व धोतर पायात आडकले तेव्हा एक मुलाने गडबड करून पळाले दुसऱ्या मुलास सवड सापडली नाही हत्तीने येऊन × × × हत्ती मकणा आहे दात नाहीत सोंडेचे मुसंड्याने दोन तीन ठोकरा पोरास मारल्या परंतु कांही लागले नाही पोर बचावले इतक्यात दोन चरकी बाण लावताच हत्ती एकीकडे निघून गेला.

आज सकाळी गोपाळपंत बावधनकर हे आले काल मोरोपंत लेले सुंदरवाडीकर यांजकडून गोमांती आंब्याची कलमे इसाड करावयास पाठविली आहे व इसाडे करणारा माणूस पाठविला आहे.

कौलापुरास मातीत सांपडेलेला हौद आणिला त्यापैकीं एक खालचे टोपण होते त्यास पदर होता ते टोपण गाड्यावरुन उतरताना फुटले तीन तुकडे झाले.

छ. ७ जमादिलाखर अ. जेष्ठ शु॥ ४ मंगळवार मु. सांगली

आज सकाळी देवळातील नगारखान्यापैकी झिल्ला बंब नौबत वगैरे सर्व सामान आणून पाहिले दोन घटका नगारखाना वाजविला.

छ. ८ जमादिलाखर अ. जेष्ठ शु॥ ५ बुधवार. मु. सांगली

नागोपंत बापट वकील मिरजेहून आज आले.

खास पंक्तीस आज बाबा गाडगीळ होते.

छ ९ जमादिलाखर अ. जे. शु॥ ९ मु. सांगली.

अस्तमानी दोन घटका दिवसास पाऊस मोठा पडला वीज श्री गणपतीचे देवळाचे शिखराचे कमानीचे गुमज्या २ दोन त्याच्या व थोडे एक दोन ठिकाणी चुन्याचे डपले पडले आहे देवळातील एक झाड चंदनाचे पडले व देवळाचे कळसाचे खैराचे लाकडाची ढलपी थोडीशी गेली आहे.

छ. १०–११ जमादिलाखर विशेष नाही

छ. १२ जमादिलाखर मु. सांगली.

छ. १३ जमादिलाखर मु. सांगली.

छ. १४ जमादिलाखर

विनायक भट कळंत्रकर हे त्रिंबकेश्वरचे सरकारचे क्षेत्रउपाध्ये त्याणी ती. कै. गोविंदपंतनानासो वगैरे वडील मंडळीची अक्षरे लिहिलेल्या वह्या आणून दाखविल्या त्यास १५ रु. देऊन निरोप दिला.

परवाचे दिवसी फिरस्त्या मुसलमानाजवळून दुंबी बकऱ्याची जोडी रु. ११० खरेदी घेतली.

छ. १५ जमादिलाखर अ. जेष्ठ व--१ वार रविवार मु. सांगली.

छ. १६ अ. जे. व. मु. सांगली

देवळावरील विद्युलतापाताबद्दल श्री. मंडपात होम वगैरे करून शांत केली.

छ. १७ जमादिलाखर अ. जे. व. ३ मु. सांगली

चिचणीकर अन्नपूर्णाबाई वारल्यानंतर तिची सवत गंगाबाई इणे मरते समई गणपतराव वासुदेव शिळकर यांचे चिरंजीव दत्तक घेतले त्यांस सरंजाम चालवावया

विसई अर्ज केला होता त्याचे बूक इंग्रजी अक्षराचे विलायतेहून चिंचणीस आले आहे ते पाहाण्यास पाठवून देतो येविसईचे पत्र चिंचणीहून आले.

छ. १८ जमादिलाखर अ. जे. व।४ संकष्टी बुधवार मु सांगली.

दाजी विनायक सहस्त्रबुद्धे काल रात्रौ वाड्यातून घरी परत आल्यावर घेरी येऊन पडले पक्षघाताने डावे अंग गेले आहे

छ. १६ जाखर अधिक जेष्ठ व॥ १ ××× मु॥ सांगली

खाशानी प्रातःकाळी स्नानसंध्या जाहल्यानंतर विद्युल्लतापात श्री गणपतीचे शिखरावर होऊन थोडा थोडा चुना पडला सबब शांत केली श्रीचे मंडपातच होम जाहला नंतर पूजा करून भोजन जाहले रा. बाबाजी सोनी करवीराहून आले. प्रातःकाळी रा. अमृतरावजी थत्ते हे आले होते श्रीमंताचे कारकीर्दीच्या वगैरा गोष्टी निघाल्या होत्या. च्यार घटका बसून निघोन गेले स्वारी तिसरे प्रहरी बागांत जाऊन अस्तमानी परतली संध्या फराळ प्राकृत गणेशपुराण ऐकून निद्रा जाहली.

छ. १७ जाखर अधिक जेष्ठ व॥ ३ मंगळवार मु. सांगली.

खाशानी प्रातःकाळी स्नानसंध्या पूजा भोजन जाहल्यानंतर रा. रामराव पेठे नरगुंदकर हे आले होते दोन घटका बसून परत गेले. चिंचणीकर अन्नपूर्णाबाई वारल्यानंतर तिची सवत गंगाबाई इणे मरतेसमई रा. गणपतराव वासुदेव सीलकर याचे चिरंजीव दत्त घेतले त्या समई विलायतेस लिहून गेले होते सरंजाम चालवावा न चालवावा येविसीचे त्याचे बुक विलायतेहून इंग्रजी अक्षराचे चिंचणीस आले आहे ते पहावयास सांगलीस पाठवून देतो येविसीचे पत्राची (?) ·× ××× न श्रीमंत रा. माधवराव दाजीसो ××× आज उद्या बुक येईल स्वारी तिसरे प्रहरी तात्यासो व श्रीसौ मातुश्रीबाईसो सुधा बाग पहावयास गेली होती अस्तमानी परत आली सौ. बाईसाहेब यास रात्रौ × × × चे सुमारास शैत्यपित्तानें वमन × × येक वेळ होऊन घाम येऊन प्रकृत बिघडली. × × आहेत.

छ. १८ जमाखर अधिक जेष्ठ व॥ ४ संकष्टी बुधवार मु. सांगली.

खाशानी प्रातःकाली स्नानसंध्या पूजा करून श्री गणपति हरिपूर बागेतील याचे दर्शन घेऊन तिसरे प्रहरी परत आली. श्री. सौ. मातुश्री बाईसो यांची प्रकृति बरी आहे रा. दाजी विनायक सहस्त्रबुद्धे हे काल रात्रौ वाड्यातून घरीं आल्यानंतर क्रिंचित घेरी येऊन प्रहर रात्रीचे सुमारे पडले आणि डावे अंग पक्षघातानें गेले असे आहे पुढे पहावे. हैदराबादेहून राव रंभा यांचे चिरंजीव रा. देवराव निंबाळकर रस्तुमदौला याजकडील भवानी पवारीण ही रावरंभाचे राखीची लेक ही खंडेराव याचे पत्र व पेशकबजाच्या दस्त्या व करांचलीची दस्ती कलाबतूची गंडेरीदार घेऊन आली. बरोबर दोन आसामी

भले माणूस होते. व भवानीची लेक बारा तेरा वर्षाची आहे ती तिसरे प्रहरी आली होती तिला बसावयास देऊन बसविली नंतर हैदराबादेचे वर्तमान सर्व सांगितले नंतर रावरंभा × × × खडर्याचे स्वारीच्या वगैरे निघाल्या होत्या × × ची बंदुक मारीत असता तिला हैदराबादेहून येताना वाटेत येक गावी बंदुकीचा बार काढीत असताना × × × चुकून पडून बंदुक इंग्रजी चापाची × × × ती फुटली ती बंदुक दाखविली व जाहले वर्तमान सांगितले खाशानी आपल्या बंदुखा तरवारी काही दाखविल्या व इंग्रजी सरकारातून करांचली आलेली दाखविली श्रींमंत रा. तात्यासो यांची पुस्ती दाखविली कचेरीस कारभारी व मुच्छदी व सिपाइ लोक होते. भवानी ही जात मराठी आहे. ती करवीरास पुढे जाणार कारण छत्रपती याचे कलवांतिणीची मुलगी इला रावरंभाचे कलवांतिणीचा मुलगा याचे सोइरिकीचे पेशजी ठरून टिळा लाविला आहे हल्ली इणे जाऊन मुहूर्ताचे ठरऊन जाईल मग हैदराबादेहून नवरा येऊन लग्न व्हावयाचे. बरोबर भवानीची मुलगी आहे तिचा वेष पुरुषाचा पठाणी डौलाचा आहे. भवानी इची वृत्ति चांगली आहे. हातात तुळसीचे मणी वगैरे वीतरागी आहे. शूर आहे. पन्नास वर्षाचे वयाची सुमार आहे. धर्मशाळेत उतरली आहेत. बरोबर घोडी ५ माणसे १० × × × आहेत चंदी वैरण सिधा सरकारातून × × दिला अस्तमानी सिरस्तेप्रो श्रीचा छबिना संकष्टीबा। निघाला होता. रात्रौ खाशानी पूजा वगैरे करून चंद्र उदय जाल्यानंतर भोजनोत्तर × × × × सांप्रदायाअन्वये श्रीपुढे नृत्य जाहले पु × × × दारू करणार आला आहे त्याजकडून काही नळे चंद्रज्योती वगैरे दारू करविली ती देवापुढे लावविली बरी केली असे.

छ १९ जा॥खर अधिक जेष्ठ व॥ ५ गुरुवार मु॥ सांगली.

खाशानी प्रात:काळी स्नानसंध्या पूजा भोजन निद्रा जाहल्यानंतर तिसरे प्रहरी स्वारी बागेत जाऊन अस्तमानी परत आली मे० उजिट (?) साहेब हे सांगलीस येणेचा बेत सबब बंगला वगैरेची तयारी करविली आहे खाशाचे भोजनानंतर रामराव पेठे वगैरे मंडळी येऊन बसून नंतर निघोन गेले तिसरे प्रहरी भवानी कुणबीण हैद्राबादकर ही पठाणी पोषाक घालून मंडळीसुद्धा आली होती तिची बंदुख फुटली सबब तिला येक बंदुक चापाची विश्वनाथ खुषमस्करे याणी साल मजकुरी ब्रामवीस (?) कासीहून आणून दिल्ही ती बंदुक दिली व तिजकडून पेषकबजास दाली बांधावयाची जरतारी होती ती कसी बांधावी ते समजून घेतले खाशास पहिले माहीत होतेच परंतु पडताल्यास पाहून घेतले व सरकारी पेषकबजे सारी दाखविली सिपरी ढाल सर्व अंग बचावयाची गेंब्याची दाखविली व गुर्दे वगैरे हत्यारे दाखविली व रावरंभानी पेशजी × × × पाठविली ती आणून दाखविली उदईक × × × मिरजेहून येणार उजीट साहेब र × × × सबब स्वारीची तयारी करविली आहे रात्रौ पुराण जाहलेनंतर भवानसिंग याणे इंग्रजी बुके वाचली व गावातील संत मंडळी वगैरे याजकडून श्रीचे देवालयात भोजन करविले.

छ. २० जमादिलाखर अधिक जेष्ठ व॥ ६ भृगुवार मु. सांगली

करवीराहून मे. उजिटसाहेब सरकीट हे हरिपुरास नदी उतरून दोन तीन घटका दिवसास सकाळचे आले. सामोरे श्रीमंत रा. तात्यासो आंकली वेसीपर्यंत गेले. साहेब आंबराईचे बंगल्यात उतरण्यास गेले तेथपर्यंत पोचऊन तात्यासो माघारे आले मे. अंडरसनसो पोलिटिक्याल असिष्टंट हे कुरुंदवाडास गेले होते ते मिरजेकडून प्रहर दिवसाचे सुमारास आले भाऊसाहेब सामोरे खाणीपर्यंत गेले होते आंबराईचे बंगल्यातच उतरले आहेत. खाशानी स्नान संध्या करून अधिक मासाव ॥ वायन देऊन भोजन करून तिसरे प्रहरी खाशाची स्वारी साहेब उभयता याजकडे गेली. उभयता साहेब बंगल्याचे पुढे सामोरे आले होते नंतर कचेरीस च्यार सहा घटका सुमार बसून बोलणी जाहली साहेब यास × × × विसी सांगितले परंतु उजिटसाहेब याचे म्हणणे माघारे येते समई या वाटेने येऊन जावे तेव्हा वाड्यांत वगैरे येऊन जाईन म्हणोन. त्याजवरून उभयताहि साहेब आले नाहींत. स्वारी तेथून निघोन स्वानंदभुवन वगैरे मळे पाहून अस्तमानी देवळांत आली श्रीमंत रा. बाळासाहेब मिरजकर व त्याचे × × विनायकराव पंडित हे मिरजेहून सो याचे मिरजेस येणेविसी बोलवावयास आले होते साहेब याची भेट बंगल्यातच जाली दोन घटका बसून निरोप घेऊन निघाले ते देवळात खाशाकडे येऊन भेटून मिरजेस अस्तमानी गेले साहेबास बेळगावास जाण्याची निकड सबब मिरजेस न जाता कुरुंद-वाडास आज मध्यानरात्रीस चालते जाहले रा. रामराव देसाई व त्याचे चिरंजीव रा. नरसिंगराव हे बाइजाबाई सिंदे याणी पेशजी दौलतीचे काम पाहावयास बोलाविले होते त्याजवरून गेले होते ते आपले खुषीनेच नाशिकाहून आजच तिसरे प्रहरी आले रा. गोविंदराव नाना भिलडवडीकर हे मिरजेहून आले व रा. मोरोपंत मामा सहस्रबुद्धे हे रेटरेहून आले रा. दाजी मोरेश्वर कुळकर्णी हे काल मंगळवेढेहून आले रा. बापू साळोंखे करवीरकर हे उजिटसाहेब याजबरोबर आपलेकडील स्वार रिसाल्याचे घेऊन आले ते आज येथे आहेत लक्ष्मीबाई जोसी याचे घरी उतरले आहेत.

छ. २१ जाखर अधिक जेष्ठ व॥ ७ मं × ×

खाशानी प्रातःकाळी स्नान संध्या पूजा ×× बापू साळोंखे करवीरकर हे त्याजबरोबरचे स्वार पांच साहा आसामी व आपले येथील दोन तीन आसामी × × × करावे असे यास जेवावयास बोलाविले होते स्वारी बागेत जाऊन अस्तमानी परत आली रामरावजी व नरसिंगरावजी हे व कारभारी वगैरे मंडळी अस्तमानी आली होती रामरावजी याणी नासिककडील बाइजाबाई सिंदे याजकडील गोष्टी वगैरे व दौलती संबंधे वगैरे बोलणी जाली कृष्णाजीपंत मोकासी ××× फार हैराण ×× सकाळी सहा घटका दिवसास देवाज्ञा जाल्याचे वर्तमान आले ग्रहस्थ बरे होते ईश्वर इच्छा.

अखेर साल जाहले.

६।६।१८४७

छ २२ जा॥खर अवल साल अधिक ज्येष्ठ व॥ ८ रविवार तेरा घटका बेचाळीस पळास मृग निघाला. मु॥ सांगली

खाशाची प्रातःकाळी स्नान. संध्या पूजा भोगनिद्रा जाहल्यानंतर तिसरे प्रहरी स्वारी बागेत जाऊन अस्तमानी परत आली. श्री. रा. तात्यासाहेब याणी हरणाचा कळप सोडून खेळवीत होते तो येका काळविटाचा व येका हरणाचा पायात पाय अडकून हरणीचा पाय मोडला अगदी तुकडा पडला हकीमाकडून पाय बांधविला आहे रा० भिकाजी हरी पटवर्धन शिलेदार यांची पत्नी प्रसूत जाली कन्या जाहली. × × जेष्ठ व॥ ५ गुरुवारी प्रसूत झाल्याचे वर्तमान आले. सायंकाळी रा० रामरावजी व त्याचे चिरंजीव नरसिंगरावजी आले होते. दरबारी गोष्टी बोलून ठिकाणास गेले. व वे. शा. सं. रा. गोपीनाथ दादा आगासे आले होते शास्त्रार्थाच्या गोष्टी निघाल्या होत्या रा. गोपाळपंत उचगावकर हे करवीरास वकिलीचे कामावर आहेत ते आले होते ते सकाळीं गेले.

७।६।१८४७

छ २३ जा॥खर अधिक जेष्ठ व॥ ९ सोमवार मु॥ सांगली.

श्रीस्वामी सावनूरकर हे आज मिरजेहून येथे आले पुढे सामोरे श्री. रा. भाऊसो। व गावातील ब्राम्हण मंडळी असे वाजतगाजत गेले होते स्वामी हे तिसरे प्रहरी आले ते विष्णूच्या देवालयात उतरले आहेत खासा स्वारी अस्तमानी बागेतून आल्यावर श्रीस्वामीकडे जाऊन दर्शन घेऊन आले स्वामीनी शालजोडी प्रसाद दिला सिधा चंदी वैरण पाठऊन दिली रा. नारापा नाईक धारवाडकर याचे चुलते रा. लक्ष्मण न॥ धारवाडकर यांचे बंधूचे पुत्र तिमापा नाईक हे स्वामीबरोबर आले आहेत ते येऊन भेटून गेले रा. नाना आपटे निंब्रकर हे मिरजेस निंब्राहून आले होते ते आज मिरजेहून आले आहेत. बांगडी कसबीण मिरजेची पोर्गी इचे गाणे रात्री जाहले व सखाराम बावाचेहि जाहाले.

छ. २४ ज॥ खर अधिक जेष्ठ वद्य १० मंगळवार मु॥ सांगली.

रा. नाना आपटे निंब्रकर यास पंगतीस भोजनास बोलाविले होते भवानी कुळंबीण इला तिज बरोबरचे मंडळीसुद्धा जेवावयास बोलाविले आहे तिला व तिचे मुलीस लुगडी खण व येक दोन आसामीस शेले पागोटी देऊन निरोप दिला श्री स्वामी श्री गणपतीच्या दर्शनास येणार सबब श्रीमंत रावसाहेब त्यांचे ठिकाणाहून घेऊन आले स्वामी श्रीचे दर्शन घेऊन ठिकाणास गेले तिसरे प्रहरी स्वारी बागेत जाऊन आल्यानंतर दौलतसंबंधे कागदपत्र वगैरे कारभारी यास समजून दिले रा. बाबाजी सहस्त्रबुद्धे श्री. सौ. आवडाबाई यास पुण्यास सासरी पोचऊन माघारे आले.

छ २५ जा। खर अधिक जेष्ठ व॥ ११ बुधवार मु सांगली

सावलीचे मळ्यांत जाऊन अस्तमानी खासे परत आले रा. दाजीबा गडबोले पुणेकर हे श्रीमंत कै. भाऊसाहेब तासगावकर यांचे पदरचे त्याणी पेशजी त्याचे × × गोपाळरावसो याजवर फिर्यादी करुन खटली केली त्याजवरुन त्यास त्याणी घालविले ते आज येथे आले आहेत कारण भाऊसो याज × × काही आपला यैवज येणे त्या विसीचे कागदपत्र आहेत ते घेऊन म्हणोन आले परंतु त्यांत काही तात्पर्य नाही आग योजला (?) लबाड आहे असी खातरी होऊन त्यास जावे म्हणून सांगून त्यास लाऊन दिल्हा श्री स्वामी सावनुरकर याणी गावातील वैद्य व आचारी व ग्रहस्थ यास तप्तमुद्रा दिल्यावर त्याजपासून खंडणी घेतली रा. नागोपंत बापट हे मिरजेस सायंकाळी गेले.

छ. २६ जाखर अधिक जेष्ठ व॥ १२ गुरुवार मु. ॥ सांगली

तिसरे प्रहरी कचेरीत सिरटी तालुक्यातील चोरटे लोकप्रकर्णी साहेबांची कारभाऱ्यांशी बोलणी झाली रा. नारायणराव मंगळवढेकर निरोप घेऊन मंगळवेढ्यास गेले. तेथे मामलतीवर गेले. श्रीस्वामीची स्वारी किल्ल्यांत गेली होती तिकडे खासा स्वारी तात्यासो सुधा गेली स्वामीनी वाडा पाहिला स्वामीस निरोपसमई ७५ रुपये व धोतरजोडा २५ रु. चा दिल्हा स्वामी उदईक तासगावांस जाणार दाजीबा गडबोले हे निरोप घेऊन करवीरास उदईक जाणार रा. विश्वासराव तात्या व बापू गर्दे हे मिरजेहून व म्हैसाळाहून आले खाशाची भेट घेऊन ठिकाणी गेले. स्वामीकडून अस्तमानी दोन आसामी आचारी मंत्राक्षता व नारळ घेऊन आले होते.

छ. २७ जाखर अधिक जेष्ठ व॥ १३ सह चतुर्दशी भृगुवासर मु. ॥ सांगली–

श्री. सौ. मातुश्रीबाईसो व सौ. वहिनीबाई हरीपुरास श्री संगमास आंग धुवावयास गेली होती तिसरे प्रहरी खाशांच्या तिसरे पत्नीची मातुश्री पुणेकर जोसी ही पुण्याहून आली. भेटून गेली. गोविंद हरी बिनीवाले हे रामदुर्गकर कागवाडास कागवाडकर याचे व त्याचे पत्नीचे वाकडे आहे तें मिटवावयास गेले आहेत रा. भाऊ सरनोबत याणी श्री. स्वामीस भिक्षा करविली आहे आपले घरी बेत केला आहे. आज पाऊस तिसरे प्रहरी मोठा पडला साहा घटका पडला.

छ. २८ जाखर अधिक जेष्ठ व॥ ३० मंदवार आज येरवी काही मजकूर अधिकोत्तर नाहीं.

छ २९ जा।खर जेष्ठ शु॥ १ रविवार मु॥ सांगली

आठपडीहून रा. गोविंदपंत हे आले आहेत त्याजकडील वर्तमान श्रीमंत रा० पंत प्रतिनिधी व त्यांची पत्नी श्री. सौ. लक्ष्मीबाई व त्याणी दत्त मुलगा पेशजी चैत्र शु॥ २ शके १७६९ घेतला तो असे किनईस आहेत पंत हे किनईस प्रकृत बिघडली म्हणोन

आले आहेत पंताचे व त्याचे पत्नीचे आजपर्यंत भाषण नव्हते ते भाषण जाहले व घरीच आहेत येविसीची खुशालीची शर्करा घेऊन आले आहेत.

छ ३० जा॥खर जेष्ठ शु॥ २ सोमवार मु॥ सांगली

रा० बापू आठवले याजकडून पंढरपूराहून कारकून × × गद्रे हे त्याचे पत्र घेऊन आले आहेत त्यातील हशील रा० बळवंतराव आठवले हे श्रीमंत रा० पंत प्रधान बाजीरावसाहेब यांचे सासरे त्यांचे पत्र माझे येथे आले त्यांत श्रीमंत यांची कन्या बाई इचे लग्न व्हावयाचे त्यास श्रीमंत रा० आपासाहेब यांचे पुत्र श्री. रा० तात्यासो यास द्यावी येविसी श्रीमंतांची आज्ञा त्यास तात्यसो यांचे जन्म टिपण वगैरे लिहून आणावे वगैरे मजकूर आहे ते पत्राच सेवेसी पाहण्यास पाठविले आहे म्हणोन तें पत्र घेऊन मशारनिले गद्रे हे आले त्याजवरून आठवले याची पत्रे दोन्ही वाचून पाहिली येविसीचा विचार होऊन पंढरीस उत्तर जाईल. रा० गोविंद हरी बिनीवाले हे कागवाडाहून रामदुर्गकर बाई याची कन्या ती कागवाडकर यांची पत्नी त्याजविसीचा मजकूर ठरविण्यास म्हणून आले रा० नारोपंत बापट हे कुरुंदवाडास व आड-पान (?) साहेब याजकडे ऐकीव वर्तमान करवीरास उभयता महाराजाची लग्ने जाहली त्यासंबधे बाइजाबाई शिंदे याणी आहेर पाठविला तो करवीरास मेहरबा ग्रामसहेब वगैरे सर्व मंडळीची कचेरी होऊन आहेर घेतला आठरासे पोषाख दागिने वगैरे × × आदमास आहे.

१५।६।१८४७

छ. १ रजब जेष्ठ मास श्र॥ ३ मंगळवार मु. सांगली

राजश्री गोविंदपंत किनईकर औंधाहून आले त्यास भोजनास बोलाविले होते शेला पागोटे × × × × कोतवाल चावडीत रा. वामनाजीपंत रानडे शेखदार याचा भाऊ रतू म्हणोन १५ वर्षांचा सुमार आहे त्याणे चावडीत शिपायाची बंदूक घेऊन बार मारतो म्हणोन बोलून बार काढला बंदुकेत गोळी होती ही माहित नव्हती बार काढला तो रस्त्यातून उत्तरेस चावडीचे सुमारे वाण्याचे दुकानांत त्याचे घरची म्हातारी बसली होती तिचे हातास लागली हात जाया होईल असे वाटते परंतु जीव बच्चाव जाहला इथे मोठे संकट निवारण केले.

छ. २ रजब जेष्ठ श्रु॥ ४ वुधवार मु ॥ सांगली

सकाळी कारभारी व रामरावजी देसाई वगैरे मंडळी कचेरीस येऊन दौलती-प्रकरणी बोलणी जाहलीं रा. बाबाजी सोनी व व्यंकाजी धोंडदेव मंगळवेढेकर हे शहा-पुरास सरकारी कामाकरितां गेले.

छ. ३ रजब जेष्ठ शु ॥ ४ वृद्धी गुरुवार मु. सांगली

आज भोजनाचे पंक्तीस रामराव व त्याचे चिरंजीव नरसिंगराव देसाई व हरीहर राव लागू व बळवंतराव फडणीस व गोविंदराव बिनीवाले व चिंतोपंत देशमूख हे होते

इचलकरंजीहून श्री. रा. केशवराव तात्यासो घोरपडे याणी चार मोरे पाठविली. रात्रौ गावातील गोंधळी वाडीचे गोंधळी याजकडून व राम जोशी याच्या लावण्या इश्वर-परायण म्हणविल्या-सखाराम बाबा वगैरे मंडळी होती.

छ. ४ रजब जेष्ठ शु॥ ५ भृगुवार मु. सांगली.

गजाजीपंत खाडीलकर हे कोंकणांत देवास वगैरे गेले होते ते काल आले ते आज भेटीस आले होते कोंकणचा जिन्नस नारळ काजू वगैरे आणून दिले सावंतवाडीस मोरोपंत लेले याजकडेस गेले होते. तिकडील वर्तमान व त्याची पत्रे असे आणून दिले रामराव हे फडणीस यांचे घरी भोजनास गेले होते हरिहरराव बाबाही भोजनास गेले होते आवडी चिंचणीकर हिचे दोघे लेक सांगलीस आले होते ते निरोप घेऊन चिंचणीस गेले रा. नागोपंत आपा बापट हे करूंदवाडास साहेबाकडे गेले.

छ. ५ रजब जेष्ट शु ॥ ६ मंदवार मु. सांगली.

रामराव अखबारनीस हे कोडोलीस गेले × × × त्याचे चिरंजीव × × × औषध घेण्यास राहिले आहेत मुंबईहून प्रभाकर छापलेले आले त्यात श्री. रा. आपासो यास इंग्रजी सरकारातून तरवार दिली त्यासमयीचे वर्तमान आहे कीं बेळगांवास तरवार सन्मानाने दिल्हेबरोबर फौज अडीच हजार होती व किती एक तोफा होत्या म्हणोन वगैरे आहे. हातास गोळी लागलेली म्हातारी आज मेली. विशाल-गडकरपंत याणी अननस वगैरे जिन्नस पाठविलेला तो आला.

छ. ६ रजब जेष्ट शु ॥ ७ रविवार मु. सांगली.

पांडुरंगराव आपा मंगळवेढेकर व नाना मायदेव याचे चिरंजीव काशिनाथपंत दाजी हे पंगतीस होते.

छ॰ ७ जेष्ट शु ॥ ८ सोमवार मु. सांगली.

चिंतामणराव सदाशिव यांची मातोश्री ८५ वर्षांची गंगाबाई हिची प्रकृती फार बिघडली म्हणून प्रायश्चित गोप्रदानसुद्धा दिले मागाहून स्वारी त्यांच्या समाचारास मिरजेस जाण्याचा बेत होता परंतु प्रकृती आता बरी आहे असे कळल्यावरून बेत राहिला.

रात्रौ गुलाबी व राधा आवडीचे (ध्वाडीचे) ? गाणे जाहले

छ. ८ रजब जेष्ठ शु॥ ९ मंगळवार मु. सांगली.

इंग्रजी सरकारातून करांचली दिली तो मजकूर लिहून थैली गोमंतकास गौरनर याजकडे रा. बाळाजीपंत मराठे याजबराबर पेशजी शहापूराहूनच पाठविली होती. मराठे हे गोमांतकास जाऊन थैली पावती केली व तांदूळ वगैरे जिन्नस दिल्हा त्याचे उत्तर घेऊन शहापूरास आले शहापूराहून सांगलीस काल आले आज थैली आणून

दाखवली थैलीत करांचली दिल्याचा मजकूर जमेस धरून त्याचे उत्तर आम्हास फार खुषी जाहली म्हणोन वगैरे सलामालकीचा मजकूर आहे.

छ. ९ रजब जेष्ट शु ॥ १० बुधवार मु. सांगली.

आज दशहार श्रीकृष्णाबाईचे उत्साहास प्रारंभ सबब श्रीकृष्णाघाटावर जाऊन श्रीकृष्णेची पूजा व सौभाग्यवायन दिले वे. शा. सं. रा. बिंदूमाधवाचार्य हे महिसाळास असतात त्याजवर काहीं अरोप आहेत सबब त्याचे गुरु स्वामी सावनूरकर हे आले आहेत त्याणी बहिष्कार घातला त्याजवरून दोन रुपये दंड बांधावा असे बोलणें पडले परंतु जमले नाहीं सबब आचार्य यानीं श्रीकृष्णेत जीव दिल्हा पांच दिवस म्हणोन वर्तमान ऐकीले खरे आहे. आज स्वारी बागेत गेली नाहीं श्रीमंत रा. तात्यासाहेब यांस इंग्रजी लिहिण्यास प्रारंभ करविला भवानसिंग रजपुत याजकडून करविला.

छ. १० जेष्ट शु॥ ११ गुरुवार मु. सांगली.

रा. रामजी नाईक भिडे पुण्याहून आज आले बाजारात बुढण बागवान म्हणून होता त्याजकडे सरकारी × × त्याबद्दल श्रीचे कारखान्यातील दगड घासावयास लावला होता त्यास काल तिसरे प्रहरी एकाएकी घेरी येऊन मृत्यू पावला रात्रौ बडेखान सारंगीवाला याजकडून सतार वाजविली रात्रौ एकादशी सबब नित्याप्रो गणेश पुराण ऐकून निद्रा जाहली.

छ. ११ रजब जेष्ट शु॥ १२ भ्रुगुवासर मु. सांगली

वे. रा. शिवरामभट याची पत्नी तिसरी यांस देवाज्ञा झाली दुखणे लागले होते त्याणे वारली

छ. १२ रजब जेष्ठ शु ॥ १३ मंदवार मु. सांगली

बिंदुमाधवाचार्य यांनी जीव दिला असे वर्तमान होते परंतु खास वर्तमान ते नव्हे. श्री नरसोबाचे वाडीस गेले होते तेथे पोटतिडकेने चार दिवसानी वारले असे वर्तमान खास आहे.

श्री. कृष्णाबाईचे उत्साह कथा कीर्तने याच्या सांप्रदायाप्रो होत आहे आज कालचा बाजार पेठेत न भरतां शिरस्तेप्रमाणे श्री कृष्णाबाईचे × × मोर भरला होता.

रामचंद्रपंत आगाशे × × हे आले आहेत सरकारी हत्ती सिरटीस चारणीस आहेत त्यातील चंचलगज हातीनें गडेकरी यास जिवे मारले म्हणोन वर्तमान आज आले म्हणोन

छ. १३ रजब जेष्ठ शु॥ १४ रविवार मु. सांगली

पुरुषोत्तम भास्कर दाजीबा लिमये हे गणेशवाडीस होते त्यांनीं चतुर्थाश्रम घेतला म्हणोन आज पत्र आले.

रा. बापू खासगी कै. बापूजी गणेश गोखले याच्या पदरचे ते कोकणात राहणार ते कालापये (?) वृत्तीचे कामास्तव आले आहेत

छ. १४ रजब जेष्ट शु॥ १५ सोमवार मु. सांगली

श्री. कृष्णाबाईचे उत्साह संबंधे समाराधना गांवाकडून वगैरे होती तिचा बेत भोजनांत करविला आहे ब्राह्मण भोजनाचा बेत पुरणाचा सांप्रदाय आहे भोजनदक्षणा एक पैसाप्रो पात्र १००० हजार सुमार जाहले

गोपाळ बल्लाळ करंदीकर श्री महायात्रेहून पत्नीसह आले त्याची मातोश्री काशीत राहिली आहेत

छ. १५ रजब जेष्ठ व॥ १ मंगळवार मु. सांगली

मातोश्री काकूबाई मामी जोसी खाशाचे तिसरे पत्नीची आई ती पुण्याहून पेशजी आली त्यांस भोजनास वाड्यात बोलाविले होते एक दोन दिवशी पुण्यास जाणार आहे. गोपाळ बल्लाळ करंदीकर व भाऊ वागळे व वे. मू. रघुनाथ भट केळकर हे महायात्रेहून काल आले त्यानी आपासोस स्पटिक माळा व गंगा आणून दिली.

चिंतोपंत गोखले वेळावीस सुखवस्तु राहात आहेत त्यानीं कांहीं ईश्वरपर आर्या व सवाया व कटाव व श्लोक वगैरे करून कथा रामायणातील व भागवतातील अशा बांधल्या आहेत ते रात्रौ भेटीस आले होते दोन घटका बसून वाचून दाखवून गेले.

छ. १६ रजब जेष्ठ व॥ २ बुधवार मु. सांगली

कुरुंदवाडकर याचा हत्ती फत्तेलष्कर हा सांगलीस आपा माहात याजकडे काल आला आहे तो आज अस्तमानी आपा महाताने बसवून फिरून पाहिला हरपनहळीचा दारुवाला मुसलमान यास पेशजी स्वारी सिरटीस गेली होती त्या समई आणविला होता तो आला आहे त्याणे दारू चमत्कारिक केली होती ती गणपती महाराजाचे नगारखान्यापुढे रस्त्यात प्रहर रात्रीचे सुमारास लाविली दारू चितल्या नळे तारनळे भुईचक्रे तऱ्हे तऱ्हेची व आंबागोता वगैरे अशी फार चांगली केली होती.

छ. १७ रजब जेष्ट व॥ ३ संकष्टी गुरुवार मु. सांगली.

छ. १८ रजब जेष्ट व॥ ४ शुक्रवार मु. सांगली

छ. १९ रजब जेष्ट व॥ ५ शनिवार मु. सांगली

छ. २० रजब जेष्ट व॥ ६-७ क्षयतिथी रविवार सांगली

छ. २१ रजब जेष्ट व॥ ८ रोज सोमवार मु. सांगली

छ. २२ रजब जेष्ट व॥ ९ मंगळवार मु. सांगली स्वारी मिरजेस गेली होती चिंतामणराव सदाशिव यांचे घरी त्याची मातोश्री गंगाबाई काकू फार वृद्ध व अशक्त तिच्या समाचारास गेले तिने एका ब्राह्मणास ५० रुपयाची जमीन तुमचे हातून यावी अशी इच्छा प्रदर्शित केल्यावरून तिने योजलेला ब्राह्मण वे. मू. तात्या केळकर यांस ५० रुपयेची जमीन दिल्याचे उदक सोडविले

छ. २३ रजब जेष्ट व॥ १० वुधवार मु. सांगली

छ. २४ रजब जेष्ठ व॥ ११ गुरुवार मु. सांगली.

बागेत जाऊन येऊन कै. हरिहररावसो यांचे सावत्सरिक श्राद्ध झाले.

मोरो कृष्ण लेले सावंतवाडीकर कारभारी हे पित्ताचा उपद्रव होऊन जेष्ठ व॥ १ मंगळवार शके १७६९ दिवसी देवाधीन जाहले म्हणून सावंतवाडीहून आजच पत्र आले.

रा. गणेश रामचंद्र बिनीवाले याच्या पत्नीस उदराची भावना होऊन आज देव-आज्ञा झाली.

छ. २५ रजब जेष्ट व॥ १२ शुक्रवार मु. सांगली

स्वानंद भुवनास नवी पेठ करावी असे ठरवून ढाल आज मुहूर्तानें उभीं केली.

छ. २६ रजब जेष्ट व॥ १३ शनिवार मु. सांगली

छ. २७ रजब जेष्ट व॥ १४ रविवार मु. सांगली

छ. २८ रजब जेष्ट व॥ ३० सोमवार मु. सांगली

आज श्री सौ. मातोश्रीबाईसो याणी हस्तीदंती फण्यांची सोमवती घातली.

छ २९ रजब आषाढ शु॥ १

(१३-७-१८४७)

मौजे कसबे सांगली संस्थान श्रीगणपति महाराज येथील येसू बिन बापू मोहिता हा काल रात्री मृत्यु पावला त्याचे बायकोचे म्हणणे सती जाणार म्हणून आडून बसली आहे. सकाळी इंग्रजी सरकारचा रंगापा हालकरा नि ॥ वकील व सरकाराकडील कारकून ऐसे तिजकडे समजून सांगोन राहणेविसी पाठविले होते परंतु दुराग्रह फार आहे परंतु चौघानी सांगून प्रेताचे दहन करविले रात्री बाळाचार्य वाईकर व भोंद्नाना व नारायण शास्त्री यांचे चिरंजीव कृष्णशास्त्री यांच्याशी चार घटका चर्चा जाहली.

छ १ साबान आषाढ शु॥ २ बुधवार मु॥ सांगली

रा. नारोपंत बापट हे साहेबाकडून आले तिकडील सर्व वर्तमान सांगितले व बत्तिससिराळ्याहून काटेसांवरीचे लाकूड लांबी पंधरा हात व आठ हात फेराचे ऐसे पेशजी

तोडून ठेवले होते ते वारणेच्या पाण्यातून वोढून आणविले ते आज आले बरोबर आंबी गेले होते त्यास इनाम दिल्हे.

श्रीमंत रा. लक्ष्मणराव आणासाो यांस दुसरा मुलगा जाला त्यास देवाज्ञा जालियाचे वर्तमान संध्याकाळी समजले.

छ १ साबान आषाढ शु॥ ३ गुरुवार मु॥ सांगली

श्रीमंत तात्यासाो याचे डोळे आले आहेत.

छ ३ साबान आषाढ शु॥ ४ भृगुवार

तिसरे प्रहरी श्रीगणपतीचे देवळांत पलुसकर हरिभक्तपरायण गाडगीळ गोसावी पलुसकर यांचे कीर्तन जाहले तें श्रवणास स्वारी बसली होती गावातील सिष्टमंडळी बहुत आली होती ब्रह्मनाळकर गोसावी याचा गांव भाऊबंदकीच्या खटल्यामुळे जप्त केला सबब सरकारास विनंती साहेबाचे नावे थैली यावी म्हणोन विनंती करावयास सकाळी आले होते थैली देणे आज्ञा झाली.

छ ४ साबान आषाढ शु॥ ५ शनवार मु॥ सांगली महत्त्वाची नोंद नाहीं.

छ. ५ साबान आषाढ शु॥ ६ रविवार. मु. सांगली

रा. नागोपंत बापट यास इंग्रजींसरकारातून मुद्दे हासील होणे त्या प्रकर्णी वाक्याचा मजकूर समजून देऊन बापट हे कुरुंदवाडास गेले. रात्रौ गुरुनाथ गोसावी याजकडून आरत्या पदे म्हणविली. कवलापूरकर तमाशेवाले याचा तमाशा देवळातील मंडपात दोन घटका जाला.

छ. ६ साबान आषाड शु॥ ७ सोमवार मु. सांगली रात्रौ जोती आंबीं सांगलीकर याजकडून पोऱ्याचा तमाशा दोन घटका करविला.

छ ७ साबान आषाढ शु॥ ८ भोमवार मु. सांगली हिरेकुभीकर पीरजादे भेटीस आले होते त्यास उगार येथे कांहीं जमीन इनाम दिली आहे त्या जमिनीस कोणी मुसलमान उगारास अडथळा करीत आहे येविसी विनंति पीरजादे याणी केली त्याजवरून त्यास आणवणेविसी ताकीद गेली आहे.

छ. ८ साबान महत्त्वाची नोंद नाही.

छ. ९ साबान आषाढ शु॥१० गुरुवार मु. सांगली मेहेरबान लिजिटसाो सरकीट हे आज सकाळी प्रहर दिवसाचे सुमारे कुरुंदवाडहून हरिपुरास नदी उतरून आले आंबराईत उतरले आहेत खासा स्वारी तिसरे प्रहरी किल्ल्यांत गेली तेथे लिजिटसाहेब हे आले बरोबर बाळासाो व दादासाो मिरजकर होते. मिरजकर परत गेल्यावर साहेबासी बोलणे झाले त्यात इंग्रजी सरकारचे पदरचे साहेबलोक वगैरे गैरआदबी लिहितात व

करतात त्या गोष्टी निघाल्या, साहेबाचीं पुसिले जे आपले चिरंजीव तात्यासो यास बाजीरावसो याची मुलगी देणार म्हणोन वर्तमान समजले त्यास ही गोष्ट अलबत व्हावी आम्हास फार खुषी असे, असे बोलले.

छ. १० सावान आषाढ शु. १० वृद्धी तीथ भृगुवार मु. सांगली.

शामसुंदर हत्ती मंगळवेढयास चारणीस होता त्यास आजार होऊन मेला म्हणोन वर्तमान आले आज ९ दिवस झाले.

छ. ११ साबान आषाढ शु॥ ११ सह मंदवार मु. सांगली.

श्री. सौ. मातुश्रीबाई साहेबानी चातुर्मास श्रीविष्णुशयन व्रत केले त्याचे पुण्याह. वाचन केले.

छ. १२ साबान आषाढ शु॥ १२ रविवार मु. सांगली.

हरिहररावदादा लागू यास अठरा घटकानंतर करांचली, फिरंग व सनगे आंगावरील दुपटा व पागोटे यैसे द्यावयाचा बेत केला परंतु आज राहिला.

रा. बाबा भावे पुण्याहून आज आले.

छ. १३ साबान महत्त्वाची नोंद नाही.

छ. १४ साबान आषाढ शु. १५ मंगळवार मु. सांगली.

हरिहरराव दादा लागू यास कराचली दुपटा पागोटे आज २७ घटका दिवसानंतर दिल्हे.

छ. १५ साबान महत्त्वाची नोंद नाही.

छ. १६ साबान

रा. गणपतराव नीळकंठ मिरजेहून आले आहेत रात्रौ न्यायपंचायतीच्या गोष्टी समक्ष समजून घेणे होत होते. जवळ पदरची मंडळी विनंति करीत होते मधें जवळ पाटल्र मोहिता म्हणोन खिजमतगार होता तो मधे बोलू लागला तो गैरआदबी मधे लहान माणसाने बोलावयाचे प्रयोजन काय म्हणोन रागे भरोन त्याचे पारपत्य जाहले.

छ. १७ साबान आषाढ व॥ ३ शुक्रवार मु. सांगली

ऐकीव वर्तमान श्रीमंत गंगाधरराव बाळासाहेब मिरजकर यांचे दौलतीचा कारभार हली इंग्रजी सरकारातून रा. विनायकराव पंडित हे मुखत्यार कामे पाहात आहेत बाळासो म्हणणे आम्हास १९ वर्षे होत आली आम्ही दौलतीचा कारभार करतो साहेबानी त्यास कुरुंदवाडास बोलावले तेथे एक फिर्यादीची मनसुबी करून रिपोर्ट करावा म्हणून त्यास सांगितले त्यावरून बाळासाहेबानी फैसला करून रिपोर्ट केला तो साहेबास मान्य झाला नाही व तुम्ही आपले दौलतीचे काम कसे पहाल ? असे बोलले.

१।८।१८४७

छ १० साबान आषाढ व॥ ५ रविवार मु. सांगली

श्री. रा० तात्यासो यांनी अलिबक्ष हत्ती यास मस्ती आली आहे मौज कशी करतो सबब पायांत मागील सडक ठेवून खुला केला आज बांधू दिला नाही.

कुशाबा परीट चाबूकस्वार हा गोधाजी चाबूकस्वार याचा नातू हा पहिला दहा वर्षाचे मागे येथे चाकरीस होता तो येथून चाकरी सोडून ब्रह्मावर्तास जाऊन श्रीबाजी-रावसो याजजवळ चाकरीस राहिला आहे तो कांहीं कामानिमित्त आपले घरी पुण्याकडेस आला तो येथे येऊन खाशास भेटून जावे म्हणून आला आहे त्याची भेट अस्तमानी झाली श्री रा. विठ्ठलराव बापूसो यांची प्रकृती किंचित बिघडली आहे पोटातील जाहले आहे.

२।८।१८४७

छ २० साबान आषाढ व॥ ६ रोज सोमवार मु. सांगली

श्रीमंतांचे भोजन देवळातील वाडयांत झाले पंक्तीस श्री. माधवराव दाजीसो चिंचणीकर मंडळीसह होते अलिबक्ष हात्ती आज सकाळी धरून किल्ल्यांतील ठाण्यात नेवून बांधला.

खाशाबा चाबूकस्वार हा तिसरे प्रहरी खाशास येऊन भेटला एकांती विनंती केली त्यातील अभिप्राय की इकडे श्री. रा. पंतप्रधान बाजीरावसो यांची कन्या तात्यासोबास द्यावी असे मानस फार तिकडील आहे व श्रीमंताचे पत्नीचे मनांतून आहे तात्यासो यास आज दहावे वर्ष लागले वाढदिवस केला.

छ. २१ साबान महत्त्वाचे नाही.

छ. २२ साबान " "

छ २३ साबान आषाढ व॥ ९ गुरुवार मु. सांगली

आज पूजा आटोपल्यानंतर पूर्वाश्रमीचे नांव रा. दाजीबा गोळे पुणेकर हे कै श्री. रावजीराव पटवर्धन याच्या बहीण मातोश्री बचूबाई गोळी याचे पुत्र त्याणी चतुर्थाश्रम घेऊन २५ वर्षे सुमार जाहली ते गोकूळ वृंदावनी असतात त्याचे येणे हिकडे जाहले ते सागलीस आले तात्या पुराणीक यांचे घरी उतरले आहेत त्याचे दर्शनास स्वारी गेली होती. दर्शन घेऊन बोलणे झाले स्वामीचे व सरकारचे वय बरोबरीचे पांचचार वर्षांनी स्वामी लहान लहानपणाच्या गोष्टी मिरजेतील ओळखीच्या निघाल्या होत्या स्वामीचे डाव्या कुशीस ल्हासे आहे ते खाशानी लहानपणी पाहिले होते ते आहे की काय म्हणून पुसले. आहे म्हणोन स्वामीने दाखविले आश्चर्य केले कीं कधीची गोष्ट स्मरणास राहिली. पुण्यास स्वारी श्रीमंताकडे जाई तेव्हा श्रीमंतानी गौरव

करावा श्रीमंताजवळ राहणे खाशानी होत होते नेहमी पदरचे मंडळीस आज्ञा होत असे याप्रमाणे स्वामीचे मुखातील अक्षरे × × × × × पंतप्रधान बाजीराव पुणे सोडून निघावयाची मसलत जाहली ते समई श्री. सरकारने विनंती केली जे पुणे सोडून जाऊ नये पुण्यात कायम रहावे असे म्हणताच श्रीमंतांनी आज्ञा केली की इंग्रजानी कैद केल्यास कसे म्हणोन त्याची विनंती तसे जाहल्यास घोडी चालवून मरून जाऊ म्हणोन तेव्हां श्रीमंत बोलले जे ही रांगडी मसलत म्हणोन. तेहि बोलणे झालेले स्वामीनी सांगितले. सर्वत्रास आनंद जाहला नंतर स्वामीनी प्रसाद नारळ सरकारास दिला तो घेतला.

छ. २४ साबान आषाढ व. १०–११ पहिली मु. सांगली

स्वामीस देवालय सर्व दाखविले तिसरे प्रहरी कीर्तन पळसकर बाबांचे श्रीचे मंडपात झाले.

छ. २५ साबान आषाढ व॥ १२ भागवत मु. सांगली

स्वामी मांत्रिक आहेत कोणास पिशाच्च उपद्रव झाला असता अंगात आणून बंदोबस्त करतात गोविंदभट गुळवणी हरीपूरकर यांचे बायकोचे अंगावर × × × ×

छ. ५ रमजान जिन्नत मकान राबीनसनसाहेब बहादुर याचे मडमसाो इणे विलायतेहून पांढरे मोरांची जोडी पाठविली होती त्यापैकी मादी मुंबईस येऊन मेली बाकी एक नर राहिला तो व आंब्याच्या हुंब्या दोन अशा आज आल्या मोर फार चांगला आहे. रात्रौ आवडी मिरजकर व राधा शिवरामाची इचे गाणे जाहले.

छ. ६ रमजान.

छ. ७ रमजान.

लक्ष्मणपंत बाबा नादुसकर हे जमखिंडीस इंग्रजी सरकारातून वकिलीस असतात ते भेटीस आले होते सखाराम बाबा गवई यांचे घरी उतरले आहेत.

छ. ८ रमजान श्रावण शु॥ ९ शुक्रवार मु. सांगली

रा. नागोपंत बापट वकील हे साहेबाकडून आले आहेत. रात्रौ गुलाबीचे गाणे जाहले.

छ. ९ रमजान महत्त्वाचे नाही.

छ. १० रमजान.

१३-८-१८४७

छ. ११ रमजान श्रावण शु॥ १२ सोमवार मु. सांगली.

भिलवडी मुकामी बाईचे जिनगीविषयी भाऊसाो तासगांवकर तक्रार करू लागले त्यास आपासोनी झाडून टाकले बाईची प्रकृत पाहून स्वारी नांदऱ्यास येऊन तेथून अस्तमानी सांगलीस आली.

छ. १३ रमजान श्रा. शु॥ १३ बुधवार मु. सांगली

रा. माधवराव सिधये देशमुख यास खाशानीं बंदूक साजसुद्धा व ढाल तरवार व दोन बोथाट्या अशी उत्तम तयार करून सहस्रबुद्धे याजबरोबर पाठविले आहे काल रात्रीस आवडी करवीरकर व चिमणी बक्षीची करवीरची याचे रात्रौ गाणे झाले. संध्याकाळचे चार घटका दिवसास भिलवडीहून काकूबाई वारल्याचे पत्र आले किल्ल्यातील नगारखाना दहा दिवस बंद करण्यास सांगितले.

छ. १४ रमजान श्रावण शु॥ १५ गुरुवार मु. सांगली

भिलवडीकर बाई वारल्यानंतर भाऊसाो तासगावकर याणी तिजकडील गांवखेड्यास आपला अमल बसविला तो आमंल इंग्रजी सरकार नि॥ अकबरनिस यांनी उठविला तुम्ही जिनगी वगैरेची व्यवस्था पाहावी अंमल बसविणेस हुकमाशिवाय बसवू देणार नाही म्हणून त्यानी सागितले वाड्यात नाकेबंदी तिचे कारभारी कोल्हटकर यास नजरबंद ठेविले म्हणून वर्तमान ऐकले.

छ. १५ रमजान श्रावण व॥ १ शुक्रवार मु. सांगली

बाळासाो रास्ते यांजकडून यशवंतराव जोसी सखदेव हे चमत्कारीक जिन्नस मातीची भांडी पाणी थंड होण्याची व सुवर्णमुख्या वगैरे जिन्नस पेगू कोमडी अशी घेऊन आले आहेत.

छ. १६ रमजान श्रावण व॥ २–३ मु. सांगली महत्त्वाचे नाही.

छ. १७ रमजान श्रावण व॥ ४ मु. सांगली

कृष्णाजीपंत रोटे पटवर्धन यांस पटवर्धन यांचा वंशवृक्ष व मुंबईची पेटी चित्राची दाखवून त्यांस निरोप दिला.

छ. १८ रमजान महत्त्वाचे नाही.

छ. १९ रमजान ” ”

छ. २० रमजान कृष्णाजीपंत तात्या रोटे पटवर्धन हे आज कोकणांत जाण्यास चालते झाले सरकारचे वतनी ठिकाणचे खटले तुटले सरकारचे पुण्य मोठें आज शंभर वर्षे जे खटले होते ते घरी चालून येऊन खटले तोडून टाकले ही मोठी गोष्ट झाली.

सरकारातून बाजार पेठेत गुलाबीस घर बांधून दिले त्याची वास्तु तिणे आज केली.

छ. २४ रमजान श्रावण व॥ १२ रविवार मु. सांगली

महत्त्वाचे नाही

समंध आहे तिला आणली होती अंगात आणून बोलविला असे काहीं चमत्कार होत आहेत रात्रौ बापू नारायण यांचे घरी आवडी मिरजकर इची बैठक झाली.

छ. २६ साबान आषाढ व॥ १३ (८।८।१८४७) मु. सांगली

स्वामीस भिक्षेस बोलाविले होते.

भाऊ सरनोबत याचे बायकोस पिशाच्चबाधा फार सबब ती स्वामीचे दर्शनास आली येताच तिची तिडीक राहिली असा चमत्कार आहे. गांवातील उपद्रवी माणसे स्वामीचे दर्शनास येत आहे.

कुशाबा परीट चाबूकस्वार यास सणगे जोडी देऊन निरोप दिला.

छ. २७ काही महत्त्वाचे नाही

छ. २८ साबान आषाढ व॥ ३० मु. सांगली काही महत्त्वाचे नाही.

छ. २९ साबान श्रावण शु॥ १ बुधवार मु. सांगली

मिराभाई वैद्य करवीरकर यास येणे विषई पत्र लिहिले होते कारण खाशाचे पायास वायूचा विकार होऊन पाय दुखतो सबब औषधी उपचार करावयास आणविले ते आज सकाळी आले होते.

सुलतानबा बिन बळवंतराव बाबर गारडीकर (?) हे धोंडजी वाघ याचे स्वारीस खाशाबरोबर होते त्यास लढाईत डाव्या पायास गोळी लागली होती त्याणे पाय जाया होऊन गेला तो मांडीपासून कापून काढिला होता ते आषाढ व॥ ११ शुक्रवार शके १७६९ दिवसी गार्डीस मृत्य पावले त्याचा भाऊ जगोबा गार्डीकर याचा लेक यांनीं येऊन वर्तमान सांगितले त्याच्या आस्ति ठेवण्यास आज्ञा झाली आहे फार दुःख खाशास झाले माणूस मर्द चांगला होता त्यास तिघे लेक हणमंतराव व गोविंदराव वारले धाकटा मुलगा आहे.

कोंकणचे वृत्तीप्रकरणी कागदपत्र काशिनाथपंत खोत सहस्रबुद्धे व बाळाजी दामोदर यांणीं आणून दाखविले

नारोपंत पटवर्धन हे कोंकणचे घराण्यातील हे चिंचणीहून दाजीसो याजकडून आले इंग्रजी बुके व बखरीच्या यादी व तलवार वगैरे जिन्नस घेऊन दाखविण्यास आले आहेत.

छ. ३० साबान श्रावण शु॥ १ वृद्धि मु. सांगली

स्वारी तिसरे प्रहरी बागेत जाऊन आली स्वानंद भुवनास नवा बाणसाज ठेवला आहे त्याजकडोन पहिल्या लोखंडी पोलका रिकाम्या होत्या त्या पुन्हा भरवून तयार

करविल्या त्यातील एक बाण कसा उडतो तो लावून पाहिला व जुनाहि उडवून पाहिला.

छ. १-२ रमजान श्रावण शु. २।३ शुक्रवार मु. सांगली. महत्त्वाचे नाही.

छ. ३ रमजान श्रावण शु॥ ४ रविवार.

दाजीबा लिमये याणी आश्रम गणेशवाडीस घेतला होता ते आषाढ व॥ ३० समाधिस्त झाले आज सहावा दिवस–खाशाचे डावे पायाचे बोटास वायूने मुंग्या येत होत्या सबब भिराभाई वैद्य याजकडून बोटाचे मागे चामड्यावर तुंबडी लावून रक्त काढले वाटीभर सुमारे निघाले.

छ. ४ रमजान श्रावण शु. ५ (नागपंचमी) मु. सांगली

खाशानी श्रावणी केली बत्तीसशिराळ्याहून नागकुळे व अरण्यातील नाग अगजू नालबंद याणे आणला होता.

छ. ५ रमजान श्रावण शु. ६ सांगली. महत्त्वाचे कांहीं नाही.

छ. २६ रमजान श्रावण व॥ १३ मंगळवार मु. सांगली

ऐकीव वर्तमान भिलवडीस काकूबाईचे तेरावे दिवशी ब्राम्हणास देकार द्यावयाचा तेव्हा आठ पैसे देऊ म्हणोन तासगांवकर म्हणू लागले तेव्हा दहा पांच हजार ब्राम्हणांनीं कट करून गांवच्या साऱ्या वेशी बंद करून पाणी बंद केले आणि म्हणाले की, बाईचा विषय लाख रुपयाचा गांडीखाली घालून ब्राह्मणास चवल देता ! × × × फार बोलले भाऊसो तासगावकर हे ब्राम्हण आपणास मारतील म्हणून भिऊन घरांतून बाहेर आलेच नाही तेव्हा पदरच्यानी ब्राम्हणास चार आणेप्रमाणे देवविले आणि तोड काढली आणि मोकळीक केली ब्राम्हणास भोजन घातले त्यांची आगदी राड झाली उकरड्यावर जेवावयास ब्राम्हणास बसविले तेव्हा माशा भारी उठून अस्तमान झाला तेव्हा माश्या लागून शेकडो ब्राम्हण ओकले. असेहि जाहले. सारा विषय तासगावकर याणी सोनीस पहिले मातोश्रीकडे पोहचविला.

श्री सौ. वहिनी यांची प्रकृत बिघडून चार घटका बोलणे बंद झाले कांहीं पिशाच्च उपद्रव आहे

छ. २७ रमजान श्रावण व॥ १४ महत्त्वाचे नाही.

छ. २८ रमजान श्रावण व॥ ३० गुरुवार मु. सांगली

सावंताचे वाडीहून शेणवी पागे याणी व मोरोपंत लेले यांचे चिरंजीव याणी श्रीगणपतीस मोर्चेल जोड्या दोन कलाबतुच्या व दोन गुल्प्या व दोन नळकोटी रंगीत व गंजीफाची पेटी एक पंखे दोन वगैरे जिन्नस पाठविला तो आला.

श्री. सौ. वहिनीबाईसाठी उपवाडेहून जैन असामी पंचाक्षरी आहेत त्यास बोलावून उपचार केला

छ. २९ रमजान भाद्रपद शु. १ शुक्रवार मु. सांगली

गणपतीउत्सवास प्रारंभ झाला ब्राम्हण भोजन दररोज २०० पर्यंत होऊन तिसरे प्रहरी नाच नंतर छत्रीना कृष्णाबाईस जाणे रात्रौ कीर्तन रत्नागिरीकर करमरकर बुवाचे असे कार्यक्रम जाहले.

छ. ३० रमजान भाद्रपद शु॥ २ मंदवार मु. सांगली

आज कीर्तन उत्सवांत काशिनाथपंत भिडे बाबा यांचे झाले.

छ. १ सवाल भाद्रपद शु. ३ रविवार मु. सांगली

मुंबईहून मोरोजी त्रिबकजी परभू चित्रे करणारा त्याणी गणपती मूर्ती दोन बाहुल्या अंगावर हात टाकित आहेत अशा तऱ्हेची करून आणून सरकारात दिली आहे

छ. २ सवाल भाद्रपद शु॥ ४ मु. सांगली

आज श्रीचे अंगावर दागिने घालून श्रीची प्रतिष्ठा झाली स्वानंदभुवनास स्वारी जाऊन तेथे श्रीचे देवालय तयार होत आहे तेथे श्रीची मूर्ती मृत्तिकेची असती त्याचें दर्शन घेऊन किल्ल्यात आली मंत्रजागर दोनशे ब्राम्हणाचा झाला त्यांस दक्षणा ५ पासून २ रु. पर्यंत योग्यतेप्रमाणे आज ब्राम्हणभोजन किल्ल्यात २००० ब्राम्हणाचे झाले.

छ. ३ सवाल भाद्रपद शु॥ ५ मंगळवार मु. सांगली.

रमण्यात ब्राह्मण भोजन ४१०० सुमारे झाले रात्रौ देवळांत ळळीत झाले.

इमाम नायकिण कै. शिवाजी महाराज छत्रपती याणी ठेवलेली ती करवीराहून आली आहे ती महाराजानी ठेवली सबब तिचा मानमरातब राखविला व आज ळळीताचा नारळ व खण प्रसाद देवविला.

छ. ४ सवाल भाद्रपद शु॥ ६ बुधवार मु. सांगली

छ. ५ सवाल भाद्रपद शु॥ ७ गुरुवार मु. सांगली

रात्रौ कै. राम जोशी सोलापूरकर याचे पुत्र रा. पांडूबा जोसी सोलापूरकर हे उत्साहास आले आहे त्याणी राम जोसी याच्या लावण्याची वही आणली आहे ती खाशा जवळ त्याणी रात्री वाचून दाखवली नारायण दिक्षीत मराठे वसईकर दोन चिरंजीवासह मुद्दाम उत्सव पाहण्यास पुण्याहून आले आहे

छ. ६ सवाल भाद्रपद शु॥ ८ शुक्रवार मु. सागली

ज्योतीगुरव डवरी नरगुंदकर श्री. व्यंकोबाचा चाकर सारंगी वाजवितो व गातो त्यास बोलाविले होते तो आला आहे.

छ. ७ सवाल भाद्रपद शु॥ ९ शनिवार मु. सांगली

उत्साहास मंडळी आलेपैकीं आज कुस्तीगीर परगांवचे आले आहेत त्यांची व सांगली येथील पैलवानाच्या कुस्त्या वाड्यापुढें झाल्या

छ. ८ सवाल भाद्रपद शु॥ १० रविवार मु. सांगली महत्त्वाचे नाही.

छ. ९ सवाल भाद्रपद शु॥ ११ सोमवार मु. सांगली

तिसरे प्रहरी पांडोबा गोसावी सोलापूरकर हे रामजोशी कवी ज्याणी ईश्वरपर लावण्या केल्या त्याचे नातू त्याचे कीर्तन श्री देवळात जाहले.

छ. १० सवाल भाद्रपद शु॥ १२ रोज मंगळवार मु. सांगली

दत्तोपंत भाऊ पिंगळे हे शाहूराजाच्या वेळेचे पेशवे मोरोपंत पिंगळे होते त्याचे वंशज त्यांनीं विनंती केली. त्यातील भाव कीं आम्ही चौघे बंधू एक आसामीचीं सोय आपले पदरी असावी त्यांस सनगे देऊन निरोप दिला पिंगळ्यानी पहिल्या श्रीमंताच्या वेळच्या गोष्टी माहितीच्या कांहीं बोलले त्यांस लिहून पाठविण्या विशई आज्ञा झाली आहे.

छ. ११ सवाल भाद्रपद शु॥ १३ रोज बुधवार मु. सांगली

आज श्रीगणपतीचे देवळात आणा गोसावी मंगळवेढेकर याचे कीर्तन झाले स्वारी श्रवणास गेली होती वहिनीबाईसाठी करवीराहूए वे.मू. रा. ×× जाणते आणिले आहेत ते वाड्यांत उतरले आहेत.

छ. १२ सवाल भाद्रपद शु॥ १४

छ. १३ सवाल भाद्रपद शु॥ १५

आवशीचे घटका रात्रीस ग्रहण लागले ते दहा घटका रात्रीचे सुमार सुटले.

वहिनीबाईस करविरकर मांत्रीकबाबानी उपचार केला पिचाच्च म्हणाले मी विठ्ठलराव बापूसो आहे माझा उपद्रव दोन वर्षे आहे म्हणून सांगितले मला रामतीर्थास व नरसोबाचे वाडीस नेऊन दर्शन करवावे म्हणजे गती घेते.

छ. १४ सवाल भाद्रपद व॥ १ मु. सांगली.

वहिनीबाईकडे स्वारी जाऊन आली.

छ. १५ सवाल भाद्रपद व॥ २ मु. सांगली.

आणा गोसावी मंगळवेढेकर यांस दहा रुपये देऊन निरोप दिला.

छ. १६ सवाल भाद्रपद व॥ ३ मु. सांगली.

महत्त्वाचे नाही.

छ. १७ सवाल भाद्रपद व॥ ४ मु. सांगली.

इमाम नायकिणीस चाळीस रुपायचे लुगडे व रुपये ५० रोख देऊन निरोप दिला रात्रौ श्रीपुढे राधा व रमा व गुलाबी व नैनी व इमाम नायकीण इच्या पोरी व विठा नायकीण गोवेवाली इचा नाच व गाणे झाले खासास्वारी व मंडळी आली होती.

छ. १८ सवाल भाद्रपद व ॥ ५ मु. सांगली.

महत्त्वाचे नाही.

छ. १९ सवाल भाद्रपद व॥ ६ गुरुवार मु. सांगली.

ऐकीव वर्तमान मिरजेस विनायक पंडीत यानी माजी कामगार भास्करपंत जोसी मोरोपंत गोखले, नरसीपंत दामले व खासगी पथक व किल्ल्याकडील जामदार यांचे घरी चौक्या बसविल्या आहेत.

इमाम नायकिणीबरोबर नूरबक्ष गवई आला होता त्यास ५ रुपये बिदागी दिली.

छ. २० सवाल भाद्रपद शु ॥ ७–८ शुक्रवार मु. सांगली.

महत्त्वाचे नाही.

छ. २१ सवाल भाद्रपद व ॥ ९

आपा आनगळ सातारकर सावकार याणी मोत्याचा कंठा विकावयास आणला होता तो सात पदरी आहे पदराचे मोती चढी आहे थोरली मोती बोराएवढी आहेत लहान मोती हरबऱ्याएवढी किंमत २५००० हजार सांगतात पानड्यास हिरवे सामोसे स्फटीका पारखी हिऱ्याचे मोर आहे दागिना मोठा पण बेढब आहे.

आज हस्तनक्षत्राचा पाऊस मोठा पडला.

ऐकीव वर्तमान गोखल्याचे घर काल तिसरे प्रहरी खंटले त्यात श्री. कै. मोरोबा आबासो याचे खाजगीपैकी ऐवज व कांहीं रुप्याची भांडी व दागिनें असे सांपडले.

छ. २२ सवाल भाद्रपद व॥ ९ रविवार मु. सांगली.

हिरासिंग बारगीर निसबत सरकार यास ज्वर होऊन मेला. बरा होता.

छ. २३ सवाल भाद्रपद व॥ १० सोमवार मु. सांगली.

गणू शिंदा काशीचा निसबत सरकार याला काल रात्री × × उपद्रव चाचा होऊन आज सकाळी मेला वाईट गोष्ट जाहली तात्यासोचा लोभ त्याजवर फार होता.

खाशाचे उजवे पायास गुडघ्याचेवर एक गांठ झाली आहे तिला जळवा लाविल्या.

छ. २३ सवाल भाद्रपद व ॥ १० मु. सांगली.

राघोबा बापट गवई व जोती डवरी नरगुन्दकर यास देहनगी दहा रुपये १० बापट यांस रोख व डवरी यांस दहा रुपयाचे शेलापागोटे देववून निरोप दिला.

छ. २४ सवाल भाद्रपद व ॥ ११ मंगळवार मु. सांगली.

श्रीचे देवळांत आणा गोसावी याचे कीर्तन झाले. देवाचे वाड्यांत हस्तगौरीचें हळदकुंकू झाले.

आज सकाळी वे. शा. स. गणेशशास्त्री हरीपूरकर खाशाचे भेटीस आलें होते.

राघोपंतभाऊ करमरकर यांस सौ. वहिनीबाईचे प्रकृती पाहण्याकरितां मिरजेहून आणिले होते.

अस्तमानी दिवेलागणी बरोबर अदमासे आकाशातून एक तारा पडला तो पश्चिमेकडून पूर्वेकडें जाऊन नाहीसा झाला.

छ. २५ सवाल भाद्रपद व ॥ १२ बुधवार मु. सांगली.

बापू पवार भादुलेकर खिजमतगार यांस दुखणे लागले होते तो आज दहाबारा घटका रात्रीस मृत्य पावला माणूस चांगला विश्वासू होता त्याकडे श्री सौ. मा. बाईसो याजकडील कापड वगैरे नखती शिल्लक व तात्यासो याजकडील कापड व नखतीचे काम होते.

छ. २६ सवाल भाद्रपद व ॥ १३ गुरुवार मु. सांगली.

छ. २७ सवाल भाद्रपद व ॥ १४ भृगुवार मु. सांगली.

राधा नाईकीण तेरदळकर इला लुगडे खण दिला ती तेरदळ येथे गेली.

श्री. रा. रामचंद्र आपासो मिरजमळ्यातील व श्री. रा. लक्ष्मणराव आणासो याची पत्नी सौ. गिरजाबाई अशी वहिनीबाईचे समाचारास आली होती.

ऐकीव वर्तमान वाखरीचे वाटेवर अगरणी नदीस पावसाचे पाणी येऊन सौदागराचे उंट होते त्यापैकी ८-१० वाहून गेले या गोष्टीस ५-६ दिवस आदमासे झाले.

छ. २८ सवाल भाद्रपद व ॥ ३० शनिवार मु. सांगली.

सखोपंत जोगळेकर निसबटसोचे वेळेस इंग्रजीस चाकरीस होते करजगीस राहात असतात ते महायात्रेहून परत आले.

आज सूर्यग्रहण १९ घटकास लागले ते २७ घटकेस सुटले पर्व मोठे आंगुळमात्र शेष बिंब राहिले होते.

छ. २९ सवाल अश्विन शु ॥ १ रविवार मु. सांगली

आज नवरात्रास प्रारंभ खाशांची तिसरी पत्नी कै. यशवदाबाई इचे श्राद्ध भाद्रपद व ॥ १४ चे अतिरिक्त राहिले ते आज तात्यासो यांनीं केले.

रामभाऊ सहस्रबुद्धे याचे सांगण्यात गवनरसाो सातान्यास येणार आहे.

छ. १ जिल्काद अश्विन शु ॥ २ सोमवार मु. सांगली

छ. २ जिल्काद आश्विन शु ॥ ३ मंगळवार मु. सांगली

छ. ३ जिल्काद आश्विन शु ॥ ४ मंगळवार मु. सांगली

छ. ४ जिल्कादा आश्विन शु ॥ ५ बुधवार मु. सांगली

छ. ६ जिल्काद अश्विन शु ॥ ७ मंदवार मु. सांगली

मेहेरबा अंडरसन् असिष्टट पोलिटिकल हे मुंबईस जाणार अशी बातमी आहे बेळगावाहून मेहेरबा इंनवरीटसो बहादूर पोलिटिकल एजन्ट याजकडून वटथैली व जाहिरनाम्याची नक्कल अशी आली त्यांत हाशिल गांवगना व महालानिहाय वगैरे गल्ला कैली जिन्नस व वजनी जिन्नस वगैरेची मोजण्याची मापे आहेत ती सर्वगांवी सारखीच आहे असे नाही त्यामुळें नुकसानी होतें यास्तव कैली मापवजन पक्के पाच ५ शेर ८० रुपये भार शेर प्रमाणे पांच शेरी माप व वजनी अशी सारखी गावगना व महालांनी करावी ती साल मजकूर दिपवाळीसच जाहली पाहिजे व वजने व मापे लोखंड व पितळ व तांब्याची असावीं त्याजवर शिक्का इंग्रजी सरकारातुन बेळगांव मुक्कामी जाऊन करून घ्यावा म्हणून आहे त्याचा विचार होऊन उत्तर जाण्याचे होत आहे. रा. पांडोबा जोसी सोलापूरकर हे श्रीचे उत्साहास आले होते त्यास २५ रुपये रवानगी देऊन निरोप दिल्हा त्यांणीं इंग्रजी सरकारातून करांचली आली ती बघीतली इंग्रजी चित्राची पेटीं वगैरे चित्रे बघितली उदईक निघून सोलरपुरास जाणार.

छ. ७ जिल्काद आश्विन शु ॥ ८ मु. सांगली

अण्णासो मिरजमळा, हरिपंत गोखले इचलकरंजी श्री रा. माधव दाजी चिंचणीकर हे समाचाराकरितां येऊन गेले.

छ. ८ जिल्काद आश्विन शु ॥ ९ मु. सांगली

आज खांडे नवमी देवळातच उपाध्याकडून सरकारांत आशौच म्हणून हत्यारे घोडी हत्ती वगैरे नगारखाना सुद्धा एकंदर पूजा केली.

ब्रम्हनाळकर गोसावी यांचे गांव ब्रम्हनाळवाडी (बुद्रुक) हे इंग्रजी सरकारातून जप्त झाले होते ते सुटले ये विसईचा हुकूम गोसावी हे घेऊन दाखविण्याकरितां आले होते.

यादी दिनचर्या समान आरबैन मयातैन व आलफ शके १७६९

छ. ९ जल्काद आश्विन शु ॥ १० विजयादशमी मु. सांगली.

आज दसरा सबब किल्ल्यातून खासेनिशाण व बिनीकडील खाशा लग्या असे श्रीचे देवळांत आणून श्री कडील जरीपटका पुजले सीमाउल्लंघनास श्रीची स्वारी तिसरे प्रहरी गेली सर्व सरंजाम खाशाकडून दिला होता.

विसाजी धोंडदेव आपटे जमखिंडीकर हे श्री. कै. गंगाबाई वहिनीचे मामा ते समाचारास आले आहेत.

छ. १० जिल्काद आश्विन शु ॥ ११ मु. सांगली.

आज कै. सौ. वहिनीबाईचे क्रियेस आरंभ झाला.

छ. ११ जिल्काद आश्विन शु ॥ १२ मु. सांगली.

तात्यासो याचे हातातील जोडवे सकाळी स्नान करिताना काढून ठेवले होते ते कोणी पळविले शोध होत आहे.

छ, १२ जिल्काद आश्विन शु ॥ १२ मु. सांगली.

प्रभाकर शास्त्री मुनसफ येऊन भेटले ते इंग्रजी सरकारांत मुनसफीच्या कामावर कर्नाटकांत आहेत त्यास दोनशे रुपये दरमहा पगार आहे पुण्यास एकंदर मुनसफाची परिक्षा कायद्याची वगैरे साहेब लोक घेणार कायद्यांत बरोबर उतरून इन्साफ जास्ती करील त्यास पगार चढवून द्यावयाचा असे ठरले आहे म्हणून प्रभाकरशास्त्री पुण्यास चालले आहेत.

छ. १३ जिल्काद आश्विन शु ॥ १४-१५ मु. सांगली.

आज दशांतकर्म कावळा दोन घटिका आवकाशाने शिवला त्यावेळी खाशानी तुझी मुले लहान त्यांचे संरक्षण करीन असे म्हटल्यावर कावळा शिवला.

छ. १४ जिल्काद आश्विन व ॥ १ मु. सांगली.

छ. १५ जिल्काद आश्विन

खाशाचे उजवे पायास गुडघ्याचे वरचे अंगास एक गांठ आंब्याचे कोईसा रखीवी फिरती तिच्या बाजूने कातड्यातून आपले हाताने सुईने भोक पाडून रेशमाने टाका घेऊन बांधला आहे त्याजवर तूप हाळद घालून किंचित चरले म्हणजे फाडावयाचे आहे.

छ. १६ जिल्काद

छ. १७ जिल्कार आश्विन व ॥ ४ संकष्टी मु. सांगली.

धर्मराव देसाई काकतीकर यांस ज्वर येत होता तो वारलेचे पत्र काकतीहून आज आले आज सातवा दिवस शिपाई मर्द बहूत दिवस सरकारकामे केलेला चांगला होता ईश्वरइच्छेपुढे उपाय नाहीं.

काल मंगळवारचे रात्री श्री. गणपती महाराज पंचायतन संस्थान सांगली याची रात्रौ आवशीस शेजआरती होऊन कवाड लावलेनंतर देवाचा शागीर्द बंबू याणे १२–१४ घटका रात्रीचे आवशीचे सुमारे उठून रोजच्या पाठाप्रो समईची वात लांबवून काजळी आल्यास आंत जाऊन सारावयाची नाहीं पेक्षां आंत जावयाचे नाहीं तेव्हा त्या दिवशी काजळी आली सबब कवाड उघडून आंत गेला तो त्यांस असे भासले कीं देवाचे बिछान्यावरील पांघरूण होते ते मनुष्य निजून उठते आणि पांघरूण विस्कटते व हालते तसे दिसले नंतर पुन्हा माणूस निजते उठते तसे दिसू लागले डोके पांघरुणाचे आंतून हालले तेव्हां त्याणे नमस्कार केला तो गचांडी मारतात तसे होऊन घेरी येऊन पडला ते चौकीदारानी पाहिले नंतर रामाजीपंत वाडेकर श्रीकडिल कारकून निजले होते त्यास उठवून आणले त्यांनी सावध करून उठवून आणून निजविले असा चमत्कार देवाचा झाला ते वर्तमान खाशास समजले तेव्हा आनंदश्रु येऊन विस्मीत झाले.

छ. ८ जिलकाद आश्विन व॥ २ गुरुवार मु. सांगली.

छ. १९ जिलकाद आश्विन व॥ ६ भृगुवार मु. सांगली.

नारायणराव दादासो मिरजकर केशवराव तात्यासो इचलकरंजीकर हे दुखवटा घेऊन आले होते.

छ. २० जिल्काद आश्विन व॥ ७ शनिवार मु. सांगली.

श्री. म. छत्र. बुवासो महाराज हे काशीनजिक होते ते आश्विन शु॥ ५ गुरुवारी शके मजकुरी देवआज्ञा झाल्याचे वर्तमान सातान्याहून आले महाराज याणी कै. बाळाराव सेनापती यांचा मुलगा आपला म्हणविला तो सातान्यास येणार गौवरनर सो पुण्याहून सातान्यास येऊन तीन दिवस राहून नहरास गेले सातारकर महाराजाची बोलणी जी आहे ती नहरास समजून घेऊ म्हणून सांगितले महाराज वारले सबब नगारखाना तीन दिवस बंद करण्याची आज्ञा दिली.

रा. भिमराव मुन्डरगी याणी निळाची जोडी एक पाठविली आहे. आनंदराव माने बारगीर हे पुण्यास सरकार कामाकरिता गेले होते ते आज आले. गिरैबाज व लपके वगैरे खवुतराच्या जोडया वगैरे जिन्नस आणिला आहे.

खंडेराव फराटे हे निरोप घेऊन आपले गांवी मांडवगणास गेले त्यांचे चुलतबंधु गणपतराव फराटे हे चाकरीस आले आहेत.

छ. २१ जिल्काद आश्विन व॥ ८ मु. सांगली. महत्त्वाचे नाही.

छ. २२ जिल्काद आश्विन व॥ ८ मु सांगली.

रा. राघोपंत काळे व भवानसिंग इंग्रजी पंतोजी हे शहापुरास आपले कामाकरितां आज निरोप घेऊन गेले आहेत.

छ. २३ जिल्काद आश्विन व॥ ९ मु. सांगली.

छ. २४ जिल्काद आश्विन व॥ ११ मु. सांगली.

रघुनाथराव दादासो दुखोटा घेऊन आले अस्तमानी परत गेले.

छ. २५ जिल्काद आश्विन व॥ १२ मु. सांगली.

छ. २६ जिल्काद आश्विन व॥ १३ मु. सांगली.

रामभाऊ भिडे सातारकर हे रावजी निमये यांचे जावई हे भेटीस आले होते त्यांनी साताऱ्चे वर्तमान सांगितले की गवरनरसो हे साताऱ्यावर सात मुक्काम करावे या बेताने आले होते परंतु थोरले महाराज गेल्याचे वर्तमान आले सबब तीन दिवसच राहून नहरास गेले समारंभ मोठा केला एकंदर लाख रुपये खर्च केला हशिल गोष्ट सारे दौलतीवर हूकूम रेसिडन्ट साहेबाचा महाराजाचे हाती कांहीं नाहीं थोरले महाराज काशीस गेल्या तागाईत हल्ली महाराज आपासो हे पेटे हिंडावयास जात नव्हते व हुकूमही नव्हता तो हल्ली सहा महिने शिरस्ते बद्दल पेठ्यास हिंडण्यास जावे म्हणोन दिला आहे.

उदईक दिपवाळी सबब देव गाई बंदीवान बारगीर वगैरे यास शिरस्ते प्रमाणे तेल बुका बाटली व पाठविली साल मजकुरी कै. सौ. गंगाबाई वहिनी वारली सबब पदरचे मानकरी वगैरे तेल पाठविणे व बोलावणे झाले नाही.

छ. २७ जिल्काद अश्विन व॥ १४ मंदवार मु. सांगली

छ. २८ जिल्काद आश्विन व॥ ३० रविवार मु. सांगली

आज लक्ष्मीपूजनास खासा स्वारी चिमणाराम व बाबा भावे व गंगाराम व सरदार मल्ल व श्रीधर नाईक देसाई व विष्णू नाईक मोडक व पुरुषोत्तम नाईक जोसी व रामाजी नाईक भिडे यांचे दुकानांत पानसुपारीस गेली होती रामाजी नाईकानी तात्यासोस हिऱ्याची आंगठी दिली.

छ. २९ अश्विन व॥ ३० वृद्धी तीथ सोमवार मु. सांगली

करवीरचा एक कुंभार त्याची लेक फितवून एका कुंभारानें आणली तो येथे गावात रहात होता. काल रात्री त्या दोघाचे भांडण होऊन त्याने हिचे उरावर बसून तोंडात बोळा घालून व नाक कापून पळून गेला वर्तमान सरकारांत समजल्यावर तिला आणून नाकाचा तुकडा बसऊन सभोवते टाके घातले जखम भारी तिला खर्चास देऊन औषधपाणी करविले आहे गुन्हेगाराचा तपास चालू आहे

ब्रम्हानंद बावाचे शिष्य सहजानंद बावा हे श्री कार्तिकस्वामीचे दर्शनास जाणे-करितां भिलवडीहून सांगलीस आले आहेत ते भेटावयास आले होते.

छ. ३० जिल्काद कार्तिक शु ॥ १ मंगळवार सांगली

आज भाऊबिज सबब हरीहरदादा लागू याचे घरी स्वारी बाईसाहेब व सर्व खाशासुद्धा स्वारी भोजनास गेली होती.

यादी सुरुसमान अरबैन मयातैन व आलफ शके १७६९

छ. १ जिल्हेज कार्तिक शु॥ २ बुधवार मु. सांगली.

गोविंदराव नाना भिलवडीकर यांस तैनात व माणसे दिवटी आबदागिर यासुद्धा एकंदर ५०० रुपयाची याद करून दिली.

छ. २ जिल्हेज कार्तिक शु ॥ ३ गुरुवार मु. सांगली.

सखाराम गोडसे गवई यांस पाठवून देण्याविषयीं कुरूंदवाडाहून दादासोंचे पत्र आले होते त्याप्रमाणें गोडसे आज रवाना झाले.

छ. ३ जिल्हेज कार्तिक शु ॥ ४ भ्रगुवार मु. सांगली.

छ. ४ जिल्हेज कार्तिक शु ॥ ५ शनिवार मु. सांगली.

बाळाचार्य मुद्गल वास्तव्य सांगली व्रधापकाळामुळे अशक्त होऊन आज तिसरे प्रहरी मृत्यू पावले ब्राह्मण थोर विद्यासंपन्न होते.

छ. ५ जिल्हेज कार्तिक शु॥ ६ रविवार मु. सांगली.

शिवराम भट लाटकर निसबत श्री. स्वामी जगद्गुरु यांजवर स्वामीचे कागदपत्र चोरल्याचा ठपका येऊन इंग्रज सरकारानीं त्यास धारवाडचे तुरुंगात पाठविले होते तेथे त्यानीं जीव दिल्याचे वर्तमान आले आज चार दिवस झाले

छ. ६ जिल्हेज कार्तिक शु ॥ ७–८ क्षयतीथ

छ. ८ जिल्हेज कार्तिक शु ॥ १० मु. सांगली.

छ ९ जिल्हेज

छ. १० जिल्हेज कार्तिक शु ॥ १२ शुक्रवार मु. सांगली.

शंकराचार्य संकेश्वर आज सांगलीस आले खाशानीं समारंभाने दर्शन घेतले

आज तुळसीचे लग्न लाविले

गुलाबीचा भाऊ लिंगू राजमाने याणे आपले घरी तुळसीचे लग्नाचे वेळेस कडाबिनीचा बार काढला तो कडाबीन फुटली चार पांच तुकडे झाले.

छ. ११ जिल्हेज कार्तिक शु ॥ १३ मंदवार मु. सांगली

छ. १२ जिल्हेज कार्तिक शु ॥ १४ बुधवार मु. सांगली

येशवंतराव जोग तासगांवकर यांचे घरची घोडी करडी होती ती दुमच्या वगैरे होड होती परंतु घोडी मासलेदार सबब ती घोडी याणी सरकारांत दिली सरकारातून त्यास बसावयाकरितां करडी निगडे यानी सिरटी मुक्कामी दिली होती ती त्यास दिली.

छ. १३ जिल्हेज कार्तिक शु॥ १५ मु. सांगली

छ. १४ जिल्हेज कार्तिक व॥ १ मंगळवार मु. सांगली

छ. १५ जिल्हेज कार्तिक व॥ २ बुधवार मु. सांगली

गोपिनाथबाबा शास्त्री आगाशे वाईकर हे पुण्यास दक्षिणेकरितां निरोप घेऊन गेले

छ. १७ जिल्हेज कार्तिक

विष्णुशास्त्री गाडगीळ हे आपले वर्षासनाकरितां बेळगांवास निरोप घेऊन गेले

छ. १८ जिल्हेज कार्तिक व॥ ५ मंदवार मु. सांगली

मेहेरवान अंडरसन साहेब बहादूर याचे पत्र आले त्याचे हाशिल आपले सरकारांत शिपाई माणसे वगैरे किती व दारूगोळा किती शेरी असेल ते एकंदर लिहून पाठवावे

छ. १९ जिल्हेज कार्तिक व॥ ६ मु सांगली

मातोश्री गंगाबाई काकू चिंतामणराव पटवर्धनाची आई नव्वद ९० वर्षांची कार्तिक व॥ ५ मध्यरात्री वारल्याचे वर्तमान आले

छ. २० जिल्हेज काही नाही

छ. २१ जिल्हेज कार्तिक व॥ ८ सांगली

शंकराचार्य जगद्गुरु याची शिक्के कटार शिरगांव येथे कृष्णेत बुडाली

छ. २२ जिल्हेज कार्तिक व ॥ ९ मु. सांगली

श्री महायात्रेस मंडळी गेली बीतपशिल

१ आवाजी गणेश करमरकर कुटुंबसुद्धा गेले त्यास सणगे दिली. १ बाळकृष्ण रघुनाथ लेले यांची मातोश्री व बंधु १ रामाजी भगवंत सांगलीकर १ आणखी गावातील गोरगरीब अशी गेली १ सदोबामामा रानडे भिकाजीपंत बाबा रानडे यांचे चिरंजीव ते काशिस जाण्याकरिता इचलकरंजीहून निरोप घेण्यासाठी आले होते तें निरोप घेऊन गेले

छ. २३ जिल्हेज कार्तिक व ॥ १० गुरुवार मु. सांगली

छ. २४ जिल्हेज कार्तिक व ॥ ११ भ्रुगुवार मु. सांगली

बाल मुकुंद मारवाडी देशाहून परत आला त्यानें एक संगमरवरी जाळीदार खुरसी सरकारांत नजर केली. राजापूरास समुद्रतिरी बंदर आहे ते मोडून दुसरे ठिकाणी इंग्रज घालतात म्हणून वर्तमान ऐकले बेळगांवाहून पुण्यास जाण्याकरितां मेहेरबा दाक्तर सांगलीस आले त्याणी खाशाच्या मांडीची गांठ पाहिली अपरेशन करून काढून टाकीन म्हणाले त्याना तात्यासोनी इंग्रजी बुक वाचून दाखविले

छ. २९ जिल्हेज कार्तिक व ॥ १२ मंदवार मु. सांगली

काशीहून आश्विन शु॥ ६ चे पत्र खाडीलकराचे आले त्यांत तेथिल कोणा कोकणस्थ शास्त्र्याचा मुलगा द्रव्य घेऊन बाटून किरस्थाव झाला किरस्थाव ब्राम्हण जाहाला आणखी ब्राह्मणांची मुले बाटणार असे वर्तमान आहे रामाजी पंत जालेहाळकर हे भिमराव जालेहाळकर यांचे तीर्थरूप ते काशीयात्रेहून आले भेटीस आले होते वृद्ध ७० वर्षाचा आहे वाघाच्या स्वारीच्या गोष्टी त्याणी ऐकल्या व पाहिल्या आहेत त्या निघाल्या होत्या त्यास खाशानी वाघ प्रकरणी वाकाहि वाचून दाखविला व त्याजवळ वाघ प्रकरणी कैफियत आहे ती पाठवून देण्याविषयी सांगितले

छ. २६ जिल्हेज कार्तिक व ॥ १३ रविवार मु. सांगली.

जगद्गुरुस्वामीस किल्ल्यांत भिक्षा झाली स्वामीस रोख रुपये २०० शालजोडी व धोतरजोडी रुमाल शालनाम्याचा व रुप्याचे लोटी व पंचपात्री १००रु. भार असे दिले.

छ. २७ जिल्हेज कार्तिक व ॥ १४ सोमवार मु. सांगली

अंताजीपंत मुतालिक निसबत प्रतिनिधी यांजकडून कारकून लग्नपत्रे घेऊन आले त्यांत त्यांच्या कन्येचा विवाह मार्गशिर्ष शु॥ ९ स व्हावयाचा मुलगा कऱ्हाडकर प्रतिनिधी याणी हल्ली दत्त मुलगा घेतला तो

छ. २९ जिल्हेज मार्गशीर्ष शु ॥ १ बुधवार मु. सांगली

श्री. सौ. लक्ष्मीबाई प्रतिनिधी यांच्या चिरंजीवाचे लग्न सबब बाईचे भाचे गोविंदराव लग्नाचे निमंत्रण देण्यास आले बहुत आग्रह यावयाचा केला कारण बाईचे व खाशांचे बंधूपणाचे नाते

छ. २० मोहरम मार्गशीर्ष व ॥ ८ मु. सांगली

जमखिंडीस मेहेरबा अंडरसनसो आहेत त्याणी श्री. मा. राधाबाई ताई यास दरबारखर्चाचे वगैरे कागदाविषयी नड लागली सबब ती निघोन कलेहलीस गेल्याचे वर्तमान छ. १८ रोजी लिहिलेच आहे हल्ली ताई याजकडून व रा. त्रिंबकपंत फडके घर

× × असे आले आहेत त्याणी सर्व मजकूराची विनंती केली पुढे याची तजवीज कशी करावी आता सर्व वडीलपणा व यातून पार पाडणे आपलेकडे म्हणोन खाशास

विनंती केली. आज्ञा जाहलीजे " पेशजी ति. कै रामचंद्रपंत आपासाो व चि. गोपाळ-राव दादा याणी वैर करून सर्वस्वी घात केला हा सर्वत्रास माहित आहे आतां या समयास मजकडे येऊन काय होणे? तुम्ही केले तुम्ही भोगित अहा परंतु सलाह जर विचारता तर तुम्हाकडे कांहीं खोटेपणा नाहीं तर साफ उत्तर सांगावे की आमचे पदरी मापेची (?) कोणची (ही) गोष्ट घालावी आम्ही जाग करू. आम्ही आपले रिवाजा-प्राो दवलतीचे वगैरे व्यवस्था केली आहे हल्ली तुम्ही जबरदस्त अहा काय पाहिजे ते करा " म्हणोन. नाही तर आपलेकडे खोटेपणा जर आहे तर आधिच पदरी घेऊन जो मजकूर वाजवी असेल तो साफ सांगून मोकळे व्हावे. पुढें जे होणे असेल ते होऊं. हा विचार माझे मनासी येतो, असे खाशानी सांगितले सदरहू मजकूर छ. १८ मोहरमी जाहला तो आजचे तारखेस लिहिला आहे.

जीवनराव देशपांडे धारवाडकर यांचे चि. व्यंकटराव बाळाजीपंत माजी वकील माईणकर, चिंतामणराव सदाशिव, परशराम गणेश पटवर्धन, हे येथे आले आहेत गोविंदराव नाना भिलवडीकर साताऱ्यास प्रतिनिधीच्या लग्नास आहेर घेऊन गेले होते ते आज आले त्यांच्या सांगण्यात महाराजाची स्वारी पेटें पाहण्यास निघाली आहे

मेहरबान इनविरारटीसाो बहादूर यांची मडम व मुले असे आज करवीराहून आले.

छ. २१ मोहरम मार्गशीर्ष वा॥ ८ वृद्धी तीथ गुरुवार मु. सांगली सकाळी व्यंकट-रावजी मंत्री बागणीकर याचे ठिकाणी खाशा स्वारी गेली होती मंत्री आपले उभयता चिरंजीव व जांवई चिटणीस सांवतवाडीकर यांना घेऊन सामोरे आले होते कचेरीस बैठक झाली तेथे इसलामपूरकर आण्णा वैद्य बर्वे व त्यांचे चिरंजीव बापू वैद्यही होते या वैद्याचे आजे कै. शिवराम भाऊ वैद्य यानी मला लहानपणी औषधे दिलेली आहेत वगैरे आठवण खाशांनीं सांगितली नंतर भाऊ सरनोबद आजारी सबब त्याचे घरी जाऊन त्याचे मुलास जवळ घेऊन त्याचे हातात पुतळी घातली नंतर उभयता साो यांस किल्ल्यां-तून तात्यासाो यास सामोरे पाठवून किल्ल्यांत आणिले स्वारी सदरेपर्यंत पुढे जाऊन साहेबास घेऊन दुमजल्यावर कचेरीस बसणे झाले शिरस्ते प्राो भुजंग तोफेचे अकरा ११ बार केले नंतर तिमजल्यावर साहेबास खाना खावयाचा बेत केला होता तेथे जाऊन खाना घेऊन नंतर चवथे मजल्यावर जाऊन सर्व गांव व किल्ला दाखविले नंतर खाली दुमज-ल्यावर येऊन कचेरीस बसून अत्तर गुलाब नाच एक घटका झाला नंतर उभयता साहे-बास घेऊन खाशी मंडळी पायउतारा तोफखान्यांत गेली तोफा वगैरे सर्व सामान व तोफाचे बैल जातीजातीचे ३०० होते ते दाखविले बेळगांवास इग्रजी सरकारचे तोफखान्याचे सामान आहे त्याचे बालोबाल हे सामान आहे अशी साहेबानी बहूत तारिफ केली तोफखान्यात सुतार लोहार घिसाडी करजगार सर्व कामदार आपआपले काम करित होते वाड्यांत दुमजल्या आतील दक्षिणेचे दहालानात (दालनात ?)

बंदूका तरवारी पिस्तुले दस्ताने जंबीये ढाल वगैरे सर्व हत्यारे मांडली होती ती सर्व जाती जातीची व अमक्याकडील अमूक अशी दाखविली. व वाघाचे स्वारीस खाशास जखमा लागल्यावेळेस ढाल पाठीस होती त्यामुळे बचाव झाला वगैरे मजकूर सांगून ती ढालही दाखविली त्या वेळे बरोवर हत्यारे होती तीही दाखविली नंतर कचेरीस आल्यावर साहेब म्हणाले आपण ग्रामसाहेबाकडे आपले कामाचे मजकूराचा वाका पाठविला आहे तो आम्ही पाहिला आणखी पासदर (?) आणि त्याचा तरजमा करणार त्यांस आणखी आम्हांस दाखविला पाहिजे त्यावर खासे म्हणाले उद्ईक दाखवीन मग साहेबाने विचारले आपले स्वार व पायदळ किती याचे उत्तर खाशाने केले की नेहमी पांचशे स्वार व मावळेसुद्धा २००० दोन हजार पायदळशिवाय कवाईती आहे नंतर साहेबाना कवाईती लोकांची कवाईत पाहावयाची होती म्हणून रथांत बसून किल्ल्याचे मैदानांत बाहेर येऊन कवाईत पाहिली खाशानी पदरचे मानकरी शिलेदार व ब्राह्मण-मंडळी व बारगिर व हशमी जमादार वगैरे व आप्त यांची याद नांवनिशीची केली आहे त्यांत अमका माणूस अमूक पिढीचा त्याणे व त्याचे वडील आजेपणजे याणी अमुक काम आमके वेळेस केले लढाईत जखमा लागले व मेले वगैरेचे माहिती याद केली ती वांचून बिनीवाले यांजकडून दाखविली खाशानीं साहेबास सांगितले जे माझे दवलतीत द्रव्य खजीना नाहीं जो खजीना आहे तो ही पिढाजादी माणसें व हत्तारे व घोडी वगैरे आहे हाच खजिना आहे. ज्या माणसास जी नेमणूक दिली होती त्याचे निम चौथाई वगैरे कमी करून माणसास इंग्रज सरकारचे कोणचे वेळेस दोस्तीचे जागा काम पडेल त्यासमई उपयोग इंजानेबाकडून व्हावा सबब बाळगली आहे.

बाळाजीपंत दादा नातू हे सातार्‍याहून खाशाचे भेटीस फार दिवस जाहाले सबब येणार होतें ते बाबडे यास (?) आले आहेत उद्ईक येथे येतील.

तिसरे प्रहरी मोरोपंत गोखले मिरजकर, गोविंदराव म्हैसकर व शिवरामपंत म्हणून कारकून तासगांवचे असे आले होते.

छ. २२ मोहरम मार्गशीर्ष व ॥ ९ शुक्रवार मु. सांगली

रामचंद्रपंत जोसी नि॥ नाना फडणीस मेणवलीकर हे आले आहेत भवानीसिंग रजपूत इंग्रजी लिहिणे शिकवणार बेळगांवास गेला होता तो काल आला श्री. माधवराव दाजी चिंचणीकर साहेबाचे भेटीस आले आहेत ते किल्ल्यांत उतरले आहेत.

छ. २३ मोहरम मार्गशिर्ष व॥ १० रोज मंदवार मु. सांगली बाळाजीपंत दादा नातू हे काल बांबवडयाहून नांदरे येथे वामाणात (?) होते ते आज येथें आलें वाडीस बेलबागेत उतरले आहेत दादाकडे सिधा वगैरे जिन्नस पाठविला होता तो त्याणी खाशाची भेट जाहली नाही सबब परत पाठविला जमखिंडीकरीण ताईसो यार्णी मेहेरबान इनवरारटी साहेबाचे नावे अडरसन साहेबाविरुद्ध थैली पाठविली त्याजबरोबर साहेबास

राग आला व अंडरसन याणी इतकी सक्ती करण्याचे कारण नव्हते असे बोलला वगैरे मजकूर ऐकण्यांत आला.

आज पंक्तीस रामचंद्रपंत जोसी मेणवलीकर होते तिसरे प्रहरी वाडीस बाळाजीपंत नातु उतरले त्यांचे भेटीस स्वारी गेली नातुनी शेपन्नास हात सामोरे येऊन भेट जाहली बोलण्यांत इग्रज सरकारचे करांचलीची गोष्ट निघाली होती बाळाजीपंत नातु म्हणाले श्री. महाराजास करांचली देण्याकरितां आली होती परंतु त्यास कांहीं मिळाली नाहीं आपण पुण्यवान सबब या गोष्टी घडल्या नंतर खाशानी येथे लांब पडते तरी बापूसाो यांचे वाड्यात जागा केली आहे असे नातूस सांगितले खाशानी माधवराव चिंचणींकरास साहेबास भेटविले साहेबास रथांत बसून नारळीचा बाग स्वानंदभुवन तात्यासाो याचा मळा दाखवला.

दादा मनोलीकर तासगांवाहून आज आले आहेत

छ. २४ मोहरम मार्गशिर्ष व॥ ११ रविवार मु. सांगली

सकाळी बाळाजीपंत दादा नातू येऊन दोन तीन घटका बोलणे झाले प्रचलीत राजकीय गोष्टी निघाल्या होत्या त्यात हल्लीचे गवरनर हे सिंध मुलकांत जाणार आहेत कारण तो मुलख सरकरात सर करून घेतला कारण त्या सरकारातील खर्च भागत नाही सबब तो मुलख सोडून देणार असे ऐकिले

नातू हिराबागेत डेरे देऊन राहिले

साहेब याजकडील मुनसी वगैरे मंडळी ही छापखाना व देवालय पाहावयास आली होती

छ. २५ मोहरम मार्गशिर्ष व॥ १२ सोमवार मु. सांगली

छ. २६ मोहरम मार्गशिर्ष व॥ १३ मंगळवार मु. सांगली

साहेबास श्रीगणपतीचे देवालय दाखविले. साहेबानी गणपतीच्या देवळाच्या दगडकामाची जसा कांहीं आरसा असे काम कोठे पाहिले नव्हते म्हणून वर्णन केले नंतर मंडपात छापखाना आणिला होता तो पाहिला कांहीं कागदहि छापून बघितले बाळंभट वाटवे खाशाचे पुरोहित त्याचीहि भेट साहेबानी उठून घेतली वाटवे म्हणाले मी श्री. कै. परशरामपंत भाऊ तासगांवकर याजजवळ होतो ते कृपा करीत तसेच आपासाो करितात माझे घर शहापूरास आहे. मोरोपंत गोखले यांनीं आपला अर्ज साहेबास दिला त्यांत आपले घराची जप्ती करुन जामीन घेतला आहे तरी जामीन घेऊन जिन्नस वगैरेची मोकळीक करावी त्यावर साहेब रागे भरून बोलले जे तुम्ही गंगाधरसाहेबाचे आप्त असून दौलत बुडविली ही फार गैरगोष्ट आहे आम्ही याबाबत बोलणार नाहीं काय सांगावयाचे ते मिरजचे कारभाऱ्यास सांगावे नंतर

खाशाची तसबीर विठ्ठलपंत रोडे चितारी यांणी काढली होती ती साहेबास दिली नगारजी-कडून नगारा वाजवून दाखविला नंतर खासे व तात्यासो व मेहेरबासो. असे घोड्यावर बसून शुक्रवार पेठेतून नीट जाऊन हरीपूरचेमार्गे स्वारी गेली अंकली वेशीपाशी साहेबास निरोप दिला साहेबानी खाशास पेनसिल लिहावयाचे पितळेचे दांडीचे आत शिशाच्या कांड्या असतात तसले भेट म्हणून दिले.

यादी दिनचर्या समान अरबन मयातैन श १७६९ छ. २६ मोहरम

×× मामलतीवर पाठविले त्यांत त्यास राग येण्याचे कारण काय म्हणतात ? साहेब बोलले जे ठीक आहे मामलेदार आहेत ते कायमच आहे ये विसई अंडरसनसाहेब याणी आपणास वारंवार लिहूनही असे करितो खासे बोलले जे आम्ही शिपाई लोक आमची अब्रू केवढी ते इंग्रजी सरकारास वगैरे जाहिर आहे इंग्रजी सरकारचे पदरचे कामगार हे हलक्या गोष्टी करितात जिकीर करील लबाडाचे मनावर घेऊन इंज्यानेवास अधिक आगळे लिहून अब्रूची खत्ता करितात त्यास ये विसई बंदोबस्त केला पाहिजे नाही पेक्षा जहागिरीची गरज नाही. जहागिर श्री. गणपती महाराजाचे सरकारांत गुदरली आहे ये विसई इंग्रजी सरकारात लिहीलेच आहे जसे चित्तास येईल तसे करावे इंग्रजी सरकारचे राज्यात वगैरे कोठेच फंदबखेडा केला नाही इंग्रजी सरकार दोस्त त्यांचे ज्या वेळेस काम त्या वेळेस जिवाची इच्छा न धरितां पैसा खर्च करून कामे बजावली आहेत त्याविसईची पत्रे आहेत एवढे मात्र तुमचे ध्यानांत असावे त्याचे उत्तर साहेबानी केले की आपली नेकी व अब्रू व खरेपणा हा विलायतेपर्यंत महशूर होऊन इंग्रजी सरकारची खात्री जाहली सबब दोस्तीची जागा बक्षिसीबद्दल विलायतेहून विलायती तरवार मिळाली आहे त्यापेक्षा कोणत्या गोष्टीची काळजी करू नये कामगार याणी भलते केले आहे त्याचा व पुढे कोणी केल्यास त्याचा बंदोबस्त करितो भिलवडी प्रकरणी बोलणी झाली त्यांत मला या गोष्टीची गरज नाही तासगांवकर हे अधिक आगळे बोलतात याचा अभिमान साहेबास असावा त्याचे उत्तर बरे आहे म्हणून साहेबानी केले

तात्यासो इचलकरंजीकर इचलकरंजीस निरोप घेऊन गेले त्याणी खाशास बोलले त्याचा आशय आमचा व करवीरकर याचा इलाखे प्रकरणी बहूत दिवस तंटा होत आता इंग्रजी आंमल झाला आहे म्हणून त्याच्या इलाख्यात वागावे असे ठरले त्याप्रो वागत अहोत परंतु दरम्यानदारीचे ठरावाची याद ग्रामसो बहादूर करून देणार इनवरारेटीसो आज संध्याकाळी मिरजेस गेले चंदोपंत रामदुर्गकर हे निरोप घेऊन रामदुर्गास गेले.

छ. २७ मोहरम मार्गशिर्ष व॥ १४ बुधवार मु. सांगली

श्रीमंत व्यंकटराव साहेब मंत्री बागणीकर हे निरोप घेऊन बागणीस केले

श्री. कै. गणपतराव तात्यासो मिरजकर यांची पत्नी दुसरी सरस्वतीबाई ही व तिची सून बाळासो याची बायको सौ. उमाबाई अशी कोकणांत माहेरी नाण्याकरिता काल येथे आली आहेत.

छ. २८ मोहरम मार्गशिर्ष व॥ ३० गुरुवार मु. सांगली

खासास्वारी तिसरे प्रहरी बाळाजीपंत नातु याचे ठिकाणास गेली होती.

उदईक विनायकराव खाडीलकर नातूस मेजवानी करणार सबब तात्यासोस आमंत्रण करण्यास आले होते इनविरारेटीसो आज प्रातःकाळी मिरजेहून जमखिंडीस रवाना झाले.

अस्तमानी तात्यासो याणी कर्नाटकी कळसूत्र डोंबारी याचा खेळ करविला.

जिनगौडा जैन चाबूकस्वार कोंगवाडास त्याचे वडिल आज्यापासून चाकरीस आहे हल्ली जिनगौडाचे तेथे बनेनासे होऊन येथे आला चाकरीस राहणेकरितां–घोडयावर बरा बसतो सबब त्यास १० रु. दरमहा ५० आंख कापड २५ रु. नालबंदी अशी करून चाकरीस ठेवला बाळासो यास मुखत्यारी यावी असे वर्तमान आहे दोन महिने साहेबानीं आपले बरोबर नेवून काम करण्याजोगे अक्कलवान आहेत कसे त्याची परीक्षा पाहून मुखत्यारी सांगावी असे आहे.

छ. २९ मोहरम पौष शु॥ १ गुरुवार मु. सांगली

बाळाजीपंत नातू यांस मेजवानी खाडिलकरानीं केली ते समई पंक्तिस श्री. तात्या सप्रे, बापू शहापूरकर, बापू लागू, बळवंतराव फडणीस, गोविंदपंत बिनीवाले व गोपाळपंत करंदीकर असे होते दादा नातू त्यांचे चिरंजीव नाना, कनिष्ट बंधू पांडोबाभाऊ.

खासा स्वारी तिसरे प्रहरी बागेत जाऊन येताना बाळाजीपंत नातू याचेकडे जाऊन त्यास उद्याच्या भोजनाचे त्यांच्या मंडळीसुद्धा आमंत्रण करून आले.

छ. १ सफर पौष शु. २ मंदवार (८–१–१८४८). मु. सांगली

आज मुंबईहून पत्र आले त्यात मजकुर कीं गवरनरसो बहादूर हे सिंध प्रांतात इंग्रज सरकारचा आमल जाला आहे तेथील बंदोबस्त करण्यास गेले आहेत सयाजीराव गायकवाड बडोदेकर हे सन मजकुरी मार्गशीर्ष देवआज्ञा जाहली त्याचे वर्तमान मुंबईस आले त्यावरून साहेबानी खेद करून ४ तोफा मारल्या त्याच्या कायद्याप्रमाणे—महाराजाचे वय ४८ वर्षांचे होते सबब चार वर्षास एक असे याप्रो केल्याविसईचे पत्र मार्गशीर्ष व॥ १२ आले त्यात लिहिले आहे.

बाळाजीपंत नातूस श्रीचे वाड्यात मेजवानी दिली दादा मनोळीकर निरोप घेऊन गेले उद्या तासगांवास गेले.

छ. २ सफर पौष शु. २ रविवार. मु. सांगली

बाळाजींपंत नातू तिसरे प्रहरी गणपतीचे देवळांत खाशाकडे आले होते त्यास कागदपत्र पंढरपूरचे मुक्कामचे करारातील मुद्दे इंग्रजी सरकारातून हाशील करून द्यावयाचे त्या प्रकरणी दाखविले खाशानीं नातूस संक्रांत करून जावे असा आग्रह केला म्हणून ते राहणार आहेत.

छ. ३ सफर पौष शु. ४ सोमवार. मु. सांगली

पांडुरंगराव गणेंश मंगळवेढेकर यांचे चिरंजीव रामचंद्र आबा याची पत्नी सौ. सिताबाई इला उष्णतेचा विकार होऊन दुखण्याने पडली होती ती गाणगापूर मुक्कामी मार्गशीर्ष व॥ १० शनिवारी छ. २३ मोहरम देवाज्ञा झालेचे पत्र मंगळवेढ्याहून आले.

छ. ४ सफर पौष शु. ५ मंगळवार. सांगली

रा॰ लिंगोपंत निपाणीकर याजकडून कारकून सूतशेखर मात्रा मागावयास आले आहेत.

करवीराहून उचगांवकर याचे पत्र आले त्यांत उभयता महाराज करवीरवासी संक्रमण झाले म्हणजे समुद्र पाहावयास कोकणांत जाणार असे आहे.

आज खाशा स्वारी भोजनोत्तर मिरजेस गणपतीचे मळ्यात जाऊन बाळाजीपंत नातुस बाग दाखवून त्यासुद्धा अस्तमानी परत आले उद्या नातूस बळवंतराव फडणीसाचे घरी मेजवानी आहे.

छ. ५ सफर पौष शु॥ ६-७ क्षयतीथ बुधवार मु. सांगली.

रामाजी नाईक भिड्यानी नातू यास बाजारात आपले दुकानी पानसुपारी केली खासेहि गेले होते.

छ. ६ सफर पौष व॥ ८ गुरुवार मु. सांगली

आज मकर संक्रमण खाशांनी संप्रदाय प्रो तीळपात्र व गोप्रदान वगैरे व सर्व खाशा मंडळींनी तीळ पात्रे वगैरे दिली श्री. सौ. बाईसो विष्णूभट खाडिलकर यास आंधण म्हणून देतात ते त्याचे घरी जाऊन तपेले पळी वेळणी नेऊन त्या आधण घालून दिले व वर्षाची धडोती ब्राम्हणाचे घरी दिली तिसरे प्रहरी खाशाकडे व तात्यासोकडे सर्व पदरची मंडळी व भाईबंद व बाळाजीपंत दादा नातू व बाजार पेठेतील सावकार व गांवातील शिष्टविद्वान व पदरचे मोठे मोठे मानकरी व बारगीर वगैरे सर्वत्रानी तीळगुळ येऊन दिले ज्याचा जसा मान तसा स्वहस्ते अगर कारकूनाकडून देवविले. स्वारी २ घटका दिवसास अस्तमानी किल्ल्यात जाऊन घरचे देवास तीळगुळ ठेवून आले पदरच्या मंडळीपैकी ज्यावर बहूत लोभ त्यास बोलावून सर्वत्राची नांवे

घेऊन तीळगुळ सोहळ्यानी खाणे जाहले वे. मू. रा. बाबाजी भट जोसी वरखंडकर यांचे बंधू पूर्वाश्रमीचे नाव कृष्णशास्त्री थाणी आश्रम घेऊन आठ वर्षे अधिकच जाहली कांहीं दिवस काशिस ब्रम्हावर्तास होते. हल्ली सातान्यासहि होते येथे येऊन आठ चार दिवस झाले डोके फिरले आहे विक्षिप्त झाले आहेत ते आज खाशाकडे येऊन आचावचा भाषण करून गेले.

उद्या बाळाजीपंत नातूस हरिहर दादा लागू यानी हरीपूरास आपले घरी मेजवानीस बोलावले आहे.

छ. ७ सफर पौष भृगुवार मु. सांगली.

आज वाडयांत हाळदकुंकू संक्रांतीबद्दल जाहले.

बाळापंत नातूस पागे पैकी एक उंट व कर्डा बराल्या सिंगा असे सामानासुद्धा दिले सदाशिव भट जोसी जटापाठी सातारकर रघुनाथ बावाचे शिष्य हे साधु आहेत ते अस्तमानी खाशाकडे येऊन बसून निरोप घेऊन गेले त्याजकडे शिधा पाठविला आहे.

छ. ८ सफर पौष शु॥ १० मंदवार मु. सांगली.

आज खाशांनीं बाळापंत नातूस श्रीचे देवळांत मेजवानी केली.

मौजे बस्तवाड येथे डोंगरातून एक वाघ आला आहे तो मळ्यात येऊन उसांत राहिला आहे अशी गांवकऱ्याची आर्जी आली सबब तो धरण्यासाठी सांपळा व शिपाई बरकंदाज असे पाठविले आहेत.

भोजनोत्तर नातूस कागदपत्र वाचून दाखवून निरोप दिला बाळाजीपंत दादास शालजोडी व पागोटे किमत एकूण २२५ व चिरंजीव नानास दुपट्टा पागोटे किंमत २०० बंधू पांडूभाऊ यांस ५० रुपये जोडी व कारकून मंडळीस शेले पागोटे व आश्रित मंडळीस संभावना व धोतरजोडे दिले दादाबरोबर श्रीपाद भट जोसी इचलकरंजीकर आहेत ते फार विद्वान आहेत अल्पवयी आहेत त्यांचेसारखे विद्वान पुण्यापासून अलिकडे थोडे त्यांची संभावना केली.

छ. ९ सफर पौष शु॥ ११ रविवार मु. सांगली.

पुण्याची पत्रे आली त्याचे हाशील माधवराव देशमूख जावई याचा व त्याचे चुलते दामोदरराव देशमूख याचा घरगुती खटला मुंबईस पडला होता त्याचा फैसल माधवराव याजसारखा जाहला म्हणोन ऐकण्यात ते लिहिलेले आले सदाशिव भट्ट जोशी जटापाठी यांस धोतर जोडा व दहा रुपये रोख देऊन निरोप दिला शिवाय ओझ्यास बैल व भटजीसाठी पोहचवावयास मेणाहि दिला.

इनव्हेररेटी साहेबानी बाळासो दादासो मिरजकराचे बोलणे उडवून लावले आमचे हातात कांहीं नाही गवरनरसोास लिहा (मुखत्यारीबद्दल) म्हणून सांगितले ते दोघे साहेबा जवळून जमखिंडीहून मिरजेस परत आले.

छ. १० सफर पौष शु॥ १२ सोमवार मु. सांगली

राधानाईकीण तेरदळकर ही आज येथे आली आहे

छ. ११ सफर पौष शु॥ १३ मंगळवार मु. सांगली

व्यंकटराम देशपांडे धारवाडकर निरोप घेऊन मुंबईस गेले

यादी दिनचर्या सुरू समान आरबैन मयातेन शके १७६९

छ. १२ सफर पौष शु. १४ बुधवार मु. सांगली

गंगाधरराव बाळासाहेब व दादासो हे मिरजेहून येऊन तीळगूळ देऊन अस्तमानी परत गेले.

वे. शा. सं. पुरुषोत्तमशास्त्री खरडेकर पुराणिक हे खर्डाहून इंग्रजी सरकारातून तरवार दिली त्या मजकुरावर काही श्लोक कविता करून घेऊन आले आहेत

नाना व बाबाजी कोलटकर हे साहेबाकडून आले ते खाशास येऊन भेटले.

छ. १३ सफर पौष शु. १५ गुरुवार मु. सांगली

रघुनाथ हणमाजी भाऊ सरनोबत क्षयाने पाच चार महिने आजारी होता तो आज सूर्योदयानतर घटका दिवसाचे सुमारे मृत्यू पावला खाशाचे लोभातील चिरंजीवातील आसामी व फार सुमनुष्य अल्पवई होता खाशास बहुत दुःख जाले

छ. १४ सफर पौष वद्य १ भृगुवार मु. सांगली

चिंतामणभट जोसी सातारकर हे जोतिषशास्त्री आहेत त्यास नारायणभट जोसी सांगलीकर हे खाशाकडे घेऊन आले होते त्यास संभावना पांच रुपये व धोतरजोडा दिला

छ. १५ सफर पौष व॥ २ मंदवार मु. सांगली

खाशी स्वारी भाऊसो तात्यासो व पदरची मंडळी दिगरजेच्या मळ्यावर कळकीचे बेटात चव्हाणाकडे भोजनास गेली चव्हाणानी खाशास बंदुक तोडयाची चांगली दिली तात्यासाहेबास बाबासाहेबास कटयारी भाऊसाहेबास निमच्या कारभारी यांस बकरा (बकपा?) म्हणोन सुऱ्यासारखे असते ते दिल्हे. जोत्याजीराव चव्हाणाची मातोश्री हिने खाशावरून सतका दोन रुपये उतरून टाकिला तात्यासाहेब यांचे स्वारीबरोबर कवाइती लोक होते त्यात कुशा कदम म्हणोन आंबी सरकारची कुणबीण आहे तिचा भाऊ हा होता तो तेथे कळकीत निजला होता तेथे सर्प चावला किंवा कसे हे कळलें नाही स्वारी माघारी आली येते समई त्यास काही कळले नाही कृष्णाबाईस पाणी पिऊन चौकीत आला तो झेंडू येऊन निपचित पडला आणि अर्ध घटकेने प्राण गेला ! मोठा चमत्कार जाहला.

बाळाजीपंत नातू हे इचलकर्जीस गेले होते ते आज मिरजेस येऊन तेथे किल्ल्यात मेजवानी झाली उदईक येथे येऊन भोजन करून पुढे नांद्रयास मुकामास जाणार पुढे सातान्यास जाणार येविसीचे त्यांचे पत्र आले आहे.

पुरुषोत्तम शास्त्री खरडेकरानी श्रीमंताचे कारकीर्दीचे काही श्लोकबद्ध कविता करून पुस्तके केली आहेत त्यातील काही श्लोक म्हणून अर्थ करून दाखविले त्यांचा सिधा वगैरेचा बंदोबस्त केला आहे.

छ. १६ सफर पौष वद्य॥ ३ रविवार मु॥ सांगलीं.

आज संकष्टी चतुर्थी बाळाजीपंत नातु आले आहेत उदईक जातील.

तिसरे प्रहरी नारायण महाराज हरीपूर बागेतील यांचे दर्शनास स्वारी जाऊन आली

छ १७ सफर पौष वद्य ४ सोमवार बाळाजीपंत नातू व मंडळी भोजनास आली होती.

छ. १८ सफर पौष वद्य॥ ५ मंगळवार वासुदेव शास्त्री जुन्नरकर खाशास भेटण्यास आले त्यास ५ रुपये संभावना व धोत्रजोडा दिला तिसरे प्रहरी डोंबारी याचा खेळ तात्यासाहेबानी श्रीच्या देवळापुढे करविला छत्रपती सातारकर आपासाहेब हे चवदा पेटे पाहण्यास गेले होते ते पंढरपूर पेठ्यास गेले त्यांचा मुकाम काल जहागिरीतील मंगळवेढयास येक दिवस होता त्याजकडे मामलेदार याणी फडफर्मास नेऊन दिली

निपाणीकर निंबाळकर सरलस्कर याची बायको जानूबाई यांचा कारकून तिळगूळ तात्यासाोसाठी बंदुक व बाईसाहेबास हळदकुंकू असे घेऊन आला होता कारकुनाचे नांव बाबाजीपंत.

नाथाजीराव शिंदे मळणगांवकर व मानसिंगराव ऊर्फ रावजी भोसले करवीरकर (हे पदरचेच) हे खाशाचे भेटी घेऊन गेले.

छ. २० सफर पौष वा॥ ७ गुरुवार—लक्ष्मण भट खरे पनवेलकर हे येथे आले आहेत त्यास खासे जाऊन भेटून त्यास भोजनास बोलावले सिवगिरी गोसावी हे करवीराहून आले कारण मिरजेस मनसागिरीबाबा याणी देवालय मार्कंडेश्वराजवळ बांधले आहे त्यात देवाची प्रतिष्ठापना करावयाची आहे म्हणून आले ते येऊन खाशास भेटून गेले.

रामचंद्र जोशी मेणवलीकर निरोप घेऊन गेले मंगळवेढयास जाणार

छ. २१ सफर—महत्त्वाची नोंद नाही

छ. २२ सफर पौष वा॥ ९ मंदवार—माधवराव देशमुख जावई यांजकडून कारकून सखोपंत मामा गोरे व दिनकरभाऊ सोहोनी उभयता आले आहेत त्याणी नारिंगे वगैरे जिन्नस व जावई याजकडील पुस्त्या दिल्या.

छ. २३ सफर देशमुखाकडील कारकुनानी हकीकत सांगितली त्यातील हशील कै. विनायकरावजी देशमूख हे वारल्यानंतर इंग्रजी सरकाराकडील सरंजाम वगैरे दाहा हजार अदमासाचा चालत होता तो जप्त जाहला त्या विसी मुंबईस बोलणे दोन वर्षे पडले आहे त्या विसीचे कौसलांत ठरून निम्मे सरंजाम चालवावा याप्रो होऊन विलायतेस रपोट लिहिला आहे उत्तर येईल ते समई सरंजाम सुटेल.

बाळंभट काळे पौष व॥ २ मंदवारी वारले

नाना मायदेव खाशाचे सासरे व भाऊ पेठे हे मंगळवेढ्याहून आले आहेत.

छ. २४ सफर पौष वद्य॥ १० वृद्धी तीथ सोमवार

चिमणाराम वगैरे मारवाडी यांची कापडाची खरेदी नागपूरची शंभर दीडशे वोझी आज आली ते समई बार वगैरे समारंभ संप्रदायाप्रो त्याणी करविले त्यास दोन तीन दिवस झाले

छ २५ सफर चिंतामण दीक्षित चिरंजीवासह पुण्याहून आले त्यानी सुकी केळी दिली

जगद्‌गुरु संकेश्वरकर यांची सिक्केकटार गमावली होती सबब येथून नवे सिके व दळत रुप्याचो व कटार वगैरे तयार करून पाठविली.

ऐकीव वर्तमान की श्री भीमाशंकराकडे कोणी बंड करून इंग्रजी सरकारच्या पदरचे साहेबलोक यांची नाके कापली होती ज्याणे बंड केले तो श्री पंढरपुरास वारी करीत असे त्याचा पत्ता लाऊन श्री वेणुनादापासी त्यास साहेबलोकांनी मराठे लोकांचा वेश धरून धरला आणि त्याचा मुसक्या बांधला मुंबईस लाऊन दिला आठ चार दिवस झाले

छ. २६ सफर पौष वा। १२ बुधवार सिवरामपंत अण्णीगिरीकर यास श्रीपाद-वाडीस गणपतीची मूर्ती तांब्याची सिद्धिविनायक उजव्या सोंडेचा तीन बोटे उंचीची सांपडली त्यास दृष्टांत झाला की सांगलीस आप्पासाहेबास द्यावी म्हणून त्यानी ती मूर्त छ २३ सफरी आणून दिली.

मिरजेस हरिपंत फडक्यांच्या घरी पिशाचे व समंध बहूत उपद्रव करीत सबब जमखंडीनजीक आठ कोसावर दोडमलगांव आहे तेथे पांडुरंगभट म्हणून जाणते घरदांज पिढीजादे आहेत त्यास विचारले त्याणी काही सांगितले त्याप्रो एक वर्सभर अभिषेक वगैरे केले समंध घरातील गेले हली त्याणी त्या बावास मिरजेस आणिले आहेत सांगता सहस्त्रभोजन घालीत आहेत. बावाची वृत्ती साधी वय २५।३० वर्षांचे आहे. कोणास काही मागत नाहीत.

छ. २७ सफर पौष वद्य १३ गुरुवार–महत्त्वाचे नाही.

(छ. २८ सफर–महत्त्वाचे नाही)

छ. २९ सफर माघ शु॥ १ मंदवार आज हरिपूरचे संगमेश्वराचा उत्सव दोन
नार ब्रा० भोजन झाले मुक्तद्वार होते.

छ. ३० सफर उद्या शु॥ २ सोमवारी मुंजीचा मुहूर्त गावातील १८ जणांची
क्षत आली.

७-२-१८४८

यादी दिनचर्या समान अरबैन मयातैन आलफ श. १७६९.

छ. १ रबिलावल माघ शु. ३ सोमवार. मु. सांगली

आज मिराभाई वैद्य करवीरकर बोलावण्यावरून येऊन खाशाच्या पायाची गांठ
हिली.

छ. २ रबिलावल माघ शु. ४ मंगळवार.

लक्ष्मणभट खरे पनवेलीकर आले आहे त्यास संभावना रु. १० धोतरजोडा
ला.

छ. ३ रबिलावल माघ शु. ५ वसंतपंचमी बुधवार. मु. सांगली.

छ. ४ रबिलावल माघ शु. ६ गुरुवार मु. सांगली.

छ. ५ रबिलावल माघ शु. ७ शुक्रवार.

रा. रामभाऊ कापसे निसबत नाना फडणीस हे येथे आले आहेत

छ. ६ रबिलावल माघ शु. ८ शनिवार. मु. सांगली

भाऊ कापसे यांस भोजनास पंक्तिस बोलावून शेला पागोटे दिले त्याजबरोबर
णार्थ लिहिलेले दिले त्यात नवाब निजामअलीखान हे भागानगराहून खर्ड्यास
ते कोणकोणच्या मार्गाने गेले त्या गांवाची नावे व नबाबाबरोबर फौज किती
त्याचा तपशिल लिहून पाठवावा म्हणून. याचे कारण कापशे हे नाना फडणीस
इनाम गांव आहे त्या गांवात असतात सबब तिकडे शोध करून लिहून पाठवावे
न लिहून दिलें.

तात्यासो इचलकरंजीकर यास मूत्र बंद होऊन प्रकृती बिघडली म्हणून समजले.

छ. ७ रबिलावल माघ शु॥ ९ रविवार मु. सांगली

छ. ८ रबिलावल माघ शु॥ १० सोमवार मु. सांगली

छ. ९ रबिलावल माघ शु॥ ११ मंगळवार मु. सांगली

काल रात्री पुणेकर ळळींते खेळकरी आले आहेत त्याचा खेळ श्रीचे देवळात
.

छ. १० रबिलावल माघ शु॥ १२ बुधवार मु. सांगली

दामोदरपंत भानु श्री कै. नाना फडणीस याचे दायाद हे आले आहेत.

छ. १२ रबिलावल माघ शु १४ भृगुवार मु. सांगली

खासा स्वारी कौलापूरास जावून अस्तमानी परत आली जाणेचे कारण कौलापूरच्या रानांत पूर्वेस तुकाईची वाडी म्हणून खुले पाटील यांनीं बांधली आहे लहान आहे तेथे देवीचे देवालय आहे तेथील मूर्त फारच चांगली आहे ती पाहावयास गेली होती मूर्त अष्टभुजा मरेगुदीचे दगडाची आहे पहिली संगमरवरी दगडाची २४ भुजाची होती ती मागे कधी दंग्यात फोडली आहे सबब दुसरी मरेगुदीची करून बसविली आहे व जवळ उजवे आंगास स्वयंभूदेवी आहे.

श्री रा. परशरामपंत भाऊसो तासगांवकर हे कुटुंबासह सोनीकर मातोश्री ताईस घेऊन शिवरात्रीकरितां गोकर्णास गेले ते कौलापूरांवरून आज म्हैसाळचे मुक्कामास आले.

छ. १३ रबिलावल माघ शु॥ १५ मु. सांगली

छ. १४ रबिलावल माघ व॥ १ मु. सांगली

छ. १५ रबिलावल माघ व॥ २ सांगली

मार्तंड शामजी उपनवाडीकर हे पंढरीस दंडवत नवसाबद्दल घालीत गेले होते ते आले त्याणीं श्रीस नैवेद्य व मावंदे केले तात्यासो भाऊसो श्री. सौ. बाईसो प्रसादास गेले होते.

छ. १६ रबिलावल भौमवार संकष्टी माघ व॥ ४ मु. सांगली

काल नानाचे घरी अष्टपुत्रे वाईकर यांची कन्या सखोपंत रेटरेकर कुलकर्णी याचे नातवात दिली त्या लग्नास स्वारी गेली होती.

बायजाबाई शिंदे आलिजा बहादूर ही नाशकास होती ती ग्वालेरीस गेली तिणे दिल्लीचे तांदूळ पाठविले येविषयीचे पत्र त्यांचे खंडेराव याणी लिहिले ते आज आले

छ. १७ रबिलावल माघ व॥ ४ बुधवार मु. सांगली.

रामचंद्रपंत गोखले हरीपूरकर याचे मुलाचे लग्नाची व विष्णूदास भाई याच्या मुलीचे लग्न सखाराम मनसाराम यांचे नातवाशी, अशी दोन लग्ने माघ व॥ ५ ची आहेत त्याच्या अक्षती आल्या होत्या.

श्री. सौ. मा. बाईसो व सौ. आवडीबाई अक्का याणी अनुक्रमे गणपती व बाळकृष्ण याच्या मूर्ती रुप्याच्या करविल्या त्यांची प्राणप्रतिष्ठा आज केली ५-५० ब्राम्हण भोजन व सवाष्णी झाल्या.

छ. १८ रबिलावल माघ व ॥ ६ गुरुवार.

खाशानी आपले पायाचे गुडग्याजवळ गांठ झाली आहे ती आपले हातानी शस्त्र घेऊन फाडून तीन बोटे लांबी करंगळी इतके खोल असे कापले आतली गांठ निघणेस थोडा लग राहिला दुखूं लागलें सबब तितकेच ठेवून दुसरे वेळेस पाहावयास येईल म्हणोन ठेविले जवळ मिराभाई वैद्य हे होते आपले हाताने आपले शरिर फाडणे हे परम कठिंण सर्वत्र मंडळीस आश्चर्य वाटले.

श्री. रा. भाऊसाो यांची स्वारी मिरजेस गेली कारण विष्णूदास भाई याचे घरी लग्न आहे.

अलिबक्ष हात्ती आज तिसरे प्रहरी तात्यासोनीं आगदी चारी पाय खुले करून सोडला आहे.

छ. १९ रबिलावल माघ व ॥ ६ भृगुवार मु. सांगली.

सातारकर महाराजाची स्वारी पेटे पाहण्यास निघाली ती बहेबोरगांवास आली आहे.

बापू आठवले यांजकडे पंढरपूर पेटा आहे त्याची घालमेल होणार म्हणून ऐकले परंतु सध्या काम राहाते झाले आहे.

छ. २० रबिलावल माघ व॥ ७ मंदवार मु- सांगली.

करविरकर छत्रपती नरसोबावाडीस यात्रेस आले आहेत येऊन तीन दिवस झाले सप्रदायाप्राो इकडून फडफरमास पाठविली गोपाळ आपा उचगांवास गेले आहेत-

सातारकर छत्रपतीना बरे वाटत नाही म्हणून माहाळुंगे आणावयास खाशाकडे माणूस पत्र घेऊन आले माहाळूंगे पाठवीली व समाचारास रामचंद्र विश्वनाथ सहस्त्रबुद्धे यास बहेबोरगावांस पाठविले.

छ. २१ रबिलावल माघ व॥ ८ रविवार मु. सांगली.

छ. २२ रबिलावल माघ व ॥ ९ सोमवार मु. सांगली.

कै. बापू गोखले यांचे गुरु कै. ठाकूरदास बाबा हे सातार्‍यास रहात असत त्यांचे चिरंजीव वे. मू. रा. बाबा हे आले आहेत धर्मशाळेत उतरले आहे त्याजकडे शिधा चंदी पाठविली उद्या भेटीस येतील.

छ. २३ रबिलावल माघ व॥ १० मंगळवार मु. सांगली.

तिसरे प्रहरी ठाकूरदास बाबाचे चिरंजीव भेटीस आले होते.

छ. २४ रबिलावल माघ व ॥ ११ बुधवार मु. सांगली.

ठाकूरदास बाबाच्या मुलाची कथा आज श्रीचे देवळात झाली

छ. २५ रबिलावल माघ वद्य १२ गुरुवार मु. सांगली

छ. २६ रबिलावल माघ व॥ १३ शिवरात्र शुक्रवार

खासास्वारी ब्रम्हनाळास जाऊन श्री. आनंदमूर्तींच्या समाधीचे दर्शन घेऊन गेले शिवरात्रीस समाधीची वृंदावने आहेत त्यापैकी पश्चिमेचे वृंदावन डोलते ते पाहून नंतर हरीपुरास जाऊन संगमेश्वराचे दर्शन घेऊन आली.

छ. २७ रबिलावल विशेष नाही

छ. २८ रबिलावल विशेष नाही

छ. २९ रबिलावल फाल्गुन शु ॥ १ रविवार मु. सांगली

वे. रा. चिंतामण दिक्षीत आपट्यास घर रहावयाकरितां पेठेत श्रीचे डावे बाजूस पश्चिमाभिमुख दुकाने आहेत त्यापैकी वामनाजी बाबाजी रानडे याणी घर बांधले होते तेच त्याची किंमत देऊन त्यांस दिले

छ. १ रबिलाखर फाल्गुन शु॥ २ मंगळवार मु. सांगली

छ. २ रबिलाखर फाल्गुन शु॥ ३ मु. सांगली

छ. ३ रबिलाखर फाल्गुन शु ॥ ४

करविरकर महाराज स्वारी श्रीपादवाडीहून कूच करून मौजे उदगांवचे मुक्कामास आली आहे उदगांवास करवीरकर छत्रपतीच्या चोपदाराची सोन्याची काठी गमावली हे वर्तमान ऐकले

छ. ४ रबिलाखर फाल्गुन शु ॥ ५-६ क्षयतीथ मु. सांगली

मालगांवकर सिदगौड पाटील याची प्रकृती बिघडली सबब सरकारातून बाबा सांबारे वैद्य यांस पाठविले

छ. ५ रबिलाखर फाल्गुन शु॥ ७ मंदवार

अंडरसनसाहेब कुरुंदवाडाहून सांगलीस आमराईतील बंगल्यात आले बायजाबाई शिंदे याणी करवीरकर छत्रपतीस हत्ती सामानासुद्धा व तीन घोडे असे पाठविले आहेत ते येथे पाहावयासाठी महाराजाकडून आणविले आहेत घोडे बोर आहेत मातबर आहेत हत्तीहि बराच आहे आपला फुंदणगज आहे त्यासारखा आहे उंची व डौल तसाच आहे वर सामान भरगच्ची कलाबुतूचा गाशा व शिरी व रुप्याचे मोराचा जीन दोन आसामी बसावयाजोगा आहे

अंडरसनसाहेबास भेटण्याकरितां स्वारी गेली होती.

छ. ६ रबिलाखर फाल्गुन शु॥ ८ मु. सांगली

हरी रामचंद्र दाते यास आज तिसरे प्रहरी देवआज्ञा झाली खंडेराव निंबाळकराचा व खाशाचा परमस्नेह निंबाळकर हे चिरंजीवातील आसामी असे आहेत निरोप घेऊन जाते वेळी निंबाळकरानी पायावर डोसकी ठेविली यापुढे मला पत्र खासे पाठवितील त्यांत अखंडित लक्ष्मी असा मायना न लिहिता 'चिरंजीव' असा लिह्यावा म्हणून विनंती केली खाशांनी मान्य केली

छ. ७ रबिलाखर फाल्गुन शु॥ ९ मु. सांगली

अंडरसनसाहेबाचा मेणा, आमचीं दाद घेत नाही म्हणोन फिर्यादी लोकांनी वाटेत आडविला. जाऊ देईनात. साहेबाने कळविल्यावरून कवाईत लोक पाठवून दबाव देऊन वाट मोकळी केली. नंतर साहेबाची स्वारी मुक्कामास आली. श्रीचे मळयांत बैठक घातली होती. नंतर श्रीकगणेश्वरीचे आवारांत येऊन साहेब बसले. तात्यासोकडून बंदुकीचे बार व तीरकमान व पट्ट्याचे हात व तोफेची शिस्त करून दाखविली व कवाईतीची पोरे नवी तयार करविली आहेत त्यास कवाईत सागून करवली व भवानसिंग पंतोजी इंग्रजी याजकडून मुले तयार पदरची वगैरे झाली आहेत त्याची परीक्षा साहेबानी खुद्द आपले हाती बूक घेऊन घेतली

रा. हरीपंत तात्या ब्रिनीवाले यांचे धाकटे चिरंजीव, तसेच बाबा फडणीस, रावजी निमये, भाऊ भावे या त्रिवर्गाचे चिरंजीव याणी परीक्षा दिली साहेब संतोष जाहले मग साहेब गेले. जाते वेळी साहेबास खाशानी तुम्ही एकटे फिरता हे चांगले नाही चार लोक बरोबर ठेवावे कोणी वाईटावर असतात कोणते वेळी काय गुदरेल हे सांगता येत नाहीं असें म्हटले. साहेब म्हणाले ठीक आहे असे आम्हास सांगणारे कोण आहे अलबत तुम्ही सांगता तसेंच करू.

भास्करराव लक्ष्मण किल्लेदार याणी आपले घरी खाशास मेजवानीचा बेत केला आहे.

छ. ८ रा॥खर फाल्गुन शु ॥ १० मंगळवार—

साहेब आज पहाटे कुरुंदवाडास रवाना झाले

काल सोमवारी सोळा घटका रात्रीस कोकणात श्री देवास दर्शनास जाणेचा मुहूर्त पाहून प्रस्थान ठेविले आहे

ठरल्याप्रमाणे आज सर्व मंडळी भास्करराव किल्लेदाराचे घरी मेजवानीस गेली. भोजनाचा बेत तमाजी नरसिंह जमखिंडीकर यांचे घरी केला होता पंक्तीस विष्णुपंत जोसी मुनसी नि॥ साहेब अंडरसन होते.

छ. ९ रबिलाखर फाल्गुन शु ॥ ११ बुधवार—(नाही)

छ. १० रबिलाखर फा. शु ॥ १२ गुरुवार—

आन्या रामोसी व राम्या रामोसी आळतेकर हे पेशजी दरवड्यात होते ते धरून आणून कैदेत ठेविले होते ते पळाले होते ते हल्ली आळतेकर याणी धरले ते येथे आणून कैदेत ठेविले आहेत त्यास मारहि दिल्हा.

छ. ११ रा।खर— (विशेष नाहीं)

छ. १२ रविलाखर—

रामभाऊ सहस्त्रबुद्धे सातान्यास श्रीमंत छत्रपती याजकडे गेले होते ते काल रात्री आले त्यांच्या सांगण्यात छत्रपतीची प्रकृति फार बिघडली होती हात घालून उठवावे असे जाहले होते आता बरी आहे सातान्यास पांच देवालये बांधण्याचा त्यांचा बेत आहे मुहूर्त पाहून कामहि लावले आहे सांबाची ३ व्यंकोबाचे १ देवीचे १ अशी पांच.

अस्तमानचे तीन घटका रात्रीनंतर नगारखान्यापुढे बसोन तेथे खेळे वगैरे याणी खेळून नंतर राधेचा तमाशा दोन घटका करून स्वारी माघारी आली. चवदा घटका रात्रीनंतर चंद्रग्रहण ते नऊ घटकेने मुक्त जाले रात्री आग लागून कोऱ्याचे घर जळाले.

छ. १४ र॥खर फाल्गुन वद्य १ धुळवड व ग्रहणाची कर रोज सोमवार—

सांप्रदायाप्रो धुळवडीचा खेळ दांडपट्टा कुस्त्या डफगाणी झालीं बागेत व कंगणेश्वराच्या आवारात जाली तिसरे प्रहरी गावात बहुरूपी मुस(लमा)न आला आहे त्याणे भावाने राजास लढाईत जखमा लागल्या तो जखमी राजा पाठीशी बांधून आणिलेला अशी दोन स्वरूपे येकानेच घेतली असे सोंग आणिले होते तें खाशाकडे दाखविण्यास आला होता तें पाहिले सोंग बरे आणले म्हणोन आज्ञा झाली. तो गेला. रात्रौ जोती आंबी सांगलीकर याजकडील पोऱ्याचा तमाशा जाला.

छ. १५ रबिलाखर फाल्गुन वद्य. २ मंगळवार—

रात्रौ घाणीवरील राघू सोनार याचा व जोती आंबी याजकडील राधेचे तमाशे झाले तात्यासो व भाऊसो बसले होते.

छ. १६ रबिलाखर—

लिंगोपंत निपाणकराकडून कृष्णाजीपंत कारकून आला त्याणे भुईकोहळा व कोळीसरे सरकारात भेट दिली

छ. १७ रविलाखर फाल्गुन व॥ ३ संकष्टी गुरुवार मु. सांगली.

संप्रदायाप्रो किर्तन छबीना व रात्रौ नृत्य वगैरे झाले रा. दामोदरपंत भानू पुणेकर हे आले होते त्यास आज निरोप देऊन लावून दिले निरोप समई शेलापागोटे व नक्त

रुपये ३० दिले गृहस्थ थोर घरचे खरे परंतु संभावित पदरी राखणेजोगे अगर विश्वासाची जागा नव्हे. त्यास नाना फडणीस याणी चिरंजीव म्हणविले त्याविषयीची पत्रे श्री. कै. सवाई माधवरावसो यांचे एक, नानाची एक दोन त्याच्या नकला त्याणी दिल्या. त्या पाहता कागद तगली असे दिसते ज्याचे ते जाणे!

छ. १८ रविलाखर फाल्गुन व ॥ ४ भृगुवार मु. सांगली.

छ. १९ रविलाखर फाल्गुन व ॥ ५ रंगपंचमी मु. सांगली.

वे. रा. यज्ञेश्वर दिक्षीत वाईकर हे साताऱ्यास जाऊन आले त्यास छत्रपतीची प्रकृत बिघडावयाचे कारण काय येविसई विचारले त्याणे सांगितले जे बहेवोरगांवास मुक्काम होता तेसमई श्रीकृष्णाबाईचे डोहांत मच्छ होते ते धरून भक्षण जाहाले तेथील कोणी धरित नाहीत असे श्री मारुतीचे स्थान मोठे आहे असे असता धरून भक्षण केले तेव्हां दोन दिवस खाताच प्रकृत बिघडली ती फार बिघडली हल्ली बरी आहे म्हणून सांगत होते.

आज रंगपंचमी रंगाचा समारंभ व्हावयाचा परंतु सालमजकुरी श्री. सौ. गंगाबाई ही वारली सबब आज बेत झाला नाही.

छ. २० रविलाखर फाल्गुन व ॥ ६ रविवार मु. सांगली.

ब्रम्हचारी गोळपकर जोशी काशीस आसतात त्याची गांठ ते मिरजेस आले तेव्हां पडली होती त्यास सांगलीस बोलावले होते त्याप्रो ते आज आले त्यास संभावना १ धोतरजोडी दिली

छ. २१ रविलाखर फाल्गुन व ॥ ७ रोज सोमवार मु. सांगली

प्रभाकरपंत आठवले मिरजकर कोणी मूठ मारली किंवा कसे न जाणो ते एकाकी रक्त ओकून एक प्रहरांत परवाचे दिवशी मंदवारी व ॥ ५ वारले.

छ. २२ रविलाखर फाल्गुन व॥ ८ मंगळवार मु. सांगली

आज स्वारी हरीपूरास जाऊन चार लग्नघरी आहेर केले.

छ. २३ रविलाखर फाल्गुन व॥ ९ बुधवार मु. सांगली.

काल अस्तमानी मोरोकेशव नातु फडणीसाचे मूल यास गांवातील गढीछोड याणे धरून गळयातील ताईत व कमरेतील अंडबुली अशी काढून घेतली पायातील साखळ्या उरावर पाय देवुन तोंड धरून बोळा घालून काढावयाचा बेत होता इतक्यांत मागून आरडा होताच सोडून पळाला मुलगा वाचला. नाही पेक्षा घटकाभर आवकाश पडेल तरी मेला असता मुलगा चार वर्षांचा होता सदरहू प्रकार सुतारआळीस वीरभद्राचे देऊळ जुन्या गांवात पडकेसे आहे आहे तेथे अस्तमानी झांज पडता झाला.

अस्तमानी राघोपंत गोखले पूर्वी जिऊबाई मेणवलीकर यांचे पदरचे ते हल्ली आपटे याजवळ असतात ते आले आहेत खाशाचे भेटीस आले होते बोलणी झाली त्यात दामोदरपंत भानू हे नाना फडणीस यास दत्तक दिले हे खरे किंवा कसे म्हणून खाशांनीं विचारले. राघोपंत गोखले वृद्ध नाना जवळ होते त्याणी ही गोष्टीं खोटी, नानानी त्यास कांहीं दत्तक घेतले नाही, त्यानी पत्रे दाखविली ती सारी खोटी केली आहेत म्हणून सांगतले आहे. कृष्णराव आपटे वडील कै वामनराव आपटे श्री. पंतप्रधान बाजीरावसो याजबरोबर हालपटीत होते ते कांहीं स्वारीतून निघोन आले म्हणोन विचारिले त्याचा मजकूर; त्यांस स्वारीत कर्ज झाले ऐवज श्रीमंत देईनात सबब निघोन आले. खाशानी सांगितले जे वामनराव सभ्य गृहस्थ खाविंद याचे चाकरीविसई मोठे तत्पर

छ. २४ रबिलाखर फाल्गून व॥ १० मु. सांगली

आपटे भोजनास आले होते

तिसरे प्रहरी तात्यासो यांचे मराठी शाळेत जाऊन खाशानी साऱ्या मुलांच्या पुस्तका पाहिल्या कांहीं हिशेब तात्यासोकडून करविले.

अस्तमानी मिराभाई वैद्याकडून खाशांचे मांडीस गांठ उठली तिला तुंबडी लावून रक्त काढले.

छ. २५ रबिलाखर फाल्गुन व॥ ११

कृष्णराव आपा आपटे यास किल्ल्यांत तोफखाना व सिलेखाना व किल्ला दाखविला

छ. २६ रबिलाखर फाल्गुन व॥ १२ मंदवार शनिप्रदोष मु. सांगली

कृष्णराव आपट्यास बरोबर घेऊन हरीपूरास संगमेश्वराचे दर्शनास गेले तात्यासो मळ्यांतही गेले होते कारंजे झऱ्याचे दाखविले. घरी येऊन पूजा भोजन झाल्यावर पालखीच्या दांड्याची बेटेही दाखविली.

छ. २७ रबिखर फाल्गुन व॥ १३ रविवार मु. सांगली

आपटे यांस भोजनास बोलावून वस्त्रे देऊन निरोप दिला आपट्यास चापाची बंदूक सामानासुद्धा व पोलादी बाकी (?) दिली.

छ. २८ रबिलाखर फाल्गुन व ॥ १४ सोमवार मु. सांगली.

उद्यापासून ब्रह्मनाळास रामनवमीचा उत्सव सर्वास आमंत्रणास गोसावी आले होते.

आज सोमवती श्री. सौ. बाईसो यानी अंजीर घातले सातारकर छत्रपतीस बरे नाही सबब श्रीपादवाडीस गुरुचरित्रास ब्राह्मण एक व सांगलीच्या गणपतीस प्रदक्षणा घालण्यास ब्राम्हण एक असे लाविले आहेत

छ. २९ रविलाखर चैत्र शु॥ १ गुढ्याचा पाडवा मु. सांगली

श्री गणपती महाराज पंचायतन संस्थान कसबे सांगली याजकडील नैवेद्य व विद्यार्थी कामगार ब्राम्हणमंडळी याचे जेवणाचा बेत आज पावेतो तो सरकार खाजगी कडून होता तो आज मुहूर्ताने निराळा खर्च श्री कडील नेमणूकेपैकी करून करावा असे ठरवून २५ पात्रांचा बेत चालता जाहला. पावसाळा हिवाळा त्यात गावातील विद्यार्थि वगैरे १५० सुमार आजमासे हे दोन प्रहरी मधोकरीस जातात त्यास ऊन लागते पाय पोळतात सबब त्यास जेवणाचा बेत भोजन घालणेचा बेत आज दहा वर्षे सुमार चालला आहे त्याप्रो बेत आजपासून होऊन चालते जाहाले सदरहू विद्यार्थ्यांच्या भोजनाचे काम काशिनाथ गंगाधर कानिटकर याजकडे सांगितले आहे आज पाडव्यास स्वारी किल्ल्यात जाऊन गुढीची व खासे व बिनीकडील निशाणे व लग्या यांची पूजा केली.

छ. ३० रबिलाखर चैत्र शु ॥ २ बुधवार मु. सांगली

छ. १ जमादिलावल चैत्र शु॥ ३ गुरुवार मु सांगली

इमाम बहुरुपी होनवाडकर याणे सोंगे आंणली सबब त्यांस १० रुपयें पागोटे असे दिले त्याणे आज सोंग राच्याच्या लेकीचे आणले होते. बरेच होते.

मिराबाई हकिम याणे खाशाचे पायांस इलाज केले सबब त्यास सोन्याचे कडे वजन तोळे १० किंमत ७५ दिले

छ. २ जमादिलावल चैत्र शु ॥ ४ मु. सांगली

छ. ३ जमादिलावल चैत्र शु ॥ ५ मु. सांगली

काल रात्री खाशास शैत्य होऊन ज्वर फार आला होतां त्याणे किंचित भ्रमही पडला होता.

महाराच छत्रपती आपासो यांची प्रकृती चैत्र शु॥ २ बुधवारी फारच बिघडली सबब सर्वत्र पदरचें कारभारी याणी व बाळाजीपंत नातू यांनी दत्त मूल द्यावा असे ठरवून चिमणाजी भोसले शेडगांवकर याचा नातू यास दत्तक घेवविले दोन प्रहर दत्तविधान झाले साखरा वाटल्या तोफा केल्यानंतर तीन घटका अदमासे त्याच दिवसी महाराजाचा काळ झाला त्या विसईचे पत्र रामचंद्र विश्वनाथ सहस्त्रबुद्धे हे साताऱ्यास गेले होते त्याचेकडून आज आले. खाशानी किल्ल्यातील नगारखाना दहा दिवस बंद करविला आहे मुलगा दत्तक दिला त्याचे नांव जनकोजी राजे म्हणून ठेविले आहे जे दिवसी दत्तविधान काळ जाहला त्याच दिवसी सकाळी साताऱ्याचे रेसिडेन्ट फ्रीयर साहेब हे नहरास गवरनर साहेबाकडे गेले दोन दिवशी येणार. आले नंतर दत्तविधान होऊन मुल घेतळा त्याविसई कसे होते ते पाहावे म्हणोन सहस्त्रबुद्धे याच्या लिहिण्यात आहे बहूधा ही गोष्ट कायम होईल असे आहे.

छ. ४ जमादिलावल चैत्र शु ॥ ६ रविवार मु. सांगली.

खाशानी काल आज मंत्र स्नान केले. कशाय आज दिला आहे.

छ. ५ जमादिलावल चैत्र शु ॥ ७ सोमवार मु. सांगली.

छ. ६ जमादिलावल चैत्र शु ॥ ८ मंगळवार मु. सांगली.

श्री. रा. विठ्ठलराव बापूसो यास तिसरे प्रहरी २५ घटका दिवसानंतर देवीचा तोडगा पीलसांवत याजकडून करविला व गांवातील दहावीस मुलांसही करविला.

छ. ७ जमादिलावल चैत्र शु ॥ ९ रामनवमी मु. सांगली.

दाजीबा खाडिलकर लग्न सावताचे पाडीस करून कुटूंबासह भेटीस आहे त्यानी गव्याचे शिंगाचे संपुष्ट आणून दिले.

छ. ८ जमादिलावल चैत्र शु ॥ १० मु. सांगली.

कौलापुरास हरीहर दादा लागू यास जमीन दिली आहे त्यात विहिर खंटली आहे त्या जमीनीत नांगर धरला होता त्या नागटींत तांब्याचे अष्टदळ त्याजवर तांब्याची डबी अशी सांपडली ती पाहाता त्याचे खाली दगडाचे चिरे आहे असे समजले व पत्रा अष्टदळी आणून दाखविला सबब स्वारी तिसरे प्रहरी पाहण्यास गेली.

आज साताऱ्याहून बाबाजी गोपाळ वसगडेकर याचे पत्र आले त्यांत रेसिडेन्टसो महाराजाच्या कारकून मुखत्यारा कडून काम चालविले आहे

छ. ९ जमादिलावल चैत्र शु॥ ११ मु. सांगली

छ. १० जमादिलावल चैत्र शु॥ १२ शनिप्रदोष मु. सांगली

श्रीमंत मातोश्री लक्ष्मीबाई कुरुंदवाडकर ही निरोप घेऊन कुरुंदवाड येथे गेली.

नाना काळे तासगांवकर हे तासगांवाहून आले आहेत स्फटिकाचे लिंग मिरजेस रा. याचे घरी गहाण होते ते रा. गोविंदराव गणेश भिलवडीकर याणी आणिले अहे सरकारांत खरेदी घेणार असा बेत आहे लिंग सहा बोटे उंची सुमार निर्मळ बेजिरीम आहे फार चांगले आहे हुडकू गेले असतां मिळणार नाही

छ. ११ जमादिलावल चैत्र शु॥ १३ मु. सांगली

छ. १२ जमादिलावल चैत्र शु॥ १४ मु. सांगली

आज मारवाड देशांतून कारिगार याणी संगमरवरी दगडाचे जिन्नस उत्तम आणिले आहेत ते पाहावयास श्रीचे पुढे मंडपांत उभे केले आहेत ते पाहावयास गावातील वगैरे मंडळी आली होती जिन्नस बी तपशिल १ दोन गज लांबीची चौकी मेचासारखी ती ×× की हम चौक फळी आहे वगैरे सामान जाळ्या वगैरे फार उत्तम आहे नंतर २ मेघडबऱ्या देव्हारे (१ लहान प्रत थोर)

सातारकर छत्रपती चैत्र शु॥ २ वारले सबब किल्यातील नगारखाना बंद केला होता तो काल दिवस चांगला होता सबब १२ वे दिवशी पुन्हा वाजवावयास आज्ञा झाली.

यादी दिनचर्या सुरू सबा आरबैन मयातैन आलफ श १७७०.

छ. १३ जमादिलावल चैत्र शु॥ १५ मु. सांगली.

महायात्रेहून मंडळी आली ती १ बाजी हरी खाडीलकर १ बावा पुराणीक १ बाबाजी बाबूराव करंदीकर याची पत्नी. मारवाडातून आलेले देव्हारे फार चांगले मोठे आहेत. गणपती महाराजाचे देवळ्यात सिद्धीबुद्धीसुद्धा आत मावावयाजोगे आहेत एक आहे त्याची किंमत आठ हजार सांगतात सोईवार पटल्यास घेण्याचा विचार आहे

छ. १४ जमादिलावल चैत्र व॥ १ मु. सांगली.

अलिबक्ष हत्तीने मागील पिछधाडया तोडून घेतल्या होत्या सबब तात्यासो याणी जाऊन पुढील पायातील लंगर सोडणे करितां सांगितले परंतु जवळ मनुष्य येऊ देईना तेव्हां पिराजी गडेकरी यास सांगितले जे चार पायाने हत्ती मोकळा कर म्हणजे सोन्याचे कडे बक्षिस देईन त्याणी हत्ती मोकळा केला सबब त्यास सर्वत्रा देखता आपले हाताने बक्षिस दिले

नरसिंगराव रामाजी देसाई याणी हस्तीदंती कलमदान जाळीदार फार उत्तम खोदीव काम केले आहे तसले सरकारास आज दिले आत रुप्याच्या दौती आहेत

मौजे मंपगे हा इनाम गांव रा. महादाजी सदाशिव बापट यांचा तो इंग्रजी सरकारा तून जप्त झाला होता दोन वर्षे सुमार झाली तो चौकशी होऊन सोडल्याचे पत्र मुबईहून आले म्हणून कोन्हेरराव शहापूरकर यानीं साखर वाटली फणसळकर सावकार निरोप घेऊन आजऱ्यास गेले.

छ. १५ जमादिलावल चैत्र व॥ २ गुरुवार सांगली

छ. १६ जमादिलावल चैत्र व॥ ३ शुक्रवार सांगली

छ. १७ जमादिलावल चैत्र व॥ ४ शनिवार सांगली

खाशास आज बराच ज्वर आला प्रकृत हलक झाली आहे.

ब्रह्मनाळास श्री. स्वामी आनंदमूर्ती यांचे वृंदावनाचा डोल होतो म्हणून काल समजले त्याजवरून स्वार पाठविला तो आज उत्तर आले त्यांत डोल आज पांच दिवस पौर्णिमापासून होत आहे म्हणोन लिहून आले

ऐकीव वर्तमान, मेहरबा अंडरसनसो जमखिंडीस होते तेव्हा जमखिंडीजवळ कलहळी म्हणोन गांव आहे तेथे श्री. मारुती जागृत आहे त्याजवळ एक विहिर आहे

त्या विहीरीस गांवातील ब्राह्मणाची बायको पाण्यास आली तिने नाकातील नथ काढून चूळ भरली नंतर माघारी जाताना नथ विसरली. कोणी पळविली. साहेब स्पोर्टास गेले होते ते त्या विहीरीपाशी गेले होते त्यास ती नथ दृष्टीस पडली त्यानीं उचलून चपराशा-जवळ दिली इकडे नथ हरवल्या बाईने दुसऱ्या बाईने नथ चोरल्याचे किटाळ घेऊन मारुतीस कौल लावला कौल चार वेळ लावला त्यांत दुसऱ्या बायकोने नथ उचलली असा आला म्हणोन ती बाई तिच्या गळ्यांत पडली अखेर फिर्याद साहेबाकडे गेली साहेब म्हणाला मारुती लबाड आहे मी नथ उचलली असतां या गरीब. बाईवर तुफान घेऊन कौल देतो म्हणून रागास येऊन श्रीची पूजा वगैरे बंद करून कवाडसा कुलुप घालून त्या कुलपास बेडी लोखंडी घातली आणि श्रीस नैवेद्याबद्दल तीन पैसे देऊन त्या कडिल जमीन वगैरे नेमणूकीची जप्ती केली !

छ. १८ जमादिलावल चैत्र व॥ ५ रविवार सांगली

खाशाची प्रकृत आहे तशीच आहे. कषाय सांबारे यांनीं दिला आहे.

नाना काळे फडणीस तासगांवकर याणी सरकारात मालवी गाई पेशजी दिली होती तिचे नांव मंदाकिनी ती नेहमी तात्यासो जवळ असे तिला आजार होऊन आज पाहाटे मृत्यु पावली खाशास वाईट वाटले

छ. १९ जमादिलावल मु. सांगली.

अर्ल ऑफ क्लेअर हे गवरनर होऊन पेशजी आले होते त्यास तरवारप्रकर्णी पत्र येथून विलायतेस गेले होते त्याचे उत्तर विलायतीहून आले त्यात त्यानीं खाशांचा गौरव फार केला आहे ते पत्र आज तिसरे प्रहरी भरकचेरीत खाशानी आपले मुखे वाचून पाहिलें.

छ. २० जमादिलावल चैत्र व॥ ७. मु. सांगली

खाशानी ग्रहपीडेबद्दल नवग्रहाचीं दाने ब्राम्हणास दिली.

छ. २१ जमादिलावल चैत्र व॥ ८ मु. सांगली.

छ. २२ जमादिलावल चैत्र व॥ ९. मु. सांगली.

कैं. कृष्णाजी त्रिंबक व हरी त्रिंबक व बापूजी त्रिंबक परचुरे हे खाशाचे आतेबंधू या त्रिवर्गास त्रिंबक कृष्णा यास हूजूरची आसामी, हरी त्रिंबकास लक्ष्मीश्वराचे फडणीसी व बापूस हुबळीची फडणीसी अशा तिघास तीन नेमणूका करून दिल्या.

छ. २३ जमादिलावल चैत्र व॥ १०. मु. सांगली.

छ. २४ जमादिलावल चैत्र व॥ ११ शनिवार. मु. सांगली

गोपाळपंत बावधनकर श्री. भाऊसोास नवऱ्या पाहावयास गेले होतें त्याणी पुणे वाई सातारा येथे पुढील मुली पाहिल्या. एक कृष्णराव गोळे पुणेकर

बुधवारातील जोग पुणेकर मोरोबादादाचे वाड्यातील विनायकपंत करमरकर पुणेकर एक नाना फडणीस उपाध्ये नितसुरे पुणेकर वासुदेव नाईक गोखले पुणेकर दाजी वैद्य लावगणकर पुणेकर भिडे विश्रामबागेलगत पुणेकर चिमणापंत साने देशमुखाचे वाड्याजवळ पुणे गणेशपंत जोसी पुणे सखारामभट्ट सातारकर मोरभट जोसी याच्या मुली दोन वाईकर धोंडोपंत खरे वाईकर दाजीबा रानडे वाईकर दाजीबा फडके वाईकर इतक्यांत उत्तम मुलगी करमरकर यांची आहे योगबले करून होईल ते होईल.

आज गारोडयाचा खेळ तिसरे प्रहरी केला.

यादी समान आरबैन मयातैन आलफ श. १७७०.

छ. २४ जमादिलावल चैत्रमास १२ मु. सांगली.

सातारकर महाराज याणीं दत्तक घेतला त्याजकडे मुखत्यारपणा कौसलातून नव्हता पहिले महाराजानी काशीस मुलगा घेतला त्यास आणून गादीवर कायम करावे करावे असे ठरवून त्यास आणावयाकरितां सरंजाम गेला म्हणोन लेखीच वर्तमान आले.

छ. २५ जमादिलावल चैत्रमास १३ मु. सांगली.

आज सरकारतून हरीहर दादा लागू व कोन्हेरराव बापू देशपांडे यास रंगीत लाकडी आंत गुप्ती अशा सांवतवाडीकडील दिल्या.

छ. २६ चैत्र मास वद्य १ मे १८४८ इ. मु. सांगली.

छ. २७ चैत्र व॥ १४ मे २ १८४८ मु. सांगली.

ब्रह्मनाळास रघुनाथ स्वामीचे वृंदावन चैत्र शु॥ ५ पासून डोलत होते ते पाहण्यास आज स्वारी गेली होती पांच चार वेळ डोल चांगला झाला येताना स्वारी नावेत बसून आली.

छ. २८ जमादिलावल चैत्र व॥ ३० मे ३ १८४८ सांगली.

राधा नाईकीण तेरदळकर ही तेरदळाहून आज आली.

छ. २९ वैशाख शु॥ गुरुवार ४ मे १८४८ मु. सांगली.

मंदाकिनी गाईच्या मृत्यूस बारा दिवस सबब तिच्या नावे पांच ब्राह्मण भोजनास बोलाविले होते.

छ. १ जमादिलाखर वैशाख मे ५ १८४८ सांगली.

बाळाजीपंत गोडबोले आज प्रातःकाळी २ घटका दिवसास निर्वतले.

छ. २ जमादिलाखर वैशाख मे ६ १८४८ सांगली.

छ. ३ जमादिलाखर वैशाख मे ७ १८४८ सांगली.

सिदगौडा पाटील मालगांव चैत्र व॥ १४ मंगळवारी वारला आज सहावा दिवस कोंडोपंत सहस्त्रबुद्धे व सखारामपंत व भिमराव जालेहाळकर हे पुण्यास इंग्रजी सरकारचे पदरी असतात ते दहावीस मंडळीसुद्धा आले आहेत.

छ. ४ जमादिलाखर वैशाख शु॥ मे ८ १८४८ मु. सांगली.

नारोपंत नाना मायदेव हे खाशाचे पांचवे श्वशुर हे निरोप घेऊन मंगळवेढयास जाणार पुणेकर कामगार मंडळीस राधाबाई तेरदाळकर हिचे गाणे ऐकवले.

छ. ५ जमादिलाखर वैशाख ९ मे १८४८ मु. सांगली.

छ. ६ जमादिलाखर वैशाख १० मे १८४८ सांगली.

छ. ७ जमादिलाखर वैशाख ९ गुरुवार ११ मे १८४८

सातारकरमहाराज वारले ते समई अकारावे दिवशी हत्ती दान दिला तो हत्ती येथे आला आहे बरा आहे मागील डावे पायांत ताव आहे

छ. ८ जमादिलाखर ता. ११ मे १८४८ सांगली

पुणेकर मंडळीस निरोप दिला व सनगे दिली जाते समई त्यास श्रीमंताचे कारकीर्दीतील कागदपत्र दाखवले व पटवर्धन मंडळीच्या वंशावळीचा वंशवृक्ष चित्रे काढलेला दाखविला.

यादी दिनचर्या समान अरबैनमयातैन श १७७०

छ. ९ जमादिलाखर वैशाख व॥ मे १३ १८४८ मु. सांगली.

भाऊमहाराज करवीकर यांचे घरी लग्न आहे सबब आमंत्रण पत्र घेऊन कारकून आला होता सबब त्याजकडे आहेर घेऊन नाना फाटक गेले आहेत.

छ. १० जमादिलाखर वैशाख मे १४ १८४८ मु. सांगली

सांगलीस श्रीमंत गणपतराव बाबा यास कागद लिहिण्याचा मुहूर्त आज सकाळी दहा घटका दिवसास केला.

अस्तमानचे दोन घटका सुमारे वीज कडाडून नरसू गवंडी याचे घरावर पडली.

छ. ११ जमादिलाखर वैशाख शु॥ १३ मे १५ १८४८ सांगली

छ. १२ जमादिलाखर मे १६ १८४८

हिंदुस्थानातून कोणी मुसलमान नगारखाना वाजविणार व गाणे गातो व सारंमंडळ व सारंगी बीन व जलतरंग वाजवितो असा घुडण नगारची यांचे ओळखीने आला आहे त्याणे रात्री येऊन नगारखाना वाजविला व गाणेही झाले. सुमारांत आहे.

छ. १३ जमादिलाखर मे १७ १८४८ सांगली

छ. १४ जमादिलाखर मे १८ १८४८

सालाबादप्रमाणे आज किल्ल्यातील थोरली वसंत पूजा झाली गावातील व हरीपूरची घरची मंडळी आमंत्रण करून बोलाविले होते खेरिज आणखी व आगांतूक वगैरे पात्र सुमार १०००० हजार झाले आमंत्रित ब्राह्मणास चार आण्यापासून रुपयापर्यंत दक्षणा दिली.

कै. नाना फडणीस भान् श्रीमंत दैववान पेशव्याचे घरी कारभार करून लौकीक मिळविला तेव्हा त्यांचे जन्मग्रह कोणचे पडले असतील ते पाहावे असे खाशास वाटून त्याची जन्मपत्रिका मेणवलीहून आणविली आहे.

श्री. भाऊसोसाठी जोगांची कन्या नेमस्त करून येतो म्हणून गोविंदराव कृष्ण व गोपाळपंत बावधनकर यांचे पत्र आले.

छ. १५ जमादिलाखर वैशाख १९ मे १८४८.

मुंबईहून वर्तमान आले त्यांत पारश्याची दुकाने अग्नी लागून जळाली १६–१७ लाखाचे नुकसान झाले आपासो महाराज सातारकर वारले त्यावेळी त्याने सांगितले होते कीं सरस्वती व येशवंतराव भाऊ यास माझे तालुक्यांत ठेवू नये हद्दपार करावे महाराज वारल्यावर रेसिडेन्टसाहेब तिच्या घरी जाऊन विचारले आता कसे महाराजाचा हुकूम असा आहे तिने उत्तर केले आता माझे रुसणे बोलणे कोणतेच राहिले नाही मी राणीसाहेब महाराज याचा जोडा उचलावा माझे संरक्षण करावे महाराजांचा खाजगीचा खर्च दरमहा ८–१० हजार होता तो आणखी ८ हजार रुपये दौलतीपैकी करून दौलतीस कर्ज आहे त्याचे रदकर्जाचीं व्यवस्था दरमहा १५ हजार रुपयाची करून कर्ज फेडावे असे ठरले आहे तूर्त राणीसो मुखत्यार आहे त्याणी घेतलेला दत्तक मंजूर झाला नाहीं प्रतिनिधी कऱ्हाडकर क्षीण होत होत वैशाख शु. ८ बुधवारी छ. ६ जमादिलाखरी देवाधिन झाली आज दहावा दिवस यजमानास बहूत दुःख झाले. श्री. लक्ष्मीबाई प्रतिनिधीनी खाशास भाऊ म्हणविले होते त्याची यांची भेट जन्मभर नव्हती परंतु परस्परे लोभ फार उत्कर्ष.

छ १६ जमादिलाखर वैशाख मे २० १८४८.

ग्रामसाहेब करवीरचा कारभार पाहात होते त्यांची बदली होऊन क्लार्कसाहेब आले आहेत.

छ. १७ जिमादिलाखर २१ मे १८४८.

छ. १८ जमादिलाखर मे २२ १८४८.

श्रीमंत भाऊसाहेबाचा मुहूर्त दहा घटकाचा ठरला लग्नपत्रे लिहिली.

छ. १९ जमादिलाखर मे २३ १८४८ मु. सांगली.

भाऊसाहेबाचे लग्न सुमुहूर्तावर झाले पांच तोफा झाल्या किल्ल्यात ब्राम्हण भोजन १००० पात्र झाले ब्राम्हणास देकार दक्षणा झाली.

छ. २० जा॥खर २४ मे १८४८.

लग्नाचा समारंभ आज दुसरा दिवस.

यादी दिनचर्या सुरसमान आर्बैन मयातेन व अलफ शके १७७० कीलकनाम संवत्सरे.

छ. २१ जा॥खर वैशाख वद्य ७ गुरुवार ता. २५ मे सन १८४८ इ॥ सन १२५७ फसली मु॥ सांगली.

श्रीमंत रा. दादासो॥ मिरजेहून आहेर घेऊन आले होते रा.हरी बाळकृष्ण बिनीवाले याचे कन्येचे लग्न कागवडास (म्हणून) गेले. दिनकर बाळकृष्ण म्हैसकर याचे चिरंजीवास दिल्ही त्याची अक्षत त्याणी आणली होती ते कागवाडास आज गेले जोग व्याही आमंत्रणास आले होते.

छ. २२ जा॥खर वैशाख व॥ ८ भृगुवार २६ मे १८४८ मु॥ सांगली.

सांप्रदायाप्रो॥ जोग व्याही आमंत्रणास आले होते. श्री. रा.आप्पासो॥ कुरुंदवाडकर यांची पत्नी सांगलीस आली आहेत सबब वाड्यांत येऊन गेली श्री. सौ. बाईसो॥ याणी लुगडी खण व कुंची मुलास दिली व खाशानी हातात पुतळी मुलाचे घातली येथे येण्याचे कारण ही वाई पुणेकर गोळ्यांची कन्या व बळवंतराव फडणीस यांची कन्या सौ. विठाबाई ही गोळे यांचे घरी दिली आहे यास पुत्र जाहला सबब बाळंतविडा घेऊन आली होती ती परत आजच गेली. कर्नाळ गोसावी व. चव्हाण हिमत बहादर याचा खटला त्याजविसीचे कागदपत्र चव्हाण याजकडील समजून घेतले रा. बळवंतराव मोरेश्वर पटवर्धन यांचे चिरंजीव मोरो बळवंत हे लग्नास आले होते त्यास परत आहेर देऊन त्यानी निरोप घेतला ते मिरजेस गेले. स्वारी तिसरे प्रहरी बागेत जाऊन अस्तमानी आली श्रीचे वाड्यात स्नान संध्या फराळ जाला श्रीमंत रा. तात्यासो॥ याणी अखर दाचून दाखविली बतीस पुतळ्याची वाचली.

छ. २३ जा॥खर वैशाख व॥ ९ मंदवार ता. २७ मे सन १८४८ मु॥ सांगली.

आज सोहेरास अकरावा दिवस सोहेर फिटला.

कृष्णराव आपटे मामलेदार पेटा वाळवे अष्टयास राहतात त्याणी इंग्रजी रिवाजाचे कायद्याची याद पाठऊन दिली ती आली. रात्रौ परजन्य मोठा प्रहरभर पडला आज सकाळी बस्तवाडकर पाटील व चौगुल्या प्रकर्णी खटले सरकारात पडले आहे त्या विसी मजकूर समक्ष होत होता.

छ. २४ जाखर वैशाख व. १० सह ११ क्षयतीथ स्मार्त एकादसी रविवार ता. २८ मे सन १८४८ इ. मु॥ सांगली.

दिलीहून पातशाहजादे कोणी या देशी आले आहेत त्याणी सरकारास पत्रे पाठविली त्यात नागपुरचे वाटेस आम्हास लुटले तीन हजार रुपये व घोडे २ गेले आपला लौकिक ऐकोन आलो आहें म्हणून तें पत्र चिटणिसानीं वाचून दाखविले त्याची आज्ञा उत्तराची जाली की येजमानसाहेबाचा इशारा आल्यासिवाय भेट घ्यावयाची नाही म्हणोन जाहली. सदरहू मजकुर त्याजकडील माणसास सांगून पत्र परत दिल्हे. तिसरे प्रहरी अलीबक्ष हत्तीजवळ कोन्हेरराव बापू वगैरे मंडळी गेली होती त्यास माणसाकडून छाविला त्याणे दगड घेऊन मारला तो बापूचे हातास निसटता लागला गणपतराव वासूदेव सीळकर याची सापत्न मातोश्री कोकणात होती ती वै॥ वद्य ८ शुक्रवारी देवाज्ञा झाल्याचे पत्र जाले.

२९ मे १८४८

तिसरे प्रहरी खाशाची परवानगी घेऊन तात्यासो व कान्हेरराव बापू याणी अलीबक्ष हत्ती सोडविला खासा स्वारी शुक्रवार पेठेत नवा बंगला सरकारातून बांधला आहे त्याजवर बसून व तात्यासो वगैरे मंडळी वाड्याचे माडीवर बसून रस्त्यात हत्तीचा तमाशा पाहणे झाले.

छ. २६ जाखर वैशाख वद्य १३ मंगळवार ३० मे १८४८.

आज व्याह्याकडून मांडव परतणे बा॥ आमंत्रण आले होते.

३१ मे १८४८ अलीबक्ष हत्ती मोकळाच आहे त्याने श्रीचे नगारखान्याचे दरवाज्यावर चालून येऊन चौकटीस दात लाविले ते समई बापू बाणदार नि॥ सरकार याणे चर्की बाण लाऊन हत्ती मागे सारला. अशी आणखी हुल्लड केली ते समई दुसरा बाण लावताच निघोन जाऊन रा. गणेशपंत मोडक याचे घराचे दार मोडून नदीकडे गेला तिसरे प्रहरी पुन्हा येऊन पागेजवळील छपरात गडेकरी व रा. रावजी मुकुंद जोसी गोळपकर याचा भाऊ सदाशिव हा १६ वर्षाचा सुमार आहे तो होता त्याचे अंगावर जाऊन त्याचे पागोटे खाली पाडले व त्याला पाडला इतक्यांत बापू बाणदार याणे बाण लाऊन हत्ती मागे फिरविला तिसरे प्रहरी हत्ती पाहण्यास पेठेतील बंगल्यावर स्वारी व मंडळीसुद्धा बसणे झाले होते.

१ जून १८४८ अलीबक्ष हत्ती मोकळाच आहे तो धरण्याचा इलाज बहुत केला परंतु धरू देत नाहीं दोन प्रहरचे सुमार हत्तीने पुढील श्रीचे दरवाजावर चालून आला बाण लाऊन मागे फिरविला नंतर बाजारांत परशराम आतार याचे दुकानाजवळ जाऊन पडवी पाडली त्यात येक ब्राह्मण व कुपवाडचा चांभार असे दोन आसामी होते ते सांपडले चांभारास फार लागले हैराण होऊन अस्तमानी मेला ब्राह्मण बचावला

अस्तमानी स्वारी व कारभारी असे पेठेतील नवे बंगल्यावर जाऊन तमाशा हत्तीचा पाहिला नाना सिंदे बेदरकर हे रा. भाऊ लागू याचे घोडयावर बसून हत्तीस भाले लावीत. हत्तीहि त्याजवर पल्ले घेऊन उठे परंतु घोडा चांगला सांपडला नाहीं.

२ जून १८४८ आज हत्ती धरणेचा प्रयत्न करून पुढील दोन पायास फास घातले असता तोडून घेऊन कृष्णेवर गेला बायका धूत होत्या त्या पळाल्या रा. गणेश-पंत केळकर याची पत्नी धूत होती तिला जावयाची आवध राहिली नाही हत्तीने येऊन गाठले धक्का सोंडेचा मारून पाण्यात पाडली परंतु जिवास काहीं जाहले नाहीं हत्ती निघोन गेला. बाई फार आर्ष आहे.

३ जून १८४८ मंदवार मु. सांगली हत्तीस सकाळपासून धरण्याचा प्रयत्न मोठा करून शेवटी अस्तमानी धरून बिंढा भरून ठाणावर नेंऊन बांधला.

३ जून १८४८

श्री. सौ. मातुश्रीबाईसाो याणी मोगऱ्याचे फुलाची लाखोली श्री सांब पंचायतनातील यास वाहिली त्याची सांगता पंधरा ब्राह्मण सांगितले होते. रा. हरिपंत तात्या बिनीवाले कन्येचे लग्नास कागवाडास गेले होते ते करून परत आले जहिनुलाबंदीन खान गवई ख्यालीचे दिल्लीवाले हे सांगलीस आले आहेत त्यांचे गाणे रात्रौ श्रीचे देवालयांत मंडपात मागीलजाहले. साल मजकुरी पौषमासी रा.बाळाजीपंत दादा नातू हे साताऱ्याहून खाशाच्या भेटीस म्हणोन आले होते त्या समई त्यांचे म्हणण्यातील अभिप्राय येथून सरकारातून काही तरी इनाम जमीन असावी म्हणोन परंतु त्या समई त्याविसीचे काही जाहले नाही हली नारायण नाइक येथे आहेत त्याणी त्या गोष्टीचा उद्योग करून विनंति केली त्याजवरून पो मंगळवेढे येथे दोनशे रु. ची जमीन इनाम दिल्ही ती तपसील.

१०० मौजे चल हे पते प्रोमजकूर १०० मौंजे अनवली प॥ मजकूर.

दोनसे रुची जमिनीची ताकीद दिल्ही.

(दिनचर्या खंड १ समाप्त)

वर्गीकृत ढोबळ नामसूची

अ

अटसनसाहेब २२
अंताजीपंत साठे २३
अन्नपूर्णाबाई चिंचणीकर ५३
अमृतरावजी थत्ते ५४
अंडरसनसाहेब ४६, ५६, ७५, ८०, ८१, ८३, ८४, ९५, ९६, १०२, १०३
अन्या रामोशी ९७
अंताजी मल्हार दप्तरदार मिरज किल्ला ४८

आ

आकप्पा देसाई ४४
आनंदराव पालेकर ४६
आनंदराव माने बारगीर ७७
आपा अनगळ सातारकर ७३
आपासाहेब भोसले छत्रपति १००
आपा महात ६२
आपा भट म्हैसकर ५०
आपासाहेब सांगलीकर (चिंतामणराव आप्पा) १, २, ४, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, २१, २२, २३, २४, २८, ३२, ३७
आपा भागवत बनीकोपचा ३२
आपा रायटर १२
आपा फडणीस १२
आपाजीराव देसाई जांबोटीकर १३
आपाजीपंत रानडे २६
आबा चोळीकर १७
आबा जोग ४८
आबासाहेब कुरुंदवाडकर २, १४
आबाजी गणेश करमरकर ८०
आवडाक्का २, १६, २०, ५७, ९३
आवडी मिरजकर ६७
आवडी करवीरकर ६८
आण्णासाहेब मिरजमळा ७५
आण्णा वैद्य बर्वे इसलामपूरकर ८२
आण्णा गोसावी मंगळवेढेकर ७२, ७४
आण्णा देशपांडे १६
आण्णासाहेब मिरजकर २, ३७

इ

इनवर्ड साहेब ११, १३, १७
इनवरारीट साहेब ७५, ८२, ८३, ८५, ८६, ८८
इमाम नायकीण ७१, ७३
इमाम बहुरूपी १००

उ

उजिटसाहेब ५५, ५६
उंटसाहेब ३, ९, ११, १३
उटरामसाहेब १२
उद्धव नाईक तबीब ३०

ए

एकप्पा नाडगौडा ३६

क

काशिनाथ गंगाधर कानिटकर १००
काशिनाथपंत खोत सहस्त्रबुद्धे ६९
काशिनाथपंत दाजी मायदेव ६०
काशिनाथपंत भिडे बावा ७१
किंचन गौडा देसाई ३८
कुशाबा परीट चाबुकस्वार ६६, ६९

कुशाबा नाना लिमये पंतोजी ४५
कुशी कसबीग ९
केशव लक्ष्मण मोडक ४४
कृष्णराव आपटे मामलेदार पेटा वाळवे १०७, २२
कृष्णराव आपटे (दु. बा. चे सरदार वामनराव आपट्यांचे पुत्र) ९९
कृष्णशास्त्री जोशी वरखंडकर ८८
कृष्णाजी त्रिंबक परचुरे १०३
कृष्णाजीपंत कारकून नि॥ लिंगोपंत निपाणकर ९७
कृष्णाजीपंत मोकाशी ५६
कृष्णाजीपंत रोटे पटवर्धन ६८
कृष्णराव हुळगोळ ३९
केशवराव तात्यासाहेब इचलकरंजीकर ५२, ७७
केशवराव लागू ३३
कोंडोपंत सहस्रबुद्धे १०५
कोल्हटकर (कारभारी) ६८
कृष्णराव हुळगोळ २३, २५, २७, २८
कोन्हेरराव पेठे (बाबा) २१, २२, २३,
कुंडलगीकर स्वामी २२
कोंडो रामानुज रायटर १०
कृष्णराव सरअमीन १२
केशवशास्त्री नि॥ स्वामी कुंडलगीकर २५, २८
केशवराव भाऊ ओक ३३
कायसनसाहेब २४
केंचवा ३४

ख

खरडेकर २
खंडेराव निंबाळकर ५४, ९६
खंडेराव फराटे मांडवगणकर ७७
खानाप्पा देसाई काकतीकर १५

ग

गमाजीपंत खाडिलकर ६०
गणपतराव नीळकंठ ६१
गणपतराव फराटे मांडवगणकर ७७
गणपतराव बाबा १०५
गणपतराव वासुदेव शीळकर ५३
गणपतराव विनायक पटवर्धन ५१
गणू शिंदा (काशीचा) ७३
गणेशपंत केळकर १०९
गणेशपंत मोडक १०८
गणेशपंत साठे ५१
गणेश रामचंद्र बिनीवाले ६३
गणेशशास्त्री हरीपूरकर ७४
गाडगीळ गोसावी पलुस्कर ६४
गणेश रामचंद्र मलठणकर १९
गणपतराव बाबासाहेब ११
गुरूनाथ गोसावी ६४
गुलाबी ३८, ६०, ६७, ६८, ७३
गोवाजी चाबूकस्वार ६६
गोपाळ बल्लाळ करंदीकर ६२
गोविंदपंत नि॥ प्रतिनिधी ५८, ५९,
गोविंदराव गारडीकर ६१
गोविंदराव निगडे ३६
गोविंदराव नाना भिलवडीकर ५६, ७९, ८२
गोविंदराव म्हैसकर ८३
गोविंद हरी बिनीवाले ३५, ५८, ५९
गोविंदसिंग रजपूत ४३
गोपाळपंत उचगांवकर ५७
गोपाळपंत बावधनकर ५३, १०३
गोपाळराव म्हैसकर अखबारनीस ५२

गोपीनाथ दादा आगाशे वाईकर ५७, ८०
गोळपकर जोशी ब्रह्मचारी ९८
गंगाधर बाळासाहेब मिरजकर ६५
गंगाबाई चिंचणीकर ५३
गंगाबाई वहिनी ७६, ३,
गंगाराम ७८
ग्रामसाहेब ५९, ८३, १, २
गणपतराव भोसले ३६
गणेश रघुनाथ तळावली ३९

घ

घुडण नगारची १०५

च

चितांबर रामचंद्र कुळकर्णी ३६
चिंतामण जोतिषी सातारकर ८९
चिंतामण दीक्षित ९१
चिंतामण दीक्षित आपटे ९५
चिंतामणराव आप्पासाहेब ७६
चिंतामणराव सदाशिव ८२
चिंतोपंत गोखले ६२
चिंतोपंत देशमुख ५९
चापाजी विश्वनाथ खुसमस्करे ५५
चिमणाराम ७८
चिमणासाहेब छत्रपति ४७

ज

जगन्नाथ शास्त्री ३३
जगोबा गारडीकर ६९
जनार्दन कृष्ण केळकर ५१
जानूबाई निपाणकर सर लस्करची बायको ९०
जिनगौडा जैन चाबुकस्वार ८६
जिवनराव देशपांडे ८२
जिवाजी गोपाळ जोग ४८
जोति गुरव डवरी नरगुंदकर ७२, ७४

ठ

ठाकुरदास बाबाचा पुत्र ९४

त

ताईसाहेब जमखंडीकरीण ८३
तात्या पुराणिक ६६
तात्या सप्रे ८६
तात्यासाहेब ३५, ३८, ४९
तात्यासाहेब इचलकरंजीकर ८५, ९२
तिमाप्पा नाईक धारवाडकर ५७
त्रिंबकपंत फडके ८१
त्रिंबकपंत सहस्रबुद्धे ५२

द

दत्तोपंतभाऊ पिंगळे ७२
दाजी मोरेश्वर कुळकर्णी ५६
दाजी विनायक सहस्रबुद्धे ५४
दाजीबा गोडबोले पुणेकर ५८
दाजीबा गोळे पुणेकर ६६
दाजीबा लिमये ७०
दाजीबा जोसीराव ४७
दादा मनोळीकर ८४, ८६
दादा दातार पुराणिक ४८
दामोदरपंत, नाना फडणिसांचे दायाद ९३
दामोदरपंत भानू पुणेकर ९७
दामोदरपंत देशमुख, माधवराव देशमुखांचे चुलते ८८
दिनकर भाऊ सोहोनी ९०
दिनकरपंत भाऊ गोखले ४८
देवराव निंबाळकर रुस्तम दौला ५४
देशिंगकर घोरपडे ३६
धर्मराव देसाई काकतीकर ७७

न

नरभट वैद्यजोसी ४८
नरसिंगराव देसाई ५६, ५९

नरसोपंत दि॥ छत्रपती सातारा ५०
नागोपंत बापट ६३, ५८, ६७
नाथाजी शिंदे मळणगांवकर ९०
नाना आपटे निंबकर ५७
नाना काळे फडणीस तासगांवकर १०३
नाना फडणीस १०६
नाना मायदेव ४८, ६०, ९१
नाना नातू, बाळाजीपंताचा पुत्र ८६
नाना शिंदे बेदरकर १०९
नाराप्पा नाईक धारवाडकर ५७
नारायण दीक्षित ५१
नारायण दीक्षित मराठे वसईकर ७१
नारायण महाराज ९०
नारायणराव कृष्ण मंगळवेढेकर ५०
नारायणराव दादासाहेब मिरजकर ७७
नारोपंत पटवर्धन ६९
नारोपंत बापट ६३
नारो सदाशिव दांडेकर ५२
नूरबक्ष गवई ७३
नैनी नायकीण ७३

प

परशराम गणेश पटवर्धन ८२
पंचाप्पा उमदी ५२
पारो शेणवी ७०
पाटलू मोहिता ६५
पांडुरंग भट पंचाक्षरी ५१
पांडुरंगराव आप्पा मंगळवेढेकर ६०
पांडोबा भाऊ (बाळाजीपंत नातूचा कनिष्ठ बंधू) ८६
पांडोबा जोसी सोलापूरकर राम जोशाचा नातू ७१, ७२, ७५
पिराजी गडेकरी १०२
पुरुषोत्तम शास्त्री खरडेकर पुराणिक ८९, ९०
पुरुषोत्तम नाइक जोशी ७८
पुरुषोत्तम भास्कर दाजीबा लिमये ६२
प्रतिनिधी कराडकर १०६
प्रभाकर शास्त्री मुनसफ ७६
प्रभाकरपंत आठवले मिरजकर ९८

ब

बचूबाई गोळी ६६
बडेखान सारंगीवाला ६१
बळवंतराव आठवले, दु. बाजीरावांचे सासरे ५९
बाजीराव दुसरे ६५, ६६
बापू आठवले ५९, ९४
बापू गर्दे ५८
बाबा गाडगीळ ५३
बाबाजी गाडगीळ ५१
बाबाजी सहस्रबुद्धे ५७
बाबाजी सोनी ५४, ५९
बापू पवार भादुलेकर खिजमतगार ७४
बापूजी त्रिंबक परचुरे १०३
बाबा भावे ६५, ६७
बाबाजीभट जोशी वरखंडकर ८८
बायजाबाई शिंदे ५६, ५९, ९३
बाळाजी दामोदर ६९
बाळाजीपंत गोडबोले १०४
बाळाजीपंत नातू ८३, ८४, ८६, ८७ ८८, ९०, १००, १०९
बाळाजीपंत मराठे ६०
बाळासाहेब मिरजकर ५०, ५६
बाळासाहेब रास्ते ६८
बाळमुकुन्द मारवाडी ८१
बाळकृष्ण रघुनाथ लेले ८०

बाळंभट काळे ९१
बाळंभट वाटवे खाशांचे पुरोहित ८४
बाळाचार्य मुद्गल ७९
बाळाचार्य वाईकर ६३
बाळाराव सेनापती सातारकर ७७
बांगडी कसबीण ५७
बिंदु माधवाचार्य ६१
बुवासाहेब छत्रपति सातारकर ७७
ब्रम्हनाळकर गोसावी ६४,७५

भ

भवान सिंग ६१, ७८, ५५, ८३, ९६
भवानी पवारीण नि॥ रावरंभा ५४
भाऊ महाराज गुरू करविरकर १०५
भाऊ लागू १०९
भाऊ वागळे ६२
भाऊ वाठारकर निंबाळकर ५१
भाऊ सरनोबत ५८, ६९, ८२
भाऊसाहेब ४९,१०७
भाऊसाहेब तासगांवकर ६८
भास्करराव लक्ष्मण किल्लेदार ९६
भास्करपंत जोशी ७३
भिकाजी हरी पटवर्धन ५७
भीमराव सुंडरगी ७७
भीमराव भट लाटकर ७९
भीमराव जालीहाळकर ८१

म

मनसागिरि बावा गोसावी ९०
मार्तंड शामजी उप्पनवाडीकर ९३
माधवदाजी चिंचगीकर ७५, ६६, ८३
माधवराव जोशी ८८
माधव रामचंद्र जोशी मेणवलीकर ९०
माधवराव सिधये देशमुख ६८
मानसिंगराव भोसले करवीर ९०
महादाजी सदाशिव गडेकर १०२
मिराभाई वैद्य ९१, ९४, १००, ६९, ७०
मोरोबा आबासाहेब ७३
मोरोपंत गोखले ८३,७३
मोरोपंत लेले ५१,५३,७०,
मौनीबाबा नरसोबाडी ५१

य

यशवंतराव जोग तासगावकर ८०
यशवंतराव जोसी सखदेव ६८
यश्वदाबाई (चिंतामणरावांची ३ री पत्नी) ७५
यज्ञेश्वर दीक्षित वाईकर ९८
येसू बिन बापू मोहिता ६३

र

रघुनाथ भट केळकर ६२
रघुनाथराव दादासाहेब ७८
रघुनाथ हणमाजीभाऊ सरनोबत ८९
राधा (शिवरामाची) ६७, ७३, ७४, ८९
रमा नाइकीण ७३
रामजोशी कवी ६०
रामभाऊ कापसे नि॥ नानाफडणीस ९२
रामभाऊ भिडे सातारकर ७८
रामभाऊ सहस्त्रबुध्धे ७५, ९७
रामचंद्र आप्पासाहेब मिरजमळा ७४
रामचंद्र जोशी नि॥ नानाफडणीस ८३, ८४
रामचंद्र विश्वनाथ सहस्त्रबुध्धे १००
रामचंद्रपंत आगाशे ६१
रामराव अखबारनीस ६०
रामराव पेठे ५५, ५४
रामराव देसाई ५६, ५९
रामजी नाइक भिडे ६१, ७८

रामाजी भगवंत सांगलीकर ८०
रामाजीपंत जालीहाळकर ८१
रामाजीपंत वाडेकर ७७
राम्या रामोसी ९७
राघोपंत काळे ७८
राघोपंत गोखले नि॥ जिऊबाई मेणवलीकर ९९
राघोपंतभाऊ करमरकर ७४
राघोबा बापट गवई ७४
राबिनसन साहेब ६७
रावजीराव पटवर्धन ६६
रंगाप्पा हलकारा ६३

ल

लक्ष्मण नाईक धारवाडकर ५७
लक्ष्मणराव आप्पासाहेब ६४
लक्ष्मणराव आण्णासाहेब ७४
लक्ष्मणपंत बाबा नादुसरकर ६७
लक्ष्मीबाई प्रतिनिधी ८१, १०६
लिजिट साहेब ६४
लिंगू राजमाने गुलाबीचा भाऊ ७९
लिंगोपंत निपाणीकर ८७

व

वामनाजीपंत रानडे शेखदार ५९
वासुदेवबाबा म्हैसकर ५०
वासुदेवशास्त्री जुन्नरकर ९०
विश्वासराव तात्या ५८
विठ्ठलपंत रोडे चितारी ८५
विठ्ठलराव बापूसाहेब ६६, १०१
विठानाइकीण ७३
विनायक जनार्दन केळकर ५१
विनायकभट कळंबकर त्रिंबकेश्वर उपाध्ये ५३
विनायकराव कुरुंदवाडकर ५१
विनायकराव खाडीलकर ८५
विनायकराव देशमुख सिधये ९१
विनायक पंडित ७३, ५६, ६५
विष्णू नाईक मोडक ७८
विष्णुशास्त्री गाडगीळ ८०
विष्णुपंत जोसी नि॥ अंडरसन ९६
विष्णुभट खाडिलकर ८७
विसाजी धोंडदेव आपटे जमखंडीकर ७६
व्यंकटराव तात्यासाहेब ८६
व्यंकटराव देशपांडे ८२
व्यंकटराव मंत्री बागणीकर ८२, ८५
व्यंकाजी धोंडदेव मंगळवेढेकर ५९

श

शंकराचार्य संकेश्वर ७९
शिवराम नाईक बेंकापुरे ५१
शिवरावमभाऊ वैद्य ८२
शिवरामपंत अण्णीगिरीकर ९१
शिवगिरी गोसावी ९०
श्रीधर नाईक देसाई ७८
श्रीपाद जोशी इचलकरंजीकर ८८

स

सखारामपंत गोडसे गवई ७९, ६७, ४९, ५७
सखारामपंत जालेहालकर १०५
सखोपंत गोरे मामा ९०
सखोपंत जोगळेकर नि॥ निसबटसाहेब ७४
सदाशिवभट जोसी जटापाठी ८८
सदोबा मामा रानडे भिकाजी बाबा रानडे यांचे चिरंजीव ८०
सयाजीराव बडोदेकर ८६

सरस्वती (नाइकीण) १०६
सरदारमल्ल ७८
सहजानंद बाबा ७९
सावनूरकर स्वामी ५७
सुलतानबा बिन बळवंतराव बाबर गारडीकर ६९

ह

हणमंतराव बाबर ६९
हरी त्रिंबक परचुरे १०३
हरी रामचंद्र दाते ९६
हरीपंत गोखले इचलकरंजी ७५
हरीहरराव दादा लागू ४९, ५०, ६५, ७९

५५ शिवचरित्रसाहित्य, खंड ८ १—५०
*५५ अ, शिवचरित्रसाहित्य, खंड ५ ३—५०
५६ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड४ २—०
५७ ऐ. संकीर्ण वाङ्मय साहित्य,खंड१ १—५०
५८ शिवकालीन दंडनीति (वा.सि. बेंद्रे) ३—०
५९ पुणेंनगरसंशोधनवृत्त,खं.२(चिं ग.कर्वे)१-५०
६० ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड१ १-५०
६१ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य,खंड५ १-५०
६२ शिवचरित्रसाहित्य, खंड ९ (शां. वि. आवळसकर) १—५०
६३ हिंगणे दप्तर, खंड १ (ग. ह. खरे) ३--०
६४ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य,खंड६ १-५०
६५ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड३ २—०
६६ पुणें नगरसंशोधनवृत्त खंड ३ १—५०
६७ महाराष्ट्रांतील कांहीं ताम्रपट व शिलालेख (डॉ. मो. गं. दीक्षित) ३—०
६८ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड७ २--०
६९ ऐतिहासिक संकीर्ण निबंध,खंड २ ३--०
७० हिंगणे दप्तर, खंड २ (ग. ह. खरे) ३--०
७१ आंग्रेकालीन पत्रव्यवहार (शां. वि. आवळसकर) ३—०
७२ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड४ २-५०
७३ पेठे दप्तर, भाग १ (वि.सि.चितळे) ३-०
७४ Explorations at Karad 5—0
७५ संभाजीकालीन पत्रसारसंग्रह व शकावली (शं. ना. जोशी) ३—०
*७६ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खंड ३ (ग. ह. खरे) ३—०
७७ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ४ (ग. ह. खरे) ३—०
७८ पेठे दप्तर, भाग २ (वि.सि.चितळे) ३-०
७९ पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार (रा. वि. ओतुरकर) ३—०
८० इतिहासकर्ते मराठे (ग. ह. खरे) २—०
८१ दाभाडे दप्तर, खंड१ (शं.ना.जोशी) ३-०
८२ दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें, खं. ४ (डॉ.मो. गं. दीक्षित) ३-०
८३ पुणें नगरसंशोधनवृत्त, खंड ४ २—०
८४ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ५ ३-०
८५ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ८ (द. वा. पोतदार) ३—०
८६ शिवचरित्रसाहित्य, खंड १० (शां. वि. आवळसकर) ३—०
८७ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड९ ३-० (शं. ना. जोशी)
८८ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ६ ५-०
८९ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड१० ५-० (शां. वि. आवळसकर)
९० शिवचरित्रसाहित्य खंड ११ (ग. ह. खरे) ५—०
९१ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ११ (य. न. केळकर) ५—०
९२ भारत–इतिहास–संशोधक–मण्डलस्थ–हस्तलिखित–ग्रन्थानुक्रमणिका (ग. ह. खरे) १५—०
९३ ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ५, भाग १ (ग. ह. खरे) ६—०
९४, ९५ शिवचरित्रसाहित्य, खंड १२ व १३ (ग. ह. खरे) अनुक्रमें ५ व ६
९६ ऐतिहासिक संकीर्ण निबंध,खंड ७ ५—०
९७ ऐतिहासिक संकीर्ण निबंध,खंड८ ५—०

मंडळ त्रैमासिक पुस्तकें १ ते ४५, प्रत्येकीं ५ रु.; याशिवाय सर्व प्रकारचीं ऐतिहासिक पुस्तकें मिळवून देण्याची खटपट केली जाईल; तारकांकित पुस्तकें अप्राप्य; पण क्र. ३५, ३८, ४०–४३, ४६, ५१, ५४ अ, ५५ अ, ७६ हीं त्रैमासिकांत भागशः प्रकाशित झालीं आहेत; स्वीय मालेंतील पुस्तकांच्या खरेदीवर खालीं दिल्याप्रमाणें सवलत मिळेल—
२५–५० रु. = १० टक्के; ५१–१०० रु. = १२॥ टक्के; १०१ रु. व पुढें = १५ टक्के.

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिकाची केंद्र सरकारच्या नियमानुसार द्यावयाची माहिती (१९५६ चे नियम, नियम ८, नमुना ४)

१	प्रकाशनस्थळ—	भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २
२	प्रकाशनकाल—	त्रैमासिक
३	मुद्रकाचें नांव, राष्ट्रीयत्व व पत्ता	दत्तात्रेय वासुदेव आंबेकर, भारतीय, आर्यभूषण मुद्रणालय, ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४
४,५	प्रकाशक व साधारण संपादक यांचीं नांवें, राष्ट्रीयत्व व पत्ते	श्री. गणेश हरि खरे, श्री. विश्वनाथ त्र्यंबक शेटे, डॉ. बाळकृष्ण मोरेश्वर कानिटकर, भारतीय, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २
६	मालक व पत्ता—	भारत इतिहास संशोधक मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें २

आम्ही उपर्युक्त तिघे प्रकट करतों कीं, आमची माहिती व विश्वास यांप्रमाणें वर दिलेला तपशील अचूक आहे.

ता. ८।७।१९६७ **ग. ह. खरे, वि. त्र्यं. शेटे, बा. मो. कानिटकर**

मुद्रक : द. वा. आंबेकर, आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४
प्रकाशक : ग. ह. खरे, वि. त्र्यं. शेटे, बा. मो. कानिटकर,
१३२१ सदाशिव पेठ, पुणें २